



माझें बारा वर्षांचें काम

उर्फ

ज्ञानकोशमंडळाचा इतिहास



लेखक व प्रकाशक

डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर एम्. ए. पीएच्. डी.

REFBK-0003403

१९२७

किंमत दीड रुपया.

मुद्रक—डॉ. श्री. व्यं. केतकर, ज्ञानकोश प्रेस, ८४१ सदाशिव पुणें.

अनुक्रमणिका

मूलग्रंथ

प्रकरणें	पृष्ठ
१ प्रास्ताविक	१
२ कल्पनेची उत्पत्ति	४
३ स्थापनेनंतरचें दीड वर्ष	३२
४ नागपूर येथील इतिहास	३९
५ पुणें येथील पहिलीं तीन वर्षें	६८
६ मुद्रणाचा इतिहास	९०
७ गिऱ्हाईकी	९८
८ संपादकीय वृत्ति	१०४
९ संपादकीय अंतर्व्यवस्था	१२३
१० ज्ञानकोश आणि वैदिक संशोधन	१३९
११ मुद्रणकालांतील संपादन	१४६
१२ ज्ञानकोश आणि वैयक्तिक प्राप्ति	१५२
१३ ज्ञानकोशाच्या कार्यांतील माझे साहाय्यक	१५६
१४ ज्ञानकोश व महमद प्रकरण	१६९
१५ उपसंहार	१८३

परिशिष्टें

१ घटनेंचीं योजना	१
२ संपादनखात्याचे नियम	२८
३ कार्यक्रमाबद्दल संपादकीय योजना	३०
४ द्रव्याभावामुळें दप्तरांतच राहिलेली योजना	३३
५ धर्मशास्त्रीय प्रश्न व ज्ञानकोशकारांची अडचण	३५
६ व्यापारी वर्गास विनंति	३८
७ महाराष्ट्रांतील नृत्याभिज्ञ स्त्रीपुरुषांस प्रश्न	४०
८ सर्व जातींच्या पुढाऱ्यांस विनंति	४३
९ वाचनालयास ग्रंथालय जोडण्याची योजना	४५
१० कार्याचें धोरण आणि पद्धति	४७
११ ज्ञानकोशसंस्थेची संपत्ति व तिचें शिक्षणसंस्था व ज्ञानोत्पादक संस्था या दृष्टीनें अवलोकन	५०
१२ पाध्ये यांचे आक्षेप	५७
१३ आक्षेपांस उत्तर	७०
१४ पाध्ये यांचें प्रत्युत्तर	७५
१५ ग्रंथोत्पत्तीनंतर टीका— स्वतंत्र हिंदी अर्थ-शास्त्राची आवश्यकता	८१
१६ महाराष्ट्रकाव्य व ज्ञानकोश	९१
१७ जर्मन शब्दांचे उच्चार	९८
१८ परकीय शब्दांचे उच्चार	१०१
१९ केसरीकारांची ज्ञान-कोशविषयक वृत्ति	१०४
२० ज्ञानकोश आणि जाति विषयक वादविवाद	१२८

प्रस्तावना

माझें गेल्या बारा वर्षांतील काम उर्फ ज्ञानकोशमंडळाचा इतिहास हा देण्याचा प्रयत्न येथें करीत आहे. या इतिहासामध्यें वाचकांस उपयुक्त भाग कांहीं आहे काय हें वाचकच सांगूं शकतील. हें पुस्तकं लिहितांना मी आपल्या मनांत हें कोणासाठीं लिहीत आहे असें विचारल्यास असें सांगतां येईल कीं ज्ञानकोशासारखा मोठा ग्रंथ करूं इच्छिणारा जो कोणी असेल त्यास आपला अनुभव सांगावा अशी कल्पना मनांत ठेवून हें पुस्तक लिहिलें आहे. हें केवळ आत्मचरित्रात्मक पुस्तक नव्हे. आत्मचरित्रात्मक पुस्तक लिहावयाचें असतें तर ज्ञानकोशाच्या धंद्याशीं असंबद्ध अशा वैयक्तिक गोष्टी सविस्तर मांडल्या असत्या व त्या लोकांस वाचणुकीच्याहि झाल्या असत्या. मी त्यांत आपली संपूर्ण लेखनविषयक कामगिरीहि मांडली नाहीं. कारण ती मांडावयाची असती तर तींत माझ्या कादंबऱ्यांचा उल्लेख करावा लागला असता व त्यांचें स्वागत निरनिराळ्या लोकांकडून कसकसें झालें, त्यांची तरफदारी व निंदा करणारी मंडळी कोणकोणत्या प्रकारची म्हणजे कोणकाणत्या पूर्वग्रहाची होती इत्यादि गोष्टींविषयी चर्चा करावी लागली असती, माझ्या लग्नाच्या वेळच्या वर्तमानपत्रांतील टीका वगैरे गोष्टींस स्थल द्यावें लागलें असतें. अर्थात हें पुस्तक लिहितांना दृष्टि अगदीं नियमित ठेवली आहे. भावी ज्ञानकोशकारास जी जी माहिती उपयोगी पडेल असें वाटलें ती ती सर्व माहिती एकत्र करून यांत घातली आहे. ज्ञानकोशाच्या पुनर्मुद्रणाचा प्रसंग सुमारें २०।२५ वर्षांनीं येईल त्यावेळस माझा अनुभव सांगण्यास मी असेनच अशी खात्री नाहीं व त्या वेळेस आजच्या आठवणी नाहींशा होतील व आजचीं साधनेंहि नाहींशीं होतील. तर आपल्या आठवणी ताज्या आहेत तोंपर्यंत जितक्या पद्धतशीर लिहून काढतां येतील तितक्या लिहून काढाव्या हें अवश्य आहे.

इतिहास सांगावयाचा म्हणजे विसरलेलीं भांडणें पुन्हां उकरून काढावयाचीं असेंहि होतें आणि आज मी पाठीमागच्या भांडणांचा जो इतिहास दिला आहे त्याचा हेतु एका काळीं जो पक्ष माझ्या विरुद्ध होता त्या पक्षाविरुद्ध लोकमत बनवावें असा नाहीं आणि मी स्वत:

तर विरुद्धपक्षानें जे मला अपाय केले त्याविषयींचा विषाद सोडून दिला आहे. तें भांडणें देण्याचा हेतु एवढाच कीं एखाद्या सत्कार्यांत देखील द्वैत कसें उत्पन्न होतें हें लोकांस कळावें व आज जे लोक आपले मित्र आहेत ते उद्यां शत्रू होऊं नयेत याबद्दल जी काय खबरदारी घ्यावयाची ती घ्यावी—एवढाच आहे. विरुद्ध पक्षाच्या मंडळीच्या विरुद्ध मी कोणतेंहि अमृत्य लिहिलें नाहीं. किंबहुना त्यांची बाजू त्यांच्या तर्फेनें जितकी समजून घेतां येईल तितकी घ्यावी अशा तऱ्हेचा प्रयत्न मनाशीं करून इतिहास दिला आहे. इतकें करूनहि त्यांस जर अन्याय झाला असेल तर तो माझ्या गैरसमजुतीमुळें झाला आहे, इच्छेमुळें झाला नाहीं असें समजावें.

परिशिष्टांत ज्ञानकोशाच्या अंतर्गत व्यवस्थेसंबंधानें माहिती देणारीं अनेक पत्रकें छापलीं आहेत व त्याबरोबर अनेक टीकाहि प्रसिद्ध केल्या आहेत. खरोखर महत्त्वाच्या टीका आतां यापुढेंच व्हावयाच्या. जितक्या अधिक टीका होतील तितक्या त्या आमच्या हिताच्याच होतील असें मी समजतों. आमच्याविरुद्ध होणाऱ्या टीकांचे पुनर्मुद्रण आम्ही मुद्दाम केलें आहे, त्यावरून आम्ही विरुद्ध टीकांचें किती प्रेमानें स्वागत करतों हेंहि वाचकांनां दिसून येईल. व येथें मी टीकाकारांस असें जाहीरपणें आव्हान करतों कीं टीकाकारांनीं आपली टीका आमच्याकडे पाठविण्यास कधीं विसरूं नये. सर्व टीकांचा संग्रह करून त्या पुनरावृत्ति काढणाराच्या हातीं द्यावयाच्या आहेत.

श्रीधर व्यंकटेश केतकर

ज्ञानकोशमंडळांतील कार्यकर्ते

जून १९२०



डॉ. केतकर यांचे वडील व मातुश्री



५० वर्षांपूर्वीच्या फोटोवरून.

डॉ. केतकर यांचे बंधूंचें कुटुंब



माझें बाराव्या वर्षाचें काम

उर्फ

ज्ञानकोशमंडळाचा इतिहास

मराठी ग्रंथालय संग्रहालय ठाणे
क्र. 3405

प्रकरण १ लें.

प्रास्ताविक

ज्ञानकोशमंडळाचा इतिहास लिहावा आणि त्यामध्यें ज्ञानकोश तयार करण्याच्या कामामध्यें जे मला अनुभव आले ते एके ठिकाणीं ग्रथन करून ठेवावेत असें ज्ञानकोशमंडळाच्या अनेक हितचिंतकांकडून आणि अभिमानी मंडळीकडून लिहून आलें. माझ्याहि मनांत हा इतिहास लिहावा अशी इच्छा होती, आणि त्यामुळें ही सूचना आली ती माझ्या मनांतील इच्छतच व्यक्त करणारी होती असें मला वाटलें. ज्ञानकोशमंडळाचा इतिहास लिहावयाचा म्हटला म्हणजे आत्मप्रशंसा सपाटून करावयाची एवढेंच त्या पुस्तकाचें स्वरूप ठेवावें अशी मात्र इच्छा नाहीं. जेव्हां लेखक आपल्या कामाविषयीं लिहिणार तेव्हां मी किती हुषार आहें हें दाखविण्याची तो संधी घेणारच व हा आत्मप्रशंसा करणारा लेखक आहे म्हणून इतर मंडळी त्याची टर उडविणार. या सर्व गोष्टी लक्षांत ठेऊन कथनास प्रारंभ केला पाहिजे. आत्मचरित्रात्मक लेख लिहिण्याचें दुसरें एक कारण असें असतें कीं आत्मचरित्रकारास ज्या व्यक्तींनीं वोच-कारलें असेल त्यांचें त्याबद्दल उट्टें काढणें किंवा त्या आत्मचरित्रकारावर जे दोषारोप झाले असतील त्यांपासून आपला बचाव करणें या गोष्टी करण्यासाठीं त्यास संधी मिळते.

आत्मप्रशंसेची ही अत्यंत स्वाभाविक संधी मी मुळींच गमावूं इच्छीत नाहीं. एवढें मात्र खरें कीं एखादें काम पुरें झाल्यानंतर आपण पाठी-मागच्या इतिहासाकडे जेव्हां पाहूं लागतों, तेव्हां आपले व इतरांचे जे पूर्वी प्रसंग घडले असतील त्यांविषयीं आपण अधिक निर्विकार बुद्धीनें पाहूं लागतों, आणि यामुळें कार्य संपूर्ण झाल्यानंतरच्या इतिहास लेखास केवळ आपली स्तुति व इतरांस शिव्या यांच्या संग्रहाचें स्वरूप येत नाहीं.

ज्ञानकोश ही एक यशस्वी कामगिरी होय. अनेक योजना तयार होतात त्यांपैकीं कांहीं अनेक अडचणींमुळें कागदावरच राहतात. कांहीं योजनांस

प्रारंभ होतो व त्यासंबंधानें काम मध्येंच पडून रहातें. यामुळें जें काम यशस्वी होतें त्या कामाकडे लोकांचें लक्ष सहज अधिक जातें. आणि तें काम यशस्वी तऱ्हेनें कसें पार पडलें याविषयीं जिज्ञासा होते. आणि ह्या जिज्ञासेमुळेंच काम फत्ते करणारास आत्मप्रशंसा करण्याचा अधिकार आहे असें समजून ती करण्याची संधी उत्सुक श्रोते आनंदानें देतात. मी या संधीचा पूर्ण उपयोग करून घेण्याचें येथें योजिलें आहे. खरोखर पहातां ज्ञानकोशाचें काम फत्ते झाले ही गोष्ट महाराष्ट्रीय परंपरेशीं विसंगत नाहीं. ज्या काळांत महाराष्ट्रीयांनीं अर्ध्याअधिक हिंदुस्थानावर राज्य केलें, दोन तीन लाख फौज लढाईवर नेली तो काल गेल्यामुळें आतां अगदीं सामान्य कृति करणाऱ्यास देखील महत्त्व आलें आहे; त्यामुळें बऱ्याच लोकांस ही कामगिरी मोठी वाटत असेल. पण विचार करतां या काळांत देखील ही कामगिरी केवळ अपूर्व नाहीं.

ग्रंथस्वरूपाचीं मोठमोठालीं काम करणाऱ्या मंडळींचीं उदाहरणें यापूर्वीच झालीं आहेत. वामनराव आपटे यांचे कोश पहावे किंवा रघुनाथ शास्त्री गोडबोले यांचे प्राचीन व अर्वाचीन कोश पहावे. त्याचप्रमाणें गीर्वाणलघुकोशकार ओक व निळोपंत रानडे यांचे कोश पहावे, तर असें दिसून येईल कीं हीं सर्व कामें त्या त्या मंडळींनीं तडीस नेलीं आहेत. चिपळूणकर मंडळीच्या रा. ठकारांनी महाभारताच्या भाषांतराच्या प्रसिद्धीचें कामहि तडीस नेलें आहे. या अनेक गोष्टींवरून एखादा मोठा सुंदर ग्रंथ तयार करण्याचें काम करावयास महाराष्ट्र असमर्थ आहे अशांतला भाग नव्हे. ज्ञानकोशाचें काम इतर कामापेक्षां अधिक मोठें होतें व त्यामुळें त्यांत अडचणीहि जास्त होत्या पण हा ग्रंथ तयार करण्यास अवश्य असणारें व्यवहाराचें पूर्वशिक्षण या कार्याच्या योजकापाशीं अधिक होतें. त्यामुळें जास्त मोठें काम हातीं घेऊन तें काम पार पाडतां आलें. अनेक अडचणी आल्या असतां त्यांच्यांतून पार पडून आपलें काम शेवटास नेण्यास लागणारी चिकाटी रा. वामनराव आपटे रानडे किंवा ज. वि. ओक यांच्यामध्यें माझ्यापेक्षां कमी होती असें मला मुळींच वाटत नाहीं. ती जर त्यांचेपाशीं नसती तर त्यांच्याकडून झाली ती कामगिरी झालीच नसती. त्यांच्या व माझ्या कामांमध्यें मला मुख्य फरक दिसतो तो केवळ उद्दिष्ट हेतूस व्यावहारिक स्वरूप कसें द्यावयाचें या बाबतींतला आहे. "आरंभशूराः खलु दाक्षिणात्याः" हें वाक्य केव्हां

कोठें उत्पन्न झालें असेल तें असो. आजच्या महाराष्ट्रासंबंधानें तें मुळींच लागू नाहीं. इतर प्रांतांपेक्षां महाराष्ट्रामध्यें आरंभ केलेलें दीर्घ काम पुरें करण्याची चिकाटी जास्तच आहे असें अनेक प्रांतांचें अवलोकन करतां म्हणतां येईल. जरी महाराष्ट्रांतली मंडळी कामें तडीस नेणारी आहेत तरी आपण कामें अर्धींच टाकणारे आहोंत असा खुद्द महाराष्ट्रीयांचा समज होण्यास कारण काय बरें आहे? माझ्या मतें मुख्य कारण असें आहे कीं तो दृग्भ्रम दुसऱ्याच एका अवलोकनामुळे उत्पन्न झालेला आहे. माणसें जीं कार्यें करतात त्यापेक्षां योजना जास्त करतात. आणि कार्यकर्तीं माणसें योजना करतात किंवा कामास आरंभ करतात त्यापैकीं कांहीं नियमित योजनांच यशस्वी होतात. जेव्हां आपण एखाद्या लोकांविषयीं विचार करूं लागतो तेव्हां त्या लोकांच्या फसलेल्या योजनांवरून किंमत न करतां त्यांच्या पार पडलेल्या योजनांवरूनच किंमत केली पाहिजे. चिकाटीच्या बाबतींमध्यें महाराष्ट्र हिंदुस्थानांतील इतर लोकांपेक्षां खात्रीनें कमी नाहीं. जनता भोंवतालीं विरुद्ध असतां नेटानें काम करणारीं माणसें महाराष्ट्रांत आहेतच. प्रो. कर्वे यांनीं आपलें उद्दिष्ट काम करण्याचा नेट जितकीं वर्षें दाखविला तितकीं वर्षें मला दाखवितां आला तर मला खरोखरच आनंद वाटेल. दाखवितां येईल किंवा नाहीं हें भवितव्याच्या ढगांत दडलेलें आहे.

ज्ञानकोशाचें कार्य यशस्वी झालें आहे असें अजूनहि म्हणतां येत नाहीं. सध्यां सुमारें ३६००० च्या कर्जाची जबाबदारी माझ्यावर आहे. आणि या जबाबदारींतून जेव्हां मी पूर्ण मुक्त होईन तेव्हां मी आपलें कार्य यशस्वी तेव्हेनें संपविलें असें समजेन. सध्यां मला यशस्वितेवर हक्क सांगतां येणार नाहीं. हातीं घेतलेलें वाङ्मयात्मक कार्य पुरें झालें एवढें मात्र खरें.

ज्ञानकोशाच्या इतिहासाचीं अंगें अनेक आहेत. या इतिहासाचे साधारणपणें (१)कल्पनेची उत्पत्ति; (२) कार्यास प्रवृत्ती; (३) मंडळाची स्थापना; (४) संपादकीय कल्पना; (५) व्यावहारिक कल्पना; (६) नागपूर येथील इतिहास; (७) निरनिराळ्या लोकांचें साहाय्य; (८) कार्यांतील अडचणी; (९) संपादकांचा मुशाहिरा; (१०) ज्ञानकोश व जाती; (११) ज्ञानकोश व नवीन संशोधन; (१२) ज्ञानकोशकारांच्या दृष्टींचीं कांहीं अंगें; (१३) ज्ञानकोश आणि इतर वाङ्मय; (१४) ज्ञानकोशाची आर्थिक व्यवस्था;(१५) ज्ञानकोशांतील महत्त्वाचे कार्यकारी;(१६) ज्ञानकोशावरील

आक्षेपक; (१७) संपादकीय वैगुण्यें; (१८) मंडळाची पुनर्घटना या अनेक अंगांवर कांहीं टीपा लिहिल्यास त्यांत कांहीं उपयुक्त अनुभव सांठवून ठेवितां येईल असें वाटतें.

प्रकरण २ रें.

कल्पनेची उत्पत्ति

ज्ञानकोशाच्या कल्पनेचा प्रारंभ माझ्या मनांत केव्हां झाला याविषयीं आत्मपरीक्षण करितां असें आठवतें कीं. उमरावतीच्या सिटी लायब्ररींस तेथील एका विद्वान वकिलांनीं (रा. मोरोपंत मराठे?) एनसायक्लोपीडिया ब्रिटानिकाची एक प्रत नजर केली तेव्हांपासून झाला. यावेळेस म्हणजे १८९७ च्या सुमारास हीं पुस्तकें मीं प्रथम पाहिलीं आणि त्यावेळेस त्या ग्रंथाचा उपयोग करून घेण्याइतकें जरी माझें शिक्षण वाढलें नव्हतें तरी त्या ग्रंथाचें स्थूल स्वरूप माझ्या चांगलेंच लक्षांत आलें,आणि असा ग्रथ मराठींत असावा असें वाटलें. त्याच सुमारास एक मौजेची गोष्ट घडून आली ती अशी: मी हायस्कूलमध्यें असतां साधारण बहुश्रुत असा विद्यार्थी आहें अशी माझी प्रसिद्धि झाली होती आणि त्या प्रसिद्धीस कारण म्हटलें म्हणजे आमच्या वर्गाचे मास्तर रा. नारायण वामन थत्ते बी. ए. (हे पुढें महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचे ग्राहक झाले) यांनीं मला कौतुकानें "एनसाय-क्लोपीडिया" हें नांव दिलें. व त्यामुळें कांहीं स्नेहीमंडळी माझी थट्टा करण्याकरितां मला एनसायक्लोपीडिया म्हणूं लागली होती. या गोष्टीचा माझ्या मनावर प्रेरक परिणाम कितपत झाला असेल हें सागतां येत नाहीं; तथापि आत्मपरीक्षणास सुरवात झाल्यामुळें जी गोष्ट आठवली तिचा येथें उल्लेख केला आहे एवढेंच. एनसायक्लोपीडिया सारखा ग्रंथ मराठींत असावा असें त्यावेळेस मी कांहींजणापाशीं बोललों होतों हेंहि आठवतें. त्यानंतर मी एनसायक्लोपीडिया अगदीं विसरून गेलों होतों असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. तथापि १९०६ मध्यें म्हणजे प्रथम एनसायक्लोपीडिया पाहिल्यानंतर ९ वर्षांनीं अमेरिकेंतील कार्नेल युनिव्हर्सिटीमध्यें माझा प्रवेश झाला, आणि त्यावेळेस अनेक एनसायक्लोपीडिया वारंवार चाळण्याचें काम पडलें आणि त्यावेळेस देखील असे ग्रंथ मराठींत नाहींत याचें मला दुःख होत असे. तथापि कार्नेल युनिव्हर्सिटीमध्यें असतां या प्रकारच्या ग्रंथाची घडवणूक आपणच ध्यावी ही कल्पना मनांत उद्भवली नाही.

इ.स. १९०८ मध्यें दुसरी टर्म हॉर्वर्ड युनिव्हर्सिटीमध्यें होती.तेथें असतां सायक्लोपीडियाविषयीं विचार पुनः आला आणि त्यास कारणेंहि झालीं. नेल्सन कंपनीनें " लूज लीफ एनसायक्लोपीडिया " काढला होता आणि त्या एनसायक्लोपीडियाचा विक्रय करणारा एक गृहस्थ हार्वर्ड युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांमध्यें गिऱ्हाइकें मिळविण्यासाठीं आला. त्यावेळेस मी एम्. ए. झालेला होतों, आणि जातिभेदाच्या इतिहासाचा पहिला भाग लिहीत होतों. आणि त्यामुळें संशोधनपद्धतीशीं माझा परिचय झाला होता. आणि माझ्यांत एखादा लेख अगदीं आजतागाईत आहे किंवा नाहीं हें वाङ्मयसूचीसारखे संदर्भ ग्रंथ पाहून तपासण्याइतकें ज्ञान उत्पन्न झालें होतें. त्यावेळेस नेल्सन सायक्लोपीडियाच्या कंपनीनें अशी जाहिरात दिली होती कीं आमचा एनसायक्लोपीडिया घेतला तर तो मागसलेला कधींच रहाणार नाहीं; कारण जसजसे शोध होतील तसतशीं आम्ही नवीन पानें छापीत जाऊं, आणि जुन्या पानांच्या ऐवजीं तीं पानें घालण्याची संधी वाचकांस देऊं. या कंपनीच्या बाण्याचा उच्चार अर्थात् प्रचारकाकडून झाला आणि त्यामुळें मी त्यांचे लेख कितपत आजतागाईत आहेत त्याची तपासणी त्याच्या देखतच केली. तेव्हां त्या सायक्लोपीडियांतील वैशिष्ट्य खरोखर मजकुराचा आजतागाईतपणा नसून बांधणीत होतें हें माझ्या चांगलेंच नजरेस आलें. त्या सायक्लोपीडियांतील प्रत्येक पान स्वतंत्र होत; आणि पाठीला शिवण नव्हती तर प्रत्येक पानास बाजूला मोठालीं भोकें पाडलीं होतीं व तीं भोकें जाडी तार किंवा सळई जाईल अशा बेताचीं होतीं व ती सर्व पानें सळईनें ओंवलीं होतीं, म्हणजे त्यांत वाटेल तेव्हां वाटेल तें पान काढून टाकून नवीन पान घालतां यावें अशी सोय केली होती. केवळ ह्या सोयीमुळें ग्रंथ नेहमीं आजतागाईत राहील व तो तसा ठेवण्यास ग्रंथाचें संपादकमंडळ तयार आहे असा भास उत्पन्न होत होता. तथापि जर आपण मजकुराचें परीक्षण करूं लागलों तर असें दिसून येई कीं बराचसा मजकूर काळजीपूर्वक लिहिला नव्हता. हिंदुस्थानविषयक अनेक लेखांमध्यें इतकें दुर्लक्ष झालें होतें कीं, हे लेख कोणी तरी अगदींच अनधिकारी माणसानें लिहिले आहेत असें भासून आल्याशिवाय रहात नसे व त्याप्रमाणेंच मी अर्थशास्त्रावरील लेखहि पाहिले तेव्हां कित्येक निनांवी लेखकांनीं कांहीं तरी कोठला तरी मजकूर घेऊन कसा तरी लेख तयार केला आहे असें वाटे.

मला गिऱ्हाइक बनविण्याच्या उद्देशानें जेव्हां तो कॅनव्हासर प्रयत्न करूं लागला तेव्हां मी अनेक दोष दाखवून दिले, आणि त्यामुळें आमच्या इमारतींत राहणाऱ्या पदवीधर विद्यार्थ्यांनीं त्या ग्रंथाकडे अनुकूल दृष्टीनें पाहिलें नाहीं. याप्रमाणें त्या विक्रेत्याची निराशा झाल्यावर तो माझ्याकडे आला आणि "तुम्हाला जर लेखकमंडळांत घ्यावयाचा कंपनीनें विचार केला तर तुम्ही येण्याचा विचार कराल काय?" अशी पृच्छा केली. मीं त्यास आपली संमति दर्शविली; व पुढें त्या ग्रंथाच्या मुख्य संपादकाकडून तीच पृच्छा करण्यांत आलीं. त्यानंतर मीं संमतीचें उत्तरहि लिहिलें. परंतु पत्रव्यवहार यापुढें मुळींच केला नाहीं; तथापि या ग्रंथाच्या संपादकमंडळांत आपण जाऊं आणि आपण दोन पैसे मिळवूं या अपेक्षेनें आपणांस परिचित असलेल्या विषयांपैकीं कोणकोणत्या विषयावर नवीन लेख पाहिजेत यांचें टांचणहि केलें होतें. पण मुख्य संपादकाकडून माझ्या पत्रास जबाब न आल्यामुळें तें सर्व जागच्या जागींच राहिलें. तथापि चालू मजकूर रद्द करून आणि नवीन मजकूर करण्याचें कंत्राट मिळवावें या अपेक्षेनें त्या ग्रंथांतील कांहीं भागाचें बारीक परीक्षण मात्र झालें यांत शंका नाहीं.

हार्वर्ड युनिव्हर्सिटीमध्यें असतां कोशरचनेच्या कृतीशीं मला परिचित करणारी याशिवाय दुसरी गोष्ट घडून झाली ती अशी:—वेब्स्टरच्या मोठ्या शब्दकोशाचे त्यावेळचे संपादक डॉ. लॉंग यांनीं ही डिक्शनरी कशी संपादीत आहों आणि जान्ससनच्या काळापासून कोश करणारांनीं काय काय खटपटी केल्या इत्यादि विषयावर हारवर्ड युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यापुढें एक व्याख्यान दिलें.

तें व्याख्यान रात्रीं साडे आठ वाजतां सुरू झालें आणि प्रश्नोत्तरें होत होत कार्यक्रम १०॥ ला संपला, तेव्हां डॉ. लॉंग यांस मी आपल्याच खोलींत येऊन निजण्यास आमत्रण केलें, आणि दूर जाण्याच्या ऐवजीं जवळच्याच ठिकाणीं निजायची सोय झाली तर बरी असें वाटून तें त्यांनीं पत्करलें. आम्ही दोघेजण माझ्या खोलींत आल्यानंतर आम्हीं कॉफी केली; आणि रात्रीं दान वाजेपर्यंत गप्पा मारीत बसलों. तेव्हां त्यांनीं डिक्शनरीच्या धंद्यांतील बऱ्याच मौजा सांगितल्या आणि आफीसच्या अंतर्व्यवस्थेची माहितीहि सांगितली. त्यावेळेस त्यांनीं मला विचारलें कीं तुम्ही इतकी खोदखोदून माहिती कां विचारतां; तुम्हांला शब्दकोश

करावयाचा आहे काय; तेव्हां मीं त्यांस असें सांगितलेलें आठवतें कीं हिंदुस्थानांतील कोणत्याहि भाषेस शब्दकोशापेक्षां एनसायक्लोपीडिआची जास्त आवश्यकता आहे. आणि नंतर शब्दकोशाचा काल येईल. अगोदर भाषेंत सर्व प्रकारचें लिखाण तयार व्हावें आणि नंतर त्यांत आलेले शब्द निवडले जावे हा कार्यक्रम भाषेची प्रगती साधण्याच्या दृष्टीनें योग्य होईल. हें गप्पांचें साल १९०९ होतें.

इ. स. १९०९ च्या सप्टेंबर महिन्यांत जातिभेदाच्या इतिहासाचा पहिला भाग छापला, त्याणि आक्टोबरमध्यें कार्नेल युनिव्हार्सिटींत परत गेलों. संशोधनपद्धतीशीं परिचय जातिभेदाच्या इतिहासाचा पहिला भाग तयार केला त्यामुळे बराच झाला होता, आणि आपण समाजशास्त्रीय, शासनशास्त्रीय आणि अर्थशास्त्रीय संशोधन चांगल्या प्रकारें करूं असा आत्मविश्वास आतांपर्यंत प्रोफेसरांच्या आदेशानें जे अनेक निबंध लिहिले, त्यामुळें उत्पन्न झाला होता. तथापि याच सुमारास मीं एक जिआलॉजीवर पुस्तक वाचलें तेव्हां भूस्तरशास्त्रास लागू पडणारे अनेक नियम सामाजिक घडामोडींचे स्पष्टीकरण करण्यासहि कसे लागू पडतात व ते समाजशास्त्रज्ञांनीं कसे दाखवून दिले नाहींत हें मनास पटलें आणि यानंतर असें वाटलें कीं सामाजिक शास्त्रांच्या अनेक शाखांविषयीं आपण स्वतःच्या परिश्रमानें अभ्यास करण्यास समर्थ आहों; तर आपणास जर खरे समाजशास्त्री बनावयाचें असेल तर केवळ समाजशास्त्रावरील पुस्तकें वाचीत बसण्यांत काय अर्थ आहे ? त्या पुस्तकांचे लेखकहि मला अर्धवट लोक आहेत असें भासूं लागलें. त्यांचीं पुस्तकें वाचण्यापेक्षां अनेक शास्त्रांचें प्राथमिक ज्ञान मिळविलें तर तें अधिक उपयुक्त होईल. या प्रकारच्या कल्पना मनांत येऊन समाजशास्त्र व शासनशास्त्र यांच्या प्रोफेसरांच्या कोणत्याहि व्याख्यानास न जातां भूस्तरशास्त्र, जीवशास्त्र (बायालजी), पुस्तकवर्णनशास्त्र (बिब्लिआग्रफी), इतिहाससंशोधनशास्त्र, पुराणवस्तुशास्त्र इत्यादि विषयांवरच्या पहिल्या वर्गांत जाऊन व्याख्यानें ऐकत बसलों. कार्नेल युनिव्हार्सिटींत एक नियम असा असे कीं पदवीधर विद्यार्थ्याला त्यानें अमुक वर्गांनां हजर राहिलें पाहिजे अशी त्यावर सक्ती नसे, व वाटेल त्या वर्गांत जाऊन बसावयास त्यास मोकळीक असे. त्याच्या अभ्यासांत त्याला मदत करण्यासाठीं जी कमेटी असते आणि

जी पुढें त्याची परीक्षक होते त्या कमेटीच्या मंडळीचें म्हणणें त्यानें ऐकलेंच पाहिजे असें नाहीं. आणि या नियमाचा फायदा घेऊन मी आपणांस वाटतील त्या विषयांच्या (प्रोफेसरांस वाटतील त्या विषयांनां नव्हेत) व्याख्यानांस हजर रहात होतों. याबद्दल माझ्या राजकारणाचे प्रोफेसर डॉ. जे. डब्ल्यू. जेंक्स यांनीं माझी कानउघाडणी देखील केली, पण तुमच्या गेल्या वर्षीच्या व्याख्यानांस बसून माझा विशेष फायदा झाला नाहीं असें भी त्यांस सांगितलें, व त्यांस असेंहि सांगितलें कीं तुम्ही जें सांगतां तें मला स्वतःच्या अभ्यासानें मिळवितां येईल, पण भूस्तरशास्त्र, प्राणिशास्त्र इत्यादि जीं प्रायोगिक शास्त्रें आहेत त्यांचा अभ्यास मला स्वतंत्र रीतीनें करतां येणार नाहीं. म्हणून भी त्या विषयांच्या व्याख्यानांस जातों. पुढें प्रो. जेंक्स यांनीं हा प्रश्न माझ्या कमेटीपुढें काढला आणि त्यावेळेस मला माझ्या पद्धतीनें समाजशास्त्राचा अभ्यास करावयाचा आहे आणि त्या अभ्यासासाठीं या इतर शास्त्रांचें ज्ञान अवश्य आहे इत्यादि गोष्टी मीं सांगितल्या. माझ्या अभ्यासावर नजर ठेवणाऱ्या कमेटीचे (प्रत्येक विद्यार्थी आपापली कमेटी स्वत. निवडतो) अध्यक्ष प्रो. विलकाक्स हे होते. त्यांनीं माझें म्हणणें ऐकून घेऊन मला जसे वाटत असेल तसें मी करावें असा निकाल दिला. प्रो. विलकाक्स यांचा निकाल महत्त्वाचा होता. कारण माझें मुख्य समाजशास्त्र होतें, राजकारण नव्हतें, त्यामुळें प्रो. जेंक्स यांनां जास्त बोलतां येईना. प्रो. विलकाक्स यांची वृत्ति अशी होती कीं, प्रत्येक विद्यार्थ्यानें आपल्या इच्छेप्रमाणें अभ्यास करावा आणि ठेंचा खातखात शिकावें; त्यामुळें त्यांनीं मला ठेचा खाण्याचें स्वातंत्र्य दिलें आणि मी वाटेल ते विषय अभ्यासूं लागलों. परिणाम असा झाला कीं, १९१८ सालच्या जून महिन्यांत जी माझी पीएच्. डी. ची परीक्षा घेण्यांत आली त्या परीक्षेंत मी नापास झालों. पण त्यावरोबर हेंहि कबूल केलें पाहिजे कीं, या वाटेल तिकडे भटकण्यामुळें मला अनेक विषयांची प्रास्ताविक ओळख होऊन ज्ञानकोश रचनेच्या कार्यास न कळत मी तयार झालों.

१९१० सालीं जून जुलै मध्यें मला इंटर न्याशनल सायक्लोपीडिआच्या अंतर्व्यवस्थेची माहिती वरीच कळली. त्या सालीं मी त्या ज्ञानकोशाचा मागणी उत्पन्न करणारा म्हणून थोडें काम केलें; इंटरनॅशनल सायक्लोपीडियाचे प्रकाशक डॉड मीड आणि कं. हे जेव्हां कॅनव्हासर म्हणून

मंडळीनां पाठवीत असत तेव्हां ते अमेरिकेंतील निरनिराळे ज्ञानकोश दाखवीत. आणि त्याबरोबर आपल्या ग्रंथाशीं बाजारांत स्पर्धा करणाऱ्या दुसऱ्या ज्ञानकोशाच्या उणीवा दाखवीत; आणि आपला ज्ञानकोश इतरांपेक्षां उच्च कसा आहे यांचें स्पष्टीकरण करीत. गिऱ्हाइकें मिळविणाऱ्या चमूस या सर्व गोष्टींची चांगली माहिती असावी यासाठीं त्या कंपनीनें एक पुस्तक तयार केलें होतें तें होतकरू प्रचारकास वाचावयास देत असत; आणि प्रत्येकाकडून गिऱ्हाईक भेटला म्हणजे बोलणें कसें करावें याविषयीचे ठराविक मंत्र म्हणवून घेत असत. त्या मंत्रांतील अर्थ साधारण येणेंप्रमाणें होता:—या एनसायक्लोपीडियाचीं पानें इतकीं झालीं आहेत, भाग इतके, लेखक असे असे आहेत, लोकमत असें उत्तम आहे, यावर अंमक्यांत लेखकांचे अभिप्राय पहा, तमक्याचे पहा, हा ग्रंथ तुम्हाला इतक्या इतक्या गुणांमुळें उपयोगी पडेल, वैगेर गोष्टी होत्या. त्यांच्या विक्री करणाऱ्या मंडळीमध्यें अगदीं वेताचें शिक्षण झालेल्या मंडळीपासून अनेक प्रोफेसरांपर्यंत लोक होते. या डॉड मीड कंपनीचे एनसायक्लोपीडियाचे गिऱ्हाईकमिळवे तयार करण्याचे वर्ग पाहिले, त्या वर्गांत एक दोन दिवस जाऊन बसलों, त्यांचे वशीकरणाचें महामंत्र पाठ केले, आणि दोन आठवडे कॅनव्हासिंगचें कामहि केलें.पहिल्या आठवड्यांत एकहि गिऱ्हाईक मिळालें नाहीं.रहाणीचे व वाहनाचे पैसे फुकट गेले. १२ दिवस सतत मेहनत केल्यानंतर एक गिऱ्हाईक मिळालें; व पुढें त्यागोपाठ तीन गिऱ्हाइकें मिळालीं. पुढें कॅनव्हासरचें काम सोडून दिलें, पण उपयुक्त अनुभव मात्र मिळाला तो कायमचा झाला. जीं चार गिऱ्हाइकें मिळालीं तीं सर्व गरीबांतील होतीं, आणि त्यावरून असें वाटूं लागलें कीं हप्त्यानें पैसे भरावयाची सोय केल्यास अगदीं गरीब सुशिक्षित मंडळीची ज्ञानकोश घेण्याकडे प्रवृत्ति होईल. इंटर नॅशनल सायक्लोपीडियाकडे काम करीत असतांना जी अत्यंत महत्त्वाची गोष्ट समजली ती गोष्ट हीच होय, असे मी समजतों.

अमेरिकन एनसायक्लोपीडियाकडे काम करीत असल्यामुळें त्यांनीं एनसायक्लोपीडिया ब्रिटानिकाचे दोष दाखविणारें एक पत्रकहि तयार केलें होतें. त्या पत्रकात त्या कंपनीनें असें दाखविलें होतें कीं ब्रिटानिका हा इंग्रज लोकांसाठीं इंग्रज दृष्टीनें लिहिलेला ग्रंथ आहे, त्यांत अमेरिकेविषयीं माहिती पूर्वग्रहदूषित आणि अपुरी आहे, इंग्लडांतील सामान्य व्यक्तीस

देखील स्थान मिळालें आहे आणि अमेरिकेंतील प्रख्यात मंडळीकडे देखील संपादकांचें दुर्लक्ष झालें आहे, तर हा ग्रंथ अमेरिकन गरजा पुरविणारा नव्हे आणि त्यांतील पूर्वग्रहदूषित दृष्टीमुळें अमेरिकन तरुणांपुढें ठवण्यास हा ग्रंथ निरुपयोगी आहे. ते सर्व मुद्दे खरेच होते, पण इंग्लंडांतील गिऱ्हाईकांकडे लक्ष देऊन जो ग्रंथ बनविण्यांत आला तो अमेरिकन लोकांस उपयुक्त कसा होणार? तथापि स्पर्धा करणाऱ्या ग्रंथास अमेरिकन बाजारांतून हुसकून लावण्यासाठीं तयार केलेल्या वाङ्मयाच्या वाचकांचा अस उपयोग झाला कीं, प्रत्येक राष्ट्रास निरनिराळ्या तऱ्हेचा एन्सायक्लोपीडायो लागतो हें तत्त्व मनास पटलें.

ब्रिटानिकाचे दोष

ब्रिटानिकाच्या ज्या आवृत्तींतील दोष दाखवून देऊन डॉड मीड आणि कंपनीनें कॅनव्हासिंग सुरू केलें ती आवृत्ति नववी होती. ही आवृत्ति छापणें १८७५ मध्यें सुरू झालें तें १८८९ मध्यें संपलें म्हणजे छापावयासच चौदा वर्षें लागलीं. डॉड मीड कंपनीनें असेंहि दाखवून दिलें कीं, १८७९ मध्यें छापावयास घेतलेला बराचसा मजकूर १८६९ च्या सुमारास तयार झाला होता. म्हणजे हा ग्रंथ निघाला त्याच वेळेस अगदीं मागासलेला झाला होता.

जन्मतःच म्हातारा

ब्रिटानिका ग्रंथाची नवीन आवृत्ति १९११ च्या सुमारास निघाली. ती आवृत्ति देखील मला कांहीं कारणामुळें तपासून पहावी लागली. तथापि ही आवृत्ति इतकी एकाएकी कशी निघाली याचेंहि मला आश्चर्यच वाटलें. कारण मला अशी माहिती होती कीं, ब्रिटानिकाची नवी आवृति काढतांना अमेरिकन गिऱ्हाइकी पटकावण्यासाठीं एक आफिस अमेरिकेंत उघडण्यांत आलें होतें आणि त्या ऑफिसांत बराच खर्च करून अनेक अमेरिकन लेखकांकडून लिहविलेले लेख जमा करण्यांत आले होते. हे लेख ज्या इमारतींत ठेवले होते ती इमारत जळून गेल्यानें या कंपनीचें बरेंच नुकसान झालें आहे. याशिवाय १९१० मध्यें डॉड मीड आणि कंपनी यांच्या ऑफिसांतील सेल्समन तयार करणाऱ्या गृहस्थाकडून असेंहि कळलें होतें कीं, ब्रिटानिकाच्या मालकीसाठीं पूर्वीच्या कंपनीच्या भागीदारांत भांडणें लागून दोघाहि पक्षांनीं कोर्टांतील कज्जांत हजारों पौंड खर्च केले आहेत. आणि या स्थितींत

हस्तलिखितहि जळून गेलें यामुळें ब्रिटानिका इंटर न्याशनल सायक्लोपीडि-याशीं स्पर्धा करण्यास पुढें सरसावेल असें दिसत नाहीं. ही माहिती मला होती. आणि त्यानंतर थोडक्याच दिवसांनीं म्हणजे १९१० च्या जून, जुलैमध्यें ब्रिटानिकाच्या ११ व्या आवृत्तीची जाहिरात फडकलेली पाहिली तेव्हां ती जाहिरात पाहून मला खरोखरच आश्चर्य वाटलें. डबघाईस आलेलें प्रकरण एकदम सांवरलें कसें याचा अचंबा वाटूं लागला पण पुढें चौकशी करतां असें समजलें कीं, या अकराव्या आवृत्तीच्या उत्पादनास अमेरिकन भांडवल आणि अमेरिकेकडून उपयोगी पडली आहे.

हें कार्य इतक्या तडफीनें झालें कीं, वर्षांत ब्रिटानिकाचे व्हाल्यूम खरोखरच बाहेर पडले नववी आवृत्ति पाहिली आणि अकरावी पाहिली तर तंडफीमध्यें जमीन अस्मानाचें अंतर दिसून येतें.

इंग्लंडमध्यें मीं मे १९११ ते सप्टेंबर १९१२ पर्यंत होतों. तेथें अर्थीनियम पत्रामध्यें पुस्तकांचे रिव्ह्यू लिहिण्याचें काम पुष्कळ दिवस केलें व तेथील स्टाटिस्टिकल असोसिएशन, रायल एशिआटिक सोसायटी इत्यादि संस्थांच्या बैठकींत जात असें त्यामुळें ब्रिटानिकांतील अनेक लेखकांच्या गांठीं पडल्या. मिसेस केतकर यांची ओळख प्रथम इंग्लंडमध्येंच झाली. इंग्लंडहून स्वदेशीं आल्यानंतर १ जुलै १९१३ पासून १।७।१४ पर्यंत कलकत्ता युनिव्हर्सिटींत पोस्ट ग्रयाज्युएट विद्यार्थ्यांनां राजकारण आणि अर्थशास्त्र शिकवीत होतों.

१९१४ च्या मे महिन्याच्या शेवटीं कलकत्ता युनिव्हर्सिटीची नोकरी सोडून मी मुंबईस आलों आणि तेथें कांहीं दिवस सरदारगृहांत रहात होतों, आणि त्यावेळेस लेखनसंपादनाच्या व्यवसायांत आपण पडावें अशी इच्छा होती. यावेळेस देखील मुद्रणाच्या धंद्यांत पडावें ही इच्छा नव्हती तर आपलें कार्यक्षेत्र लेखन आणि ग्रंथप्रकाशन एवढेंच ठेवावें असें मनांत योजिलें होतें. प्रकाशनांत देखील पुस्तकप्रकाशनाचें व खपविण्याचें काम करण्याचा इरादा नव्हता. यावेळेस ज्या मनांत अनेकयोजना आल्या त्यामध्यें एक इंग्रजी व एक मराठी अशीं दोन मासिकें काढावींत ही एक योजना होती. आणि त्यावेळेस तसें मासिक काढावें म्हणून डॉ. शिलोत्री यांचा आग्रह होता. डॉ. शिलोत्री यांनीं हिंदुस्थानाकडे येतांना एक प्रगमनशील विचारांचें इंग्रजी मासिक काढण्यासाठीं माझें

मन वळवावें अशी मनांत योजना केली होती. व त्याचें त्यांनीं "पायलट" (Pilot) असें नांव मनांत योजून ठेवलें होतें. ही इंग्रजी मासिकाची कल्पना मला इतकी पसंत नव्हती आणि याचें कारण मासिकांमध्यें स्पर्धा काय आहे आणि त्याला काय खर्च लागतो याची माहिती मॉडर्न रिव्ह्यू वरच्या अनुभवावरून बरीच झाली होती. कलकत्त्याला पूर्वी जें एक वर्ष घालविलें होतें त्या वर्षांत मॉडर्न रिव्ह्यूचे संपादक रा. रामानंद चातर्जी यांची चांगलीच ओळख झाली, व त्यांनीं मॉडर्न रेव्ह्यूची एकंदर कथा सांगितली होती, त्यावरून मासिक इंग्रजींत काढल्यास त्यांत किफायत होण्यास किती काळ लागेल याविषयीं बरीच स्पष्ट कल्पना होती.

या महिन्यापासून सप्टेंबरपर्यंत जो काळ गेला त्या काळामध्यें मुंबई-हून पुण्यास जाणें येणें चालूंच होतें. व बेकार मनुष्य ज्याप्रमाणें मनांत अनेक योजना करितो त्याप्रमाणें माझ्या मनाची स्थिति होती. एवढें मात्र निश्चित होतें कीं आपणांस जें काय करावयाचें असेल म्हणजे जें आपल्या आवडीचें असेल तेंच करावयाचें. आपल्या संशोधकशक्तीचा उपयोग पुढील पिढीस करून द्यावा हें काम मीं मनांत योजिलें होतें पण तसल्या-प्रकारचें काम मिळण्याची संधी नव्हती. तसलें काम मिळावयाचें म्हणजे युनिव्हर्सिटी प्रोफेसरची जागा मिळणें पण हें युनिव्हर्सिटीनें संशोधन विद्येचा प्रचार करावयाचें ठरविले तरच शक्य होतें पण तसें कांहीं झालें नाहीं. मी स्वतःला जरी युनिव्हर्सिटीप्रोफेसरासारख्या मोठ्या जागेला लायक समजत होतों तरी अधिकारी लोक मला लायक समजत नव्हते. माझ्या योग्यतेसंबंधानें माझें उच्च मत सकारण होतें. १९१४ सालापर्यंत समाजशास्त्रीय, शासनशास्त्रीय, अर्थशास्त्रीय व संशोधनपद्धतीचें शिक्षण देण्याची पद्धत इंग्लंडांत सुरू झाली नव्हती आणि त्यामुळें इंग्लिश युनिव्हर्सिटयांतून बाहेर पडणारे पदवीधर किंवा तिकडून येणारे इंग्रज शिक्षक माझ्याइतके शिक्षणाचे नव्हते तथापि इकडील युनिव्ह-र्सिटयांमधून ते इंग्रज असल्यामुळें आणि संशोधनविद्येशीं अपरिचित असल्यामुळें संशोधनाच्या आवश्यकतेचा काल इकडे अजून आला नाहीं असें ते म्हणत आणि त्यांच्या तंत्रानें इतर लोक चालत.

सरकारची अनुदार बुद्धि मला फारशी भोंवली नाहीं. कारण सरकारकडे नोकरीसाठी मी अर्जच केलेला नव्हता. उलट मध्यप्रांतसरकारची वृत्ति

मला नोकरी द्यावी या तऱ्हेची होती आणि याचें कारण वऱ्हाडचे कमिशनर मि. स्टांडेन यांची माझ्याविषयीं स्नेहबुद्धि होती हें होय. सरकारची अनुदार वृत्ति भोंवली नाहीं हें खरें. पण आपल्या लोकांची इंग्लंडपूजा मात्र भोंवली. इंग्लंडच्या साध्या पदवीधरांची मान्यता माझ्यापेक्षां जास्त आपल्या लोकांकडूनच होई, एवढेंच नव्हें तर माझ्यानंतर आलेल्या ब्रिटिश युनिव्हर्सिटीच्या पदवीधरांपेक्षां किंवहुना लंडन युनिव्हर्सिटीच्या डी. एस. सी. पेक्षां माझा शिक्षणमूलक अधिकार अधिक आहे, अशी माझी भावना; तर अमेरिकन युनिव्हर्सिटीच्या अत्युच्च पदवीधरांनां देखील ब्रिटिश युनिव्हर्सिटयांच्या सामान्य किंवा अत्यंत कनिष्ट पदवीधरांपेक्षां कमी समजण्याची सरकारची वृत्ति व तीच बरोबर कांहिंचि माहिती नसलेल्या आपल्या देशी गृहस्थांची वृत्ति असल्यामुळें सरकारी अगर निमसरकारीं शिक्षणसंस्थांत माझा सौदा न जुळणें स्वाभाविक होतें. या प्रकारच्या कारणामुळें एका ठिकाणीं माझा सौदा जुळला नाहीं.

माझी किंमत मी सभोंवतालच्या हिंदु व इंग्रज शिक्षकांपेक्षां अधिक समजत होतों आणि अंडर ग्रॅज्युएट विद्यार्थ्यांनां पढविण्याचें काम करण्याची माझी तयारी नव्हती, तर फक्त युनिव्हर्सिटीमध्यें पोस्टग्रॅज्युएट विद्यार्थ्यांनां शिकविण्याचें काम पतकरण्याचें योजिलें होतें पण तें काम मिळालें नाहीं. कलकत्त्याला काम केलें, पण तेथें सर अशुतोष मुकर्जीनीं माझ्याविषयीं लवाडी केली असा माझा समज असल्यामुळें कलकत्त्याखेरीज इतर ठिकाणीं म्हणजे मुंबई, मद्रास व अलाहाबाद येथील युनिव्हर्सिटयांकडे मी अर्ज केले होते, व त्यावेळेस तिन्ही ठिकाणीं अर्जाचा निकाल होण्यास बराच वेळ लागून शेवटीं इंग्रज गृहस्थ नेमले गेले. युनिव्हर्सिटयांमध्यें माझ्यापेक्षां जास्त लायकीच्या मंडळींचे अर्जच आले नव्हते तथापि मला त्यापैकीं कोणतीहि जागा मिळण्याचा योगायोग नव्हता. युनिव्हर्सिटयांकडून ताबडतोब निकाल न होतां प्रकरण लांबणीवर टाकलें गेलें. अर्थात मला आपल्या भवितव्याचा निकाल ताबडतोब करावयाचा होता आणि त्यामुळें युनिव्हर्सिटयांकडून उत्तर काय येतें याची वाट न पाहातां मी आपलें भवितव्य स्वतःच ठरविण्याच्या विचारास लागलों. माझी ज्ञानकोशाकडे प्रवृत्ति होण्यास माझी कांहीं अंशीं स्वतः पत्करलेली बेकारी कारण झाली असावी असें वाटतें.

कांहीं दिवसांनीं लोकमान्यांची सुटका झाली. त्यादिवशीं मी पुण्यास होतों आणि त्यांची अनायासें भेट पहिल्याच दिवशीं झाली. त्यावेळेस मला पुढें काय करावयाचें आहे याविषयीं कांहीं बोलणें झालें नाहीं मी विशेषेंकरून त्यांनीं तुरुंगवासांत जो अभ्यास केला त्यासंबंधानें बोललों. त्यावेळेस त्यांनीं फ्रेंच, जर्मन आणि पाली या तीन भाषांचा अभ्यास केला होता.

लढाई सुरू झाली तेव्हां मी मुंबईस रहात होतों आणि त्यावेळेस माझे स्नेही डॉ. शिलोत्री आणि मी एकत्रच रहात होतों आणि मधून मधून पुण्यास येत होतों. त्यावेळेस पुण्यांतील अनेक मंडळींच्या ओळखी झाल्या. कै. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांची ओळख याच वेळेस दृढ झाली. भारतेतिहाससंशोधक मंडळांतील सरदार तात्यासाहेब मेहेंदळे, प्रो. दत्तो वामन पोतदार इत्यादि अनेक आस्थेवाईक मंडळींशीं ओळखी झाल्या. त्या वेळेस रा. राजवाडे बरेच दिवस पुण्यांतच असत किंवा निदान मंडळाच्या पाक्षिक सभांस येत असत,त्यामुळें त्या संस्थेंत कर्तव्यजागृति विशेष दिसत होती. आणि त्या खेपांत पुण्यांतील आणखी कांहीं मंडळींच्या ओळखी दृढ झाल्या. ज्या जुन्या ओळखी दृढ झाल्या त्यामध्यें रा. रा. अच्युतराव भट यांच्या ओळखीचा उल्लेख केला पाहिजे.

रा. अच्युतराव भट यांचें थंदेवाईक तत्त्वज्ञान

रा. अच्युतराव भट यांची ज्ञानकोशाच्या हितासाठीं झालेली कामगिरी मोठीच आहे आणि तिचें वर्णन यथाक्रम पुढें होईलच. तथापि त्यांनी दुसरी जी कामगिरी केली ती त्यांस नकळत अशीच केली. त्यानीं आपला अनुभव असा सांगितला कीं, ४ आण्याचें पुस्तक खपविण्यापेक्षां १० रु चें पुस्तक काढून खपवणें सोपें; कारण ४ आण्यांचें पुस्तक फारसें महत्त्वाचें नसणार; तेव्हां त्याचें महत्त्व गिऱ्हाईकास समजूनल कसें देणार? लहान लहान पुस्तकें जेव्हां एखादी चळवळ चालू असे तेव्हांच खपावयाचीं, एरवीं खपावयाची नाहींत; लहान धार्मिक पुस्तकें मात्र कांहीं खपतील. लहान शालोपयोगी पुस्तकें, तीं घेण्याची विद्यार्थ्यांवर जवळ जवळ सक्ती असल्यामुळें स्वाभाविकच खपवावयाचीं, तथापि त्यांव्यतिरिक्त पुस्तकें खपविणें झाल्यास लहान लहान पुस्तकांपेक्षां मोठीं पुस्तकें खपविणें सोपें जातें. अच्युतरावांच्या या विधानामुळें मला अंधुकपणें दिसणारें सत्य एकदम स्पष्ट दिसूं लागल्यासारखें झालें. जितकें पुस्तक

मोठें तितकें तें खपविण्यास सोपें हें प्रथम दर्शनीं आश्चर्याचें वाटेल पण तसें नाहीं. मोठीं पुस्तकें खपण्यास कारणेंहि आहेत त्यांपैकीं एक मुख्य कारण म्हटलें म्हणजे मोठ्या पुस्तकांच्या विक्रयासाठीं कराव्या लागणाऱ्या खर्चाकरितां जास्त रक्कम बाजूला काढितां येते. व त्यामुळें एखादा विक्रीसाठीं मनुष्य पाठविणें शक्य होतें हें होय.

ज्ञानकोश रचनेसारख्या कठिण कार्याकडे जी प्रवृत्ति झाली ती सुखासुखी झाली नाहीं. ज्ञानकोश व्हावा असें वाटत होतें हें खरें पण तेवढ्यानें कार्याकडे प्रेरणा होत नाहीं. मनुष्यप्राणी सुखाचा आणि अल्प परिश्रमाचा मार्ग शोधीत असतो; आणि कष्टतर मार्गाकडे एकाएकीं प्रवृत्त होत नाहीं. माझी या कार्याकडे जी प्रवृत्ति झाली ती होण्यास केवळ भाषाप्रेम एवढेंच कारण होते, असें मला आज तरी वाटत नाहीं; ज्यावेळेस काम सुरू केलें त्यावेळेस आपण केवळ भाषाप्रेमामुळें इकडे वळलों आहोंत असें वाटत होतें एवढेंच नव्हे तर इंग्रजी राज्याचा हेतु इंग्रजी भाषेस संस्कृत भाषेचें स्थान देऊन मराठी भाषेला शूद्र भाषेचें स्थान द्यावयाचें आहे हाच आहे आणि हा हेतु आपण विध्वंसून टाकला पाहिजे असें वाटत होतें.

१९१४ सालीं डिसेंबर महिन्यांत मी मद्रासच्या कांग्रेसला गेलों होतों आणि तेथें हिंदुस्थानचे देश व विभाग भाषेच्या तत्त्वावर पाडावे इत्यादि मतांचा प्रसार करण्यासाठीं एक पत्रक छापून तेथील प्रतिनिधींमध्यें वाटलें; त्यामुळें तेथील आंध्र मंडळीपैकीं बऱ्याच मंडळीची ओळख झाली. त्यांमध्येंच रा. रा. डॉ. अच्यन्त लक्ष्मीपति यांच्याशीं ओळख झाली, व त्यानंतर मद्रासहून सिलोनला गेलों होतों, व सिलोनहून परत आल्यानंतर इंडियन सायन्स कांग्रेसला हजर राहाण्यासाठीं पुनः मद्रासला परत आलों, तेव्हां डॉ. लक्ष्मीपति यांच्याकडे उतरलों होतों व त्यांच्याकडे उतरल्यामुळें ज्ञानकोशाची जी कल्पना होती तिला चालना मिळाली. डॉ. लक्ष्मीपति यांनीं व दुसऱ्या कांहीं मित्रांनीं मिळून तेलगू ज्ञानकोशाचें काम अगोदरच सुरू केलें होतें व त्यांतील कांहीं अंक माझ्या नजरेस पडले.

तेलगु ज्ञानकोश

तेलगू ज्ञानकोशाचे मुख्य संपादक कै. के. व्ही. लक्ष्मणराव हे होते. कै. के. व्ही. लक्ष्मणराव हे पूर्वी मराठी लेखक म्हणून प्रसिद्ध

होतें. त्यांचें लक्ष मराठीकडून तेलगूकडे वळाविण्यास त्यांची वहीण कारण झाली असें म्हणतात. कै. के. व्ही. लक्ष्मणराव यांचा नागपूरशीं निकट संबंध आहे. ते प्रथम नागपूरासच शिक्षण घेऊन प्रसिद्ध झाले. आणि त्यांची जन्मभाषा तेलगू असल्यामुळें तेलगू वाङ्मयाची महाराष्ट्रांत प्रसिद्धि करण्याकडे त्यांनीं कांहीं प्रयत्न केले. कै. के. व्ही. लक्ष्मणराव यांचे भाचे रा. रा. भवानीशंकर नियोगी हे तर अस्सल नागपुरी म्हणून मोडतात आणि नागपूर म्यु. पालिटीचे ते अध्यक्ष आहेत. एवंच मराठी व तेलगू या दोही ज्ञानकोशाच्या उत्पादकत्वाचा संबंध नागपूरशीं येतो हा योगायोग आहे. लक्ष्मिपतीच्याकडे १९१५ च्या जानेवारी १५ नंतर उतरलों होतों पण माझ्या मनांत जी एक विचारक्रांति झाली ती सिलोनमध्यें हिंडत असतां झाली.

१९१५ च्या जानुआरी महिन्याच्या पहिल्या तारखेस सिंहलद्वीपांत गेलों तेव्हां तेथें ज्या कांहीं गोष्टी दृष्टीस पडल्या त्यावरून हिंदुस्थानांतील भावी संस्कृतीचें स्वरूप कसें होईल याविषयीं निरनिराळ्या कल्पना मनांत येऊं लागल्या. तेथें १९११ सालींच शिक्षण हिंदुस्थानापेक्षां जास्त होतें. प्रौढ विवाह अगदीं सामान्य झाले होते आणि त्यावेळेस मद्रास इलाख्यामध्यें ऋतुप्राप्तीनंतर होणारे हिंदु स्त्रियांचे विवाह कायदेशीर धरले जावेत म्हणून एक बिल ना. शास्त्री यांनीं मद्रास कौन्सिलांत आणलें होतें. सिंहलद्वीप हें शिक्षणदृष्टीनें किंवा सामाजिक दृष्टीनें हिंदुस्थानच्या बरेच पुढें गेलेलें असल्यामुळें तेथें आज जी स्थिति दृष्टीस पडते ती उद्यां हिंदुस्थानांत दृष्टीस पडेल अशीं स्वप्नें मला दिसूं लागलीं. आणि एकंदर आर्थिक आणि शैक्षणिक दृष्ट्या सिंहलद्वीप जरी पुढें गेलें तरी राष्ट्रीय भावनांच्या दृष्टीनें त्या देशाचा अपकर्ष झाला आहे असें मला वाटूं लागलें आणि ती स्थिति बदलण्यासाठीं देशांत जोराची चळवळ पाहिजे म्हणून प्रयत्न करावा असें मला वाटूं लागलें.

सिंहलद्वीपामध्यें ख्रिस्ती आणि बौद्ध यांच्यामध्यें सामाजिक वियुक्तता नाहीं.

राष्ट्रीय अरिस्टॉक्रसी आणि देशभाषासंवर्धन

गोइगम जातीची ख्रिस्ती मंडळी आणि बौद्ध मंडळी एकमेकांशीं लग्नें करतात आणि तेथील एक विद्वान पुढारी डा. हेवावितरण(यांची व माझी लंडन येथेंच ओळख झाली होती) असें म्हणत कीं ख्रिस्ती झालेला मनुष्य

पतित झाला अशी भावना खिस्ती मंडळींत नाहीं, बौद्धांतहि नाहीं. उलट तो प्रगतीच्या मार्गालाच लागला असें सामान्य जनास वाटूं लागतें, हा नैतिक अपकर्ष बौद्ध समाजांत झालेला दिसला. याशिवाय हेंहि दिसून आलें कीं, दोन सिंहली जातीची मंडळी एकमेकाशीं लग्नें करीत नव्हती पण ती बर्घेर म्हणजे यूरेशिअन लोकांशीं लग्नें करीत. याचा परिणाम असा व्हावयाचा कीं, इंग्रज हे सिंहली समाजाचें केंद्र होणार आणि सामाजिक दृष्ट्या देखील इंग्रजाचा दर्जा सिंहली लोकांपेक्षां उच्च ठरणार आणि जर इंग्रजी भाषेस देशांत प्रामुख्याचें स्थान राहिलें तर समाजाचा नेता, व उच्च संस्कृतीचा वाहक या नात्यानें इंग्रजाचें अस्तित्व देशांत मान्य होणार, पाश्चात्त्य भाषेस प्राधान्य चालूच राहिले तर ती बोलणारा इंग्रज ब्राह्मण ठरणार आणि सुशिक्षित देशी मनुष्य केवळ इंग्रजाची खराब नक्कल असा तयार होऊन तो इंग्रजांचा शूद्र होणार. तर देशी संस्कृतीची म्हणजे देशी वाङ्मय आणि देश्य ललित कला यांचें देशांत प्रामुख्य राहिलें तरच देशांतील लोकांची सामाजिक उच्चता कायम राहील. परक्या भाषेची उच्चता देशांत राहूं दिली तर ती भाषा ज्यांची जन्मभाषा आहे त्यांचें उच्च जातित्व देशास मान्य करावें लागेल. तर या क्रियेस जोरानें प्रतिबंध केला पाहिजे. हिंदूमध्यें जातिभेद आहे आणि राज्य जरी परक्यांचें आहे, तरी त्यामुळें क्षत्रियवर्ग कायतो स्थानभ्रष्ट झाला. पण ब्राह्मणवर्गाचें देशावर प्रामुख्य राहिलें. परराष्ट्रीयास आपलें सामाजिक उच्चत्व देण्याची अधोगति देशांत अजून उत्पन्न झाली नाहीं तर आपल्या भाषेचें देशांत प्रामुख्य राखल्यानें इंग्रजांच्या सबंध जातीला समाजाचा उच्च वर्ग बनूं देण्यामुळ जी राष्ट्रीय अधोगति उत्पन्न होईल, तींतून तरी आपला समाज बचावेल.परकीय राष्ट्रास आपली सामाजिक उच्च जात म्हणून कबूल करण्याचें भवितव्य अनेक प्रकार करून टाळलें पाहिजे असें मनानें घेतलें आणि त्याला माझ्या मनांत जी सुधारणात्रयी वागत होती तो एकच उपाय आहे, असें दिसूं लागलें. देशामध्यें देश्य भाषेचें स्वामित्व राहिलें तरच त्या भाषा उत्तम तऱ्हेनें बोलणाऱ्या आणि लिहिणाऱ्या वर्गांचें स्वामित्व राहील ही कल्पना मनांत चांगली बिंबली आणि नवीन तऱ्हेचे विचार देशांत पसरविण्यास मन उद्युक्त झालें. आणि कांहीं दिवस सुधारणा त्रयीचा प्रचार करावा असा निश्चय झाला.

अरिस्टॉक्रसीचें स्वरूप

सिलोनमध्यें प्रवास करीत असतां अशी एक गोष्ट दिसून आली की सिंहली समाजामध्यें प्रौढविवाह जरी पूर्णपणें स्थापित झाला आहे तरी प्रीतिविवाह स्थापित झालेला नाहीं. आणि स्त्रीपुरुषांची ओळख ज्या समाजांत होते असा समाज म्हटला म्हणजे तेथील यूरोपिअन आणि बर्घेरांचा समाज होय. यूरोपिअन लोकांचा समाज बराचसा स्वयंपूर्ण आहे. त्यांत बर्घेर लोकांसहि मज्जाव आहे पण बर्घेर लोकांच्या समाजामध्यें यूरोपिअन लोकांच्या चालीरीतींचें बरेंच अनुकरण झालें आहे व त्यांच्या सामाजिक फंकशन्समध्यें म्हणजे संस्थामध्यें श्रीमंत वर्गांतल्या सिंहली आणि तामिळ लोकांचाहि प्रवेश होतो. सिंहली लोकांमध्यें व तामिळ लोकांमध्यें जरी लग्नाचें वय आणि शिक्षण हीं वाढलीं आहेत तरी स्त्रीपुरुषांचा सामाजिक परिचय करून देणाऱ्या संस्था न वाढल्यामुळें चेल्ल्याल, गोईगम किंवा करावा यांसारख्या सुशिक्षित जातींमध्यें देखील परस्पर लग्नव्यवहार तर नाहींच पण स्त्रीपुरुषांच्या ओळखी देखील होत नाहींत. त्यामुळें पुष्कळशा तरुण सिंहली किंवा तामिळ मंडळींची या बर्घेरांच्या म्हणजे यूरेशिअनांच्या समाजांत आपला प्रवेश करून घेण्याची प्रवृत्ति होते. आणि त्यामुळें या समाजाचें उच्चत्व देशी लोकांच्या मनावर ठसतें. या सर्व गोष्टी मी पाहिल्या तेव्हां माझ्या मनांत जी गोष्ट आली ती ही, कीं प्रत्येक देशांत त्या देशाच्या उच्च संस्कृतीची वाहक अशी जी ॲरिस्टाक्रसी पाहिजे; तशी तयार होण्यास त्या समाजामध्यें स्त्रीपुरुषसंबंध देखील खुला पाहिजे. कारण ज्या समाजांत हा खुला संबंध असतो तो समाज अधिक आकर्षक होतो, आणि त्यामुळें त्या समाजांत शिरावें अशी इतरांस इच्छा उत्पन्न होते. "अरिस्टाक्रसी" होऊं इच्छिणाऱ्या समाजानें केवळ लखोटबंद राहून उपयोगी नाहीं तर इतरांनां आपणांत समाविष्ट होण्याची संधि दिली पाहिजे आणि आपल्या वर्गांत समाविष्ट होण्याची इतरांची इच्छा जिवंत ठेवली पाहिजे. ब्राह्मणांत शिरावें अशी ब्राह्मणेतरांची इच्छा असल्यास त्यांस संधि द्यावी. ब्राह्मण समाज अधिकाधिक आकर्षक करावा व त्या समाजामध्यें इतर जातींतील चांगल्या व्यक्तींनां येण्यास संधि मिळावी. असें केल्यानें ब्राह्मण जात ही केवळ जात न रहातां समाजाचा उच्च वर्ग होईल; म्हणजे देशामध्यें इंग्रजांस हिंदु समाजाची उच्च जात बनूं द्यावयाचें नाहीं; तो मान

राखण्याचा ब्राह्मणांनीं प्रयत्न करावयाचा व देशामध्यें इंग्रजांनां सामाजिक प्रामुख्य मिळूं नेय म्हणून देशी भाषेचेंच प्रामुख्य देशांत राखावयाचें आणि तें देखील इतकें कीं प्रत्येक भागांत जे परके लोक येतील त्यांनां देखील देश्य लोकांशीं सादृश्य उत्पन्न व्हावें ही आवश्यकता वाटावी.

यासाठीं उपाय म्हटला म्हणजे देशाचे विभाग भाषेच्या तत्त्वानुसार व्हावे, प्रांतिक राज्यकारभार देशी भाषेंत व्हावा, तो देखील इतका कीं गव्हरनरनें इंग्रजींत सही केली तर ती बेकायदेशीर ठरावी, देशभाषेत हायकोर्टाचे निवाडे व्हावे म्हणजे देशी सामान्य भाषांनां कायदेशीर भाषेचा संस्कार होईल, आणि इंग्रज कायदेपंडितांचें देशांत प्रामुख्य रहाणार नाहीं आणि त्याबरोबर त्यांचें नैतिक प्रामुख्यहि रहाणार नाहीं.

सायन्स कांग्रेसच्या वेळेस मी मद्रासला होतों. पण त्यावेळेस माझा मुक्काम कायतो ५।६ दिवस होता. त्यावेळेस मी डॉ. लक्ष्मीपति यांच्याकडे उतरलों होतों पण त्यावेळेस त्यांची "आंध्रविज्ञानसर्वस्वमू"ची योजना मी पाहिली नाहीं. मद्रासला सायन्स कांग्रेसला गेलों त्यावेळेस हिंदु आयकोनोग्राफीचे कर्ते टी. गोपीनाथराव यांची ओळख झाली, आणि त्यांनीं मला त्रावणकोर पहाण्यास बोलावलें. तेव्हां मी तें आमंत्रण स्वीकारलें आणि त्यांच्या नंतर २।३ दिवसानीं त्रिवेंद्रम् येथें पोहोंचलों. तेथें देखील आणखी एका गोष्टीचें अवलोकन झालें आणि तें म्हटलें म्हणजे तेथें स्त्रियांनां जरी स्वातंत्र्य बरेंच आहे तरी तेथें अनुनयपद्धति उत्पन्न झाली नाहीं. त्रावणकोरहून कोचीनला गेलों.तेथें एर्नाकुलम, त्रिचुर इत्यादि मुक्कामीं होतों. त्रिचुर येथें तेथील एथ्नालाजिस्ट ए. के. अनंत कृष्ण एय्यर यांच्याकडे पाहुणा होतों. त्रावणकोर येथील गोपीनाथ रावांमुळें आणि त्रिचुर येथील रा. ऐय्यरांमुळें तेथील मल्याळी लोकांच्या समाजाची माहिती चांगल्या प्रकारें झाली. तेथें असें दिसून आलें कीं, जरी त्यांच्यामध्यें प्रौढविवाह आहे आणि प्रीतिविवाह होतो तरी प्रीतिविवाह ही गोष्ट जनसंमत धरली जात नाहीं. त्रावणकोरचे दिवाण रा. कृष्णन् नायर यांनीं तर प्रीतिविवाहाचें अस्तित्व नायर समाजांत नाहीं व नायर आणि ब्राह्मण यांच्या विवाहपद्धतींत जणु काय फरकच नाहीं असें दाखविण्याची त्यांची इच्छा होती. म्हणजे जेथें स्त्रीस्वातंत्र्य आहे व

नैतिक विचार अगदीं स्वतंत्र आहेत. तेथील हिंदु समाजांत देखील अनुनयपद्धतीची कल्पना रुजत नाहीं. याचें कारण समाजाच्या ब्राह्मण अरिस्टॉक्रसीनें ती मान्य केली नाहीं हें होय असें वाटूं लागलें.

ना. गोखल्यांचा मृत्यु

त्रिचुर येथें असतां नामदार गोखल्यांच्या मृत्यूचें वर्तमान ऐकलें. व तेव्हां एक तऱ्हेची मनाला जागृति झाल्यासारखें झालें. महाराष्ट्रांतील एक महत्त्वाचा मनुष्य दिवंगत होतो आणि आपण केवळ अनिश्चयी मनुष्यासारखें भ्रमण करीत आहों, जग हें पुढें दररोज चाललें आहे, हिंदुस्थान मात्र मागें आहे आणि आपण त्याच्या प्रगतीसाठीं काय करीत आहोंत इत्यादि विचार मनांत जागृत झाले आणि गोखल्यांच्या मृत्यूची बातमी आल्यानंतर एकदोन दिवसांनीं त्रिचुर सोडलें आणि मद्रासला गेलों. यावेळेसहि डॉ.लक्ष्मीपतींच्याकडे उतरलों होतों आणि आंध्रांच्या ज्ञानकोशाची मांहेती मला याच वेळेस झाली.

डॉ. लक्ष्मीपति आणि त्यांच्या सुशील पत्नी

डॉ. लक्ष्मीपति हे पुण्यास वैद्यक संमेलनाच्या वेळीं आले होते त्यामुळें त्यांची ओळख कांहीं महाराष्ट्रीयांस असेलच. डॉ. लक्ष्मीपति हे तेलुगुज्ञानकोशाचे मुख्य संपादक नव्हते, मुख्य संपादक रा. रा. के. व्हा. लक्ष्मणराव एम्. ए. हे होते. तथापि या ग्रंथाची सर्व व्यवस्था पहाण्याचें काम डॉक्टर लक्ष्मीपति हेच करीत होते. हें काम करण्यासाठीं जो प्रास्ताविक खर्च लागावयाचा तो चार मंडळींनीं कांहीं महिने शंभर रुपये दरमहाप्रमाणें पैसे घालून केला. या कामाची योजना साधारणतः येणेंप्रमाणें होती: एका रुपयास १०० पानें ज्ञानकोशाचीं द्यावयाचीं आणि शंभर पृष्ठांचा एक असे साठ अंक काढून पुस्तक साठ रुपयांत द्यावयाचें. त्यांच्या ग्रंथाला या योजनेनें सातशें वर्गणीदार मिळाले. आणि त्यामुळें त्यांचें काम चालेल असा त्यांस विश्वासहि वाटूं लागला, त्यांनीं अनेक पुस्तकांचें पद्धतशीर पृथक्करण करावयाचें आणि त्यांत विषय पडतील तसे पडूं द्यावयाचे अशी योजना न करतां अगोदरच अजमासानें विषय ठरवून त्या त्या विषयांवर लेख लिहिण्याची योजना केली. ही कल्पना आणि आम्ही ज्ञानकोश तयार करतांना योजलेली कल्पना यांची तुलना ज्ञानकोशाच्या

प्रथमच्या योजनेंतच केली आहे (ही योजना परिशिष्ट म्हणून पुढे छापली आहेच). डॉ. लक्ष्मीपतींच्याकडे यावेळेस बरेच दिवस म्हणजे निदान दोन आठवडे राहिलों, आणि ते दिवस मोठ्या आनंदाचे गेले. डॉ. लक्ष्मीपती म्हणजे आपली प्रगति अनेक दिशांनीं व्हावी म्हणून उत्साह बाळगणारे, आणि वाङ्मय, राजकारण, वैद्यकशास्त्र, सामाजिक सुधारणा यांसारख्या सर्व प्रकारच्या गोष्टींत आस्था बाळगणारे गृहस्थ असल्यामुळें त्यांच्याशीं संभाषण मनास उल्लसित करीत असे आणि त्यांच्या सुशील पत्नी या सुशिक्षित आणि सुस्वभावी आंध्र कुलवधूचा उत्तम नमुना होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. आणि या दोहोंच्या संबंधानें माझ्या मनांत एक तऱ्हेचा आदर उत्पन्न झाला. त्यावेळेस आंध्रमंडळीमध्यें मुलीचें रजोदर्शनोत्तर विवाह क्वचितच होत आणि मिसेस लक्ष्मीपति यांचें लग्न त्या इंटरमिजिएट झाल्यानंतर झालें, आणि दोघांचा परिचय झाल्यानंतर झालें आणि नवरा आणि बायको ही दोघे ब्राह्मण पण निराळ्या पोटजातींतली होतीं त्यामुळें हें कुटुंब तेथील सामाजिक दृष्टीनें अत्यंत प्रगमनशील मंडळींत मोडलें जाई. डॉ. लक्ष्मीपति यांच्याकडे असतांना आंध्र देशांतील प्रमुख लेखकवर्गाच्या ओळखी झाल्या, आणि त्यावेळेस आणि मीं "आंध्रांमध्यें गीर्वाणाविषयक जागृति" विविधज्ञानविस्तारांत पाठविण्यासाठीं लेख तयार केला, (वि. वि. एप्रिल १९१९).

यावेळेस डॉ. लक्ष्मीपतींच्या आंध्रविज्ञानसर्वस्वमूच्या व्यवस्थेचे गुण व त्याप्रमाणें दोषहि कळून आहे. अंक वेळेवर निघत ना, आणि दोन अंक एकदम देण्याचीहि प्रवृत्ति झाली. पण तीमुळें नुकसानहि सोसावें लागलें. व्ही. पी. दोन रुपयांची केली म्हणूनच कित्येकांनीं नाकारली. असेंहि दिसून आलें कीं ज्या अनेक ग्राहकांनीं पहिला अंक घतला त्यांनीं दुसरा अंक घतला नाहीं आणि ज्यांनीं दुसरा घेतला त्यांनीं तिसरा घेतला नाहीं त्यामुळें संच बिघडले आणि असेंच चालू राहिलें तर काम शेवट पर्यंत तडीस कसें जाईल याची शंका डॉ. लक्ष्मीपतीनांच वाटूं लागलेली दिसली; तेव्हां रुपरुपायास एकेक अंक विकावयास काढणें हा योग्य मार्ग नव्हे असें मनांत मीं ठरविलें. या सर्व गोष्टींचें अवलोकन मराठी ज्ञानकोशाच्या यशाला कारण आहे असें मीं समजतों. आपल्या आंध्र मित्रांस आलेलें अपयश आमच्या यशास कारण झालें आहे.

आंध्र आणि महाराष्ट्र

आंध्रांचा हा प्रयत्न पाहून मनाला एक तऱ्हेचें ईर्ष्येचें उत्तेजन मिळालें. आंध्रांच्या मध्यें शिक्षण कमी आहे अशी माझी त्यावेळेस समजूत होती आणि आंध्रांपैकीं निजाम हद्दींत असलेला भाग महाराष्ट्राच्या निजाम हद्दींत असलेल्या भागापैकीं जास्त आहे आणि त्यामुळें ब-याच भागांत आंध्रवाङ्मयाला अपकर्षक अशी स्थिति आहे असें दिसून येत होतें, आणि अर्वाचीन आंध्रवाङ्मय त्याच्या योग्यतेकडे पाहिलें तर तें मराठीपेक्षां कमी दर्जाचें आहे असें भासल्याशिवाय रहात नसे; असें असूनहि आंध्रांनीं ज्ञानकोश तयार करण्याची कंबर बांधली तर महाराष्ट्राला तसें करतां येणार नाहीं काय, असा विचार उत्पन्न झाला; व माझा स्वतःच्या योग्यतेसंबंधानें मोठा आत्मविश्वास होताच. तर आपण जर ज्ञानकोशरचनेचें काम अंगावर घेतलें तर आंध्रांपेक्षां तें अधिक चांगलें आणि अधिक यशस्वी खात्रीनें करूं असें वाटलें. तथापि यावेळेस देखील ज्ञानकोश काढण्याचें अंगावर घेण्याचा कायमचा निश्चय झाला नाहीं. अजून माझें मन स्वकीय संस्कृतीच्या संवर्धनासाठीं सामाजिक व राजकीय चळवळ करण्याकडेसच होतें. आणि मद्रास येथें मीं जीं व्याख्यानें दिलीं तीं याविषयावरच होतीं. त्या व्याख्यानांचे अहवाल तेथील स्थानिक दैनिकांत प्रसिद्ध झाले होते आणि त्यामुळें माझ्या मतांविषयीं आणि विचारांविषयीं आंध्र मंडळींत बरीच जिज्ञासा उत्पन्न झाली होती. त्यामुळें मच्छलीपट्टणच्या मंडळींनीं मला व्याख्यानास येण्यास आमंत्रण केलें. तेथें व्याख्यानें झालीं तीं संभाषणस्वरूपाचीं होतीं आणि त्या व्याख्यानांत आंध्रांच्या भाषांविशिष्ट प्रांताच्या तत्त्वास नव्या तत्त्वज्ञानाची जोड मिळाली.

आंध्रांच्या देशांत असतां त्यांनीं माझा जो सत्कार केला आणि त्यांच्या चळवळीस जो मीं जोर दिला त्यासंबंधानें सविस्तर माहिती देणें तो केवळ आत्मचरित्राचा भाग होईल. तो ज्ञानकोशाच्या इतिहासाचा भाग होणार नाहीं आणि यासाठीं त्याची विशेष माहिती येथें देतां येत नाहीं. एवढेंच सांगतां येईल कीं, आपल्या समाजाची संस्कृति कायम राखण्यासाठीं प्रयत्न करण्याची आवश्यकता आणि तीसाठीं सुधारणात्रयीचें महत्त्व आंध्रांनां बरेंच पटलें. इंग्रजी भाषेनें समाजांत एक दुर्बल एकीचा सदृश वर्ग उत्पन्न होईल पण एक जात जितकी परस्पर बद्ध असते तितक्या एकीचा वर्ग तयार करावयाचा असला तर तो स्थानिक

संस्कृतीच्या महत्त्वस्थापनेनें समाजांत जें दृढीकरण उत्पन्न होतें त्यानेंच होईल आणि भिन्न लोक स्थानिक समाजाशीं एकजीव होण्याचा प्रयत्न अधिकाधिक करतील.

तर थोडक्यांत सांगावयाचें कीं हिंदुस्थानाच्या प्रत्येक भागांत स्थानिक संस्कृतीचें महत्त्व स्थापन करण्यासाठीं जी एक भावना माझ्या मनांत उत्पन्न झाली आणि ज्या भावनेचा प्रसार मी इतरांत उत्पन्न करीत होतों ती भावना ज्ञानकोशाच्या उत्पत्तीस बऱ्याच अंशी कारण झाली. या भावना उत्पन्न करण्यासाठीं मी संस्कृतमध्यें व्याख्यानेंहि दिलीं आणि समाजसंघटनेवर कांहीं संस्कृत श्लोकहि तयार करून त्यांचा प्रचार आंध्र देशांत, बेझवाडा, गुंतूर नरसरापेठ, राजमहेंद्री, काकीनाडा, विजयानगर इत्यादि ठिकाणें हिंडून आणि उत्कलांतील गंजम, कटक, जगन्नाथपुरी इत्यादि गांवें हिंडून केला आणि नंतर कलकत्ता व रायपूर येथें जाऊन नागपुरास आलों आणि तेथें ज्ञानकोशाची कल्पना मांडली आणि कार्याला लागलों. रायपूर येथें माझा जन्म झाला असल्यामुळें यावेळेस रायपूर पाहून मला मोठा आनंद झाला. नागपूरलाच ज्ञानकोशाची कल्पना कां मांडली याविषयीं थोडेसें विवेचन अप्रस्तुत होणार नाहीं.

कार्य पुण्यास कां सुरू केलें नाहीं?

ज्ञानकोशाचा कायक्रम पुण्यांत सुरू न करतां नागपुरासच सुरू कां केला याविषयीं थोडासा खुलासा केला पाहिजे. प्रारंभींचा कार्यक्रम नागपुरासच सुरू करण्यांत अनेक सोयी होत्या. पुण्यास संस्था पुष्कळ आहेत नागपूर व मध्यप्रांत येथें महत्त्वाची संस्था नाहीं याविषयीं नागपूरच्या कांहीं मंडळींस खेद वाटे. पुण्यास संस्था निघाव्यात आणि त्यानीं वऱ्हाड नागपूराकडे वर्गणीसाठी यावें ही गोष्ट गैर आहे असें पुष्कळ लोकांस वाटूं लागलें. होतें. माझ्या मनांतहि हीच भावना होती. मला पुण्याचा अभिमान नव्हता मला महाराष्ट्राचा अभिमान होता आणि त्यांतल्या त्यांत पूर्वेकडील महाराष्ट्राचा अभिमान होता. वऱ्हाड नागपूरनें एखादें असें कार्य करून दाखवावें कीं, जें हिंदुस्थानांत गाजेल असें मलाहि वाटत होतें. या माझ्या प्रांतिक देशाभिमानामुळें माझी नागपुरासच काम करावें ही प्रवृत्ति झाली पण या प्रांतिक अभिमान शिवाय दुसरींहि कारणें होतीं. पुण्यास जर हा कार्यक्रम सुरू केला असतां तर हें कार्य पक्षविषयक प्रश्नांतच गणलें गेलें

असतें. त्यावेळेस लो. टिळक जिवंत होते आणि लो. टिळक हा एक व्यक्ति अशी होती कीं, तिला आंत घ्यावें तरी पंचाईत व वगळावें तरी पंचाईत. लोकमान्य आंत असले तर ज्ञानकोश हा ग्रंथ विशिष्ट पक्षाचा होणार असें लोकांनां वाटलें असतें. आणि त्या वेळच्या वातावरणांत विशेषेंकरून मवाळपक्षानें त्यास उपद्रव दिला असता. कांहीं कारणामुळें मला त्यावेळेस जहाल पक्षाचे धरण्यांत येत असे. आणि त्याला कारण काय तर "स्वार्थत्यागाची मीमांसा" हा लेख. फर्ग्युसन कॉलेजच्या कांहीं मंडळीना तो लेख केवळ मवाळांची टवाळी करण्याकरतां आहे असें वाटलें.या लेखामध्यें केवळ स्वार्थत्याग हा केव्हां उपयोगी पडेल, केव्हां शहाणपणाचा, केव्हां निरुपयोगी याविषयीं तत्त्वें दिली होतीं व फर्ग्यूसन कॉलेजचें उदाहरण केवळ डोळ्यासमोरचें म्हणून दिलें होतें. परतु या कॉलेजच्या अभिमानी मंडळीचा असा समज झाला कीं, माझा मुख्य हेतु फर्ग्यूसन कॉलेजची टवाळी करणें हा आहे, व तत्त्वांची मांडणी केवळ उपबृंहण होण्यासाठीं आहे. सुबोधपत्रिकेंतनें तर त्या लेखावर टीका करतांना डॉ. केतकर हे जहालांचे पुढारी होऊं पहात आहेत असा मजवर आरोप केला. फर्ग्यूसन कॉलेजमध्यें सर्वच मंडळी अगदीं विरुद्ध होती अशांतला मुळींच भाग नाहीं. कारण प्रो. पटवर्धन, डॉ. गुणे वगैरे मंडळींनीं त्या लेखाचें स्वागत चांगल्या प्रकारें केलें.

केसरीमध्यें जातिभेदावर जो लेख लिहिला होता तो लेख देखील मला विशिष्ट पक्षांत घालण्यास कारण झाला. तसला लेख लिहिण्याचें धैर्य मला झालें नसतें असें डॉ. भांडाकर देखील माझ्यापाशीं म्हणाले होते, व तो लेख आज जर कोणीं वाचून पाहिला तर जे विचार त्यावेळचे कट्टे सुधारक देखील व्यक्त करावयास भितील अशा विचारानें तो भरलेला आहे. पण तो लेखहि माझ्यावर जहालपणाचा शिक्का मारण्यास कारण झाला होता, आणि याचें कारण एवढेंच कीं, बुद्धाला वाईट म्हटलें. बुद्धाला वाईट म्हणणारा लेखक ब्राह्मण्याची तरफदारी करणारा होय. आणि अर्थात् तो जुन्या मताचा आहे असा त्यावरून कांहीं उदारमतवाद्यांनीं आपला मुद्दाम समज करून घेतला. आणि जुन्या मताचा म्हणजे राष्ट्रीय म्हणजे मवाळांच्याविरुद्ध अशी कित्येकांची विचारपद्धति होती. परंतु बुद्धाला वाईट कां म्हटलें याच्या कारणांकडे लक्ष दिलें नाहीं. माझा बुद्धावर जो आक्षेप होता तो असा कीं, बुद्ध

हा जातिभेद मोडावयास उद्युक्त झालेला नसून जातिभेदाची तळी उचलून धरणारा होता. आणि तो समतेचा भोक्ता नसून केवळ ब्राह्मणद्वेष्टा असा होता, ब्राह्मणद्वेष म्हणजे जातिभेदाचा द्वेष नव्हे. तथापि इतका खोलवर विचार न करतां बुद्धास वाईट म्हणणारा मनुष्य सुधारणेला विरोधी आहे असें धोपट मार्गानें लोक ठरवीत असत. व त्या मतानुसारच लोक माझें वर्गीकरण करूं पहात. पुण्यामुंबईतील लोकांच्या विचारांवर असल्या विचारांची खरपूड होती पण ती खरपूड पूर्वेकडील महाराष्ट्रांत फारशी पसरली नव्हती.पूर्वेकडील महाराष्ट्र अधिक मोकळ्या मनानें विचार करणारें होतें आणि पाश्चिमेकडून जे विचारप्रवाह येत त्याला बेताचाच मान देणारें होतें व तेथें टिळक व गोखले या दोघांनाहि त्याच व्यक्तींकडून सारखाच मान मिळे. या गोष्टींमुळें ज्ञानकोश काढावयास पुणें हें स्थल योग्य नव्हे, प्रारंभींच फार अडचणी येतील असें मला वाटलें आणि नागपूर ही जागा पसंत केली.

नागपूर कां पसंत केलें

नागपूर ही जागा पसंत करण्याचें दुसरें एक कारण होते. आणि तें कारण म्हटलें म्हणजे माझें वऱ्हाड मध्यप्रांतावरील प्रेम हें होय. माझा जन्म रायपूरला झाला आणि माझें बरेचसें शिक्षण उमरावतीस झालें आणि त्यामुळें मी आपणांस उमरावतीचा म्हणवीत असें; आणि उमरावतीच्या माझ्या मित्रमंडळीबद्दल मला मोठा अभिमान वाटत असे. वीर वामनराव, कै. शामराव देशपांडे वगैरे मंडळी माझ्या बरोबरीचीच. उमरावती हायस्कूलचे माझ्याबरोबरचे विद्यार्थी वऱ्हाडांतच वसती करून राहिलेले आणि यामुळें या सर्व मंडळीशीं माझ्या ओळखीहि होत्या व त्यांसहि माझ्याविषयीं अभिमान असे. व जेव्हां मीं ज्ञानकोशाची योजना तयार केली आणि ती कांहीं मंडळीनां कळविली तेव्हां या कार्यास आपण मदत करावी ही भावना त्यांच्यामध्यें स्वाभाविकपणें उत्पन्न झाली. याप्रमाणें वऱ्हाडांतील मंडळी व मी यांचा येणेंप्रमाणें आपलेपणाचा संबंध असल्यामुळें वऱ्हाडांतील मंडळीस मला मदत करावी या तऱ्हेची बुद्धि होती.

शिवाय नागपूर ही जागा पसंत करण्याचें कारण म्हटलें म्हणजे कांहीं अंशीं तो योगायोग जुळून आला हें होय. कलकत्ता युनिव्हर्सिटीची

नोकरी सोडल्यानंतर मी दीड वर्ष हिंदुस्थान हिंडत होतों आणि मद्रास कडे विशेषें करून आंध्र देशांत भाषेचे तत्त्वानुसार देशविभाग पाडण्यासाठीं जी चळवळ सुरूं झाली तिला जोर देत होतों, हें मागें सांगितलेंच आहे. आंध्रामध्यें ही चळवळ जोराची उत्पन्न करून मी ओरिसांत गेलों. व तेथेंहि उत्कल चळवळीला टेंकू दिला. त्यानंतर मी कांहीं दिवस कलकत्त्याला होतों. व तेथून मध्यें रायपूरला मुक्काम करून मी नागपुरास आलों कलकत्त्यास असताना तेथील लायब्ररींत बसून एक मध्य प्रांताविषयीं व्याख्यान तयार केलें. त्या व्याख्यानांत मुख्य मुद्दा असा होता कीं मध्यप्रांतास हिंदुस्थान सरकाराकडून पुरेसा पैसा मिळत नाहीं. आणि बंगाल प्रांताला माल जास्त मिळतो. आणि खरोखर मध्य प्रांतालाच मदतीची गरज जास्त आहे हें. जें व्याख्यान मीं तयार केलें तें बरेंच आंकडे वगैरे देऊन तयार केलें होतें आणि ते व्याख्यान नागपुरास आल्यानंतर प्रथम दिल्यानें नागपूरच्या मंडळीवर एकदम छाप पडली. या व्याख्यानाला गर्दी सपाटून होती व हा व्याख्यानांतील मुद्दा नागपूरच्या पुढाऱ्यांच्या तोंपर्यंत मुळीच लक्षांत आलेला नव्हता. आणि नागपूर सरकार आपला कारभार गचाळ रीतीनें करीत आहे अशा रीतीनें त्या व्याख्यानांत मांडणी केली होती. त्यानंतर नागपूर युनिव्हर्सिटीवर एक व्याख्यान दिलें. आणि त्या व्याख्यानाचाहि परिणाम बराच झाला. परंतु त्या व्याख्यानाचा दुसराहि परिणाम झाला. आणि तो म्हटला म्हणजे मध्यप्रांतांतील ज्या यूरोपीयन अधिकाऱ्यांची मी सरकारी नोकरींत शिरावें अशी इच्छा होती किंबहुना आग्रह होता त्यांची ती इच्छा नाहींशी झाली.नागपूरला असतांच तेथें ज्ञानकोशाची कल्पना मीं जाहीर केली. आणि त्यावेळेस एक कच्ची याजना देखील तयार केली. ती योजना करतांना ज्या गृहस्थानें विशेष मेहनत घेतली ते गृहस्थ म्हटले म्हणजे कै. पांडुरंगपंत जोशी हे होत. ही ज्यावेळेस योजना तेथील लोकांच्या पुढें मांडली तेव्हां एक मौजेचा, महत्त्वाकांक्षी परंतु फाजील महत्त्वाकांक्षी व त्यामुळें हास्यास्पद कार्यक्रम म्हणूनच कांहीं मंडळींनां वाटलें.

परंतु कांहीं मंडळींनीं जरी कार्यक्रम हास्यास्पद असला तरी तो हातांत घेऊन कामाला लागावें; अपयश येणारच. तरी येणार हें समजूनच काम हातीं ध्यावें असें म्हणणारी मंडळी होतीं. आणि अशा

मंडळीमध्यें तेथील अनेक पुढारी होते. त्यांत डॉ. मुंजे, डॉ. चोळकर व माधवराव पाध्ये वगैरेंचा उल्लेख करतां येईल. एवंच, नागपूरनें या कल्पनेचें प्रथम स्वागत केलें व त्यामुळें नागपुरास कार्यारंभ व्हावा हेंच युक्त होतें.

देशी भाषांतून शिक्षणाची चळवळ

नागपूरहून सप्टंबरच्या सुरवातीला उमरावतीला आलों त्यावेळेस मीं दुसरें एक काम अंगावर घेतलें होतें. तें म्हटलें म्हणजे नागपूर युनिव्हर्सिटी स्थापन होणार होती तींत सर्व शिक्षण देशी भाषांतून करावें ही चळवळ होय. त्यानंतर थोडक्याच दिवसांनीं नागपूरला प्राव्हिन्शिअल कान्फरन्स भरणार होती. व युनिव्हर्सिटीसंबंधानें ज्या सूचना कोणास करावयाच्या असतील त्यांची अखेरची तारीख देखील त्या प्राव्हिन्शिअल कान्फरन्सच्या अगोदर कांहीं दिवस होती. तेव्हां ही कल्पना बऱ्याच लोकांस मान्य करून द्यावी आणि बऱ्याच सुशिक्षित लोकांच्या सहीनें ती मांडावी म्हणून लोकमत मिळविण्यासाठीं वऱ्हाडभर हिंडलों आणि सुमारें ३।४ शें सुशिक्षितांच्या सह्यांनीं ती सूचना सरकारकडे पाठविली. यावेळेस मी वऱ्हाभर हिंडलों त्यामुळें पुष्कळशा मंडळीशीं ओळखी झाल्या आणि त्यांचें मराठी व हिंदी भाषांत उच्च शिक्षण मिळावें या कल्पनेस पाठबळ मिळालें. याच सुमारास जेव्हां प्राव्हिन्शिअल कान्फरन्ससाठीं अध्यक्ष कोण करावा म्हणून नावें मागविलीं होतीं त्यावेळेस अध्यक्षाच्या पदासाठीं माझेंहि नांव कांहीं जणांकडून सुचविण्यांत आलें. यावरून थोडक्याच दिवसांत मला कांहीं समाज अनुकूल झाला होता हें दिसलें. त्यावेळेस अध्यक्षपद कै. ना. शुक्ल यांस मिळालें होतें. पण अध्यक्षाच्या जागीं माझें नांव सुचविलें गेलें ही जाहिरात देखील माझें थोडेसें महत्त्व वाढविण्यास कारण झाली असावी.

फर्ग्युसनचे प्रोफेसर

नागपूरची प्राव्हिनशिअल कान्फरन्स (आक्टोबर १९१६) आटपल्यानंतर पुन्हां कांहीं दिवस उमरावतीस राहून मी मुंबईस कांग्रेससाठीं गेलों आणि तेथें देखील ज्ञानकोशाची कल्पना खासगी तऱ्हेनें जाहीर केली. आणि अनेकांचें साहाय्य मिळविण्याचा प्रयत्न केला. यानंतर म्हणजे जानेवारीच्या प्रारंभाला पुण्यास गेलों तेव्हां फरग्युसन

कालेजमध्यें तेथील मंडळीचें सहाय्य मागावयास गेलों तेव्हां त्या मंडळीनां थोडेसें आश्चर्य वाटलें. त्याचवेळेस कांहीं मंडळी म्हणावयास लागलो कीं, आमच्यावर टीका करतां आणि पुन्हां आमचें सहाय्यहि मागतों. मीं सांगितलें कीं असें करूं नये हें कोणत्या शास्त्रांत सांगितलें आहे. त्यावेळेस फरग्युसनच्या ज्या प्रोफेसरांबरोबर मी चहा घेत होतों,त्यांत प्रो. धर्मानंद कोसंबीहि होते. त्यांनांहि मी लेखक होण्याबद्दल विनंति केली तेव्हां ते म्हणाले कीं मला तुम्ही वादविवादास अयोग्य समजतां आणि मग माझ्यापाशीं लेख मागण्यास कां येतां. मी त्यांस म्हटलें कीं तुमच्याशीं वादविवाद करणें सोडून दिलें कारण वादाविवादास लागणाऱ्या औचित्याच्या कल्पना तुम्हीं सोडून दिल्या होत्या हें होय. तेव्हां ते म्हणाले आम्हाला जर औचित्याच्या कल्पना नाहींत तर आम्हाला लिहायला कशाला सांगता? मीं त्यांस उत्तर दिलें कीं मी तुम्हांस पाली वाङ्मयावर लिहावयाला सांगणार आहें; औचित्याच्या कल्पनांवर निराळा लेखक पाहीन! पण हें उत्तर प्रो. धर्मानंदांस आवडलें नाहीं. त्यांनीं पुढें तुम्ही सारस्वतांचा द्वेष करतां वगैरे आरोप करण्यास सुरवात केली व मीं त्यास शेवटीं कंटाळून आपण भांडणाची तारीख जरा कांहीं दिवसांनंतर ठरवू असें सांगितलें. त्यावेळेस कै. प्रो. पटवर्धन यांनीं मात्र आपलें वर्तन वादविवादाच्या मैदानांतील अट्टल खेळगड्याप्रमाणें केलें. ते म्हणाले "तुम्ही आमच्यावर टीका करतां काय? तुम्हीहि कधीं सांपडाल, मग तुमची मी अशी काढतों कीं तुम्हाला आठवणच राहील." हें ते हंसत हंसत आणि माझ्या कपांत चहा अधिकाधिक ओतीत म्हणाले. तेव्हां इतर मंडळीहि हंसूं लागली. आणि प्रो. पटवर्धनांच्याविषयीं माझ्या मनांत एकदम प्रेम [illegible]

डा. भाडारकर

त्याच वेळेस मी डॉ. भांडारकरांच्याकडे गलों. त्यांच्याकडे घेऊन जाण्याची कृपा आमचे मित्र सरदार मेहेंदळे यांनीं केली होती. त्यावेळेस डॉ भांडारकर माझ्याविषयीं अत्यंत वाईट कल्पना घेऊन बसले होते. माझीं पुस्तकें न वाचतां माझ्याविषयीं त्यांनीं मत बनविलें होतें: तेव्हां प्रथम डॉ. भांडारकरांनीं माझ्याशीं सहकारिता करण्याचें नाकारलें पण शेवटीं कांहीं लेख तपासून देण्याचें कबूल केलें. त्यावेळेस आमचें भाषण

एकमेकांवर लहान सहान हल्ले करणारें आणि त्यामुळें जरा मौजेचें झालें आणि त्यामुळें मला बरोबर घेऊन गेलों ही गोष्ट बरी झाली कीं वाईट झाली असें सरदार मेहेंदळ्यांस झालें असावें. पण शेवटीं डॉ. भाडारकरांचें मन बरेच खुलें झाले आणि सरदार मेहेंदळ्यांनां देखील थोडेसें बर वाटल.

महाराष्ट्रीय ज्ञानकोश आणि बाळ गंगाधर टिळक

१९१६ च्या जानेवारींतच कांग्रेसनंतर लोकमान्यांनाहि भेटलों होतों त्या संस्मरणीय प्रसंगीं लोकमान्यांनीं ज्ञानकोशाची योजना पार पडणार नाहीं. ती पार पाडणें अत्यंत कठिण गोष्ट आहे, इत्यादि गोष्टी सांगितल्या. तेव्हां त्यांस मीं म्हटलें कीं, ज्ञानकोश तयार करावा कीं न करावा याविषयीं तुम्हाला सल्ला विचारावयास आलों नाहीं, तुम्हीं काय मदत देंऊ शकाल एवढेंच विचारण्यास आलों आहे.

कार्य करावयाचें यासंबंधाचे निश्चयाचे शब्द ऐकून लोकमान्यांस आनंद झाला व ते म्हणाले कीं निश्चय ठरलाच असला तर जी काय मदत करावयाची ती मी आनंदानें करीन,स्वतः तुमच्याकरतां कांहीं लेख लिहीन, केसरींतून तुमच्या कार्याची जाहिरात करीन आणि जी काय स्वतः द्रव्याची मदत करतां येईल ती करीन आणि जे अनेक लोक भेटायला येतील त्यांच्याशीं तुमच्यासंबंधानें बोलेन. या प्रकारें काय मदतीची अपेक्षा करावी हें त्यांनीं सांगितलें आणि दुसरा कांहीं उपदेश केला त्याचें स्थूल स्वरूप येणेंप्रमाणें: लोकमान्य म्हणाले कीं "आपण डॉ. भांडारकरांनां भेटा; दुसऱ्या अनेक मंडळींनां भेटा;सर्वांचा सल्ला घ्या पण लेख स्वीकारतांनां कडक नजर ठेवा.पुष्कळ मंडळी लेख लिहितांना वाटेल तसे भरकटत असतात आणि पुष्कळशा मंडळीचा विद्वान म्हणून गौरवहि झालेला असतो आणि तो आमच्यासारख्यांनांहि करावा लागतो पण त्या गौरवानें फसूं नका. पुष्कळ मंडळींनां आम्ही विद्वान म्हणून सरटिफिकिटें देतों तीं वासरांत लंगडी गाय शहाणी या नात्यानें देतों, व तसें उत्तेजनार्थ द्यावेंहि लागतें पण ज्ञानकोश तयार करतांनां तुम्हाला अत्यंत निष्ठुरतेनें वागलें पाहिजे. लोकांचें लेख तुम्हाला तपासावे लागतील आणि मोठ-मोठ्या मंडळींनां दुखवावें लागेल." मीं त्यांस उत्तर दिलें कीं "जेव्हां लेख दुसऱ्याच्या नांवावर येणार तेव्हां त्यांत आम्ही जबाबदारी त्यांच्यावरच टाकणार, तर आम्हीं लेखांत व्यक्त होणाऱ्या मतांबद्दल फिकीर कां

बाळगावी.'' टिळक म्हणाले कीं ''जबाबदार आणि चांगला लेखक असेल आणि तो पूर्वग्रहदूषित नसेल तर तसें करण्यास हरकत नाहीं पण तुम्हांस अशी माणसें कोठून मिळणार आणि किती मिळणार?''तेव्हां मीं म्हटलें ''चांगली संशोधक माणसें थोडींच आहेत. कांहीं भागावर राजवाडे आणि खरे,कांहीं भागावर आपण स्वतः आणि कांहीं भागावर डॉ. भांडारकर यांस अधिकारी लेखक धरून त्यांचे लेख जसेच्या तसेच स्वीकारावयास हरकत नाहीं पण इतरांच्या लेखांवर बारीक नजर ठेवावीच लागेल.''तेव्हां ते म्हणाले ''कीं सर्वांच्याच लेखावर ठेवावी लागेल, तुम्हाला भांडारकरांनां वगळावयाचें असेल तर वगळा, मी त्यासंबंधानें कांहीं म्हणत नाहीं पण माझ्यासंबंधानें मी सांगतों कीं मला देखील वाटेल तसें लिहिण्याचें स्वातंत्र्य देतां कामा नये. तसेच राजवाड्यांनांहि देतां कामा नये. आम्हां दोघांच्याहि लेखांवर तुम्ही कात्री चालविली तर तुम्हीं आपलें कर्तव्यच केलें असें मी समजेन.''

ज्ञानकोशांत लोकमान्य टिळक लेख लिहिणार होते पण त्यांस कार्यबाहुल्यामुळें वेळ मिळाला नाहीं. ज्ञानकोशाच्या दुसऱ्या भागांत जो वेदविषयक मजकूर आला आहे त्याविषयीं त्याच्याशीं देखील मधून मधून चर्चा होत असे.

लोकमान्यांची भेट घेतली व पुण्यास समाजशास्त्रावर ज्याख्यानेंहि झोडलीं; त्या व्याख्यानांचा गडबडगुंडा गोपवारा केसरींत सांपडेल. मी १९।१।१६ च्यां सुमारास उमरावतीला व तेथून नागपूरला गेलों व तेथें जानेवारी महिन्यांतच ज्ञानकोश काढण्यासाठीं वाकररोडवरील कोंपऱ्याच्या दाते यांच्या घरांत भाडयानें जागा घेतली.

नागपूरला मी प्रथमतः ज्ञानकोशाची योजना मांडली तेव्हां ज्ञानकोश करावयाचा तो एक ट्रस्ट म्हणून करावा आणि ट्रस्टींपाशीं वर्गणी गोळा करणारांनीं फंड आणून द्यावा आणि त्या ट्रस्टींनीं मधून मधून रक्कम पास करून ती कामाकडे द्यावी अशा तऱ्हेची योजना ज्ञानकोशाची सहानुभूति बाळगणाऱ्या नागपूरच्या मंडळींत होती. व ज्ञानकोशाचे ट्रस्टी होण्यासाठीं अनेक मंडळी कबूल होती. पण ट्रस्टी होण्यास मी जी एक अट घालीत होतों त्या अटीस कोणी कबूल नव्हते आणि ती अट म्हटली म्हणजे ज्ञानकोशमंडळास दोन दोन हजार रुपये ट्रस्टी होणाऱ्या मंडळींनीं घालीत ही होतीं; पण ती अट ट्रस्टी होण्यास तयार

असलेल्या मंडळीपैकीं कोणासहि मान्य नव्हती. त्यावेळची बैठक कांहीं एक न ठरवितां खलास झाली. ज्ञानकोशाची योजना अव्यवहार्य आहे असें मत बनवून मंडळी घरोघर गेली. मात्र त्यांत कांहीं अपवाद होते. डॉ. चोळकर म्हणाले, कीं तुम्ही कंपनी कां काढीत नाहीं. कंपनी काढावी व लोकांनां, आगाऊ वर्गणीदार होणाराम अमुक फायदा मिळेल असे कांहीं तरी कळवावें आणि लोकांच्या हप्त्याहप्त्यानें वर्गण्या ध्याव्यात आणि त्या पैशावर ज्ञानकोश काढावा—ही कल्पना;ते सहज बोलून गेले. ही कल्पना मींहि अगोदर कांहीं मंडळीपुढें मांडली होती.पण ही कल्पना कोणासच पसंत पडली नव्हती. ज्ञानकोशाच्या पवित्र कामाला कंपनीचा धंदेवाईकपणा नको असें लोकांचें मत होतें. डॉ. चोळकरांनीं जात जातां ही कल्पना केव्हां मांडली कीं जेव्हां आपण याच्यावर पुढें बोलूं असे मी त्यांस सांगितलें, व त्यांस घाई असल्यामुळें तेहि निघून गेले.

लोकांची अनुकूलता कशी अजमावली

नागपुरांतल्या"बडया बडया" मंडळींची बैठक खलास झाल्यानंतर त्या बैठकींत काय ठरलें यांविषयीं जिज्ञासा असलेली "छोटी" मंडळी आली. ती मंडळी कांहीं तरी इष्ट ठरलें असेल अशा अपेक्षेनें व उत्साहानें आली होती. त्या मंडळीमध्यें कांहीं कायद्याचे विद्यार्थी होते व कांहीं नुकतेच कॉलेजांतून बाहेर पडलेले मास्तर होते. त्या मंडळींनां मीं प्रश्न केला कीं जर तुम्हांला १०० रु. भरावयास सांगितले आणि ते रुपये ५ वर्षांत भरावे म्हणून संधि दिली तर तुम्ही ज्ञानकोश घ्याल किंवा नाहीं. तरुण मंडळीमध्यें प्रथम भेटावयास आलेले गृहस्थ रा.नारायणराव पंढरपूरकर हे होते ते म्हणाले कीं, अवश्य घेऊं, हप्त्याहप्त्यानें पैसे भरण्याची सवड असली तर माझ्यासारख्या थोडया प्रातीच्या मनुष्याला देखील ज्ञानकोश घेणें अशक्य नाहीं. आणि दरमहा ४।५ रुपये भरून मी स्वत: जरूर घेईन. रा. नारायणरावास मीं विचारलें कीं, जर हा आपण ट्रस्ट केला तर तुम्ही त्यास केवळ वर्गणी म्हणून काय रकम घाल. तेव्हां त्यांनीं ५ रु. च्या आंतली रकम सांगितली. अर्थात या बोलण्यावरून लोकांची प्रवृत्ति काय आहे हें सहज दिसून आलें. मी इंटर नॅशनल एन्सायक्लोपीडियासाठीं गिऱ्हाइकी मिळवण्याचें काम अमेरिकेंत केलेंच होतें. आणि त्यावेळेस मला असें दिसून आले कीं, प्राथमिक

शाळेंतल्या मास्तर व मास्तरणी यांच्या गळ्यांत एन्सायक्लोपीडिया बांधतां येतो. त्यांनां हप्त्यानें पैसे भरण्याची मात्र सवड पाहिजे. तोंच अनुभव हिंदुस्थानांत देखील येऊं शकेल असें नारायणराव पंढरपूरकर यांच्या बोलण्यावरून वाटूं लागलें. नारायणराव पंढरपूरकर निघून गेल्यानंतर दुसरे व तिसरे कायद्याचे विद्यार्थी आले. त्यांनां देखील मी तोंच प्रश्न केला आणि त्यांनीं देखील तीच उत्तरें दिलीं. यावरून मला असें वाटूं लागले कीं, ५०।६० रु. पगाराच्या सामान्य पदवीधरांमध्यें जर उत्साह उत्पन्न करतां येतो तर ज्ञानकोशाची कल्पना अशक्य कां समजावी. ज्ञानकोशाला पैशाची अडचण पडणार नाहीं. आपण १००००० रु. गोळा करूं शकूं अशी मनांत खात्री उत्पन्न झाली. या बैठकीला माधवराव पाध्ये हजर नव्हते. या रात्रीला मी कंपनीची संपूर्ण योजना तयार केली. ती अशी:—५०००० रुपयांचे कंपनीचे शेअर्स करावेत व ५०० वर्गणीदाऱ्या विकाव्यात; व या दोहोंकडून उत्पन्न सरासरी १००००० रु. येईल. या एक लाखांत खर्च कसा बसवावयाचा त्याचेंहि स्थूल कोष्टक केलें. त्यावेळेस कागदाचा भाव ८४ धरला होता. आणि एक हजार प्रतीं छापण्यास सुमारें ४०००० रु. खर्च येईल,असा हिशोब काढला. व ६०००० रु. संपादकीय व व्यवस्थाखर्च म्हणून धरले होते. त्याचवेळेस ५००० पर्यंत गिऱ्हाइकीं वाढूं शकेल अशी कल्पना करून दुसरा एक हिशोब बसविला होता.

रा. पाध्ये, रा. फडके व श्रा. गंगाबाई पेंडसे

दुसरे दिवशीं ही योजना माधवराव पाध्ये यांस दाखविली, त्यांस ती पसंत पडली व त्यांनीं १५ शेअर्स घेऊन डायरेक्टर होण्याचें कबूल केलें.व १५ शेअर्स घेण्यास मी तयार आहे असें मला पत्रहि लिहून दिलें.तें पत्र घेऊन आकोल्यास रा. फडके यांचेकडे गेलों; ते मला पाठिंबा देतील ही माझी खात्री होती. कां कीं ते माझे आप्त असून पूर्वोपासून हितचिंतक आहेत. रा. फडके यांचेकडे मला जावयाचेंच होतें. कां कीं त्यांनीं आपल्या दुसऱ्या मुलाच्या मुंजीसाठीं मला आमंत्रण केलें होतें. मुंज आटोपल्यानंतर त्यांचें व माझें बोलणें झालें, व त्यांनीं १९०० रु. चे शेअर्स घेण्याचें कबूल केलें. तेथेंच खामगावचे वकील व रा. फडके यांचे श्वशुर रा. दत्तोपंत पेंडसे हेहि आले होते, व दत्तोपंत पेंडसे यांनीं मला लहानपणापासून पाहिलें असल्यामुळें आणि माझ्याविषयीं कौतुक करणाऱ्या

मंडळीपैकीं ते एक असल्यामुळें त्यांनीं देखील या कार्यास आपली पूर्ण सहानुभूति व्यक्त केली. दत्तोपंत पेंडसे यांनीं आपल्या हयातींत ज्ञानकोशास काय मदत केली व त्यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नीनें (श्री. गंगाबाई पेंडसे यानी) मदत काय केली याचा उल्लेख पुढें प्रसंगानुसार येईलच.

ज्ञानकोशमंडळाच्या सुरवातीस माझे २५ शेअर्स, रा. माधवराव पाध्ये यांचे १५ शेअर्स व रा. नारायण खंडेराव फडके वकील अकोला यांचे १५ शेअर्स अशी जोड झाल्यामुळें कंपनीस मूर्त स्वरूप येणें शक्य झालें. माझ्या इच्छेस पहिल्या प्रथम दुजोरा देण्याचें श्रेय जर कोणास असेल तर तें नागपूरचे प्रसिद्ध वकील महादेव कृष्ण पाध्ये बी. ए. बी. एल्. संपादक उद्यम यांचेकडे आहे. महादेव कृष्ण पाध्ये हे माझे पहिले साहाय्यक होत. आणि त्यांच्या या साहाय्याबद्दल मला माझी कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. पुढें कंपनीच्या व्यवहारांत भांडणें झालीं आणि कांहीं लबाड मंडळीचें पुढारीपण माधवराव पाध्यांनीं केलें आणि हें करतांना त्यांनीं मजवर बरेच शिंतोडे टाकले आणि कंपनीच्या कामासहि नुकसान पोहोचाविलें तरी देखील ते माझे पहिले साहाय्यक होते ही गोष्ट मी कधींच विसरलों नाहीं.

प्रकरण ३ रें.

स्थापनेनंतरचें दीड वर्ष

माझें भांडवल

ज्ञानकोशमंडळाची जी एकंदर रचना झाली त्या रचनेवरच ज्ञानकोशमंडळाचें यश बऱ्याच अंशी अवलंबून आहे. प्रथम ५०००० भांडवलाची लिमिटेड कंपनी म्हणून नोंदण्यांत आली. या कंपनीमध्यें असेंच पहिल्यापासून धोरण ठेविलें होतें कीं कांहीं मंडळीची सत्ता पहिल्यापासून शेवटपर्यंत रहावी. या हेतूनेंच कंपनीमध्यें कायमचे चालक तिघेजण होते. व यासाठीं जादा चालक दोहोपेक्षां जास्त नसावेत म्हणून नियम "आर्टिकल्स"मध्यें घालण्यांत आला. जादा चालक कोणताहि शेअरहोल्डर होऊं शकेल. याचा परिणाम इष्ट झाला नाहीं व त्यामुळें ज्यांचें कंपनींत भांडवल कांहींच नाहीं व जे केवळ भांडवल

न घालतां चळवळ करूं इच्छितात अशा लोकांस आंत गडबड करण्यास वांव मिळाली. परंतु पुढें अनुभवानें म्हणा किंवा परिस्थितीमुळें म्हणा कंपनीचें हें वैगुण्य नाहींसें झालें. आणि ज्ञानकोशमंडळास २००० पर्यंत रक्कम ज्यानीं कर्जाऊ दिली आहे किंवा कंपनीच्या कर्जाबद्दल जे २००० पर्यंत जामीन आहेत अशा मंडळींपैकींच जादा चालक निवडावेत असा ठराव कंपनीनें केल्यामुळें कंपनीचे कामास स्थिरता उत्पन्न झाली. कपनी प्रथम ५०००० भांडवलाची होती व तें भांडवल१०० रु. चा एक शेअर याप्रमाणें विभागलें गेलें होतें. कायम चालकांनीं १५ किंवा जास्त शेअर घ्यावे असा नियम होता व मी स्वतः २५ शेअर घेतले होते. या २५ शेअरवर शेकडा ३० पर्यंत रक्कम पहिल्या वर्षींच भरणें प्राप्त होतें. म्हणजे कंपनी माझ्या ७५० रु. भांडवलावर निघाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. कां कीं उरलेली रक्कम म्हणजे १७५० रु. मला पुढील ३ वर्षांत भरावयाचे होते. म्हणजे मला ते माझ्या पगारांतून भरण्याची संधी होती. एवंच ७५० रु. भांडवलावर मला एक मोठी कंपनी स्थापन करतां आली. हिचें भांडवल पुढें एक लाख झालें आणि ज्ञानकोश रचनेची उलाढाल साडेतीन लाखांवर झाली. या सर्वाचा प्रारंभ किती लहान होता हें या सर्व गोष्टींकडे पाहिलें असतां लक्षांत येईल. ज्ञानकोशमंडळामध्यें पुढें कांहीं मंडळी माझ्याविरुध्द झाली तरी २५ शेअरांच्या मतांमुळें मला आपले अधिकार शेवट पर्यंत कायम ठेवतां आले. माझें उच्चाटण करण्याचा इतरांकडून प्रयत्न झाला नाहीं असें नाहीं. प्रयत्न पुष्कळ झाला. परंतु त्या मंडळींनां मतें कमी पडल्यामुळें व त्यांस कंपनीच्या कायद्याचें चांगलें ज्ञान नसल्यामुळें त्यांच्या प्रयत्नास यश आलें नाहीं. मी २५०० रुपयांचे शेअर घेतले होते त्यामुळेंच दोन गृहस्थांनीं १५०० चे शेअर घेतले. नाहीं तर त्यांनीं ती रक्कम आंत घातली नसती. मी २५०० पर्यंत रक्कम घातली कारण मी नोकर म्हणून रहाणार होतों. रा. पाध्ये यांनीं कांहीं अंशीं छापण्याचें काम मिळविण्याच्या इच्छेनें रक्कम घातली असावी तर रा. फडके यांनीं मला मदत करावयाची म्हणून हे पैसे आंत घातले असावेत. रा. पाध्ये व फडके या दोघांनां कार्याचें महत्त्व नव्हतें असें म्हणावयास मी तयार नाहीं. तथापि जास्त प्रबल भावना कोणती असावी याविषयीं माझें वर दिलेलें मत झालें आहे.

कार्यारंभ

महाराष्ट्रीय ज्ञानकोशमंडळ लि. ही कंपनी ३० मे १९१६ रोजीं नोंदण्यासाठीं पाठविली. व त्यानंतर २ जून रोजीं कंपनीच्या संस्थापकांची सभा बोलाविली. त्यावेळेस बहुतेक सर्व मंडळी हजर होती. त्या सभेंत डॉ. केतकर यांनां पगार म्हणून किंवा खर्चाकरतां म्हणून दरमहा ५० रु. द्यावयाचें ठरलें. दरमहा २० रु. चा एक कारकूनहि देण्यांत आला. त्यानंतर पुढची सभा १ जुलै रोजीं भरली. त्या एका महिन्यामध्यें दोघाजणांचेच कारकुनीसाठीं अर्ज आले होते. हें सांगण्याचें कारण असें कीं आमच्याकडे नोकरी करण्यासाठीं यावें इतपत सुद्धां विश्वास साध्या कारकुनास वाटत नव्हता. त्यानंतरची सभा आगस्ट ९ रोजीं भरली. कंपनी नोंदल्याचें साक्षीपत्रक आल्यानंतर हीच पहिली सभा असल्याकारणानें त्या सभेमध्यें सुरवातीपासूनची हकीगत देण्यांत आली ती येणेप्रमाणें:—

(१) ज्ञानकोशासंबंधाची चळवळ प्रथम १९१५ च्या आगष्ट महिन्यांत निघाली.

(२) ता. २६ जानेवारी १९१६ रोजीं हें कार्य करण्याचा निश्चय करून प्रस्तुत घर घेतलें (वाकर रोडवरील रा. दाते यांचा बंगला).

(३) ता. १४ फेब्रुवारी १९१६ रोजीं यासंबंधानें पहिली सभा बोलावण्यांत आली.

(४) ता. २० फेब्रुवारी रोजीं कंपनी स्थापन करण्याचें रा. निळकंठराव उधोजी यांचे घरीं ठरलें. व कंपनीची योजना देखील तेथें जमलेल्या लोकांत मान्य झाली.

(५) ता. २५ एप्रिल १९१६ रोजीं मेमोरँडम व आर्टिकल्स यावर सह्या करून कंपनी रजिस्टर करण्याचा प्रयत्न केला पण कांहीं चुकांमुळें त्यावेळीं (त्या कागदांचा) स्वीकार झाला नाहीं.

(६) ता. १९ मे १९१६ रोजीं कंपनी रजिस्ट्रेशनकरतां मेमोरँडम व आर्टिकल्स बदलून पुनः पाठविली.

(७) ता. ३० मे १९१६ रोजीं प्रॉस्पेक्टस फाईल केला.

(८) ता. ८ जुलै रोजी कंपनी रजिस्टर झाली. व १२ जुलै रोजीं कंपनीचें सरटिफिकेट मिळालें. याच सभेंत डॉ. केतकर यांस मंडळाचे मॅनेजर व सेक्रेटरी नेमिलें.

२० नोव्हेंबर १९१६ च्या सभेंत एकंदर २३८ शेअर खपले असा उल्लेख आहे.

६।१।१९१७ रोजीं कंपनीच्या शेअरचें "ॲलॉटमेंट" झालें, यावेळेस एकंदर २४१ शेअर "ॲलॉट" झाले.

३।३।१९१७ रोजीच्या चालक मंडळाच्या सभेंत हिशोब जुन्या महाजनी पद्धतिप्रमाणें ठेवावे असें ठरलें.

३१।३।१७ रोजींच्या सभेंत ज्ञानकोशाची संपूर्ण योजना (परिशिष्ट १ पहा) डायरेक्टरांपुढें ठेवण्यांत आली. व याच सभेंत डॉ. केतकर यांस १ एप्रिल पासून ९० च्या ऐवजीं १०० रु. महिना द्यावयाचें ठरलें.

३१।३।१७ च्या सभेच्या पूर्वी गुढी पाडव्याच्या शुभ मुहुर्तावर एक कार्यारंभविधीसाठीं जाहीर सभा रा. ब. ठाकूर यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. त्या सभेची हकीकत अनेक पत्रांतून त्या वेळेस आली.

ज्ञानकोशाच्या योजनेंतच कांहीं महत्त्वाचीं अंगें होतीं त्याचें स्पष्टीकरण केलें पाहिजे. शेअर होल्डर प्रथम ९०० करावयाचे होते तर वर्गणीदार ९०० करावयाचे होते. ९०० शेअर होल्डरांनां रक्कम एकदम भरावयाची नव्हती तर चार वर्षांत भरावयाची होती. तर शेअर होल्डरांनां असें सांगतां येई कीं जर शेअरहोल्डर किंवा ग्राहक वाढत नाहींत अगर संपादकीय काम चांगलें चालत नाहीं असें तुम्हांस आढळून आलें तर तुम्ही पुढें कंपनी चालूं देऊं नये. तुम्हाला ती बंद करतां येईल म्हणजे तुम्ही आज फक्त तीस रुपयेच (अर्जाबरोबर पांच व ॲलॉटमेंट नंतर पंचवीस) घोक्यांत घालीत आहांत जास्त घालीत नाहीं. वर्गणीदार करतांना लोकांनां असें सांगतां येई कीं हिस्सेदारांनीं तीस रुपये भरले आहेत. प्रत्येक हिस्सेदाराची उरलेली जबाबदारी सत्तर रुपयांची आहे. वर्गणीदारांची रक्कम बुडण्याची भीतीच नाहीं कारण तुम्ही वर्गणीदार एका वर्षांत १५।२० रुपये भरणार. एक शेअरहोल्डर तीन वर्गणीदारांनीं पहिल्या वर्षी भरलेली रक्कम भरून देऊं शकतो म्हणजे आमच्या दोनशें शेअरांमुळें उत्पन्न होणारी सिक्यूरिटी खपून जाण्यासाठीं वर्गणीदार सहाशें झाले पाहिजेत आणि त्यांनीं प्रत्येकीं वीस-पंचवीस रुपये भरले पाहिजेत. म्हणजे ६०० वर्गणीदारांकडून एक वर्षाचा हप्ता येईपर्यंत तुमची संपूर्ण रक्कम अगदीं सुरक्षित आहे. व ६००गिऱ्हाइकी झाली तर काम मुळीं यशस्वीच होतें. कारण त्याच्या योगानें जवळ

जवळ लाख रुपये उत्पन्न होतात. ही आमची मांडणी पुष्कळांस पटत होती. आणि यासाठीं "मिनिमम सबास्क्रिप्शन" (जितक्या रकमेचे शेअर कंपनीच्या स्थापनेपासून १२० दिवसांत भरले नाहींत तर कंपनी मोडून टाकणें अवश्य आहे अशी रक्कम) फक्त १५००० ठेवली होती. १५००० रुपयांचे शेअर १५०;म्हणजे १५० शेअर खपले तर कंपनी मिनिमम सबस्क्रिप्शन जमली नाहीं म्हणून मोडण्याचें भय नाहीं. कंपनी नोंदली गेली ती नोंदतांनाच ६४ शेअर जमा झाले होते, आणि पुढल्या १२० दिवसांत फक्त ८६ शेअर विकावयाचे होते. हे जर विकतां आले नसते तर कंपनी मोडण बंद पडूं नये म्हणून ४३० रुपये फार तर भरावे लागले असते व ते आपल्या नांवावर करून घ्यावे लागले असते तथापि तसा प्रसंग आलाच नाहीं. १२० दिवसांत २०५ शेअर खपले आणि कंपनीला धंदा करण्यास परवानगी मिळण्यापूर्वी म्हणजे २४।३।१७ पूर्वी २५४ शेअर खपले होते. यानंतर वर्गणीदार करण्याला परवानगी मिळविली तर तेव्हांपासून स्टयाच्यूटरी रिपोर्टाच्या दिवसापर्यंत ३०५ शेअर खपले आणि५७ वर्गणीदार झाले.

कार्यारंभापूर्वी २५४ शेअर खपले म्हणजे लोकांकडून यावयाचे रुपये २५४०० त्यांपैकीं १८२५ रुपये कायते खर्च झाले होते म्हणजे लोकांच्याकडून सक्तीनें वसूल करतां येण्याजोगें २३५७५रु. इतके झाले होते. म्हणजे १००० वर्गणीदारांस तेवीस रुपयपेर्यंत भरणा करण्यास तारण उत्पन्न झालें होतें म्हणजे कंपनी स्थापन होऊन काम करावयास परवानगी मिळाली त्याच वेळेस भक्कम पायावर उभी केली गेली होती आणि यामुळेंच तिला पुढें काम निश्चयानें करतां आलें.

ज्ञानकोशमंडळाचें ऑफिस वाकररोडवर होतें तें फेब्रुवारी१९१७मध्यें धनतोलीस काण्यांच्या बंगल्यांत आलें. या बंगल्यासमोर आमच्या सोईसाठीं पोस्टऑफीसनें एक पत्राची पेटी दिली ती ज्ञानकोशाचें स्मारक म्हणून अजून तेथेंच आहे. कार्यारंभास कंपनीस परवानगी ४।३।१७ ला मिळाली त्याच्या पूर्वीच्या कालामध्यें आम्ही संपादकीय काम कांहींच केलें नाहीं असें नाहीं. रा. गो. चिं. तांबे बी. ए. एल्. एल्. बी.; रा. रामचंद्र त्रिं. देशमूख, बी. एजी.; रा. गणेश वासुदेव विद्वांस, बी. ए.; विनायक लक्ष्मण घटने, बी. ए.; रा. शंकर ग. खांडेकर, एम्. ए. इत्यादि मंडळी कांहीं काम व्हालंटीअर म्हणून करूं लागली पण मी त्यांस कामाचा

हिशोब ठेवण्यास सांगितलें आणि कंपनीचें काम सुरू झालें तेव्हां कांहीं ठराविक दराप्रमाणें पैसेहि दिले. ३१।३।१७ रोजीं जो समारंभ झाला त्यावेळस रा. ब. ठाकूर हे अध्यक्ष होते आणि त्यावेळचीं सर्व भाषणें (कर्नल प्राउडनखेरीज)मराठींत झालीं त्यावेळेस अनेक मंडळींनीं मिळून जें खासगी काम करून ठेवलें तें लोकांत पहावयासाठीं मांडलें होतें.

सरकारची वृत्ति

ज्ञानकोशमंडळाच्या प्रारंभापासून नागपूरच्या सरकारास काय वाटत असावें हें नक्की सांगतां येत नाहीं. कंपनी नोंदली गेली पण ती नोंदण्यासच फार वेळ लागला. आणि ती नोंदण्यापूर्वी कंपनीच्या रजिस्ट्रारचा दुसऱ्या खात्याशीं कांहीं पत्रव्यवहार झालेला मला माहीत आहे.त्यावेळचे डायरेक्टर मि. मेहयू यांनीं मला विचारलें कीं या कंपनींत सरकारचा किंवा यूरोपियन लोकांचा संबंध कांहीं नसावा असें तुम्हीं योजिलें आहे काय? त्यांच्या प्रश्नाला "नाहीं" म्हणून उत्तर दिलें व ही पब्लिक कंपनी आहे वाटेल त्याला हींत शेअर घेतां येईल तुम्हांलाहि शेअर होल्डर व्हावयास हरकत नाहीं असें मी सांगितलें. त्याचप्रमाणें त्यावेळचे चीफ कमिशनर सर बेंजामिन रॉबर्टसन यांनां ही कंपनी म्हणजे कांहीं फार पुढें गेलेले राजकीय विचार प्रदर्शित करण्याचें एक यंत्र होईल काय अशी धास्ती पडली होती. सर बेंजामिन रॉबर्टसन यांनीं वऱ्हाडचे त्यावेळचे कमिशनर बी. पी. स्टँडेन यांजकडून मला पत्र लिहविलें होतें कीं मी चीफ कमिशनरला भेटावयास जावें अशी चीफकमिशनरांची इच्छा आहे. त्याप्रमाणें मी ना. रॉबर्टसन यांस भेटावयास गेलों तेव्हां तुम्ही "पॉलिटिक्स" यांत घालणार आहां काय? म्हणून मला प्रश्न केला. व तुमच्या कंपनीविषयीं मला थोडीशी शंका वाटत आहे, कां कीं त्या कंपनीमध्यें मुंजे व ओगले यासारखे राजकीय मतांत जास्त पुढें गेलेल्या मतांचे लोक आहेत. तेव्हां मीं त्यांनां सांगितलें कीं, ज्ञानकोश म्हटला म्हणजे त्यांत कोणतेच विषय गाळतां येत नाहींत. पॉलिटिक्स राहणारच, मात्र पक्षविषयक राजकीय मत मांडण्याचा प्रयत्न होणार नाहीं. राजकीय बाबतीमध्यें अगदीं त्रयस्थपणाचीं म्हणजे न्यूट्रॅलिटीची वृत्ति राहील. सर बेंजामिन म्हणाले, "न्यूट्रॅलिटी" राहील ना? न्यूट्रॅलिटी हा शब्द चांगला आहे. माझे मनांत काय जें व्यक्त करावयाचें तें हेंच होतें. उदाहरणार्थ चेंबर्स एनसायक्लोपीडिया

पहा, त्यांत पॉलिटिक्स वगळलें नाहीं. पण त्यांत त्यांनीं दोन्ही बाजू दिल्या आहेत.तुमचें तसेंच होईल ना? मी तुम्हाला एवढें आगाऊ सांगून ठेवतों कीं जर न्यूट्रॅलिटी राहिली नाहीं तर मी पुस्तक शाळांकरतां घेऊं शकणार नाहीं. मीं त्यांस सांगितलें कीं केवळ पांडित्याच्या अपेक्षेमुळचें (Reasons of Scholarship alone) न्यूट्रॅलिटी बाळगण्यांत येईल. व्हालंटीअर मंडळीनींनें काम केलें त्याचे पैसे स्टयाचूटरी मीटिंगनंतर देण्यांत आले.

प्रकरण ४ थें.

नागपूर येथील इतिहास (जुलै १९१९ पर्यंत)

(१) कार्यारंभापासून स्टयाचूटरी मीटिंगपर्यंत

(१।४।१७ ते १६।९।१७)

रा. दाते यांची नेमणूक झाल्याचा उल्लेख ५।५।१९१७ च्या सभेंच्या अहवालांत आहे. तथापि त्यांची नेमणूक प्रथमतः मार्च १ पासूनच झाली होती. व ते प्रथमतः महिना दोन महिने रहाण्याच्या उद्देशानें आले होते व मे महिन्यामध्यें नागपूरची बरीच मंडळी पुण्याकडे गेली होती. त्यावेळेस कांहीं वकील मंडळीस १०० रु.पगार देऊन गिऱ्हाइकी जमविण्यास पाठविलें होतें. अशा मंडळींत रा. नीळकंठ बळवंत भवाळकर व रा. (प्रो.) श्रीकृष्ण नीलकंठ चाफेकर, रा. नारायणराव आळेकर, व रा. वामनराव चितळे ही मंडळी होती व त्यांत चितळे खेरीज करून बाकी कोणास यश आलें नाहीं असा पुढें उल्लेख आहे. याच सभेंत संपादन खात्याचे मुख्य नियम पास झाले (परिशिष्ट १ पहा) आणि मंत्री,विभाग—संपादक, लेखक इत्यादिकांचीं कर्तव्यें हि विशद करण्यांत आलीं. त्यांतील मंत्रिमंडळाची योजना केवळ कागदावरच राहिली असें पुढच्या इतिहासावरून म्हणावें लागेल. इतर नियम साधारणपणें बऱ्या प्रकारें पाळण्यांत आले. पुढच्या सभेंत (३-८-१७) कांहीं संपादकीय नेमणुका दिल्या आहेत. त्यांत डॉ. भाजेकर (मुंबई),प्रो. कानिटकर (पुणें), डॉ. गुणे. प्रो. अमृतराव (मद्रास), वैद्य पंचानन कवडे, डॉ. श्रीरंग मोरेश्वर साने, दिवाकर यशवंत फाटक (मुंबई), रा. टी. आर. तळवळकर (बडोदें),.

प्रो. दामले (कानपूर), रा. कुंटे इंजिनीअर (ग्वाल्हेर), प्रो. आजरेकर, प्रो. रावबहादूर केळकर, प्रो. हाटे, प्रो. डी. व्ही. बाळ नागपूर, यांचा उल्लेख आहे. परंतु ज्यांचें कार्यकर्तृत्व शेवटपर्यंत टिकलें अशा मंडळींचा उल्लेख करावयाचा झाल्यास रा. दिवाकर यशवंत फाटक, प्रो. दामले, प्रो. आजरेकर, प्रो. रा. व. केळकर, प्रो. हाटे इतक्यांचा उल्लेख करतां येईल. ज्यांनीं थोडेसें काम केलें अशा मंडळींत डॉ. भाजेकर व डॉ. साने यांचा उल्लेख करतां येईल.

कंपनीच्या कार्यारंभापासून म्हणजे एप्रिल १९१७ पासून सप्टेंबर १९१७ पर्यंत ऑफीसमध्यें गोषवारे काढण्याचें काम चालूच होतें. पण या कार्यांतील एक मुख्य कार्य म्हटलें म्हणजे महाराष्ट्रीय वाङ्मयसूचीचें (प्रस्तावनाखेरीज) हस्तलिखित संपूर्ण तयार झालें हें होय. या वाङ्मय-सूचीसंबंधानें डायरेक्टरांचा ठराव कांहीं झाला नाहीं, पण छापण्याची योजना पसंत केल्याचा ठराव ३।८।१७ च्या सभेंत आहे. वाङ्मयसूचि तयार करण्याचा ठराव झाला नाहीं यांचें कारण तें कार्य ज्ञानकोशाच्या संपादनकार्याचें उपांग म्हणून सुरू झालें व तें सुरू करतांना आपल्या उपयोगाकरतां माहिती जमवून ठेवणें एवढाच आमचा उद्देश होता. ३।८।१७ च्याच सभेमध्यें हिस्लॉप कॉलेजांतील त्या कॉलेजच्या नोकरींतून सुटलेले प्रो. देग्वेकर यांस मंडळांत घेण्याचा ठराव उल्लेखित आहे. तथापि मंडळांत येण्याचा उद्देश प्रो. देग्वेकर यानीं कांहीं खाजगी कारणामुळें रहित केला. प्रो. देग्वेकर एम्. ए. एम्. एस्सी. व एल्एल्. बी. झालेले गृहस्थ आहेत व हे जर आले असते तर मंडळास त्यांचा उपयोग फार चांगला झाला असता अशी अपेक्षा होती. याच एप्रिलनंतरच्या सहामाहींत रा.ब. नारायणराव केळकर यांसहि ज्ञानकोशमंडळांत आणण्याची खटपट चालू होती. व त्यांचेकडे व्यवस्थापकाचें काम सोंपवावें व केवळ संपादन खात्याकडेच लक्ष देण्यास मला सवड मिळावी अशी माझी इच्छा होती. व रा. ब. नारायणराव केळकर यांनीं यावयाचें कबूलहि केलें होतें. परंतु पुढें त्यांस कोऑपरेटिव्ह सोसायटीचे गव्हर्नर म्हणून ६०० रु. पगाराची जागा मिळाली व त्यामुळें त्यांचें आमचेकडे येणें झालें नाहीं. रा. ब. केळ-कर यांनीं हें काम न करतां जबाबदार आणि कर्तृत्ववान दिवाण म्हणून पुढें यावे असा योगायोग होता.

ज्ञानकोशाची योजना–प्रो. भानु व पटवर्धन

ज्ञानकोशमंडळास रजिस्ट्रारकडून काम करण्यास परवानगी मिळाल्यानंतरच्या सहामाहींत म्हणजे स्टॅच्यायुटरी मीटिंगपूर्वीच्या काळांत जीं कामें झालीं त्यांचा स्थूल आढावा घ्यावयाचा म्हणजे योजना पद्धतशीर तयार होऊन चोहोंकडे वाटली गेली. तिचा निर्देश प्रथम करावा लागेल. इंदुप्रकाश पत्राखेरीज तीवर कोणी चांगली टीकाहि केली नाहीं. त्यावेळेस इंदुप्रकाशाचें काम प्रो. भानु पहात होते व योजनेवरील टीका त्यांची होती असें समजतें. त्या योजनेंत सहकार्य करण्यासाठीं व तीवर टीका करण्यासाठीं मुद्दाम विनंतीपत्रें गेलीं होतीं. पण त्या योजनेवर चांगली टीका फारशी झाली नाहीं.ती योजना निरनिराळ्या युनिव्हर्सिटयांकडे पाठविण्यांत आली पण त्या योजनेवर मत देण्याचें काम मद्रास युनिव्हर्सिटीशिवाय दुसरें कोणी केलें नाहीं. मद्रास युनिव्हर्सिटीनें मात्र तिच्या मराठीच्या बोर्डावरील दोघां गृहस्थांचीं मतें कळविलीं. मद्रास युनिव्हर्सिटीतर्फे मत व्यक्त करणारांत हैद्राबादचे शिक्षण खात्यांतील रा. अत्रे बी. ए. हे एक होते आणि दुसरे प्रोफेसर पटवर्धन (फरग्युसन) हे होते. रा. अत्रे यांची सूचना म्हणजे केवळ सहानुभूति व्यक्त करणारा अभिप्राय होता; पण प्रो. पटवर्धन यांनीं मात्र योजनेवर सपाटून टीका केली होती ती टीका माझ्याकडे आल्यानंतर मी प्रो. पटवर्धनांचे आभार मानले, व मी सांपडलों म्हणजे जो टीकेचा चांगला मार देणार तो हाच काय म्हणून त्यांस विचारलें. तेव्हां त्यांनीं लिहिलें कीं, तुमच्या योजनेची तपासणी केली तेव्हां टीकेचा मार द्यावयाचें विसरून गेलों होतों, आणि जी टीका योजनेवर केली ती त्यावेळेस जें वाटलें त्यावरून केली; सपाटून टीकेचा मार अजून पुढेंच यावयाचा आहे असें उत्तर लिहिलें. प्रो. पटवर्धन यांचें तें खुल्या दिलाचें उत्तर मला फार आवडलें.

स्टॅच्यूटरी सभा १६।९।१९१७ रोजीं भरली. ही सभा म्हणजे कंपनीस आपला धंदा सुरू करावयास जें सर्टिफिकेट मिळतें त्यानंतर सहा महिन्यांच्या आंत भरावी लागते व या सभेच्या अगोदर सात दिवसांची नोटिस द्यावी लागते व अगदीं आजतागाईत हिशोब द्यावा लागतो. या रिपोर्टांत ३१ आगस्ट १९१७ पर्यंत अहवाल दिला होता. ता.३१आगस्ट १९१७ रोजीं म्हणजे कंपनीच्या स्थापनेसाठीं नागपूरला

आल्यापासून पावणेदोन वर्षांत प्रगति इतकी थोडी झाली कीं, कंपनीच्या स्थापनेपासून एकदर द्रव्याची आयात आठ हजार रुपये देखील झाली नव्हती. या सभेच्या सुमारासच ज्ञानकोशमंडळामध्यें कारस्थानें उभारलीं जाण्यास सुरुवात स्पष्टपणें झाली. तथापि कारस्थान सुरू झालें आहे याची जाणीव मला बराच काळ नव्हती. द्वैतास खरोखर वाङ्मयसूचीच्या छपाईच्या करारापासून म्हणजे महिनाभर अगोदरपासून सुरवात झाली.

वाङ्मयसूचि

ज्ञानकोशमंडळाच्या कामाचें पहिलें दृश्य फल वाङ्मयसूचि हें होय. प्रत्येक वाङ्मयाचा जेव्हां पद्धतशीर अभ्यास होऊं लागतो तेव्हां संग्रह, सूचीकरण इत्यादि क्रिया अवश्य होतात. वेदांच्या संहिता झाल्याबरोबर अनुक्रमणीची आवश्यकता भासून ती तयार झालीच आणि त्यानंतर वेदांगांची म्हणजे वैदिक शास्त्रांची रचना किंवा वाढ झाली. महाराष्ट्रीय वाङ्मयाचा अभ्यास करावयाचा म्हणजे पूर्वी काय झालें आहे याची पद्धतशीर मोजदाद झालीच पाहिजे ती करणें म्हणजेच वाङ्मयसूचि करणें होय. मराठी वाङ्मयाभ्यासानें या बाबतींत अपूर्वता पटकावली आहे. मराठींत जशी वाङ्मयसूचि आहे तशी दुसऱ्या कोणत्याहि हिंदुस्थानांतील भाषांत नाहीं. आमच्या वाङ्मयसूचीमध्यें १८१० पासून झालेल्या पुस्तकांची नोंद आहे. वाङ्मयसूचि करण्यासाठीं साहित्य म्हटलें म्हणजे सरकारी रिपोर्ट हे मुख्य होत. तथापि हे रिपोर्ट फार अपुरे पडतात.

मराठी भाषेंत पुस्तकें केवळ मुंबई इलाख्यांतच प्रसिद्ध होतात असें नाहीं. तर हिंदुस्थानांतील बहुतेक भागांत मराठी पुस्तकें प्रसिद्ध होतात. मुंबई इलाख्याचे रिपोर्ट बऱ्या स्थितींत आहेत पण त्यांतहि अनेक पुस्तकें निर्देशिलीं नाहींत. बरेच दिवस सक्तीनें नोंदणी करण्याचा कायदाच नव्हता. आणि त्यामुळें अनेक पुस्तकें सरकारी नोंदणींतून वगळलीं गेलीं. तीं आमच्या सूचींत सांपडतील. मराठी पुस्तकें विशेषेंकरून मुंबई इलाखा, मध्यप्रांत, वऱ्हाड आणि मराठी संस्थानें आणि गोवें इतक्या ठिकाणीं प्रसिद्ध होतात पण पुष्कळशा महत्त्वाच्या संस्थानांत मराठी पुस्तकांची नोंदच ठेवली जात नाहीं. कोल्हापूर येथें बरींच महत्त्वाचीं मराठी पुस्तकें प्रसिद्ध झालीं पण त्यांची

नोंद नाहीं. वन्हाडची नोंद नाहींशीं करण्यांत आली आणि पुस्तकें जाहीर रीतीनें रद्दी म्हणून लिलांव करण्यांत आलीं. अशा स्थितींत जेथें सरकारी नोंद नाहीं तेथें खासगी चौकशी करावी लागली. या यादींत सरकारजमा पुस्तकें देखील खुणेनें दाखविलीं आहेत व यादींतल्या पुस्तकांपैकीं मुंबईच्या ग्रंथसंग्रहालयांत कोणतें आहे हेंहि दाखविलें आहे.वाङ्मयसूचीसारख्या पुस्तकाचें महत्त्व ज्ञानकोशकारांच्या दृष्टीनें फार मोठें होतें. मराठींत काय आहे याचा पत्ता आम्हांला लागला आणि जेव्हां कोणत्याहि विषयावर मराठींत असलेल्या लेखाकडे त्याच्या महत्त्वाच्या अभावामुळें दुर्लक्ष करण्याचे प्रसंग आले तेव्हां आम्ही त्या लेखाकडे त्याच्या अस्तित्वाच्या अज्ञानानें दुर्लक्ष केलें अशा आक्षेपाचें कारण राहिलें नाहीं. आमच्यापाशीं पद्धतशीर यादी नसती तर महत्त्वाच्या लेखांकडे देखील दुर्लक्ष झालें असतें यांत शंका नाहीं.

सूचीचें संपादन व विक्री

वाङ्मयसूचीचें हस्तलिखिताचें काम किती खर्चानें व वेगानें तयार झालें याची थोडी माहिती दिली असतां मौजेची होईल. वाङ्मयसूचीस सुमारें ३॥ हजारांपासून चार हजारांपर्यंत खर्च झाला, आणि तिच्या प्रती५०० काढल्या होत्या. त्यामुळें प्रत्येक प्रत आम्हांस सुमारें ७॥ रुपयांस पडली त्यांपैकीं सुमारें १०० प्रती ९ रुपये भरणाऱ्या आगाऊ वर्गणीदारांकडे गेल्या. आणि पुढें कांहीं प्रती ७॥ रुपयांस, कांहीं १२॥ रुपयांस व कांहीं पंधरा रुपयांस गेल्या. अतां सूचीची किंमत १७॥रु. आहे व प्रती १० पेक्षां कमी शिल्लक आहेत. येणेंप्रमाणें वाङ्मयसूचीवर झालेला खर्च बहुतेक वसूल होऊन येईल असें वाटतें. पण ही वसूली होण्यास १२ वर्षें लागलीं. खर्च झालेल्या रकमेवर व्याज आकारल्यास पूर्ण वसूली व्हावयाचीच नाहीं.

वाङ्मयसूचि करण्यासाठीं सुमारें ६०००चिठ्या लिहाव्या लागल्या.हें काम तीन महिन्यांत झालें. कांहीं काम नागपुरास झालें पण मुख्य काम पुणें-मुंबई येथें झालें. मुंबईस मराठी ग्रंथसंग्रहालयापाशीं जो ग्रंथसंभार (मासिकसंभार) होता त्यावरून मासिकाच्या लेखांची यादी करतां आली. रा. रामचंद्र त्रिंबक देशमुख बी. एजी. यांनीं अलीकडच्या कांहीं वर्षांत झालेल्या पुस्तकांची यादी ठाण्यास कलेक्टर कचेरींत बसून केली.

आणि १८१० पासून १९०० पर्यंतच्या पुस्तकांची यादी डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीनें अगोदरच केली होती. त्या गादीवरून रा. दाते यांनीं केतकरांच्या अनाथ विद्यार्थीगृहांतील वरेच विद्यार्थी घेऊन चिठ्या तयार केल्या. त्या यादीचा उपयोग करण्याची आम्हांस सासायटीनें परवानगी दिली. त्याबद्दल ज्ञानकोशमंडळ त्या संस्थेच्या अधिकाऱ्यांचें ऋणी आहे. आम्ही असेंहि म्हणूं कीं वाङ्मयसूची तयार करण्याचें निदान एकदशांश श्रेय त्यांचें आहे.

अर्वाचीन पाखंडें

वाङ्मयसूचीचें महत्त्व लोकांनां जितपत वाटेल असें वाटलें त्यापेक्षां जास्त वाटत आहे असें दिसून आलें. वाङ्मयसूचीचा उपयोग पुष्कळ लोकांनां झाला आणि त्या पुस्तकाचा खपहि अपेक्षेपेक्षां अधिक झाला. जास्त प्रती काढल्या असत्या तर बरें झालें असतें असें आतां वाटूं लागलें. वाङ्मयसूचीची तपासणी देखील थोडीबहुत झाली. रा. भिडे (भोर) यांनीं तींतील काव्यांची यादी तपासून तीवर विचार करणारा एक लेख विस्तारांत प्रसिद्ध केला आणि सूचीच्या साहाय्यानें एकंदर वाङ्मयाचा आढावा घेणारा एक लेख बडोद्याच्या रा. दंडवते यांनीं नवयुगांत प्रसिद्ध केला. वाङ्मयसूचीच्या वर्गीकरणपद्धतीमुळें थोडीशी टीकाहि झाली. ब्रह्मसमाज वगैरे पुस्तकें "अर्वाचीन पाखंडें" या सदराखालीं चर्गिलीं गेल्यामुळें सुबोधपत्रिकेनें रागाचा लेख लिहिला. पाखंड हें "हेरेसी"चें भाषांतर आहे. धार्मिक वाङ्मयाचें वर्गीकरण करतांना मुख्य मतें आणि हेरेसीज असें वर्गीकरण करण्याची यूरोपीय ग्रंथवर्णनशास्त्रज्ञांची पद्धति आहे. जें मत मुख्यापासून भिन्न पण अगदींच बाहेरचें नव्हें तें "हेरेसी" होय. आणि आम्ही "पाखंड" हा शब्द त्याच अर्थानें योजिला होता. असो, या अर्थाच्या निदर्शक दुसरा एखादा चांगला शब्द सुचविल्यास आम्ही पुढच्या प्रसंगीं त्याचा उपयोग करूं इच्छितों. पाखंडी हा शब्द मी द्वेषबुद्धीनें लिहिला असणें शक्यच नाहीं. कारण प्रचलित बहुमतापेक्षां भिन्न मत बाळगणें हें मी गैर कधींच धरीत नाहीं. पाखंडी या शब्दापासून "नास्तिक" असा अर्थ सूचित होतो म्हणून तो शब्द नको असें कित्येक प्रार्थनोंनीं मला सांगितलें. पण हें त्यांचें रागावणें माझ्या मतें अनुदार भावनेचें दर्शक आहे. "नास्तिक" ही देखील मी शिवी धरीत नाहीं. हे सर्व वर्गवर्णनाचे शब्द आहेत माझ्या मतें हिंदु, मुसलमान, जैन,

हे जसे वर्गवर्णनाचे शब्द आहेत. तसेच पाखंडी, नास्तिक हेहि वर्गवर्णनाचेच शब्द आहेत. एखाद्या हिंदूस कोणी जैन समजल्यास जसे रागावण्याचें कारण नाहीं तसेंच नास्तिक समजल्यासहि रागावण्याचें कारण नाहीं. मी ज्यांनां पाखंडी म्हणेन त्यांविषयीं माझ्या मनांत प्रेम नसेल असेंहि नाहीं. ख्रिस्ती संप्रदायांतील युनिटेरियन या पंथाबद्दल माझ्या मनांत प्रेम वाटतें, पण त्याचें वर्गीकरण करावयाचें झालें तर तें ख्रिस्ती संप्रदायांतील पाखंडांतच मी करीन. असो ही माझी वृत्ति रा. यज्ञेश्वरपंत भांडारकर, द्वारकानाथपंत वैद्य यांसारख्या लोकांनाहि सांगितली पण त्यांचे या स्पष्टीकरणानें समाधान झालेंसें वाटत नाहीं.

गृहकलहास सुरुवात

ता.३।८।१७ च्या सुमारास वाङ्मयसूचि छापण्यास रा. पाध्ये यांनीं घेतली आणि महिनाभर छापायला सुरुवातच केली नाहीं आणि माझीं माणसें तुमचें काम न छापण्याबद्दल संप करीत आहेत इत्यादि गोष्टी रा. पाध्ये (आमचे अध्यक्ष आणि मुद्रक) यांनीं सांगावयाला सुरुवात केली. आणि याचें कारण करार केलेला टाईप नव्हता हें होय. व तें त्यांना लपवावयाचें होतें. हें त्यांनीं लपवायचा प्रयत्न न करतां सरळपणें सांगितलें असतें तर बरें झालें असतें व पुढचें द्वैत वांचलेंहि असतें. पण खरी अडचण वळविण्यास त्यांनां जो संकोच वाटला त्याचा वाईट परिणाम झाला. त्यांनी खरें लपविण्यासाठीं त्यांच्या माणसांची समजूत करा असें मला सांगितलें. मी त्यांच्या माणसांशीं बोललों तेव्हां मला संपाचें अस्तित्व मुळींच दिसून आलें नाहीं. तेव्हां मी उलट रा. पाध्ये यांसच नोटीस दिली कीं, तुम्ही जर ४८ तासांच्या आंत काम सुरू करणार नाहीं तर तुमचें काम काढून घेऊं. याप्रमाणें नोटीस देऊन मी गोंडिया बालाघाटकडे प्रवासास गेलों आणि ३।४ दिवसांनीं परत आलों तों रा. पाध्ये अगदीं संतापून गेले होते व दुसरे एक डिरेक्टर त्यांच्या तर्फेनें माझ्यावर चिडले. हेच डिरेक्टर पूर्वी रा. पाध्ये यांनां काम देण्याबद्दल मला दोष देत होते. तेव्हांपासून रा.पाध्ये यांनीं दुसरे डिरेक्टर आपल्या तर्फेचे करून घेऊन मला पकडींत ठेवावयाचा प्रयत्न करण्यास सुरुवात केली होती. हें आज अगदीं स्पष्ट होतें. त्यांना ज्ञानकोशाचा चालक असा हवा होता कीं, जो

त्यांच्या छापखान्याच्या सोईप्रमाणें चालेल, जो आपल्या सोईप्रमाणें छापखान्याला वागावयास लावील असा गैरसोईचा ज्ञानकोशसंपादक नको होता. तेव्हां डॉ. केतकर फार स्वतंत्रपणें वागतो, हा कोणाचें कांहीं एक ऐकायचा नाहीं इत्यादि गोष्टी बोलण्यास त्यांनीं सुरुवात केली. आणि डॉ. केतकर हा कांहीं तरी कारणामुळें तावडींत सांपडला पाहिजे असें म्हणून कांहीं मंडळी वाट पहात होती; आणि स्टाच्यूटरीच्या अगोदर झालेल्या मीटिंगमध्यें अमुक मंडळी निवडून यावी याबद्दल खटपट करीत होती. त्यांची ही खटपट माझ्या लक्षांत त्यावेळेस आलीच नाहीं. स्टयाच्यूटरी मीटींग नंतरहि मी जेव्हां वाङ्मयसूची लवकर छापली जावी म्हणून निकड लावूं लागलों तेव्हां रा. पाध्ये यांनीं असाहि डाव मांडला कीं, माझें आणि त्यांच्या छापखान्याचे म्यानेजर यांची बोलाचाल व्हावी आणि त्यांनीं न्यायाधीश म्हणून माझी चौकशी करावी. आणि त्यांनीं ही वेळ जेव्हां आणली तेव्हां त्यांचीच कर्मधर्म संयोगानें उखडंपट्टी झाली. तिची हकीगत क्रमानें येईलच.

आपापसांतील भांडणांपासून ज्ञानकोश मुक्त नव्हता. हीं भाडणें महाराष्ट्रीयांच्या कोणत्या मनोवृत्तीमुळें होत याचें थोडेसें स्पष्टीकरण करावेंसें वाटतें. कित्येकांची अशी समजूत झाली आहे कीं, गृहकलहाचा महाराष्ट्राला शाप लागला आहे. निदान नागपूरचे एकावेळचे नगराध्यक्ष डॉ. चोळकर हे ज्ञानकोशाच्या शेअरहोल्डरांच्या एका सभेंत तरी असें बोलले. माझ्यामतें भांडणाचें कारण महाराष्ट्रीयांच्या स्वभावांतच कांहीं निराळें आहे असें नाहीं. मत्सर हा सर्व लोकांत आहे. स्वार्थहि सर्व लोकांत आहे. आपण गुजराती, मारवाडी वगैरे लोक पाहिले तर त्यांच्यामध्यें स्वार्थासाठीं खोटीं भांडणें करावयाची वृत्ति कमी आहे असें नाहीं. इतर कंपन्यांचे व्यवहार समजले तेव्हां आमच्यांतील भांडणें कांहींच नाहींत असें वाटावयास लागलें. ज्ञानकोशामध्यें भांडणें तरी फारच थोडी झालीं. आणि ज्ञानकोशाच्या प्रारंभीं माझी अशी वृत्ति होती कीं, आपण होताहोईतों कोणासहि दुखवूं नये आणि या माझ्या वृत्तीमुळें पुष्कळदां नुकसान झालेलें आहे. कांहीं मंडळींस वांव दिला म्हणजे ती डोक्यावर चढत असा अनुभव वारंवार येई. व भांडणास कारण मी प्रारंभीचें दाखविलेलें मनोदौर्बल्य होय असें वाटे. तथापि मी असें आतां म्हणतों कीं कंपनी म्हटली म्हणजे तींत भांडणें हीं व्हावयाचींच.

अनेक लोक आपापल्या हेतूसाठीं एका कार्यांत प्रविष्ट होतात, व त्यांत प्रत्येकाचे हेतू साध्य होत नाहींत आणि यामुळें भांडण हें स्वाभाविकपणें उत्पन्न व्हावयाचेंच. महाराष्ट्रीय लोक भांडतात आणि इतर लोक भांडत नाहींत असें नाहीं. आणि माझ्याशीं भांडण करण्यांत पुढाकार घेऊन माझ्यावर सर्व तऱ्हेनें आरोप उत्पन्न करणारे माधवराव पाध्ये हे एक वाईट गृहस्थ होते अशांतला भाग नाहीं. मी पूना ब्यांकेतील व इतर कंपन्यांतील भांडणें पाहिलीं आहेत तेव्हां मला असें वाटूं लागले कीं, रा. पाध्ये यांनीं भांडण करतांनां सदसद्विवेकबुध्दि थे डीशी कायम ठेवली होती.


माधवराव पाध्ये

रा. माधवराव पाध्ये यांच्या ज्ञानकोशमंडळांतील कामगिरीविषयीं जरा विस्तारानें लिहिणें अवश्य आहे. सामान्यतः चांगल्या वृत्तीचा वाङ्मयाचा अभिमानी आणि आपल्या मंडळींनीं स्वतंत्र धंद्यांत पडावें व केवळ नोकरीच्या पाठीमागें लागूं नये अशा भावनेचे हे गृहस्थ आहेत अशी त्यांच्याविषयीं जी माझी पहिल्याप्रथम समजूत झाली ती अजूनहि कायम आहे. रा. पाध्ये हे ज्ञानकोशाचे डिरेक्टर झाले त्यांत स्वतःचा फायदा होईल तो करून घ्यावा हा हेतु त्यांचा असेल तरी ते चांगल्या कार्यास उत्तेजन द्यावें या हेतूनें अगोदर या योजनेकडे प्रवृत्त झाले असले पाहिजेत असें मला अजूनहि वाटतें. स्वतःचा फायदा पहाणें हें मी गैर मुळींच समजत नाहीं. उलट जो मनुष्य चांगलें काम हाती घेऊन तें तो स्वतःस किफायतवार करून घेतो त्या मनुष्याविषयीं माझ्या मनांत आदरच राहील. रा. पाध्ये यांनीं आपल्या अपेक्षा कळविल्या असत्यां तर चांगलेंच झालें असतें. तथापि धंदा करण्यास अयोग्य असे त्यांच्यामध्यें अनेक गुण होते, हें मात्र माझें कायमचें मत झालें. व यांचें ज्ञानकोशमंडळांत कांहीं चालूं द्यावयाचें नाहीं अशी वृत्ति माझ्यामध्यें जी पुढें उत्पन्न झाली तिचें आज पाठीमागें झालेल्या सर्व व्यवहाराकडे पाहतां समर्थनच होतें असें मला वाटतें. धंदा करतांना ज्या मंडळीच्या साहाय्यानें आपण धंदा करतों ती कार्यकारी मंडळी म्हणजे सामान्य कारकुनापासून मॅनेजरपर्यंत मंडळी यांचें हित धंद्याच्या वाढीशीं अत्यंत निगडित असतें म्हणून धंद्याशीं संयुक्त अशा प्रत्येक व्यक्तीची किफायत व्हावी हें तत्त्व रा. पाध्ये

यांस कांहींच समजलें नाहीं. ते स्वतः छापखानदार आहेत. असें असतां त्यांचा छापखाना बाल्यावस्थेंतच राहिला याचें कारण वरील तत्त्वाचें अज्ञान होय असें माझें मत झालें. रायपूरचे रा. सप्रे हे जेव्हां देशसेवकाचे व्यवस्थापक होते तेव्हां त्या छापखान्याची बरीच भरभराट झाली व जेव्हां रा.सप्रे आणि माधवराव रा.पाध्ये यांच्यामध्यें द्वैत उत्पन्न झालें तेव्हां छापखान्यास उतरती कळा लागली. याचें कारण रा. सप्रे यांस प्राप्ती जास्त होऊं नये म्हणूत माधवराव पाध्ये यांची वृत्ति बनली हें होय असें नागपुरास लोक म्हणत. रा. सप्रे यांनीं याविषयीं खुलासा माझ्यापाशीं कांहींच केला नाहीं. त्यांनीं एवढेंच सांगितलें कीं; तुम्ही माधवराव पाध्यांचे मित्र आहांत तर या गोष्टीची तुमच्यापाशीं चर्चा न केलेली बरी. माधवराव पाध्ये यांची ज्ञानकोशमंडळांत प्रमुख असतां अशी वृत्ति बनूं लागली होती कीं, डॉ. केतकर यांनीं जवळजवळ फुकटांत काम करावें, त्यांनां ज्ञानकोशाची छपाई द्यावी;व या त्यांच्या वृत्तीमुळें डॉ. केतकर यांच्या पगाराचा प्रश्न २२ महिने ताटकळत ठेविला आणि तुम्ही पगाराकरतां काम करता आहां कीं कार्याकडे लक्ष देऊन काम करीत आहां असा प्रश्न करण्यास त्यांच्याकडून सुरवात झाली. त्यांस छपाई पाहिजे होती, आपला फायदा पाहिजे होता पण माझ्या पगारास मात्र नियंत्रण करावयास पाहिजे होतें. आणि स्वार्थत्यागाचें महत्त्व मला समजावून देण्याची ते खटपट करीत होते. ज्ञानकोश हें विद्यावर्धनाचें काम. हें पवित्र काम आहे. हें काम करणाऱ्यांनीं ऋषीप्रमाणें वर्तन केलें पाहिजे म्हणजे प्राचीन ऋषींचें ध्येय उज्वल तऱ्हेनें पार पडेल असें त्यांचें सांगणें असे.

जे लोक व्यवहारांत जास्त आहेत ते लोक आपण जें कांहीं करावें ते स्थार्थासाठीं म्हणजे पैशासाठीं सर्व करीत आहों असें दाखविण्यास कमी करीत नाहींत आणि महाराष्ट्रीय मनुष्य स्वार्थाकरतां मीअमुक करीत आहें असें सांगण्यास लाजतो. मनास स्वार्थबुद्धि गैर वाटते पण स्वार्थ हा कांहीं कोणास सुटला नाहीं. व त्यामुळें भांडणें वाढतात. व मनुष्य आपला स्वार्थ नीट मोजून पहात नसल्यामुळें भांडणें जास्तच वाढतात. निरनिराळी मंडळी निरनिराळ्या स्वार्थांनी प्रेरित झाली म्हणजे त्यांची तोंडमिळवणी करण्याचें कौशल्य ज्या मानानें काम करणाऱ्यांत असेल त्या मानानें काम सुरळीत होणार, कार्यकर्त्यांस जी मंडळी मिळवून घेतां

कोहन कुटुंब



मिस्. कोहन मिसेस केतकर मि. कोहन.

डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर एम्. ए. पी. एच्. डी.



कॉलेजच्या पोषाखांत.

ज्ञानकोशमंडळांतील कार्यकर्ते



डॉ. श्री. व्यं केतकर
मुख्य संपादक व
सौ. शीलवती केतकर.



श्री. य. रा. दाते. संपादकीय व्यवस्थापक





कै. रा. स. वा. देशपांडे उपसंपादक

येत नसतील ती त्यानें निर्बल केली पाहिजेत. अशा क्रियांनींच कंपनीचें काम चालणार. तथापि जेव्हां मुख्य काम करणाऱ्या मंडळीचें आपापला स्वार्थ कसा साधावयाचा यांचें खुल्या दिल्यानें बोलणें होत नाहीं आणि केवळ लोककल्याणार्थ ढोंग होऊं लागतें तेव्हां मात्र खटका उडतो. आणि अगोदर कांहींच निश्चित नसतें व पुढें प्रत्येकाचे हेतू जसजसे हळू हळू स्पष्ट होत जातात तसतसें एकमेकांचें एकमेकांविषयीं वाईट मत होऊं लागतें. यासाठीं जेव्हां ज्या कोणाला जी स्वार्थबुद्धि असेल ती त्यानें सरळपणें पुढें मांडावी म्हणजे दुसऱ्याची उपयुक्तता कशी काय होईल याचा योजकाला विचार करतां येतो. ज्ञानकोशाचें कार्य मला करावयाचें होतें. त्यामुळें माझ्याशी सहकारिता करणाऱ्यांचे योग्य स्वार्थ मी लक्षांत घेतले असते. पण जेव्हां त्यांची स्वार्थबुद्धि प्रमाणाबाहेर जाऊं लागली तेव्हां डायरेक्टरांच्या हातून कंपनी कशी बचावावी याची मला काळजी पडली. व कांहीं डिरेक्टरांमध्यें माझा पगार अगदीं कमी कसा करावा हा विचार उपस्थित झाला.

मला पगार कमी मिळावा म्हणून जो विचार डिरेक्टरांत उत्पन्न झाला तो केवळ ज्ञानकोशाच्या हितासाठीं उत्पन्न झाला असें त्यांना वाटलें असें ते दाखवीत. त्यांनां असें वाटे कीं माझा पगार कमी आहे असें सांगितल्यानें लोकाश्रय जास्त मिळेल. ज्ञानकोशाचें कार्य चांगलें आहे म्हणून माझ्या बरोबरीच्या डायरेक्टरांनां सांगूनं चाललें असतें. परंतु या कार्यांत आमची स्वार्थबुद्धि कांहीं नाहीं. डॉ. केतकर यांनीं अगदीं अल्प पगारावर राहण्याचें कबूल केलें आहे. अशा तऱ्हेच्या गप्पा कंपनीचे संस्थापक म्हणून ज्यांच्या सह्या घेतल्या होत्या त्यांपैकीं कांहींनीं उठाविण्यास सुरवात केली. असें करण्यांत त्यांचा वाईट हेतु होता असें नाहीं तर आपली निःस्वार्थता दाखविली म्हणजे कार्याचा उत्कर्ष होतो अशी त्यांची समजूत होती. डिरेक्टरांनां बैठकीस'ठीं बरंच पैसे हे मात्र माझा पगार कमी ठेवूं इच्छिणाऱ्या डिरेक्टरांस हवें होतें.

त्यांचा प्रयत्न डायरेक्टरच्या बैठका वारंवार कराव्यात व त्यांची प्रत्येकी १० रुपये फी करावी आणि प्रत्येक डायरेक्टरनें आपलें दरसाल ५०० रुपयाचें उत्पन्न करून घ्यावें अशा प्रकारचा होता. व त्यांनीं त्याचप्रकारचे नियम सुचविले होते व ही सर्व किफायत तीस रुपयांच्या भांडवलावर मिळवावयाची होती. कांहीं तीस रुपये भरून डायरेक्टर

झालेल्या लोकांनां त्यामुळें निःस्वार्थतेचें गाणें अवश्य होतें. पण त्यांत जे नागपूरचे स्थानिक लोक होते त्यांनां मी बाहेरचा वाटत असे आणि स्वतःसाठीं जरी ५०० रुपये उत्पन्न फुकटांत मिळविण्याची योजना करावयाची होती तरी डॉ. केतकर यांनीं फार थोडक्यांत काम करावें या बाबतींत मात्र त्यांचें एकमत होतें. डायरेक्टरांच्या फीचे पैसे फुकटांत मिळविण्याची त्यांची हिकमत होती असें मी म्हणतों याचें कारण त्या डायरेक्टरांनां खरोखर काम असें कांहींच नव्हतें. संपादकीय बाबतींत त्यांनीं कांहींच केलें नाहीं आणि व्यवहारदृष्टीनें देखील त्यांनां कांहीं एक करतां येण्याजोगें नव्हतें. कारण शेअरसाठीं आलेले अर्ज मंजूर करणें यासारखेंच काम असे. धंद्याची सर्व दृष्टि एकंदर योजनेंतच ठरली होती आणि तीप्रमाणें म्यानेजरनीं काम करावयाचें एवढेंच काय तें होतें व वारंवार आपण काय काम केलें हें डायरेक्टरांनां सांगायचें असाच कार्यक्रम होता. सभेंत महत्त्वाच्या गोष्टी ठरतच नसत. ज्ञानकोशमंडळाच्या डायरेक्टरांच्या सभेंत महत्त्वाचें खरोखर कांहींच ठरत नसे, व त्यांचा प्रयत्न मुख्य म्यानेजरला लबाड समजून मोठ्या संशयखोर तऱ्हेनें कसें वागवावें या प्रकारचाच होता आणि त्यांनां दरसालचे ५०० रुपये त्यासाठींच पाहिजे होते, व यासाठीं माझ्याविरुद्ध कांहीं तरी सांपडावें याची त्यांनां फार इच्छा होती. मी कंपनीचा प्रवर्तक, मुख्य कार्यकर्ता आणि सर्वांत मोठा भागीदार होतों तरी मला अधिकार सर्वांत कमी असावेत ही इच्छा इतर लोकांत होती आणि स्वार्थत्यागाच्या गोष्टी मला सांगून मला अर्धपोटी काम करावयास लावावें आणि इतर डायरेक्टर होणाऱ्या मंडळींनीं आपला चांगला फायदा करून घ्यावा ही त्यांची इच्छा होती. ही इच्छा डिरेक्टरांच्या सभेंत बहुमत करून घेऊन ते पार पाडणार होते. रा. फडके ज्ञानकोशमंडळाच्या सभेस फारसे येतच नसत आणि पाध्ये, ठेंगडी आणि भवाळकर ही तीन मंडळी अगोदर खासगी बैठकी करून संगनमत ठरवून सभेला येत. ठेंगडी हे गृहस्थ साधारण दणकेबाज परंतु त्यांनां लटपटी पाहिजेत व दमबाजी करावयास पाहिजे अशापैकीं दिसून आले तर भवाळकर हे निराळ्या प्रकृतीचे दिसून आले. व रा. पाध्ये यांनीं यांत जो पुढाकार घेतला तो त्यांच्या मुद्रणविषयक अपेक्षांवर मी नियंत्रण घालूं लागलों तेव्हांपासून घेतला असें वाटतें.

रा. पाध्ये वगैरे मंडळीस माझ्याविरुद्ध काहूर करण्यास एक संधि आयतीच मिळाली. स्टयाच्युटरी मीटिंगचा अहवाल तांतडीनें करावयाचा असतो. आणि ३१ तारखेपर्यंतचा हिशोब घेऊन एक तारखेला ताळेबंद करून देण्याची आवश्यकता होती. परंतु तितक्या वेळांत कारकुनाचा ताळेबंद जुळेना. तेव्हां दोन तारखेच्या सभेंत मी तसें सांगितलें तेव्हां जणूं काय मी पैशाची अफरातफर केली असाच कांगावा पाध्येकंपूनें केला; प्रत्यक्ष आरोप केला नाहीं. दररोजचा हिशोब बरोबर असतां २४ तासांत ताळेबंद न जुळणें म्हणजे कांहीं गैरव्यवस्था होत नाहीं; तो केवळ जास्त वेळ घालून हिशोब करण्याचा प्रश्न आहे. तथापि त्या संधीचा फायदा घेऊन मला हिशोब बरोबर ठेवण्याचें; आणि प्रामाणिकपणाचें महत्त्व सांगण्यास आणि हिशोबाचा कायदा सांगण्यास सुरवात केली. त्यावेळेस या सर्व मंडळीचें हें पूर्वरचित नाटक आहे हें मला ठाऊक असतें तर मी त्या धोरणानें वागलों असतों आणि त्यानंतर १२ सही करणारांकडून जे डायरेक्टर निवडावयाचे ते निराळे लोक निवडून यावेत म्हणून प्रयत्न केला असता. माझ्या मनांत ती शंका कांहीं आलीच नाहीं. आणि यामुळें रा. पाध्यांच्या टोळींत असलेल्या एका गृहस्थास मी आपलें मत दिलें. पण मला त्यांची गहजब करण्याची तऱ्हा त्यांचा संस्था चांगल्या तऱ्हेनें चालावी या हेतूनें उत्पन्न झालेला आवेश आहे असें वाटलें. १४।९।१७ रोजी स्टयाच्युटरी मीटिंगपूर्वी एक सभा भरली होती तींत पुढच्या सालासाठीं डिरेक्टर पाहिल्या बारभाईनें (कंपनी स्थापन करतेवेळेस सह्या करणाऱ्या १२ जणांनीं) निवडले. त्या सभेंत माझी डिरेक्टर म्हणून निवडणूक करूं नये असें मत कांहीं जणांनीं व्यक्त केलें. त्यांचें असें म्हणणें पडलें कीं जो आपले सर्वांत अधिक पैसे घालतो आणि ज्याच्यामुळें ही कंपनी स्थापन झाली तो डिरेक्टर असला काय आणि नसला काय सारखाच; उलट डिरेक्टर नसल्यानें त्याचा स्वार्थत्याग उलटा अधिक दिसून येणार आहे !! हें म्हणणें कांहींनां पटलें पण कांहींनां पटलें नाहीं त्यामुळें माझीहि डिरेक्टर म्हणून निवडणूक झाली. तथापि माझे अधिकार कमी करावे हें पाध्ये कंपूस वाटतच होतें व यासाठीं माझी सेक्रेटरीशिप काढून घेऊन रा. गोविंद चिंतामण तांबे यांची कंपनीचे चिटणीस म्हणून नेमणूक करण्यां

आली आणि रा. तांबे यांस पाध्ये यांनीं सांगितलें कीं तुम्ही सर्व काम शिकून घ्या म्हणजे म्यानेजरहि तुम्हांलाच नेमूं. सेक्रेटरी दुसरा करण्यांत रा. पाध्ये यांचा डाव असा होता कीं, सेक्रेटरी व म्यानेजर यांच्यामध्यें द्वैत रहावें आणि आपला अधिकार चालण्यास संधि जास्त मिळावी. त्यांत रा. तांबे रा. पाध्ये यांच्याच तंत्रानें वागतील असें वाटण्याचें त्यांनां कारणहि होतें. त्यांनां असें वाटे कीं, तांबे कऱ्हाडे, आपण कऱ्हाडे आणि अध्यक्ष व सेक्रेटरी हे दोन्ही कऱ्हाडे असले म्हणजे ज्ञानकोश काढण्यामध्यें महत्त्वाची कामगिरी कऱ्हाडयांनीं केली असें होईल. शिवाय रा. तांबे हे वकील या नात्यानें माधवराव पाध्ये यांचे कांहीं दिवस ज्युनिअर देखील होते. पण रा. तांबे यांस ज्ञानकोशाची कळकळ असल्यामुळें आणि माझ्यावरच त्यांचा विश्वास असल्यामुळें " कऱ्हाडा पेटिआटिझम " उत्पन्न करून आम्हां दोघांमध्यें द्वैत उत्पन्न करणें रा. पाध्ये यांस शक्य झालें नाहीं.

ज्ञानकोशाविषयीं सरकारनें एकंदर त्रयस्थपणाची वृत्ति पहिल्यापासून ठेविलेली होती. सरकारनें ज्ञानकोशावर प्रेमहि दाखविलें नाहीं किंवा विरुद्धता दाखविली नाहीं. मध्यप्रांत सरकारच्या मदतीनें ज्ञानकोश ऑफीसला १९११ सालचे सेन्ससचे रिपोर्ट मिळाले पण पुढें १९२१ सालीं सेन्ससचे रिपोर्ट मिळविण्यांत मुख्य संपादकीय ऑफीस पुण्यांत आल्यामुळें मध्यप्रांत सरकारनें कांहीं मदत केली नाहीं आणि मुंबई सरकारनें ते आम्हांस मिळवून देण्याची कृपा केली नाहीं. १९११ चे सेन्सस रिर्पार्ट आणि ग्याझेटीअरचे कांहीं भाग आम्हांस या स्टयाच्युटरी मीटिंगच्या पूर्वीच मिळाले.

सप्टंबर १९१७–सप्टंबर १९१८

हा काळ म्हटला म्हणजे स्टयाच्यूटरी मीटिंगनंतरचें पहिलें वर्ष होय. या काळांतल्या मुख्य गोष्टी म्हटल्या म्हणजे रा. पाध्ये यांची पदच्युति, डॉ. केतकर यांचा पगार ठराविला जाणें, व काम बरेचसें होणें या गोष्टी होत. या काळांत ज्ञानकोशमंडळाचीं पुणें व मुंबई येथील ऑफिसें स्थापन झालीं. या काळांतच कै. वि. का. राजवाडे यांच्याशीं ६००० रुपयांत १५०० पृष्ठें त्यांनीं तयार करावीं या योजनेचें पूर्व स्वरूप ठरलें.

दक्षिणा कां नको

ज्ञानकोशमंडळानें दक्षिणा घ्यावयाची नाहीं हें धोरण पहिल्यापासून ठरविलें होतें. आणि या धोरणामुळेंच ज्ञानकोशमंडळास चांगलाच फायदा झाला. ज्या मंडळींनां तुम्ही गिऱ्हाईक व्हा म्हणून आम्हीं सांगण्यास जावें त्यापैकीं कांहीं मंडळी आम्ही या कार्यास मदत म्हणून १०।२० रु. द्यावयास तयार आहोंत असें म्हणत, तीच मंडळी १००।१२५ रु. देणारीं गिऱ्हाईकें करतां आलीं. ज्ञानकोशाचा एखादा दुसरा भाग जेव्हां बाहेर पडला तेव्हां वर्गणी म्हणून कांहीं दक्षिणा देऊं असें म्हणणारी मंडळी भेटत तेव्हां आम्ही त्यांस त्या रकमेपुरते भागच द्यावयास सांगत होतों. त्यामुळें असें झालें कीं आम्हास दक्षिणा देण्याच्या हेतूनें जी मंडळी एखादादुसरा भाग घेती झाली तीच मंडळी पुढें सबंध ज्ञानकोश घेती झाली व दक्षिणा घ्यावयाची नाहीं या बाण्यामुळें ज्ञानकोशमंडळाविषयीं आदर वाढला तो निराळाच. दक्षिणा घ्यावयाची नाहीं, हा बाणा प्रथम जेव्हां जाहीर केला गेला तेव्हां साहेबी ऐट म्हणून त्याच्यावर टीकाहि करण्यांत आली व दक्षिणा घ्यावयाची नाहीं हा नियम प्रथम माझ्या मनांत असतां तो कागदावर कोठेंहि आला नव्हता. डायरेक्टर मंडळीमधील बहुतेकांचें दक्षिणा घ्यावी या प्रवृत्तीचेंच मत होत होतें परंतु त्यासंबंधीं त्यांचें मत मला फिरवितां आलें. त्यावेळेस त्यांस दक्षिणा न घेण्याचीं कारणें सांगितलीं होतीं तीं येणेंप्रमाणें:—

त्यांस सांगितलें कीं ही कंपनी आहे. आपण जर दक्षिणा घेऊन कंपनीच्या शेअरहोल्डरांस मुनाफा वाटूं लागलों तर तें वेडेवांकडें दिसून येणार नाहीं काय? तुमची जर दक्षिणा घेण्याची स्थिति आहे तर कंपनीस मुनाफा वांटण्याची शक्यता मुळींच नाहीं असें आपोआपच होतें कीं नाहीं? व कंपनीला जर मुनाफा होणार नाहीं तर लोकांनीं शेअरहोल्डर कां व्हावें आणि लोक जर शेअरहोल्डर होणार नाहींत तर वर्गणीदारांनीं आपली वर्गणीची रक्कम कोणत्या तारणावर द्यावी. अर्थात दक्षिणा घेणें म्हणजे कंपनीचे अस्तित्वासच धोका आणणें आहे, ही दृष्टि जेव्हां मीं दिली तेव्हां आम्हांस देणगी घ्यावयाची नाहीं हें तत्त्व कंपनीच्या नियमांत तारीख १३।११।१९१७ रोजीं समाविष्ट करतां आलें.

संदेशची करामत

हें तत्त्व जाहीर मात्र अशा वेळेस झालें कीं तो दुसऱ्या एका गृहस्थाच्या करामतीविरुद्ध उलट डाव टाकण्यांत आला तेव्हां झालें. संदेशचे संपादक अच्युत बळवंत कोल्हटकर यांनीं "नारिंगीनिशाण" या नाटकाचा प्रचार करण्यासाठीं "बंधुसमाज" नांवाची नाटक मंडळी काढली होती. आणि या संस्थेचा उद्देश नाटकाच्या खेळाचें उत्पन्न इतर संस्थांस देणें हा आहे असें संदेशकारांनीं जाहीर केलें होतें. व त्यावेळेस ज्या संस्थांविषयीं लोकांनां सहानुभूति असेल त्या संस्थांनां आम्हांस मदत करावयाची आहे तर तुम्ही आमच्या खेळास या अशा अर्थाचीं पत्रकें ते काढीत असत. त्यांनीं ज्या अनेक संस्थांस मदत करण्याचा आपला संकल्प कळविला होता त्यामध्यें ज्ञानकोश मंडळाचें नांव त्यांनीं घातलें. व ज्ञानकोशमंडळास एक हजार रुपयांची मदत करण्याचा आपला इरादा त्यांनीं जाहीर केला, यामुळें परिस्थिति निराळीच उत्पन्न होणार होती, आम्ही ज्ञानकोशास ग्राहक व्हा म्हणून ज्या लोकांपाशीं जाणार ते लोक म्हणणार कीं आम्हीं रुपया दोन रुपयाचें तिकीट घेऊन ज्ञानकोश मंडळास मदत केलीच आहे. लोकांची ज्ञानकोशमंडळास मदत करण्याची कर्तव्यबुद्धि रुपया सवारुपयाच्या खर्चानें शांत झाली असती आणि त्या खेळाला जें उत्पन्न आलें असतें त्यांतील ज्ञानकोमंडळाला अच्युतराव कोल्हटकरांच्या कारभारांत काय मिळणार याविषयीं देखील मला बराच संशय होता. ती अच्युतरावांची दान करण्याची इच्छा नसून ज्ञानकोशाविषयीं जी सहानुभूति लोकांस वाटत असेल त्या सहानुभूतीवर धंदा करण्याची त्यांची इच्छा होती असें त्यावेळेस मत झालें. व कंपनीच्या नियमाप्रमाणें आम्हास देणगी स्वीकारतां येत नाहीं आणि नारिंगीनिशाण संस्थेनें आम्हांस ही देऊं केलेली मदत नको आहे अशा अर्थाचें पत्र मी संदेशकारांस पाठविलें पण तें त्यांनीं प्रसिद्ध केलें नाहीं, तेव्हां त्यांची आमच्या सहानुभूतीवरच धंदा करण्याची इच्छा आहे अशी खात्री झाली; तथापि त्या अर्थाचें पत्र इतर पत्रांतून मागाहून प्रसिद्ध करतां आलें. तेव्हां आमच्या साहेबी वृत्तीवर संदेशनें टीका सुरू केली.

यानंतरची नमूद करण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे रा. पाध्ये यांचें ज्ञानकोशाच्या शासनाध्यक्षाच्या जागेवरून व चालक मंडळांतून

उच्चाटन होय. रा. पाध्ये व मी या दोघामध्यें जें द्वैत उत्पन्न झालें त्याचा परिणाम रा. पाध्ये यांच्या उच्चाटनांत झाला, आणि पुढें रा. पाध्ये यांनीं माझ्या संबंधानें लोकमत कलुषित व्हावें यासाठीं प्रयत्न केला, तो इतिहास मी येथें जरा विस्तृततेनें पण रा. पाध्ये यांच्या विषयीं जितकी न्यायबुद्धि धरतां येईल तितकी धरून देऊं इच्छितों. माझ्या मनांत रा. पाध्ये यांच्याविषयीं कांहीं काळ राग असेल पण आतां तो नाहीं आणि यामुळें मी मुद्दाम कोणत्याहि गोष्टीचा विपर्यास करीन असें वाटत नाहीं. महादेव कृष्ण पाध्ये यांनीं १५०० रुपये ज्ञानकोशमंडळांत घातले होते, आणि ते घालतांनां त्यांनां फायद्याची आशाहि होती पण १५०० चे शेअर घेणें व डायरेक्टर होणें याशीं कंपनीशीं करार करणें हें कायद्यानें मना होतें. पण ते कंपनीचे डायरेक्टर झाले व चेअरमन देखील झाले व आमचें छपाईचें कामहि ते करीत आणि यामुळें त्यांच्यामध्यें आणि माझ्यामध्यें पुढें द्वैत उत्पन्न झालें. कंपनीचें काम करणारा मनुष्य या नात्यानें त्यांच्याकडून काम नीट झालें नाहीं तर त्यांच्यावर रागावावें कसें, तेच तर आमच्या मंडळाचेहि अध्यक्ष; अशी स्थिति उत्पन्न झाली, तेव्हां तीवर कांहीं तरी इलाज करणें अवश्य होतें. दुसरे दोघे जादा चालक व रा. पाध्ये हे नेहमी एकीनें वागत असल्यामुळें कंपनीच्या कामाला जेव्हां रा. पाध्यांकडून दिरंगाई होई तेव्हां ते नेहमीं रा. पाध्ये यांनांच उचलून धरीत. त्यांनां एकी करण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. तेव्हां दुसरे दोघे डिरेक्टर एकशेअरवाले असल्यामुळें पुन्हां निवडून येण्यासाठीं त्यांस रा. पाध्ये यांचा १५ मतांचा जोर पाहिजे होता. व यासाठीं ते नेहेमी पाध्ये यांच्याशी मिळून वागत तेव्हां यावर उपाय करावा असा विचार माझ्या डोक्यांत सुरु झाला. तेव्हां डिरेक्टरांची जबाबदारी व बंधनें या संबंधाचा कायदा पाहिला तेव्हां असें आढळून आलें कीं जेव्हां एखादा डायरेक्टर कंपनीशीं करार करतो तेव्हां तो आपोआप डायरेक्टर या पदापासून च्युत होतो. तेव्हां पाध्ये यांस काढून टाकणें मला प्राप्त होतें. एवढेंच नव्हें तर तसें मी केलें नसतें तर रा. पाध्ये आणि मी असे दोघेहि कायद्याप्रमाणें शिक्षेस पात्र झालों असतों. कदाचित कायद्याकडे आमचें लक्ष मागाहून गेलें असें निमित्त करून आणि ओढाताण करून रा. पाध्ये यांस काम मिळणें मात्र बंद करून डायरेक्टर म्हणून ठेवतां आलें असतें असेंहि कित्येक वकील मागाहून म्हणाले. तथापि तशी

कायद्याची ओढाताण करावयाची माझ्या मनाची तयारी नव्हती. तो विचार माझ्या मनांतहि आला आणि तेव्हां असें वाटलें कीं ज्याच्या अपेक्षा फसल्यामुळें जो मनुष्य दुखावला आहे असा मनुष्य डायरेक्टरांत ठेवला तर तो कारभारांत दररोज त्रास देईल. तर असा मनुष्य बाहेरच रहावा हें उत्तम. बाहेर राहिला असतां तो जो त्रास देईल त्याला प्रतिकार करतां येतो पण आंत राहून मनुष्य नेहेमी अधिक त्रासदायक बनतो. तर आपल्याविरुद्ध जाणारा मनुष्य आपल्याला त्रास देण्यासाठीं मानगुटीवर ठेवण्याकरतां कायद्याची ओढाताण करून मनुष्य स्वत: लबाडी केल्याच्या गुन्ह्याला पात्र होण्याचें कोण करणार आहे? असो, अशा स्थितींत माधवराव पाध्ये यांस मी काढून टाकण्यास त्यांचें शत्रुत्व माझ्या मनांत मुळींच नको होतें आणि नव्हतेंहि. रा. पाध्ये यांनां काढून टाकलें तें काढून टाकण्यापूर्वी रा. फडके यांचा देखील सल्ला घेतला होता. व रा. फडके यांनीं देखील कायद्याच्या दृष्टीनें दुसरा इलाज नाहीं असें मत दिलें होतें. पाध्ये हे डिरेक्टर नाहींत म्हणून रजिस्ट्रारकडे जें पत्र गेलें तें रा. गोविंद चिंतामण तांबे यांच्या सहीनें गेलें. रा. तांबे, रा. पाध्यांचे एका वेळीं ज्युनिअर होते म्हणजे रा. पाध्ये तांब्यांचे गुरु होते त्यामुळें

रा. तांबे यांनीं " गुरुसाईड " केला

असें त्यांचे मित्र त्यांस म्हणूं लागले.

रा. पाध्ये यांचें उच्चाटन डिसेंबर १९१७ च्या शेवटास झालें आणि पाध्ये यांस तें कांग्रेस आटपल्यानंतर कळलें. त्यावेळेस लोकमान्य टिळक कांग्रेस आटपून नागपुरास येऊन राहिले होते आणि त्यांचीं व्याख्यानें वगैरे माधवराव पाध्ये यांच्या छापखान्याच्या मोकळ्या पटांगणांत होत. त्यावेळेस "राष्ट्रीय" मंडळींतील एका कंपूत वातावरण एकदम माझ्याविरुद्ध झालें होतें व त्यावेळेस लोकमान्यांची व माझी भेटहि होऊं न देतां लोकमान्यांनां माझ्याविरुद्ध पुष्कळ गोष्टी सांगितल्या गेल्या असें कळतें. पण लोकमान्यांनीं त्या गोष्टींनां मुळीच महत्त्व दिलें नसावें असें वाटतें. डॉ. केतकरांचा ज्ञानकोश कधींहि सिद्धीस जाणार नाहीं असें लोकमान्य म्हणाले अशीहि गप्प कांहीं शेलक्या लोकांनीं उठविली. पण ती अगदीं खोटी होती कारण कांहीं दिवसांनंतर बुटीच्या

बंगल्यांत त्यांची आणि माझी भेट होऊन बऱ्याचशा गप्पा झाल्या तेव्हां त्यांनीं नागपुरास माझ्याविरुद्ध असलेल्या मंडळीसंबंधानें एकहि गोष्ट काढली नाहीं. आणि डिडेरोच्या साहाय्यकांचें आणि त्यांचें भांडण होऊन ती मंडळी त्यांस सोडून कशी गेली, तरी देखील तो कसा डगमगला नाहीं हें सांगितलें आणि हें ज्ञानकोशाचें कार्य तुम्हांस पुरें करण्यास वीस वर्षें लागतील असा आपला अजमास सांगितला.

रा. पाध्ये प्रकरण त्यांच्या उच्चाटनानें संपलें नाहीं; हें केवळ त्याचें पूर्वस्वरूप आहे असें १९२० सालच्या वृत्तांतावरून दिसून येईल. त्या वेळची हकीगत देऊन नंतर या भांडणाविषयीं माझे विचार मी व्यक्त करणार आहें. रा. पाध्ये यांच्याशीं भांडण झालें ही गोष्ट वाईट झाली असें अनेकदां वाटें, तर हें भांडण झालें हें बरेंच झालें आणि पाध्ये यांचा संबंध १९१८ च्या जानेवारींतच तुटला हें चांगलें झालें असेंहि एका दृष्टीनें वाटूं लागलें. तर त्याहि गोष्टी मी मांडणार आहें.

पाध्ये गेले तरी भांडण संपलें नाहीं. उलट अशा कांहीं गोष्टी झाल्या कीं, त्यामुळें माझ्याविषयीं एक शेअरवाल्या जादा चालकाचें मन कलुषित झालें. याला कारण तेच केवळ नसतील मीहि असेन. त्यांची अशी कल्पना झाली कीं, मी त्यांस तुच्छतेनें वागवितों. पण तसें नव्हतें. त्यांचा तसा समज होण्यास पुणें व मुंबई येथील ऑफीसें कारण झालीं.

पुणें ऑफीसचा प्रारंभ

१९१७ सालच्या वर्षप्रतिपदेच्या, दिवशीं (१२ एप्रिल १९१८) पुणें ऑफिस उघडलें आणि तें उघडण्याचा समारंभ नानावाडयांत करण्यांत आला. पुणें ऑफिसवर प्रो. वै. का. राजवाडे यांची योजना करण्यांत आली, आणि प्रो. राजवाडे यांच्या वार्धक्यामुळें त्यांच्याकडून स्वतः विशेष काम होण्याजोगें नव्हतें तर त्यांचा उपयोग पुण्यांतल्या कांहीं मंडळींचीं तोंडें बंद करण्याकडे झाला. तसाच अनेक लोकांची सहानुभूति मिळविण्याकडे झाला. प्रो. राजवाडे आम्हांस मिळाले कसे याचेंच पुष्कळांनां आश्चर्य वाटलें. प्रो. राजवाडे हे मवाळ आणि डॉ. केतकर तर जहाल असें असतां प्रो. राजवाडे यांनीं केतकरांशीं सहकारिता कशी केली इत्यादि गोष्टींचें कांहीं मंडळींनां कोडें पडलें. त्यासारखें कोडें या दिवसांत पडावयाचें नाहीं. पण पक्षाच्या अभिमानी मनुष्यानें दुसऱ्या पक्षाच्या मनुष्याशीं कोणत्याच तऱ्हेनें सहकारिता करूं नये

असें वाटत होतें, प्रो. राजवाडयांचा उपयोग दुसऱ्याहि प्रकारें झाला. बऱ्याच लोकांनां आपलीं लिखितें कोणी तरुणानें तपासावीं हें योग्य वाटत नव्हतें. मी सर्वच गोष्टींचा सूत्रधार असल्यामुळें मी लोकांचे लेख तपासूं नये असा कोणाचाच आग्रह नव्हता. पण जेव्हां शास्त्रीय विषयावर स्वतंत्र संपादक म्हणून डॉ. श्रीरंग मोरेश्वर साने यांस संपादक नेमण्याचें योजिलें तेव्हां त्या विचारास बऱ्याच शाखा संपादकांनीं विरोध केला. तथापि त्या मंडळींची भाषेच्या दृष्टीनें प्रो. राजवाडे यांनीं आमचीं लिखितें तपासावीं याला पूर्ण संमति होती. पुणें येथें ऑफीस उघडल्यामुळें पुण्यांत थोडी बहुत सहानुभूति उत्पन्न झाली आणि ज्या वेळेस पुण्यास ऑफीस उघडावयास आलों त्यावेळेस पुण्यास येथें सुमारें २५ वर्गणीदार करून गेलों. मला त्यावेळेस पुण्यांतली बडी राजकारण करणारी मंडळी म्हणत होतीं कीं पुणें शहराचे लोक लुच्चे आहेत. तुम्हांला येथें पैसा बिलकुल मिळावयाचा नाहीं. तुम्हांला बऱ्हाडांतच काय पैसा मिळवायचा असेल तो मिळवा आणि तेथें खर्च करा. पण खरोखर पुणें शहरानें जेवढी आम्हांस पैशाची मदत केली तितकी दुसऱ्या कोणत्याहि शहरानें केली नाहीं. पुण्यांतून आम्हांस चाळीस हजार रुपयांच्यावर रकमा मिळाली आहे. वाङ्मयासाठीं जे प्रयत्न करतात त्यांचा पाठिराखेपणा पुणें शहर जेवढें करतें तेवढें कोणतेंच शहर करीत नाहीं असें खालीनें म्हणतां येईल. असो.

पुणें येथें ऑफीस उघडल्यामुळें आणि प्रो. राजवाडे त्यांत आहेत अशी बातमी प्रसिद्ध झाल्यामुळें कार्यास मदत झाली ती विश्वास वाढण्याचीच झाली हें मात्र सांगितलें पाहिजे. प्रो. राजवाडे हे आपल्या चढत्या वयामुळें आणि डोळ्यांच्या स्थितीमुळें विशेष काम स्वतः करूं शकले नाहींत. व त्यांनीं नऊ महिन्यांतच काम सोडून दिलें. कारण त्यांनां तपासनीसांचें काम करावें लागे व तें करतांना त्यांच्या डोळ्यांनां त्रास होऊं लागे व जें तपासणीचें काम त्यांच्याकडून होई तें देखील दुसऱ्यांच्या साहाय्यानें होई. प्रो. राजवाडे यांच्या नेमणुकीसंबंधाने एक दोन डिरेक्टर नाखूष झाले. मी व रा. फडके या दोघांची त्यांनां नेमावे अशी इच्छा होती तथापि दुसरे डिरेक्टर असें म्हणूं लागले कीं, प्रो. राजवाडे यांनां अर्ज करूं द्या म्हणजे आम्ही त्याचा विचार करूं, प्रो. राजवाडे यांनीं अर्ज करावा व त्यांचा अर्ज मंजूर करण्याचें

श्रय आपणांस असावें हें त्यांस पाहिजे होतें तर प्रोफेसर राजवाडे यांचें मन आपण कसें वळवावें या फकिरींत मी होतों. तेव्हां ही केवळ संपादकीय बाबत आहे म्हणून मी त्यांनां न विचारतांच प्रो. राजवाडे यांची नेमणूक केली व हें रा. भवाळकर व ठेंगडी यांस मी त्यांनां कांहीं एक विचारीत नाहीं असें वाटण्यास कारण झालें.

मुंबई ऑफीस १ जुलैला उघडलें त्यावेळेस तें देखील डिरेक्टरांनां न विचारतांच उघडलें. याचें कारण ती गोष्ट देखील मॅनेजरच्या अधिकारांतलीच आहे असें माझें म्हणणें होतें. डिरेक्टरांनां न विचारतां या गोष्टी केल्या याचें कारण धंद्यासाठीं जो ताबडतोब निर्णय करावा लागतो तो निर्णय करण्यास ते असमर्थ आहेत असें दिसून आलें व दोन ऑफीसें उघडण्यासारख्या महत्त्वाच्या गोष्टी देखील त्यांनां न विचारतां करणें त्यांनां गैर वाटलें तर त्यांत त्यांचा दोष आहे असें मला वाटत नाहीं.

याच वेळेस कंपनीच्या हितासाठीं मी वागत असतो केवळ आम्हांला तुम्ही विचारलें कां नाहीं एवढया मुद्यावरच हल्ला करण्याचा एक प्रयत्न दोन जादा डायरेक्टर (१ शेअरवाले) यांच्याकडून झाला. १९१७-१९१८ सालांत "इंडियन कंपनीज रिस्ट्रिक्शन आक्ट" हा नवाच कायदा हिंदुस्थान सरकारनें केला. या कायद्याचा हेतु जी रोकड लोकांपाशीं असेल ती खासगी कंपन्यांत जाऊं नये व सरकारला कर्ज काढण्यास अडचण पडूं नये हा होता. हा कायदा पास झाल्याचें माझ्या नजरेस रा. माधवराव अणे यांच्या दक्षतेमुळें आलें. त्यावेळेस मी प्रवासांतच होतों. या कायद्यानें नवीन कंपनी काढण्यास किंवा अस्तित्वांत असलेल्या कंपनीचें भांडवल वाढविण्यास किंवा शेअरवरच्या हप्त्याची मागणी करण्यास हिंदुस्थान सरकारची संमति लागत होती. या कायद्यामुळें आमचा व्यवहारच थांबावयाचा अशी स्थिति झाली. तेव्हां शेअरवरचे नवीन हप्त्याची मागणी करण्यास प्रतिबंध असूं नये आणि अवश्य वाटल्यास एक लाखपर्यंत भांडवल वाढविण्याची मोकळीक असावी असा अर्ज हिंदुस्थान सरकारास केला आणि तशी एक लाखपर्यंत भांडवल करण्यास आणि हप्ते वसूल करण्यास सरकारनें परवानगी दिली. अर्थात या आक्टाकडे बोट दाखवून कोणी आमचे हप्ते भरण्याचें चुकवूं नये म्हणून सरकारनें दिलेल्या परवानगीसंबंधाची

माहिती प्रसिद्ध करणेंहि अवश्य होतें. व या सर्व गोष्टी मी बाहेर गांवीं असतां माझ्या पत्राप्रमाणें सेक्रेटरींनीं केल्या. तेव्हां डायरेक्टर चिडले व म्हणाले कीं कंपनीचें भांडवल वाढविण्याची परवानगी मागून ठेवावयाला तुम्हांला कोणी सांगितलें होतें? मी अर्थात स्पष्टीकरण केलें. तेव्हां ते म्हणाले कीं सरकारला पुन्हां लिहा कीं आम्हाला ही परवानगी नको आहे; आणि परवानगी मागितली ती डायरेक्टरांची परवानगी नसतांना मागितली होती. अर्थात हें डायरेक्टरांचें ऐकणें म्हणजे वेडेपणाच होता. पण सरकारला जें आम्ही पत्र लिहिलें त्यांत "अवश्य वाटल्यास" हे शब्द होते, त्यांकडे त्यांचें लक्ष ओढलें. आणि त्याचा असा अर्थ स्पष्ट करून दाखविला कीं "भांडवल वाढवावें अशी शिफारस डायरेक्टरांनीं केल्यास आणि ती सूचना शेअरहोल्डरांनीं स्वीकारल्यास" असाच अर्थ होतो. तेव्हां एकास तें पटलें व दुसऱ्यास तें पटलें नाहींच; तो सरकारची परवानगी मागण्यास आमची परवानगी मागावयास पाहिजे होती असेंच घेऊन बसला. तेव्हां ज्या डायरेक्टरांनां माझें म्हणणें पटलें त्यानीं दुसऱ्या डायरेक्टरास "चिड चिड करूं नको, उगा मुगा रहा ना" म्हणून दबकावलें, व तो रुसवा डायरेक्टर चूप बसला. ते रुसवे डिरेक्टर द्वेष करण्यास आतुर असत. तेव्हां ज्ञानकोशास एक लाख भांडवल करण्यास परवानगी मिळाली काय? म्हणून प्रश्न केला तर ते ही "क्यापिटल जोक" आहे असें उत्तर देत.

रा. ठेंगडी आणि भवाळकर या दोघांची वृत्ति समजण्यासारखी आहे रा. ठेंगडी हा गृहस्थ चळवळ्या म्हणून प्रसिद्ध होता पण एखाद्या वाङ्मयसंस्थेत डिरेक्टर म्हणून कसा आला हा प्रश्न उपस्थित होण्याजोगा आहे. त्याचप्रमाणें एक शेअरवाल्या लोकांनां डिरेक्टर म्हणून येण्याची संधि कां ठेवली हा प्रश्न देखील उपस्थित होईल. पैसे थोडे पण चळवळ मात्र फार अशा लोकांनां अधिकारवर येऊंच न देण्याची कंपनींचीं आर्टिकल्स करतांनां अशी धूर्तता दाखविली कां नाहीं. इत्यादि प्रश्न उत्पन्न होतील. यासाठीं त्यांचें स्पष्टीकरण केलें पाहिजे.

प्रथमतः हें सांगितलें पाहिजे कीं १९१६ सालीं कंपन्यांच्या कारभाराविषयीं महाराष्ट्रांत तर काय पण सर्व हिंदुस्थानांत अविश्वास होता. अनेक ब्यांकांचीं दिवाळीं वाजलीं होतीं. आणि त्यामुळें पुष्कळ लोक कंपनीचे डिरेक्टर व्हावयास भीत असत. रा. माधवराव पाध्ये यांनीं

कंपनीचे डिरेक्टर व्हावयाचें म्हणजे काम फसलें तर लोकांच्या शिव्या खाण्याची आणि आपलें नांव बदनाम करून घेण्याची तयारी करावयाची असें भाष्य केलें, आणि तें पुष्कळ अंशीं खरें होतें. ज्ञानकोशमंडळाचे १५ शेअर घेणारेच सर्व डिरेक्टर असावेत व तो काम संपेपर्यंत जवळ जवळ कायमचे असावेत असें माझें धोरण होतें. पण १५ शेअ घेऊन डिरेक्टर होण्यास पाध्ये व फडके यांखेरीज कोणी तयार होतच ना. तेव्हां मनांत अशी कल्पना आली कीं, ज्ञानकोशाच्या तीन कायम डिरेक्टरांपैकीं दोन मृत झाले तर पुढें काय करावयाचें? कंपनी म्हटली म्हणजे दोन तरी चालक लागतातच आणि वेळेस जर सर्वच कायम चालक मृत झाले तर निदान दोन तरी नवे डिरेक्टर येण्याची व्यवस्था असली पाहिजे. जर १५ शेअर घेणारी मंडळी मिळालीच नाहींत तर पुढें काय करावयाचें यासाठीं जादा चालक म्हणून जे लोक निवडावयाचे ते एकशेअरवाले देखील चालतील असा नियम केला.

पहिली आर्डिनरी जनरल मीटिंग

या सभेच्या वेळेस ज्ञानकोशमंडळाचे कांहीं "महत्त्वाचे" नियम ठरविण्यांत येणार होते, व यावेळेस जे दोन जादा चालक होते त्यांचा प्रयत्न असा होता कीं, रा. फडके यांस डायरेक्टरांमधून काढून टाकावें व आपणच पुन्हां निवडून यावें आणि ज्ञानकोशमंडळामध्यें माझें वजन अगदीं कमी करून टाकण्याचा प्रयत्न करावा. तें वजन कमी करण्याची त्यांची खटपट होती. तींतील अंगें येणेंप्रमाणें:—तीन तीन महिन्यांचें बजेट करावें आणि तीन तीन महिन्यांनीं खर्चास परवानगी द्यावी आणि खर्चास परवानगी देण्याचे वेळेस जितका त्रास देतां येईल तितका देण्याची व आपल्या अधिकाराची जाणीव मॅनेजरला अधिकाधिक व्हावी यासाठीं खटपट करावयाची अशी त्यांची वृत्ति होती व तीच त्यांनां चालवावयाची होती. रा. माधवराव पाध्ये हे चिडलेलेच होते. आणि त्यांनां हातीं धरून त्यांच्याकडून कंपनीचे व्यवस्थेबद्दल पुष्कळ तक्रारी बोलवाव्या आणि दुसऱ्या दोघां जादा चालकांनीं त्या तक्रारींची सत्यता मान्य करावी आणि डायरेक्टरास अधिकार फारसे नाहींत म्हणून डॉ. केतकरांच्या कारभारावर आम्हाला नियंत्रण करतां येत नाहीं म्हणून सांगावें आणि आपण पुन्हां निवडून तर यावेंच पण

निवडून येतां येतां डॉ. केतकर यांचे अधिकार कमी कमी करून निवडून यावें म्हणून खटपट झाली. या खटपटीचा सुगावा मला अगोदरच लागला होता; कां कीं आपली ही सर्व खटपट कशी काय आहे, डॉ. केतकर यांच्या तावडींतून आम्ही कंपनी कशी सोडवून आणतों याविषयीं त्या मसलतींत असलेल्या मुत्सद्यांनीं नागपूरच्या बार रूममध्यें वढाईचीं भाषणेंहि केलीं होतीं त्यावेळेस त्यांचा हेतु आम्हांस पुरा विध्वंसून टाकतां आला. त्यांस कांहीं करतां आलें असतें अशांतला भाग नाहीं. कां कीं, मतांची प्रवळता माझ्यापाशींच होती. त्या सभेला रा. फडके हजर होते व रा. पाध्ये व रा. फडके यांचीं मतें एकमेकांविरुद्ध पडून माझीं २५ मतें व मी प्राक्सी गोळा करून मिळविलेलीं मतें यांच्यापेक्षां जास्त मतें आपलीशी करून घेणें रा. भवाळकर व ठेंगडी यांस अशक्य होतें. तथापि आपली प्रॉक्झीचीं मतें न वापरतां किंवा स्वत:चीं २५ मतेंहि न वापरतां जमलेल्या मंडळींतच माझें बहुमत व्हावें अशी माझी इच्छा होती. व यासाठीं त्यांच्या लटपटी पद्धतशीर फोडून टाकणें अवश्य होतें. यासाठीं आम्ही उपाय केलेले येणेंप्रमाणें:—

रा. फडके यांच्याविरुध्द प्रयत्न

रा. माधवराव पाध्ये यांची प्रथमत: अध्यक्षस्थानीं योजना केली. त्यामुळें रा. पाध्ये यांस भांडणाऱ्या व्यक्तींतील एक पक्ष म्हणून जो भडिमार करावयाचा होता तो करतां आला नाहीं. व त्यामुळें रा. धुंडीराज ठेंगडी व भवाळकर यांस "कंपनीचे व्यवस्थेविरुद्ध ज्या गोष्टी दु:खानें कबूल" करावयाच्या होत्या त्या करतां आल्या नाहींत. व त्यामुळें त्यांचा कार्यक्रम बिघडल्यामुळें घोटाळा होऊन गेला. त्यांच्या पक्षाच्या पढविलेल्या एका शेअरहोल्डरानें असा प्रश्न केला कीं, तुम्हीं लेख लिहिण्याकडे हजारों रुपये खर्च करीत आहां. पण अशी कल्पना करा कीं पुढें गिऱ्हाईकीच झाली नाहीं तर छापावयास पैसा राहणार नाहीं म्हणजे पैसे जातील बाहेर आणि कागद येतील घरांत, आणि ते देखील लिहिलेले असणार. म्हणजे मग त्या कागदांचें काय करावयाचें? त्याला उत्तर देणें सोपें होतें. कीं कंपनी मोडून टाकावयाची आणि कागद रद्दीचे भावानें विकून टाकावयाचे. हें उत्तर ऐकतांच हशा पिकला. व डॉ. केतकर यांस आपण पकडींत धरलें आहे असें दाखविणारी त्या

शेअरहोल्डराची मुद्रा खजील झाल्यासारखी दिसली. या बैठकींत जे ठराव आणले होते त्या ठरावांमध्यें, जो डायरेक्टर अमुक एक बैठकीला हजर रहाणार नाहीं तो आपोआप गाळावा असा ठराव होता. आणि तो रा. फडके यांस काढून टाकण्यासाठीं होता. कां कीं रा. फडके अकोल्यास असल्यामुळें त्यांनां बैठकांस हजर राहतां येत नसे. रा. भवाळकर व रा. ठेंगडी यांस रा. फडके हे नको होते. कारण त्या दोघांचें मताधिक्य त्यांस ठेवून माझ्यावर अधिकार गाजवावयाचा होता. पण गाजवणार तो काय? रा. ठेंगडी उध्दटासारखें भाषण करी. तर दुसरा द्वयर्थी भाषणें करी व रा. नारायण खंडेराव फडके मुद्दाम अकोल्याहून आले असतां त्या बैठकीला कांहीं तरी कुरापत काढून कांहीं एक काम होऊं देऊं नये अशी त्यांची वृत्ति होती. ठेंगडी व भवाळकर हे दोघेहि जादा चालक. दोघांची जिंदगी ज्ञानकोशमंडळांत तीस रुपयांपर्यंत. परंतु इच्छा मात्र अशी कीं डॉ. केतकर यांनीं पूर्णपणें त्यांच्या तंत्रानें चालावें, त्यांना ज्या गोष्टी करावयाच्या असतील त्या करूं द्याव्यात आणि त्या दोघांनीं जूट करून आपलें स्वामित्व गाजवावें. त्यांपैकीं एकाची तर अशी इच्छा होती कीं ज्ञानकोशमंडळांतले जे अनेक लेखक होते त्यांनीं आपणाशीं बाहेर देखील मोठ्या अदबीनें वागावें. व त्यांपैकीं कोणी चहाच्या दुकानांत चहा घेतला असला आणि तेथें ज्ञानकोश मंडळांतला एखादा डायरेक्टर गेला तर त्या मंडळीनें उठून उभें रहावें व मंडळांतील एक कारकून तसा उठून उभा राहिला नाहीं म्हणून एका डायरेक्टरानें मजकडे तक्रारहि केली होती. रा. फडके यांस काढून टाकणें हें कंपनीच्या "आर्टिकल्स"प्रमाणें अशक्य होतें. कंपनीचा कायम चालक कोणत्या विशिष्ट कारणामुळें पदच्युत होऊं शकेल त्या अटी स्पष्ट मांडिल्या होत्या. त्यामुळें आर्टिकल्स बदलल्याखेरीज कोणताहि ठराव पास होणें अशक्य होतें. एवंच या सर्वसाधारण बैठकींत भवाळकर व ठेंगडी यांस कांहीं करतां आलें नाहीं. व ते पुनः निवडूनहि आले नाहींत. त्याबेळेस डॉ. खरे व रा. कठाळे हे नवीन जादा चालक निवडून आले. व या दोघांनीं मी नागपूरला होतों तोंपर्यंत काम चांगलें केलें. व डॉ. खरे यांनीं शेवटपर्यंत काम चांगलें केलें.

डॉ. नारायण भास्कर खरे एम्. डी. यांच्याविषयीं थोडेसे दोन शब्द लिहिले पाहिजेत. डॉ. खरे यांची व माझी ओळख प्रथम नागपुरासच

झाली आणि ती देखील झाली ती अशी; मी त्यांची पाटी पाहिली. एम्. डी हीं अक्षरें पाटीवर पाहिलीं व यांच्यासारख्या मनुष्याचें कंपनीच्या संस्थापकांमध्यें नांव असलें तर बरें असें वाटून त्यांची मेमोरांडम व आर्टिकल्स वर सही घेतली. त्यामुळें हे कंपनीच्या आद्य संस्थापकांत दाखल झाले व त्या नात्यानें दीड वर्ष डिरेक्टर राहिले. मध्यें स्टयाच्युटरी मीटिंगच्या अगोदरच्या आठवडयांत जेव्हां नवीन डिरेक्टरांची निवडणूक केली, तेव्हां ते निवडून आले नाहींत. त्यांनां रा. भवाळकरापेक्षां एक मत कमी पडलें आणि त्यावेळेस माझें मत भवाळकरांसच मी दिलें होतें तेव्हां एक वर्षभर ते डिरेक्टर नव्हते. त्याच्या पुढच्या वर्षी धुंडीराज ठेंगडी आणि भवाळकर हे डिरेक्टर निवडून आले नाहींत. कारण कोणते डिरेक्टर निवडून यावे हे बहुतेक माझ्या इच्छेवरच होतें आणि त्यांच्याऐवजीं रा. कठाळे व डॉ. खरे हे निवडून आले. त्यांच्या निवडणुकीच्या वेळेस देखील एक शंका उपस्थित करण्यांत आली होती आणि ती म्हटली म्हणजे कंपनीचे ऑडीटर रा. खरे हे डॉ. खरे यांचे सावत्रबंधु आहेत आणि यासाठीं डॉ. खरें यांनां डिरेक्टर केलें तर रा. खरे यांस ऑडीटर करतां येणार नाहीं. तथापि डॉ. खरे यांच्या निवडणुकीचा प्रश्न अगोदर सोडवावा लागला आणि ते निवडले गेले आणि त्यांची निवडणूक झाल्यानंतर ऑडिटर खरे यांच्या निवडणुकीच्या वेळेस तो आक्षेप कोणी घेतलाच नाहीं.

डॉ. खरे यांनीं डिरेक्टरचें काम चांगल्या तऱ्हेनें केलें. ते नेहेमी ठरलेल्या वेळीं सभेला येत आणि येण्यापूर्वी सर्व कागद वाचून येत आणि आल्यानंतर १० किंवा पंधरा मिनिटांतच सर्व काम उरकून टाकीत असत. बहुतेक वेळ बैठकीचीं मिनिटबुकें तेच लिहीत असत. त्यांच्यामध्यें ताबडतोब विचार करण्याची आणि निर्णय करण्याची हातोटी होती, आणि सार्वजनिक काम करतांना स्वतःस जरी थोडा चट्टा बसला तरी हरकत नाहीं अशी त्यांची वृत्ति असे. तथापि यांच्या हातूनहि एक दोन चुका झाल्या; त्यांचा उल्लेख पुढें प्रसंगानुसार येईलच.

रा. कठाळे हे चांगल्या तऱ्हेचे वकील आहेत. यांनां पोंच बेताचाच असे आणि यांच्याकडे येऊन कोणी गोष्टी खोट्या सांगितल्या तर ते त्यांवर लवकर विश्वास ठेवीत. यांची एक वर्षपर्यंत कारकीर्द निरुपद्रवी झाली. तथापि मी पुण्यास असतांना माझ्याविरुद्ध कांहीं तरी प्रयत्न करावा म्हणून

रा. भवाळकर जेव्हां खटपट करीत असत तेव्हां ते कठाळयांच्याकडे जात असत. रा. कठाळे यांची त्यामुळें माझ्याविरुद्ध वृत्ति झाली होती पण हे माझें फारसें नुकसान करूं शकले नाहींत.

वर दिलेल्या हकीगतींत असें वाटण्याचा संभव आहे कीं, मी डिरेक्टर मंडळीची विनाकारण उपेक्षा करीत होतों. तथापि मला अजूनहि तसें वाटत नाहीं. ज्या प्रकारच्या माणसांशीं संबंध आला त्या प्रकारच्या माणसांशीं अन्य तऱ्हेनें वागणें शक्यच नव्हतें. जे दोघे जादा चालक होते त्यांस पुन्हां निवडून येण्यासाठीं कोणत्या तरी पुष्कळ हिस्से घेणाऱ्या भागीदारास चिकटून राहिल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. ते आपली दुर्बल स्थिति कांहीं अंशीं ओळखून होते तरी पण त्यामुळें मुख्य हिस्सेदार जो मी त्याच्या तंत्रानें न वागतां रा. पाध्ये यांच्या तंत्रानें ते वागूं लागले. प्रथमतः पाध्ये व मी या दोघांमध्यें असें मत होतें कीं, मुख्य जबाबदारी कायम चालकांवर आहे आणि जे जादा चालक आहेत त्यांनां फारशी गडबड करूं देऊं नये व रा. फडके जर वारंवार येत असते तर दोन जादा चालकांनां बांजवीपेक्षां जास्त महत्त्वाकांक्षा उत्पन्नच झाली नसती. पण रा. फडके न येण्यामुळें या दोन जादा चालकांनां असें वाटूं लागलें कीं, ते दोघे व मी व पाध्ये असे चारच जण जागेवर आहोंत. जर ते दोघे चिकटून राहिले व आम्हां दोघांपैकीं कोणाला तरी आपल्या बाजूचे केलें तर आपल्याला कंपनी आपल्या ताब्यांत ठेवतां येईल. यासाठीं या दोघांनीं प्रथम रा. पाध्ये यांच्याविषयीं माझें मन कलुषित करण्याचा प्रयत्न केला; पण तो सिद्धीस गेला नाहीं. रा. पाध्ये जेव्हां आपल्या शिफारसीचा कारकून पाठवीत तेव्हां त्यास तुम्हीं ठेवूं नका असें ते म्हणत असत. रा. पाध्ये व हे दोघे यांचें एकमेकांशीं बरें होतें अशांतला भाग नाहीं. कारण रा. भवाळकर व व रा. ठेंगडी हे दोघेहि आपणांस राष्ट्रीयपक्षाचे म्हणवीत असत, रा. पाध्ये हे नेमस्तपक्षाचे होते. व नागपूरला कांग्रेस न होतां सुरतेला कांग्रेस झाली तेव्हां रा. पाध्ये यांनीं कांग्रेसच्या स्वागत कमेटीचे पैसे आपल्या हातांत ठेवून नागपूरला कांग्रेस करण्याचा जो व्यूह अजीबात फेटाळून लावला त्यामुळेंच रा. पाध्ये व राष्ट्रीय पक्षाची मंडळी यांमध्यें परस्परांविषयीं क्रोधद्वेषादि भाव जागृत होते.

माधवराव पाध्यांच्याविरुद्ध मी राहून जादा चालकांच्या मतानें चालेन अशी जेव्हां त्यांस संधि मिळेना तेव्हां ते माधवरावांबरोबर दोस्तीचे

आविर्भाव करूं लागले व जेव्हां मी रा. पाध्ये यांस ४८ तासांत काम सुरू केलें पाहिजे, नाहीं तर काम काढून घेऊं म्हणून नोटीस दिली तेव्हां त्यांची व पाध्यांची दोस्ती घट्ट झाली. रा. पाध्ये यांच्या जोरावर ते माझ्याशीं उद्धटपणानें वागूं लागले आणि रा. पाध्ये देखील त्यांनां जोर देऊं लागले पण जेव्हां माधवराव पाध्ये चालक मंडळींतून निघाले तेव्हां आतां आपली किंमत कशी राहील असें त्यांनां वाटलें. व आम्ही कंपनी मोडून टाकण्याचा अर्ज देणार आहोंत इत्यादि गोष्टी ते बोलूं लागले. पण पुढें त्यांनां असें वाटूं लागलें कीं, आतां माधवराव पाध्ये गेल्यामुळें जादा चालकांचें महत्त्व उलटें वाढलें आहे. तेव्हां आम्ही दोघे, एक-शेअरकाले जे बाहेर आहेत त्यांचे प्रतिनिधि आहोंत आणि कायमच्या चालकांच्या स्वार्थाला आळा घालण्यासाठीं आहोंत अशी भाषा बोलण्यास त्यांनीं सुरवात केली व आपलें महत्त्व अधिकाधिक दाखवावें अशी त्यांस बुद्धि झाली. काम मला करूं देऊन जर मी कोठें कंपनीचें हित विसरत असेन तर निषेध करावा हें धोरण न ठेवतां प्रत्येक वेळेस अडवणूक करण्याचें धोरण त्यांनीं पत्करलें. तेव्हां मला देखील त्यांच्या मताला कांहींएक किंमत यावयाची नाहीं हें धोरण पत्करावें लागलें. यांनीं कांहीं गोष्ट मंजूर कली नाहीं तरी ती जर आपणांस योग्य वाटत असेल तर करण्यास हरकत नाहीं, आपण ती गोष्ट जनरल मीटिंगमध्यें आपल्या स्वतःच्या मताच्या व आपल्याविषयीं चांगलें मत असणाऱ्यांच्या मतांच्या जोरावर सहज पास करूं असा मला विश्वास होता. गांवांत त्या दोघां-वर विश्वास नसून माझ्यावरच विश्वास अधिक आहे ही जाणीव मला होती. त्यामुळें दोघां चालकांच्या विरोधाची कांहींच पर्वा न करतां मला काम चालू ठेवतां आलें.

सप्टेंबर १९१८–सप्टेंबर १९१९

चालक मंडळीमध्यें पक्ष उत्पन्न होऊन लढे लागूं नयेत यासाठीं दुसऱ्या वर्षीं (सप्टेंबर १९१८–सप्टेंबर १९१९) रा. फडके यांनीं एक युक्ति योजिली आणि त्या युक्तीचा उपयोगहि चांगला झाला. ती युक्ति म्हटली म्हणजे तिघा डिरेक्टरांच्या सभाच कमी करून टाकल्या आणि चार डिरेक्टरांच्या तर्फे नेहेमीची काम करण्यासाठीं कमेटी दोघांचीच नेमली. तींत डॉ. खरे व मी असे दोघे जण होतों. त्यामुळें पक्ष उत्पन्न होण्याचा संभवच टळला. जी गोष्ट दोघांच्यामध्यें एकमतानें ठरणार

नाहीं ती गोष्ट चौघांच्या बोर्डापुढें मांडावी असें ठरलें. त्यामुळें बहुतेक गोष्टी सोप्या झाल्या व चौघांच्या बोर्डापुढें फारच थोडे प्रश्न ठेवण्यांत आले. पुष्कळ प्रसंगी आमचें एकमत होई तरी त्या प्रश्नावर ठराव सर्व बोर्डानें करावा अशी आमच्याकडून शिफारस जाऊन नंतर तो ठराव होई. याच वर्षांत मुख्य काम पुणें येथें करावें असें ठरलें आणि मिस् कोहन यांस हिंदुस्थानांत येण्यास आमंत्रण द्यावें हें देखील याच वर्षांत ठरलें. दोघांची सबकमेटी करावी हें तत्त्व फारच उपयुक्त ठरल्यामुळें तें शेवटपर्यंत पाळलें गेलें. पुणें येथें डिरेक्टर निवडले जात तरी देखील हें तत्त्व पाळलें जाई. चालू काम करणारी डायरेक्टरांची कमेटी दोघाजणांची असल्यामुळें काम देखील झटपट आटपे. पुणें येथें वार्किंग कमेटीमध्यें पहिलीं दोन वर्षें कै. दांडेकर व मी असे होतों, व नंतर रा. अच्युतराव भट व मी असे दोघे जण होतों.

दोघांच्या सबकमेटीचें तत्त्व ह्या दोहोंमध्यें मी एक नेहमी असेंतोंपर्यंत अत्यंत उपयुक्त ठरलें. पण जेव्हां मी पुण्यास आलों आणि नागपुरास डॉ. खरे. व रा.कठाळे यांचीच जेव्हां वर्किंग कमेटी बसूं लागली आणि ती बसण्यापूर्वी कांहीं उपद्व्यापी मंडळी रा. कठाळे यांस येऊन भेटत तेव्हां मात्र दोघांच्या वार्किंग कमेटीचें तत्त्व निरुपयोगीच केवळ नव्हे तर नुकसानकारक होऊं लागलें. पण ही नुकसानकारकवृत्ति १९२० च्या सप्टेंबरपर्यंत दृष्टीस पडली नाहीं.

१९१९ पर्यंत ज्ञानकोशाचें काम नागपुरासच चाललें होतें व तों पर्यंत बरेंचसें संपादकीय काम नागपुरास होऊन गेलें होतें. पुणें ऑफीसचें काम चांगल्या प्रकारें चालत नव्हतें तरी देखील पुणें येथें ऑफीस आणण्याची आवश्यकता होती. संपादकीय कामाची एकंदर हकीगत पुढें येईलच.

डॉ. खरे व रा. कठाळे हे डिरेक्टर १९१८ सालच्या सप्टेंबरमध्यें आले. आणि त्यानंतर कांहीं महिने म्हणजे सप्टेंबर १९१८ ते मे १९१९ पर्यंत त्यांच्याशीं आमचा निकट संबंध होता. आणि या वेळपर्यंत ज्ञानकोशाचें बरेचसें कच्चें लिखित तयार झालें होतें पण जें दुसरें कांहीं महत्त्वाचें काम होतें तें नागपुरास होणें शक्य नव्हतें. यासाठीं मे १९१९ च्या अखेरीस ज्ञानकोशाचें सर्व संपादकीय काम पुण्यास आणणें अवश्य

झालें आणि पैसे पुरविण्याचें काम देखील मलाच करावें लागत असल्यामुळें हिशोबखातें देखील पुण्यासच आणणें अवश्य झालें. या संबंधाचा डायरेक्टरांचा ठराव ता. ३१।३।१९ रोजीं झालेला आहे.

प्रकरण ५ वें.

पुणें येथील पहिलीं तीन वर्षें

जून १९१९–२९ एप्रिल १९२०

पुणें येथें आगमन १ जून १९१९ रोजी झालें. येथें त्यावेळेस सर्व काम रा. रा. पांडुरंग महादेव बापट हे पहात होते. पुणें ऑफिस १।४।१९१८ रोजीं उघडलें तेव्हां तें प्रो. वैजनाथ काशीनाथ राजवाडे यांच्या नेतृत्वाखालीं उघडलें गेलें. प्रो. राजवाडे यांनीं काम ६।१२।१८ पर्यंत केलें. त्यानंतर कांहीं दिवस रा. रा. श्रीधर गोविंद काळे एम् ए. हे पुणें शाखेचे मुख्य काम पहात होते पण रा. काळे हे ३१।३।१९ तारखेस काम सोडून फलटण संस्थानच्या शिक्षण शाखेचे मुख्य अधिकारी झालें. पुढें रा. बापट हे पुणें ऑफिसचें मुख्य म्हणून काम पाहूं लागले.

पुण्यास कचेरी कां आली

ज्ञानकोशाच्या रचनेचीं मुख्य अंगें दोन होतीं. एक जी माहिती जमा झाली आहे तिची शिस्तवार मांडणी करणें हें अंग होतें पण त्याबरोबर जी माहिती कोठें पद्धतशीर मांडली गेली नाहीं ती मुद्दाम गोळा करून किंवा लागेल तें संशोधन करून मांडणें हेंहि दुसरें एक महत्त्वाचें अंग होतें.

वर सांगितलेल्या दोन क्रियांपैकीं पहिली क्रिया ऑफिस नागपूर येथें असतांच झाली. गॉझिटियर्स, एनसायक्लोपीडिया ब्रिटानिका व दुसरे इतर सायक्लोपीडियाज् यांतील अवतरणलेला भाग यांचे गोषवारे नागपुरासच तयार झाले. त्याप्रमाणेंच वॅट यांच्या हिंदुस्थानांतील व्यापारी वस्तूंच्या पुस्तकाचा गोषवारा हा देखील नागपुरासच तयार झाला. विंटरनिट्झच्या पुस्तकाचें भाषांतर लंडन येथें मिस् कोहन (सौ. शीलवती-बाई केतकर) या करीत होत्या आणि पहिल्या भागाचें भाषांतर जवळ

जवळ पुरें झालें होतें. याशिवाय निरनिराळ्या लेखकांकडे लेख वांटून देणें, विभागसंपादक नेमणें, इत्यादि क्रिया नागपुरासच पुऱ्या झाल्या होत्या व बऱ्याच जणांकडून लेखहि तयार झाले होते. तथापि बरेचसें काम राहिलेंहि होतें. १।१२।१९१९ रोजीं सर्व कच्चें लिखित तयार व्हावें अशी योजना होती. पण १ मार्च १९१९च्या सुमारास सर्व कच्चें लिखित तयार होईल असा रंग दिसेना. वर्गणीदार व शेअरहोल्डर मिळून संख्या हजारावर गेली होती. बऱ्याच शास्त्रीय विषयांवर लेख तयार व्हावयाचे होते त्यांस लेखक मिळतना. या लेखकांचा वर्ग त्यावेळेस मुंबई पुण्याकडेसच होता. व यामुळें लवकर ऑफिस पुण्यास नेऊन उरलेलें कार्य लवकर वेगानें पार पाडावें आणि १।१२।१९१९ ला हस्तलिखित पुरें करावें असा मानस होता.

शिवाय असें होई कीं, नागपूर येथें कामाला कायमचीं माणसें मिळण्यास अडचण पडत होती. जे पदवीधर कामास लावावयाचे ते सर्व टर्म भरल्यानंतर एल्एल्. बी. होऊन जात. त्यामुळें तयार झालेलीं माणसें निघून जात व पुनः कच्चीं माणसें ऑफिसांत येत. अशा प्रसंगीं आम्हास कायमचा संपादकवर्ग तयार करणें ही अधिक महत्त्वाची व निकडीची गोष्ट आहे हें दिसून आलें; ग्हणजे संपादकीय दृष्टीनें नागपुराहून मुख्य ऑफिस पुण्यास आणण्याचीं कारणें झालीं तीं.—

(१) तयार न झालेल्या मजकुराची जुळणी जोरानें करणें.

(२) विशिष्ट प्रकारचा मजकूर—विशेषेकरून भारतीय पांडित्याचा मजकूर—तयार करण्यासाठीं लेखकवर्ग मिळविणें.

(३) जो शास्त्रीय मजकूर तयार झाला नसेल त्याच्यासाठीं देखील मंडळी निवडून काम जोराने सुरू करणें.

नवीन मजकूर घालून, भाषा तपासून योग्य संक्षेप देऊन कच्च्या मजकुराचा पक्का मजकूर करण्यासाठीं मराठी भाषा चांगली लिहूं शकणारा लेखकवर्ग जुळविणें इ. कार्यें उद्दिष्ट होतीं.

पुण्यास ऑफीस आणण्याचें व्यवहारदृष्टीनें, तसेच संपादकीय दृष्टीनें फायदे दुसरेहि झाले आहेत, पण ते ऑफीस आणण्याचें ठरविलें त्यावेळीं ठाऊक नव्हेत. ते मुख्य फायदे म्हटले म्हणजे मुद्रणाची व्यवस्था जुळविणें हा होय. दुसरा फायदा म्हटला म्हणजे जेव्हां ज्ञानकोशाला पैशाची

अडचण पडली तेव्हां पुण्यांतल्या पुण्यांतच जोरानें ग्राहक मिळविण्याचें काम करतां आलें आणि मुंबई जवळ असल्यामुळें मुंबईस वारंवार जाऊन जोरानें पैसा मिळवितां आला. त्यावेळचा वृत्तांत पुढें दिलेला आहे.

नागपूरहून मुख्य ऑफीस उठल्यामुळें कांहीं नुकसानहि झालें. ती नुकसानी म्हटली म्हणजे तेथील असंतुष्ट वर्गांत माझ्याविरुद्ध चळवळ करण्यास संधि मिळाली. जनरल मीटिंग नागपूरला होत व काम तर पुण्यास आलें. त्यामुळें असें होई कीं नागपूरच्या शेअरहोल्डरांच्या मनांत हवे तसे खोटे ग्रह पसरून देण्यास तेथील मंडळींनां सोपें होई. व या संधीचा फायदा त्या मंडळींनीं चांगलाच घेतला. त्याची सर्व हकीगत पुढील भांडणाची हकीगत देतांना येईलच.

प्रस्तावनाखंडाची योजना

पुण्यास मी असतां तावडतोब मुद्रणास कांहीं तरी द्यावें असा विचार माझ्या मनांत आला. व ज्ञानकोश छापावयाची वेळ येण्यापूर्वी थोडें उत्पन्न जास्त काढण्यासाठीं दोन मोठीं पुस्तकें प्रसिद्ध करावीं असें वाटलें. ९।८।१९१९ रोजीं डिरेक्टरांच्या सबकमेटीची सभा भरली होती आणि यावेळेस मी हजर नव्हतों व डॉ. खरे व कठाळे हे दोघेच हजर होते. त्या वेळेस वैदिक आणि बौद्धवाङ्मय यांची माहिती देणारे दोन नवीन भाग आधीं आजच छापावयास घ्यावेत असा मी जो विचार पुढें मांडला होता त्याची चर्चा झाली. यावेळेस हे दोन्ही विभाग ज्ञानकोशाच्या बाहेरचे म्हणून संकल्पित होते व वाङ्मयसूचि हा ज्याप्रमाणें निराळा ग्रंथ काढला तसच हे काढावेत असा इरादा होता. पण ही योजना पास झाली नाही व त्यावेळेस आम्ही याविषयी कांहींच ठराव करीत नाहीं, जो कांहीं ठराव करावयाचा असेल तो इतरांच्या सल्ल्यानेंच करावा असा ठराव केला होता. व असा ठराव त्यांनीं केला हें चांगलें केलें. यानंतर आणि पुढची चौथांची बैठक भरण्यापूर्वी (२१-९-१९ पूर्वी) दोन भाग न करतां ज्ञानकोशाच्या आंतलेच भाग म्हणून प्रस्तावनाखंडाचे दोहोंच्या ऐवजीं पांच भाग काढावेत म्हणून मी योजना मांडली व पूर्वीच्या योजनेच्या ऐवजी ही नवीन योजना पत्करावी अशी विनंति केली व ही योजना त्या दिवशीं मंजूर झाली. याच दिवशीं कंपनीची वार्षिक सभा झाली.

भांडवल एक लाख झालें

१९१९ सप्टेंबरमधली वार्षिक सभा नागपुरास भरली. त्यावेळेस कांही विशेष झालें नाहीं. सभा पांच मिनिटांतच पार पडली. सभेला चौघेहि डिरेक्टर हजर होते. सेक्रेटरी हजर होते, व पूर्वी ज्ञानकोशमंडळांत माझे सेक्रेटरी असलेले देशमुख हजर होते. म्हणजे सर्व मंडळी घरचीच. बाहेरचें कोणी तरी असावें म्हणून रत्न्यांतून जात असलेले प्रो. गर्दे यांस वर बोलावून आणलें आणि ते देखाल वर सभा आहे हें ठाऊक असतें तर आले असते कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं. सभा पांच मिनिटांत पार पडली. ब्यालेन्सशीट पांच मिनिटांत पास झाला. जादा डिरेक्टर व आडिटर यांची निवडणूक म्हणजे पूर्वीच्यास कायम करणें झालें आणि कंपनीचें भांडवल एक लाखाचें करण्यांत आलें. माझें स्थानांतर झाल्यानंतरची नागपुरास झालेली ही पहिली सभा आहे.

"मिस्. कोहन" उर्फ मिसेस केतकर

ज्ञानकोशाच्या इतिहासांत यानंतरची महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे मिस कोहन यांचें आगमन होय. हें १९।१२।१९ रोजीं झालें. त्यानंतर त्यांचें रीतीप्रमाणें कामहि झालें.त्या कामाची संपूर्ण हकीगत पुढें परिशिष्टांत दिली आहे. मिस कोहन आणि त्यांचा व्रात्यसम्तोम आणि त्यानंतर त्यांच्याशीं माझें लग्न या सर्व गोष्टी त्यावेळेस वर्तमानपत्रांतील चर्चेचा विषय झाला होता, आणि त्यावेळेस सर्व गोष्टी करतांना जुनें धर्मशास्त्र आणि वैदिक विधि यांचा आश्रय केला होता म्हणून या गोष्टींचें लोकांस कौतुक वाटत होतें. अत्यंत नवीन गोष्टी करतांना देखील त्या गोष्टी वैदिक धर्माचेंच उपबृंहण करून करतां येतात या एका गोष्टी मुळें बऱ्याच लोकांस हें लग्न कौतुकाचें वाटलें तर कांहीं सुधारक मंडळीस तें वाईट वाटलें. मनोरंजनकारांनीं मिस कोहन यांनीं हिंदु होऊन हिंदु कायद्याप्रमाणें लग्न केलें ही मोठी चुकीची गोष्ट केली असे विचार प्रदर्शित केले. त्यांनां असें वाटलें कीं, जर जुना श्रौतस्मार्तसंप्रदायच जर सर्व प्रकारच्या नव्या गोष्टींना क्षेत्र उत्पन्न करून देऊं शकतो तर "ब्रह्मो" संप्रदाय व सिव्हिल म्यारेज आक्ट हे अनावश्यक ठरतील. त्याच प्रमाणें हिंदु मिशनरी सोसायटीनें देखील व्रात्यस्तोमावर टीका केली. कै. गजाननरावांनां असें वाटे की जर जुन्या वैदिक ग्रंथांतूनच परकीयांस

हिंदु करण्याचे विधी बाहेर पडूं लागले तर आमच्या नवीन विधींस कोण विचारतो. आणि अहिंदूंस हिंदू करण्याच्या कामांत आपलें पुढारीपण ब्राह्मण हिसकावून घेणार. ज्ञानकोशमंडळाच्या भागीदारांपैकीं चळवळ्या व्यक्तीस ही एक तऱ्हेची उत्पन्न झालेली लोकप्रियता आवडली नाहीं. त्यांनां असें वाटूं लागलें की जो कांहीं मंडळी या लग्नाला खरोखर विरुद्ध असतील आणि ज्ञानकोशमंडळापाशी वैदिक ज्ञानाचा अगडबंब सांठा आहे त्यास भिऊन चूप बसले असतील अशी मंडळी डॉ. केतकर यांच्याविरुद्ध करण्यास ही संधि बरी आहे. म्हणून त्यांनीं अशी शंका उपस्थित केली कीं डॉ. केतकर यांनीं आपल्या बायकोच्या येण्याचा खर्च कंपनीवर पाडला आणि तिला काम देऊन आपलीच धन करावयास सुरवात केली आहे. पुढें वार्षिक सभेच्या वेळीं असेंहि उठविलें कीं डॉ. केतकरांनीं पुण्यास आफीस नेलें हें डिरेक्टरांच्या परवानगाशिवाय नेलें. व मिस कोहन यांनां काम दिलें त्यांत देखील कोणाची परवानगी घेतली नव्हती इत्यादि. यासाठीं या संबंधाची सर्व हकीगत देणें अवश्य आहे.

या सभेनंतर प्रस्तावनाखंड छापण्याची तयारी करण्यास लवकरच सुरवात झाली; आणि त्यावेळेसच माझा श्रौत संस्थांचा अभ्यास जोरानें चालू होता. या अभ्यासाचा प्रारंभ जुलैपासूनच चालू होता व नोव्हेंबर १९ पर्यंत यजुर्वेदाच्या अभ्यासांत मदत करण्यासाठीं वै. अण्णंभट अभ्यंकर यांस दिलेले सुमारें १०० रुपये या कालांतच खर्च झालेले आहेत. रा. दातार यांची नेमणूक आगस्टमध्येंच झालेली आहे. प्रस्तावनाखंडाच्या मुद्रणास निर्णयसागरनें सुरवात करण्यापूर्वी आमच्याकडून आगाऊ रक्कम म्हणून २५०० रुपये घेतली होती. ती १८।१२।१९ रोजीं खर्चीं पडली आहे.

ज्ञानकोशमंडळाच्या कारभारांतील ज्या गोष्टींविषयीं कांहीं लोकांनीं आक्षेप घेऊन चळवळ उत्पन्न केली आणि मजवर शिंतोडे टाकण्याचा प्रयत्न केला अशी गोष्ट म्हटली म्हणजे मिस् कोहन यांची नेमणूक आणि त्यांस येण्यासाठीं ज्ञानकोशमंडळानें जें भाडें दिलें त्यासंबंधाची होय. ह्या गोष्टीसंबंधानें स्पष्ट खुलासा करावयाचा झाल्यास मला माझ्या आयुष्यक्रमांतील कांहीं खासगी गोष्टी स्पष्ट कराव्या लागतील. तथापि ज्ञानकोशमंडळाचे पैसे मी मंजुरीशिवाय खर्च केले असा जर कित्येकांचा समज होईल तर तो दूर करण्यासाठीं मी सविस्तर हकीगत येथें

देतों. यासंबंधानें प्रसिद्धपणें कोणी आक्षेप घेतला नाहीं त्यामुळें उत्तर प्रसिद्ध करण्याची देखील जरूरी नव्हती. ज्यांनीं जनरल मीटिंगमध्यें प्रश्न विचारला त्यांनां अध्यक्षांनींच उत्तर दिलें कीं, चालकांच्या संमतीनेंच मिसेस केतकर यांचा येण्याचा खर्च डॉ. केतकर यांच्या संमतीनें दिला. याविषयीं शंका रा. पाध्ये यांनीं उपस्थित केली होती पण मिस् कोहन यांनां काम करण्यासाठीं आम्ही ज्ञानकोशांत बोलावणार आहोंत ही गोष्ट रा. पाध्ये हे ज्ञानकोशाचे शासनाध्यक्ष असतांच प्रसिद्ध झाली आहे. रा. पाध्ये यांनीं मिस् कोहन यांस काम पहिल्याप्रथमच कां दिलें वगैरे प्रश्न भाडणाच्या वेळेस उपस्थित केले. पण जेव्हां ३१ मार्च १९१७ रोजीं चालक मंडळापुढें मी। एकदर ज्ञानकोशाची योजना मांडली त्या योजनेंतच नवव्या परिच्छेदांत मिस् कोहन यांस काम दिलें याचा उल्लेख आहे आणि ती योजना त्यावेळच्या चालक मंडळानें पास केली आहे. यानंतर ११।१०।१७ रोजीं एक पत्रक तयार केलें तें पत्रक रा. पाध्ये यांच्या सहकार्यानें तयार केलें, तें रा. पाध्ये यांच्या छापखान्यांत छापलें गेलें व त्यावर रा. पाध्ये यांचें नांव आहे आणि त्या पत्रकाचीं मुद्रितें डिरेक्टरांमध्यें अगोदर पाठवून ३१।१०।१७ च्या सभेंत चर्चा करून पास केलीं व नंतर तें पत्रक छापून प्रसिद्ध केलें. डिरेक्टरांच्या सभेंत तें पास झाल्याचा उल्लेख प्रोसीडिंग बुकांत आहे. हें पत्रक मुद्दाम पास करण्यांत आलें त्याचें कारण ज्ञानकोशाचे व्यावहारिक धोरण त्यांत स्पष्टपणें मांडलें होतें व ज्ञानकोशाचें वर्गणीदार होणें लांबणीवर टाकलें असतां दर सहा महिन्यास किंमती काय होतील याचें कोष्टक दिलें होतें. ज्ञानकोशविक्रीसाठीं प्रसिद्ध केलेली जाहिरात ही पहिलीच होती. त्या जाहिरातीमध्यें एक परिच्छेद खालीलप्रमाणें आहे.

सध्यां आमचें क्षेत्र अत्यंत नियंमित असल्यामुळें फारच थोडया जर्मन ग्रंथांचा आम्हांस उपयोग करून घेतां येत आहे. प्रथमत: जर्मन ग्रंथांचें च लेखांचें इंग्रजी रूपांतर करावें लागतें व नंतर त्याचा ग्राह्य भाग शोधून मराठींत द्यावा लागतो. जर्मन ग्रंथाचें इंग्रजी रूपांतर करण्याचें काम मिस् ईडिथ व्हिक्टोरिया कोहन यांनीं अत्यंत अल्प मोबदला घेऊन करण्याचें पत्करलें आहे. मिस् कोहन या सेंट आंड्र्यूस युनिव्हर्सिटी(स्कॉटलंड)च्या पदवीधर असून 'कंप्यारेटिव्ह रिलिजन्स'मध्यें त्यांनीं

"ऑनर्स" मिळविले आहेत. त्यांचा अभ्यास येना (Jena) वगैरे जर्मन युनिव्हर्सिट्यांतूनहि झाला आहे आणि फ्रेंच व डच या भाषांशीं चांगला परिचय आहे. यांस धाकट्या भगिनींचें (या लंडन युनिव्हर्सिटीच्या बी. ए. आहेत) साह्य आहे. येथें संपादकमंडळांत येऊन काम करणें शक्य झाल्यास यावयाचें असा त्यांचा विचार आहे.

यानंतर ३१।३।१९ रोजीं जी डिरेक्टरांच्या सबकमेटीची बैठक झाली तींत असा ठराव पास झाला कीं, मिस् ईडिथ व्ही कोहन यांचा दर्जा केवळ भाषांतरकार म्हणून आहे त्याच्या ऐवजी ज्ञानकोशमंडळाच्या लंडन येथील प्रतिनिधि म्हणून दर्जा करावा व त्यांचे अधिकार, म्यानेजर जे अधिकार लेखी देतील तेवढ्यापुरतेच असावेत. आणि या कामाबद्दल त्यांस जो मोबदला द्यावयाचा त्याचा मसुदा डिरेक्टरांपुढें मांडावा.

या तऱ्हेचा ठराव करण्याचें कारण झालें होतें तें येणेंप्रमाणें:—फ्रेंच व जर्मन पुस्तकांसंबंधानें जें काम करून पाहिजे होतें तें सर्व एकटीच्या हातून त्या केवळ फुरसुतीच्या वेळांत काम करीत असतां होणें शक्य नव्हतें. व फ्रेंच व जर्मन भाषेंतील साहित्य चांगल्या तऱ्हेनें वापरण्यासाठीं प्रथम दुसरी कांहीं तरी योजना करावी म्हणून प्रयत्न केला व रा. रा. नारायण सदाशिव मराठे यांची नेमणूकहि केली होती पण त्यांच्याकडून काम निभेना. त्यानीं कांहीं पुस्तकांची यादी केली व हें काम करण्यास शेंसवाशें रुपये पगार खर्ची पडला, व ते पुढें नोकरी सोडून गेले त्यामुळें तें काम फुकटच गेलें. मिस् कोहन यांचें तेवढें काम उपयुक्त झालें. तेव्हां इंग्लंडमध्यें गोषवारे व भाषांतरें यांचें काम करवून घ्यावें असें ठरलें. त्यानंतर २९।४।१९ रोजीं डिरेक्टरांच्या सबकमेटीचा असा ठराव झाला आहे कीं "मिस ईडिथ व्ही कोहन यांस संपादकांचे जर्मन व फ्रेंच भाषेंतील मदतनीस म्हणून सहा महिन्यांसाठीं बोलवावें. आणि यासंबंधाचा आगाऊ ठराव सर्व डायरेक्टरांच्या बोर्डापुढें ठेवावा. तो ठराव असा कीं, मिस् कोहन यांस ६ महिन्याकरतां बोलवावें त्यांचा पगार २०० पासून ३०० रुपये पर्यंत असावा आणि मिस् कोहन यांस जाण्यायेण्याचा खर्च द्यावा. ही शिफारस करतांना मिस् कोहन यांचें पूर्वीचें सर्व काम आणि उपयुक्तता कळविणारी एक नोट तयार करून पाठवावी.

या ठरावाप्रमाणें एक नोट तयार करून पाठविली व १६ जून १९१९ रोजीं डिरेक्टरांची जी बैठक झाली तींत या संबंधानें चर्चा करतांना रा. फडके यांनीं असें सांगितलें कीं डायरेक्टर कोणाहि व्यक्तीची अलीकडे नेमणूक करीत नाहींत. ती जबाबदारी संपादकांवरच ठेवावी आणि डिरेक्टरनीं केवळ रक्कम मंजूर करण्याचें अंगावर घ्यावें असें धोरण ठरलें आहे तर आम्ही फक्त रक्कम मंजूर करतों. मिस कोहन यांच्या योग्यायोग्यतेचा प्रश्न संपादकांनीं आपल्या जबाबदारीवरच सोडवावा असें म्हणून जादा खर्चासाठीं २००० रुपये मंजूर केले.

सप्टेंबर १९१९ ते सप्टेंबर १९२० या वर्षांत ज्या डिरेक्टरांच्या पांच सभा झाल्या त्यांत पहिली सभा जनरल मीटिंगच्या दिवशींच झाली व तींत नवीन भांडवल वाढविलें त्याच्या शेअरचे हप्ते कसे काय करावेत हें ठरविलें. दुसरी सभा (हजर फक्त कठाळे व खरे) २०।२।२० रोजीं झाली. या सभेंत महत्त्वाचें कांहींच ठरलें नाहीं. तिसरी सभा ७।३।२० रोजीं झाली. या सभेस खरे, कठाळे व मी तिघेहि जहर होतों, महत्त्वाचें कांहीं झालें नाहीं. एकंदर प्रगति कशी झाली आहे याची बरीच तोंडी माहिती डिरेक्टरांनां देण्याचाच या सभेचा उद्देश होता. पुढची सभा २०।६।२० रोजी झाली. या सभेंत रा. दाते यांस ३०० रुपये व रा. टिळक यांस २०० रुपये बोनस म्हणून द्यावे असें ठरलें. मिसेस केतकर यांचा राजीनामा मंजूर करून त्यांस ३० जून पासून नोकरींतून मोकळें करावें असें ठरलें. व माझा पगार तीनशेंच्या ऐवजीं सवाचारशें करण्यांत आला. २०।७।२० रोजीं पुढची सभा भरली. त्या सभेंत कंपनीनें विंटरनिट्झचें भाषांतर प्रसिद्ध करूं नये, मिसेस केतकर प्रसिद्ध करीत असतील तर त्यांस पाहिली आवृत्ति प्रसिद्ध करूं द्यावी आणि मिसेस केतकर यांनां पहिल्या आवृत्तीबद्दल काय द्याल म्हणून विचारण्यांत यावें इत्यादि गोष्टी ठरल्या. या ठरावांतीलच पुढचें वाक्य गाळून अर्धा ठराव छापून ज्ञानकोशमंडळानें विंटरनिट्झचें पुस्तक छापण्याचा अधिकार मिसेस केतकर यांस डिरेक्टरांनीं फाजील उदारपणा दाखवून बहाल केला आहे असें म्हटलें आहे. हा ठराव माझ्या गैरहजेरींत झाला.

या कालांत संपादकीय काम जें झालें त्यांत मुद्रणासाठीं कांहीं मजकूर तयार करण्याचें झालें. माझा स्वतःचा बराचसा वेळ वैदिक अभ्यासांतच जात होता. याच काळांत एका सुशिक्षित ठगाची जबानी म्हणून

माझ्यावर शिंतोडे टाकण्यासाठीं एक गोष्ट उद्यमांत प्रसिद्ध केली. तीमुळें कांहीं डिरेक्टर चिडून जाऊन रा. पाध्ये यांचर फौजदारी खटला भरा म्हणून मला त्यांनीं पत्रें व तारा केल्या पण त्याकडे अगदीं दुर्लक्ष करण्याचें ठरविलें.

नोव्हेंबरमध्यें पुस्तक छापणें सुरू होतें तें १९२० च्या सभेपर्यंत चालूच होतें. त्यावेळेस जें मंदगतीनें काम चालू होतें त्यामुळें मी त्रासून स्वत:चा छापखाना काढावा यासंबंधाचा विचार करीत होतों. निर्णयसागरमध्यें पुस्तक छापणें चालू असतां रा. बापट किंवा रा. दाते यांपैकीं कोणी तरी मुंबईस असेच आणि मुंबईस काम चालू असल्यामुळें खर्च वराचसा जास्त होई. आम्ही हा खर्च केला याचें कारण आमचें काम निर्णयसागर मार्फतच व्हावें ही इच्छा होती पण त्यांची त्या संबंधानें तीव्रता नव्हती. पहिला भाग नोव्हेंबरमध्यें छापावयास गेला आणि त्याची पहिली प्रत आम्हांस २।२।२१ रोजीं वाचकांच्या हातीं देतां आली. म्हणजे हें काम करण्याकरतां निर्णयसागरनें १४ महिने घेतले.

तिसरी साधारण सभा १९२० च्या सप्टेंबर महिन्यांत झाली पण तींत काम न आटपल्यामुळें ती पुढें ढकलली गेली व तीनंतर पुढें डिसेंबर महिन्यांत सभा भरणार होती पण ती फेब्रुआरी महिन्यांत भरली गेली. माझें व रा. पाध्ये यांचें भांडण होऊन कांहीं वेळ माझा पराभव आणि शेवटीं माझा विजय इत्यादि गोष्टी झाल्या. ज्ञानकोशमंडळ देखील भांडणें करण्यांत पूर्ण महाराष्ट्रीय आहे असें लोकांनां वाटलें.

तिसरी साधारण शेअरहोल्डरांची सभा २६।९।२० रोजीं झाली. या सभेच्या वेळीं मंडळींनीं कांहीं प्रश्नांबद्दल माहिती मागितली तेव्हां ती देण्यासाठीं डायरेक्टरांचें प्रोसीडिंग बुक नव्हतें; तें कोर्टांत होतें व कंपनीची खातेवही देखील तेथें नव्हती तेव्हां कांहीं शेअरहोल्डरांनीं इच्छा प्रदर्शित केली कीं, आजच्या सभेंत व्यालेन्सशीट पास करूं नये व हिशोब पहाण्याची आम्हांस संधि देऊन पास करावा. डॉ. खरे यांस त्यांत कांहीं कावा न वाटल्यामुळें त्यांनीं त्यास आपली संमति दिली व सभा तहकूब झाली. आणि पुढें सभा २४।१०।२० रोजीं भरली त्या दिवशीं रा. पाध्ये यांनीं एक लांबलचक ठराव आणला. तो ठरावच साठ सत्तर ओळींचा, अशुद्ध वाक्यांचा आणि अनेक आरोप गर्भित करणारा आणि अनेक खोटीं विधानें केलेला होता. तो ठराव मुळींच

विचारांत घेतला नाहीं. त्या दिवशीं असाहि एक आक्षेप आणला गेला कीं, हिशोब पहाण्यास वेळ अपुरी होती. तेव्हां अध्यक्षांनीं (डॉ. खरे यांनीं) सभा तहकूब केली आणि आक्षेपकांची एक कमेटी हिशोब पाहून तक्रार मांडण्यास नेमली. आणि त्या कमेटीनें ता. ९ डिसेंबरच्या आंत आपला रिपोर्ट पाठवावा असा हुकूम दिला. या सभेच्या दिवशीं रा. पाध्ये यांनीं अशी एक नोटीस दिली कीं, मी डिरेक्टरचे अधिकार पुन्हां घेऊं इच्छितों तेव्हां त्या सभेनंतर भरलेल्या डिरेक्टरांच्या सभेनें असें ठरविलें कीं, कोर्टातील प्रोसीडिंग बुक आल्यानंतर पाध्ये यांच्या प्रश्नाचा विचार करावा.

दुसरी तहकूब सभा ता. १९ डिसेंबर रोजीं भरावयाची होती पण ती नागपुरास न बोलावतां मी पुण्यास बोलविली आणि याचें कारण मधल्या वेळांत आपणास जणूं काय कंपनीचा व्यवहार पाहून शेअर होल्डरां-कडे रिपोर्ट पाठविण्याचा अधिकार मिळाला आहे असा बहाणा करून एक पाध्ये मंडळींनीं अहवाल तयार केला. तो सर्व अहवाल पुढें परिशिष्टांत दिला आहे व त्याला उत्तरेंहि तेथेंच दिलीं आहेत (परिशिष्ट १२ते १४, पृष्ठ ९७–८०पहा). या अहवालाचा हेतु स्वतःस मतें मिळविण्याचा होता. तेव्हां असा, आपणास भलतेच अधिकार आहेत असें सांगून खोटा अहवाल पाठवून मिळविलेलीं मतें निरुपयोगी करावीं एवढेंच काम मला करावयाचें होतें. पण मी तें न करतां पुण्यास सभा बोलावली. त्या सभेंत ब्यालेन्सशीट पास करून घेतला नाहीं. व त्या सभेंत कांहीं एक काम करावयाचें नाहीं असें ठरविलें. इकडे नागपूरच्या मंडळीनीं अध्यक्षांच्या संमतीनें सभा नागपुरास बोलावली व या सभेची मंडळीनां नोटीस गेली नाहीं म्हणून दुसरी तारीख नेमली. तेव्हां तिसरी तहकूब सभा २० फेब्रुवारी रोजी बोलवावी एवढाच ठराव त्या सभेंत पास झाला आणि तिसरी तहकूब सभा २० फेब्रुवारी रोजीं भरली.

तिसऱ्या तहकूब सभेच्या अगोदर रा. पाध्ये यानीं एका ठरावची नोटीस दिली. तो ठराव म्हटला म्हणजे ज्ञानकोशाच्या संपादकाचें काम आणि व्यवस्थापकाचें काम हीं दोन्ही कामें डॉ. केतकर करीत आहेत तर हीं दोन्हीं कामें निराळीं करावींत. या नोटिशीची माहिती मला सभेच्या अगोदर सात आठ दिवस कळली. या तऱ्हेचा ठराव कायदे-शीर तऱ्हेनें आणतां येणें शक्यच नव्हतें. कां व.ीं तहकूब सभेंत पूर्वीच्या सभेंत उरलेलें तेवढेंच काम घेतां येतें, नवें काम घेतां येत नाहीं असें

कंपनीच्या कायद्याच्या टेबल ए. मध्यें म्हणजे आमच्या कंपनीच्या आर्टिकल्स मध्येंच आहे. तथापि या रा. पाध्ये यांच्या नोटिसीचा मला फायदा करून घेतां आला. अशी कामाची विभागणी झाली आणि कंपनीस योग्य म्यानेजर मिळाला नाहीं तर कंपनीस पैशाचा पुरवठा होणार नाहीं तर त्या ठरावाविरुद्ध मला भांडतां यावें म्हणून आपण मला प्राक्झी पाठवावी असें मला लोकांनां लिहितां आलें आणि त्यामुळें सुमारें साठ प्राक्झी मला मिळाल्या. व यामुळें माझे हात जे अधिक बळकट झाले ते पाध्ये यांच्या न घेतां येण्यायोग्या ठरावामुळेंच झाले.

या सभेच्या अगोदर रा. पाध्ये यांनीं एक पत्रक काढलें होतें. त्यांत त्यांनीं डिरेक्टरला छपाईचें काम घेतां यावें अशी सूचना मांडली होती व आपण डिरेक्टर जणूं आहोंतच पण केवळ सध्यां त्रयस्थपणें वागत असल्यामुळें डिरेक्टरांमध्यें बसत नाहीं; असें भासविलें होतें.

रा. गणपतराव लोथे यांची महत्त्वाकांक्षा

नागपुरास गणपतराव लोथे म्हणून एक रिटायर्ड ई. ए. सी. (डेप्युटी कलेक्टर) आहेत. हे बी. ए. बी. एल्. झालेले आहेत. यांनां मध्येंच इच्छा झाली कीं ज्ञानकोशाचे म्यानेजर आपण व्हावें. आणि हे देखील माझ्याविरुद्ध चळवळींत होते. आणि तहकूब सभा पुण्यास बोलावली तेव्हां यांनीं मला एक संतापून पत्र लिहिलें होतें. मी जेव्हां नागपुरास गेलों होतों तेव्हां कांहीं मंडळींनीं म्यानेजर आणि एडीटर या कामाची विभागणी केली तर कसें होईल म्हणून विचारलें; तेव्हां मी सांगितलें कीं म्यानेजरचें काम करण्याला मनुष्य लायक मिळेल तर तो हवा आहे. आणि त्याच्यायोगानें मला स्वास्थ्य चांगलेंच मिळेल. असें जेव्हां मी सांगितलें तेव्हां त्यांनीं लोथ्यांचें नांव सुचविलें. तेव्हां लोथ्यांच्या पत्रामागें आणखी कांहीं आहे असें वाटलें. आणि पुढें फेब्रुवारीमध्यें सभा भरली त्या सभेला सर्वांनीं यावें म्हणून लोथे यांचीं छापील कार्डेहि गेलीं होतीं. ग. लोथे यांनीं ज्ञानकोशाचे म्यानेजर व्हावें हें मला मुळींच पसंत नव्हतें; व यांचें कारण शिव्यांचें पत्र नव्हतें. कारण मनुष्य लायक असता तर शिव्यांचें पत्र मी मुळींच विसरून गेलों असतों. पण म्यानेजरचें काम यांच्याकडून होईल हें शक्य नव्हतें. व ज्या कामास जो मनुष्य लायक नाहीं तो अधिकारावर येऊन बसला तर त्यापासून उपद्रव मात्र जास्त होतो. लोथे हे नापसंत असण्याचें

मुख्य कारण म्यानेजरचें काम करावयास जी तडफ लागते तिचा त्यांच्यांत अभाव होय. म्यानेजरचें काम म्हणजे पुष्कळ लोकांची अशी समजूत आहे कीं दुसऱ्याच्या कामाकडे लक्ष ठेवणें आणि त्यास काम नीट करीत जा म्हणून सांगणें, मिनिटबुकें बरोबर लिहिलीं गेलीं आहेत किंवा नाहीं वगैरे पहाणें इत्यादि. पण म्यानेजरचें काम त्याहूनहि निराळें आहे. तें काम म्हटलें म्हणजे पैसा मिळवणें हें होय. मग तो पैसा ते स्वतः जाऊन मिळवोत किंवा एजंटांमार्फत मिळवोत. तथापि ही कामाची जाणीव ज्याला नाहीं असला मनुष्य काय कामाचा ? त्यांतल्यात्यांत रा. लोथे यांच्यापाशीं धडाडी मुळींच नव्हती. त्यांना कांहीं मित्र होते त्यांनीं पुनर्विवाह केला असल्यामुळें "सात पुनर्विवाहांच्या धनतोलींत" त्यांच्यातर्फे मत द्यावयासहि कांहीं माणसें मिळालीं असतीं. पण त्यांनां पैसे मिळविण्याचा कांहीं एक अनुभव नव्हता. मीटिंगच्या दिवशीं कांहीं मंडळींनीं रा. लोथे यांचें नांवहि सुचविलें पण मी त्याकडे दुर्लक्षच केलें.

सभेच्या दिवसाची सकाळ

त्या सकाळीं प्रत्येक बाजूला प्राक्झी किती मिळाल्या आहेत त्याची मोजदाद झाली. माधवराव पाध्ये यांस शंभराच्यावर प्राक्झी मिळाल्या होत्या. त्यामुळें ते जोरांत होते आणि आपण जिंकूं असें त्यांस वाटत होतें. पण ती आशा व्यर्थ ठरली. कारण त्यांनां फक्त पैशाचा भरणा करण्याचें चुकवूं इच्छिणाऱ्या मंडळींनीं प्राक्झी दिल्या होत्या. ज्या लोकांनीं हप्ते भरले नाहींत म्हणून मी त्यांस तुमचे पैसे कोर्टा-मार्फत वसूल करावे लागतील अशा अर्थाचीं पत्रें पाठविलीं होतीं त्या लोकांनीं माझ्याविरुद्ध चळवळ करणाऱ्या पाध्यांस प्राक्झी दिल्या. पण त्या प्राक्झी निरुपयोगी ठरल्या. कारण ज्यांनीं पैसे भरले नसतील त्यांस मत नसतें. रा. पाध्ये यांच्यापाशीं १०४ पैकीं कायत्या ३२ प्राक्झी शिल्लक राहिल्या. आणि त्यांपैकीं दहा प्राक्झी भंडाऱ्याच्या (रा. जकात-दार यांच्या वजनानें मिळालेल्या) होत्या. त्या दिवशीं एकंदर हिशोब होतां मला ४५ प्राक्झी जास्त होत्या असें दिसून आलें. शिवाय मी कांहीं प्राक्झी अध्यक्ष खरे यांच्या नांवानें मिळविल्या होत्या त्या सुमारें वीस होत्या. रा. पाध्ये यांनां माझ्याविरुद्ध यश पावण्याचा बिलकुल

संभव नव्हता. तेव्हां रा. जकातदार म्हणाले कीं, कांहीं तडजोड करतां येणार नाहीं काय ? मी त्यांस म्हटलें कीं तडजोडीची गोष्ट कशाला करता ? तुम्हाला काय पाहिजे आहे तें सांगा, तें कबूल करण्यासारखें असेल तर तें मी आनंदानें करीन.

प्राक्झीची तपासणी डॉ. खेर व रा. कठाळे यांनीं केली. त्यावेळस प्राक्झीचे तपासणीस रा. पाध्ये व मी शिवाय रा. तांबे, रा. ग. ना. टिळक रा. जकातदार, कै. कार्णिक रिटायर्ड पोलीस इन्स्पेक्टर इत्यादि मंडळी होती. त्यावेळीं कांहीं प्राक्झी खऱ्या धरण्यासाठीं ज्या प्राक्झींवर तिकिट नसेल त्यांनां मागाहून तिकिट लावून खऱ्या धरतां येतील असा शास्त्रार्थ रा. कठाळे यांनीं सांगितला. त्यामुळें पाध्यांच्या कांहीं प्राक्झी खऱ्या झाल्या. नाहीं तर त्या याहूनहि कमी भरल्या असत्या.

दुपारीं आजच्या सभेंत बरीच मौज होणार म्हणून अडतीस मंडळी सभेला आली होती. इतकी मंडळी ज्ञानकोशाच्या वार्षिक सभेस कधींच जमली नव्हती. सभेच्या अगोदर रा. जकातदार आले आणि म्हणाले कीं,"आमच्या म्हणण्याला आपण कांहींच मान देत नाहीं काय?"त्यांची भाषा याप्रमाणें जेव्हां निराळी आली तेव्हां मी त्यांस म्हटलें कीं,"तुमची काय इच्छा आहे?"ते म्हणाले"रा.पाध्ये यांनीं डिरेक्टर व्हावें."मी म्हटलें कबूल! जादा चालक म्हणून त्यांचा स्वीकार करावयाला कोणतीच हरकत नाहीं." ते म्हणाले कीं,"त्यांनीं कायम चालक व्हावें." मी म्हटलें कीं,कायद्यानें तसें कसें करतां येईल.ते म्हणाले"कायद्याचें आम्ही पाहून घेऊं, तुमची कांहीं हरकत नाहीं ना?"तेव्हां मी म्हटलें "माझी हरकत नाहीं."तेव्हां ते म्हणाले कीं,"तुम्हाला सर्व अधिकार कशासाठीं पाहिजेत" मी म्हटलें "मला कोणतेच अधिकार नकोत, तुम्हाला दुसरा एडिटर पाहिजे आहे काय?तसा नेमा;माझी हरकत नाहीं."तेव्हां ते म्हणाले कीं, "एडिटर तुम्हीच रहावें पण म्यानेजर तुम्ही कशास रहावयास पाहिजे?" तेव्हां मीं म्हटलें कीं, "म्यानेजरचें काम जास्त कठिण आहे,जर लायक मनुष्य मिळाला तर म्यानेजरचें काम सोडावयास भी एका पायावर तयार आहे पण लायक मनुष्य आणा." इतक्यांत कोणी लेाथ्यांचें नांव सुचविलें. तेव्हां मी लायक म्यानेजर आणा हें वाक्य पुन्हां उच्चारलें आणि लायक शब्दावर जोर दिला. तेव्हां रा. जकातदार म्हणाले कीं,

"तुम्हांस आपल्या शेअरहोल्डरांत कोणी लायक मनुष्य दिसतो काय?" मी त्यांस उत्तर दिलें कीं "तुम्हीच लायक दिसतां, तुम्ही हें काम पत्करतां काय?" तेव्हां जकातदारांनीं हें काम पत्करतों म्हणून सांगितलें.तेव्हां मी त्यास म्हटलें. कीं"तुम्हीं पत्करीत असल्यास मी आनंदानें देतों." मग पुढें त्यानीं "बिझिनेस ऑफीस नागपूरला ठेवावयास आपण तयार आहां काय?"म्हणून विचारलें तेव्हां मी म्हटलें कीं"काम तुमचें आहे. तुम्हाला वाटेल तेथें ऑफीस घ्या" तेव्हां बिझिनेस ऑफीस नागपूरला असावें याला मी संमति दिली. मग जकातदार म्हणाले कीं "आतां एक प्रश्न मिसेस केतकर यांच्या भाड्याचाच आहे तर तेंहि सोडावें म्हणजे आम्हाला आनंद होईल."तेव्हां मी ती गोष्ट कबूल केली. मी त्यांनां म्हटलें कीं" जर तुम्ही प्राक्टिस सोडून ज्ञानकोशाच्या म्यानेजरचें काम करावयास तयार आहांत तर मी साताठशें रुपयांचें नुकसान सोसावयास तयार आहें."

पुढें या सर्व गोष्टी सभेंत ठरल्या. मिसेस केतकर यांचें भाडें पुन्हां परत घेणें ही गोष्ट कंपनीच्या इभ्रतीला मुळीच शोभण्यासारखी नाहीं म्हणून डॉ. चोळकर यांनीं हरकत घेतली पण पुढें तीं हरकत डॉ. केतकर यांची संमति आहे तर आपण हरकत घेऊं नये असें सांगितल्यावरून त्यानीं आपली हरकत परत घेतली. तथापि रा. रा. गोविंदराव बिवलकर व माधवराव प्रधान यांनीं आपली हरकत व्यक्त केली तेव्हां तेवढी गोष्ट बहुमतानें पास झाली व इतर ठराव एक मतानें पास झाले.

जनरल मीटिंग आटपली पण तेवढयानें भानगड संपली नाहीं. माधवराव पाध्ये यांची नेमणूक गैरकायदा होती. व रा. जकातदार हे काम करण्यास मुळींच तयार नव्हते. कामाची प्रथम ओळख होण्यासाठीं त्यांनीं कांहीं दिवस काम शिकलें पाहिजे हें त्यांस सांगितलें होतें व त्यांस तें मान्यहि होतें. ही वेळ वकीलांनीं वकीली सोडावी या तत्त्वाच्या पुरस्काराची होती. व रा. जकातदार हे देखील आपण वकीली सोडून कामाला येतों म्हणून बोलत होते. रा. जकातदार यांस आपण डॉ. केतकर यांस आपलें म्हणणें कबूल करावयास लावलें म्हणून आनंद वाटत होता तर रा. जकातदार यांच्यासारख्या मनुष्याला मी पकडलें म्हणून मला आनंद वाटत होता. रा. जकातदार हे धडाडीचे गृहस्थ म्हणून मी त्यांस ओळखीत होतों. आणि त्यांस मी ५०० रुपये

पगार करावा म्हणून इतर डिरेक्टरांशीं बोलणें केलें. मी म्हटलें कीं "आम्हाला दोन लाख रुपये अजून मिळवावयाचे आहेत. ते मिळविण्यासाठीं ५०० रुपये महिना पगार अगदीं आनंदानें पुढें मांडला. आणि पुढें मी त्यांस सांगितलें कीं आतां मला ज्ञानकोशमंडळाचे चेअरमन व्हावयास हरकत नाहीं. तुम्ही माझ्या हाताखालीं काम करावें, तथापि रा. जकातदार यांनीं वकीली सोडली नाहीं. ते पुण्यास काम समजून घेण्याकरतां आलेच नाहींत. एवढेच नव्हे तर नागपूरच्या ऑफीसमध्यें देखील ते आले नाहींत. रा. जकातदार यांचा गंभीरपणानें काम करण्याचा उद्देश नव्हता असें दिसून आलें.

या सभेच्या योगानें माझें वैगुण्य मला कळून आलें आणि तें म्हटलें म्हणजे मी एकदां दुसऱ्या पक्षाचें म्हणणें कबूल करावयास लागलों म्हणजे त्यांच्या अपेक्षेच्या बाहेर मी कबूल करतों. मिसेस केतकर यांचा येण्याचा खर्च मी परत द्यावयाचें जें कबूल केलें त्याच्या योगानें रा. फडके, डॉ. खरे व रा. कठाळे हे नाखूष झाले. रा. कठाळे म्हणाले कीं या योगानें आम्ही मंजुरी दिली ही गोष्ट चुकीची ठरते. तर मी हें मुळींच करावयाचें नव्हतें. कांहीं लोकांस या सर्व गोष्टी ठाऊक नव्हत्या. ते म्हणाले कीं पहा, डॉ. केतकर कंपनीचा पैसा खासगी कामाकरतां लावतात कीं नाहींत आणि तो पुढें त्यांनां सोडावा लागला कीं नाहीं. म्हणजे आपला पक्ष खरा असतां दुसऱ्यांच्या मागण्या कबूल करण्यानें आपणच उलट संशयास पात्र कसें होतों हें कळून आलें.

या सभेंत माधवराव पाध्यांस मिळालेली डायरेक्टररची जागा फार दिवस टिकली नाहीं. जर त्यांनीं कंपनीच्या हिताची वृत्त इतःपर ठेवली असती तर त्यास कांहीं आणखी दिवस डिरेक्टर रहातां आलें असतें पण त्यांनीं अशी वृत्ति दाखविली कीं मी व फडके जेव्हां नागपुरास असूं तेव्हां सभाच होऊं देऊं नये, व आम्ही नसलों म्हणजे त्यांनीं व कठाळ्यांनीं मिळून वाटेल ते ठराव करावेत. ही त्यांची वृत्ति दिसून आली तेव्हां रा. पाध्ये यांस काढून टाकणें प्राप्त झालें.

माधवराव पाध्ये यांच्याविरुद्ध कांहीं करतां आलें तर करावें म्हणून एक गृहस्थ संधि पहात होते आणि ते म्हटले म्हणजे माझे आतेभाऊ रा. रा. दिवाकर यशवंत फाटक, एन्जीनीअर हे होत. यांचे मित्र रा. पानवलकर म्हणून होते. त्यांनीं आनेस्टी आणि कंपनी म्हणून गिरगांवांत

चालविली आहे. एकदां आनेस्टी कंपनीच्या व्यवहारांत कांहीं दस्त-ऐवज करून आपणांस फसविलें म्हणून रा. पानवलकर यांचा राग रा. पाध्यांवर होता आणि रा. दिवाकरपंत हे रा. पानवलकर यांचे त्यावेळेस जिवश्च कंठश्च मित्र असल्यामुळें रा. पानवलकर यांस झालेला अपाय तो आपणांसच झालेला आहे असें ते मानीत होते. आणि त्यामुळें रा. पाध्ये यांच्याविरुद्ध कांहीं करतां आलें तर तें करावें असें त्यांस वाटे. तेव्हां पाध्ये यांची निवडणूक बेकायदेशीर आहे अशी तक्रार माझ्याकडे करण्यास मीं त्यांस सांगितलें आणि त्यांनीं त्याप्रमाणें तक्रारहि केली अर्थात त्या तक्रारीबरोबर हिशोबखातें पुण्यास न्यावें इत्यादि तक्रारी त्यांनीं केल्या व एक वाव खेरीज करून व्यालेन्सशीट पास करणें गैर आहे इत्यादि प्रश्न त्यांनीं उपस्थित केले. तेव्हां मी त्यांची तक्रार कायदे-शीर आणि न्याय्य आहे म्हणून ती मान्य केली. आणि जनरल मीटिं-गचे ठरावच गैरकायदा आहेत असें धरून रा. माधवराव पाध्ये यांस डिरेक्टरच्या पदावरून पुन्हां काढून टाकलें. शेअरहोल्डरांच्या सभेंत जर कांहीं गैरकायदा झालें तर त्याला बजावणी न देणें हें काम म्यानेजिंग डिरेक्टरचेंच आहे आणि यामुळें रा. पाध्ये यांच्या प्रश्नावर पहिला निकाल देण्यासाठीं न्यायाधीश मीच होतों. व तो आपला निकाल रजि-स्ट्रारकडे पाठविला. व यानंतर रा. जकातदार हे देखील म्यानेजरच्या जागेवर नसून मीच आहें हे देखील रजिस्टारला कळविलें. रा. कठाळे यावेळेस पाध्यांच्या तर्फेचे झाले होते व नागपूरची एकदोन उपद्व्यापी मंडळी माझ्याविरुद्ध त्यावेळेस बोलत होती त्यामुळें त्यांनीं माझा निकाल हा गैरकायदेशीर आहे वगैरे बोलणें करण्यास सुरवात केली पण त्याचा परिणाम कांहीं झाला नाहीं. पुढें जी डिरेक्टरांची सभा झाली तीस रा. पाध्ये यांस आमंत्रण केले नाहीं तथापि पाध्ये हे कठाळे व खरे यांच्या निमंत्रणावरून आले होते पण त्यावेळेस कोरम नसल्या-मुळें कांहींच करतां आलें नाहीं. पुढें जेव्हां डिरेक्टरांची सभा भरली तीस मी व रा. फडके असे दोघेहि गेलों आणि इतःपर कंपनीच्या साधारण आणि असाधारण सभा पुण्यास भरवाव्यात असा ठराव पास करून आलों. असा ठराव करण्याचें कारण असें होतें कीं, कंपनीस पैशाची नड होती आणि पैसा पुण्याच्या लोकांच्या वैयक्तिक सिक्युरिटी-वर देण्यास पूना ब्यांक तयार होती. तर जे लोक जामीन रहाणार

त्यांस कंपनीच्या कारभाराकडे लक्ष ठेवण्याची संधि देण्यासाठीं कंपनींच्या सभा पुण्यास होणें व पुण्याचे डिरेक्टर असणें हें अवश्य होतें. ही गोष्ट डॉ. खरे यांस पटली पण रा. कठाळे यांस पटली नाहीं. तेव्हां रा. फडके व मी पुण्यास सभा भराव्यात या मताचे होतों त्यामुळें अध्यक्षांनीं आपलें मत न देतां ठराव पास झाला.

१९२१ सालीं सप्टेंबरमध्यें जी शेअर होल्डरांची बैठक झाली तींत ज्ञानकोशाच्या व्यवस्थेसंबंधाचे कांहीं महत्त्वाचे ठराव झाले. त्या सभेंत असें ठरलें कीं जी मंडळी ज्ञानकोशाच्यासाठीं जें कर्ज उभारावें लागलें तें उभारण्यासाठीं २००० रुपयांपर्यंत जामीन रहातील किंवा स्वतःच ती रकम कर्जाऊ देतील अशा मंडळींसच डिरेक्टर निवडण्यांत यावें. डॉ. केतकर हे स्वतः वैयक्तिकरीत्या जबाबदार असल्यामुळें त्यांच्या अधिकारांमध्यें ढवळाढवळ डायरेक्टरनीं करूं नये व कर्ज उभारण्यासाठीं कंपनीचा छापील माल हा केतकर यांनीं तारण म्हणून देण्यास हरकत नाहीं. या ठरावामुळें सर्व सत्ता कायदेशीर रीतीनें एका व्यक्तीच्या ठायीं निश्चित झाली आणि तीमुळें ज्ञानकोशाच्या कामामध्यें डायरेक्टरांच्या विरुद्धतेमुळें जें नुकसान होत होतें तें मिटलें. यानंतर माझे व डायरेक्टरांचे लढे उत्पन्न झाले नाहींत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. डायरेक्टरांचें वजन कमी झालें असें मात्र म्हणतां येणार नाहीं. या वेळच्या निवडणुकींत रा. रा. लक्ष्मणराव फाटक व कै. शांताराम विश्वनाथ दांडेकर हे डिरेक्टर निवडले गेले. ही निवडणूक झाल्यानंतर रा. फाटक हें पूना ब्यांकेमध्यें २००० रुपयासाठीं जामीन न रहातां स्वतःच २००० रुपये देते झाले, व रा. दांडेकर, अच्युतराव भट व रा. धोंडोपंत ऊर्फ लोखंडवाले साठे हे २००० साठीं जामीन राहिले. रा. दांडेकर यांचे डिरेक्टरपण त्यांच्या मृत्यूपर्यंत राहिलें आणि त्यांच्या मृत्युनंतर रा. अच्युतराव भट हे डिरेक्टर झाले. ज्ञानकोशमंडळाचें काम या सभेनंतर स्वतंत्रपणें चाललें होतें व डिरेक्टरांचा उपयोग शेअर मंजूर करणें शेअर जप्त करणें यासारख्या गोष्टी पुरताच होता तरी रा. भट हे डिरेक्टर झाल्यानंतर त्यांचा उपयोग जास्त होई. या सभेंतच मिसेस केतकर यांचें भाडें कंपनीनें परत करावें असा ठराव झाला. व माधवराव पाध्ये यांस डिरेक्टर मधून काढून लावण्याच्या कृतीस कंपनीनें आपली संमति व्यक्त केली.

मिसेस केतकर यांनीं येण्याचें भाडें जर कंपनीनें मंजूर केलें होतें तर तें परत देण्याचें तरी कारण काय आणि परत दिल्यानंतर तें पुन्हां मंजूर कां करून घेतलें हा प्रश्न कित्येक जणांनीं विचारला व मीत्यांस उत्तरहि दिलें तें येणेंप्रमाणें होतें:—रा. विष्णुपंत जकातदार यांनीं तें भाडें परत द्यावें अशी इच्छा व्यक्त केली होती आणि ते तर म्यानेजर म्हणून कामाला येणार होते तर त्यांनां जो स्वार्थत्याग करावा लागेल त्यापुढें आपला साताठशें रुपयांचा प्रश्न कांहींच नाहीं असें मनाला वाटलें. रा. विष्णुपंत जकातदार म्यानेजर होणार म्हणून मीं मनांतल्या मनांत खुष होऊन गेलों होतों. आणि मला म्यानेजर म्हणजे फक्त क्यानव्हासिंगचें काम करतां येईल असें ते बोललेहि होते. आणि मला यासाठींच एक वजनदार मनुष्य पाहिजे होता. विष्णुपंत जकातदार हे एक वजनदार वकील, त्याप्रमाणेंच एक धडाडीचे गृहस्थ म्हणून मला माहीत होते व त्यांनीं खरोखर म्यानेजरचें काम पत्करल्याप्रमाणें खरोखरच केलें असतें म्हणजे मला फार आनंद झाला असता. ते त्या वेळेस महात्मा गांधींची फार तारीफ करीत होते व वकीली सोडून देण्याच्या गोष्टीहि बोलत होते. पण जेव्हां रा. विष्णुपंत जकातदार यांनीं मात्र वकीली सोडली नाहीं व कामावर रुजू झाले नाहींत तेव्हां आपणहि विनाकारण आपलें नुकसान कां करून घ्यावें म्हणून अगोदर कंपनीस दिलेली दक्षणा मी परत घेतली.

येथें कोणी असा प्रश्न विचारील कीं मिस् कोहन (मिसेस केतकर) यांचें भाडें कंपनीनें मंजूर केलें पण यांत खरोखर तुम्हीं आपल्या बायकोचा येण्याचा खर्च कंपनीवर लादण्याची खटपट केली नाहीं काय ? त्या प्रश्नाला उत्तर देणें म्हणजे आमची खासगी सर्व कथा सांगणें आहे. पण ती सांगणें अवश्य आहे म्हणून ती येथें स्पष्ट सांगतों. मिस् कोहन यांचीं आणि माझी लंडनला ओळख झाली आणि तीं देखील मी इंग्लंड सोडण्याच्या अगोदर कांहीं महिने झालीं. त्यावेळेस लंडन येथें कांहीं इंग्रज मंडळींनीं "दि नोबर्डीज क्लब" म्हणून एक क्लब स्थापन केला होता. त्या क्लबाचे मि. कोहन आणि त्यांच्या दोघी मुली सदस्य झाली. मी त्या क्लबाच्या दोन सेक्रेटरींपैकीं एक होतों. त्यावेळेस आम्हां दोघांचा चांगला परिचय झाला. मी लंडन सोडलें त्यावेळेस आमचें लग्नासंबंधानें कांहीं बोलणें झालें

नाहीं. एवढेंच नव्हें तर एकमेकांचीं अंतःकरणें एकमेकांस पुरीं कळलीं देखील नाहींत. मी इंग्लंड सोडतेप्रसंगीं मिस कोहन यांस माझ्या वियोगामुळें दुःख होत आहे असें मला दिसून आलें. पुढें आमचा पत्रव्यवहारहि झाला, तथापि निश्चित कांहीं ठरलें नाहीं. एकमेकांचीं अंतःकरणें मात्र एकमेकांस स्पष्ट झालीं. तथापि लग्न करावें कीं करूं नयें याविषयीं नक्की कांहींच ठरलें नाहीं. मला असें वाटे कीं यूरोपियन बाई हिंदुस्थानांत आल्यानंतर आणि इंग्रज लोक हिंदुस्थानी लोकांस कसे वागवितात हे दृष्टीस पडल्यानंतर तिची बुद्धि कशी होईल याचा नेम सांगतां येत नाहीं. व आपल्यालाहि जो त्रास होईल त्यामुळें आपली बुध्दि तरी काय होईल याचाहि नेम सांगतां येत नाहीं. तर अशा वेळेस आपण कांहीं एक कायम करूं नये हेंच बरें. मि. कोहन यांनीं कै. बाळ गंगाधर टिळक यांचाहि या बाबतींत सल्ला घेतला होता. तेव्हां त्यांनीं तत्त्वदृष्ट्या असल्या मिश्र विवाहास अनुकूल असेंच मत दिलें. तथापि डॉक्टर केतकर हा श्रीमान मनुष्य नाहीं, त्याला आपल्या लेखणीच्या जोरावर आपली उपजीविका करावी लागणार आहे इत्यादि गोष्टी मिस् कोहन यांस सांगितल्या. एवंच कायमचा निश्चय हिंदुस्थानास आल्यानंतर व्हावयाचा होता.

येथें हें मात्र सांगितलें पाहिजे कीं नागपूरच्या कांहीं शेअरहोल्डरांनीं गडबड करण्यांत भाग घेतला तो आमचें पूर्वीचें लग्नाचें ठरलें असून मागाहून लग्न ठरविलें हें केवळ नाटक आहे अशा समजुतीनें घेतला असावा. पुण्यांत देखील मिस् कोहन आल्यानंतर या केतकरांच्या भावी पत्नी आहेत अशी समजूत आमचें दोघांचें ठरण्याच्या अगोदरच पुण्यांतील स्त्रीपुरुषांत झाली होती. असो.

निरूढ व्रात्यस्तोम

हिंदुस्थानांत मिस् कोहन आल्यानंतर कांहीं महिने गेल्यानंतर आमचा लग्न करण्याचा निश्चय झाला. व्रात्यस्तोमविधि २१ मार्चला झाल्यानंतर तो निश्चय आमच्या श्वशुरांनां कळविण्यांत आला. जर लग्नाचें अगोदर ठरलें असतें तर परत जाण्याचें भाडें अगोदर मंजूर करून घेण्याचें कारणच नव्हतें. आमचें लग्न १४ मे १९२०रोजीं झालें. लग्नाच्या अगोदर व्रात्यस्तोम झाला. त्या व्रात्यस्तोमाच्या वेळेस आपण गृहपति व्हावें म्हणून मी लो. टिळकांनां विचारलें होतें पण ते म्हणाले

कीं, मला तुम्ही यांत अडकवू नका. व्रात्यस्तोमाला कोणी आक्षेप घेतला तर मी त्याचें समर्थन करीन. पण असा आक्षेप कोणी घेतलाच नाही. कै. रामशास्त्री आखवे यांनीं त्यावर श्रौतविषयाचा अभ्यास करून व्याख्यान दिलें पण त्यांत त्यांनीं बहुतेक आक्षेप विधींतील चुकांच्या स्वरूपाचे काढले. त्या व्याख्यानाला मीं हजर नव्हतों पण कांही श्रोत्यां-कडून असें कळलें कीं, रामशास्त्री आखव्यांनां एकानें उत्तर दिलें कीं, व्रात्यस्तोमांत चुकाच झाल्या ना! पुढच्या व्रात्यस्तोमाच्या प्रसंगीं तुम्हांला निमंत्रण करूं! असें म्हटल्याबरोबर श्रोत्यांत हंशा पिकला. कै. रामशास्त्री आखवे यांनीं जो मुख्य आक्षेप घेतला होता तो हा कीं, "व्रात्यस्तोमाचा विधि आम्ही जशाचे तसाच घेतला नाहीं, तो सोमयागापासून निराळा केला आहे." याला आमचें उत्तर असें आहे कीं तांडय ब्राह्मणाच्या अगोदरच्या कालांत व्रात्यस्तोम हा सोमयागाला मुळींच जोडला नव्हता. हा अथर्व्यांचा विधि होता आणि जेव्हां मोठाले याग तयार झाले नव्हते तेव्हां देखील व्रात्यस्तोम होता. आणि तो विधि एकादे स्तोत्र म्हणण्याइतपत लहान होता. आज सोमयागासह व्रात्यस्तोम करण्यांत अर्थ नाहीं कारण व्रात्यस्तोमानंतर ज्या समाजांत व्यक्ति प्रविष्ट होणार तो समाज याग करणार नाहीं. यासाठीं आम्ही मांडणी केली आहे कीं अथर्व्याच्या मताप्रमाणें आतिथ्य हाच याग समजणारा अर्वाचीन समाज आहे. आणि तें सांगणारें आतिथ्यस्तोत्र आम्ही व्रात्यस्तोमाच्या अगो-दर जोडलें आहे. या विधीचें आम्ही पुस्तकहि छापलें आहे.

माझ्या लग्नाच्या वेळेस झालेल्या दुसऱ्या कांहीं गोष्टी आतां येथेंच सांगून टाकतों. लग्नानंतर आम्ही "हनीमून" माथेरान येथें साजरा केला. आणि नंतर ८ जून रोजीं पुण्यास आलों.

जूनपासून पुढें कांहीं दिवस पुणें शहरातर्फे कौन्सिलसाठीं मी उमे-दवार उभा होतों या संबंधाची हकीकत परिशिष्टांत दिली आहे. मी यावेळेस उमेदवारी सोडली याचें कारण त्याच्या योगानें आपल्या अंगी-कृत कामास व्यत्यय कसा होईल याच्या कल्पना येऊन सोडली. व ज्ञानकोशाच्या हिताच्या दृष्टीनें ती सोडली हेंच चांगलें केलें असें वाटतें.

माझ्या लग्नाच्या दिवशीं आमच्या ऑफिसांत पण माझ्या गैरहजेरींत एक गोष्ट घडून आली ती म्हणजे समाजशास्त्रमंडळाची स्थापना होय. कै. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनीं येथें येऊन समाजशास्त्रमंडळ

म्हणून एक संस्था स्थापन केली होती. तींत रा. राजवाडे, स. मेहेंदळे, प्रो. पोतदार, रा. दाते, आहिताग्नि राजवाडे आणि मी इतकीच मंडळी होतो. या संस्थेच्या सदस्यत्वाची वर्गणी २५० रुपये ठेवली होती पण कै. राजवाडे यांनीं कांहीं निबंध संस्थेपुढें वाचले व माझ्या हिंदुस्थान व जग या विभागाचीं कांहीं प्रकरणें येथें वाचलीं पण दुसरे कोणीहि निबंध लिहून आणीना म्हणून ही संस्था मोडून टाकण्याचें ठरलें.

यात्त वेळचें आणखी एक अगोदर पत्करलेलें व नंतर टाकून दिलेलें कार्य म्हटलें म्हणजे "स्त्रीकर्मसदन" नांवाची एक संस्था होय. ही संस्था ब्राह्मण किंवा इतर मध्यम वर्गांतील विधवा स्त्रियांनां कांहीं उद्योग काढून द्यावा आणि जमाखर्चाची तोंडमिळवणी झाल्यास चालवावा या हेतूनें सौ. शीलवतीबाईंच्या व्यवस्थेखालीं चालविली होती. तींत शर्ट शिवण्याचें काम चाले. हें काम सुमारें ६ महिने चालून त्यांत सुमारें १२०० रुपयांचा चट्टा बसून पुढें बंद झालें. तथापि या कामामुळें मला कांहीं महत्त्वाच्या गोष्टी कळल्या आणि ते १२०० रुपये गेले याबद्दल मला आज मुळींच दुःख होत नाहीं. त्या कामामुळें जो अनुभव मिळाला त्या अनुभवामुळें ते गेलेले १२०० रुपये पुढें मागें वसूल होतील असा मला विश्वास वाटत आहे. या कामांत मला ज्या गोष्टीबद्दल जास्त दुःख झालें तें याबद्दल कीं जरी १२०० रुपये नुकसान झालें तरी स्त्रीकामकऱ्यांच्या वांटयास ६०० रुपये देखील आले नाहींत. माल तीन चार हजारांचा तयार झाला पण भाडें, कापड व जाहिरात यांनींच बरीचशी रक्कम खाल्ली.

या कामांत जी एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट कळली ती ही कीं, जेव्हां एखाद्या विशिष्ट वर्गाला काम देण्यासाठीं कारखाना काढावयाचा असेल तर जें काम काढावयाचें त्यांत मालाची किंमत ज्यांत फार कमी आहे व मजूरीची किंमत ज्यांत जास्त आहे अशा तऱ्हेचा तो उद्योग असावा. या दृष्टीनें छापखान्याचें काम श्रेष्ठ ठरतें, व कपडे करण्याचें काम कनिष्ठ ठरतें याविषयीं विद्यासेवकाच्या दुसऱ्या वर्षांत तीन लेख लिहिले आहेत. "मध्यमवर्गांतील स्त्रियांचा उद्योगांत प्रवेश" (अंक ३); "सामाजिक क्रांति व तिची तयारी" (अंक ४); "औद्योगिक दानसंस्था" (अंक ५); "दुर्बलांस उद्योग देऊन त्यांस स्वसंरक्षणास समर्थ कसे करावे या विषयावर मी जे इतरांचे लेख वाचले त्यांत

फोर्डच्या आत्मचरित्राचा उल्लेख केला पाहिजे. असो, हें विषयांतर सोडून ज्ञानकोशाकडेसच पुन्हां वळूं.

ज्ञानकोशाच्या इतिहासाचें कथासूत्र देतांना आतांपर्यंत संपादकीय, मुद्रकीय इ. बाबतींची माहिती थोडीच दिली आहे. याच्यापुढें ती सविस्तर देण्याचा उद्देश आहे. याचा अर्थ भांडणें व त्यांचें पुणें येथें वार्षिक सभा भरविण्यांत पर्यवसान हीं ज्या काळांत झालीं त्या काळांतलें संपादकीय काम कमी महत्त्वाचें होतें असें नाहीं. किंबहुना बहुतेक महत्त्वाचें संपादकीय काम याच्या अगोदरच झालें होतें. तथापि यापुढें चालक मंडळीचा किंवा बडतर्फी झालेल्या चालकांचा विरोध कंपनीस बाधला नाहीं. आणि त्यामुळें बुडत्या कार्यास तारतां आलें. रा. जकातदार ज्या काळामध्यें म्यानेजर म्हणून झाले होते, ज्या काळांत त्यांनीं ऑफीसांत पाऊलहि घातलें नाहीं त्या काळामध्यें जें कंपनीचें नुकसान झालें तें भरून काढण्याकडेच पुढील वर्षें गेलीं. मुद्रकांचें बेजबाबदार वर्तन आणि आमच्यामध्यें निश्चित सत्तेचा १ वर्ष पर्यंत अभाव यामुळें भरभराट असलेल्या कंपनीस फारच मोठा धक्का बसला. या धक्क्यामुळें कंपनी बुडाविण्याची वेळ आली होती. तथापि त्यावेळेस ती केवळ अविश्रांत श्रमामुळेंच वांचली. मुंबईच्या गिऱ्हाइकांनीं यावेळेस पैशाची मदत चांगली केली.

पुणें येथें ज्ञानकोशमंडळाच्या वार्षिक सभा झाल्या त्यांमध्यें तंटे उपस्थित झाले नाहींत. रा. रा. शांताराम विश्वनाथ दांडेकर हे कैलासवासी झाले तेव्हां नवीन डिरेक्टरांची निवडणूक व्हावयाची होती तेव्हां मात्र वार्षिक सभेस बरीच मंडळी जमली होती, आणि त्यावेळेस पुण्यांतील वाङ्मयसेवकांपैकीं एखादा कोणी तरी प्रमुख मनुष्य ज्ञानकोशमंडळाच्या चालकांत घालावा या इच्छेनें झालेल्या ७ जुलै १९२३च्या सभेला बरीच मंडळी जमली होती पण त्या सभेंत त्यांची ती इच्छा पूर्ण झाली नाहीं. एकशेअरवाला कोणीहि सभासद ज्ञानकोशाचा डिरेक्टर होऊं शकतो असें जरी कंपनीच्या नियमांत आहे तरी जे कंपनीच्या कर्जासाठीं जबाबदार आहेत किंवा कंपनीस मोठें कर्ज देणाऱ्या मंडळींत आहेत अशांपैकींच डिरेक्टर निवडावेत म्हणून धोरण २१ सालींच ठरलें असल्यामुळें येथील वाङ्मयसेवक म्हणून प्रसिद्ध असलेल्या व्यक्तींपैकीं डिरेक्टर न येतां पुस्तकांचा धंदा करणारे रा. अच्युतराव

भट हे डिरेक्टर म्हणून निवडून आले व त्यांचा ज्ञानकोशाला उपयोग झाला.

प्रकरण ६ वें.

मुद्रणाचा इतिहास

ज्ञानकोशाचें मुद्रण ही ज्ञानकोशाच्या इतिहासांतील धंद्याच्या दृष्टीनें महत्त्वाची उपकथा होय. छापणें म्हणजे केवळ यांत्रिक काम, तें पुरें करणें म्हणजे त्यांत कठीण काय आहे? अशी माझी कार्यारंभापूर्वी समजूत होती. आणि मुंबईची कांग्रेस आटपल्यानंतर मी पुण्यास येऊन उमरावती व नागपूरकडे जातांना मुंबईस उतरलों तेव्हां टाईम्स ऑफ इंडियाच्या मुद्रणशाखेच्या मुख्यास मी स्वतः विचारलें कीं ५०० पानांचा एक असे २० भाग १ वर्षांत काढूं शकाल काय? तेव्हां त्यांनीं "सहज" म्हणून उत्तर दिलें. तथापि पुढें एकदां जेव्हां त्यांच्याकडे एक भाग छापावयास अवयास गेलें होतों आणि १ भाग दीड महिन्यांत छापून द्या म्हणून म्हटलें तेव्हां त्यांनीं तें आमच्याकडून होणार नाहीं म्हणून नाकारलें. ज्ञानकोशाचा पहिला भाग निर्णयसागरकडे नोव्हेंबर १९१९ मध्यें गेला व त्याच महिन्यांत त्यांच्याकडे आगाऊ २५०० रुपये आम्ही नेऊन भरले. व पुढें थोडक्याच दिवसांनीं आणखी ५०० रुपये भरले तरी देखील निर्णयसागरनें ५०० पौंड टाइपावरच काम करावयास सुरुवात केली. निर्णयसागरनें ज्ञानकोशाचें काम छापावयास दिरंगाई लावून प्रथम गोत्यांत घातलें आणि नंतर आर्यभूषणनें गोत्यांत घातलें आणि आम्ही जेव्हां कंपोझिंगचें काम सुरू केलें तेव्हां आम्ही अडचणींतून बाहेर पडूं लागलों. सर्वांत गचाळपणें काम करणारा, दर बराच घेणारा आणि कामांत दिरंगाई करणारा छापखाना म्हटला म्हणजे आर्यभूषण होय. हा पुण्यांतला सर्वांत मोठा छापखाना आहे तथापि हा छापखाना आमचें काम बरोबर करूं शकला नाहीं आणि या छापखान्याच्या निष्काळजीपणामुळें ज्ञानकोशमंडळाचें सुमारें कमींत कमी दीड हजार रुपये नुकसान झालें आहे. या छापखान्यानें छापण्याची तयारी करण्यासाठीं आगाऊ ५०० रुपये १३।१२।२१ व २५।१।२२ रोजीं घेऊन निष्काळजीपणानें काम केलें आणि काम चालू असतां कामाकडे

दुर्लक्ष केलें असें सर्टिफिकिट दिल्या शिवाय रहावत नाहीं. याच वेळेस त्यांनां ५०० रुपये भरण्याऐवजीं स्वतःच ५०० रुपयांचा टाईप घेऊन कामास सुरवात केली असती तर ज्ञानकोशमंडळाचें एक वर्ष तरी वाचलें असतें.

१९२२ सालच्या सप्टंबर महिन्यांत आम्ही एक शेअरहोल्डरांकडे पत्रक पाठविलें होतें त्यांतील मुद्रणविषयक भाग येथें अवतारितों.

ग्रंथ छापून काढण्यासाठीं लागणारी खटपट

"सन १९१७ मध्यें योजना प्रसिद्ध केली तींत चार वर्षे ग्रंथरचना करावयासाठीं आणि एक वर्ष छापावयासाठीं असा हिशेब धरला होता; आणि त्याप्रमाणें १९१९ सालीं पहिला विभाग छापावयासहि दिला. पुस्तक निश्चयानें दोन किंवा तीन वर्षांत पार पाडण्याचें काम निर्णयसागर छापखान्यास घेववलें नाहीं. निर्णसागरकडून सुमारें दीड वर्षांत दोन भाग छापून निघाले. तिसरा भाग आर्यभूषणकडे १९२१ च्या आक्टोबर महिन्यांत छापावयास दिला. तो त्यांच्याकडेसच छापत आंहे. पंण त्यांच्याकडून फारसें जलद काम होत नाहीं असें पाहून १९२२ च्या एप्रिल महिन्यांत पाडव्याच्या मुहुर्तावर "ज्ञानकोश छापाखाना" म्हणून मंडळानें आपल्या मालकीचा छापखाना काढावयाचें ठरविलें. छापखाना रजिस्टर केला आहे. वस्तुतः छापखाना रजिस्टर केला नसून कंपोजशाखा तेवढी काढली आहे; व छपाईचें काम जगद्धितेच्छु छापखाना करतो. ज्ञानकोश छापखान्यांत ५ व्या भागाचे खिळे जुळून पुढें छापण्यांत येत आहेत. आतांपर्यंत (१५ आगस्ट १९२२) ३४ फार्मे म्हणजे २१६ पृष्ठें छापून झालीं आहेत. ज्ञानकोशाचा कार्यसमातीचा अंदाज चुकला यांत तो कोणत्या कारणामुळें प्रामुख्यानें चुकला असें विचारलें असतां असें उत्तर देतां येईल कीं, संपादकीय काम फारसें कमी झालें नाहीं. उलट बराचसा भाग वेळेच्या अगोदर तयार झाला होता. हा सबंध ग्रंथ एका वर्षांत छापून काढणें महाराष्ट्रांतील सर्वांत मोठमोठ्या छापखान्यांपैकीं बऱ्याच जणांस शक्य असेल असें चुकीनें धरलें होतें. पुष्कळ लोकांकडून वर्गणी वेळेवर येत नाहीं. ही गोष्ट विलंबाबद्दल बरीचशी जबाबदार आहे. वसूली करण्यासाठीं प्रयत्न करण्यांत आम्हीं कसूर करीत नाहीं ही गोष्ट प्रत्येकास परिचित असेलच.

धंद्यांत स्पर्धेबाहेर असलेल्या छापखान्याची आम्हांस आवश्यकता

आम्ही असें म्हणूं शकतों कीं, हा ग्रंथ २ वर्षांत छापून काढण्याचा ताकद महाराष्ट्रांतील कोणत्याहि मोठ्या पण धंद्याच्या स्पर्धेंत असलेल्या छापखान्यास नाहीं. आम्हांस लहानसा पण स्वतंत्र छापखाना काढूनच तें कार्य दोन–अडीच वर्षांत करणें शक्य आहे. मात्र दररोज दोन फार्म म्हणजे सोळा पृष्ठें छापून निघालीं पाहिजेत. आम्हांला हें शक्य आहे, असें विधान आम्ही करतों याचें कारण असें:–कंपाझिटरचा तुटवडा पडला म्हणजे कोणताहि चालू छापखाना निरनिराळ्या कंपाझिटरांनां स्वीकारलेल्या गिऱ्हाइकांचीं निरनिराळीं कामें वाटून देतो व तीं जेव्हां पार पडतील तेव्हां पट्टूं देतो. आपण छापखान्यास किफायतदार दर दिला म्हणजे आपलें काम जलद होईल असें नाहीं; छापखानदारास आपल्याच कामाकडे अधिक माणसें देतां येतील असें होत नाहीं. त्याची काम करणारास दर देण्याची व माणसें मिळविण्याची शक्ति नियमित असते. ती त्याजकडे ज्या दरानें जें इतर काम येईल त्यावर अवलंबून असते. शिवाय छापखानदारांस गिऱ्हाईकांकडून बराच किफायतीचा दर मिळाला म्हणजे कंत्राटी कामगारांत व छापखानदारांत तंटे सुरू होतात; आणि त्या तंटयांमुळें अधिक किफायतीचें काम मुळींच पडून राहतें. ज्ञानकोश छापणाऱ्या छापखान्यांत हा अनुभव आला. कंत्राटी कामगारांस चालू दरापेक्षां अधिक दर देणें आणि विशिष्ट कामासाठीं जास्त माणसें लावणें मोठ्या छापखान्यास शक्य नसतें. कारण कांहीं काम करण्यासाठीं जास्त पैसे देऊन माणसें लावलीं तर सर्वच माणसें अधिक पगार मागूं लागतात. तो छापखान्यास देणें शक्य नसतें. या कारणामुळें आम्हांस स्वत:चा छापखाना काढणें भाग झालें. आतां आम्हांस असें दिसतें कीं. सर्व ग्रथ छापून घेण्याची जबाबदारी आम्हांसच घेतली पाहिजे."

ज्यावेळेस वरील वाक्यें लिहिलीं तेव्हां असें वाटलें कीं स्पर्धा क्षेत्रांत विशिष्ट छापखाना आहे म्हणूनच तो छपाई वेळेवर करण्यास असमर्थ होत असेल. आतां मात्र माझें असें मत होऊं लागलें आहे कीं जेव्हां दोन यंत्रें असलेले छापखाने दररोज दोन फरमे देण्यास असमर्थ

होतात तेव्हां त्या असमर्थतेचें व्यवस्थापकाच्या नालायकीशिवाय दुसरें कारण नाहीं. गचाळ छापखानदार आपल्या कामाची दिरंगाई करून प्रकाशकास कसे भिकेस लावतात याचें उदाहरण ज्ञानकोश हें होय. ज्ञानकोश हें काम जर मध्येंच पडलें असतें तर तें संपादकाच्या नालायकीमुळें किंवा पैशाचा पुरवठा कमी पडल्यामुळें पडलें असतें असें नाहीं तर मुद्रकांच्या नालायकीमुळें अपुरें राहिलें असतें. प्रत्येक भाग छापून पुरा केव्हां झाला याचें कोष्टक येणेंप्रमाणें आहे:—

भाग	पहिली प्रत दिल्याची तारीख	भाग	पहिली प्रत दिल्याची तारीख
१	२– २–२१	११	१०–१२–२४
२	६– ३–२२	१२	१४– २–२५
३	२२– १–२४	१३	१– ४–२५
४	१९–१०–२३	१४	२३– ६–२५
५	१४– ५–२३	१५	७– ८–२५
६	९– ४–२४	१६	३०–१०–२५
७	११– ६–२४	१७	२३–१२–२५
८	२९– ७–२४	१८	३०– ३–२६
९	२८– ८–२४	१९	३– ७–२६
१०	१०–११–२४	२०	१७–११–२६
		२१	११– ४–२७

१९२२ जानेवारीपासूनं पुढचा ज्ञानकोशचा इतिहास एकसारखा प्रगतीचा आहे. या काळांत प्रथमतः ज्ञानकोशाच्या २ ऱ्या भागाच्या ज्या प्रती निर्णयसागरकडे अडकल्या होत्या त्या सोडवून आणण्यास सुरवात झाली. त्यांचें १० हजारांचें बिल होतें. तें दिलें नाहीं म्हणून त्यांनीं नमुन्याच्या १।२ प्रती देखील देण्याचें नाकारलें होतें. व पुढें ५ हजार रु. घेऊन कांहीं प्रती सोडविण्याचें नाकारलें. शेवटीं त्यांना आम्ही असें कळविलें कीं प्रती आम्हांस दिल्याशिवाय तुमचें बिल लागूच होत नाहीं. गिऱ्हाईकाचें नुकसान केल्याने छापखानदाराची भरभराट होत नाहीं. उलट त्यास मदत केल्यानेंच होते इत्यादि गोष्टी आम्ही सांगून पाहिल्या तरी त्याचा उपयोग कांहीं झाला नाहीं.

हें पत्र गेल्यानंतर निर्णयसागरनें थोडीशी हुषारी आरंभिली. आणि आमच्याकडून गेलेले सर्व पैसे नुसते हिशोबी जमा केले. व पहिल्या व्हॉल्यूमचें नवीन बिल करून पाठविलें व सॉलिसिटरमार्फत नोटीस पाठविली. ही सर्व लटपट अर्थात कोर्टांत कज्जा दाखल झाला असता तर बाहेर पडलीच असती. यासंबंधानें जेव्हां ज्ञानकोशाच्या प्रतिनिधीशीं व त्यांच्या सॉलिसिटर्सशीं आमचें बोलणें झालें तेव्हां सॉलिसिटरनीं त्यांना १९०० प्रती सोडावयास सल्ला दिला व त्यांनीं केलेल्या हिशोबाच्या फिरवाफिरवींत आमची संमति घेतली. त्यामुळें १९०० प्रती लोकांच्या-कडे पाठवून आम्हांस कांहीं पैसे वसूल करतां आले.

दुसरा भाग लवकर तयार झाला तरी गिऱ्हाईकांच्या हातीं तो उशीरा पडला याचें कारण हेंच होतें. निर्णयसागर छापखान्याची अनुदार वृत्ति अत्यंत अविचाराची होती हें सांगावयास नकोच!

एप्रिलमध्यें वर्षप्रतिपदेच्या दिवशीं आम्हीं ज्ञानकोश छापखाना ग्रथम काढला. प्रथम छापायचें यंत्र नसून केवळ कंपोझिंगचें खातें उघडलें.

ज्ञानकोशमंडळाच्या कारभारांत ग्रंथ तयार करणें, छापणें व विकणें या तिन्ही क्रिया एकत्वानें चालल्या होत्या आणि त्या एक कारभार म्हणून चालण्यावरच जें पुढें यश आलें तें अवलंबून आहे. पुस्तक छाप-ल्याबरोबर सात आठ दिवसांत बांधणी होऊन व्ही. पी. सुटत. हे कार-भार जेव्हां परक्या छापखानदारावर अवलंबून असत तेव्हां दुसरे छाप-खानदार आमचें काम बाजूला टाकून दुसरें काम घेण्याचा मोह त्यांना पडे, त्यामुळें ते कामास दिरंगाई लावीत. केवळ शंभर पुस्तकें बांधून यावयाचीं तीं देखील पुस्तक छापून झाल्यानंतर महिन्या दीड महिन्यानें हातीं यावयाचीं असा प्रकार होई. बांधणी सुद्धां वेळेवर होईना तेव्हां आम्हांला बांधणीखातें काढावें लागलें. जसजसा बांधणीवाले एकेक दिवस जास्त लावीत तसतसें आमचें नुकसान दररोज दीडशे रुपयांच्या-वर होई. ही गोष्ट आम्ही बांधणीवाल्याला, तशीच छापखानदाराला कितीदां जरी सांगितली तरी त्याला त्याची फिकीर काय? पुष्कळदां असें व्हावयाचें कीं, आम्ही पुस्तक छापून काढलें म्हणजे छापखाना-वाल्यानें लाविलेल्या दिरंगाईमुळें आमचे पैसे संपून जावयाचे आणि त्यामुळें त्यांनां पुन्हां आमचे पैसे कोठें आहेत ते आणा म्हणजे

पुस्तकें सोडतों एव्हीं सोडीत नाहीं असें छापखानदारास म्हणावयास सांपडे. आमचा मासिक खर्च २५०० आणि छापखानदारानें दीड महिन्याच्या ऐवजीं भाग छापावयास सहा महिने लावले म्हणजे दहा हजार रुपये गेलेच! आणि आपल्या नालायकीमुळें जरी प्रकाशक बुडाला तरी त्यांनां त्याचें काय?

निर्णयसागर छापखान्यानें जी बेपरवाईची वृत्ति दाखविली तिची हकीकत मागें दिलीच आहे. आर्यभूषणची कथा तशीच. त्यांनां २५० पानें छापावयास सुमारें दीड वर्ष लागलें. तिसरा भाग छापत असतां आम्ही कंटाळून स्वतःच खिळेजुळ्वीपुरता छापखाना काढला आणि त्यांत पांचवा भाग (पृ. ७००), चौथा भाग (पृ. ५७५) आणि तिसरा उत्तरार्ध (पृ. १४०) इतका छापून घेतला तेव्हां त्यांचें काम फक्त पृ. २४८ इतकें झाल होत. म्हणज आमच काम सव जनतच्या सहानुभूतान झाल पण मुद्रकवर्गाच्या सहानुभूतीचा अभाव असतां–किंबहुना त्याचें अविश्वसनीय वर्तन असतां–झालें. आमचें काम पार पाडण्यास महाराष्ट्राच्या मुद्रक वर्गास कोणतेंच श्रेय देतां येत नाहीं. कर्नाटक छापखान्यानें सहाव्या विभागाचीं पृष्ठें २३२ छापलीं पण तीं छापण्यास सुमारें चार महिने लागले. त्यावेळेस देखील मुद्रणाचा हुकूम द्यावयास कांहीं दिवस मी किंवा रा. दाते हे मुंबईत मुद्दाम हजर होतों.

येथें प्रश्न असा येईल कीं निर्णयसागर, आर्यभूषण, कर्नाटक, हे महाराष्ट्रांतले सर्वांत मोठाले छापखाने आहेत आणि हे सर्वच वाईट कसे? हाच प्रश्न माझ्याहि मनांत येतो आणि त्याचें उत्तर मी आज असें देतों कीं या सर्व मंडळीमध्यें काम करण्यास प्रत्यक्ष वेळ किती लागतो याचा मुळींच अजमास नाहीं. ज्याला प्रकाशकाचा धंदा करावयाचा आहे त्याला छापण्याचें काम दुसऱ्यावर टाकतां येणारच नाहीं.

प्रकाशकानें ज्या कांहीं गोष्टीं लक्षांत ठेवल्या पाहिजेत त्या येथें देतो–

(१) साधारणपणें कोणताहि कागदाचा व्यापारी साठ दिवसांपेक्षां जास्त दिवस रक्कम उधार ठेवूं शकत नाहीं. यासाठीं जें पुस्तक छापावयाचें त्याचें ४५ पासून ६० दिवसांच्या आंतच मुद्रण होऊन व बांधणी होऊन त्याच्या व्ही. पी. गिऱ्हाइकांकडे जाण्याची व्यवस्था झाली पाहिजे.

(२) बहुतेक छापखानदारांस आपलें काम किती दिवसांत होईल याचा मुळींच अंदाज नसतो, व दररोजचे दोन फरमे नियमानें जाव-याचा मुळींच अंदाज नसतो, व दररोजचे दोन फरमे नियमानें जाव-यास तयारी किती पाहिजे याचाहि अंदाज नसतो व यामुळें बरेच छाप-खानदार 'तुम्ही कापी मात्र वेळेवर पुरविली पाहिजे म्हणजे दिवसांतून दोन फरमे छापूं' असें अभिवचन देतात पण तें त्यांस खरोखर शक्यच नसतें.

(३) रोज दीड फरमा नियमानें जाण्यास कमींत कमी तयारी पुढील-प्रमाणें पाहिजे–

टाईप दहा फरम्याचा पाहिजे म्हणजे जर एका फरम्यास शंभर पौंड टाईप लागत असेल तर एक हजार पौंड तरी टाईप पाहिजे. कारण टाईपांचा फौंट येतो तो लोकांच्या गरजांप्रमाणें नसतो. उदाहरणार्थ फ्र, फ्ल हे टाईप फारच क्वचित लागतात व अशा अनेक जोडाक्षरांच्या टाईपांनीं केस भरलेली असते. आणि ९० पौंडांच्या केसींतील उपयोगास येणार टाईप २५ पौंडापलीकडे येत नाहीं.

प्रत्येक अक्षराचा टाईप किती असावा याची शास्त्रीय मोजदाद कोणी अजून करून त्याचें कोष्टक मांडलेलें प्रसिद्ध नाहीं. बहुतेक फाउंड-र्यांचे अजमास चुकलेले आहेत. पुष्कळशा फाउंड-र्या आपली आर्डर मोठी करण्यासाठीं कमी उपयोगाचा टाईप प्रमाणाबाहेर फौंटमध्यें घालतात. त्यामुळें पुष्कळ टाईप निरुपयोगीच रहातो. यामुळें जरी एका फरम्यां-तील टाईपाचें वजन शंभर पौंड असलें तरी तो टाईप उपयोगांत येण्यास २०० पौंडांच्या केसेस खरडून काढाव्या लागतात. २०० पौंड म्हणजे सुमारें चार केसेस होतात. केसीमध्यें असलेल्या एकंदर टैपापैकीं जो प्रत्यक्ष उपयोगांत येणारा टाईप असतो त्याचें प्रमाण वाढवीत नेणें ही गोष्ट परिश्रमानेंच साध्य होण्यासारखी आहे. पण त्या तऱ्हेचा संशोधक परिश्रम कोणी केला असेल असें वाटत नाहीं. शिवाय हें प्रमाण पुस्तक परत्वें बदलतें. एखाद्या वेळेस मनुष्य एखादा कोश छापूं लागला म्हणजे पहिल्याच फरम्यांत "अ" चा तुटवडा पडेल, "ऋषि" हा शब्द अनेक वेळ एकाच फरम्यांत आला म्हणजे "ऋ" हें अक्षर कमी पडेल. यासाठीं मोठें पुस्तक छापणारानें आपल्यापाशीं मुद्रांचें ओतकाम करणारी फाउं-डरी बाळगली पाहिजे किंवा जास्त टाईपच ठेवला पाहिजे. माझा अनुभव असा आहे कीं दीड फरमा रोज छापून निघावा अशी अपेक्षा

असल्यास सुमारें १५०० पौंड टाईप जय्यत ठेवावा लागतो एरव्हीं तें कार्य होत नाहीं. तो तसा ठेवावा लागतो याचीं कारणें म्हणजे त्याचा हिशोब येणेंप्रमाणें:—दीड फरमा रोज म्हणजे दोन दिवसांनीं तीन फरमे छापणें. ज्या दिवशीं जो फरमा छापावयाचा असेल त्याच्या आधल्या दिवशीं तो शेवटची तपासणी व शुद्धीकरण होऊन तयार रहावा लागतो. त्याच्या अगोदर ज्ञानकोश छापखान्यांत खालील तपासण्या होत असतात:— (१) पहिले कच्चे प्रूफ. (२) दुसरें प्रूफ. (३) यानंतर संपादकास कांहीं मजकूर घालावयास ते देण्यांत येत असे, व संपादकीय दुरुस्त्या होत त्यामुळें तिसरें प्रूफ काढावें लागे व त्यांत संपादकीय सर्व फेरफार आले आहेत कीं नाहीं हें पाहिलें जाई. (४) पेजप्रूफ. (५) पेज दुसरें प्रूफ. (६) मशीन प्रूफ. कधीं कधीं यांतील एक दोन प्रुफें गाळलीं जात असत. तथापि जो फरमा आज कंपोज होतो त्याच्या पुढले तीन फरमे छापखान्यांतच राहून पांचवा फरमा छापावयास जाई; हा धोपट नियम सांगतां येईल. नियमानें दीड फरमा छापला जावयास पांच फरमे टाईप गुंतवावा लागतो आणि त्याच्या निदान दुप्पट तरी टाईप केसींत रहातो. तथापि एवढयानेंच भागत नाहीं. कांहीं फरम्यांत खुणा किंवा विशिष्ट टाईप आणावयाचा झाला किंवा कोठें पुस्तक छापतांना संपादनखात्यास विधानाची चूक आढळून आली म्हणजे तो फरमा बाजूलाच पडतो. म्हणजे रोजचा दीड फरमा छापावयास सहा फरमे टाईप लागतो. याशिवाय केसींतला टाईप आणि प्रत्यक्ष उपयोगास येणारा टाईप, यांचें प्रमाण १०० शीं ५० असल्यास बारा फरम्यांचा म्हणजे १२०० पौंड टाईप लागतो. आर्यभूषण छापखान्यानें आमचें काम इतकें दिरंगाईनें केलें याचें कारण त्यांनीं ५०० पौंड टाइपांतच सर्व कामें उरकण्याचा विचार केला आणि त्यासाठीं लागणारी रक्कम ५०० रुपये तयारीसाठीं आमच्या पासूनच मागून घेतले होते. छापखानदार वचनभंग करतात याच कारण केवळ त्यांची लबाडी असते असें नाहीं तर त्यांच्यामध्यें फाजील आशावादीपणा असतो हें होय.

आमचा प्रकाशकांस अमा सल्ला आहे कीं, मुद्रकाच्या आशावादीपणाविषयी फार सावध रहावें.

प्रकरण ७ वें.

गिऱ्हाइकीची जुळवाजुळव

ज्ञानकोशाच्या यशाचीं जीं कारणें असतील त्यांत गिऱ्हाइकी चांगली जुळली हें एक महत्त्वाचें कारण आहे आणि या कार्याप्रीत्यर्थ जे काम झालें त्यांत गिऱ्हाईकी जुळवण्यांत जो वेळ किंवा मेहनत खर्च झाली तें अत्यंत-महत्त्वाचें होय.या बाबतींत बरीचशी मेहनत प्रत्यक्ष मलाच करावी लागली. मला असें वाटतें कीं, एकंदर झालेल्या गिऱ्हाइकामध्यें निम्यापासून दोनतृतीयांश गिऱ्हाइकें मीं स्वतःच जुळविलीं आहेत. गिऱ्हाईकी-झाली ती. कित्येकांच्या मतें अपेक्षेच्या बाहेर झाली तर कित्येकांच्या मतें या प्रयास आणखी गिऱ्हाइकी पाहिजे होती. माझी स्वतःची कल्पना अशी होती कीं कमींत कमी १००० गिऱ्हाइका होईल तर जास्तींत जास्ती ५००० होईल परंतु प्रत्यक्ष गिऱ्हाईकी या दोहोंच्यामध्यें झाली. ही तीन हजार गिऱ्हाईकी समाजाच्या गरजेमुळें झालीं काय तर हो असेंच उत्तर द्यावें लागतें. कित्येकांस असें वाटतें कीं, ज्ञानकोश ही सामाजिक गरज नसतां डॉ. कतकर यांच्या भिडेमुळें एवढी झाली. खरोखर वस्तुस्थिति अशी आहे कीं, ही गिऱ्हाईकी जी जुळली.ती ज्ञानकोश ही एक समाजाची गरज होती म्हणूनच जुळली. मी स्वतः जी मेहनत घेतली त्यामुळें कांहीं गिऱ्हाईकी मिळण्यास सापेंहि झालें असेल पण खरें कारण ती सामाजिक गरज होती हेंचहोय.

क्यानव्हासिंग ज्यांनीं चांगल्या तऱ्हेनें केलें अशा मंडळीमध्यें नागपूरचे रा. वासुदेवराव चितळे व रा. विष्णुबाबा अक्कलकोटकर यांचा अंतर्भाव करतां येईल. या दोघांनीं प्रत्येकी २५० च्या वर ग्राहक मिळवून दिले आहेत. मी नेहमीं असें म्हणतों कीं, एक चांगला क्यानव्हासर मिळवणें म्हणजे अनेक महाराज मिळवणें आहे. या दोघांनां ज्ञानकोशास ५० हजार रुपये मिळवून देण्याचें श्रेय आहे तर आमच्या दृष्टीनें हें मोठे कीं संस्थानिक मोठे!! ज्ञानकोशाच्या कार्याला राजेमहाराजे यांचा उपयोग फारसा झाला नाहीं, मध्यमवर्गाच्या सहानुभूतीचीच मदत जास्त झाली. राजे व संस्थानें यांची मदत येणेंप्रमाणें सांगतां येईल:बडोदें २० प्रती, इंदूर ३ प्रती, ग्वाल्हेर ३ प्रती, सांगली ५, जमखंडी ४, मिरज ३, औंध ३, मिरजमळा १, रामदुर्ग १, भोर १

फलटण १, जंत १, इंचलकरंजी ३, म्हणजे एकंदर पन्नासच्या आंत बाहेर प्रती यांनीं घेतल्या आहेत म्हणजे तीन हजारांत ९० म्हणजे शंभर रुपयांपैकीं दोंड पावणेदोन रुपयाची मदत या राजेरजवाड्यांकडून झाली आहे.

यावरून असें दिसून येतें कीं, ज्ञानकोशासारखीं आतां मोठालीं कामें व्हावयाचीं झाल्यास लोकाश्रयानेंच होतील. वाङ्मयविकास हा संस्थानिकांच्यावर मुळींच अवलंबून नाहीं. मी राजेरजवाड्यांकडे फारसा गेलेलों नाहीं. कारण त्यांच्यापासून होणाऱ्या फलप्राप्तीवर माझा विश्वासच नव्हता. सौ. शीलवतीबाई मात्र सांगली, जमखिंडी, मिरज,बुधगांव या ठिकाणीं गेल्या होत्या व त्यांच्या जाण्यापासून काय प्राप्ति झाली तिचा अंदाज वरच्या आंकडयांवरून करतां येईल.

ज्ञानकोशाच्या वर्गणीदारांच्या व शेअरहोल्डरांच्या यादीकडे लक्ष फेंकलें म्हणजे थोडीशी चमत्कृति उत्पन्न होते. कंपनी स्थापन होतानांच ज्यांचीं नांवें मेमोरांडम आणि आर्टिकल्सच्या कागदांवर घेतलीं गेलीं अशी मंडळी म्हटली म्हणजे (१) डॉ. केतकर, (२) रा. माधवराव पाध्ये वकील, (३) रा. ना. खं.फडके वकील,(४) डॉ. ना. भा. खरे,(५) रा. धुंडीराज ठेंगडी, (६) डॉ. ल. दा. गद्रे, (७) डॉ. चोळकर, (८) र . गोपाळराव ओगले (संपादक महाराष्ट्र), (९) रा. गो. चं. तांबें (१०) रा. भवाळकर वकील, (११) रा. नीलकंठराव उधोजी व (१२) डॉ. मुंजे ही होत, म्हणजे ४ डाक्टर, ५ वकील, १ एन्जीनिअर, १ वर्तमानपत्रकार आणि मी स्वतः याप्रमाणें होती. या मंडळीस कंपनीचे संस्थापक होण्याचें श्रेय मिळालें आहे. या मंडळीनंतरचे पहिले शेअरहोल्डर झालेले गृहस्थ म्हटले म्हणजे वामन वासुदेव चितळे वकील हें होत. यांनीं कांहीं दिवसांनीं आणखी शेअरहोल्डर मिळविण्याचें कामहि केलें आहे आणि त्यांच्या कामांतील यशस्वितेचा उल्लेख मागें (पृ. ३९ पहा) आलाच आहे. यांनीं पुस्तकविक्री आणि प्रकाशन याचा संथा प्रथम आमच्याकडेसच घेतली आणि नंतर पुढें आपले कायद्याचें "डायजेस्ट" काढलें.

ज्ञानकोशाची गिऱ्हाईकी दोन प्रकारें होई. मंडळी शेअरहोल्डर होत व वर्गणीदार होत. शेअरहोल्डर होणें ही गोष्ट पुष्कळ लोकांस आवडत असें कारण शेअर घेणें हें वर्गणीदार होण्यापेक्षां अधिक आवडे. शेअर

वेणें म्हणजे कंपनीच्या कारभारांत आपण असूं; याचेंहि महत्त्व कांहीं लेखकांनां असे. ज्ञानकोशाचे कंपनी संस्थापकांच्या बाहेरचे शेअरहोल्डर रा. चितळे पहिले होत. हे २५।६।१६ रोजीं शेअरसाठीं अर्जदार झाले तर आमचे पहिले ग्राहक कै. पांडुरंग प्रभाकर जोशी हे होत. हे कंपनीचे धंदा सुरू करण्याची परवानगी २४।३।१७ रोजीं मिळाल्यानंतर थोड-क्याच दिवसांनीं म्हणजे ३१।३।१७ रोजीं झाले. हे ज्ञानकोशाच्या कल्प-नेशीं अत्यंत सहानुभूति बाळगणारे होते. ज्ञानकोशाची कच्ची योजना मी प्रथम केली होती ती यांच्याच खोलींत बसून केली होती. रा. जोशी यांच्यानंतरचे दुसरे वर्गणीदार रा. रा. विष्णु विनायक परांजपे पुराणीक हे होत. हे ७।४।१७ रोजीं तिसऱ्या प्रकारचे वर्गणीदार झाले. हे मला पुरास पुराण सांगण्याकरतां आले होते. व तेथें असतां त्यांस ज्ञानको-शाच्या कार्यास मदत करावी अशी इच्छा होऊन कांहीं तरी दक्षिणा देण्यासाठीं आले. तथापि आमची दक्षिणा घेण्याची इच्छा नाहीं असें सांगितल्यानंतर त्यांनीं असा प्रश्न केला कीं, तुमच्या कार्याला मदत कर-ण्याची मला इच्छा आहे आणि वर्गणीदार होण्याची तर ऐपत नाहीं तर ही मदत करण्याची इच्छा मी कशी पूर्ण करून घ्यावी. तेव्हां आम्ही त्यांस असा सोपा उपाय सांगितला कीं, वर्गणीदार व्हावें. व सहा महि-न्यांचे आंत आम्हांस वर्गणीदार रहाणें नाहीं अशी आम्हांस नोटिस द्यावी म्हणजे तुमची वर्गणी आम्ही जप्त करूं. ही कल्पना त्यांनां पसंत पडली व ते वर्गणीदार झाले. सहामाहीच्या आंत आम्हांस, वर्गणीदारां-तून आमचें नांव काढावें अशी नोटीस येण्याचे ऐवजीं त्यांनीं आणखी ६ रु. आणून भरले व ते पहिल्या प्रतीचे वर्गणीदार झाले. पहिल्या प्रका-रच्या वर्गणीदारांत श्रीमंत लोकच असतील अशी ज्यांची कल्पना असेल त्यांनीं लक्षांत ठेवावें कीं, या प्रकारचा पहिला वर्गणीदार भिक्षुक आहे. विष्णुशास्त्री परांजपे वर्गणीदार झाल्यानंतर थोडक्याच दिवसांनीं म्हणजे १२।४।१७ रोजीं झालेले वर्गणीदार म्हटले म्हणजे स्वामी आत्मानंद सरस्वती हे होत. हे अर्थात संन्यासी म्हणजे ग्राहक या नात्यानें ज्ञानको-शाच्या कार्यास टेकू देणारी (कै. जोशी बजा जातां) पहिली व्यक्ति भिक्षुक तर दुसरी संन्यासी, अर्थात ही गोष्ट मला फार उत्तेजक वाटली, पैसेवाल्यापासून आपण पैसे काढूच, पण गरीब विद्याभिलाषी मंडळी देखील ज्ञानकोश घेऊं इच्छितात हें सिद्ध झालें.

यानंतर पुढें मी पुष्कळ ग्राहक केले, एका दिवसांत सात सात पर्यंत ग्राहक मिळविले आहेत पण विष्णुशास्त्री पुराणिक यांच्या वर्गणीदार होण्यानें जो आनंद झाला तो मी पुढें कधींच विसरलों नाहीं!

माझ्यावरोबर जे एक दोन क्यानव्हॉसर गिऱ्हाईकी मिळविण्यासाठीं खटपट करीत होते त्यांची अशी समजुत होती कीं मला जी गिऱ्हाईकी मिळते ती केवळ माझ्या वजनामुळें मिळते. त्यांनां मला हें दाखवावें लागलें का मी प्रत्यक्ष कामच पुष्कळ जास्त तास करीत होतों. मी मुंबईत काम करीत असतां अनेकदां सकाळीं आठ वाजतां जो बाहेर पडे तों संध्याकाळीं दहा वाजतां परत घरीं येत असें. ज्यावेळेस ज्या भागांत असेन त्या भागांत जेथीत असें, म्हणजे पारशी, इराणी, गोवानीज किंवा ब्राह्मणी विश्रांतिगृहांत "विश्रांति" येत असे. माझ्या बरोबरच्या कांहीं क्यानव्हासरनां इतकें काम करणें म्हणजेच हलकटपणा वाटत असे. मुंबईत मिसेस केतकर आणि मी असे दोघेहि काम करीत असतां दोघेहि आठ वाजतां भिन्न दिशांनीं जात होतों ते रात्रीं १० वाजतां भेटत असूं. क्यानव्हासिंग करणें म्हणजे मोठें अपमानास्पद असें आमच्या महाराष्ट्रीय पगारी नोकरांस वाटतच होतें. आणि हें काम आपणाला नको म्हणून तें टाळण्याची प्रवृत्ति बहुतेक नोकरांत दिसून आली. महाराष्ट्रीय लोक व्यापारी नसल्यामुळें मागणी मिळविण्याच्या धंद्यांत पडलेले फारसे लोक मिळत नाहींत, इन्शुअरन्स कंपन्यांचीं माणसें कामाला घेण्याचा विचार केला पण त्यांत अडचण येत असे ती अशी कीं बरेच दिवस एखाद्या इन्शुअरन्स कंपनीमध्य काम केलेल्या क्लिय्केांस् असें वाटत असेल को सामान्य एजंटाला लोक ज्या तऱ्हेनें वागवितात त्यापेक्षां मला निराळ्या तऱ्हेनें वागविणार आणि त्यामुळें माझें काम इतरांपेक्षां अधिक सुलभ होणार. पण इतर लोकांस अधिक वाईट बोलणीं ऐकावीं लागणार आणि लोकांच्या घरीं जाण्याचा जो कांहीं कटु अनुभव असतो तो मला मिळाला नसेल; पण हीं कल्पना व्यर्थ आहे. ज्या मनुष्याला पैसे खर्च करावयाचे नसतात तो मनुष्य पुष्कळदां आपण कांहीं तरी कारणामुळें ज्ञानकोशावर रागावलों आहोंत असें दाखवी. आणि कंपन्यांचा व्यवहार म्हणजे अगदीं लुच्चेगिरीचा येथपासून सुरवात व्हावयाची. असले अनुभव क्यानव्हासिंगच्या प्रसंगीं मला स्वतःला आलेले आहेत.

ज्ञानकोश घेण्याचा करार करणें हा दीर्घकालीन करार आहे आणि त्यामुळें कित्येक लोक तसला करार करण्यास नाखूष असत. ते म्हणत कीं शंभर सत्त्याशें रुपये भरण्याची जबाबदारी घ्यावी कोणी? अशा वेळेस माझें एक उत्तर पुष्कळदां ठरलेलें असे. मीं त्यांस असें म्हणें कीं तुम्ही ज्यावेळेस लग्न केलें त्यावेळेस त्या दुसऱ्याच्या मुलीला जन्मभर आणि तिच्या व तुमच्या मुलांनां तीं मोठीं होईपर्यंत पोसण्याची जबाबदारी तुम्हीं पत्करलीच नाहीं काय? जर लग्नाच्या वेळीं तुम्हाला इतक्यांनां पोसण्याचें सामर्थ्य आहे काय म्हणून विचारलें असतें तर तुम्हाला काय उत्तर देतां आलें असतें? त्यावेळेस तुम्ही केवळ शेंसवाशें रुपये देण्याचीच जबाबदारी पत्करली असें नाहीं तर दरमहा निदान तितके, किंबहुना त्याच्या अनेकपट रुपये खर्च करण्याची जबाबदारी पत्करली. तर तुम्हांला कांहीं रुपये भरून वर्गणीदार व्हावयाची जबाबदारी पत्करावयास कांहीं एक हरकत नाहीं! कित्येकांनां या विधानाचें हंसूं येईल तर कित्येकांनां त्यांतील सत्यताहि दिसून येईल.

क्यानव्हासिंगच्या कामांतील कांहीं मौजा सांगितल्या तर थोडीशी करमणूक होईल. ज्ञानकोश ही वस्तु चांगली आहे हें लोकांस पटवावयास वेळ लागत नसे. त्याचें शिक्षणविषयक महत्त्व देखील सहज स्पष्ट करतां येईल. मुलांच्या अभ्यासक्रमाकडे त्याचा उपयोग काय होणार म्हणून कोणी विचारलें तर असें सांगतां येईल कीं प्रत्येक मुलाचीं जिज्ञासेचीं वर्षें म्हणजे १४ पासून २५ हीं होत. पंचविशी उलटते त्या सुमाराला मनुष्य धंद्याला लागतो, आणि पुढें त्याचें फारसें वाचन होतच नाहीं. चौदापासून वीस वर्षांपर्यंत त्याचा इंग्रजी भाषेशीं फारसा परिचय नसतो आणि इंग्रजी लेख त्याला सहज समजत नाहीं. अशा वेळेस त्याला पाहिजे ती माहिती मराठींतूनच मिळाली तर त्याचें काम सोपें होतें. शिवाय आपला अनुभव असा आहे कीं आपण व्याख्यान अगर पुराण ऐकून बसलों तर पुष्कळ गोष्टी आपल्या कानांवरून जातील पण त्या लक्षांत रहात नाहींत तथापि जर आपणांस एखाद्या गोष्टीसंबंधानें जिज्ञासा उत्पन्न झाली असतां तींसंबंधानें माहिती मिळविली तर ती चांगली लक्षांत रहाते. जर मुलास जिज्ञासा उत्पन्न होऊन त्यानें ज्ञानकोश उघडून पाहिला तर ती माहिती जास्त लक्षांत रहाण्याचा संभव आहे. तर मुलांस संदर्भग्रंथ उघडून माहिती मिळविण्याची संवय लावली पाहिजे. हें म्हणणें पुष्कळांस पटत असें.

नागपूरचे रा. चितळे वकील यांचे वडील वासुदेवराव चितळे यांनीं ज्ञानकोशाला ग्राहक मिळविण्याचें काम चांगल्या तऱ्हेनें केलें. यांच्या कामगिरीबद्दल अभिज्ञता-देखाल कंपनीनें बऱ्या प्रकारें दाखविली आहे. यांनीं आम्हांस तीनशेंच्या वर ग्राहक मिळवून दिले म्हणजे कंपनीस चाळीस हजार रुपयांच्यावर प्राप्ति करून दिली. क्यानव्हासिंगची यांची शैली इतर मंडळींच्या पद्धतीपेक्षां भिन्न असे. लोकांनां गिऱ्हाईक करतांना हे कसे काय बोलत हेंहि मीं एकदोनदां प्रत्यक्ष पाहिलें आहे. व कांहीं गिऱ्हाइकांच्या तोंडून जी कथा कळली तीवरून ओळखलें आहे. हे पेन्शनर असल्यामुळें व नोकरीनिमित्त यांनां अनेक ठिकाणीं हिंडावें लागल्यामुळें यांच्या मूठच्याच ओळखी पुष्कळ होत्या. आणि कोणीहि मनुष्य भेटला म्हणजे त्याच्या आप्तांपैकीं कोणी तरी यांच्या ओळखीचा निघावयाचाच. मग ज्याला हे भेटत तो ब्राह्मण असो अगर प्रभु असो. ओळखी निघाल्यावर त्या गृहस्थाचे यांच्या ओळखीचे दुसरे आप्त कोते आहेत याची चौकशी व्हावयाची. पण हें सर्व अगोदर बोलून मग आपलें काम सांगावयाचें असें हे करीत नसून अगोदर आपण कशाकरतां आलें हें सांगावयाचें आणि बोलतां बोलतां ती चौकशी करून आपण त्या व्यक्तीच्या मित्रमंडळींतलेच आहोंत असें त्यास भासवावयाचें. यांच्या ज्या ओळखी निघत त्या विशेषेकरून ज्यांस ते गिऱ्हाईक करू पहात त्यांच्या वडिलांशीं किंवा चुलत्याशीं किंवा मामाशीं निघत; त्यामुळें ते आपल्या मंडळींतलेच पण ज्यांच्याकडे वडीलपणाचें नातें येतें अशापैकीं आहेत असें ग्राहकांस वाटे, व त्यामुळें त्यांचा प्रसंगविशेषीं विशेष सत्कारहि होई. रा. चितळे यांचें इंग्रजी शिक्षण झालेलें नव्हतें पण त्यांच्यामध्यें संभाषणकौशल्य चांगल्या प्रकारचें होतें व ते अनेक विषयांवर बोलू शकत. कॉफी किंवा चहा आला तर तो घ्यावयाचा, असा त्यांचा नियम असे पण प्रत्येक ठिकाणीं चहा घ्यावा लागेल या भीतीनें अर्धाच कप चहा प्यावयाची खबरदारी ते ठेवीत.

रा. विष्णुबाबा अक्कलकोटकर यांची शैली निराळ्या प्रकारची होती. त्यांचा प्रचारक्रम येणेंप्रमाणें असे:—एक तर कोठेहि गेलें तर कोणा वकीलाकडे उतरावयाचें, पहिले दिवशीं वकील मंडळीच्या टेनिसक्लबाकडे जावयाचें, तेथें त्यांची ओळख करून दिली जाई. तेथें नंतर टेनिस खेळावयाचें, आणि टेनिस खेळल्यानंतर काळोख पडल्यावर मंडळी गप्पा

मारायला लागतातच, तेथें बराच वेळ बसून रहावयाचें म्हणजे मंडळींनीं ज्ञानकोशासंबंधाचे प्रश्न विचारले म्हणजे त्यांनां उत्तरें द्यावयाचीं, त्यांत अनेक गोष्टी सांगावयाच्या, आणि नंतर दुसऱ्या दिवशीं मंडळीकडे व्यक्तिशः जावयाचें; आणि ज्ञानसंवर्धन आणि ज्ञानाचा प्रसार या संबंधानें भावना जागृत करावयाची, व त्या मंडळींस गिऱ्हाईक करावयाचें.

कंपनीच्या संपादकीय शाखेकडे काम करणाऱ्या मंडळींनींहि गिऱ्हाइकी मिळविण्याचें काम केलें आहे. या कार्यांत रा. दाते, रा. भावे, रा. कर्वे, रा. चांदोरकर यांनीं कामें केलीं आहेत व त्यांच्या संयुक्त प्रयत्नामुळें १५० च्यावर गिऱ्हाइकी झाली आहे. सौ. शीलवती केतकर आणि मिस् कोहन यांची गिऱ्हाइकी सुमारें ५० पर्यंत झाली आहे. म्हणजे ज्ञानकोशाला गिऱ्हाईकी मिळविण्याच्या कामांत पुष्कळ मंडळीकडून प्रयत्न झाला आहे. श्रौताचार्य धुंडीराज बापट व सेनापति बापट यांच्या नांवावर प्रत्येकी २० गिऱ्हाइकी तरी मांडतां येईल.

प्रकरण ८ वें.

संपादकीय वृत्ति

ज्ञानकोशाच्या संपादनाचा इतिहास थोडासा सविस्तरपणें दिला पाहिजे. कारण बऱ्याच वाचकांस त्याच्यासंबंधानें जिज्ञासा आहे. आणि सविस्तर इतिहास द्यावयाचा म्हणजे पहिली कल्पना, त्या कल्पनेमागें असलेली विद्याविषयक दुःस्थितीची जाणीव, व ती जाणीव झाल्यामुळें संपादकीय कार्यपद्धति, कार्यांतील अडणची आणि ग्रंथप्रसिद्धीनंतरचें स्वागत या सर्व गोष्टी दिल्या पाहिजेत. एवंच त्या इतिहासाचीं अनेक अंगें आहत. आम्ही ज्या अपेक्षा मनांत बाळगल्या त्या पूर्वीच प्रसिद्ध केल्या आहेत, आणि त्या प्रत्यक्ष संपादकीय कार्यांत उतरविल्या आहेत. ज्ञानप्रगतिविषयक आमच्या भावना आणि ज्ञानविषयक स्थितीच्या जाणीवीमुळें ज्ञानकोशरचनाप्रसंगीं जें एक विस्तृत ध्येय ठेवलें होतें तें ध्येय याची मांडणी पूर्वीच झालेली आहे. ती मांडणी आज पुन्हां छापली असतां ज्या गोष्टी अपूर्ण राहिल्या असतील त्या

पुढील कार्यकर्त्यांच्या नजरेस येतील. त्या गोष्टी पुऱ्या झाल्या नसल्यास त्या पुऱ्या करण्याचा प्रयत्न इतःपर व्हावा म्हणून संपादकीय कल्पनेची पूर्वीची मांडणी येथें आम्हीं पूर्णपणें देत आहों.

ज्ञानकोशाच्या कार्यासंबंधीं आमच्या कल्पना काय होत्या त्या लोकांस कळाव्या म्हणून पूर्वी एकदां लोकशिक्षणांत दोन लेखांकांत (वर्ष ७ अंक २–३) त्या मांडल्या होत्या, त्याच लेखांतील उपयोगी भाग येथें उद्धृत करतों.

ज्ञानकोश करावयाचा तो कां ?

या प्रकारच्या प्रयत्नाची आवश्यकता किती आहे याबद्दलची जागृति करण्याची योग्य वेळ म्हटली म्हणजे कार्यारंभापूर्वीची आहे असें कित्येकांस वाटेल. कांहीं अंशीं तें म्हणणें खरेंहि आहे. तथापि आवश्यकतेविषयीं कार्यारंभापूर्वीच वादविवाद उत्पन्न करण्याची आमची इच्छाच नव्हती; त्याचा परिणाम असा होणेंहि शक्य होतें कीं, कार्य वादविवादाच्या पलीकडे सरकलेंच नसतें. आतां कार्याची शक्यता केवळ कल्पनेंतच नाहीं; कल्पना दृश्यफल पावण्याच्या मार्गास लागली आहे. महाराष्ट्रांतील बहुतेक विद्वान व सुशिक्षित मंडळी या कार्यांत अडकली गेली आहे व आतां हा अशक्य वेडा प्रयत्न आपण सोडून द्या असे गंभीरपणानें सांगणारा गृहस्थ कोणी पुढें सरकेल असें वाटत नाहीं व सरकला तरी त्याची फिकीर नाहीं. कां कीं, आतां पळून जाण्यास कार्यकर्त्यांस वाटच नाहीं. ज्ञानकोश आतां असावा किंवा नसावा हा प्रश्न पुढें नाहीं.होणारा ग्रंथ कसा असावा याविषयींच कोणीहि झाला तरी कल्पना सुचवील. आम्ही आपलें कार्यध्येय पुढे मांडीत आहोंत आणि आमच्या कार्यध्येयाचें परीक्षण आम्ही लोकांकडून अपेक्षितों. अनेकांच्या कल्पनांच एकीकरण करून त्यांची ग्राह्याग्राह्यता व युक्तायुक्तता यांचा विचार करणें हेंच काम आमच्याकडे येईल. निरनिराळ्या सुशिक्षितांनीं आपल्या कल्पना आमच्याकडे पाठविल्यास आम्हास आनंद होईल.

ज्ञानकोशाचें काम सर्व राष्ट्राच्या सहकारितेनें पार पडणार आहे. कोणत्याहि शासनविषयक कार्यामध्यें दोन भाग असतात, एक ध्येयनिर्णय आणि दुसरा कार्यकारिता. ध्येय ठरविणारी मंडळी निराळी आणि त्या ध्येयाप्रमाणें कार्य पार पाडणारी मंडळी निराळी असते. सर्व

लाकांकडून आम्हांस सहकारिता जर मिळाली तर ती सामान्यतः ध्येय-निर्णयापुरती मिळणार. कार्य जें करावयाचें तें सर्व एकसूत्रानें एका विशिष्ट योजनेंत बसविण्यासाठीं व्हावयाचें आणि यामुळें ज्ञानकोशघटनेमध्यें अत्यंत मर्यादित प्रमाणानें बाहेरच्या लेखकांची आणि सुशिक्षितांची मदत घेतां येते. सर्व सुशिक्षितांकडून आम्ही खालील गोष्टींत सहकारिता अपेक्षितों--

(१) ज्ञानकोशांत आपण कोणत्या प्रकारचा मजकूर अपेक्षितां यासंबंधानें आपलें मत व्यक्त करणें.

(२) जी स्थानिक माहिती मागितली जाईल, ती शक्य अल्प्यास देणें.

(३) ग्रंथाचे वर्गणीदार अगर भागीदार होऊन मदत करणें.

ज्ञानकोशाच्या कचेरीबाहेरील गृहस्थास फारच नियमित प्रमाणानें लेखनसाहाय्य करणें शक्य आहे. याचें कारण, बाहरच्या गृहस्थास लेख लिहावयास सांगितला तर त्यास अवश्य ती ग्रंथसामग्री मिळविणें शक्य होत नाहीं, आणि आपापला विषय लिहावयास यथास्थित ग्रंथसामग्री असल्याशिवाय त्यास लेख चांगल्या तऱ्हेनें लिहितां येणार नाहीं. प्रत्येक लेखकाकडे ग्रंथसामग्री पाठवून देणें आम्हांस शक्य नाहीं आणि या प्रकारच्या अडचणीमुळें आम्हांस कित्येक कळकळीच्या लोकांचें लेखनसाहाय्य खेदानें नाकारावें लागलें. अमेरिका व यूरोप येथील ज्ञानकोशाचे लेखक निरनिराळ्या ठिकाणीं असतात. पण त्यांत बरेचसे त्या त्या विषयाचे जन्माचे व्यासंगी असल्यामुळें त्यांच्यापाशींच ग्रंथसंग्रह असतो. त्यांपैकीं पुष्कळ युनिव्हर्सिटयांमधून प्रोफेसर असतात आणि त्यामुळें त्यांस ग्रंथांची कमतरता नसते. याशिवाय पुष्कळ लोक न्यूयार्क, बोस्टन, फिलाडेल्फिआ यांसारख्या शहरीं असतात, तेथें प्रचंड सार्वजनिक ग्रंथालयें असतात, त्यामुळें त्यांस ग्रंथांची अडचण भासत नाहीं. हिंदुस्थानांतील परिस्थिति अगदीं निराळी आहे. महाराष्ट्रांत मुंबई व नागपूर या दोन शहरांखेरीज इतरत्र ग्रंथसंग्रहहि चांगल्या प्रकारचा नाहीं. अर्थात सर्वसामान्य जनतेकडून द्रव्य पुरविणें व आपल्या अपेक्षा कळविणें यापलीकडे मदत होणें शक्य नाहीं.

आमच्या पुष्कळ हितचिंतकांची एक समजूत अशून आहे ती ही की, आम्ही काय करणार, तर ब्रिटानिकासारखा ग्रंथ घेऊन त्याचें

भाषांतर करणार! ही समजूत चुकीची आहे. पुष्कळांचा असा समज होण्याचें कारण असें असतें कीं, ब्रिटानिकासारखा ग्रंथच त्यांनीं सूक्ष्मपणें अवलोकन केलेला नसतो. ब्रिटानिका एकदां काळजीपूर्वक चाळून पाहिला म्हणजे कोणाहि वाचणाराची खात्री होईल कीं, ब्रिटानिकाचें भाषांतर करण्याकडे कोणाहि सुशिक्षिताची प्रवृत्तीच होणार नाहीं. ब्रिटानिकामध्यें वारंवार आढळून येणारे माहितीचे दोष बरेच आहेत. ब्रिटानिकाप्रमाणें आमच्या ग्रंथांत देखील दोष रहाणें शक्य आहे. म्हणून या मुद्दयावर मी सध्यां फारसा भर न देतां केवळ स्थूल भेदांकडेसच वळतों.

प्रथमतः हें लिहिलें पाहिजे कीं, ब्रिटानिकांतील बरीचशी माहिती आपणांस अनवश्यक आहे. ब्रिटानिकांतील आपणांस अनवश्यक अशी माहिती अ पण काढून टाकली तर त्या ग्रंथांतील ग्राह्य भाग दोनतृतीयांशानें कमी होतो. तो इतका कमी कसा काय होतो याची स्पष्ट कल्पना येण्यासाठींच हें विधान सविशेष केलें पाहिजे.

ब्रिटानिकांतील अनवश्यक माहितीचीं अंगें येणेंप्रमाणें:—

(१) सामान्य चरित्रांपैकीं नऊदशांश भाग.

(२) वाङ्मयेतिहासापैकीं व तदंतर्गत चरित्रांपैकीं निम्याहून अधिक भाग.

(३) यूरोपीय इतिहास व तदंतर्गत चरित्रांपैकीं निम्याहून अधिक भाग.

(४) भूगोलविषयक वर्णनापैकीं निम्याहून अधिक भाग.

(५) ख्रिस्ती संप्रदायाच्या इतिहासापैकीं शेंकडा ९५ हिस्से.

कोणत्याहि राष्ट्राच्या ज्ञानाचें आणि ज्ञानविषयक अपेक्षांचे विशेषत्व या वरील भागांतील विवेचनामुळेंच सिद्ध होत असतें. आणि वर लिहिलेल्या बाबतींत जर ब्रिटानिका आहे तसा नसता तर ब्रिटानिकाच्या अस्तित्वाचीच जरूर नसती. कारण शास्त्रें, धंदे, कला या गोष्टी सर्वसामान्य आहेत. प्रत्येक ग्रंथांत आपल्या राष्ट्रांतील लोकांच्या अपेक्षेप्रमाणें मजकूर द्यावा लागतो. जो भाग आपणांस अनवश्यक आहे तो ब्रिटानिकांत घेतला नसता तर ब्रिटानिका हा ग्रंथ इंग्रज राष्ट्रास त्याज्य झाला असता.

आपलें मुख्य कर्तव्य आपण न्यायासनावर बसून ब्रिटानिकाची चौकशी करण्याचें अगर ब्रिटानिकाशीं स्पर्धा करण्याचें नाहीं.

ज्ञानकोशाच्या ग्राहकांत इंग्रजी जाणणारा वर्ग बराच मोठा आहे. ज्या गोष्टी सुशिक्षित भारतीयास अनवश्यक आहेत तथापि परकीय देशांचा सूक्ष्मपणें अभ्यास करणाऱ्यांसच आवश्यक आहेत त्या ब्रिटानिकांतून लोकांनीं घ्याव्यात.

आपणांस अनवश्यक भाग म्हणून वर सांगितलें, त्यांपैकीं प्रत्येक भागाची स्पष्ट माहिती होण्यासाठीं कांहीं बाबींचा उलगडा येथ करितों. उदाहरणार्थ, वाङ्मयेतिहास व राजकीय व इतर चरित्रें घ्या; य पैकीं फारच थोड्यांची आपणास जरूरी आहे. ब्रिटानिकानें दिलेल्या चरित्रांची यादी येणेंप्रमाणें:—

विषय.	चरित्रसंख्या अदमासें.	आपणांस अवश्य.
मानवशास्त्र आणि मानवेतिहास	३०	२०
पुराणवस्तुशोधन	७५	३०
वास्तुसौंदर्यशास्त्र	९०	५
संगीत	४२०	१०
चित्र आणि कोरींव काम	९६०	२५
खोदकाम	२००	१०
किरकोळ कला	६०	१०
नृत्य	२५०	०
रसायनशास्त्र	१२०	६०
ज्योतिष	१००	४०
जीवशास्त्र	२००	२५
समाजशास्त्रशिक्षण व अर्थशास्त्र	३७५	३०
भूगोलविज्ञान	२५०	२५
भूगर्भशास्त्र	२७५	८५
यूरोप व अमेरिकेंतील ऐतिहासिक पुरुष	४५००	३००
धंदे	१२०	४०
कायदा व शासनशास्त्र	३५०	२५
यूरोपीय वाङ्मय	४०००	२५०
गणित	१२५	४०

विषय.	चरित्रसंख्या	आपणांस अवश्य.
	अदमासे	
पाश्चात्य वैद्यक	१७५	२५
युद्धशास्त्रलेखक	९०	०
"फिलॉसफी"	४००	४०
पदार्थविज्ञान	१२५	१०
पाश्चात्य साधु ख्रिस्ती संप्रदायांतील लेखक	७००	२५

यॅणेप्रमाणें स्थूल मोजदाद करून किती चरित्रें आपणांस अनवश्यक आहत हें लिहिलें; परंतु एवढ्यानेच अनवश्यक भागाची त्या विषयापुरतें मापनें झालें असें होत नाहीं; कां कीं, प्रत्येक चरित्रांतील बराचसा भाग आपणांस अनवश्यक असतो. प्रत्येक चरित्रांत नातीगोती, अनेक चरित्रकारांचे तत्कालीन स्त्रियांबरोबर असणारे बरेवाईट संबंध यांचीं माहिती त्यांत असते; ही सर्व आपणांस अनवश्यक आहे. पाश्चात्य चरित्रांतून आपणांस जें हवें तें हें कीं आपापल्या विषयापुरतें अमुक व्यक्तीनें कार्य काय केलें.

ब्रिटानिकांतील सर सांगितलेला चरित्रांचा आपणांस अनवश्यक भाग काढून टाकिला म्हणजे आपल्या वांटणीस सुमारें निम्मा ब्रिटानिका उरला.

आतां भूगोलविषयक भाग घेऊं. त्याचें वरीलप्रमाणें पूर्ण पृथक्करण न करितां स्पष्टीकरणार्थ कांहीं गोष्टी पुढें मांडतों:—

देश.	ग्रामसंख्या वगैरे.	आपणांस अवश्य
आस्ट्रिया हंगेरी	२४०	२५
बेल्जम	७५	८
फ्रान्स	७२५	५०
जर्मनी	८००	५०
इटली	७२५	५०
स्पेन	२४०	२५
रशिया	३६०	२५
युनायटेड किंग्डम	१७५०	६०
युनायटेड स्टेट्स	१२००	६०

ह्यीं नुसतीं लेखांचीं नांवें झालीं. याशिवाय येथें हेंहि सांगितलें पाहिजे कीं, अनेक लेख फारच लांब आणि सूक्ष्म आहेत. इंग्लंडमधील कांहीं तालुक्यांवरील लेख पांचपासून दहा पृष्ठें लांब आहेत आणि कांहीं त्याहूनहि लांब आहेत. यांतला फारच थोडा भाग आपणांस अवश्य आहे.

आतां ख्रिस्ती संप्रदायाचा इतिहास घेऊं. नुसता बायबलावरील लेख ९४ पृष्ठें लांब आहे आणि बायबलामध्यें येऊन गेलेल्या पुंस्तकांवर स्वतंत्र लेख आहेत. त्यांची मोजदाद केली असतां १९० पेक्षां अधिक पृष्ठें होतात. शिवाय बायबलामध्यें जे ऐतिहासिक विषय येऊन गेले आहेत त्यांस दिलेल्या जागेची मोजदाद केली असतां आणखी ६० पृष्ठें भरतील. ख्रिस्ती संप्रदायाच्या इतिहासावर एकंदर सुमारें ८०० पृष्ठें लागलीं असतील असा अंदमास आहे. आपणांस ख्रिस्ती वाङ्मय व संप्रदायाचा इतिहास यांवर सुमारें चाळीस पृष्ठें मजकूर दिला असतां बस्स आहे.

अर्थात् ब्रिटानिकांतील दोनतृतीयांश भाग असा आहे कीं, तो आपणांस जवळजवळ निरुपयोगी आहे. म्हणजे आपण असें समजावें कीं, जर ब्रिटानिकासाठीं ४९० रुपये खर्च केले असले तर फक्त १९० रुपयांचा माल आपल्या हातीं आला.

आतां ज्या भागाकडे ब्रिटानिकानें अजीबात दुर्लक्ष केलें आहे किंवा ज्यास फारच कमी जागा दिली आहे तिकडे वळतों. आणि त्याविषयीं स्थूल विवेचन झालें म्हणजे मग आपलें कार्यध्येय स्पष्ट करितों.

महाराष्ट्रीय ज्ञानकोश म्हणजे ब्रिटानिकासारख्या ग्रंथाचें केवळ रूपांतरच नाहीं हें दाखविण्यासाठीं ब्रिटानिकांतील आपल्या दृष्टीनें अनवश्यक अशा भागाचें दिग्दर्शन केलेंच. आतां महाराष्ट्रीय ज्ञानकोशांत नको काय हें सांगण्याबरोबर हवें काय हें सांगणें ओघानेंच प्राप्त झालें.

महाराष्ट्रीय ज्ञानकोशकारांचें कर्तव्य काय याचें स्पष्टीकरण होण्यासाठीं, ज्ञानकोशाचें मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत स्थान कोणतें आहे, याविषयीं विचार आपोआपच उत्पन्न होतो. या विषयावर ज्ञानकोशकारांनीं आपल्या मनाशींच विचार केला आहे, तो येणेंप्रमाणें:—

(१) महाराष्ट्रीय ज्ञानकोश म्हणजे पूर्वपरंपरागत ज्ञान आणि भविष्यकालीन स्थिति यांस जोडणारा दुवा होय.

(२) आतांपर्यंत झालेल्या वाङ्मयांतील ग्राह्य भाग निवडणें त्याचें कर्तव्य आहे.

(३) मराठी भाषेंत अनेक लेखकांनीं आपले एका विषयावरील विचार व्यक्त करण्यासाठीं निरनिराळे शब्द योजिले असतां जें भाषाद्वैत उत्पन्न झालें असेल तें काढून टाकून भाषा स्थिर करणें त्याचें कर्तव्य आहे.

(४) महाराष्ट्रांतील पंडितवर्गांत वागत असलेलें विविध ज्ञान मराठी भाषेनें व्यक्त झालेंच नसल्यास तें व्यक्त करण्याची संधि त्यास देणें हेंहि ग्रंथकारांचें कर्तव्य होय.

(५) पाश्चात्त्य संस्कृति व परंपरागत संस्कृति यांचें एकीकरण करण्याचें स्थान महाराष्ट्रीय ज्ञानकोश होय.

(६) शेतकी व सुशिक्षित वर्गाचे धंदे हे करण्यापलीकडे महाराष्ट्रीय समाजामध्यें कार्यक्षमता नाहीं, तर समाजाचें कार्यक्षेत्र अधिक विस्तृत होणें शक्य होण्यासाठीं वाङ्मय द्वारें जी मदत करणें शक्य असेल ती करणें ज्ञानकोशाचें कर्तव्य होय.

(७) समाजांत ज्या क्रिया येथें होत असतात त्यांचें उत्तान अगर परिणत स्वरूप कोठें अन्यत्र दृग्गोचर होत असेल तर तें दाखविणें हेंहि ज्ञानकोशाचें कर्तव्य होय.

(८) हिंदु समाजाचे व विशेषेंकरून महाराष्ट्रीय समाजाचे हितसंबंध ओळखून तद्विषयक माहिती वाचकांपुढें ठेवणें हेंहि ज्ञानकोशाचें ध्येय आहे.

महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचीं शेंकडा ३५ पृष्ठें भारतीय संस्कृतीच्या स्पष्टीकरणासाठीं दिलीं आहेत, आणि केवळ शेंकडा १५ पृष्ठें बाह्य संस्कृतीच्या उद्बोधनासाठीं दिलीं आहेत. आमची योजना ज्या वेळेस प्रसिद्ध झाली त्या वेळेस कांहीं पत्रकारांनीं याबद्दल ज्ञानकोशकारांस पक्षपाताचा दोषहि दिला होता. त्या वेळेस जें स्पष्टीकरण केलें होतें, तेंच पुनः एकदां करतों.

परक्या देशांची आपणांस केवळ स्थूल माहिती हवी असते; तथापि आपल्या देशाची आपणांस सूक्ष्म माहिती पाहिजे असते. आपल्या

देशांची माहिती देतांना, आपल्या देशांतील पंडितवर्गास उपयोगी पडेल असा ग्रंथ केला पाहिजे. सामान्य जनता व आपल्या देशासंबंधानें संशोधन करणारा वर्ग यांच्या ज्ञानांत जें आज जमीनअस्मानाचें अंतर आहे, तें काढून टाकावयाचा प्रयत्न केला पाहिजे. महाराष्ट्रीय जनतेची ही मोठी बौद्धिक गरज आहे, आणि ज्ञानकोशकारांनीं ती लक्षांत घेतलीच पाहिजे.

महाराष्ट्रीय ज्ञानकोश हा महाराष्ट्राचें बौद्धिक स्वातंत्र्य स्थापन करण्यासाठीं झालेला प्रयत्न होय. महाराष्ट्राचे बौद्धिक स्वातंत्र्य कसें प्रस्थापित होईल हा विचार करण्यासाठीं बौद्धिक स्वातंत्र्याचा अभाव म्हणजे काय हें समजलें पाहिजे.

जेव्हां मनुष्य स्वतःच्या विचारापेक्षां परक्याच्या मतास अधिक मान देतो तेव्हां त्यास बौद्धिक परावलंबित्व थोडें तरी म्हटलेंच पाहिजे. तथापि समाजांत बरेंचसें बौद्धिक परस्परावलंबित्व असतेंच. उदाहरणार्थ, आपण डॉक्टरचा, वकिलाचा किंवा खरेदीविक्रीच्या प्रसंगीं दलालाचा सल्ला घेतों. हा अर्थात योग्यच प्रकार आहे. तज्ज्ञाकडे जाणें कोणासहि लांच्छनास्पद नाहीं. आपणांस हें बौद्धिक परस्परावलंबित्व नष्ट होऊं द्यावयाचें नाहीं; उलट वृद्धिंगत करावयाचें आहे. समाजांतील अनेक व्यवहार तज्ज्ञांच्या सल्ल्यानें झाले म्हणजे हातून होणाऱ्या खटपटींची कार्यकारिता वाढते व समाजाचें कल्याण होतें. तज्ज्ञांच्या सल्ल्यानें चालणें म्हणजे तज्ज्ञांकडून स्वतःस ठकवून घेणें मात्र नव्हे; तर स्वतः कांहीं ज्ञान मिळवूनहि कार्य अधिक योग्य व्हावें म्हणून विशेषज्ञाकडे जाणें होय. समाजांतील परस्परावलंबित्व कायम पाहिजेच; पण एका राष्ट्रास दुसऱ्या राष्ट्रावर अवलंबून रहावें लागावें हें हितावह नाहीं. व्यापारांत कांहीं अंशीं परावलंबन प्रत्येक राष्ट्रास भाग आहे. तथापि बौद्धिक बाबतींत परावलंबित्व धोक्याचें व राष्ट्रास अत्यंत कमीपणा आणणारें आहे. त्यांतल्यांत्यांत जें ज्ञान राष्ट्राच्या हिताशीं निकटतेनें संबद्ध आहे, त्यांत परावलंबित्व फारच धोक्याचें आहे. उदाहरणार्थ, वेदांत काय आहे, हें आपण इंग्रजास अगर जर्मनास विचारावें आणि त्यानें अपणापुढें पांडित्य करावें, यासारखी खेदाची दुसरी कोणती गोष्ट आहे बरें? पण आज वस्तुस्थिति मात्र

ज्ञानकोशमंडळांतील कार्यकर्ते



रा. ग. ना. टिळक हिशेबनीस.



वे. चिं. शं. दातार शास्त्री.



प्रो. वै. का. राजवाडे व्यवस्थापक-पुणें शाखा.

ज्ञानकोशमंडळाचे सावकार व कांहीं डायरेक्टर



रा. अ. चिं. भट



रा. ल. ब. फाटक.



श्रीमती गंगाबाई पेंडसे.

तशी आहे, हें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. पण येथें नुसतें अश्रू ढाळून काय उपयोग? या परावलंबित्वाची कारणमीमांसा केली पाहिजे.

तर्कशास्त्रांत ज्याप्रमाणें साधारण कारणें म्हणजे ईश्वर, काल, दिक् हीं आहेत पण कारणमीमांसेंत ती बाजूस ठेवून असाधारण कारणें शोधावयाचीं असतात. त्याप्रमाणें दारिद्र्य, देशांतील उष्ण हवा, परराज्य या प्रकारचीं सर्व प्रकारच्या अवनतींचीं साधारण कारणें बाजूस ठेवून बौद्धिक दास्याचीं निकट कारणें कोणतीं आहेत, इकडे लक्ष दिलें पाहिजे.

आज आपणांस आपल्या देशाविषयींच्या अनेक गोष्टींविषयीं माहिती मिळविण्यासाठीं पाश्चात्त्य ग्रंथकारांच्या ग्रंथांकडे पहावें लागतें आणि पाश्चात्त्य भाषा अवगत झाल्याशिवाय किंवा संस्कृत भाषेचें पांडित्य असल्याशिवाय आपणास कोणत्याहि विषयावर माहिती मिळत नाहीं. मृत भाषा सर्वांस समजणें शक्य नाहीं, म्हणून भाषांतरें लागतात. जितक्या संस्कृत ग्रंथांचीं भाषांतरें इंग्रजी, फ्रेंच किंवा जर्मन या भाषांमध्यें झालीं आहेत, तितकीं हिंदुस्थानांतील कोणत्याहि भाषांत झालीं नाहींत ! आज पुष्कळांस संस्कृत ग्रंथांतील अर्थाचें ज्ञान इंग्रजी पुस्तकांवरून करून घ्यावें लागतें. त्यामुळें परावलंबित्व उत्पन्न होतें.

परावलंबित्वाचें दुसरें कारण असें आहें कीं, पाश्चात्त्य देशांतील सामान्य ठिकाणीं जशीं ग्रंथालयें आहेत, तशीं मुंबईस किंवा कलकत्त्यासहि नाहींत. संस्कृत भाषेंत जें ज्ञान आहे त्याचा गोषवारा देणारे, त्यावर ऐतिहासिक विचार प्रदर्शित करणारे, जगाच्या इतिहासांत त्यांचें स्थान मोजणारे जसे ग्रंथ व लेख पाश्चात्त्य भाषांत आहेत, त्याच्या शतांशहि आपल्याकडे नाहींत. त्यांच्या बाबतींत परावलंबित्व घालवून देण्याचा प्रश्न येतच नाहीं. एकंदर ज्ञानक्षेत्राविषयीं तर बोलावयासच नको. ज्ञानविषय किती आहेत याची कल्पना जेव्हां येईल तेव्हां प्रत्येक विषयावर काय लिहिलें आहे हें जाणण्याची जिज्ञासा उत्पन्न होणार. अनेक विषयांसंबंधानें प्राथमिक स्वरूपाचीच माहिती ज्ञानकोशांत येईल. यापेक्षां अधिक दिली तर आपल्या वाचकवर्गास पचावयाचीच नाहीं. 'प्राथमिक स्वरूपाची' याचा अर्थ हायस्कुलांतील विद्यार्थ्यांस साजेलशी असा मात्र नव्हे. आज अखिल ज्ञानक्षेत्राची कल्पनाहि नाहीं तर त्यावर ग्रंथ कोठून निर्माण होणार? अनेक ज्ञानक्षेत्रांशीं निदान ओळख करून देणें

ज्ञानकोशाचें कर्तव्य आहे, विस्तृतज्ञानक्षेत्रांकडे दुर्लक्ष केलें तरी नेहमीं आपल्या परिचयांतील व्यवहारांचा माहिती आपणांस कितपत असते ? नेहमींचे बोलण्याचे विषय असून त्यासंबंधानें माहिती सामान्य सुशिक्षितास कितपत असते, याविषयीं कल्पना ज्याची त्यास खालील प्रश्नांचीं उत्तरें द्यावयाचा प्रयत्न करावा म्हणजे कळून येईल. हे प्रश्न जितके अगदीं सामान्य शोधून काढतां येतील तितके शोधून घातले आहेत.

(१) प्रवर म्हणजे काय ? गोत्रें आणि प्रवर यांची माहिती कोणत्या ग्रंथांत आहे ? सगोत्र लग्न करण्यास कोणते ग्रंथकार संमति देतात व कोणते देत नाहींत ?

(२) आश्वलायन ही "शाखा" आहे काय ?

(३) वैद्यकांत "चिकित्सा" म्हणजे काय ?

(४) यजुर्वेदाच्या मुख्य मुख्य शाखांची, निदान ज्या शाखांचे ब्राह्मण महाराष्ट्रांत आहेत त्यांचीं नांवें सांगावींत ?

(५) सामवेदी ब्राह्मण महाराष्ट्रांत आहेत काय ? अथर्ववेदी ब्राह्मण महाराष्ट्रांत आहेत काय ? माध्यंदिन, काण्व, मैत्रायणीय, चरक, जाबाल या शाखांच्या जशा निरनिराळ्या जाती आहेत, तशा सामवेदी आणि अथर्ववेदी अशा कांहीं निरनिराळ्या जाती आहेत कीं, एखाद्या निराळ्या नांवाच्या जातींत या वेदाच्या ब्राह्मणांचा अंतर्भाव होतो ?

(६) जैन व इतर हिंदु यांचीं लग्नें होतात काय ? शीख व इतर हिंदु यांचीं लग्नें होतात काय ? खिस्ती व हिंदु यांचीं लग्नें कोठें होतात ? मुसुलमानांच्या मुली करण्यास कोणत्या हिंदूस हरकत नाहीं ?

(७) एका जातीचा मनुष्य दुसऱ्या जातींत जाऊं शकत नाहीं, याला अपवाद कोठें कोठें आहेत ?

(८) "मराठे" या नांवानें ओळखली जाणारी जात कितपत जुनी आहे ?

(९) १६२७ सालीं शिवाजी जन्मला कशावरून ?

(१०) महाराष्ट्रीय ब्राह्मणांमध्यें पुरुष अधिक आहेत कीं बायका अधिक आहेत ?

भौतिक शास्त्रें व तज्जन्य कला यांच्या बाबतींत आपण केलेली पाश्चात्त्यांची व आपली तुलनाच हास्यास्पद होईल. तथापि आपल्या संस्कृतीच्या

अभ्यासाच्या बाबतींत आपण त्यांची बरोबरी करूं, असा जर आपला भ्रम असेल तर तोहि सोडून दिला पाहिजे. संस्कृत ग्रंथांचा अभ्यास पाश्चात्त्य पंडित करतात, आणि आज आपल्या देशांतील लोकांच्या संस्कृत ग्रंथांविषयींच्या ज्ञानाकडे तुच्छतेनें पहाण्याचें धैर्य त्यांस आलें आहे व आपलें अध्यापकत्व पटकावण्याचीं त्यांची तयारी आहे. त्यांस येतो हा जोर कशानें येतो याविषयीं तर आपण विचार केला पाहिजे ना ? आज त्यांस जोर येत आहे, याचीं कारणें अनेक आहेत, त्यांपैकीं मुख्य कारणें येणेंप्रमाणें:—

(१) आपल्या अभ्यासापेक्षां त्यांचा अभ्यास अधिक पद्धतशीर आहे.

(२) प्रत्येकानें अभ्यास करून जें शोधात्मक ज्ञान संपादन केलें तें लेखी व्यक्त करून त्यानें पुढील पिढीसाठीं ठेवलें आहे.

(३) हिंदुस्थानाबाहेर झालेल्या ग्रंथांचें, जगाच्या इतिहासाचें आणि शास्त्रांचें ज्ञान आपणापेक्षां त्यांस फारच अधिक आहे. भारतीय पांडित्यास या सर्व गोष्टींची जरूर आहे. इतिहासाची किंवा ज्ञानाची अशी गोष्ट आहे कीं, एका देशांतील ज्ञानाचें, राज़कीय इतिहासाचें किंवा कलेचें जगांतील एकंदर ज्ञानाच्या राजकीय अगर कलेच्या इतिहासापासून पृथक्त्व नसतें. आणि यामुळें जगांतील इतर हालचालींचें ज्ञान ज्यांस असतें त्यांस हिंदुस्थानविषयक गोष्टी अधिक स्पष्टपणें समजावयास मार्ग असतो, आणि अशा लोकांच्या लेखांतील चुका काढणें इतरांस शक्य होत नाहीं.

आपल्या अभ्यासापेक्षां त्यांचा अभ्यास अधिक पद्धतशीर कसा असतो याची कल्पना येण्यासाठीं, त्यांच्या अभ्यासपद्धतीची कल्पना एकदोनच गोष्टींचा निर्देश केला असतां येईल.

पाश्चात्त्यांच्या अभ्यासांतील पहिला प्रयत्न म्हणजे ज्या विषयावर आपणांस परिश्रम करावयाचा असेल त्या विषयावर आजपर्यंत कोणी काय लिहिलें आहे याचा संपूर्ण तपास लावून **तद्विषयक वाङ्मयसूचि** तयार करणें. ही वाङ्मयसूचि करण्यास त्यांचीं साधनें येणेंप्रमाणें—एकतर त्यांच्या ग्रंथशाला बरेच दिवसांच्या स्थापन झाल्या असल्यामुळें आणि ग्रंथसंग्रहविषयक परिश्रम दांडगा असल्यामुळें जो हिंदुस्थानविषयक ग्रंथ येथें मिळण्यास फार यातायात पडेल तो ग्रंथ पाश्चात्त्य

विद्यापीठांतील विद्यार्थ्यांस आपल्या ग्रंथालयांत सहज मिळूं शकतो. आक्सफर्ड, केंब्रिज, लंडन, बर्लिन, सोर्बन, कार्नेल, कोलंबिया, येल, हार्वर्ड या विद्यापीठांत जीं हिंदुस्थानविषयक पुस्तकें सहज पांच मिनिटांत मिळतील, तीं मुंबईस अगर कलकत्त्यासहि मिळावयाचीं नाहींत. हिंदुस्थानच्या कॉंग्रेसचे जुने रिपोर्ट मला अमेरिकेंत सहज मिळत, पण हिंदुस्थानांत चार पांच वर्षांपूर्वीचे रिपोर्ट्स मिळवावयास यातायात पडते. ग्रंथोपलब्धीसंबंधानें जेवढी सोय तेथें आहे तेवढी इकडे नाहीं, एवढेंच नव्हे तर अमुक विषयावर ग्रंथ कोणता ही माहिती मिळविण्यास मारामार पडते. निरनिराळ्या प्रकाशकांचे व लायब्र्यांचे क्याटलॉग, वाङ्मयप्रसिद्धीविषयींच माहिती देणारीं मासिकें व ग्रंथ यांची पाश्चात्त्य विद्यापीठांत रेलचेल असते. असो.

प्रत्येक पंडित आपल्या अभ्यासाचा विषय स्वतंत्र व नवीन करण्यासाठीं खटपटत असतो. निदान दुसऱ्यानें जें अभ्यासक्षेत्र घेतलें असेल, त्या क्षेत्रावर पुन्हां निराळा ग्रंथ लिहिण्याचें काय प्रयोजन झालें याविषयीं त्याला आपल्या ग्रंथांत स्पष्टीकरण करावें लागतें. अमुक विषयावर जें संशोधन झालें त्याचें सिंहावलोकन जर्मनमध्यें होतें. कोणत्याहि पंडितास आपण ज्या विषयावर ग्रंथ प्रासिद्ध करतों त्या विषयावरील पूर्वीचा ग्रंथ ठाऊक नसणें हें लज्जाकारक वाटतें आणि त्यानें त्याचा उपयोग केला नसल्यास किंवा त्याकडे दुर्लक्ष केलें असल्यास अज्ञान किंवा मत्सराचा आरोप त्याजवर येतो. या तऱ्हेच्या प्रगतीमुळें सर्व अभ्यासामध्यें एकवाक्यता होते. वाटेल त्या लेखकानें मनास वाटेल तें लिहावें, दुसऱ्याच्या परिश्रमाकडे दुर्लक्ष करावें असें करून चालत नाहीं. शोधकांच्या संस्था आहेत, त्यांत प्रत्येकास दुसऱ्याशीं प्रसंग येतो त्यामुळें जबाबदारी वाढते, व निरंकुशता कमी होते.

संस्कृतग्रंथविषयक पाश्चात्त्यांच्या अभ्यासांत केवळ शिस्तीची जोड मिळाल्यामुळें विशेष काय साध्य झालें आहे हें सांगितलें पाहिजे.

प्रथमतः मूलपाठाच्या संशोधनाविषयीं त्यांची पद्धतशीर खटपट होऊन तीस चांगलें यश आलें आहे. मनुस्मृतीची आवृत्ति त्यांस काढावयाची आहे असें समजा. त्यासाठीं तें प्रथम अनेक हस्तलिखितें गोळा करतील. तीं गोळा करणेंहि त्यांस सोपें आहे. निरनिराळ्या ग्रंथशालांच्या

हस्तालिखितांचे क्याटलॉग असतातच, त्यांतहि एका पुस्तकाच्या अनेक हस्तालिखित प्रती अससात. त्या अनेक प्रतींचीं साग्र वर्णनेंहि त्यांत असतात. तीं वाचून एखादा ग्रंथ मागवावा असें अभ्यासकास वाटलें तर तो आपल्या संस्थेच्या लायब्ररीमार्फत तीं हस्तालिखितें मागवूं शकतो. अनेक हस्तालिखितें गोळा केल्यानंतरचा प्रयत्न म्हटला म्हणजे शुद्ध पाठ ठरविणें हा होय. शुद्ध पाठ याचा अर्थ ज्यांत व्याकरणशुद्धि अधिक असेल किंवा ज्यापासून अर्थनिष्पत्ति अधिक चांगली होत असेल तो शुद्धपाठ असें नाहीं. तर ऐतिहासिकदृष्ट्या जो मूळ पाठ असेल तो. उदाहरणार्थ आपण असें घेऊं कीं, एखाद्या मासिकाच्या संपादकास आलेला लेख प्रसिद्ध करावयाचा आहे. आलेल्या लेखांत व्याकरणाच्या पुष्कळ चुका असतात. त्या दुरुस्त करून तो प्रसिद्ध करतो. तेव्हां प्रसिद्ध केलेला लेख म्हणजे मूळ नव्हे. ऐतिहासिक दृष्टीनें किंवा कायद्याच्या दृष्टीनें जबाबदारी प्रसिद्धलेखापेक्षां मूळ पाठविलेल्या लेखाबद्दलच लेखकावर असते. बदलेलेल्या लेखाबद्दल कमी. यासाठीं तपासून शुद्ध न केलेला पाठ खरा व शुद्ध केलेला खोटा. याप्रमाणेंच जुन्या लेखांचें आहे. अस्सल व नक्कल यांमध्यें नकलेला महत्त्व कमी. अनेक हस्तलिखितें जमा करून त्यांतून मूळ पाठ कोणता होता, मूळ मिळविणें शक्य नसेल तर मूळपाठाच्या जवळजवळ पाठ कसा शोधावा याविषयीं शोध करण्याची पद्धति अनुभवानें ठरली आहे. पाश्चात्त्य अभ्यासांत मूलशोधनाचा भाग महत्त्वाचा आहे. ग्रंथाचें मूळ शुद्ध असलें म्हणजे त्याच्यावरून तत्कालीन परिस्थितीचा पुढल्यामागल्या परिस्थितीशीं संबंध पाहून इतिहासाची जुळवाजुळव करणें या खटपटी पुढें शक्य होतात. संस्कृत ग्रंथाच्या शुद्ध आवृत्त्या पाश्चात्त्यांच्याच आहेत.

आतां भारतीय ज्ञानाच्या बाबतींत त्यांची कशी काय प्रगति होत आहे याची अंधुक तरी कल्पना दिली पाहिजे. प्रगतीचीं कारणें दोन आहेत; नवीन साहित्याचा उपयोग, आणि जुन्या साहित्याचा नवीन पद्धतीनें उपयोग. प्राचीन भारतीय विषयांपैकीं पाश्चात्त्य पंडित ज्या विषयांत आपल्या पुढें फार गेले आहेत, ते विषय म्हटले म्हणजे इतिहास आणि तदनुषंगिक शास्त्रें हे होत. जी शास्त्रीय पद्धति त्यांनीं आपल्या देशांत स्वकीय संस्कृतीच्या व राजकीय घडामोडींच्या इतिहासास लावली तीच पद्धत त्यांनीं इकडे लावली आणि जी माहिती जुन्या पंडितांस

नव्हती अशी अनेक प्रकारची माहिती पैदा केली. त्या माहितीचें स्वरूप मुख्यतः येणेंप्रमाणें:—

(१) **चिरंजीवी लिखाणांचा अभ्यासः**—ताम्रपट, शिलालेख हीं अनेक जमवून, त्यांच्या नकला घेऊन, त्यांवरील लिपि ओळखून, त्या लिपीच्या अनुसंधानानें अर्थ लावून, त्यांतील मजकुरावरून, देशांत झालेल्या घडामोडींची शकावलि, राजमालिका हीं तयार करणें.

(२) **मुद्राविज्ञानः**—नाण्यांचा अभ्यास करणें.

(३) **पुराणवस्तुसंशोधनशास्त्रः**—जुनीं शहरें, देवालयें, कलाकुशलतेच्या जिनसा हीं जमा करून त्यांचा अभ्यास करणें.

(४) **मानववंशशास्त्रः**—निरानिराळ्या मनुष्यांच्या जातींच्या, म्हणजे त्यांच्या चालीरीती, त्यांच्यांतील जुन्या कालाचे अवशेष, त्यांचीं दैवतें, उपासना, खाणेंपिणें इत्यादि गोष्टींचा अभ्यास.

याप्रमाणें साहित्यावरून शास्त्रांचीं नांवें तयार झालीं आहेत. तथापि या शास्त्रांच्या अभ्यासांत जी माहिती पैदा झाली आहे तिचें संकलन होऊन " लिपिविज्ञान " म्हणजे देशांतील आजच्या लिपींचा अशोककालीन लिपीपासूनचा इतिहास, इत्यादि अनेक शास्त्रें अगर शास्त्रांगें तयार होत आहे.

वर सांगितलेलीं अभ्यासक्षेत्रें पाहिलीं असतां असें दिसून येईल कीं, नवीन साहित्य पैदा करून त्यावर हा अभ्यास रचला गेला आहे. पण पूर्वीपासून ब्राह्मणांस परिचित असें साहित्य म्हटलें म्हणजे श्रुति-स्मृति-पुराणें. त्यांचा अभ्यास कसा काय होत आहे इकडे लक्ष देऊं.

उदाहरणार्थ " वेद " घेऊं. वेदांचा अर्थ कसा लावावा हें जाणण्यासाठीं प्रथम यास्कसायणादि ग्रंथांच्या साहाय्यानें त्यांनीं अभ्यास केलाच. पण त्यांत कांहीं थोडीशी सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. यास्क हा देखील वेदकालानंतर बऱ्याच कालानें होऊन गेला. त्याअर्थी त्यास वेदकालीन संस्थांचें ज्ञान स्पष्ट नसेल, व त्यामुळें त्यानें दिलेले अर्थ चुकलेले असतील, ही शक्यता मनांत धरून वेदवाक्यांच्या दिलेल्या अर्थाविषयीं संशयवृत्ति तयार झाली. शिवाय अर्वाचीन पंडितांस झेंदावेस्ताचें व यूरोपीय भाषांचें ज्ञान यांची जोड मिळाली. तेव्हां त्यामुळें त्यांस प्राचीन यूरोपीय, प्राचीन भारतीय व प्राचीन इराणी या

तीन लोकसमूहांच्या भाषा, शब्द व संस्था यांतील सादृश्य लक्षांत आलें, व जी संस्था व जे शब्द वेदांत व या पाश्चात्त्य ग्रंथांत सदृश असतील तीं पुढें हिंदुस्थानांत नष्ट झाल्यामुळें यास्कादिकांस न समजणें व अर्वाचीन संशोधकांस समजणें शक्य आहे असें त्यांस वाटून त्यांनीं तौलनिक पद्धति अमलांत आणली आणि वेदार्थज्ञान स्वतंत्रपणें करून घेण्यास सुरवात केली.

शब्दांचा अर्थ स्वतंत्रपणें लावावा, वेदग्रंथांतील भाषेची ऐतिहासिक चिकित्सा करून वेदवाक्यांचा कालानुक्रम काढावा, वेदांत व्यक्त झालेल्या कथांचा (Myths) अर्थ काय याविषयीं स्वतंत्र बुद्धीनें शोध करावा, वेदांत ज्यांचा नामनिर्देश आला आहे असे ऋषी, राजे, जाती, राष्ट्रें, स्थलांतरें, युद्धें यांच्या उल्लेखांवरून राजकीय व बौद्धिक इतिहास जुळविण्याची खटपट करावी; प्राकृत, वेदभाषा, अवेस्ती भाषा, यूरोपीय भाषा यांचा तौलनिक अभ्यास करून अपभ्रंश व भाषेंत होणारे बदल यांचे नियम शोधून काढावेत, या प्रकारचा परिश्रम त्यांनीं अनेक वर्षें चालविला आहे. रामायण,महाभारत व वेद यांतींल कथांचा मेळ घालण्यासाठींहि प्रयत्न पुष्कळ झाला. विचारसंप्रदाय व शास्त्रें यांचाहि ऐतिहासिक अभ्यास झाला आहे.

ग्रंथांतील शब्दांची सूची, विशेषनामांच्या सूची, श्लोकांची सूची, एतद्विषयक पुस्तकांच्या याद्या, मूलपाठशोधनांत घेतलेली खबरदारी यांची पाश्चात्त्य बुद्धीस जोड मिळाल्यामुळें आणि हीं साधनें आपणांस नसल्यामुळें संशोधनशास्त्रपरिचित अशा इकडील पंडितांस जाळ्यांत सांपडलेल्या सिंहासारखें व्हावें लागतें. दैत्यांनीं ग्रासलेल्या अरण्यास ज्याप्रमाणें ऋषी सोडून जातात अगर तेथें येत नाहींत त्याप्रमाणें, पांडित्यास अपकर्षक अशा परिस्थितीनें ग्रासलेल्या हिंदुस्थानांत येऊन शिक्षिण्यास देखील खरा पाश्चात्त्य पंडितांचा वर्ग तयार नाहीं.

आपल्या सुशिक्षित वर्गांपैकीं पुष्कळांमध्यें पाश्चात्त्यांच्या भारतीय पांडित्याविषयीं तुच्छता वाटत असते. ती सर्वांशीं योग्य नाहीं असें म्हणणें भाग पडतें. देशांतीलच नवीन साहित्य शोधणें व वापरणें, भारतेतिहासास उपयोगी असें बाह्य साहित्य जमा करणें, सर्व साहित्य पद्धतशीर रीतीनें जमा करून उपयोगांत आणणें, आपण केलेल्या

अभ्यासानें जमा झालेलीं अनुमानें लिहून ठेवणें, अभ्यासासाठीं नवीन पद्धति स्वीकारणें या सर्व बाबतींत थार परिश्रम पाश्चात्यांनींच केले आहेत. त्यांच्याच पद्धती घेऊन आपणहि अभ्यास करूं लागलों म्हणजे आपण त्यांच्या मागें न रहातां पुढेंहि जाऊं हें खरें आहे व जे थोडे भारतीय पंडित पाश्चात्य संशोधनपद्धतींनीं अभ्यास करून निर्भयपणें नवे नवे सिध्दान्त पुढें मांडीत गेले त्यांचा पाश्चात्यांनीं योग्य आदरहि केला आहे. आपलें कर्तव्य आपली उच्चता परिश्रमानें स्थापित करण्याचें आहे, उच्चता व्यक्त करण्याचें नाहीं. पाश्चात्यांचें संशोधन गोळा करावें, तपासून पहावें, ग्राह्य असेल तें घ्यावें, त्याज्य असेल तें टाकावें. सर्व जगाचें ज्ञानविषयक रणमैदान एक होत आहे. आपण केलेलें संशोधन जगानें आदरावें असें आपणांस वाटत असेल तर पूर्वी परिश्रम करणारांचे ग्रंथ आपण अवलोकिले पाहिजेत.

पण हें सर्व कोणी करावें? गचाळपणा व इंग्रजी भाषा भारतीय तरुणांच्या वशांत कोंबण्याची हांव, या दोन्ही चिन्हांनीं अंकित झालेल्या मुंबई, मद्रास, कलकत्ता, अलाहाबाद येथील युनिव्हर्सिटयांकडून हें काम पुढील पन्नास वर्षांतहि होईल अशी आशा वाटत नाहीं. हिंदु युनिव्हर्सिटीकडून जर कांहीं खटपट झाली तर यश येणें शक्य आहे; पण तिच्याकडूनहि कांहीं होईल असें सध्यांच्या परिस्थितीवरून वाटत नाहीं. ज्ञानकोश करतांना पाश्चात्यांचें भारतीय पांडित्य तपासून त्यांतील ग्राह्यांश घेण्याचें काम चालू आहे आणि पाश्चात्यांचें भारतीय पांडित्य सर्वांशीं तपासण्याचें काम जरी ज्ञानकोशकारांस अशक्य आहे तरी या कार्यांत भावी परिश्रम करणारांस आगाऊ तयारी म्हणून कार्य करतां येईल असें वाटतें. माहितीचे ग्रंथ आपल्या शहरांत दुर्मिळ आहेत. पुस्तकें मिळवावीं कोणतीं याचीच माहिती आपल्या लोकांस नाहीं, आणि त्यामुळें एकत्र जमविलेल्या माहितीची जरूर आपल्या लोकांस मोठी आहे.

पाश्चात्यांच्या भारतीय पांडित्यांत दोष नाहींत असें नाहीं; दोष आहेतच. सामान्य वाचकांच्या नजरेस येणारा त्यांचा दोष म्हटला म्हणजे भाषांतर करतांना होणारा दोष होय. कांहीं अंशीं हा दोष त्यांचा पांडित्यदोष नसून अपरिहार्य दोष असतो. संस्कृत शब्दांची अर्थकक्षा पूर्णपणें लक्षांत आली तरी इंग्रजी अगर इतर पाश्चात्य भाषेंतील शब्दांत ती

व्यक्त करावयाची असल्यामुळें ती अर्थकक्षा पूर्णपणें योजलेल्या प्रतिशब्दांत उतरत नाहीं. त्यामुळें भाषांतरांत मूळांतील अर्थ उतरला नाहीं असें वारंवार ध्यानांत येतें आणि वाचक एकदम भाषांतरकारास दोष देऊं पहातो. इंग्रजी भाषेंत प्रतिशब्द नसतो आणि संस्कृत शब्दांतील अर्थकक्षेचा एक भाग ज्या इंग्रजी शब्दांचें अर्थक्षेत्र विस्तृत आहे अशा शब्दांनीं व्यक्त होतो. एकदां भाषांतर झालें असलें म्हणजे पुढील लेखकांची प्रवृत्ति मूळाकडे न जातां भाषांतरावरून तहान भागवून घेण्याकडे होते. आणि पुढील लेखक इंग्रजी शब्दांतील भलताच अर्थ घेऊन पुढें जातात. या प्रकारच्या गडबडीमुळें पुष्कळ घोंटाळे झाले आहेत.

हा दोष पाश्चात्त्य भाषांतरांत वारंवार होणारा आहे आणि महाराष्ट्रीय वाचकांनीं पाश्चात्त्यांनीं केलेलीं भाषांतरें वाचलीं असतां सहज लक्षांत येणारा आहे, आणि त्यामुळें महाराष्ट्रीयांस त्यांच्या पांडित्यांविषयीं संशय एकदम उत्पन्न होतो. इंग्रजी ग्रंथांवरून स्वदेशाची माहिती घेऊं पहाणारांनीं आणि त्यासाठीं संस्कृत पंडित तयार करण्याच्या योजनेस अडथळा करूं पहाणाऱ्या नामदार परांजप्यांसारख्यांनीं प्रस्तुत ज्ञानविषयक दोष लक्षांत घेणें अवश्य आहे.

पाश्चात्त्यांच्या भारतीय पांडित्यांतील दुसरा एक दोष म्हटला म्हणजे त्यांचा स्वतःच्या देशाच्या संस्कृतीविषयीं आणि संप्रदायाविषयीं असलेला अभिमान होय. हिंदुस्थानांतील अनेक गोष्टी फारच अर्वाचीन आहेत, असें दाखविण्याचा त्यांस मोह पडतो. याकोबी आणि ब्लूमफील्ड यांच्यासारखे लेखक सोडून दिले तर इतर लेखकांस वेदांच्या किंवा नंतरच्या ग्रंथांच्या प्राचीनत्वावर गदा घालण्याची प्रबल इच्छा आहे काय असा संशय वारंवार येतो. आपलें मत सिद्ध करण्यासाठीं त्यांनीं आणलेले आधार सर्वस्वी उपेक्षा करण्याजोगे नसतात, आणि त्यामुळें त्यांच्या म्हणण्याकडे बरेंच लक्ष द्यावें लागतें. हापकिन्ससारखे लेखक असें म्हणूं लागतात कीं, आम्ही सर्व ग्रंथ बरेचसे अर्वाचीन धरूं; पुराव्याचा बोजा प्राचीनत्व सिद्ध करूं पहाणारांवर आहे. अर्थात असल्या प्रकाराच्या विधानांत पंडितांची मनःप्रवृत्ति दिसून आली तरी तिला मानवेंसें भाग पडतें.

पाश्चात्त्यांच्या भारतीय पांडित्याविषयीं आम्ही जी अपेक्षा करतों व जी अपेक्षा फारशी पूर्ण झाली नाहीं, ती म्हटली म्हणजे तटस्थपणाची

होय. आपणांस असें वाटतें कीं, ब्राह्मण पक्ष किंवा बौद्ध पक्ष यासारख्या कोणत्याहि पक्षास पाश्चात्त्य ग्रंथकार मिळणार नाहीं आणि हिंदुस्थानच्या ऐतिहासिक प्रश्नांवर निर्विकार मनानें ते लिहितील पण ही अपेक्षा व्यर्थ आहे असें वाटावयास लागतें. ख्रिस्ती संप्रदायावरील आसक्ति वारंवार वोंटाळा करते. हिंदी संस्कृतीच्या पुरस्कर्त्या म्हणून समजल्या जाणाऱ्या मॉक्समुल्लर नांवाच्या पंडिताची अशी अपेक्षा होती कीं, ख्रिस्ती संप्रदायाच्या उच्चतम गुणांची माहिती हिंदूंस पन्नासएक वर्षांच्या शिक्षणानें होऊन सर्व हिंदु लवकरच ख्रिस्ती होऊन जातील! त्यानें ही अपेक्षा व्यक्त केल्याला साठ वर्षें होऊन गेलीं. तथापि त्यानें अपेक्षिलेला परिणाम मात्र घडून आला नाहीं.

कित्येक ग्रंथकार ब्राह्मण लबाड आहेत, त्यांच्या भिक्षुकी लेखांवर विश्वास ठेवूं नये, प्रामाणिक बौद्धांच्या ग्रंथांवर विश्वास ठेवावा असा आग्रह धरतात. वेदग्रंथांचे अभ्यासक आणि अवेस्त्याचे अभ्यासक यांमध्यें आपल्या अभ्यासविषयाच्या ग्रंथांसंबंधानें अभिमान असून एकानें दुसऱ्याच्या ग्रंथास अर्वाचीन ठरविण्याचा प्रयत्न करावा अशी धडपड आहेच. जसजसें अर्वाचीन कालाकडे यावें, तसतसें पाश्चात्त्य पंडितांचें मन अधिकाधिक दूषित झालें आहे असें दिसून येतें.

पाश्चात्त्य पांडित्यांतील दोष त्यांच्या गुणांमुळें भयंकर होतात. जे ग्रंथ आदरणीय नाहींत, त्यांतील दोषामुळें कोणाचें कांहीं नुकसान होत नाहीं तथापि जे ग्रंथ आदरणीय आहेत, त्यांतील दोष लोकांवर परिणाम घडवितात आणि यामुळें त्यांतील दोष शोधणें अवश्य असते. पाश्चात्त्य ग्रंथकारांचे दोष शोधण्याची दृष्टि अहितकारक नाहीं, ती अवश्य आहे. ग्रंथांत दोष शोधण्याची दृष्टि नेहेमींच चांगली असते असें नाहीं. पण एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रांतील पंडितवर्गाच्या पांडित्यामुळें दिपून जाऊन वाचाहीन व्हावें यापेक्षां दोषैकदृक् बुद्धि देखील वाईट नाहीं. पाश्चात्त्यांचें शिष्यत्व योग्य आहे पण तें जगांतील चढाओढींत जय पावण्यासाठीं आहे. पाश्चात्त्य पांडित्यामुळें घाबरून हतवीर्य होणें आणि बाबावाक्यं प्रमाणम् या प्रकारची दृष्टि त्यांच्याविषयीं ठेवणें, हें केवळ उद्धटपणानें पाश्चात्त्य पंडितांच्या लेखांचें महत्त्व कमी समजण्यापेक्षांहि वाईट आहे."

वर सांगितलेल्या गोष्टी आम्हीं ज्ञानकोश तयार करतांना जागृत ठेवल्या होत्या हें आम्ही आश्वासन देतों. आम्हीं या गोष्टीकडे लक्ष दिलें नाहीं अशी जर उदाहरणें सांपडलीं तर तीं आमचा प्रयत्न अपुरा पडल्यामुळें झालीं असें समजावें.

प्रकरण ९ वें.

संपादकीय अंतर्व्यवस्था

ज्ञानकोशाच्या संपादकीय कार्याला आरंभ कंपनीचें कार्य कायदेशीर रीतीनें होण्यास आरंभ होण्यापूर्वीच झाला होता. आरंभीं फक्त कांहीं इंग्रजी ग्रंथांतून मराठीमध्यें गोषवारा काढण्याचें काम चालू होतें. विषयनामें आधीं निश्चित न करतां प्रथम शक्य तितकी विविध माहिती जमवून ती अनेक विषयांवर जशी आढळेल त्याप्रमाणें विभागून पुढें विषय निश्चित करावे असें याचें धोरण ठेवल्यामुळें इंडियन अँटिक्वरी, रॉयल एशियाटिक सोसायटी, अमेरिकन ओरिएंटल सोसायटी यासारख्या संस्थांचीं नियतकालिकें, निरनिराळ्या प्रांतांसंबंधीं लिहिलेलीं 'कास्ट्स आणि ट्राइब्स' नांवाचीं जातिविषयक पुस्तकें, प्रदेशाविषयक माहिती देणारीं प्रवासवृत्तें, खानेसुमारीचे अहवाल, निरनिराळ्या देशांच्या इतिहासाची माहिती देणारीं पुस्तकें वगैरे अनेक ग्रंथ घेऊन त्यांतील गोषवारे काढण्याचें काम प्रथम नागपूर येथें चालू होतें व पहिल्या कार्यारंभाच्या सभेच्या दिवशींच यांतील बरीच अकारविल्ह्यानें लावून पहावयास ठेवलीं होतीं. कार्यास आरंभ झाल्यावर ऑफिसमध्यें नवीन माणसें ठेवून हेंच गोषवारे काढण्याचें काम अधिक जोरानें सुरू केलें.

तथापि आपल्या एकंदर कार्याचें क्षेत्र किती आहे. कोणकोणत्या विषयावर आपणांस माहिती मिळवावयाची व एकंदर ग्रंथाची मांडणी आपणांस कशी करावयाची हें कळण्याकरितां एक ज्ञानकोशाच्या घटनेची योजना तयार करण्यांत आली व तींत विशिष्ट विषयांस किती पृष्ठें द्यावयाचीं व कार्यपद्धति कोणती असावी यासंबंधीं सर्व योजना मांडली होती (परिशिष्ट १ पहा).

तसेंच प्रारंभींच मराठींतील सर्व वाङ्मयाची माहिती व्हावी म्हणून महाराष्ट्रीय वाङ्मयसूचि तयार केली. हें काम बऱ्याच लोकांस फार

जिकिरीचें व अवाढव्य वाटत होतें व पुणें येथें डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटीजवळ असलेल्या यादीची नक्कल करण्यासच आम्हांस कांहीं महिने लागतील अशी त्या सोसायटीचे कार्यकर्ते रा. केळकर यांनीं आपली समजूत व्यक्त केली होती. पण तें काम आम्ही फक्त ८ दिवसांत केलें. तसेंच पुढें वर्गीकरणाचें कामहि आम्ही इतक्या झपाटयानें केलें कीं, सर्व हस्तलिखित तयार होण्यास पुरते तीन महिनेहि लागले नाहींत.

या वाङ्मयसूचीवरून आम्हांस एक अनुभव मिळून आपणास एखादें काम अत्यंत अल्पावधींत करावयाचें झालें तर तें करतां येईल किंवा नाहीं व करावयाचें झाल्यास कसें करतां येईल यासंबंधीं खात्री उत्पन्न झाली. या सूचीमुळें एक अपूर्व व उपयुक्त ग्रंथाची भर वाङ्मयांत पडल्यामुळें मंडळाबद्दल विश्वासहि बऱ्याच लोकांच्या मनांत उत्पन्न झाला.

वाङ्मयसूचीचें हस्तलिखित जितक्या लवकर तयार झालें तितक्या लवकर ती छापली मात्र गेली नाहीं. पण या छापण्याच्या दिरंगाईच्या अनुभवामुळें ज्ञानकोश छापण्याचें काम नागपुरास होणें शक्य नाहीं हेंहि तितकेंच स्पष्ट कळून येऊन पुढें पुणें, मुंबईकडे जाण्याची पूर्वतयारी करावी लागली.

वाङ्मयसूचीची छपाई चालू असतांच नवीन मजकूर तयार करण्याचेंहि काम ऑफिसांत चालूच होतें.

ऑफिसामध्यें विशेषतः ऐतिहासिक, भौगोलिक, वाङ्मयविषयक, जातिविषयक वगैरे मजकूर टीपारूपानें करण्याचें काम चालू असे व शास्त्रीय मजकूर बाहेरून येईल अशी अपेक्षा होती व याकरितां एक संपादकीय खात्याची योजना व नियमपत्रक तयार केलें होतें व त्या नियमांप्रमाणें एक मंत्रिमंडळ स्थापन करून निरनिराळ्या शास्त्रांकरितां विभागसंपादक नेमावयाची खटपट चालू होती (परिशिष्ट २ पहा). परंतु यांतील मंत्रिमंडळ हें कागदावरच राहिलें व विभागसंपादक सर्व शास्त्रांस मिळू शकले नाहींत. कांहींनीं प्रथम कबूल केलें परंतु कार्यव्यासृत्वामुळें त्यांस काम करतां आलें नाहीं. कांहींनीं अर्धेमुर्धें काम केल्यावर पुढें सोडून दिलें व कांहीं विषयांस कोणी विभागसंपादक मिळूंच शकले नाहींत. तेव्हां अशा ठिकाणीं सर्व काम ऑफिसनें पूर्ण करून घेतलें.

ऑफिसांत जी मंडळी कामाला येत ती, विशेषतः नागपूर ऑफिसमधील मंडळी, नवशिकी म्हणून फारच कच्ची असत. त्यांच्या भाषांतर करण्यामध्यें प्रथमतः चुकाहि होत व मराठी लिहिण्याची संवय नसल्यामुळें भाषाहि अशुद्ध येत असे. पुण्याकडील मंडळीस नागपुरास बोलावण्याचीं पुष्कळ खटपट केली. अनेकांस पत्रें लिहिलीं. पण कांहीं मंडळी इकडे आपल्या कार्यांत गुंतलेली असत व कांहीं पुणें सोडून नागपुरास यावयास तयार नसत यामुळें नागपुरास मंडळी आम्हांस शिकवून शिकवून तयार करावी लागली. याकरितां मधून मधून कांहीं व्याख्यानांचा कार्यक्रम ठेवण्यांत आला होता. रा. विश्वनाथपत राजवाडे यांसहि तेथें आणण्यांत येऊन त्यांचीं कांहीं इतिहाससंशोधनपद्धतीवर व्याख्यानें करविलीं पण त्यांची प्रकृति तेथें नीट न राहिल्यामुळें ते लवकरच पुण्यास परत आले.

नागपूर येथें काम बऱ्याच झपाटयानें चालू होतें व ज्ञानकोशाचीं तीनचतुर्थांशावर कच्चीं टिपणें नागपूर येथें तयार झालीं होतीं परंतु त्यांवर संस्करण मात्र सर्व पुण्यास करण्यांत आलें. नागपूर येथें वोडूमयसूचि तयार होत असतां व गोषवारे काढण्याचें काम जोरांत चालू असतां जवळ जवळ ४० माणसें काम करीत असत.

नागपूरला ज्याप्रमाणें अनुभवी किंवा तयार माणसें मिळाली तोहीं त्याचप्रमाणें कायम राहण्याच्या इराद्यानेंहि कोणी आले नाहींत. बहुतक कायद्याचा अभ्यास करणारे विद्यार्थी असून वकिलीची परीक्षा पास झाल्यावर वकीली करण्याचाच त्यांचा इरादा असे. त्यामुळें काम शिकून तयार झालेली मंडळी सोडून गेल्यामुळें पुन्हां नुकसान होई. एक गृहस्थ तर एक विषयाचीं सर्व तयार टिपणें वाचून झाल्यावर आतां लेख लिहावयास सुरुवात करावयाची त्याच वेळीं सोडून गेले. यामुळें पुढें संपादकीय कार्य पुण्यासच पूर्ण करण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें जुलै १९१९ मध्यें मुख्य संपादकीय ऑफीस पुण्यास आणलें.

तत्पूर्वी १९१८ मध्येंच पुढील धोरणाच्या दिशेनें पुणें येथें एक ऑफीस सुरू केले होतें व तेथें प्रो. वै. का. राजवाडे यांच्या देखरेखीखाली गोषवारे काढण्याचें काम चालू होतें.

नागपूरहून पुण्यास ऑफिस आणलें त्यावेळीं नागपूरहून फक्त डॉ. केतकर, रा. दाते, रा. देशपांडे व रा. टिळक ही चार मंडळी पुण्यास

आली व ती (रा. देशपांडे यांचे खेरीज) शेवटपर्यंत कार्य करीत आहेतच.

गोषवारे काढण्याचें काम नागपूर व पुणें या दोन्ही ठिकाणीं जरी चालू होतें तरी दोन्ही ठिकाणीं होणाऱ्या कामामध्यें थोडासा फरक आढळून आला. नागपूर येथें होणारें काम पुढें प्रत्यक्ष आपण ज्ञानकोशांत विशिष्ट विषयास किती जागा देतां येईल या दृष्टीनेंच प्रारंभापासून तयार होत असल्यामुळें नागपुरास तयार झालेलीं बहुतेक सर्व टिपणें पुढें भाषाविषयक व इतर आजतागायतपणाकरितां लागणारे फेरफार करून कमीजास्ती भर घालून मुख्य ज्ञानकोशांत अंतर्भूत करतां आलीं. परंतु पुणें आफिस मधील कामाचें धोरण या दिशेनें चालेलें आढळून आलें नाहीं त्यामुळें येथील टिपणें अवास्तव लांबलचक व फार पाल्हाळिक झालेलीं आढळलीं. त्यामुळें त्यांचा उपयोग करून घेण्याकरितां पुन्हां त्यांतील मुद्दे वगैरेचीं संक्षिप्त टांचणें तयार करावीं लागलीं. यामुळें येथील काम बरेंच निरुपयोगी झालें.

हें गोषवारे काढण्याचें कामहि एका विशिष्ट योजनेनुसारच चालेलें होतें व हें काम करतांना कोणत्या निरानिराळ्या क्रिया करावयाच्या व त्यांतील निरानिराळीं कार्यें कोणत्या काळापर्यंत पूर्ण करावयाचीं यासंबंधींहि लेखक व संपादक यांच्या उपयोगाकरितां एक योजना तयार केली होती (पारिशिष्ट नं. ३ पहा). या योजनेमध्यें निरानिराळ्या विषयांसंबंधीं माहिती कशी जमा करावी याचें विवेचन केलें असून शास्त्रीय लेखांमध्यें वापरल्या जाणाऱ्या संज्ञांमध्यें परस्पर संगति रहावी म्हणून एक सर्व शास्त्रीय संज्ञा एकत्र करून संज्ञाकोश तयार करावा अशीहि योजना केली होती. परंतु ही संज्ञाकोशार्थ जमविलेली सामुग्री टिपणरूपानेंच अखेरपर्यंत राहिली व संज्ञाकोश छापण्याचें काम द्रव्य व काल यांच्या अभावामुळें अपूर्णच राहिलें. हा संज्ञाकोश पूर्ण होऊन छापला गेला असता तर तोहि ग्रंथ वाङ्मयसूचीप्रमाणें अपूर्व व अत्यंत उपयुक्त झाला असता. असो. यापुढेंहि शक्य तर हें कार्य पूर्ण करण्याचा संपादक मंडळाचा विचार आहे.

ज्याप्रमाणें आम्ही शास्त्रीय विषयांकरितां बाहेरील लेखकांच्या साह्याची अपेक्षा करीत होतों त्याप्रमाणेंच कांहीं विशिष्ट ज्ञानक्षेत्रांत कार्य

करणाऱ्या संस्थांच्याहि सहकार्याची आम्ही अपेक्षा केली होती व त्याप्रमाणें आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या शिलालेख ताम्रपटादि लिखाणांतील स्थल काळ व्यक्तिविषयक माहिती मिळविण्याकरितां त्यांच्या निरनिराळ्या सूची तयार कराव्या अशी एक योजना तयार करून पुणें येथील भारत इतिहाससंशोधकमंडळ, भांडारकर ओरिएंटल रीसर्च इन्स्टिटयूट वगैरे संस्थांकडे पाठविली होती. परंतु त्यांचें सहकार्य या बाबतींत आम्हांस मिळूं शकलें नाहीं व ही योजना तशीच दप्तरांत पडून राहिली (परिशिष्ट नं. ४ पहा).

महाराष्ट्राच्या इतिहासासंबंधींचा मजकूरहि त्या क्षेत्रांत विशेष काम केलेल्या व करणाऱ्या मंडळीकडून तयार व्हावा अशी आमची इच्छा होती व पुणें येथील भारत इतिहाससंशोधकमंडळांत या विषयाला वाहून घेतलेली कांहीं मंडळी असावी अशी आमची अपेक्षा असल्यामुळें त्या संस्थेनें या बाबतींत आमच्याशीं सहकार्य करावें म्हणून आम्ही त्यांस विनंति करून पाहिली परंतु त्यांचेकडून हें कार्य करण्यास आमच्याजवळ माणसें नाहींत असें लिहून आल्यामुळें आम्हांस दुसरा तजवीज करणें भाग पडलें. तेव्हां आम्हा धुळें येथील सत्कार्योत्तेजक सभेमध्यें काम करणाऱ्या मंडळीमार्फत कै. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांजकडून हें कार्य करून घ्यावें म्हणून त्यांच्याशीं पत्रव्यवहार केला व रा. राजवाडे यांनीं ६००० रुपयांस १५०० पृष्ठें मजकूर महाराष्ट्र इतिहास वगैरेवर लिहून देण्याचें कबूल केलें परंतु ते पुढें हा सर्व रक्कम अगाऊ मागूं लागले व आम्ही फक्त ५०० रुपये आगाऊ देण्यस तयार होतों यामुळें त्यांनीं पुढें हें काम करण्याचें नाकारलें.

कै. वासुदेवशास्त्री खरे यांसहि यासंबंधीं आम्हीं विनंति केली परंतु त्यांजकडूनहि नकारार्थी उत्तर आलें. मात्र ज्ञानकोशाचें बरेंचसें काम झाल्यावर एकदां ते पुण्यास आले असतां त्यांनीं कांहीं लेख तपासून देण्याचें कबूल केलें होतें व २५० रुपये दरमहा घेऊन दोन वर्षांत पेशवाईच्या इतिहासावर ज्ञानकोशाच्या १००० पृष्ठांइतका मोठा स्वतंत्र ग्रंथ लिहून देण्याचें कबूल केलें होतें परंतु हें कार्य पार पाडण्याच्या आंतच त्यांना काळानें आपल्यामधून ओढून नेल्यामुळें मराठी इतिहासावर होणाऱ्या एका अपूर्व ग्रंथाचा संकल्प तसाच राहिला.

इतिहासाविषयांत बाहेरचें साह्य अल्प होणार असें दिसलें तेव्हां कै. देशपांडे यांनीं हिंदु इतिहास प्रथमपासून शेवटपर्यंत करण्यास कंबर बांधली.

याखेरीज मराठी भाषमध्यें ज्यांनीं कांहीं ग्रंथरचना केली आहे अशा कांहीं गृहस्थांसहि संपादकमंडळांत येऊन काम करण्यास विनंति करण्यांत आली, परंतु बहुतेकांकडून नकारात्मक उत्तरें आलीं.

ज्याप्रमाणें आम्ही कांहीं बाबतींत कांहीं संस्थांचें व व्यक्तींचें सहकार्य मागितलें त्याप्रमाणेंच सामान्य महाराष्ट्रीय जनतेचें व विशिष्ट गोष्टींशीं किंवा प्रश्नांशीं ज्यांचा संबंध निगडित आहे अशा वर्गांचेंहि साहाय्य आम्ही उघड रीतीनें मागितलें.

उदाहरणार्थ, धर्मशास्त्रीय लेख ज्ञानकोशामध्यें कोणत्या धोरणानें लिहावे या प्रश्नाचा विचार करून धर्मशास्त्राच्या अभ्यासकांनीं आम्हांस कांहीं सूचना कराव्या व आपलीं मतें कळवावीं म्हणून 'महाराष्ट्रापुढील धर्मशास्त्रीय प्रश्न व ज्ञानकोशाची अडचण' (परिशिष्ट नं. ५ पहा) या मथळ्याचें एक पत्रक केसरीद्वारा प्रकाशित करून त्याच्या अनेक प्रतीं ठिकठिकाणीं अनेक लोकांकडे पाठविण्यांत आल्या. परंतु या प्रश्नाचा विचार करून त्यासंबंधीं सूचना अगर मत पाठविण्यांचे श्रम कोणीहि घेतले नाहींत. याच तऱ्हेचा दुसरा प्रश्न आज व्यापारामध्यें ज्या निरनिराळ्या व्यवहाराच्या पद्धती आहेत त्यांचें प्रत्यक्ष ज्ञान लोकांस देतां यावें म्हणून आपआपल्या बाजारांतील व्यवहारासंबंधीं माहिती पाठविण्याविषयी एक विनंति पत्रक (परिशिष्ट नं. ६ पहा) मुंबई येथील अनेक व्यापाऱ्यांकडे पाठविण्यांत आलें. परंतु याहि पत्रकास प्रत्युत्तर कोणींच दिलें नाहीं. अशाच तऱ्हेचें तिसरें एक विनंति पत्र महाराष्ट्रांतील नृत्याभिमानी स्त्रीपुरुषांस पाठविलें होतें (परिशिष्ट नं. ७ पहा) महाराष्ट्रामध्यें हल्लीं संगीत व नृत्य या कला सभ्य व सुशिक्षित वर्गांतून नाहींशा झाल्या आहेत व नृत्य ही कला तर जवळ जवळ नष्ट होत आली आहे. या कलेचें अस्तित्व थोडेसें वेश्यावर्गांत कायतें दिसून येतें यामुळें या विषयाची माहिती वाङ्मयाच्या अभावीं मिळविणें कठिण असल्यामुळें हीं विनंतिपत्रें काढण्यांत आलीं होतीं. परंतु यांचाहि मुळींच उपयोग झाला नाहीं.

परंतु निरनिराळ्या जातींची माहिती ज्या ज्या जातींतीलच पुढारी व विश्वसनीय मंडळीकडून मिळावी म्हणून एक बावीस निरनिराळ्या बाबींसंबंधी प्रश्न विचारून माहिती मागविली होती (परिशिष्ट नं. ८ पहा) कित्येक प्रश्नपत्रिका अनेक वर्तमानपत्रांत छापवून व अनेक

जातींच्या पुढाऱ्यांस पाठवून तिचा पुष्कळच प्रसार करण्यांत आला. होता. या प्रश्नपत्रिकांस मात्र अनेक लोकांकडून उत्तरें आलीं. आपल्या जातीसंबंधी ज्ञानकोशामध्यें काय माहिती येणार यासंबंधीं जितकी जिज्ञासा लोकांनीं दाखविली तितकी दुसऱ्या कोणत्याहि प्रश्नासंबंधीं दाखविली नाहीं. परंतु जितकी यासंबंधी लोकांकडून जिज्ञासा दिसली तितकाच आम्हाकडे लिहून आलेल्या माहितीमध्यें विचित्रपणाहि दिसला. अनेक जातींनीं आमच्या जातीस अमुक क्षत्रिय म्हणावें, अमुक ब्राह्मण म्हणावें, अमुक वैश्य म्हणावें अशा तऱ्हेनें कळविलें. कांहींनीं अमुक जातीचा अंतर्भाव आमच्यांत करूं नये असें कळविलें. तर एका जातीच्या नांवाबद्दलच पुष्कळ पत्रव्यवहार व सभा–परिषदा झाल्या. एका जातीच्या लोकांनीं दोन निरनिराळ्या ठिकाणीं सभा भरवून त्या सभांच्या अध्यक्षांमार्फत आम्हांस अशी नोटीस दिली कीं आम्ही आपल्या जातीबद्दल जी माहिती आपणांकडे पाठवूं तीच माहिती तुम्हीं छापावी, दुसरी छापल्यास तुमच्यावर कायदेशीर इलाज करूं. परंतु या अध्यक्षांनीं किंवा सभा भरविणाऱ्या मंडळीनीं आपल्या जातीची माहिती आम्हांस अद्यापपर्यंतहि पाठविली नाहीं. व संपादकवर्गापैकीं कांहींचें मत या जातीची माहिती जातीकडून न आल्यामुळें व आम्हास दुसरी माहिती छापूं नये अशी नोटीस दिल्यामुळें या जातीची माहिती देतां आली नाहीं असेंच छापावें असें होतें; परंतु तसें केल्यानें जातींतील कांहीं चळवळ्या मंडळीच्या दोषाकरतां सर्व जातीस शिक्षा देऊं नये असें मत पडलें, आणि त्या ज्ञातींतीलच एका गृहस्थाकडून माहिती घेऊन छापण्यांत आली. बहुतेक जातींची वृत्ति चातुर्वर्ण्यविषयक संस्कारांचा पूर्णपणें लोप झाला असतांहि ब्राह्मण किंवा क्षत्रिय वर्गांत गणना करून घेण्याकडे असे. जातिविषयक माहितीबरोबर फोटोहि मागविले होते परंतु जातीचें वैशिष्ट्य दाखविणारा पोषाख वगैरे असलेला फोटो फक्त सोनकोळी जातीशिवाय दुसऱ्या कोणत्याहि जातीकडून आला नाहीं. कांहीं माहिती पाठविणारांनीं आपले स्वत:चे फोटो स्वत:च किंवा आपल्या आप्तांमार्फत जातीचे पुढारी म्हणून पाठविले; तर कांहींनीं आपणांकडे अमुक फोटो पाठविणारे गृहस्थ आमच्या-जातीचे पुढारी नसून त्यांचा फोटो आपण छापूं नये असें कळविलें. एका गृहस्थानें आपण अमक्या गृहस्थाचा फोटो छापीत असल्यास मी पहिल्या प्रकारचा वर्गणीदार होतों असेंहि कळविलें. अर्थात त्यास तसें

करतां येणार नाहीं असें कळविल्यावर त्यांचा वर्गणीदार होण्याची इच्छाहि अदृश्य झाली हें सांगावयास नकोच.

ज्ञानकोशाकरितां माहिती पाठवितांना पाठविणाऱ्यांची दृष्टि ऐतिहासिक किंवा चिकित्सक अशी क्वचितच दिसून आली. बहुतेक दिलेली माहिती जातीच्या गौरवपर असून जातीचीं वैगुण्यें किंवा तिच्याबद्दल समाजांत असलेल्या समजुती कोणत्याहि तऱ्हेचा पुरावा न मांडतां केवळ खोट्या आहेत एवढेंच नमूद केलेलें असे. कांहीं जातींच्या बाबतींत त्यांच्यां जातींतील गृहस्थानींच पाठविलेली माहिती आम्ही छापिली असतां ती त्या जातींतिल इतर कांहीं व्यक्तींस पसंत न पडल्यामुळें ज्ञानकोशकारांवरच टीका करण्यांत आली. ज्या जातीची माहिती छापल्यामुळें विशेष चळवळ, चर्चा वैगेरे झाली अशा जाती म्हणजे गोवर्धन व देवरुखे ब्राम्हण या होत. त्या वादविवादांची माहिती पुढें दिलीच आहे (परिशिष्ट पृष्ठ १२८ व पुढें पहा).

महाराष्ट्रांतील व एकंदर हिंदुस्थानांतील अनेक संस्थानांचे इतिहास व माहिती त्या त्या संस्थानांकडून तयार होऊन साधार व बिनचूक मिळावी म्हणून एक छापील पत्रक तयार करून सर्व संस्थानांच्या दरबारांस विनंति करण्यांत आली होती. परंतु महाराष्ट्रांतील जमखंडी भोर वगैरे एक दोन संस्थानाखेरीज कोणीहि अशी माहिती पुरविण्याची तसदी घेतली नाहीं. याप्रमाणें माहिती तयार होऊन येत नाहीं तेव्हां इतिहास वगैरे ऑफिसांत तयार करून ताजे आंकडे वगैरे घालतां यावे म्हणून अँडमीनिस्ट्रेशन रिपोर्ट वगैरे माहितीहि मागविण्यांत आली परंतु अशा पत्रांसहि उत्तरें आलीं नाहींत किंवा अहवाल वगैरेहि पाठविण्यांत आले नाहींत.

ज्या घराण्यांचा महाराष्ट्रीय मंडळी अभिमान बाळगतात त्या घराण्यांतील मंडळींनां स्वाभिमान कितपत आहे हें त्यावरून स्पष्ट होईल.

हिंदुस्थानांतील सर्व प्रांतिक सरकारानांहि आपले वार्षिक अहवाल मोफत पाठविण्याविषयीं विनंतिपत्रें पाठविण्यांत आलीं होतीं व मुंबई सरकारशिवाय बाकी सर्व प्रांतांनीं ब्रह्मदेशासुद्धां आपले वार्षिक अहवाल नियमितपणें आजतागायत पाठविले. मुंबईसरकारनें मात्र काटकसरीची सबब पुढें करून आपला अहवाल मोफत पाठविण्याचें नाकारलें. यावरून मुंबई सरकारचें दाक्षिण्य, वाङ्मयाचा पुरस्कार करण्याची वृत्ति व आपल्या प्रांतांत होणाऱ्या कार्यासंबंधीं अभिमान हीं चांगलींच दृग्गोचर होतात.

याप्रमाणेंच आम्हांस कांहीं गांवांच्या लोकसंख्येचे नक्की आंकडे पाहिजे होते म्हणून ज्या जिल्ह्यांत हीं गांवें होतीं त्या जिल्ह्यांच्या कलेक्टरांस आम्ही पत्रें पाठविलीं. त्यांची चार जिल्ह्यांकडून चार प्रकारचीं उत्तरें आलीं. एकानें ही माहिती आपण कोणत्या आधारावर मागतां तें कळवा असें विचारलें. एकानें ही माहिती पाठवितां येत नाहीं असें स्पष्ट कळविलें. एकानें योग्य अधिकाऱ्याकडे आपलें पत्र पाठविलें आहे असें उत्तर दिलें व एकाकडून मात्र पाहिजे ते आंकडे आले.

सरकारकडून कांहीं पुस्तकें मोफत मिळविण्याचा प्रयत्न कलाल्या बाबतींतहि असेंच दिसून आलें. १९१७ सालीं मध्यप्रांत सरकारमार्फत १९११ च्या खानेसुमारीचे अहवाल मोफत मिळाले पण १९२१ च्या खानेसुमारीचे अहवाल तसेच मागविले असतां मुंबईसरकार व मध्यप्रांत सरकार यांनीं एकमेकांकडे बोट दाखवून अखेरीस कोणीच अहवाल पुरविले नाहींत.

वाचावयास पुस्तकें मिळविण्याच्या बाबतींतहि मध्यप्रांत सरकारनें प्रथम कांहीं गॅझेटिअरचे भाग मोफत देऊन बाकीचे सेक्रेटारिएट लायब्ररीमधून नेण्यास व इतरहि पुस्तकें नेण्यास परवानगी दिली परंतु पुढें लायब्ररी लावण्याचें काम चालू असण्याच्या सबबीवर पुढें पुस्तकें देण्याचें नाकारलें.

नागपूर सेकंडक्लास सायंटिफिक लायब्ररीनें नागपुरास काम चालू असेपर्यंत पुस्तकें पुरविलीं पण तीं वैयक्तिक जबाबदारीवर आणावीं लागत. त्यांनींहि संस्थेस पुस्तकें देण्याचें नाकारलें. मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या शाखेतील पुस्तकें मिळावीं म्हणून मी तिचा सभासद झालों व ती संस्था माझ्या नांवावर पुस्तकें पाठवी पण तिनें संस्थेस पुस्तकें देतां येत नाहींत असें कळविलें व पुढें माझ्या प्रतिनिधीसहि पुस्तकें देण्याचें नाकारलें. तथापि एकंदरींत आम्ही प्राचीन विज्ञानावरील माहिती जमविण्याच्या कामीं रॉयल एशियाटिक सोसायटीच्या लायब्ररीचा पुष्कळच उपयोग करून घेतला.

संपादकीय कार्याचें धोरण व कार्यपद्धति यासंबंधीं आमची योजना परिशिष्ट नं. ३ व १० मध्यें दिलीच आहे. त्यांत ज्ञानकोशाचा कच्चा खर्डा कसा तयार करावयाचा आणि निरानिराळीं कामें केव्हां पूर्ण

करावयाचीं यासंबंधीं आमचें धोरण दिलें आहे. येथें फक्त प्रत्यक्ष ऑफिसमध्यें काम कोणत्या पद्धतीनें होत असें याची माहिती देतों.

प्रथम कांहीं ग्रंथ ज्यामध्यें अनेक प्रकारची माहिती एकत्र केलेली मिळण्यासारखी होती अशा ग्रंथांमधून त्या माहितीचीं टिपणें तयार करण्यांत आलीं होतीं. उदाहरणार्थ हिंदुस्थानविषयक भौगोलिक माहितीचीं प्राथमिक टिपणें इंपीरियल व प्रांतिक गॅझेटिअरमधून तयार केलीं. जातीविषयक माहितींची टिपणें कास्ट्स अँड ट्राइब्स नांवाच्या ज्या प्रत्येक प्रांतासंबंधीं ग्रंथमाला आहेत त्या, गॅझेटिअर व खानेसुमारीचे अहवाल यांवरून केलीं. बाह्यदेशाविषयक ऐतिहासिक, भौगोलिक व वाङ्मयात्मक माहितीचीं टिपणें निरनिराळ्या इंग्रजी एनसायक्लोपिडियांमधून घेतलीं, मराठी संत कवी वगैरेचीं टिपणें कविचरित्र, संत-कवि,-काव्यसूची, अर्वाचीनकोश वगैरे ग्रंथांतून घेतलीं, व्यापारी जिन्नसांसंबंधीं टिपणें वॅट्च्या कमर्शिअल प्रॉडक्ट्स ऑफ इंडिया या ग्रंथावरून तयार केलीं. याखेरीज सामान्य सांस्कृतिक मजकूर इंडियन अँटिक्वरी, रॉयल एशियाटिक सोसायटीचें जर्नल, अमेरिकन ओरिएंटल सोसायटीचें जर्नल सारख्या नियतकालिकांतून टीपारूपानें घेतला. अशातऱ्हेनें सर्व विषयांवरचीं प्रथम कच्चीं टिपणें तयार केलीं. हीं करतांनां कोणत्या विषयांवर टिपण करावयाचें व तें कसें करावयाचें यासंबंधीं माहिती संपादकीय व्यवस्थापक प्रत्येक लेखकास खुणा करून व सूचनारूपानें देत असे. कांहीं गोष्टींसंबंधीं धोरणाबद्दल नियम करण्यांत आल होते. त्याप्रमाणें प्रथम लेखकानें टिपण केल्यावर कोणीतरी टिपणें करून व ऑफीसमध्यें होणारीं व्याख्यानें ऐकून तयार झालेला लेखक तीं टिपणें तपासीत असे. प्रथम हीं टिपणें विषयवार लावण्यांत येत असत व सर्व विषयांचीं टिपणें तयार झाल्यावर तीं अकारविल्हेनें लावण्यांत आलीं.

ज्या विषयांवर एकाच पुरतकांत माहिती मिळण्यासारखी नसे त्या विषयांवर प्रथम वाङ्मय कोणतें आहे तें पाहून त्यांतील पुस्तकांची प्रथम निवड करण्यांत येत असे व अशीं निवडक पुस्तकें जमविल्यावर कोणत्या पुस्तकांतून कोणता मजकूर घ्यावयाचा यासंबंधीं टांचणें करण्यांत येत. हें काम संपादकीय व्यवस्थापक करून पुढें प्रत्यक्ष माहितीचीं टांचणें करण्याचें काम उपसंपादकाकडे देण्यांत येत असे. अशा

तऱ्हेचें बहुतेक काम मुख्य ऑफीस पुण्यास आणल्यावरच झालें. व तें प्रथम अनुभव मिळविलेल्या उपसंपादकांकडून करून घण्यांत आलें.

वरील पद्धति ज्या विषयावर वाङ्मय तयार होतें त्या विषयासंबंधी. अंगिकारितां आली परंतु ज्या विषयावर वाङ्मय मुळींच नव्हतें किंवा नवीन संशोधन करणें जरूर होतें, अशा बाबतींत निराळी पद्धति अंगीकारावी लागली. उदाहरणार्थ, प्रस्तावनाखंडाच्या दुसऱ्या व तिसऱ्या भागांत अंतर्भूत केलेला वेद व यज्ञसंस्थेसंबंधीचा मजकूर सर्व नवीन संशोधन करून तयार करावा लागला व या संशोधनांत पाश्चात्त्य संशोधकांपेक्षां आम्हांस प्रत्यक्ष यज्ञसंस्थेंत काम केलेल्या याज्ञिक व वैदिकांची मदत असल्यामुळें व येथील परिस्थितीशीं आमचा अधिक परिचय असल्यामुळें आम्हांस अनेक गोष्टींवर अधिक प्रकाश पाडतां आला. व बऱ्याच गोष्टींची संगति अधिक चांगल्या रीतीनें लावतां आली. याकरितां आम्हांस संहितांचें पादशः पृथक्करण, पदसूची व तिच्या कार्डा तयार कराव्या लागल्या. तैत्तिरीय संहितेची पदसूची अद्याप तयार केली गेली नसल्यामुळें ती आम्हांसच तयार करावी लागली. व तिची प्रेसकॉपी आज आमचेजवळ तयार आहे. ही पूर्वतयारी आम्हांस पुष्कळच करावी लागली व स्वतः वेदविद्येचा अभ्यास करावा लागून अनेक गोष्टींची छाननी करून हा मजकूर तयार करावा लागला. व त्यामुळें महाराष्ट्रीय वाङ्मयांत दोन अपूर्व ग्रंथांची भर पडली. वेदांच्या अभ्यासास या ग्रंथांचे महत्त्व किती आहे हें एम्. ए. च्या परीक्षेकरितां अभ्यास करणाऱ्यांस विशेषतः दिसून आलेंहि आहे.

भारतीय इतिहासाचा एकंदर ज्ञातभाग किती व अज्ञात भाग किती हें काल व स्थलानुक्रमानें संशोधन करून त्याचे तक्ते तयार करावयाचे व उपलब्ध वाङ्मय त्या तक्तयांत दाखवून मधून अज्ञात असोधित भाग किती आहे तो दाखवावयाचा व त्या भागावर संशोधन करून या उणीवा भरून काढावयाच्या म्हणूनहि एक प्रयत्न करण्यांत आला. व तसे तक्ते कांहीं तयार करून त्यांतील कांहीं भाग भरलाहि होता, परंतु द्रव्य व काल यांच्या अभावी हें कार्य आम्हांस पूर्ण करतां आलें नाहीं.

संज्ञाकोशाची पूर्व तयारी करूनहि तो आम्हांस पूर्ण करतां आला नाहीं हें पूर्वी लिहिलेंच आहे.

धर्मशास्त्रीय प्रश्नासंबंधीं निश्चित मत बनविण्याकरितां सर्व धर्मशास्त्रीय ग्रंथांचें पृथक्करण करून प्रत्येक मुद्द्याच्या चिठ्ठ्या करून त्यांवर संशोधन करून धर्माज्ञांचें स्वरूप निरनिराळ्या काळीं व स्थळीं कसें बदलत गेलें व आज धर्मशास्त्र कोणत्या स्वरूपांत प्रत्यक्ष व्यवहारांत उरलें आहे हें पहाण्याचा प्रयत्न करण्याकरितां एक योजना नागपुरास संपादकीय ऑफिस असतांनां पुणें शाखेचें कार्यकारी रा. राजवाडे, यांजकडे पाठविण्यांत आली होती, परंतु ही योजनाहि वरीलप्रमाणें संकल्पांतच राहिली.

ज्ञानकोशांतील वेदविषयक व भारतीय संस्कृतिविषयक जो मजकूर लिहिला गेला आहे तो बहुतेक मूळ संस्कृतसंहिता व त्यांचें उपबृंहण करणारे, ब्राह्मणें, सूत्रें वगैरे ग्रंथांवरून तयार करण्यांत आला. वैदिक विषयांवर इंग्रजी व विशेषतः जर्मन भाषेंत बरेच महत्त्वाचे संशोधनात्मक ग्रंथ आहेत व त्यांचाहि उपयोग आम्ही केला यांत संशय नाहीं. परंतु वैदिक विषयांवर लेख लिहावयाचा तो मूळ पाहिल्याशिवाय लिहिणें कोणासहि समाधानकारक होणार नाहीं असें आमचें व आमच्या संपादक वर्गाचें निश्चित मत असल्यामुळें आम्ही वेदाचा प्रथमपासून अभ्यास केला व पाश्चात्यांचे लेख तपासून पाहतां त्यांतील बरेच एकांगी व परिस्थितीचें पूर्ण ज्ञान नसतांना लिहिलेले आढळले व त्यामुळें पाश्चात्यांचे अनेक सिद्धान्त आम्हांस खोडून काढावे लागले.

तथापि इतर विषय लिहिण्याच्या कामीं आम्हांस मुख्यतः इंग्रजी ग्रंथांचाच आश्रय करावा लागला. अनेक भारतीय विषयांवरहि देश्य भाषेंत वाङ्मय नसल्यामुळें व येथील परकीय सरकार सर्व आपले रिपोर्ट वगैरे इंग्रजी भाषेंत छापीत.असल्यामुळें, जातींची माहिती, खानेसुमारीवरून मिळणारी अनेक प्रश्नांवरची माहिती, गॅझेटिअरसारख्या ग्रंथांवरून मिळणारी भौगोलिक माहिती इत्यादि माहिती सर्व इंग्रजीतूनच घेऊन आम्हांस वापरावी लागली. यामुळें कांहीं गांवांचीं नांवें किंवा इतर नांवें मराठींत मांडतांना मूळ नांवाशीं जुळलीं नाहींत असेंहि आढळून आलें. व याकरितां पत्रव्यवहार करून स्थानिक नांवें मिळविण्याचाहि कांहीं बाबतींत प्रयत्न केला. पण अशा वेळीं आमच्या पत्रांचीं उत्तरें कांहीं महिन्यानंतर व आमचा मजकूर छापला गेल्यानंतर आलीं अशा वेळीं त्यांचा आम्हांस कांहींच उपयोग झाला नाहीं.

बाह्यदेशांचें भूवर्णन, ऐतिहासिक, वाङ्मयाविषयक व चरित्रात्मक भाग बहुतेक निरनिराळ्या इंग्रजी सायक्लोपीडिया व इतर त्या त्या विषयांचीं पुस्तकें यांवरून सजविला.

महाराष्ट्राचा इतिहास, वाङ्मय व जाति वगैरे मजकूर तयार करतांना मात्र आम्हांस उपलब्ध मराठी वाङ्मयाचा उपयोग करून घेतां आला आणि या विषयावर आजपर्यंत लिखाण तरी काय झालें आहे हें पाहण्याकरितां आम्हांस आमच्या वाङ्मयसूचीचा उपयोग झाला. परंतु एकंदर मराठी वाङ्मयाचा विस्तारच फार अल्प असल्यामुळें एकंदर ज्ञानकोशाच्या फारच थोडया अंशास महाराष्ट्रीय वाङ्मयाचें साह्य झालें असें म्हटलें पाहिजे. मात्र उपलब्ध सर्व मराठी ग्रंथांचा आम्ही शक्य तितका उपयोग करून घेतला हा गोष्ट येथें नमूद केली पाहिजे. तसेंच पारिभाषिक संज्ञा जमविण्याच्या कामींहि आम्ही उपलब्ध मराठी पुस्तकांचा उपयोग करून घेतला.

आम्हांस मुख्य भर इंग्रजी भाषेंतील ग्रंथांवरच द्यावा लागला परंतु इंग्रजी ग्रंथांतील केवळ भाषांतर स्वरूपाचा मजकूर फारच अल्पांशानें ज्ञानकोशांत पहावयास मिळेल. कारण बहुतेक माहिती निरनिराळ्या ग्रंथांतून सारांशरूपानें व टीकारूपानें निरनिराळ्या मुद्यांवर घेऊन ती पुढें एकत्रित करण्यांत आली.

फ्रेंच, जर्मन, डच वगैरे पाश्चात्य भाषांतील ग्रंथांचाहि मिसेस केतकर व मिस् कोहन यांचें साहाय्य असल्यामुळें आम्हांस थोडाबहुत उपयोग करून घेतां आला परंतु चिनी, हिब्रयू, अवेस्ता वगैरे वाङ्मयाचा आम्हांस त्या त्या भाषा जाणणाऱ्या लेखकांच्या अभावी मुळींच उपयोग करून घेतां आला नाहीं.

प्रकरण १० वें.

ज्ञानकोश आणि वैदिक संशोधन

ज्ञानकोश तयार करण्याची कल्पना जेव्हां प्रथम मांडली गेली तेव्हां नवीन संशोधन करावयाचें हा त्यांत हेतु नव्हताच तर आपल्याकडे जें संशोधन झालें आहे तेंच मांडावयाचें हा हेतु होता. तथापि वेदविषयक क्षेत्रांतील विषयाकडे जेव्हां मी लक्ष देऊं लागलों आणि वेदविषयक माहिती मांडण्याचा विचार करूं लागलों तेव्हां या विषयांत बरेंच खोल

गेल्याशिवाय आपण कांहींहि लिहिणें धोक्याचें आहे असें वाटूं लागलें. मीं ऋग्वेद पूर्वी दोनदां वाचला होता याचा अर्थ एवढाच कीं, ऋग्वेदांतील दोनतीनशें सूक्तें मूळांतून वाचलीं होतीं आणि विल्सन व ग्रिफिथ यांचीं भाषांतरें वाचलीं होती आणि अथर्ववेदाचें ग्रिफिथचें भाषांतर व निवडक सूक्तांचें ब्लूमफील्डचें भाषांतर हीं वाचलीं होतीं. तसेंच कांहीं ब्राह्मणग्रंथ वाचले होते. त्यांत गोपथ ब्राह्मण मूळांतून वाचलें होतें, तांडय ब्राह्मण नुसतें एकदां चाळून पाहिलें होतें व ऐतरेय व शतपथ या ब्राह्मणांचीं भाषांतरें वाचलीं होतीं.पण तीं त्यांचें मूळ जवळ ठेवून वाचलीं होतीं. त्यामुळें वेदांत काय आहे याविषयीं मला स्थूल माहिती झाली होती. हें सर्व वाङ्मय ज्या एकाच दृष्टीनें वाचलें तो दृष्टि म्हटली म्हणजे सामाजिक इतिहासाची—विशेषेकरून जातिभेदाच्या इतिहासाची—दृष्टि होय. माझें वेदांचें वाचन हें १९०८।९ च्या सुमारास झालें. त्यानंतर ज्ञानकोशाला हात घालीपर्यंत फारसें झालें नाहीं. तथापि अगदीं पहिल्या वाचनाच्या वेळेस देखील यूरोपीय संशोधकांच्या अनेक मतांविषयीं संशय उत्पन्न झाला होता; तथापि त्याविषयीं कांहीं निश्चित मतें झालीं नव्हतीं. यावेळेस ही संधि साधून वेदाभ्यास आपण बराच करून द्यावा आणि आपलें कोडे पुरवून द्यावें ही इच्छा उत्पन्न झाली आणि डायरेक्टरांची त्यास संमतीहि मिळाली. ही संमती अर्थात तोंडीं होती. डॉ. खरे (ज्ञानकोशमंडळाचे अध्यक्ष) यांनीं मला एवढेंच सांगितलें कीं, जर या अभ्यासांत पैसा खर्च केल्यानें ज्ञानकोशाचें महत्त्व वाढेल असें तुम्हांला वाटत असेल तर आम्हांलाहि वाटत आहे; व संपादकीय धोरणामध्यें आम्ही ढवळाढवळ कांहीं एक न करण्याची वृत्ति कायम ठेवणार आहों; जो खर्च पडेल तो करावा. वेदाभ्यास जोरानें १९१९च्या डिसेंबरच्या सुमारास सुरू झाला, तो तीन वर्षें चालू होता आणि ज्ञानकोशाच्या मुद्रणास जी दिरंगाई झाली तिचा हा अप्रत्यक्ष फायदा आम्हांस मिळाला. मुद्रणास दिरंगाई झाली नसती तर ज्ञानकोश बराच अगोदर बाहेर पडला असता पण हें संशोधनहि झालें नसतें. तर ज्ञानकोशाचें काम रेंगळण्याचा हा एक निश्चयात्मक फायदा मिळाला आहे. ज्ञानकोश रेंगाळण्यानें दुसरा एक परिणाम असा झाला आहे; ज्ञानकोशाची किंमत १५७ पर्यंत वाढली असती ती १७७ पर्यंत वाढली. पण हा फायदा नाहीं. कागद त्यामुळें गिऱ्हाइकी करणें जड होऊं लागलें.

वेदविषयक जें संशोधन झालें तें थोडक्यांत देखील येथें देण्याची सोय नाहीं तथापि माझ्या पूर्वीच्या मतांत पडलेले कांहीं मुख्य मुख्य फरक किंबहुना पूर्वकालीन संशोधकांशीं असलेले मतभेद येथें देतों. माझें मत असें झालें आहे कीं सर्व वैदिक वाङ्मय हिंदुस्थानच्याच भूमीवर निर्माण झालें आहे, उत्तरध्रुवप्रदेशीं निर्माण झालें नाहीं. आणि वैदिक यज्ञसंस्था देखील येथेंच विकास पावली, उत्तरध्रुव प्रदेशांत विकास पावली नाहीं. लो. टिळक यांच्या कल्पनांत तथ्य नाहीं असें मात्र नाहीं. ज्याप्रमाणें

आंबा पिकतो, रस गळतो । कोंकणचा राजा बाई झिम्मा खेळतो ॥

हें गाणें जरी बरेंच अर्वाचीन काळचें आहे तरी तें पुरुष झिम्मा ज्यावेळेस खेळत असतील आणि कोंकण देशाला स्वतंत्र राजा होता, अशा काळची आठवण त्या गाण्यांत ज्याप्रमाणें शिल्लक राहिली आहे त्याप्रमाणें ऋग्वेदांत उत्तरध्रुवकालीन कल्पना वैदिक ऋचांत शिल्लक राहिल्या असतील, असें माझें मत झालें आहे. तथापि लोकमान्य टिळकांचें मुख्य म्हणणें म्हणजे आर्यन् लोक उत्तरध्रुवप्रदेशाकडून इकडे आले आणि हें मला सयुक्तिकच दिसतें. मला वाटतें तें एवढेंच कीं आज जें वैदिक ऋचांचें स्वरूप आहे, तें अर्वाचीन आहे व त्यांतील कल्पना फार प्राचीन असून त्यांतील कांहीं उत्तरध्रुवकालीन असणें शक्य आहे.

आज दृष्टीस पडणाऱ्या संहिता येथेंच झाल्या एवढेंच नव्हे तर सर्व सूक्तें देखील येथेंच तयार झालीं आणि ती देखील दाशराज्ञ युद्धानंतर झालीं. दाशराज्ञ युद्ध म्हणजे दिवोदास आणि सुदास हे सरहद्दीवरून निघून कुरुक्षेत्रांपर्यंत लढत लढत आले तें वृत्त. या युद्धाचा आणि या युद्धांत भाग घेतलेल्या व्यक्तींचा आणि त्या व्यक्तींशीं संबद्ध असलेल्या व्यक्तींचा उल्लेख सर्व ऋग्वेदभर पसरलेला आहे आणि त्यावरून ऋग्वेदांतील सर्व सूक्तें या युद्धानंतरचीं आहेत हें मला सिद्ध झाल्यासारखें वाटतें. हें युद्ध ज्या पक्षांमध्यें झालें ते दोन्ही पक्ष आर्यन् होते. आर्य व दास यांचें जातियुद्ध कधींच झालें नाहीं. आर्य-दास या वैरुद्ध्याची कल्पना वैदिक लोक आपल्याबरोबर घेऊन आले. ती कल्पना हिंदुस्थानांतच स्वतंत्र तऱ्हेनें उत्पन्न झाली नाहीं. दिवोदास आणि सुदास हे भरत होते. त्यांनीं विजय हिंदुस्थानांतील आर्यन् लोकांवरच मिळविला. ऋग्वेद हा ग्रंथ आर्यन् लोकांचा दासांवर किंवा काळ्यांवर विजय दाखवीत

नसून भरतांचा देश्य आर्यन् लोकांवर विजय दाखवितो. दास व आर्य हा भेद जाति विषयक म्हणजे रक्त विषयक नसून यजनविषयक होता. आर्य आणि दास यांच्यामध्यें जसा सास्कृतिक भेद होता तसाच तो देश्य आर्य आणि नवीन आलेले आर्य यांच्यांतहि होता. नवीन आलेल्या आर्यांचें वाङ्मय वेदांतील सूक्तें होत.

पण देश्य आर्य लोकांचें वाङ्मय निराळें आहे. सूतांनीं सांगितलेल्या कथा उर्फ इतिहासपुराणें हें स्थानिकांचें वाङ्मय होतें. त्यामुळें नवीनांच्या संस्कृतीस मात्र संस्कृति हें नांव दिलें आहे. जुन्या लोकांमध्यें देखील अनेक निरनिराळ्या जाती व संस्कृती होत्या. शक व मग यांची वसाहत देशांत वेदपूर्वकालीन आहे. आणि जुन्या आणि नव्या लोकांच्या संस्कृतीचें एकीकरण जेव्हां मोठमोठे यज्ञ होत त्यावेळेस झालें. वैदिक वाङ्मयाच्या संहिता बनल्या त्या कांहीं अंशीं नवीन सूक्तें झालीं त्याच वेळेस बनत होत्या. व्यासाच्या काळीं म्हणजे महाभारताच्या काळीं वेदांचें संहितीकरण बरेंचसें झालें होतें व व्यास शिष्यांच्या काळीं म्हणजे कुरुयुद्धानंतर १०० वर्षांच्या अवधीच्या आंत संहितांचें स्वरूप जळवजवळ आजच्या सारखें झालें इत्यादि गोष्टी मी मांडल्या आहेत. ही एकंदर मांडणी करतांना ज्ञानकोशमंडळांतील मंडळीमध्यें वेदावर चर्चा दररोज होई आणि दाशराज्ञयुद्धानंतर सर्व सूक्तें झालीं असा पक्ष मी घेतला होता. तर रा. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव व श्रौताचार्य धुंडीराज बापट हे विरुद्ध पक्ष घेत. रा. दाते हे प्रथम एक दोन दिवस जरी माझ्या विरुद्ध मताचे होते तरी पुढें ते माझ्याच मताचे झाले व कांहीं दिवसांनी रा. चित्राव व रा. धुंडिराज बापट यांची देखील खात्री पटली. प्रत्येक सूक्त दाशराज्ञ युद्धापूर्वीचें आहे हें कारणासह दाखविणारें कोष्टक रा. दाते यांच्या हातचें आहे.

आमचीं मतें पूर्वीच्या अभ्यासकांपासून निराळीं आहेत हें दाखविण्यासाठीं आम्ही एक पत्रक काढलें होतें. तें पत्रक जगांतील सर्व महत्त्वाच्या युनिव्हर्सिट्यांकडे पाठविलें होतें. त्या पत्रकांत काय आलें आहे हें लंडनटाईम्सच्या लिटररी सप्लिमेंटनें मांडलेंहि होतें पण त्यावर विशेष चर्चा झाली नाहीं त्यामुळें पुस्तकाची जाहिरात परदेशीं होऊन पुस्तकास मागण्या मात्र आल्या.

मराठी ज्ञानकोशास परदेशांतून ज्या संस्थांकडून व युनिव्हर्सिटयां-कडून मागण्या आल्या त्यांची यादी पुढीलप्रमाणें आहे:—

१ रॉयल अँथ्रॉपॉलॉजिकल इन्स्टिटयूट—लंडन.

२ मेसर्स प्रोबस्थियन आणि कं. लंडन.

३ उपसाला युनिव्हर्सिटी—स्वीडन.

४ प्रशीअन स्टॅटबिब्लीओथेक, ओरिएंटॅलिस् अॅबटेलंग—बर्लिन.

५ प्रागच्या युनिव्हर्सिटीची लायब्ररी—चेकोस्लोव्हाकिया.

६ एल्. इकोल फ्रॅन्साइस डी इ एक्सट्रीम ओरिएंट—हॅनोइ (फ्रेंच इंडो चायना).

७ कोलंबिया युनिव्हर्सिटी—न्यू यॉर्क अमेरिका.

८ ग्रोनिंगनची युनिव्हर्सिटी—नेदरलँड्स्.

९ रॉयल लायब्ररी कोपनहेगन—डेन्मार्क.

भारतांतील वेदपूर्व आर्यन् संस्कृति व वैदिक संस्कृतीचा तिजवर घडलेला परिणाम

"महाराष्ट्रीय ज्ञानकोश तयार करण्याच्या कामांत प्रसंगतः वेद वाङ्मयाचा अभ्यास आम्हांला फार बारकाईनें पृथक्करण करून करावा लागला. हा सूक्ष्म पृथक्करणात्मक अभ्यास दहा एक विद्वान अभ्यासक तीन वर्षांवर पावेतों माझ्या देखरेखीखालीं करीत होते. आम्ही ऋग्वेदांतील प्रत्येक पाद तपासून त्याचें वर्गीकरण केलें आहे. ऋग्वेदाच्या मंत्रभागांत प्रतिबिंबित झालेला यज्ञक्रियेचा क्रमानें झालेला विकास आम्ही बारकाईनें तपासला आहे. व हा विकास होत होत त्यांतून श्रौतसूत्रांत दिसून येणारा धर्म कसा उदयास आला त्याचे धागे आम्ही लावले आहेत. हें काम करीत असतां आणि वेदवाङ्मयांतील विषय-सूत्रांचा इतिहास पुराणांतील विषयांशीं संबंध तपाशीत असतां आम्ही कांहीं सिद्धांत बसविले आहेत. हे सिद्धांत पंडितांपुढें ठेवून त्यांच्याकडून या सिद्धांतांचें परीक्षण करून घ्यावें अशी आमची इच्छा आहे. म्हणून हें पत्रक आम्ही काढलेलें आहे. यांत आमचा पुरावा आम्ही दाखल करीत नाहीं. आमचे सिद्धांत मात्र दाखल करीत आहों.

१ ऋग्वेदाच्या मंत्रांत जो इतिहास आहे तो भारतांतील अगदीं पहिल्या आर्यन् वसाहतीचा नाहीं.

२ मंत्रांत ज्या आर्यन् वसाहतीचें चित्र सांपडतें, त्या वसाहतीच्या अगोदर आर्यन् महावंशांत मोडतील अशा जातीचें वास्तव्य देशांत झालेलें होतें. पूर्वबंगाल व महाराष्ट्र वगळून आज आर्यन् भाषा बोलणारा जेवढा प्रदेश आहे तेवढा किंवा थोडासा कमी अधिक प्रदेश सदरील आर्यन् जातींनीं व्यापला होता. सीलोन किंवा लंकाप्रदेशहि त्या काळीं या आर्यन् वंशाच्या लोकांनीं वसला होता.

३ शक आणि मग या जातीही भारतांत मंत्रकर्त्या लोकांच्या म्हणजे ज्यांनां आर्यन् म्हणण्याचा प्रचार आहे त्या लोकांच्या अगोदर येऊन राहिल्या असाव्या. मांत्रसंस्कृति अथवा ज्या लोकांचा भारत प्रवेश ऋग्वेदांत चित्रित झाला आहे त्या लोकांची संस्कृति, भारतांत अगोदर अस्तित्वांत असलेल्या आर्यन् संस्कृतीहून थोडी निराळी होती. या अगोदरच्या संस्कृतीला प्राचीनतर आर्यन् संस्कृति हें नांव देणें युक्त होईल.

४ प्रचलित समजुतीनें ज्यांस आर्यन् नांव दिलें आहे ते अथवा मंत्रकर्ते लोक भारतांत येण्यापूर्वी तेथील आर्यन् जाती ज्या संस्कृतीचा उपभोग घेत होत्या ती संस्कृति निदान १००० वर्षांची तरी असावी.

५ प्राचीनतर आर्यन् संस्कृतींत समाजाचें धुरीणत्व क्षत्रियांकडे होतें व ब्राह्मण वर्गाचा अभाव होता. आथर्वण विद्येचे लोक थोडेफार तरी या प्राचीनतर समाजांत असावे. हे वेदपूर्वकालीन आथर्वण वर्गीय लोक सामान्य जनतेंत मिसळून गेले असावे, अथवा त्यांची अवनति होऊन गारुडी, भुतें काढणारे, गारपगारी, (गारांपासून रक्षण करणारे) वैगरे वर्ग त्यांतून निघाले असावे.

६ या प्राचीनतर आर्यन् संस्कृतींत लेखनव्यवसायी वर्गाच्या जातीचा असा महत्त्वाचा वर्ग म्हणजे सूतांचा अथवा भाटांचा होता.

७ गंगानदीच्या खोऱ्यांत पूर्वेकडील भागांत एकदां चालू असलेला अथर्व्यांचा यज्ञसंप्रदाय (पुढें मंत्र कर्त्यांचा अग्न्युपासनेचा संप्रदाय नष्ट झाला त्याप्रमाणें) मांत्र आर्यन् येण्यापूर्वीच सर्वस्वी नष्ट झाला असावा. सरस्वती नदीच्या आसपास अथर्व्यांची विद्या थोडीफार जगली असावी.

८ पुराणांतील कथांचे मूळभाग, उपनिषदांतील मताचा बराचसा भाग, जैन व बौद्ध मतांचें पूर्वस्वरूप आणि विद्याधर-गुह्यकादि देवयोनींचे काल्पनिक वर्ग या गोष्टी प्राचीनतर आर्यन् संस्कृतींतील आहेत.

र्लिंगोपासनाहि या संस्कृतितिल असावी. या संस्कृतींत आर्थिक संस्था चांगल्याच उन्नतावस्थेंत गेलेल्या असाव्यात.

९ वाङ्मयांतील विवक्षित राष्ट्रविषयक उल्लेखाची प्राचीनता आणि त्या राष्ट्राच्या भारतभूमींतील वास्तव्याची प्राचीनता या दोन गोष्टींचा घोटाळा करूं नये. एखाद्या राष्ट्राचा उल्लेख वेदवाङ्मयाच्या उत्तरकालीन भागांत आला असल्यास तो त्या राष्ट्राच्या अर्वाचीनत्वाचा पुरावा आहे असें समजून चालूं नये. उल्लेखित राष्ट्र पूर्वेकडील असेल तर त्यास हा नियम विशेष लागू आहे. वेदकालीन ग्रंथकारवर्ग पश्चिमेकडून पूर्वेकडे प्रयाण करीत होता त्यामुळें पूर्वेकडे पूर्वीपासून असलेलें राष्ट्र या वर्गाच्या नजरेस पश्चिमराष्ट्रांच्या नंतर येण्याचा संभव होता. राष्ट्र अधिक जुनें असेल तसें तें अधिक नंतरच्या वाङ्मयभागांत येण्याचा वरील परिस्थितीमुळें संभव आहे.

१० ऋग्वेदसूक्तांचा मोठा भाग विशेषत: मंडलें २ ते ७ यांतील-म्हणजे गोत्रमंडलांतील सूक्तें दाशराज्ञयुद्धाच्या कालीं अथवा त्या युद्धाच्यानंतर रचलेलीं आहेत. ऋग्वेदांतील उल्लेखांवरून व्यक्त होणारा विषय दिवोदास व सुदास यांच्या नेतृत्वाखालीं भरतांचा भारतांत प्रवेश व वसाहत हा आहे; सामान्यत्वानें आर्यन् लोकांचा [illegible] हा नाहीं.

११ वेद हे तीन संहितीकरणाच्या क्रियेनें तयार झाले आहेत. ऋग्वेदमंत्रांत दिसून येणारें सोमयागाचें प्राथमिक स्वरूप बदलून यजुर्वेदांत व ब्राह्मणांत दिसून येणारे अवयवबाहुल्यात्मक विस्तृत स्वरूप ज्या काळीं या यागाला प्राप्त झालें त्या काळीं वेदांचें पहिलें संहितीकरण झालें. सोमयागाचें बदललेलें रूप बाहेरून आलेल्या मंत्रकर्त्या लोकांच्या पुरोहितवर्गानें आपल्याच अकलेनें बसविलें कीं या कामांत या वर्गाला कसा तरी जीव धरून राहिलेल्या स्थानिक पुरोहितांची मदत झाली असावी पण ती कितपत झाली हें निश्चित सांगतां येत नाहीं.

१२ यज्ञ चालू असतां मध्यें मध्यें इतिहास पुराणांचा उपयोग होई. या क्रियेंत दोन संस्कृतींची जोड घालण्याचा प्रयत्न दिसतो. ब्राह्मणांतून ऐतिहासिक गोष्टींचा निर्देश येतो त्यावरूनहि हेंच अनुमान निघतें.

१३ तीनहि संस्करणांची म्हणजे संहितीकरणांची वेदवाङ्मयावर स्पष्ट छाप पडली आहे. ऋग्वेदांतील आठव्या व नवव्या मंडलांतील जीं

सूक्तें सामवेदांत आलीं असून त्या वेदांतील मोठा भाग ज्यांनीं व्यापला आहे तीं सूक्तें मूळच्या मंत्रकर्त्या लोकांबरोबर आलेल्या पण विशिष्ट गोत्रांच्या वाङ्मयांत नव्हतीं. तीं सोमयागाचें उपबृंहण झालें त्या कालीं गोत्रवाङ्मयाशीं जोडलीं गेलीं. तीं घालण्याचा उद्देश सामगायकांनां सोमयागामध्यें स्वतंत्र स्थान देण्याचा असावा.

१४ पहिलें सम्करण झालें त्या काळाच्या सुमारासच सामवेदाचा मोठा भाग तयार झाला असावा आणि ऋग्वेदांत ८ व ९ हीं मंडळें घातलीं असावीं.

१५ दुसरें संस्करण कुरुयुद्धाच्या काळीं झालें असावें आणि या संस्करणाचा कर्ता द्वैपायन व्यास हाच असावा.

१६ तिसरें संस्करण व्यासाच्या नंतर कांहीं काळानें म्हणजे सुमारें ५०।१०० वर्षांनीं झालें असावें.

१७ पहिल्या व तिसऱ्या संस्करणाच्या दरम्यानचा काळ हा पुरोहित वर्गांतील मोठ्या लढ्याचा काळ होता. आरंभीं हा लढा एका बाजूला अथर्वे व दुसऱ्या बाजूला त्रैविद्य (म्हणजे ऋग्वेदी, यजुर्वेदी व सामवेदी) यांच्यामध्यें उपस्थित झाला. हा लढा मंत्रकर्त्या लोकांच्या समाजांतच चालला असावा, त्याच्याबाहेर गेला नसावा.

१८ अथर्वन् लोकांत प्रथम एकाग्निपूजा चालत असे. तिचें स्वरूप कांहीं अंशीं आपणांस गृह्यसूत्रांत पहावयास मिळतें. या अथर्व्यांचे संस्कार लांबलचक नसत, अगदीं थोडक्यांत होणारे असत.

१९ मंत्रकर्ते आर्यन् जसे भारतांत वस्ती करून राहिले, तशी रोजची अग्निपूजा कमी होत गेली, सोम दुर्मिळ झाला, आणि सामान्य जनतेंत यज्ञसंप्रदाय मागें पडला. हळू हळू धंद्याकरतां नव्हेतर पोटाकरतां भिक्षुकी कर्में करणारा अशा अर्थाचें ऋत्विज नांव धारण करणारा धंदेवाईक याज्ञिकांचा वर्ग उत्पन्न झाला. ऋतुपरत्वें म्हणजे प्रसंगानुसार यजन करीत ते ऋत्विज्; ते धंदेवाईक याजक नव्हत. हे ऋत्विज लोक सार्वजनिक वर्गणीनें मोठाले यज्ञ करूं लागले व यज्ञामध्यें लांबलचक विधींचीं व संस्कारांचीं भर यांनींच घातली.

२० ब्राह्मण जातीचा इतिहास हा वेदवाङ्मयाच्या इतिहासाशीं व यज्ञविधीच्या विकासाच्या इतिहासाशीं अन्योन्याश्रयानें निगडित झालेला आहे.

२१ मांत्रसंस्कृतींत अगदीं जुन्यांत जुन्या कालापासून अथर्वे लोक असले पाहिजेत. या संस्कृतींत ते वर्गाच्या रूपानें होते व कीं त्यांची जात होती, त्याचप्रमाणें त्यांचा जात नसेल तर त्यांचा वर्ग पितापुत्रपरंपरेनें चालणारा होता कीं नव्हता हें स्पष्ट होत नाहीं.

२२ अथर्वे लोकांचा वर्ग प्राचीनतर आर्यन् संस्कृतींतहि असावा. परंतु हा वर्ग वर एके ठिकाणीं वर्णिल्याप्रमाणे लवकरच नष्ट झाला असावा.

२३ मांत्रसंस्कृतींत अथर्व्यांची जागा त्यांच्याहून बलिष्ठ अशा वर्गानें म्हणजे त्रयी विद्येचा मूळ उत्पादक व वहिवाटदार, तसेंच उपबृंहित यज्ञसंस्थेंत पौरोहित्य करणारा असा जो वर्ग त्या वर्गानें घेतली. हा वर्ग कांहीं अंशानें अथर्व्यांमधून म्हणजे 'मंत्रद्रष्ट्यां' मधून तयार झाला असावा.

२४ तीन विद्या धारण करणारे असें जें उपबृंहित यज्ञसंस्थेचे पुरोहित त्यांचें पहिलें शिक्षण निराळें असल. समाजामध्यें सामान्य आर्थिक कारणांनींच या लोकांचे वर्ग प्रथम अस्तित्वांत आले असतील. पुढें हे वर्ग यज्ञांत पुरोहितपणाचें काम करूं लागले तेव्हां निरनिराळीं स्वतंत्र कर्मे त्यांजकडे आलीं. या कर्मांची व्यवस्था करण्याच्या हेतूनें विशिष्ट कर्मासाठीं मंडळी या धोरणानें सदरील वर्गांनीं भिन्न वेद स्थापिले. यज्ञविद्येंत या रीतीनें विविधता उत्पन्न झाली.

२५ अध्वर्यूंचा अथवा व्यवस्थापकांचा वर्ग कोणत्या वर्गाच्या पोटांतून निघाला याचा विचार करतां होत्याच्या कर्माचें विविधिकरण झालें तेव्हां त्या होतृवर्गाच्या पोटांतून अध्वर्यूंचा वर्ग निघाला असें दिसतें.

२६ यज्ञपुरोहितांत अथवा ऋत्विजांत एकामागून एक भांडणें झालीं. या भांडणांचा उगम अध्वर्यूंच्या आपसांतील भांडणांत असावा. सार्वजनिक कार्यांत अथवा समारंभांत व्यवस्थापक मंडळी संहतप्रयत्नानें पैसा जमवितात व व्यवस्था करतात. तेव्हां या व्यवस्थापकांत फळया आणि तट पडण्याला जीं कारणें होतात तशींच कारणें वरील भांडणांनां झालीं.

२७ वेदसंहितांची आज उपलब्ध असलेली आवृत्ति तयार केली गेली त्याकाळीं ब्राह्मणांमध्यें वेदांप्रमाणें व शाखांप्रमाणें म्हणजे यज्ञांत कराव्या लागणाऱ्या विशिष्ट कर्मानुसार व ऋत्विजांमधील पक्षानुसार

भेद उत्पन्न झालेले होते. ब्राह्मण तेव्हां वर्गरूपानें असोत वा जातिरूपानें असोत, हे आतां सांगितलेले भेद मात्र तेव्हां जातिभेदाच्या स्वरूपाचे बनलेले नव्हते, असें दिससें. आज या भेदांपैकीं कांहीं प्राचीन काळीं होते तसे शैक्षणिक व धार्मिक स्वरूपाचेच राहिले. कांहीं कृष्ण यजुर्वेदी–शुक्ल यजुर्वेदी–याप्रमाणें पक्षात्मक होते त्यांनां मात्र कालांतरानें जातींचें स्वरूप प्राप्त झालें. सूत्रभेदानुसारहि पुढें भेद झाले परंतु या भेदांमुळें समाजांत फळ्या कांहीं नेहमींच उत्पन्न झाल्या नाहींत. त्रैविद्यांनीं यज्ञसंस्था उपबृंहित केली तेव्हां अथर्वन् लोक एकीकडून या संस्थेंत हक्काचें स्थान मागूं लागले व दुसरीकडून यज्ञकर्मांत कांहीं अर्थ नाहीं असें म्हणून त्या कर्माचा प्रचार कमी करण्याचा त्यांनीं उद्योग चालविला. यज्ञकर्मांत स्थान मिळविण्याच्या हेतूनें त्यांनीं अथर्व संहितेची पुनर्रचना केली. अथर्व्यांची मागणी त्रैविद्यांनीं कांहीं काळ पावेतों कानाआड केली. पुढें त्रैविद्यांत कृष्ण आणि शुक्ल अध्वर्यूच्या नेतृत्वाखालीं पक्ष उत्पन्न झाले तेव्हां शुक्ल अध्वर्यूनीं अथर्वन् लोकांशीं मिळून घेण्याची वृत्ति स्वीकारली, आणि यामुळें अथर्व्यांचें म्हणणें हळूहळू ऐकलें जाऊन यज्ञांत ब्रह्म्याचें स्थान त्यांनां मिळालें. या स्थानाला मिळाला तर फार विद्वान व विचक्षण मनुष्य लागतो तो तसा न मिळाला तर एखादा मूर्खच परवडतो.

२८ वेदांचें तिसरें संस्करण झालें त्याच्या अगोदर त्रैविद्यांचा अथर्व्यांशीं सलोखा झालेला होता. या संस्करणाच्या काळीं यज्ञकर्म मागें पडत चाललेलें होतें. अथर्व्यांशीं समेट व वेदांचें तिसरें संस्करण या गोष्टी घडून येण्याच्या अगोदर ऋग्वेदी लोकांनीं आपल्या वेदांत अथर्व्यांच्या संस्काराविद्येचा समावेश दहाव्या मंडळांत करून घेतला होता; गृह्यकर्म व गृह्यसंस्कार हें जें अथर्व्यांचें क्षेत्र त्यांत पाऊल टाकून आक्रमण करण्याचीहि त्यांची तयारी झालेली होती. अथर्व्यांना हटवीत हटवीत अगतिक करण्याची क्रिया ज्या काळांत गृह्यसूत्रें रचलीं गेलीं व श्रौतसूत्रें तयार होऊन त्यांत ब्रह्म्याच्या मंत्रांचा समावेश केला गेला तेव्हां पूर्ण झाली.

२९ ऋग्वेदांतील मंत्रांत दिसणारा साधा व सोपा याग जाऊन त्याच्या ठिकाणीं संकीर्ण व श्रमसाध्य असा, ब्राह्मणग्रंथांतील विधिवचनांनुसार चालणारा यज्ञ आला त्याकाळीं समाजस्थिति बदलेली

होती. मंत्रकर्त्या 'आर्यन् लोकांबरोबर जो पुरोहितवर्ग भारतांत आला त्याला या काळीं प्राचीनतर आर्यन् संस्कृतीच्या लोकांत व राजन्य वर्गांत वागावयाचें होतें. या नव्या परिस्थितींत यज्ञविषयक विधींचें समर्थन अर्थवादांनीं करतांना पुरोहितांनीं प्रसंग ओळखून अर्थवादांत केवळ खऱ्या इतिहासाचा आश्रय करणें सोडून दिलें, आणि हरिश्चंद्र, भीम, जनक वगैरे नव्या यजमानांच्या पूर्वजांचीं नांवें अर्थवादांत समाविष्ट करून अमुक विधि हरिश्चंद्रानें यज्ञ केला त्या प्रसंगीं प्रचारांत आला, अमुक भीमाच्या वेळीं सुरू झाला असें मंडन त्यांनीं आरंभिलें. तसेंच पंजाबच्या प्रदेशांतील आर्यन् लोकांच्या वस्तींत वेदांतील सूक्तें तयार झालीं तीं गंगाप्रदेशांतील आर्यन् वस्तींत तयार झालीं असें कल्पून हे पुरोहित लोक त्यांचा अर्थ लावूं लागले.

३० ब्राह्मणग्रंथांत पुराणांतील कथांचे उल्लेख आहेत, ते पुराणांतील विस्तृत कथांचे मूल आहेत असें समजूं नये. पुराणांतील कथा, पुराणविद्या ब्राह्मणरचनेच्या पूर्वीच अस्तित्वांत होती व ब्राह्मण ग्रंथांत पुराणकथांचे उल्लेख हे यज्ञकर्म सजविण्यासाठीं पुरोहितांनीं घातलेले आहेत. ''

''याप्रमाणें वेदांच्या सूक्ष्म अभ्यासानें जीं मतें आम्हांला बनवावीं लागलीं तीं सारांशरूपानें वर दिलीं आहेत. या मतांचें पंडितांनीं परीक्षण करावें अशी आमची इच्छा आहे.

आमच्याजवळ असलेला पुरावा पंडितांनां पहावयास मिळाला नाहीं तोंपर्यंत आमचीं मतें त्यांनां मान्य होतील अशी आशा आम्ही करीत नाहीं. आपणांपुढें आज आम्ही केवळ आमची सामान्य कल्पना ठेवीत आहों. व या सामान्य कल्पनेवर आपलें मत आम्ही मागत आहों. या कल्पनेला आधारभूत असलेल्या तपशिलाच्या गोष्टी आज आम्ही मागें ठेविल्या आहेत. या विषयाचें ज्यांनां चांगलें ज्ञान आहे, या विषयाच्या वाङ्मयाशीं ज्यांचा चांगला परिचय आहे ते लोक आम्ही पुढें मांडलेल्या गोष्टींवरून भारतीय समाजाच्या विकासासंबंधीं आमची काय कल्पना आहे ती सर्वस्वीं जरी नाहीं तरी बहुतांशानें ओळखतील व या कल्पनेला धरून चाललयास कांहीं असंबद्धता व असंगति उत्पन्न होते कीं काय तें सांगूं शकतील. आम्ही बसविलेल्या सिद्धांतांची विशेष बारकाईनें तपासणी करण्याची ज्या पंडितांची इच्छा असेल त्यांजशीं पत्रव्यवहारानें विचारविनिमय करण्यांत आम्हांस मोठा आनंद होईल.

वेदादि वाङ्मयाचें संशोधन करून ज्यांचें भारतीय इतिहासावरील मत आमच्या वर निर्दिष्ट केलेल्या मतासारखें जवळ जवळ झालेलें असेल त्यांनीं आमच्याकडे दोन शब्द लिहून धाडण्याची कृपा करावी. आम्ही ज्या मागावर आहोंत त्याच मागावर आलेल्या लोकांनां आमची कल्पना इतरांपेक्षां अधिक चांगली छानतां येईल व त्या कल्पनेंत महत्त्वाचे फेरफार सुचवितां येतील." श्री. व्यं. केतकर

× × × × ×

वरील सर्व मजकूर मराठींतूनहि प्रसिद्ध केला आणि त्यामुळें बऱ्याच लोकांचें लक्ष ज्ञानकोशांतर्गत संशोधनाकडे वेधलें गेलें, हें मात्र येथें सांगतां येईल. या संशोधनावर व्याख्यानें देण्याकरितां संपादकमंडळापैकीं रा. दाते व मी अशा दोघांनांहि आमंत्रणें आलीं होतीं. यावरून महाराष्ट्रामध्यें वेदकालविषयक संशोधनासंबंधानें जिज्ञासा आहे हें मात्र स्पष्ट झालें. यूरोप आणि अमेरिका येथील संस्कृत भाषेच्या अभ्यासकांकडून आमचें म्हणणें एखाद्या पाश्चात्त्य भाषेंत मांडण्यासाठीं इच्छा प्रदर्शित केली गेली आणि प्रो. विंटरनिट्झ यांनीं सांगितलें कीं, जर तुम्ही आपलें म्हणणें इंग्लिशमध्यें मांडलें तर तें जर्मनमध्यें मांडण्याचें काम मी करीन.

प्रकरण ११ वें.

मुद्रणकालांतील संपादन

मुद्रण चालू असतां संपादनाचें काम काय चाललें होतें याची कल्पना देणें अवश्य आहे. वैदिक संशोधन इकडे जरी चालू होतें तरी मुद्रणासंबंधानें लौकर व्यवस्था व्हावी ही आमची इच्छा होती एवढेंच केवळ नव्हे तर संशोधन हें प्रकाशनाला दुय्यम ठेवण्याचीच वृत्ति होती. संशोधन कधींच संपावयाचें नाहीं याची जाणीव आम्हाला होतीच. १९२२ च्या एप्रिल मध्यें मुद्रणशाखा सुरू झाली, तरी तिचें दृश्य फल (म्हणजे ५ वा विभाग) बरेच दिवस दिसलें नाहीं व त्यामुळें लोकांत अविश्वास वाढत होता. कच्चें हस्तलिखित तयार झालें तरी बरीच मंडळी कायम ठेवली आहे याचें कारण काय, इत्यादि संशयगर्भ प्रश्न पुण्यांतील कित्येक शेअर होल्डर आणि वर्गणीदार एकमेकांत विचारीत; आणि त्यांस आपापल्या बुद्धीप्रमाणें उत्तरें देत, आणि हें माझ्या नजरेस आलें होतें.

ज्ञानकोशाचे भाग बाहेर पडत नाहींत आणि ज्ञानकोशमंडळ हें एक वाङ्मयचर्चेचा क्लब आहे आणि त्या क्लबांतील मंडळी आपल्या उपजीविकेचा भार शेअरहोल्डरांवर घालीत आहेत, पुस्तक बाहेर पडत नाहीं तरी मंडळी मात्र राखली आहेत अशा तऱ्हेचा ध्वनि पुण्यांत मधून मधून ऐकू येई. तो शेअरहोल्डर व वर्गणीदार यांच्या बाहेरच्या वर्गांत जास्त येई. स्थानिक पत्रांतून मात्र अशा तऱ्हेची चर्चा आली नव्हती तथापि या तऱ्हेच्या टीकेस उघड तोंड केव्हां फुटेल याचा नेम नव्हता.

आमचें छापणें छापखानदारांच्या दुर्दैवी असमर्थतेमुळें लांबणीवर पडलें होतेंच; पण छापखाना काढण्याच्या विरुद्ध मत डिरेक्टरांत होतें. डॉ. केतकर यांस पगार मिळतो तो छापखानदार म्हणून मिळत नाहीं, त्यांची छापखानदार या नात्यानें किंमत मोठी नाहीं, त्यांनीं आपल्या उत्साहाचा दुरुपयोग करण्याचें कारण नाहीं अशीं मतें प्रतिपादिलीं जात. पण असें प्रतिपादण्यांत प्रतिपादणाऱ्या व्यक्तीचा केवळ स्वार्थ होता असेंहि नाहीं. नागपूरची मंडळी ज्ञानकोशमंडळीनें आपला छापखाना काढावा याच्याविरुद्ध होती. ज्ञानकोशमंडळानें छापखाना काढूं नये म्हणून रा. पाध्ये खटपट करीत होते, व त्यांच्या बोलण्याचा प्रतिध्वनि रा. कठाळे यांच्यामार्फत चालकमंडळांत उठे. दुसऱ्या छापखानदारांनीं काम वेळेवर केलें नाहीं म्हणून आमचे ग्रथ बाहेर पडत नाहींत असें सांगण्याची आज संधि आहे पण तुम्ही स्वतः छापखाना काढल्यास तसें सांगून सुटण्याची संधि गमावाल असेंहि एका गृहस्थानें सांगण्यास कमी केलें नाहीं. ही स्थिति १९२० मध्यें होती; व १९२२ मध्यें देखील ती वृत्ति डिरेक्टरांत होतीच. तीमुळें मी छापखाना डिरेक्टरांस न विचारतां काढला आणि त्यावेळेस आम्ही जरी मुद्रणाचें काम जोरानें सुरू केले तरी त्यावेळेस आम्ही ऑफीसमध्यें काय करीत आहोंत याविषयीं शेअरहोल्डरांनां आणि वर्गणीदारांनां विश्वासांत घेणें अवश्य झालें आणि त्यामुळें १९२२ च्या सप्टेंबरच्या पत्रकांत पुढीलप्रमाणें खुलासा करणें अवश्य झालें.

ज्ञानकोशमंडळाचें उरलेलें संपादकीय कार्य

ज्ञानकोशाचें हस्तलिखित जर जवळ जवळ तयार झालें आहे, तर सध्यां संपादकवर्ग काय करीत आहे, असा प्रश्न वारंवार कित्येक हितचिंतक विचारतात तर त्यांस हें सांगितलें पाहिजे कीं हस्तालिखित

जवळ जवळ तयार झालें तरी त्यांत कांहीं भाग नवीन करून घालावा लागतो. उणीवी वारंवार सांपडतात, लेकांस आपले इष्ट विषय ज्ञानकोशांत आहेत किंवा नाहींत हें छापण्यास सुरवात होण्यापूर्वी पहावें म्हणून आमंत्रण केलें आहेच. त्या आमंत्रणाप्रमाणें कांहींकडून ते (गळालेले विषय) दाखविण्यांतहि येतात.

शिवाय हस्तलिखित छापण्यापूर्वी त्यावर अनेक संस्कार करावे लागतात. लेखनशुद्धि पहाणें, संज्ञांचें एकीकरण करणें, पॅरिग्राफ पाहाणें, प्रत्येक परिच्छेदास सूचक नांव आहे किंवा नाहीं हें पहाणें, पूर्वीच्या परिच्छेदाचा आणि पुढच्या परिच्छेदाचा संबंध चांगला नसला तर दुरुस्त करणें, भाषा तपासणें, संदर्भ तपासणें, कोणता मजकूर कोणत्या टायपांत घालावयाचा याची सूचि देणें, पूर्वी वापरलेल्याच संज्ञा पुढें वापरल्या आहेत किंवा नाहीं हें तपासणें, तसेंच पूर्वी लिहिलेल्या मजकुराची छाटाछाट करून तो लहान करणें इत्यादि अनेक क्रिया कराव्याच्या असतात. याशिवाय जी माहिती अपूर्ण असेल ती पूर्ण करावी लागते; आणि जे लेख लोकांकडून आले आहेत ते वाचून पाहून त्यांतील मजकूर अपूर्ण असल्यास किंवा त्यांत दुरुस्त्या कराव्याच्या असल्यास त्याविषयीं टीप लिहून ती पुन्हां लेखकाकडे पाठविणें, किंवा त्याच्या संमतीनें कचेरींत दुरुस्ती करणें इत्यादि क्रिया सध्यां तयार असलेल्या लेखांवर कराव्या लागत आहेत. याशिवाय हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, जें काम पूर्वी बाहेरच्या लेखकांवर विश्वासिलें होतें तें त्यांच्याकडून १ डिसेंबर १९१९ला जेव्हां आलें नाहीं तेव्हां तें ऑफीसांतच तयार करावें लागलें. त्यामुळें नवीन माणसें शोधणें व ठेवणें इत्यादि गोष्टींत कांहीं काळ गेल्यामुळें नवीन मंडळींकडून झालेलें काम नुकतेंच पुरें झालें आणि कांहीं (फारच थोडें) व्हावयाचें आहे, तें छापावयाच्या काळापर्यंत म्हणजे विशिष्ट अक्षर येईपर्यंत पुरें होईल असा आम्हास विश्वासहि आहे.

कामाचें स्वरूप आणि संपादकवर्गाची मेहेनत

कामाच्या विस्ताराची पूर्ण कल्पना आली म्हणजे ऑफीसमध्यें असलेल्या थोडक्या संपादकवर्गावर काय काम पडतें याची कल्पना येईल. रा. रा. यशवंतराव रामकृष्ण दाते, सर्वोत्तम वासुदेव देशपांडे, चिंतामण गणेश कर्वे, लक्ष्मण केशव भावे, हौत्रवेत्ते चिंतामणभट्ट दातार,

इत्यादि मंडळींचे या वाङ्मयसेवेंत लोकांस न दिसणारे अविश्रांत श्रम लक्षांत घेतले म्हणजे महाराष्ट्रानें याबद्दल त्यांचें किती ऋणी असलें पाहिजे याची जाणीव मुख्यसंपादकापलीकडे इतरांनां असणें शक्य नाहीं. यांच्यासारख्या मंडळीकडून उणीवी भरून काढण्याची महत्त्वाचीं कामें होत आहेत. मुख्य संपादकावर पडणाऱ्या कामाची अगदीं यथार्थ कल्पना देणें शक्य नाहीं. पण कांहीं कल्पना यावी म्हणून थोडासाच हिशेब येथें देतों. समजा, सर्व हस्तलिखित अगदीं शेवटच्या दुरुस्त्या करूनहि तयार आहे; तरी तें छापण्यापूर्वी एकदां तरी वाचलें पाहिजे, गॅलिप्रूफच्या अवस्थेंत एकदां चांगलें पाहिलें पाहिजे, व छापावयाचा हुकूम देण्यापूर्वी त्यावर नजर टाकली पाहिजे. ज्ञानकोशाचें एक पृष्ठ म्हणजे लिखिताचीं फुलस्केपचीं साडेतीन पानें होतात, आणि उरलेले १७॥ भाग म्हणजे ८७९० पृष्ठें छापावयाचीं म्हणजे लिखिताचीं सुमारें तीस हजार पृष्ठें होतात; आणि तीं छापावयाचीं म्हणजे तीन वेठ पहावयाचीं म्हणजे नव्वद हजार पृष्ठ झालीं. हें काम तीस महिन्यांत करावयाचें झाल्यास दर महिन्याला तीन हजार पृष्ठें वाचलीं पाहिजेत. वाचलीं पाहिजेत याचा अर्थ पूर्वोक्त क्रिया झाल्या आहेत किंवा नाहींत हें पाहिलें पाहिजे. महिन्यांतून तीन हजार पृष्ठें व कामाचे दिवस चोवीस हा हिशेब घेतां दररोज शंभरांवर पृष्ठांचें वाचन होतें. रोज सुमारें ३५ पृष्ठें हस्तलिखित वाचलें पाहिजे; तितक्याच पृष्ठांचें रोज गॅलिप्रूफ वाचलें पाहिजे आणि तितक्याच पृष्ठांचें शेवटचें मुद्रित वाचलें पाहिजे. हें काम करावयाचें; शिवाय पैशाचा पुरवठा बरोबर होतो आहे किंवा नाहीं वगैरे पाहणें, आणि खप वाढविण्याकरितां व पैसे उत्पन्न करण्याकरितां योजना करणें वगैरे कामें आहेतच. संपादकाचें वर दिलेल्या हिशेबाप्रमाणें काम किती होतें याची कल्पना करावी, ही सर्व कल्पना काम सर्व तयार—छापावयाच्या स्थितींत आहे असें धरून केली आहे. जेव्हां मजकूर छापावयाच्या स्थितींत नसतो तेव्हां करावयाचें काम निराळेंच. ज्ञानकोशाच्या वाचकवर्गाच्या हातीं दोन भाग आहेतच. त्यांवरून संदर्भ तपासणें वगैरे कामास किती वेळ लागत असेल याची कल्पना होईलच. कामाची व्यापकता लक्षांत आली म्हणजे, जरी थोडा वेळ ग्रंथ बाहेर पडण्यास उशीर लागला तरी ग्राहकांचा धीर सुटणार नाहीं. लोकांस धीर

धरण्यास सांगतों, याचा अर्थ मंद गतीनें काम करण्यास परवानगी मागतों असा मात्र नाहीं.

आमचें काम मंद गतीनें चाललें आहे काय?

हें ठरविण्यासाठीं ज्ञानकोशाच्या ग्राहकवर्गानें हाहि विचार करावा कीं, हा ग्रंथ आमच्याकडून ज्या गतीनें त्यास मिळतो त्यापेक्षां त्यांची फक्त वाचनाची गति अधिक आहे काय? त्यांच्यावर विधानाच्या सत्यतेची जबाबदारी नाहीं, संदर्भ पाहण्याचीहि नाहीं. असें असतां आंतील मजकुराचें आकलन करण्यास लागणारा वेळ मात्र त्यांनीं द्यावा; आणि जर त्यांच्याकडून वाचन आमच्या उत्पादनशक्तीपेक्षां अधिक गतीनें झालें तर आम्हांस मंदगतीनें काम करण्याबद्दल दोष देण्यास तयार व्हावें. असो. आमची गति ठरविण्यापूर्वी दुसऱ्याहि एका गोष्टीचा विचार केला पाहिजे. ती गोष्ट म्हणजे आमच्या कामाचें स्वरूप होय.

अपेक्षेपेक्षां अधिक केलें तें काम

ज्ञानकोशाचें काम आतांपर्यंत होऊन गेलें तें अत्यंत कठिण काम होऊन गेलें. या कामाच्या मानानें पुढील काम फार सोपें आहे. सर्वांत कठिण भाग दुसऱ्या व तिसऱ्या विभागांत येऊन गेला आहे. दुसऱ्या विभागांतील कामाचें महत्त्व पृष्ठसंख्येनें मोजतां येणार नाहीं. दुसऱ्या भागांतील मजकूर अनेक संहितांचें सूक्ष्म पृथक्करण करून लिहिला आहे. परिशिष्ट पृष्ठ ४ व ५ यांमध्यें जें हौत्रवेत्ते दातार यांचें टांचण आलें आहे, तें टांचण एका पृष्ठांत छापतां येतें खरें, परंतु तें करण्यास दीड महिन्यावर अवधि गेला. तसेंच परिशिष्ट पृष्ठ ९ पासून पृष्ठ १२१ पर्यंतचें टांचण करण्याकरितां हौत्रवेत्ते दातार व धुंडिराजशास्त्री बापट यांचे अनेक महिने गेले. वेदाविद्या व गृह्य यांवरहि टांचण करण्यास महिना दीड महिना लागला; आणि काम दिसावयास मात्र तीनच पृष्ठें दिसतें. यापेक्षांहि सगळ्यांत चिकट पण न दिसणारें काम म्हणजे ३७२ पृष्ठांतील अर्ध्या पानावरील कोष्टक पाहावें. तें कोष्टक ऋत्विजांच्या कर्मांच्या विकासाच्या दृष्टीनें म्हणजे ब्राह्मणांतील जातिभेदाच्या इतिहासाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें आहे. आणि तें करण्यासाठीं धुंडिराजशास्त्री यांस पांच संहितांतील सुमारें १२०० उल्लेख शोधून प्रत्येक ठिकाणीं अर्थाची चिकित्सा करून कोष्टक तयार करावें लागलें; व हें

करण्यास सुमारें सहा महिने लागले असावेत (हें कोष्टक करतांनां प्रत्येक ठिकाणच्या उताऱ्याची चर्चा केलेलें हस्तलिखित आमच्या ऑफीसांत जपून ठेवलेलें आहे). भारतीय सामाजिक इतिहासांत अत्यंत महत्त्वाचीं वर निर्देशिलेलीं कोष्टकें होत. वैदिक विषयासंबंधानें महाराष्ट्रांत वाचन मुळींच नाहीं; व समाजांत आहे तेवढेंच ज्ञान लोकांस द्यावयाचें असें आपण ध्येय ठेविलें असतें तर ग्रंथ अत्यंत अल्प उपयोगाचा करावा लागला असता. प्रत्येक विषयासंबंधानें शांतपणें माहिती गोळा करण्याचें काम जर केलें नसतें तर ग्रंथाची उपयुक्तता मोठीशी झाली नसती. अनेक प्रकारचें ज्ञान मराठींत मांडण्याचा हा पहिलाच प्रयत्न होय. अनेक विषयांस वाहिलेला वर्ग समाजांत नाहीं. आणि तरी देखील हा प्रयत्न करतांना असें वाटे कीं, भारतीयेतिहास-पांडित्याच्या बाबतींत तरी हा ग्रंथ जगाच्या पाठीमागें राहूं नये. येवढेंच नव्हे तर भारतीय पांडित्याच्या बाबतींत परिश्रम करणाऱ्यानें महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचें सूक्ष्म परिशीलन केलें नाहीं तर तो विद्येविरुद्ध गुन्हा होईल अशा योग्यतेचा आपला ग्रंथ झाला पाहिजे हें आमचें पहिल्यापासून ध्येय आहे. भारतीय विद्येच्या बाबतींत तरी जगाकडून आपली छी थू होतां कामा नये. हा प्रश्न राष्ट्राच्या मानापमानाचा आहे. हेंच ध्येय मित शब्दांनीं अगदीं प्रारंभीच्या योजनेंत वर्णिलें आहे. आणि या ध्येयास त्या त्या वेळच्या चालकांची—उदाहरणार्थ, रा. फडके व अध्यक्ष डॉ. खरे यांची, मनांपासून सहानुभूति होती; आणि त्यामुळें हें कार्य करतां आलें. या ध्येयाच्या पूर्णतेस मन:पूर्वक सहानुभूति ज्या डॉ. खरे यांच्यासारख्या पूर्वीच्या चालकांनीं दाखविली त्यांचे आभार मानणें अवश्य आहे.

तिसरा विभाग "बुद्धपूर्वजग" यांतहि जीं पानें तयार करण्यास मेहनत पुष्कळ पण दृश्य फल थोडें असा भाग पुष्कळ आहे. तो तयार करण्यांत रा. दाते आणि हौत्रवैत्ते दातार यांनीं पुष्कळ मेहनत घेतली आहे. या दोन पंडितांच्या मेहनतीबद्दल महाराष्ट्रानें त्यांचें ऋणी असलें पाहिजे. हें तो भाग बाहेर पडल्यानंतर लोकांच्या नजरेस येईल. या दोघांचें जितकें मन:पूर्वक सहकार्य झालें तितकें झालें नसतें तर तो भाग तितक्या विशद रीतीनें मंडवितां आला नसता. आज आम्हीं धैर्यानें आणि अभिमानानें म्हणूं शकतों कीं, दुसरा व तिसरा भाग

महाराष्ट्राच्या वेदाविषयक पांडित्याचा दर्जा वाढवील; आणि भारतीय पांडित्याच्या बाबतींत महाराष्ट्रापासून जगास कांहीं तरी शिकावयाचें आहे अशी खात्री उत्पन्न करील. येवढेंच नव्हें तर, महाराष्ट्रीय पंडितवर्गांत हा ग्रंथ आत्मविश्वास वाढवील. या कार्याचें महत्त्व भविष्यत्कालीं दिसून येईल."

मुद्रण चालू असतां जें संपादनकार्य होत होतें त्याचें स्वरूप वरील उताऱ्यांत स्पष्ट दिलें आहे. तथापि या काळांत जो नवा मजकूर झाला तो थोडाथोडका नाहीं. वैद्यक विषयावरील भाग याच काळांत तयार झाला. तसेंच प्रत्येक लेख आजतागाईत करण्याचें कामहि चालू होतें. इतक्यांत एन्सायक्लोपीडियाब्रिटानिकाचे नवीन पुरवर्णाविभाग प्रसिद्ध झाल्यामुळें १९२० पर्यंत मजकूर घालण्याची सोय झाली. त्यानंतरच्या काळामधील मजकूर घालण्यासाठीं वर्तमानपत्राचे तुकडे गोळा करून त्यांचें वर्गीकरण करून ठेवणें चालूंच होतें, तें काम मिस् एच्. कोहन बी. ए. (मिसेस केतकर यांच्या धाकटया भगिनी) यांनीं फार काळजीपूर्वक केलें. शेवटी ते तुकडे गोळा करून संकलित टीप तयार करण्याचें काम त्याच करीत असत.

ज्ञानकोशाचें कांहीं काम तर इतकें उशीरा झालें कीं ज्या दिवशीं ज्ञानकोश पूर्ण छापून झाला त्या दिवशीं संध्याकाळीं ५ वाजतां पूर्ण लिखित हातीं आलें. याप्रमाणें अगदीं लांबणीवर टाकून पण ३१ मार्च १९२७ रोजीं लेख पुरा करून देण्याचें श्रेय प्रो. नाईक यांस आहे. यांच्याकडे स्थितिगतिशास्त्रावर लेख लिहावयास दिला होता पण तो त्यांस ३१ मार्च १९२७ रोजीं ५ वाजेपर्यंत पुरा करतां आला नाहीं. तेव्हां तो फरमा रात्रीं १२ वाजेपर्यंत जागून काढला आणि येणेंप्रमाणें १।४।२७च्या सूर्योदयाच्यापूर्वी ज्ञानकोश पुरा झाला.

प्रकरण १२ वें.

ज्ञानकोश आणि वैयक्तिक प्राप्ति

ज्ञानकोशाचा एवढा खटाटोप केला त्यांत स्वत:ला फायदा काय झाला याविषयीं थोडेसें लिहिलें पाहिजे. जो कोणी मोठें काम करतो त्याला जास्त फायदा व्हावा ही गोष्ट रास्त आहे. तथापि व्यवहारांत तसें होतें असें नाहीं. ज्ञानकोशापासून आज मला विशेष फायदा झाला नाहीं हें

सांगितलें तरी त्याच्या योगानें मला खंत वाटत नाहींत. व्यापारांत फायदा-तोटा आहेच. त्याप्रमाणेंच जें कार्य हातीं घेतलें त्या कार्याच्या उत्कर्षा-पकर्षावर जर त्या कार्यकारी मंडळीचे उत्कर्ष आणि अपकर्ष अवलंबून आहेत तर त्या कार्यांत कांहीं फायदा झाला नाहीं तर त्यांत तक्रार ती कोणास सांगावयाची? ज्ञानकोशाचें कार्य मला दुसऱ्या कोणी सांगितलें नव्हतें, तें मीच उचललें होतें. इतर मंडळींनीं मजविषयीं सहानुभूति बाळ-गून उलट मला मदतच केली असें जर आहे तर मला स्वत:ला प्राप्ति काय झाली हें सांगण्याचें कारण काय ? सांगण्याचें कारण एवढेंच कीं, त्याविषयीं कांहीं तरी मंडळीस जिज्ञासा असेल ती पुरवावी एवढेंच.

मला पगार येणेंप्रमाणें मिळाला:—

ज्ञानकोशाचें कार्य आगस्ट १९१५ मध्यें सुरू झालें. त्या कार्याची जाहिरात करणें, त्यास सहायक मिळविणें वगैरे कामांत जानेवारी २५ (१९१६) पर्यंत वेळ गेला. पदरचा खर्च सुमारें ४०० रुपये झाला. या-वेळेस पगार वगैरे कांहीं मिळाला नाहीं.

काल	महिने	प्राप्ति रु.
१ आगस्ट १९१५ ते १ फेब्रुआरी १९१६	६	०
१ फेब्रुआरी १९१६ ते १ एप्रिल १९१७ (दरमहा ५०)	१४	७००
१ एप्रिल १९१७ ते १ जान्युआरी १९१८ (दरमहा १००)	९	९००
१ जान्युआरी १९१८ ते १ जुलै १९२० (दरमहा ३००)	३०	९०००
१ जुलै १९२० ते १ एप्रिल १९२७ (दरमहा ४२५)	८१	३४४२५
एकूण	१४०	४५०२५

यापैकीं ५१७४—०—६ रुपये रक्कम कंपनीकडून पगारापैकीं येणें होती, व कंपनीमध्यें आपलें पद कायम राखण्यासाठीं खर्च सुमारें ३०० आला (प्राक्झी मिळविणें वगैरेसाठीं) व ज्ञानकोशासाठीं केलेला पण त्यास न आकारलेला खर्च देण्यासाठीं रुपये खर्च झाले ते अजमासें रु. २०० ही सर्व वजा करतां मला ५७०० रुपये वरील प्राप्तींतून वजा केले पाहिजेत. हा सर्व हिशोब घेतां १४० महिन्यांत नक्की प्राप्ति ३९३०० पर्यंत होते म्हणजे फक्त २८० रुपये दरमहा पडतो.

ही प्राप्ति जरी कमी दिसते तरी हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं पहिले २९ महिने कमी पगाराचे असतां मी अविवाहित होतों खर्च बेताचा होता. व

त्या वेळेस प्राप्तीपेक्षां जास्त खर्च(पहिले बिन पगाराचे सहा महिने खेरीज) झाला नाहीं. ते एकोणतीस महिने आणि प्राप्ति हीं वगळतां ३७७०० रुपये १११ महिन्यांत मिळाले. म्हणजे सरासरी तीनशेवीस रुपये महिन्याच्यावर प्राप्ति झाली. ही देखील प्राप्ति कमीच आहे. तरी याप्रकारें दरमहा प्राप्ति फारच कमी झाली असें असतां घरखर्च चालला कसा व या दिवसांतच घर बांधलें कसें हा प्रश्न येईल. याचें स्पष्टीकरण येणेंप्रमाणें करतों. सुमारें २००० रुपये मिसेस केतकर यांचे लग्नापूर्वीचे होते आणि मिसेस केतकर यांनीं २००० रुपये विंटरनिट्झचें भाषांतर केलें त्यावर मिळविले. व त्यानंतर सुमारें ७००० रुपये पगारांतले घातले. बांधलेल्या घरासाठीं खर्च झालेले पैसे वजा जातां घरखर्चासाठीं तीनशेंच्या आसपास शिल्लक राही. ही शिल्लक आणि मिस् कोहन यांना होणारी प्राप्ति मिळून घरखर्च पांचशें रुपयांपर्यंत कसा बसा चालत असे.

ही प्राप्ति आज झाली म्हणून सांगितली ती धोक्याच्या बाहेर नाहीं असें मात्र नाहीं, कारण ज्ञानकोशाला जें कर्ज आहे तें कर्ज वैयक्तिक जबाबदारीवर काढलें असल्यामुळें पूर्वीचें सर्व मिळविलेलें एकदम केव्हां जाईल याची शाश्वति नाहीं. कारण आज एकंदर कर्ज वगैरे सुमारें २६००० आहे. तें देतां आलें नाहीं तर सर्वस्व एका दिवशीं जाणार हीहि शक्यता आहे.

वर दिलेल्या फायद्यापेक्षां जो माझा मुख्य फायदा झाला आहे तो फायदा मात्र कोणीहि घेऊं शकणार नाहीं आणि तो फायदा म्हटला म्हणजे स्वत:च्या कांहीं इच्छा पूर्ण करण्यास मिळालेली संधि हा होय. मला चारहि वेद काळजीपूर्वक वाचावयाचे होते व त्यावर संशोधन करावयाचें होतें. तें करण्याची संधि मला ज्ञानकोशांनीं दिली आणि आज जरी माझें संशोधनफल जगप्रसिद्ध झालें नाहीं तरी तें उद्यां होईल आणि वेदांच्या अत्यंत मोठ्या अभ्यासकांत माझें नांव केव्हां तरी होईल ही माझी खात्री आहे. मी असें म्हणूं शकतों कीं ज्ञानकोशमंडळांत नवीन वैदिकसंशोधन प्रसिद्ध झालें आहे तें जगांतील अत्यंत मोठ्या, वेदाच्या अभ्यासकांच्या सबंध आयुष्यांतील कामाइतकें मोठें ठरेल आणि याचें कारण दहाबारा माणसें हाताशीं घेऊन वेदाभ्यास करण्याची संधि मला मिळाली हें होय. ज्या मनुष्यास पैसा मिळतो त्या मनुष्यास कीर्तीचा लोभ असतो. पैसा हातचा जातो पण कीर्ति लवकर जात नाहीं वैदिक

संशोधन म्हणून माझी कीर्ति झाली नाहीं. हें खरें आहे. ती पुढें होईल अशी माझी खात्री आहे. त्यामुळें मला समकालीनांनीं जरी योग्य अभिज्ञता दाखविली नसली तरी त्याबद्दल देखील खंत मुळींच नाहीं. मला असें वाटतें कीं, मी जें काय लिहिलें आहे त्याची उत्तम प्रकारें जाणीक होण्याइतका ज्ञानविकास भोंवतालच्या जनतेंत नाहीं त्यामुळें लोकांच्या स्तुतिनिंदेचीहि मला फारशी फिकीर वाटत नाहीं. जो पुढें वेदाभ्यासक वर्ग निघेल तो माझें कर्तृत्व ओळखील ही माझी खात्री आहे. तसेंच ज्ञानकोशामध्यें जें समाजशास्त्र घातलें आहे तें जगांतील प्रचलित समाजशास्त्रज्ञांच्यापेक्षां कांहीं बाबतींत वरच्या दर्जाचें आहे हाहि मला आत्मविश्वास आहे तथापि त्याची पारख देखील समकालीन महाराष्ट्राकडून होणें शक्य नाहीं. जें मी लिहिलें आहे तें इंग्रजींत लिहिलें असतें तर त्याचें महत्त्व लोकांस पटलें असतें. मी जें लिहिलें आहे त्याचें खरें महत्त्व जो समाजशास्त्र आणि वैदिक संशोधन यांमध्यें आजतागायत आहे त्यासच पटेल पण त्याच्या दृष्टीस तें आजच पडणें शक्य नाहीं व महाराष्ट्रीय वाचकांस त्याचें महत्त्वहि समजणार नाहीं. ज्यावर लोक मोठमोठाले ग्रंथ लिहितील अशा अनेक गोष्टी विशेषकरून जगद्विकासविषयक सत्यें मी फार थोडया पानांत मांडलीं आहेत आणि अनेक शास्त्रांच्या विकासाविषयीं कांहीं तरी नवीन सांगितलें आहे असें आजतागाईत शास्त्रीय वाङ्मय वाचणारांस दिसून येईल. या सर्व गोष्टी केल्या त्या अर्थात कीर्तीच्या आशेनें केल्या नाहींत. कारण कीर्ति म्हणजे काय तर आपण जें करतो त्याची जाहिरात. ती करण्याकडे जर लक्ष जारत जाऊं लागलें तर काम अपुरें पडतें व कीर्तीची लालसा कर्तृत्व सतत ठेवण्यास आडवी येते. कांहीं वय उलटलें व कीर्ति उपभोगिली म्हणजे कीर्तिलोभाची प्रेरक शक्ति कमी होते.; आजपासून अनेक दशकांनीं माझ्या संशोधनाची जाणीव उत्पन्न होईल ही माझी खात्री आहे. शिवाय कीर्ति तरी कोणाची मिळवावयाची ? सध्याच्या पिढींत जो समाजशास्त्रज्ञ वर्ग आहे तो मला फारच अल्प कर्तृत्वाचा वाटतो व त्यामुळें त्यांच्या प्रसंशेची लालसा माझ्या कार्यक्रमांत बंध उत्पन्न करूं शकत नाहीं.

वर सांगितलेल्या फायद्यापेक्षांहि मला एक आणखी फायदा झालेला आहे असें वाटतें तो फायदा म्हटला म्हणजे मोठालीं कामें करण्यामुळें जें कर्तृत्व अंगीं येतें तें होय. ग्रंथप्रकाशन हें जर क्षेत्र धरलें व त्या क्षेत्रामध्यें आजचें माझें कार्य पाहून जगांतील मोठयामोठया कार्यांशीं तुलना केली असतां तें अगदींच क्षुल्लक भासतें. इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका,

जर्मनी येथील मोठाले प्रकाशक घेतले तर त्यांच्याशीं आमचें काम पासंगालाहि पुरावयाचें नाहीं व शास्त्र आणि वाङ्मय यांच्या विकासास प्रेरणा करणें हें जें प्रकाशकाचें महत्त्वाचें कार्य आहे तें कार्य इतरांच्या मानानें माझ्या हातून फारच थोडें झालेलें आहे; तथापि तें इतःपर याहूनहि जास्त होईल अशी मी आशा बाळगतों.

प्रकरण १३ वें.

ज्ञानकोशाच्या कार्यांतील माझे सहायक.

एखादा युद्धप्रसंग उद्भवला तर त्या युद्धाचें श्रेय मुख्य सेनापतीस येतें, व इतर लोकांची कामगिरी त्या युद्धाचा जास्त अभ्यास करणारांखेरीज इतरांस समजत नाहीं. युद्धांमध्यें अनेक बाजूस मोहिमा होतात आणि शिवाय एका मोहिमेंत अनेक लढाया होतात, त्यामुळें मोहिमांचे सेनापती व लढाईंतील मुख्य इत्यादि अनेक व्यक्तींस महत्त्व येतें, तथापि युद्ध चालू असतां दारूगोळ्याचा पुरवठा चांगल्या प्रकारें कोणी कसा केला आणि त्यांचें त्या बाबतींत जें कार्य होतें तिकडे लोकांचें लक्ष क्वचितच असतें. ज्ञानकोशरचनेचें श्रेय किंवा दोष मुख्यत्वेंकरून मुख्य संपादकाच्याच वांट्यास आले आहेत, आणि ज्या अनेक कर्तबगार आणि एकनिष्ठ व्यक्तींचे प्रयत्न ज्ञानकोशाच्या यशस्वी पूर्णतेस कारण झाले आहेत त्यांच्याकडे सामान्य जनतेचें दुर्लक्ष होणारच पण कार्याचें खरें स्वरूप जाणूं इच्छिणाऱ्यानें त्याकडे दुर्लक्ष करणें कधींहि योग्य होणार नाहीं.

ज्या माझ्या सहायकांच्या अंतःकरणपूर्वक सहाय्यामुळें हें काम मी अनेक अडचणीतून जवळजवळ पार पाडूं शकलों त्यांचा मी ऋणी आहे आणि त्यांचें कर्तृत्व आणि योग्यता ही महाराष्ट्रानें ओळखली पाहिजे असें मला वाटतें. मी अभिमानानें असें सांगूं शकतों कीं ज्ञानकोशाच्या संपादनखात्यांत अनेक अशी मंडळी आहेत कीं त्यांनीं संपादकीय कार्याकडे लक्ष न देतां शिक्षणाकडे लक्ष दिलें असतें तर ते ज्या कॉलेजांमधून शिकवावयास गेले असते त्या कॉलेजांच्या इतिहासांत देखील त्यांचा अत्यंत गौरवपूर्वक उल्लेख करावा लागला असता, एवढेंच नव्हे तर प्रसिद्ध विद्वान म्हणून त्यांची ख्यातीहि झाली

असती. ही मंडळी ज्ञानकोशाच्या कामाला लागल्यामुळें त्यांचें जसें द्रव्यदृष्टीनें नुकसान झालें आहे. तसेंच सामाजिक महत्त्व या दृष्टीनेंहि नुकसान झालें आहे. ही गोष्ट मला मोठ्या खेदानें कबूल करणें भाग आहे.

मोठ्या कार्याच्या यशस्वी परिसमाप्तीस केवळ पत्करलेल्या कामास लागणारें कौशल्य असल्यानें निभाव लागत नाहीं. सर्वांनीं एका शिस्तीनें चालण्याची संवय, त्याप्रमाणेंच अडचणीच्या प्रसंगीं धैर्य, तसेच मुख्याला त्रास न देतां त्याच्याशीं सर्व प्रकारें सहकारिता करण्याची वृत्ति हीं सर्व लागतात. आमच्या मंडळींत एकशिस्तीनें चालण्याची संवय कितपत आहे हें त्यांनीं ज्ञानकोशाहून निराळें एक स्वतंत्र कार्य करून दाखविलेंहि आहे त्यावरून समजेल. पुण्याची सरस्वतीमंदिर ही संस्था पुष्कळांस माहीत नसेल. माहीत नसण्याचें कारण एवढेंच कीं, कर्तृत्वाच्या मानानें जी बेसुमार जाहिरात अनेक प्रयत्नांत दिसून येते तिच्याविरुद्ध या संस्थेच व्यवहारनीति आहे हें होय. आणि ही गोष्ट सर चुनीलाल मेहता यांसारख्या गृहस्थांसहि पटली आहे. सरस्वतीमंदिरानें पुण्यांतील अत्यंत अडचणींत असलेल्या तरुण स्त्रीपुरुषांस विद्यादान केलें आहे, एवढेंच नव्हें तर शिक्षण इतकें चांगलें दिलें कीं या संस्थेच्या हायस्कूलाच्या मॅट्रिकचा निकाल पुष्कळ सरकारी व प्रसिद्ध खाजगी शिक्षणसंस्थांस मत्सर उत्पन्न करतील. या संस्थेच्या मंडळीमध्यें मी नाहीं आणि वर्षांतून एकाद्या दिवशीं पाहुणा म्हणून जाण्याच्या खेरीज मी या मंडळीशीं सहकारिता कोणत्याहि तऱ्हेनें केली नाहीं तथापि ज्ञानकोशाच्या आफीसमध्यें जें एकच काम करण्याचें वळण लागलें तें या संस्थेच्या यशास कारण झालें असा गौरवयुक्त जेव्हां उल्लेख करण्यांत येतो तेव्हां मात्र मला आनंद झाल्याशिवाय रहात नाहीं. एवढी एक गोष्ट खरी कीं अत्यंत विरुद्ध मताची मंडळी एकत्र जमून हें कार्य चालवीत आहे. सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांसारखें ब्राह्मण्याचे पुरस्कर्ते आणि रा. गवंडी यांसारखें आवेशी सत्यशोधक या दोघांचेंहि सहकार्य या संस्थेंत झालें होतें. एवढेंच नव्हें तर या संस्थेची योजना प्रथम तयार झाली तेव्हांपासून अत्यंत भिन्न मताची मंडळी एकत्र काम करीत आहेत. ही भिन्नमतांची मंडळी एकत्र येणें व मतें भिन्न असतां देखील एकत्र काम करणें शक्य आहे याची जाणीव त्या सरस्वती मंदिराच्या

कार्यकर्त्यांस होण्यास त्यांचा ज्ञानकोशमंडळांतील अनुभव कारण झाला असें म्हणण्यास मला शंका वाटत नाहीं.

ज्ञानकोशाची सेवा ज्यांनीं मोठ्या एकनिष्ठतेनें केली अशी मंडळी मी शोधून काढली असें श्रेयहि मला मिळूं शकत नाहीं. ज्या मंडळीस आस्था होती अशी मंडळी आपोआपच चिकटली गेली; कां कीं ज्यांस आस्था नव्हती अशी मंडळी चिकटूनच राहिली नाहींत.

ज्ञानकोशमंडळांत काम करणारी मंडळी आजपर्यंत दोनशेंच्यावर होऊन गेली. त्यांपैकीं कांहीं प्रोफेसर वगैरेंच्या जागांवर पूर्वी काम करून ज्ञानकोशमंडळांत मागाहून आलीं तर कांहीं मंडळी अगोदर येथें काम करून मागाहून प्रोफेसर बनली. अगोदर प्रोफेसरचें काम करून मग ज्ञानकोशमंडळांत आलेल्या मंडळीमध्यें प्रामुख्यानें नांव घ्यावयाचें झाल्यास प्रो. वैजनाथ काशीनाथ राजवाडे एम् ए. (फरग्युसन कॉलेज) यांचें नांव देतां येईल. त्याचप्रमाणें ज्ञानकोशमंडळांत काम करीत असतां ज्यांची प्रोफेसर म्हणून नेमणूक झाली त्यामध्यें प्रो. डॉ. वैद्य यांचें नांव देण्यांत येईल. ज्ञानकोशमंडळांत असतां ज्यांनीं एल् एल. बी. चा अभ्यास केला व नंतर जे वकील, मुनसफ किंवा तहसिलेदार झाले अशी मंडळी तर पुष्कळच आहेत. या सर्व मंडळीचा प्रयत्न ज्ञानकोश-मंडळास सहाय्यक झाला पण ज्ञानकोश-मंडळाची खरी भिस्त या संस्थेस जे अनेक वर्षें चिकटून राहिले त्यांच्यावरच होती हें विशेष सांगावयास नको च.

ज्ञानकोशाच्या कायम सेवकांमध्यें अत्यंत महत्त्वाचा कार्यभाग ज्यांनीं उचलला अशी मंडळी म्हटली म्हणजे रा. यशवंत रामकृष्ण दाते बी. ए. एल्एल्. बी. आणि रा. ग. ना. टिळक ही होत. रा. ग. ना. टिळक यांचें नांव ज्ञानकोशाच्या पुस्तकावर कोठेंहि दिसत नाहीं म्हणून त्यांचें काम कमी महत्त्वाचें असें धरणें म्हणजे अगदीं चुकीचें होईल. त्यांच्या कामामुळें मला पुष्कळच स्वास्थ्य प्राप्त झालें. सुमारें पावणेचार लाखांचा आतांपर्यंत व्यवहार झाला. त्या सर्व व्यवहाराचा हिशोब रा. टिळक यांनीं अत्यंत काळजीपूर्वक ठेविला एवढेंच नव्हे तर वसुलीमध्यें व लोकांस माल बरोबर पाठविला जावा म्हणून यांनीं फारच काळजी घेतली. ज्ञानकोशाचा पावणेचार लाखांचा सर्व हिशोब

त्यांच्या हातानें लिहिलेला आहे. त्यांच्या हिशोबीपणामुळें ते नेहमीं इतरांस प्रिय होते असा मुळींच भाग नाहीं. तर त्यांच्या काळजीपूर्वक हिशोब ठेवण्यामुळें आणि पुष्कळदां दिसून येणाऱ्या रागीटपणामुळें ते ऑफिसमध्यें थोडेसे अप्रियच असत व त्यामुळें त्यांच्या व इतरांच्या अनेक चकमकी मजकडे येत. प्रो. राजवाडे यांच्याकडे पुणें शाखेचा व्यवहार कांहीं दिवस होता त्या वेळेस त्यांच्या हिशोबांत एक पैशाची कोठें चूक निघाल्यामुळें ती चूक दुरस्त करण्यासंबंधानें जेव्हां अनेकदां टिळक यांच्याकडून पत्रें गेलीं तेव्हां प्रो. राजवाडेहि रागावले होते. त्या वेळेस जें काय झालें होतें तें एवढेंच कीं, अमुक रुपये अमुक आणे एका मनुष्यास देऊन तसा खर्च प्रो. राजवाडे यांनीं लिहिला होता. पगारपत्रकांत मात्र त्या मनुष्याचा हिशोब देतानां पुरे आणे लिहिले नसून पावणे अमुक आणे असें लिहिलें होतें व त्याची सही घेतली होती. अगोदर पुणें ऑफीसकडून जमाखर्च लिहून आला त्याप्रमाणें नागपूरच्या ऑफीसांत तो लिहून गेला. आणि व्हाऊचरें मागाहून आलीं. तेव्हां व्हाऊचर आणि लिहिलेला हिशोब यांत फरक दृष्टीस पडला व पत्रव्यवहार सुरू झाला. टिळकांनीं अडचण उपस्थित केली, ते म्हणाले, व्हाऊचर बदलून आणा. राजवाडे म्हणाले, एका पैशाकरितां मी व्हाऊचर बदलायला जाणार नाहीं पाहिजे तर तो पैसा मजकडून घ्या. टिळक म्हणाले हिशोब पूर्ण आणे म्हणून लिहिला गेला. याप्रमाणें पत्रव्यवहार होऊन शेवटीं तें प्रकरण माझ्यापर्यंत आलें, अर्थात त्याला उपाय म्हणजे एक पैसा जास्त दिला असें प्रो. राजवाडे यांच्या सहीचें व्हाऊचर करून घ्यावयाचें; व तें त्याप्रमाणें पुढें घेतलें जाऊन प्रकरण मिटलें!! रा. टिळक यांच्यामध्यें केवळ कागदी हिशोबीपणाच होता असें नाहीं तर गिऱ्हाइकांशीं कंपनीनें अत्यंत प्रामाणिकपणानें वागावें याविषयीं हे दक्ष असत. कंपनीला चुकून जास्त पैसे मिळाले म्हणजे कंपनीचा फायदा झाला अशी भावना रा. टिळक यांनीं कधींहि ठेवली नाहीं. कोणी चुकून जास्त पैसे पाठविले म्हणजे त्यांचें त्यांस कार्ड गेलेंच. या प्रकारच्या अत्यंत कसोशीच्या वृत्तीमुळें कंपनीच्या चोख व्यवहाराचा महाराष्ट्रांत लौकिक वाढला आणि त्या लौकिकाचें श्रेय बहुतेक सर्वांशीं रा. टिळक यांच्याकडेसच आहे. टिळकांच्या सतेतोड स्वभावामुळें ज्ञानकोशमंडळांत बऱ्याच अख्यायिका

सांगण्यासारख्या उत्पन्न झाल्या आहेत. पण त्या येथें दिल्यास जागा बरीच अडेल म्हणून त्या देतां येत नाहींत.

ज्ञानकोशाच्या मुख्य संपादकीय कामाचा भार ज्यांच्यावर पडला असे गृहस्थ म्हटले म्हणजे रा. यशवंत रामकृष्ण दाते बी. ए. एल्एल्. बी. हे होत. ज्ञानकोशमंडळाचा धंदा 'आर्फाशिअली' सुरू व्हावयापूर्वी एक महिना ते अगोदर आले. हे प्रथम आमच्याकडे दोन महिन्यासाठीं कामाला आले. पुढें त्यांस वकिली करावयाची होती. तथापि दोन महिन्यांत ते कामांत इतके रंगले कीं, त्यांनां ज्ञानकोशमंडळ सोडावेसें वाटलें नाहीं. त्यांनां आल्याबरोबर गोषवारे काढण्याची तालीम कांहीं दिवस मिळाल्यानंतर त्यांच्याकडे वाङ्मयसूचि करण्याचें काम देण्यांत आले. तें काम त्यांनीं व रा. देशमुख नांवाच्या एका कायस्थप्रभु तरुणानें बरोबर केलें त्यामुळें त्या दोघांचीं नावें सूचीचे संपादक म्हणून सूचीवर आढळतील, सूचीचें साहित्य जमविण्यांत त्यांनीं केवळ सांगकाम्यासारखें केलें नाहीं. सूचीमध्यें सरकारकडे नोंदल्या गेलेल्या पुस्तकांचाहि उल्लेख आहे एवढेंच नव्हे तर न नोंदल्या गेलेल्या अनेक पुस्तकांचा उल्लेख आहे. हें काम करण्यासाठीं पुस्तकांच्या दुकानांचे अनेक चालू आणि अनेक जुने बयाटलाग जमा करणें, सरकारजमा झालेल्या पुस्तकांची यादी मिळवणें इत्यादि अनेक कामें रा. दाते व देशमुख या जोडीनें स्वयंप्रेरणेनें केलीं आहेत. सूचीच्या कामाचें महत्त्व पटल्यामुळें आपण कांहीं तरी महत्त्वाचें काम करीत आहोंत ही भावना रा. दाते यांस होतीच पण सूचीचें काम करीत असतां रा. दाते यांस सुमारें पंचवीस माणसांच्या कामावर देखरेख करावी लागे. त्यामुळें त्यांस थोडीशी अधिकाराचीहि जाणीव झाली असावी आणि त्यामुळें त्या कामांत गोडी ल. ली असावी. सूचीचें काम चिकाटीचें व त्रासाचें होतें पण त्यांतल्यांत्यांत मौजाहि पुष्कळ होत्या. पुस्तक वर्गीकरणाची योजना बनविणें तसेंच कांहीं बाबतींत अगोदर वर्गीकरण करून प्रत्येक वर्गास नांव शोधून काढणें, या प्रकारच्या गोष्टी करतांना पुष्कळ मौजेचे प्रकार उत्पन्न होत. कधीं कधीं गुंतागुंतीचें प्रश्न येऊन त्यावर ताबडतोब निकाल द्यावा लागे. कांहीं वेळेस वर्गीकरण हाताखालच्या कमी शिकलेल्या लोकांकडून होऊन तें पुढें कायम करण्यांत आलें आहे. यामुळे वर्गीकरणांत थोडासा विचित्रपणा उत्पन्न झाला आहे. 'चहा' वरील सामाजिक वाङ्मय हें 'व्यसनें'

या वर्गांत समाविष्ट झालें आहे ! कांहीं वर्गीकरणामुळें थोडी चळवळहि उडालेली आहे. धार्मिक वाङ्मयाचें वर्गीकरण करतांना यूरोपीय वर्गीकरणाचें थोडेसें भाषांतर झालें. आणि तें भाषांतर लोकांनां चीड आणणारें झालें. 'हेरेसी' याचें भाषांतर 'पाखंडें' असें झालें. हेरेसी म्हणजे मुख्य मतापासून भिन्न पण अगदींच बाहेरचें नाहीं असें मत. उदाहरणार्थ, प्रॉटेस्टंट मत हें कॅथलिक मताची 'हेरेसी' होय. याप्रमाणें ब्राह्मसमाजाचें वाङ्मय हें सनातनी हिंदूंच्या दृष्टीनें 'हेरेसी' च वाङ्मय होय. पण 'हेरेसी' याच्या ऐवजीं जेव्हां 'पाखंडें' हा शब्द आला आणि ब्राह्मसमाजाचें वाङ्मय जेव्हां 'अर्वाचीन पाखंडें' या नांवाखालीं वर्गिलें गेलें तेव्हां सुबोधपत्रिकेनें त्याकडे लक्ष ओढून त्यावर टीका करण्यास सुरुवात केली. 'हेरेसी' या शब्दाला 'पाखंड' यापेक्षां अधिक अनुरूप शब्द मलाहि सुचला नाहीं आणि अजून सुचत नाहीं. या सर्व गोष्टींचा मागें उल्लेख आलाच आहे. तथापि पाखंड या शब्दावर जें आकांडतांडव झालें त्या एका गोष्टीमुळें समाजांतील निरनिराळे लोक शास्त्रीय वर्गीकरणासाठीं योजिलेल्या शब्दांच्या मागें 'हेतु' कसे शोधून काढतात हें रा. दाते यांसहि कळून आलें. पत्रकारांनीं टीका माझ्यावर केली पण तीपासून जो बोध घ्यावयाचा तो रा. दाते यांनीं घेतला. जातिविषयक किंवा संप्रदायविषयक सहिष्णुता व त्रयस्थपणा त्यांच्यामध्यें क्रमानें उत्पन्न झालाच पण केवळ सहिष्णुता व त्रयस्थपणा हीं संपादकानें बाळगलीं असतीं तरी केवळ तेवढयानें भागत नाहीं. नकळतपणें आपण दुसऱ्यास कसें दुखवूं शकलों याची जाणीव देखील त्यांस अगदीं लवकर झाली आणि ही गोष्ट देखील चांगली झाली. ब्राह्मण जातीचें महत्त्व स्थापन करण्यासाठीं आम्ही प्रयत्न करीत आहोंत, ज्ञानकोश चित्पावनी ग्रंथ आहे इत्यादि प्रकारची टीका ज्ञानकोश-मंडळ स्थापन झाल्यापासून होऊं लागली होती. तीमुळें आपण किती जपून शब्दयोजना केली पाहिजे या सर्व गोष्टी त्यांस अगोदरच कळल्यामुळें त्यांची संपादकीय कार्यासाठीं लागणारी मनोरचना तयार केली गेली.

रा. दाते यांची प्रकृति चांगली असे, स्वभाव मेहनती, पण अट्टल खेळाडूला लागणारे गुणहि त्यांच्या अंगीं असल्यामुळें त्यांचा संपादकीय व्यवस्थेच्या कामांत चांगला उपयोग झाला. ऑफीसमध्यें खालच्या मंडळींच्या बरोबर खेळून देखील आपला कार्यभाग कसा करून घ्यावा हें

त्यांस समजतें हें मला दिसून आलें. त्यांची स्मरणशक्ति फारच चांगली आहे. मला माझ्या स्मरणशक्तीबद्दल गर्व आहे, तथापि त्यांची स्मरणशक्ति माझ्या बरोबरीची आहे असें मोठ्या आनंदानें मी कबूल करीन. ज्ञानकोशाच्या संपादकीय कार्य–व्यवस्थापकास जर कोणत्या गुणाची आवश्यकता असेल तर ती स्मरणशक्तीची होय. काम दहा वर्षांवर चाललें. कोणत्या विषयावर काय टीपा लिहिल्या आहेत, कोणत्या पुस्तकांतील टीपा तयार होऊन पडल्या आहेत, या गोष्टीची आठवण संपादकास, त्याप्रमाणें संपादकीय कार्यव्यवस्थापकास असावी लागते. त्या बाबतींत रा. दाते यांची आठवण जबरी. काय झालें आहे याची आठवण मला असून त्यांनां नाहीं असे प्रसंग फारच थोडा वेळ आले.

रा. दाते यांचा दुसरा मुख्य गुण म्हटला म्हणजे मेहनतीपणा होय. यामुळें कामामध्यें कधीं कधीं ते वाजवीपेक्षां जास्त मेहनत घेत असत. दिवसभर काम करून पुन्हां रात्रीं प्रुफें वाचीत बसलेले असतां मी यांनां पुष्कळदां पकडलें आहे व त्यांच्या हातांतून प्रुफें हिसकावून घेतलीं आहेत. रा. दाते यांची घरची मंडळी कोंकणांत गेली म्हणजे दाते बसले रात्रीं ऑफीसचें काम करीत! हें सर्व करणें नियमाच्या विरुद्ध होतें, तेव्हां त्यांस सरळ सांगितलें कीं, वेळ जात नसेल तर झोंपा घ्याव्यात, पत्ते खेळावेत, दुसरें कांहीं करावें पण ऑफीसचें काम घरीं करतां कामा नये.

संपादकीय व्यवस्थापकाच्या कामाला अवश्य असणारा आणखी एक गुण म्हटला म्हणजे कोणताहि विषय येवो त्याची माहिती नसली तरी। ती करून घेऊन आलेला लेख वाचून पहाण्याची शक्ति असणें हा होय. हा गुण देखील रा. दाते यांच्या अंगीं चांगल्याप्रकारें दिसून आला. निर्णयसागर छापखान्यामध्यें रा. दाते मुद्रितें वाचीत असतां छापखान्यामध्यें कोणत्या खुणा आहेत याची माहिती प्रसंगीं कंपाझिटरच्या फोरमनला नाहीं पण ती रा. दात्यांनां आहे असें देखील कांहीं वेळ दिसून आलें.

रा. दाते यांच्या खालोखाल ज्यांची नोकरी जवळ जवळ प्रारंभापासून झाली असे गृहस्थ म्हटले म्हणजे कै. सर्वोत्तम वासुदेव देशपांडे. हे गृहस्थ आजन्म अविवाहित होते आणि ज्ञानकोशाचें कार्य चालू असतांच ते क्षय होऊन वारले. त्यांच्या कामाची जाणीव त्यांच्या इतर

सहकारींस इतकी आहे कीं त्यांनीं रा. सर्वोत्तम देशपांडे यांचें नांव ज्ञानकोशाच्या ग्रंथशाळेस देऊन त्यांचें स्मारक करावें अशी सर्वानुमतें विनंति केली आणि ती विनंति डायरेक्टरांनीं मोठ्या आनंदानें मान्य केली. हें नांव देशपांडे हे जिवंत असतां आणि राऊ येथें हवा पालटण्यासाठीं गेले असतांच देण्याचें ठरलें. रा. देशपांडे यांनीं त्यांचें नांव देण्यास परवानगी दिली नाहींच पण त्यांच्या मृत्युसमयीं त्यांनीं आपली खासगी पुस्तकें आणि टिपणें ज्ञानकोश-मंडळास देऊन टाकलीं. ज्ञानकोश-मंडळाचे डायरेक्टर, सपादक, मुद्रक, इत्यादि मंडळीमध्यें संस्थेकडून, जर कोणाचा गौरव केला असेल तर तो याच व्यक्तीचा होय. हा मान दुसऱ्या कोणासहि लाभला नाहीं. देशपांडे मंडळींत मिसळून काम करणारे नव्हते. ते बहुधां एकटेच असत. ऑफीसमध्यें वाटेल तेव्हां त्यांनीं यावें आणि वाटेल तेव्हां जावें अशी त्यांस मोकळीक होती, पण ते बहुतेक वेळ ज्ञानकोशाच्या कामाकडे घालवीत असत. त्यांच्या आयुष्यांत त्यांनां दुसरें कामच नव्हतें. घरीं असले तरी वाचन चालू राही. ऑफीसमध्यें तर वाचन–लेखन हाच कार्यक्रम. ते फार संथपणानें काम करणारे होते. त्यांच्या कामांत घाई नसावयाची. जें काय लिहावयाचें तें शांतपणानें, स्वच्छ अक्षराचें लिहावयाचें. त्यांच्याकडे मुख्य विषय हिंदु इतिहास हा होता त्यामुळें त्यांचा पुष्कळच वेळ टिपणें काढण्यांत आणि वाचण्यांत जाई. त्यांच्या कामाकडे मी कांहींएक पहात नव्हतों. मधून मधून काय काम चाललें आहे, कोणकोणतीं पुस्तकें वाचून टीपा काढल्या एवढी मात्र चौकशी करीत असें.

देशपांडे यांच्या स्वभावाविषयीं लिहिण्यास मला शब्द शोधावयास नको आहेत. तें काम श्री ज्ञानेश्वरांनीं पूर्वीच करून ठेवलें आहे. ज्ञानेश्वरांस त्यांच्या काळांत एखादा सर्वोत्तम देशपांडे दृष्टीस पडला असल्याशिवाय खालील ओळी त्यांस लिहितां येणें शक्य नाहीं.

तरी कवणेंहि विषयींचें । साम्य होणें नरुचे ।
संभावितपणाचें । ओझें जया ॥ १ ॥

आथिलेचि गुण वानितां । मान्यपणें मानितां ।
योग्यतेचें येतां । रूप अंगा ॥ २ ॥

तै गजबजों लागे कैसा । व्याधें रुंधला मृगु जैसा ॥
का बाहीं तरतां वळसां । दाटला जेवी ॥ ३ ॥

पार्था तेणें पाडे । सन्मानें जो सांकडे ।
गरिमेतें अंगाकडे येवोचि नेदी ॥ ४ ॥
पूज्यता डोळां न देखावी । स्वकीर्ति कानीं नायकावी ।
हा ऐसा नो हावीं । सैचि लोकां ॥ ५ ॥

रा. देशपांडे यांच्या मृत्यूनें ज्ञानकोशमंडळाची मोठी हानि झाली असें म्हणण्यास मुख्य अडचण ही कीं त्यांनीं बहुतेक काम करून ठेवलें होतें. पण त्यांच्याविषयीं जी आमची अपेक्षा होती ती ज्ञानकोश आटपल्यानंतर त्यांच्याकडे सबंध मराठी इतिहास देऊन ग्रंथ तयार करविण्याची होय. त्यांच्या मृत्युनंतर थोडक्याच दिवसांनीं विद्यासेवकांत (वर्ष १ अंक १२) जो मृत्युलेख लिहिला तोच येथें अवतरितों.

कै. सर्वोत्तम वासुदेव देशपांडे यांच्या आठवणी

"जुलै महिन्याच्या १२ व्या तारखेस सर्वोत्तम वासुदेव देशपांडे यांचें देहावसान झालें. ही गोष्ट वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालीच आहे. रा. देशपांडे यांच्याविषयीं आम्हांस असें सांगतां येईल कीं एक मोठा विद्यासेवक नाहींसा झाला! रा. देशपांडे यांचें नांव आम्हीं उपसंपादकांत अग्रस्थानीं दिलेलें आहे, यावरून आम्हांस त्यांच्या कार्याचें महत्त्व किती वाटत होतें हें स्पष्ट होईल. रा. देशपांडे यांच्या विषयीं ज्ञानकोशमंडळांतील प्रत्येक व्यक्तीच्या मनांत प्रेम होतें व यास कारणें त्यांचा साधेपणा, व त्यांची कर्तव्यनिष्ठा होत. त्यांच्या साधेपणाचा कांहीं बाबतींत अतिरेक झाला होता. त्यांनां कोणीहि कधींहि आपलें दैन्य सांगितलें म्हणजे त्यास देण्यास यांच्यापासून पैसे निघत. पत्त्यांचे डाव खेळत असतां (हे कोजागरी किंवा अशाच दुसऱ्या प्रसंगीं पत्तेहि खेळत)नेहमी डाव यांच्यावरच येई. कां कीं, दुसऱ्याची कारवाई यांच्या लक्षांत कधींहि येत नसे. विचाराप्रमाचें वागण्याचा यांच्यांत अतिरेक झाल्यामुळें यांनीं साखर टाकून दिलीच होती, व दुध प्यावयाचें तें पितांना त्यांच्या मनांत संकोच उत्पन्न होई. त्यांस वाटे कीं, गाईचें दूध पिऊन वासरांचें दूध कमी करण्यास आपणांस अधिकार आहे काय? ही विचारमाला अधिकाधिक वाढत जाऊन स्वतःचें शरीरदंडन करण्याकडे यांची प्रवृत्ति होऊं लागली. बऱ्याच अंशीं विरक्त स्थिति, कर्तव्यनिष्ठा, आणि निरलस लेखनपरिश्रम यांमुळें यांच्याविषयीं ज्ञानकोशमंडळांतील सर्व लोकांस

आदर होता व त्याप्रमाणेंच त्यांच्या साधेपणाच्या अतिरेकामुळें ते थोडेसे चेष्टचाहि विषय होत, पण ती चेष्टा प्रेममिश्रित असे. ज्ञानकोश मंडळाच्या प्रारंभीच्या दिवसांत ज्ञानकोशाचे अकोल्याचे डिरेक्टर रा. नारायण खंडेराव फडके यानीं देशपांड्यांच्या कामांतील पद्धतशीरपणा पाहून त्यांची चालकमंडळांत प्रशंसा केली होती. त्यांचीं इतिहासावरचीं कांहीं टिपणें कै. वासुदेव शास्त्री खरे यांच्या दृष्टीस पडली. त्या वेळेल ते म्हणाले कीं, इतकीं पद्धतशीर टिपणें रा. देशपांडे करीत असतां आम्हीं येऊन अधिक काय करणार! जर आम्ही पेशवाईचा इतिहास तुमच्यासाठीं लिहावयास घेतला तर तुम्ही देशपांडयांनां आमच्याकडे द्या. ज्योतिष शास्त्राचा इतिहास म्हणून जें विज्ञानेतिहासांत प्रकरण आलें आहे त्यांतील बराचसा भाग रा. देशपांडे यानीं लिहिला होता. तें प्रकरण वाचून रा. व्यंकटेश बापूजी केतकर हे ज्ञानकोशमंडळाच्या ऑफिसांत आले. त्यांच्या मतानें पौरस्त्य व पाश्चात्त्य ज्योतिःशास्त्राचा इतका सरळ आणि समतोल इतिहास त्यांच्या अवलोकनांत नाहीं म्हणून ते अभिनंदन करण्यासाठीं मुख्य संपादकाकडे आले तेव्हां मुख्य संपादकानीं रा. व्यंकटरावजी केतकरांची व ज्यांनीं त्या इतिहासांतील बहुतेक भाग लिहिला त्या दोघा व्यक्तींची म्हणजे (कै. सर्वोत्तम देशपांडे व रा. ल. के. भावे यांची) ओळख करून दिली. तेव्हां व्यकटरावजींनीं रा. देशपांडे यांची पुष्कळ स्तुति केली. तेव्हां रा. देशपांडे एखाद्या फर्जंति केलेल्या व्यक्तीप्रमाणें गांगरून गेले; व तें पाहून पुष्कळ मंडळीस मौज वाटली. देशपांडे यांच्या हातचा मराठेशाहींतील अर्थशास्त्रविषयाचा लेख (ज्ञानकोश-अर्थशास्त्र पहा) वाचून त्यांच्या स्वतंत्र विचाराची खात्री होईल रा. देशपांडे यांच्या इंदूर येथील,बऱ्हाडांतील व पुण्यांतील स्नेही मंडळीस त्यांच्या मृत्यूनें दुःख झालें असेल यांत शंका नाहीं."

रा. चिंतामण गणेश कर्वे बी. ए. आणि रा. लक्ष्मण केशव भावे बी ए. एल्एल्. बी. हे दोघेजण ज्ञानकोशाच्या कामाला वाहिलेलीं माणसें होत. नियमानें काम करणें आणि कोणतीहि अडचण संस्थेवर आली असतां देखील संस्थेला चिकटून रहाणें या गुणांत ही मंडळी कोणासहि हार जाणारी नाहींत. विद्यासेवक सुरू झाल्यापासून रा. कर्वे यांनीं स्वतंत्र माहितीचे चुटके लिहिण्याकडे लेखणी वळवून विद्यासेवकाची लोकप्रियता वाढविण्यास मदत केली आहे. रा. आबा चांदोरकर आमच्याकडे

नवीनच आले आहेत तथापि त्यांस लेखनव्यवसायाची किती आवड आहे हें सांगावयास नकोच.

ज्ञानकोशाच्या कामाभध्यें गुंतलेले, तथापि अन्य कारणामुळें प्रसिद्धीस आलेले गृहस्थ म्हटले म्हणजे पांडुरंग महादेव उर्फ सेनापति बापट हे होत. रा. बापट यांचें चळवळी करणारा गृहस्थ या नात्यानें जें चरित्र आहे तें सुप्रसिद्धच आहे व तें वर्तमानपत्रांच्या द्वारें लोकांच्या पुढें आहे. त्यांच्या चरित्रावर एक लहानसें पुस्तक रा. लालजी पेंडसे यांनीं लिहिलेंच आहे. बापट यांचा ज्ञानकोशाशीं संबंध जोडण्याचें श्रेय प्रो. वैजनाथ काशीनाथ राजवाडे यांच्याकडे आहे. प्रो. वैजनाथ काशीनाथ यांनीं रा. बापट यांची नेमणूक केली व नवीन मंडळीपेक्षां यांना पगार जास्त द्यावा म्हणून त्यांची शिफारस केली व त्याप्रमाणें त्यांची जास्त पगारावर प्रारंभापासून नेमणूक झाली. साधी पण प्रौढ भाषा रा. बापट यांस लिहितां येई हा रा. बापट यांचा विशेष गुण होता. प्रो. राजवाडे व रा. काळे हे पुणें ऑफीसमधून गेल्यानंतर पुणें ऑफिसचें चालकत्व मी पुण्यास येईपर्यंत रा. बापट यांच्याकडे होतें. रा. बापट यांचें व इतर मंडळीचें जुळावयाचें नाहीं म्हणून माझी प्रथम समजूत होती पण ती खोटी ठरली. ऑफिसमधल्या हाताखालच्या मंडळीशीं वागतांना केवळ कडकपणानें न वागतां प्रेमानें वागून तितकेंच काम करून घेण्याचा गुण त्या संधीस त्यांनीं चांगल्या तऱ्हेनें दाखविला. रा. बापट यांच्या चेहऱ्यावर जरी तिरसट आणि रागीटपणाची छटा दिसते तरी त्यांचें वर्तन त्यांच्या चेहऱ्यांशीं विसंगत होतें. रा. बापट ऑफीसमध्यें चांगलेच लोकप्रिय झाले. आणि जेव्हां ऑफीसमध्यें कांहीं सामाजिक प्रसंग किंवा खेळ होत त्यांत ते रा. दाते यांच्या इतकेच उत्साहानें भाग घेत. शीलवती बाईंच्या व माझ्या लग्नाच्या वेळीं रा. बापट हेच पुरोहित होते.

रा. बापट यांस ज्ञानकोशाचे एकनिष्ठ सेवक असें म्हणतां येणार नाहीं. त्यांचें मुख्य ध्येय राजकीय चळवळ हें होतें. त्यांतल्यात्यांत ब्राह्मतेणर जनता किंवा विशेषेंकरून शेतकरी व कामकरी वर्ग यांच्यामध्यें आत्महितसाधनेसाठीं जागृति व्हावी या भावनेचे ते होते. मुंबईमध्यें जेव्हां मेहेतरांचा संप झाला तेव्हां त्यांच्यासाठीं वर्गणा गोळा करणें, त्यांच्या तर्फेनें वर्तमानपत्रांतून लिहिणें इत्यादि गोष्टी त्यांनीं केल्या. जो वर्ग जागृत नाहीं जो जागृत व्हावा आणि त्यांस आपल्या

हक्कासाठीं भांडावयास शिकवावयाचें व तें भांडण भांडतांना त्यांस धीर देऊन नेट उत्पन्न करावयाचा, हें आपलें काम आहे असें ते म्हणत. ज्ञानकोश–मंडळातली पुष्कळशी मंडळी मुळशी पेट्याच्या चळवळीच्या विरुद्ध असतांहि बापट यांनीं त्यांच्याकडून वर्गणी काढलीच. रा. बापट यांचें बाहेरच्या चळवळीकडे जरी लक्ष होतें, तरी त्यांनीं ऑफिसचें काम कधीं चुकाविलें नाहीं. ते कामावर वेळेवर येत. आणि ऑफिसचें काम करावयाचें तें उपजीविकेचें साधन म्हणून करावयाचें तथापि तें इमानानें करावें इतपत त्यांची वृत्ति होती; इतपत वृत्तीचीं माणसें देखील कोणत्याहि कार्यास फार मिळत नाहींत हें देखील सांगितलें पाहिजे.

ज्ञानकोशाच्या कार्यालयांतील काम करणारी वरील मंडळी इंग्रजी शिकलेली होय. जुन्या शिक्षणची तथापि आस्थेनें काम करणारी मंडळी देखील ज्ञानकोशास मिळाली. त्यामध्यें प्रमुख मंडळी म्हटली ग्हणजे, वे. सिद्धेश्वर शास्त्री चित्राव, श्रौताचार्य धुंडीराज बापट व हौत्रवेत्ते चिंतामणभट्ट दातार हे होत. सिद्धेश्वरशास्त्री व श्रौताचार्य बापट यांचा ज्ञानकोशाशीं संबंध तीन चार वर्षांपूर्वी तुटला आणि ते दोघेहि आज सामाजिक कार्याकडे प्रवृत्त झाले आहेत. रा. दातार यांचा ज्ञानकोशाशीं संबंध मात्र अजून कायम आहे. रा. दातार यांच्या आयुष्याचा वृत्तांतहि जरा मनोरंजक आहे. प्रथमपासून त्यांचें शिक्षण याज्ञिकीचें. त्यांत गति किती होती हे त्यांनीं १०–१२ यज्ञांत ऋत्विजाचें काम केलें यावरून स्पष्ट होईल. वे. भाऊशास्त्री लेले यांच्या यज्ञांत देखील रा. दातार यांच्याकडे होत्याचें कर्म होतें.भाऊशास्त्री लेले हे ऋत्विज मंडळीकडून किती कसोशीनें काम घेणारे होते हें बऱ्याच जणांस परिचित असेलच. त्यांनीं होत्याच्यासारख्या जबाबदारीच्या कामासाठीं रा. दातारांची निवड केली होती. दातार कांहीं दिवस कोष्टी बनले होते व त्यानंतर शेतकरी बनले होते व त्यानंतर दातार ज्ञानकोश–मंडळांत आले. ज्ञानकोशाच्या अत्यंत आरंभेवाईक सेवकांमध्यें रा. दातार यांचा अंतर्भाव केला पाहिजे. छापखान्याकडील त्रासाचें काम यांच्याकडे आहे. संपादकीय वर्ग आणि मुद्रणखातें यांच्यामधील दुवा रा. दातार हे होत. तर यांच्या कामाचें महत्त्व थोडेंथोडकें नाहीं. ज्ञानकोश–मंडळाच्या साहाय्यकांत ग्राहक मिळवून आणणाऱ्या व्यक्तींचा उल्लेख जरूर केला पाहिजे. मी नेहमीं हें म्हणत

असे कीं चांगल्या कॅनव्हासरची किंमत मला एका महाराजापेक्षां जास्त आहे. एक महाराज फार तर १०–१२ प्रती घेईल (खरोखर पाहिलें तर बडोदेसरकार खेरीज करून पांच प्रतींच्या वर कोणीहि संस्थान ग्राहक झालें नाहीं). तथापि एखाद्या चांगल्या कॅनव्हासरनें वर्षभर काम केलें तर तो शेंदीडशें प्रती सहज खपवितो. या दृष्टीनें आम्हांस काम करणारांचें महत्त्व अर्थात जास्त आहे. ग्राहक मिळविण्यामध्यें ज्यांची मदत झाली अशांत रा. वासुदेव लक्ष्मण चितळे, विष्णुबाबा अक्कलकोटकर, रा. वामन सखाराम संत बी. ए. यांचीं नावें देतां येतील. या मंडळींच्या कामाचें वर्णन द्यावयाचें म्हणजे कॅनव्हासिंगचें प्रत्येकाचें कौशल्य वर्णन करावयाचें. तें मागें केलेंच आहे. प्रत्येकाच्या कौशल्याचें निरनिराळ्या प्रकारें मागें वर्णिलेंच आहे. त्यापेक्षां जास्त वर्णन देणें म्हणजे या कलेवर पुस्तक लिहिणेंच होईल. तें करण्यास येथें अवकाश नाहीं.

आतांपर्यंत ज्ञानकोशमंडळांतील साहाय्यकांचा जो उल्लेख केला त्यामध्यें एक महत्त्वाची व्यक्ति वगळली गेली आहे आणि ती व्यक्ति म्हटली म्हणजे मुख्य संपादकाची पत्नी होय. सौ. शीलवती केतकर यांचें लग्नापूर्वी व लग्नानंतर जें साहाय्य झालें त्याचें वर्णन करणें सोपें नाहीं. त्या इंग्लंडमध्यें असतांच एका पौंडास १५ पृष्ठें या दरानें त्यांनीं भाषांतर केले होतें व हा दर अत्यंत अल्प होता. कां कीं त्यावेळेस पौंडाची किंमतहि फार थोडी होती. आणि इंग्लंडमध्यें त्यावेळेस प्रत्येक गोष्टीची महागाई होती. असें असतां त्यांनीं हें कार्य केलें तें जवळ जवळ फुकटच केलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. यांनीं तें काम जरी अल्प मजुरीनें केले तरी त्यांना त्याचा पुढें दुसऱ्या तऱ्हेनें फायदा झाला आणि तो म्हणजे प्रो. विंटरनिट्झ जेव्हां हिंदुस्थानांत आले तेव्हां आमचा व त्यांचा परिचय झाला. कलकत्ता युनिव्हर्सिटीला आपल्या ग्रंथाचें भाषांतर करण्याची त्यांनीं परवानगी दिली तेव्हां पुन्हां भाषांतर करण्याचें काम त्यांनीं मिसेस केतकर यांस देवविलें व त्यांत प्राप्ति बरी झाली. त्यावेळेस दुसऱ्यांदा भाषांतर करावेंच लागलें कारण पहिलें भाषांतर माझ्या मागणीप्रमाणें अगदीं शब्दशः केलें होतें व दुसरें भाषांतर इंग्रजी भाषापद्धतीस अनुसरून करावें लागलें. शिवाय हें भाषांतर करतांना प्रो. विंटरनिट्झ मूळांतच फरक करीत असत त्यामुळें नवीन भाषांतराचे पैसे केवळ फुकट मिळाले नाहींत.त्यांत दुसऱ्यांदां मेहेनत पडली होती तथापि काम मिळून रोकडीचा फायदा झाला

यांत शंका नाहीं. आणि ज्ञानकोशाच्या सांपात्तिक स्थितीमुळें घर खर्चासाठीं जर कधीं ओढाताण झाली तर यांतील कांहीं पैसे उपयोगी पडले. मिसेस केतकर यांचें लग्नापूर्वीचें झालेलें काम परिशिष्टांत दिलेंच आहे. व त्यामुळें त्याची पुनरुक्ति करण्याची जरूर नाहीं. त्यांनीं केवळ भाषांतराचेंच काम केलें असें नाहीं तर त्यांनीं कॅनव्हासिंगचेंहि काम केलें आहे; आणि कॅनव्हासिंगच्या बाबतींत त्यांनां माझ्या खालोखाल यश येत असे. त्यांनीं आतांपर्यंत ३।४ हजार रु. ज्ञानकोशाला मिळवून दिले असावेत.

वर सांगितलेली कामगिरी ही त्यांनींच केलेल्या इतर कामगिरीपेक्षां अत्यंत अल्प आहे. त्यांची खरी कामगिरी म्हटली म्हणजे माझें स्वास्थ्य राखणें ही होय. माझें स्वास्थ्य आणि आरोग्य राखण्याकडे त्यांनीं बरीच मेहनत केली व ती कामगिरी मी फारच महत्त्वाची समजतों, मी रोज काय खातों, सिगारेट किती ओढतों,यावर त्यांचें बरेंच लक्ष असे. व या बाबतींत मी त्यांच्या नेहेमी धाकांतच असे.वारंवार डाक्टराकडे नेऊन माझी तपासणी करून घेणें या गोष्टी त्यांनीं केल्या आहेत. एखादें मोठें कोशासारखें काम घेतलें म्हणजे तें पुरें होण्यापूर्वीच कार्यकर्ता मरावयाचा किंवा कार्य आटपल्यानंतर तो मरावयाचा असा पूर्वीचा अनुभव आहे. निदान् महाराष्ट्राला तरी असा कडू अनुभव आलेला आहे. तर अशा प्रसंगीं मुख्य कार्यकर्त्याच्या स्वास्थ्याकडे आणि आरोग्याकडे लक्ष देणें या कार्याचें महत्त्व थोडेंथोडकें नाहीं. आज हें कार्य संपलें तरी दुसरीं अनेक मोठालीं कामें आपण करूं असा जो मनाला आत्मविश्वास वाटत आहे तो वाटण्यास कारण सौ. शीलवती बाईंचीच मेहनत कारण आहे असें मी समजतों.

प्रकरण १४ वें.

ज्ञानकोश व महंमदप्रकरण

ज्ञानकोश हा ग्रंथ महाराष्ट्रीय जनतेसाठीं केला आणि महाराष्ट्रांतील निरानिराळ्या वर्गांतून यास गिऱ्हाइकी मिळाली. गिऱ्हाइकीचें पृथक्करण केलें तर जवळ जवळ दोनतृतीयांश गिऱ्हाइकी ब्राह्मणांतील निघेल. सुमारें ५शें गिऱ्हाइकी संस्थानांतील आहे. सुमारें २५० गिऱ्हाइकी मराठे व तत्सम

जाती यांची आहे व इतर जातींची गिऱ्हाइकी कर्मा आहे. कायस्थ प्रभूमध्यें व पाठारेप्रभूमध्यें मिळून गिऱ्हाइकी ६०च्या आंतच आहे. पारशी व मुसुलमान या दोहोंतील गिऱ्हाइकी १० च्या आंतच आहे. गिऱ्हाइकीच्या मानानें ज्या लोकांनीं या ग्रंथास प्रसिद्धि जास्त दिली असा वर्ग म्हटला म्हणजे मुसुलमानांचा होय. मराठी ज्ञानकोशाकडे एका वेळीं सर्व हिंदुस्थानांतील मुसुलमानांचें लक्ष वेधलें होतें व मराठींतील ग्रंथ सर्व हिंदुस्थानभर माहीत होण्यास महंमद प्रकरण कारण झालें आहे व ज्ञानकोशांतील महंमदाचें प्रकरण हें हिंदुमुसुलमानांतील दुही वाढविण्याचें एक कारण आहे असें कांहीं लोकांस तात्पुरतें वाटूं लागलें होतें. या प्रकरणाची सविस्तर माहिती येथें देतों.—

ज्ञानकोशांतील महंमद प्रकरणासंबंधानें थोडेसें लिहिलें पाहिजे. महंमदासंबंधाचा मजकूर चौथ्या विभागांत आला. सेमेटिक संस्कृतीची जगद्व्यापकता या विषयावर लिहितांना महंमदाविषयीं लिहावें लागलें. तो मजकूर 'एन्सायक्लोपीडिआ ऑफ रिलिजन ॲण्ड एथिक्स' या ग्रंथांत जें महंमदाचें चरित्र प्रसिद्ध झालें आहे त्यांतून घतला होता. प्रो.मार्गोलिथ यांनीं तो लिहिला होता. प्रो. मार्गोलिथ हे आक्फर्ड युनिव्हर्सिटींत अरबी भाषेचे आणि वाङ्मयाचे प्रोफेसर आहेत आणि त्यांचीं मुसलमानी संस्कृतीवर पुस्तकें प्रसिद्ध आहेत. यामुळें त्यांच्या लेखाला ज्ञानकोशाच्या संपादकमंडळानें महत्त्व दिलें यांत कांहीं वावगें झालें नाहीं. आपलें म्हणणें मुसलमानांस पटलें नाहीं तरी तें खरेंच आहे असा प्रो. मार्गोलिथ यांचा अजून आग्रह आहे. या लेखासंबंधानें मुसलमान मंडळीस जी चीड आली तिचें कारण स्वाभाविक आहे. कारण त्या लेखांत महंमदाची कार्यकर्ता मनुष्य म्हणून तारीफ करण्यांत आली होती तरी त्याच्या खासगी वर्तनासंबंधानें अत्यत भयंकर विधानें केलीं होतीं. प्रो. मार्गोलिथ यांचीं विधानें आम्ही प्रथम प्रमाण म्हणून स्वीकारलीं व नंतर महंमदाच्या चरित्राचीं सर्व पानें कापून काढण्याचें ठरविलें; तेव्हां हें कां केलें याचें स्पष्टीकरण करणें अवश्यच आहे. आणि यासाठीं मुसलमान मंडळींनीं जी चळवळ केली त्या चळवळीचा सर्व इतिहास दिला पाहिजे. ह्या इतिहासाचे साधारणतः दोन भाग पाडतातः (१) माझ्या स्वतःच्या मतांत फेरबदल काय झाला याची चर्चा; व (२) मुसलमानांनीं केलेली चळवळ.

महंमदाविषयीं जो लेख होता तो तर चांगल्या ग्रंथाच्या आधारानें घेतला. तेव्हां तो लेख परत कां घेतला आणि तो लेख परत घेण्यास कारण मुसलमान मंडळीची भीति वाटत होती काय? असा प्रश्न उत्पन्न होईल. व यासाठीं यासंबंधाची सविस्तर हकीगत प्रसिद्ध केली पाहिजे. याविषयीं हें सांगितलें पाहिजे कीं जेव्हां या लेखाविषयीं वाद उपस्थित झाला तेव्हां या लेखाविषयीं पुन्हां विचार करूं लागलों. आणि प्रसिध्द केलें त्याच्या सत्यतेविषयीं मला शंका येऊं लागली; ती कां येऊं लागली हें स्पष्ट करीत आहें. गौतमबुद्धाविषयीं मी आपलें म्हणणें परत घेत नाहीं पण महंमदाविषयीं परत घेतलें याचें कारण मुसलमान लोक माथेफिरू आणि मार देणारे आहेत, आणि बुध्दाविषयीं आदर बाळगणारे हिंदु माथेफिरू नाहींत असा आरोप देखील प्रसिध्द झाला आहे. आणि मुंबईच्या बुद्धिस्ट सोसायटीच्या कांहीं सदस्यांनी हा आरोप माझ्या तोंडावर केला. डॉक्टर केतकर हे उच्च शिरावरून खाली उतरले आणि त्यांनीं महंमदासंबंधानें आपलें म्हणणें परत घेतलें. आतां त्यांनीं बुद्धासंबंधानें देखील विधानें परत घ्यावींत अशा अर्थाचें ऋानिकलमधून पत्र प्रसिद्ध झालें. यासाठीं या दोहोंविषयीं माझी भिन्न वृत्ति कां आहे हें सविस्तर दाखविलें पाहिजे. गौतबुध्दावरील लेख आणि महंमदावरील लेख यांत अंतर आहे. गौतमाविरुध्द अत्यंत वाईट मत झालेल्या मंडळींत मी आहे, आणि त्यामुळें मी ज्या मताचा मुख्य अध्वर्यु त्या मताचा मी त्याग कसा करीन? कै. चांदोरकर हे एक बुध्दाविरुध्द अत्यंत कठोर मत व्यक्त करणारे दुसरे एक गृहस्थ होते. तथापि कै. चांदोरकर यांनीं प्रथम बौध्द ग्रंथांचा जोरानें अभ्यास सुरू केला तो केसरींत माझा जातिभेदावरील लेख प्रसिध्द झाल्यावर आणि त्यावर रा. धर्मानंद कौसंबी यांच्याशीं झालेला वादविवाद प्रसिध्द झाल्यावरच सुरू केला असें चांदोरकर यांनीं सांगितलें. ज्या विषयावर अभ्यासक जगापेक्षां माझें मत अगदीं निराळें आहे तें मत मी मांडणारच; आणि त्यानंतर जो वादविवाद होईल त्यांत जें काय सिध्द होईल तें होईल.

महंमदाची गोष्ट निराळ्या प्रकारची होती. महंमदाविषयीं मी कोणत्याहि एका मताचा प्रवर्तक नाहीं. कारण त्याविषयीं माझी माहिती सर्व दुय्यम प्रकारची रहाणार. आपण दुसऱ्या कोणाच्या मतांवर अवलंबून राहून त्याकरितां विनाकारण भांडणें उपस्थित करावीं हें मला योग्य

वाटलें नाहीं. प्रो. मार्गोलिथ आपलें विधान करतात तें इब्न इशाकच्या आधारावर. इब्न इशाकचा ग्रंथहि उपलब्ध नाहीं. ज्याप्रमाणें मेगॅस्थिनीसचा ग्रंथ उपलब्ध नाहीं आणि त्याचें म्हणणें इतर ग्रंथकारांतील उतारे गोळा करून काढावें लागतें त्याप्रमाणें इब्न इशाकच्या ग्रंथाची स्थिति आहे. इब्न इशाकचा ग्रंथ नष्ट झाल्यावर त्याचा आधार सांगून वाटेल तशा गप्पा वाटेल त्या ग्रंथकारानें सांगणें शक्य आहे. म्हणजे महंमदाविषयीं इब्न इशाकनें जें लिहिलें आहे तेंहि निःसंशय उपलब्ध नाहीं. इतक्या गोष्टी असतां त्या इब्न इशाकच्या म्हणून सांगितलेल्या उताऱ्यावर अवलंबून राहून प्रो. मार्गोलिथ यांनीं जें लिहिलें तें सर्व बरोबर आहे असा आग्रह धरून बसणें मला प्रशस्त वाटेना. त्यांतल्या त्यांत बडोद्याचे प्रो. नबाबअल्ली यांनीं मला एक पत्र लिहिलें त्यांत असें दाखविलें कीं इब्न इशाकनें जें पैगंबराचें चरित्र लिहिलें तें देखील केवळ इतिहाससंशोधक या नात्यानें लिहिलें नाहीं. तर तें सरकारी हुकुमानें किंवा आश्रयानें लिहिलें; आणि तें लिहिलें तें ईजिप्तच्या एका जुलमी बादशाहाच्या हुकुमावरून लिहिलें. त्यांत त्या बादशाहाला आपल्या सर्व वागणुकीचें समर्थन करावयाचें होतें, आणि तें समर्थन करावयाचा एक मार्ग म्हटला म्हणजे महंमद साहेब देखील आपल्यासारखेच वागले असें दाखविणें. ज्याअर्थी इब्न इशाकच्या महंमदचरित्रामागें येणेंप्रमाणें हेतू होते त्याअर्थी इब्न इशाकचें म्हणणें विश्वसनीय नाहीं. प्रो. नबाबअल्ली यांनीं पुन्हां असें दाखविलें कीं, प्रो. मार्गोलिथ यांच्या लेखाचें सविस्तर खंडनहि प्रसिद्ध झालें आहे आणि त्या खंडनाचें तयार झालेलें वाङ्मयहि बरेंच आहे असें दाखविलें आणि त्यांतील बरेसचें आमचा लेख प्रसिद्ध होण्यापूर्वी प्रसिद्ध झालें होतें आणि त्याअर्थी जर प्रो. मार्गोलिथच्या लेखाकडे लक्ष देणें आमचें कर्तव्य होतें तर त्याच्या खंडनाकडे देखील लक्ष देणें आमचें कर्तव्य होतें. प्रो. नबाबअल्ली यांचें पत्र आल्यानंतर असें वाटूं लागलें कीं आपण जरी न्यायदेवतेच्या कोर्टांतून दोषमुक्त ठरूं तरी संशोधक वर्गाच्या कोर्टाकडून दोषमुक्त ठरणार नाहीं. या प्रश्नाकडे लक्ष पुरवून त्याविषयीं कांहीं तरी केलें पाहिजे असें मला वाटावयास लावण्याचें जर श्रेय प्रामुख्यानें कोणास द्यावयाचें असेल तर माझ्या मतें त्या श्रेयाचे मुख्य वांटेकरी प्रोफेसर नबाबअल्ली आहेत.

या लेखाकडे हिंदुस्थानांतील सर्व मुसलमानांचें लक्ष ओढण्याचें श्रेय अझमगढ येथील "मारिफ" मासिकास आहे. मारिफ हें उर्दूतील एक चांगलें मासिक गणलें जातें आणि त्या मासिकानें या लेखाकडे अगोदर लक्ष ओढलें. त्या मासिकाचा ताबडतोब परिणाम झाला नाहीं. तथापि त्या मासिकांतील लेखाचा सारांश टाईम्स ऑफ इंडियानें प्रसिद्ध करून त्याच्या चर्चेस चेतना दिली. पुढें क्रानिकलचे संपादक रा. ब्रेलवी यांनीं या विषयाकडे ज्ञानकोश संपादकांचें लक्ष पत्र लिहून ओढलें. आणि त्यामुळें तो प्रश्न चवाठ्यावर आला. त्यावेळेस आम्ही प्रथमच स्पष्टीकरण केलें कीं आम्ही कांहीं पदरचें लिहिलें नाहीं. प्रो. मार्गोलिथ यांच्या लेखावरून मजकूर घेतला आहे वगैरे. पण त्यावर पुढें पत्रव्यवहार वाढला. इतक्यांत मुंबईत मुसुलमानांमध्यें चळवळ सुरू झाली, आणि गव्हरनरकडे डेप्युटेशन पाठविण्याचा विचार ठरूं लागला. या चळवळीचे मुख्य प्रवर्तक रा. कादरभाई नांवाचे ब्यारिस्टर होते. पहिली निषेधाची सभा पायधुणीवरील हामदिया नांवाच्या मशीदींत झाली. आणि त्यावेळेस तेथें अध्यक्ष रा. अबदुलरहीम दिमटिमकर जे. पी. हे होते. ही सभा झाल्यानंतर थोडयाच दिवसांनीं ज्ञानकोशास निजाम राज्यांत बंदी करणारें फर्मान निघालें. त्या फर्मानांत, हामदिया मशीदींत भरलेल्या सभेचा टाईम्समध्यें जो उतारा आला त्याचें अवतरण केलें होतें.

ही सभा झाल्यानंतर रा. दिमटिमकर यांची मी गांठ घेतली आणि त्यावेळेस असें ठरलें कीं, चार मंडळी जमून या प्रश्नावर विचार करावा आणि झालेल्या गोष्टीवर इलाज काढावा. येथें हेंहि सांगितलें पाहिजे कीं, प्रो. नबाबअल्लींचा माझ्याशीं पत्रव्यवहार झाल्यानंतर, आणि माझी व रा. दिमटिमकर यांची भेट होण्यापूर्वी आपल्या पूर्वीच्या लेखावर कांहीं तरी उपाययोजना आपण केलीच पाहिजे असा माझा निश्चय नबाब अल्लींच्या पत्रामुळें झाला होता. प्रश्न एवढाच होता कीं, उपाययोजना कोणत्या प्रकारें करावी. माझें असें मत होतें कीं, महंमद पैगंबरांची बाजू पुढें मांडणारा एक निराळा लेख पुरवणी विभागांत प्रसिद्ध करावा, म्हणजे झालें. केवळ पुरवणी विभागांत दुरुस्ती करावी ही सूचना कांहीं मुसलमान मंडळीस आवडली पण बऱ्याच लोकांस आवडली नाहीं व वाद पुढें जास्त माजला.

माझें व रा. दिमटिमकर यांचें जें बोलणें झालें त्यांत त्यांस ही कल्पना पसंत पडली कीं मुसलमान मंडळीपैकीं कोणी तरी एक चांगला विद्वान त्यांनीं निवडावा आणि त्यानंतर पैगंबरांचें चरित्र पुरवणी विभागांत प्रसिद्ध करावें. प्रो. नबाबअल्ली व प्रो. सर्फराज या दोघांपैकीं कोणास तरी लेख लिहिण्यास आमंत्रण करावें असें माझें ठरलें होतें. मी त्या-वेळेस रा. दिमटिमकर यांस असें सांगितलें कीं मुसलमानांनीं सरकार-कडे जाण्यांत अर्थ नाहीं, कारण सरकारकडे हें प्रकरण गेलें आणि सरकारकडून आम्हाला लिहून आलें म्हणजे मुद्रणस्वातंत्र्याच्या दृष्टीनें आम्हांस सरकारच्या म्हणण्याचा विचार करावा लागेल आणि मुसलमा-नांचा हेतु लांबणीवर पडेल. मुसलमानांनां दुखावण्याचा आमचा उद्देश असणेंच शक्य नाहीं कारण आम्हांला मुसलमानांतून देखील गिऱ्हा-इकी मिळवावयाची आहे. आणि मराठींत मुसलमानांची गिऱ्हाइकी जरी थोडी असली तरी गुजराथीला गिऱ्हाइकी अधिक असण्याचा संभव आहे. आम्ही सत्य मांडणें हें आपलें कर्तव्य समजतोंच आणि मुस्लिम मंडळीनीं प्रो. मार्गोलिथ यांच्या विधानांचें चांगलें निराकरण केलें तर तेंच हिताचें होईल. एखादें विधान लपवून कधींहि फायदा नाहीं. मार्गो-लीथनें लिहिलें आहे तें "इब्न इशाक" नांवाच्या आरबी ग्रंथकाराच्या पैगंबराच्या चरित्रावरून घेतलें आहे आणि मुसलमानास योग्य मार्ग म्हटला म्हणजे इब्न इशाकाच्याच चरित्राचें परीक्षण करविणें हा होय. ज्ञानकोशांतील पानें कापावयास लावण्यासाठीं सरकारकडून आम्हांस समज देण्याची गोष्ट फार कठीण होईल." हें म्हणणें मि. दिमटिमकर यांस पसंत पडलें. व त्यांनीं चळवळ करणाऱ्या मुसलमानांपुढें तें मांडलें, तथापि त्यांच्या सल्ल्यांचा उपयोग झाला नाहीं. तीं पानें डॉ. केतकर यांस कापावयास लावून आपला जोर दाखवावा असेंच कांहीं मुसल-मानांस वाटत होतें.

कांहीं दिवसानीं वर्तमानपत्रांत बातमी प्रसिद्ध झाली कीं मुंबईतल्या ११२ प्रसिध्द गृहस्थांनीं आणि संस्थांनीं या संबंधाचा मुंबईच्या गव्हर-नराकडे अर्ज केला. त्या अर्जाचें स्वरूप येणेंप्रमाणें होतें. त्यांत त्यांनीं माझ्यावर अनेक हेतु लादले होते व पानें कापविण्यास हिंदुस्थान सर-कारकडून मला हुकूम द्यावा असें लिहिलें होतें. हा अर्ज केल्याचें मला कळल्यानंतर "आपलें चार मंडळी मिळून राउंड टेबल करून पुढें काय

करावयाचें याविषयीं विचार करावा असें ठरलें असतां मुसलमान मंडळींनीं सरकारकडे अर्ज कसा केला हें मी अबदुल रहीम यांनां विचारलें तेव्हां त्यांनीं असें सांगितलें कीं "लोक माझ्या सल्ल्याप्रमाणें वागले नाहींत उलट मीच डॉ. केतकरांना फितूर झालों असा माझ्यावरच आरोप करूं लागले, आहेत." अबदुलरहीम यांनीं मला पुढें अंजुमाने झिया-उल-इस्लामचे सेक्रेटरी यांच्यांशी पत्रव्यवहार करण्यास सांगितलें पुढें त्या मंडळीशी मी पत्रव्यवहार केला त्यांत एवढेंच लिहिलें कीं तुम्ही सरकारकडे विनाकारण जाऊन तुमची केस खराब करून घेतली आहे. सरकार बहुतकरून या भांडणांत पडणार नाहीं. आणि पडलेंच तर आम्हांला सरकारशीं मुद्रणस्वातंत्र्यासाठीं प्रतिकार करावा लागेल. आणि त्यावेळेस आम्ही सरकारशीं भांडत बसलों म्हणजे तुमची इच्छा साध्य होणें फार दूर होईल. तथापि सरकारनें तुमच्या करतां कांहीं करावयाचें नाकारलें म्हणजे मात्र तुम्ही मजकडे या आणि मग दोन भले हिंदी गृहस्थ या नात्यानें आपण काय तोड काढायची ती काढूं. त्या संस्थेचे सेक्रेटरीस इंग्रजी चागलेसें येत नव्हतें म्हणून पुढें पत्रव्यवहार त्याच्या ऐवजीं संस्थेचे अध्यक्ष ब्यारिस्टर कादरभाई यांनींच केला.

ब्यारिस्टर कादरभाई यांची व माझी जी भेट झाली त्या भेटीमध्ये पानें कापाविण्याची योजना करण्यापेक्षां पुरवणी विभागांत मुसलमान गृहस्थांस महंमदाचें चरित्र मुसलमानी दृष्टीनें लिहिण्यास आणि मार्क्सलीथ यांचें खंडन करण्यास संधि देणें हें अधिक चांगलें हें पटलें. तथापि त्यांनां यासंबधानें स्वतः संमति देणें योग्य नव्हतें. त्यांना सांगितलें कीं जसें त्यानां पटलें तसे सही करणाऱ्या १२ जणांसें देखील पटेल, व यासाठीं त्या मंडळीची सभा बोलवावी आणि त्या सभेला मला आमंत्रण करावें. आमचें येणें प्रमाणें ठरलें; पण इतक्यांत बोहोरी लोकांचे मुख्य गुरु (बडे मुल्ला) पुण्यास आले होते, व त्या संधीस डॉ. केतकर यांस गांठून या गोष्टीचा निकाल लावावा अशीं कांहीं स्थानिक मुसलमानांची इच्छा झाली. यांत सर इब्राहिम हरून जाफर आमच्याकडे इतर मुसलमान गृहस्थांस घेऊन आले. त्यांची व माझी (मी मुंबईस असल्यामुळें) भेट झाली नाहीं पण त्याची आणि सौ. शीलवतीबाईंची भेट झाली. आणि त्यांनीं मला तार करून बोलवा असा मिसेस केतकर यांस आग्रह केला आणि त्याप्रमाणें मिसेस केतकर यांनीं तार केली,

मोस्लेम पुढारी मुद्दाम मला भेटण्यासाठीं आले होते. मुक्काम थोडे दिवस आहे तर ताबडतोब यावें अशी त्यांची इच्छा आहे अशा अर्थाची सौभाग्यवतीनीं मला तार केली. ही तार पोंचतांच ताबडतोब मी पुण्यास आलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं माझी सर्वांची भेट झाली. त्यांनां देखील पुरवणी विभागांत मुसलमानानें इस्लामी दृष्टीनें लिहिलेलें महंमदाचें चरित्र छापावें ही कल्पना पसंत पडली. व तें अभिवचन देणारें व आपली मुसलमानांनां दुखविण्याची इच्छा नव्हती इत्यादि गोष्टी व्यक्त करणारें पत्र लिहावें अशी इच्छा व्यक्त केली. त्या इच्छेस मी आनंदानें रुकार दिला. आणि त्याप्रमाणें मी पत्र लिहिलें. त्यानंतर सर इब्राहीम यांनीं असें सांगितलें कीं बडे मुल्ला साहेबांची आपणांस भेटावें अशी इच्छा आहे, तर कसें करावयाचें? मी त्यांनां सांगितलें कीं त्यांनी आमच्या ऑफीसला भेट दिली तर आमचा सन्मान झाला असें वाटेल. तेव्हां सर इब्राहीम पुढें म्हणाले कीं आपणच जर त्यांच्याकडे आला तर त्यांनां तर आनंद होईलच पण पुष्कळ मुसलमानांनां आनंद होईल. तेव्हां मी त्यांस सांगितलें कीं त्यांच्याकडे जाऊन त्यांनां भेटण्यास माझी मुळींच हरकत नाहीं. त्याप्रमाणें मी त्यांनां भेटलों. सामोपचाराच्या चार गोष्टी झाल्या व त्यावेळेस मी पत्र त्यांनां लिहिलें होतें तें एका गृहस्थानें वाचावयास सुरवात केली तेव्हां ते गृहस्थ वाचतांनां थोडेसे अडखळूं लागले तेव्हां मींच तें वाचलें. त्यावेळेस हें पत्र मी वाचण्याचा अर्थ पुढें काय करण्यांत येईल अशी माझी कल्पनाच नव्हती. त्या पत्रांत आपण गव्हरनरकडे पाठविलेल्या खलित्याचा जोर काढून घ्यावा किंवा माझ्यावर कोणती विशेष मेहेरबानी करावी अशीहि इच्छा प्रदर्शित केली नव्हती. तर बोहोरी लोकांचे गुरु म्हणजे एक थोर गृहस्थ आहेत त्यांनां आपण भेटण्याची सांधि वांया घालवूं नये एवढ्याच इच्छेनें त्यांस भेटलों होतों. या भेटीच्या वेळेस बोहोरी लोकांच्या गुरूकडून मला एक शाल अर्पण करण्यांत आली. यावरून त्यांचा सन्मान करण्याचा रिवाज हिंदू आचाऱ्यांच्या रिवाजाप्रमाणें आहे असें दिसून येईल.

हें प्रकरण येथें संपलें अशी माझी कल्पना नव्हती; व इच्छाहि नव्हती बडे मुल्ला साहेबांस जें मी पत्र लिहिलें त्यांत माझा हेतु ब्यारिस्टर कादरभाई हे जीं सभा बोलवणार होते त्या सभेच्या अगोदर जिनकी मंडळी अगोदरच माझें म्हणणें समजून माझ्या सूचनेला मान्य होतील तितकी

ज्ञानकाशमंडळाचे काही डायरक्टर



रा. ना. खं. फडके.



रा शां. वि. दांडेकर.



डॉ. भा. ना. [illegible]

ज्ञानकोश विभाग-संपादक



रा. वि. व्यं. आगाशे-स्थापत्य.



रा. ब. ग. कृ. केळकर-कृषिशास्त्र.



प्रो. र. वि. दामले-वनस्पतिशास्त्र.



रा. आर. डी. खांडेकर-कोंबड्या-बदकें.



रा. पां. स. केळकर-विणकाम.



प्रो. वि. ना. हाटे-प्राणिशास्त्र.

मंडळी मिळवावी एवढाच होता. आणि मी जी सूचना करीत होतों तींत माझा मुख्य हेतु मुसलमान मंडळींचें हित पहाण्याचाच होता. कारण तीन हजार प्रतींपैकीं २८०० प्रतींस अगोदरच गिऱ्हाइकी झाली होती आणि पुष्कळांकडे अगोदरच पुस्तकें गेलीं होतीं. अशा प्रसंगीं अमुक अमुक पानें रद्द आहेत असें त्या मंडळींनां कळवून त्या पानांऐवजीं दुसरीं पानें पाठवावींत ही जी मुसलमान मंडळीची इच्छा होती ती त्यांच्या हिताची नव्हती. त्याच्या योगानें केवळ आक्षेप घेतलेल्या मजकुराकडे लोकांचें लक्ष जास्त ओढल्यासारखें होणार होतें. आणि लोकांकडे एखादा मजकूर आम्ही नवीन पाठविला असतां तो मुसलमानांच्या आग्रहामुळें पाठविला असें लोकांस कळलें तर त्याच्या योगानें मुसलमान मंडळीनीं माझ्यावर वजन कसें पाडलें एवढेंच दिसेल. त्याच्या योगानें पैगंबराच्या चरित्रावरचे आक्षेप दूर होणार नाहींत. हें मी मुसुलमान मंडळींस चांगलें समजावून सांगितलें. तथापि मुसलमान मंडळी हट्टास पेटली होती, आणि तीं पानें कापवावींत असाच त्यांचा आग्रह होता. मुसलमान मंडळीचें हें वर्तन आपल्या पैगंबराच्या इभ्रतीच्या रक्षणाचें द्योतक नसून त्यांच्या गर्वाच्या तुष्टीसाठीं खटपट करणारें होतें असें माझें मत झालें तें अजून आहे. पाने कापावींत अशी मागणी बॅरिस्टर कादरभाई यांनीं उत्पन्न केलेल्या ११२ सहीवाल्यांची होती तशीच ती खिलाफतवाल्यांचीहि होती. मि. शौकत-अल्ली यांनीं एक मोठें प्रेमळ पत्र लिहून हीच मागणी केली होती. असो.

बडे मुल्लासाहेबांच्या भेटीनें आणि त्यांस मुसलमान बंधूस दुःख होतें याबद्दल खेद झाल्याचें दाखविल्यानें प्रकरण मिटलें असें मी मुळींच समजलें नाहीं. उलट सही करणारीं एकशेंबारा मंडळी यांच्या भेटीची अपेक्षा करीत होतों; व मुंबईस गेलों तों पत्रांत अनेक गोष्टी वाचल्या. गुजराती पत्रांनीं असें छापलें होते कीं डॉ. केतकर यांनीं बडे मुल्ला यांची माफी मागितली! व त्यांनीं त्यामुळें गव्हरनरला ११२ सह्यांनीं जो अर्ज केला होता त्यावरील आपली व आपल्या एका अनुयायाची सही बडे मुल्लांनीं काढून घेतली; तथापि गुजराथी पत्रांतील हा मजकूर माझ्या नजरेस सहज आला नव्हता. तो माझ्या करारभंगाची गोष्ट म्हणून कादरभाईनीं माझ्या नजरेस आणला. ११२ सहा करणारांनीं माझ्याशीं सहविचार करून जें काय ठरवावयाचें तें ठरवावें असें ठरलें असतां मी

जाऊन त्यांच्यांतला एक मनुष्य फोडला असें मि. कादरभाईंस वाटलें. मि. कादरभाई यांनां स्वत:ला मी सुचविलेला मार्ग पसंत पडूं लागला होता, पण त्यांनीं ठरविलें होतें कीं जें कांहीं करावयाचें तें ११२सह्या करणाऱ्या मंडळीनीं करावें. इतपत आम्हां दोघांचें जुळलें असतां मी पाठीमागें असली फूट उत्पन्न करणाचा कारभार कां केला असें त्यांस वाटलें.

मि. कादरभाई यांनीं मुसलमानांमध्यें फूट पाडण्याचा जो आरोप मजवर केला तो खरा नव्हता हें उघड आहे. मुसलमानांमध्यें आपसांत तंटे लावून मला कांहीं साधावयाचें नव्हतें: माझ्या दृष्टीनें जें मुलमानांनांच हितकर होतें तें समजावून द्यावयाचें होतें.मला तडजोड मुळींच नको होती. मला माझ्या कल्पनेस मुसलमानांची अंत:करणपूर्वक संमति पाहिजे होती आणि त्यासाठीं मला भेदनीति नको होती. भेदनीति माझ्या मतें मुळींच कल्याणकारक नाहीं. मुल्लाजींच्या मंडळीनां देखील माझी सूचना पसंत आहे तर आतां ११२ मंडळीची सभा बोलवावी व पुरवणी विभागांत महंमदी दृष्टीनें पैगंबराचें चरित्र यावें हा ठराव ११२मंडळीकडून पास करून घ्यावा असें सांगण्यास गेलों तेव्हां आपल्या संस्थेच्या सेक्रेटरीबरोबर कादरभाई माझ्या वर्तनाबद्दल आश्चर्य दाखविणारी चर्चा करीत बसले होते. मला पाहिलें तेव्हां कादरभाई म्हणाले कीं तुम्हीं आमच्यांत घोंटाळा केला. हें प्रकरण मिटविण्यास बडे मुल्लांस अधिकार नाहीं. जर कोणास अधिकार असेल तर तो ११२ सहीवाल्यांनां आहे; एकट्या मुल्लासाहेबांनां नाहीं, आणि मुल्लासाहेबांनां तो ११२ जणांचा खलित परत मागाविण्यास किंवा काढून घेतला आहे असें सांगण्यासहि अधिकार नाहीं. मी कादरभाईस सांगितलें कीं, बडेमुल्लांनीं आपला जोर काढून घेतला असें तुम्हीं कसें समजतां ? मी तर त्यांनां तशी कोणत्याच प्रकारें विनंति केली नाहीं जर कांहीं विनंति केली असेल, तर तीं एवढीच कीं, मुसुलमानबंधूंचें मनें दुखवली याच्याबद्दल आम्हांस खेद होतो हें आमचें म्हणणें त्यांनीं सर्व मुसुलमानांस कळवावें. सरकारास केलेल्या अर्जासंबंधानें त्यांनीं कांहीं कारवाई करावी अशी माझी इच्छाच नव्हती. तुम्हीं ११२ मंडळीची सभा अजून बोलवा व आम्ही सुचविलेला मार्ग त्यांनां पसंत पडेल तर ठीकच होईल. आपली आमच्याकरतां ११२ मंडळीची सभा बोलवावी असा जो तुमचा आमचा ठराव झाला आहे तो ठराव

तुम्हीं अमलांत आणावा. तो ठराव मुल्लासाहेबांच्या सेक्रेटरीपाशीं मी दिलेला आहे. मुल्लासाहेबांनी जें काय करावयाचें ते ह्या ११२ सही करणाऱ्या मंडळीशीं संगनमत करून ठरवावें अशी मी मुल्लासाहेबांच्या सेक्रेटरीस सूचनाहि दिली होती; व त्याप्रमाणें सर इब्राहिम हरुन जाफर यांनीं देखील त्या मंडळीशीं पत्रव्यवहार करा नाहीं तर आणखी कांहीं भानगड उपस्थित होईल असेंहि त्यांनीं मुल्लासाहेबांच्या सेक्रेटरीस सांगितलें. कादरभाई व मीं यांमध्यें झालेला "समजाचा" कागद नक्कल करण्यास सेक्रेटरीनीं नेला, तो पुढें परत आला नाहीं.

माझ्या मनांत ही ११२ मंडळीची सभा मुळींच चुकवावयाची नव्हती. कारण ही सभा भरली असती तर मुसलमान मंडळींच्या पुढाऱ्यांची एकाच बैठकींत ओळख होण्याची संधि मिळाली असती, व ही संधि गेली ह्याच्याबद्दल मला खरोखरच नुकसान झाल्यासारखें वाटत आहे. मला माझे कांहीं हिंदु मित्र सांगत होते कीं, तुम्हीं या ११२ मुसुलमानांत जाऊं नका, विनाकारण मार बैगेरे खाल, कारण मुसलमान लोक माथेफिरू आहेत; परंतु त्या प्रकारची भीति मला मुळींच वाटत नव्हती, कारण मुसलमानांतली देखील पुढारी मंडळी पन्नासी उलटलेली व त्यामुळें बरीच संथ डोक्याची, शांतपणें विचार करणारी अशी असणार यासंबंधानें माझी खात्रीच होती या ११२ मंडळींत मी एकटाच जाणार होतों व आपलें म्हणणें मांडून तें योग्य आहे असें पटवून देणार होतों, पण तो योग आला नाहीं. ही ११२ मंडळीची सभा कधींच भरली नाहीं व मुसलमान मंडळी व ज्ञानकोश संपादक यांची तडजोड झाल्यानंतर मला जो मुसलमान मंडळीकडून खाना मिळणार होता तो मिळाला नाहीं. व डॉ. केतकर यांच्या सौजन्यामुळें हिंदु-मुसलमानांत तेढीचा प्रसंग टळला याबद्दल आनंद प्रदर्शित करणारी एक सभा कादरभाई भरविणार होते ती देखील भरली नाहीं. तर ही ११२ सहीवाल्यांची सभा कां भरली नाहीं याचें स्पष्टीकरण केलें पाहिजे.

असें दिसून येतें कीं, बडे मुल्ला व त्यांचे एक अनुयायी या दोघांनीं ११२ सह्यांच्या खलित्यास पूर्वी दिलेला आपला जोर काढून घेतला; हें प्रसिद्ध झाल्यानंतर त्यांनीं तो जोर कां काढून घेतला याबद्दल चर्चा सुरू झाली आणि मुसलमान लोकांच्या हितसंबंधांकडे दुर्लक्ष करण्याचें

काम मुल्ला जीनीं केलें असा त्यांच्यावर आक्षेप घेण्यांत आला तर कित्येकां कडून मुल्लांवर व सर इब्राहीम हरून जाफर यांच्यावर विनाकारण मध्येंच उठाठेव करण्याचा आरोप प्रसिद्ध होऊं लागला. अनेकांकडून असा आक्षेप घेण्यांत आला कीं, बडे मुल्लांनां सर्व मुसलमान समाजातर्फे डॉ. कतकरांनां माफी करण्यास काय अधिकार होता? इत्यादि प्रकारची चर्चा सुरू झाली. मी बडे मुल्लांस आपली सही काढून घेण्यास विनंति केली नाहीं किंवा यांची क्षमा मागितली नाहीं. तर मी त्यांच्यासमोर मुसुलमानांस दुःख झालें याबद्दल खेदाचें पत्र वाचून दाखविलें त्याचा भलताच अर्थ करण्यांत येत आहे असें स्पष्टीकरण प्रसिद्ध करविलें. त्या-वेळेस बडे मुल्लासाहेबांच्या तर्फे असें प्रसिद्ध करण्यांत आलें कीं, मि. कादरभाई हे बोहोरीसमाजांतून बहिष्कार पावलेले गृहस्थ आहेत. तर त्यांनीं ज्यांत पुढाकारपणा घेतला आहे अशा खलित्यावर बडेमुल्लानीं सही करणें हें गैर आहे, असें वाटून बडे मुल्लांनीं आपली सही परत घेतली. यानंतर थोडक्याच दिवसांनीं असें प्रसिद्ध झालें कीं, सरकारनें तो ११२ जणांच्या सह्याचा खलिता परत केला आहे. सरकारकडून अर्ज फेंटाळल्याचें हें प्रसिद्ध झाल्यानंतर पुन्हां चळवळ सुरू झाली. बडे मुल्लांनां जें पत्र लिहिलें होतें तें पत्र तडजोडीची अट घातलेलें पत्र असें समजलें जाऊन तीं तडजोड इतर मुसलमानास मान्य नाहीं असें सांगणारी चर्चा वर्तमानपत्रांतून येऊं लागली; अर्थात ही तडजोड नव्हती तर माझीच सूचना होती. ११२ सहीवाल्यांची बैठक होऊन कांहीं तरी ठरवावयाचें होतें. इकडे मि. कादरभाई ११२ सहीवाल्यांची बैठक बोलविण्याच्या खटपटींत होते व त्यांनीं एक सभा बोलावून त्या सभेला मीं यावें अशी मला तार केली, पण वेळ इतका थोडा होता कीं, त्या सभेला मला जातां आलें नाहीं. आणि त्या वेळेस सौभाग्यवती शीलवतीबाई आजारी होत्या व मीं त्यांस महाबळेश्वरास घेऊन जाण्याच्या गडबडींत होतो व यासाठीं सभेची तारीख पुढें ढकला म्हणून मी तार केली. ती तार देखील पोष्टाच्या गडबडीमुळें कादरभाईंस उशीरा मिळाली. तेव्हां कादरभाईंचा असा समज झाला कीं, सरकारनें हें प्रकरण फेंटा-ळून लावलें आहे त्यामुळें मी मुसलमान पुढाऱ्यांच्या सभेस येण्याचें दुर्लक्ष करितों, पण त्यांचा हा समज चुकीचा होता. प्रकरण सरकारकडे गेलें नसतांनाच मुसलमानांचें म्हणणें मान्य करावें अशी माझी इच्छा होती

व तिचें कारण मागें सांगितलेंच आहे. तथापि मी ती वेळ न साधाल्यामुळें मि. कादरभाई यांनीं पानें कापविण्यासाठीं पंचवीस हजार सह्यांचा अर्ज करण्याची चळवळ पुढें जोरानें सुरू केली. ही १९२६ च्या आक्टोबरमधील गोष्ट होय. त्यानंतर मी पुढें उमरावती हायस्कूलच्या ज्युबिलीसाठीं उमरावतीस गेलों होतों व परत आलों तों मी पुणे शहरतर्फे कौन्सिलसाठीं उभा राहण्याची इच्छा असल्याचें जाहीर झालें होतें व त्याच सुमारास स्थानिक मुसलमानांमध्यें चळवळ सुरू होऊन आक्षेप घेतलेली पानें कापून टाकावीं अशी मागणी करण्यांत आली होती व सरकारकडे मागणी करण्यापूर्वी माझ्याकडेच मागणी करण्याचें स्थानिक मुसलमानांनीं ठरविलें तेव्हां मागणी करणाऱ्या मंडळीची एक बैठक बोलवा असें त्या स्थानिक सभेचे अध्यक्ष शहा रुखयार जंग यांनां मी सांगितलें; त्यावेळस पानें कापून न टाकतां खंडन प्रसिद्ध करावें ही गोष्ट अधिक श्रेयस्कर आहे असें मुसलमानांस पटविण्याचा माझा उद्देश होता, पण तो सिद्धीस गेला नाहीं: ती मंडळी पानें रद्द करवावींत असाच आग्रह धरून बसली. व त्यावरून त्या ११२ सहीवाल्यांच्यां सभेंत देखील माझें म्हणणें पटविणें सोपें होणार नाहीं असें मला कळून आलें आणि त्यांची मागणी, खिलाफतवाल्यांची मागणी व मि. कादरभाई यांची मागणी ही एकच स्वरूपाची असल्यामुळें ती मागणी मी मान्य केली असें मी जाहीर करणार आहें असें त्यांस तेथेंच सांगितलें. त्यावेळेस पुणेंकर मुसलमानांनीं त्यास " त्यांच्याशीं झालेला करार " असें स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. तेव्हां मी त्यांस सांगितलें कीं, मी कोणाशीच करार किंवा तडजोड करीत नाहीं; कारण तुमच्याशी करार केला तर तुम्हीं माझ्याशीं करार करणारे कोण? असा तुमच्याविरुद्ध इतरांस मत्सर उत्पन्न होऊन कांहीं मंडळी त्याच्याविरुद्ध जातील व हा करार आम्हांस मान्य नाहीं म्हणून पुन्हां भांडण सुरू होईल; तुमच्या अगोदर मि. कादरभाई व मि. शौकतअल्ली यांनीं माझ्याकडे पत्रव्यवहार केला आहे व मि. कादरभाई यांनीं यासाठीं जास्त मेहनत घेतली आहे. जर कोणापाशीं करार करावयाचा असला तर खिलाफत कमेटी किंवा सरकारकडे अर्ज करणारे ११२ सहीवाले यांच्याशी करीन व हा तंटा मिटविण्याचें श्रेय त्यांना देईन, हे म्हणणें तेथें जमलेल्या वस्ताद गुलामदस्तगीरसारख्या कांहीं मंडळीस पसंत

पडलें; तेव्हां मि. रफिउद्दीन एम्. एल्.. सी. हे म्हणाले कीं, कोणाशीं करार करून तुम्हीं पानें कापण्याचें कबूल केलें असें ठरण्यापेक्षां तुम्हीं ही गाष्ट आपखुशीनेंच पण सर्व मुसुलमानांचीं अंत.करणें लक्षांत घेऊन केली असें होणें आम्हांस जास्त श्रेयस्कर आहे. त्याप्रमाणें मी तीं पानें कापण्याचा निश्चय केला. व तो निश्चय दुसऱ्या दिवशी वर्तमान-पत्रांतून जाहीर केला. सरकारनें प्रकरण फेंटळलें असतां मुसलमानांचें म्हणणें मान्य करण्याची संधि मला साधावयाची होती व ती या वेळेस साधली. येणेंप्रमाणें हें प्रकरण मिटलें.

हें प्रकरण चालू असतां हिंदु मंडळींची वृत्ति माझ्यासंबंधानें सहानु-भूतीचीच होती. ज्ञानकोशासारख्या मोठ्या ग्रंथामध्यें मजकूर चांगल्या आधारावर दिला आहे तर मुसुलमान मंडळींनीं संतापावयाच्या ऐवजीं तो खोडून टाकण्याचाच प्रयत्न करावा व खंडन प्रसिद्ध करण्यास ज्ञानको-शकारांनीं जी संधि दिली तिचा त्यांनीं फायदा घ्यावा, असेच त्यांस वाटत होतें; तथापि याबरोबर हेंहि सांगितलें पाहिजे कीं, ज्ञानकोशाची महंमद प्रकरणामुळें जाहिरात चांगली झाली म्हणून उपहास व मत्सर ज्यांत आहे अशीं अभिनंदनाचीं पत्रें पाठविणाराहि थोडासा वर्ग होता. त्यांच्या मत्सराविषयीं थोडेसें लिहिलें पाहिजे. त्यांस हें कळविलें पाहिजे कीं, त्या जाहिरातीमुळें आमचा फायदा झाला नाहीं व त्यामुळें त्यांनीं आमचा मत्सर करण्याचें कारण नाहीं. ही जाहिरात आम्हास हवी होती काय? व फायदेशीर झाली काय ह्याविषयीं सरळ सांगावयाचें म्हट-ल्यास ही जाहिरात आम्हास मुळींच फायदेशीर झाली नाहीं व त्या-मुळें आमच्या पुस्तकांच्या खपास मदत झाली नाहीं. असेंच कबूल करावें लागेल. महंमदाची नालस्ती झाली आहे तर तो ग्रंथ आपणांस हवा असें म्हणून कोणी १५० रुपयांचें पुस्तक घेत नाहीं. एखाद्या वर्त-मानपत्राचा किंवा मासिकाचा अंक असता तर तो या प्रकारच्या प्रसि-द्धीनें खपून दहा वीस रुपये मिळाले असते पण ज्ञानकोशासारखा ग्रंथ घेतांनां तो एका बाजूचा आहे अशी त्याची प्रसिद्धि झाल्यानें त्याच्या खपास उलट व्यत्ययच येतो. जो ग्रंथ ज्ञानाचा ग्रंथ म्हणून कायम बाळगण्याजोगा आहे असा बाणा बाळगतो तो ग्रंथ मुसुलमानांविषयीं पूर्वग्रहानें दूषित झाला आहे अशी जर त्याविषयीं हिंदूची समजूत झाली तर हिंदु मंडळी देखील तो ग्रंथ कमी योग्यतेचा व त्यामुळें विकत

घेण्यास कमी लायक आहे असेंच समजतील व मुसुलमानानें ज्ञानकोश तयार केला व तो जर हिंदूंविषयी खोटें लिहिणारा असला तर तो ग्रंथ मुसुलमान ग्राहक देखील त्याज्य ठरवितील ही माझी पक्की खात्री आहे. माहितीचा विनचूकपणा हा ज्ञानकोशाचा मुख्य विक्रीचा गुण आहे, व निःपक्षपातीपणा हेंच आमचें मोठें भांडवल आहे व आम्ही देणग्या घेण्याचें नाकारलें व श्रीमंत संस्थानिकांच्या आश्रयाची पर्वा केली नाहीं या सर्व गोष्टी ज्या केल्या त्या एकाच खात्रीवर केल्या, आणि ती खात्री म्हटली म्हणजे ज्ञानकोश घेणारी जनता निःपक्षपाती प्रामाणिक लेखाची चहाती आहे याविषयींची होय. लोकांस तात्कालिक म्हणून व एकपक्षीय म्हणून आवडेल पण चिरकाल वाङ्मय म्हणून मनुष्य संग्रह करूं इच्छितो तेव्हां त्यास निःपक्षपाती वाङ्मय पाहिजे, या लोकांच्या वृत्तीविषयीं आमची खात्री होती व ही आमची खात्री अधिक अनुभवानें अधिक बळकट होऊ लागली आहे.

प्रकरण १५ वें.

उपसंहार

आतांपर्यंत झालेल्या निवेदनांत ज्या गोष्टी सांगतां आल्या नाहींत त्या गोष्टी सांगण्याची संधि या प्रकरणांत घेतों.

एकंदर या बारा वर्षांतील धंद्याचा विचार केला असतां मनांत अनेक विचार येतात. ज्ञानकोश हा कांहीं धंदा समजला गेला नाहीं आणि ज्ञानकोश चालू असतां बरीच वर्षें लोकांस अविश्वास असून कार्य तडीस गेलें व माझ्या मतें इतर किफायतीसाठीं काढलेल्या कंपन्यापेक्षां देखील ही कंपनी किफायतशीर झाली. आमच्यापेक्षां अनेक पटींनीं "टाटा पब्लिसिटी कार्पोरेशन" हिचें भांडवल होतें ही गोष्ट लक्षांत घेतली व तिची कामगिरी लक्षांत गेतली असतां ज्ञानकोशानें तुटपुंज्या भांडवलावर मोठी कामगिरी केली याचें लोकांस आश्चर्य वाटेल. कंपनी स्थापन करण्यास मला ७॥ शें रुपयेच भांडवल लागलेंआणि इतक्या थोडक्या भांडवलावर ही कंपनी उभारली गेली व आपलें कार्य पुरें करती झाली. कंपनी मुद्रकांच्या वेडेपणामुळें व कंपनीच्या डायरेक्टरांचा आपण मुद्रणास लागूं नय या आग्रहामुळें कंपनी जरी ७५ हजार रुपयांस मुकली तरी

तिला त्यांतून वर डोकें काढतां आलें आणि कार्य पुरें करतां आले व आणि टाटा पब्लिसिटी कार्पोरेशन बावीस लाखांची सहा लाखावर आली तर ज्ञानकोशाची कंपनी यशस्वी कां झाली याचा विचार करणें जरूर आहे.

आमच्या कंपनीच्या यशाचें एक पहिलें कारण म्हटलें म्हणजे कंपनीचें भांडवल जमा होत जाणें आणि गिऱ्हाइकी जमा होत जाणें या दोन्ही क्रिया बरोबरच होत होत्या म्हणजे कंपनी जवळ जवळ प्रारंभापासूनच गिऱ्हाइकी मिळवीत होती हें या यशाचें पहिलें कारण होय. ज्या कार्यास गिऱ्हाइकी मुबलक तें कार्य फसणार कसें आणि त्या कार्यास लोकांच्या दक्षणेची जरूर काय? कंपनीची गिऱ्हाइकी कशी वाढत होती याचें पहिल्या तीन वर्षांचें दरमहाचें व पुढील वर्षांचें दरसालचें कोष्टक येणेंप्रमाणें:—

१९१६–१७		१९१७–१८		१९१८–१९	
महिना	संख्या	महिना	संख्या	महिना	संख्या
एप्रिल	३९	एप्रिल	८	एप्रिल	२७
मे	२	मे	१७	मे	४
जून	११	जून	२९	जून	२३
जुलै	४९	जुलै	२०	जुलै	७०
आगष्ट	३०	आगष्ट	३१	आगष्ट	२१
सप्टेंबर	९१	सप्टेंबर	२९	सप्टेंबर	२८
आक्टोबर,	२७	आक्टोबर	१९	आक्टोबर	४२
नोव्हेंबर	७	नोव्हेंबर	१	नोव्हेंबर	३०
डिसेंबर	३२	डिसेंबर	१०	डिसेंबर	८८
जानेवारी	१३	जानेवारी	९	जानेवारी	७०
फेब्रुवारी	०	फेब्रुवारी	३९	फेब्रुवारी	६९
मार्च	४	मार्च	६०	मार्च	५९

साल	संख्या	साल	संख्या
१९१९–२०	४३०	१९२३–२४	३६३
१९२०–२१	२०६	१९२४–२५	१९९
१९२१–२२	२०९	१९२५–२६	१४९
१९२२–२३	३७६	१९२६–२७	१२०

ज्ञानकोशाची सांपत्तिक स्थिति पहिल्यापासून अनेक वर्षे जरी समाधानकारक होती तरी मंडळापाशीं शिलक अशी फारच थोडी होती. छपाईखर्चासाठीं फंड म्हणून आम्ही आगाऊ शिलक टाकीत होतों पण तीहि ४ हजारावर झाली नाहीं व ती ज्ञानकोशाच्या चालू खर्चाच्या मानानें फारच थोडी होती. ज्ञानकोशाचा खर्च २००० रु. महिनापर्यंत नागपूर येथें ऑफिस असतांच गेला होता व जसजसा आम्ही खर्च वाढवीत होतों तसतसें उत्पन्न मिळविण्याची क्रियाहि करीत होतों. काम पुष्कळ करावयाचें आहे तर भराभर माणसें वाढविलीं पाहिजेत अशी माझी संपादकीय वृत्ति होती तर जसजसा खर्च वाढेल तसतसें पैसे मिळविले पाहिजेत अशी माझी व्यवस्थापकीय वृत्ति होती. ही माझी वृत्ति पूर्णपणें न समजल्यामुळें प्रथम भांडणें उत्पन्न झालीं. दुसऱ्या डायरेक्टरांस असें वाटते कीं, इकडे फारशी शिलक नाहीं आणि कोठें५०० रुपये शिलक जमते, तों हा एकदम ५० रुपयांची १० माणसें नेमून टाकतो, हा प्रकार काय आहे ? त्यांचें मत असें होतें कीं, १०।२० हजार रुपये मिळवून आम्ही ब्यँकेत ठेवावेत आणि मग त्या पैशांची विल्हेवारी करी काय लावावयाची तें ठरवावें पण १० हजार रु. शिलक कधींच झाली नाहीं. काम वेगानें आटपलें पाहिजें इकडे माझें लक्ष होतें आणि पैसे ताबडतोब खर्च करण्याची आवश्यकता मी दाखवीत होतों.

ज्ञानकोशाच्या सांपत्तिक स्थितीचा इतिहास द्यावयाचा म्हणजे जमाखर्चाचें कोष्टक मांडावयाचें एवढेंच नव्हें तर सांपत्तिक स्थिति कशी कशी बदलत गेली यासंबंधानें कांहीं गोष्टी सांगावयाच्या; व त्या सांपत्तिक स्थितीचे ज्ञानकोशावर काय परिणाम झाले हें सांगावयाचें. ज्ञानकोशाच्या निरानिराळ्या काळीं झालेल्या सांपत्तिक स्थितीसंबंधानें स्थूल गोष्टी येणेंप्रमाणें सांगतां येतील:—ज्ञानकोशाचें काम ज्ञानकोश छापावयास जाईपर्यंत इतकें सुरळीत चाललें होतें कीं पगाराची पहिली तारीख कधींच चुकत नसे. तथापि जेव्हां आमचें काम छापण्यास निर्णयसागरनें दिरंगाई केली तेव्हांपासून कांहीं महिन्यांनीं ज्ञानकोशमंडळांतील मंडळीचे पगार वेळेवर देणें बंद होऊं लागलें. मुद्रणाच्या दिरंगाईमुळें जें आम्हांस कर्ज झालें आहे त्यांतील सुमारें निम्मा भाग लोकांच्या पगारांतील बाकया एकत्र होऊन झालेलें आहे. ज्ञानकोशानें जो पैसा मिळविला तो देणग्या घेण्यास आम्ही तयार असतों तरी

मिळाला नसता. त्यामुळें आम्हांस देणग्यांची आवश्यकताच नव्हती. ज्ञानकोशमंडळास प्राप्ति कमी होती असें नाहीं ज्ञानकोशाची प्राप्ति कांहीं वर्षें दरमहा २५०० च्या वर होती व कांहीं महिने ११हजार रुपये पर्यंत देखील प्राप्ति झालेली आहे. असें झालें म्हणजे ल्या महिन्यांत पूर्वीचें देणें दिलें जाई पण तें देखील पुरें दिलें गेलें नाहीं. लोकांनां दरमहा पगार अजीबाद मिळत नव्हता असें नाहीं. कधीं पगाराचा पाऊण हिस्सा मिळे तर कधी निम्मा हिस्सा मिळे. महाराष्ट्र हें जर व्यापारी राष्ट्र असतें, व आम्हांस गिऱ्हाईक मिळवे जर कामाला मुबलक असते तर आम्हांला पैशाची तूट कधींच पडली नसती.

ज्ञानकोशमंडळाचा मुख्य खर्च म्हटला म्हणजे छपाई व लोकांचे पगार. कागदाचा खर्च सुमारें ४० हजार रुपये झाला आहे आणि घरभाड्याचा खर्च २० हजार रुपये झाला आहे आणि सामानाचा खर्च सुमारें २० हजार रुपये (लायब्ररी आणि छापखाना धरून) झाला. उरलेला खर्च माणसांच्या पगारांतच झालेला आहे. म्हणजे या कामाचा मुख्य खर्च म्हटला म्हणजे माणसांचे पगारच होत. व भांडवलखर्च म्हणजे माणसांनां एकत्र काम करीत राहण्यासाठीं लागणारा खर्च. तो खर्च म्हटला म्हणजे कायतो भांडें, लायब्ररी, छापखाना व पोष्टेज यांचा खर्च होय. म्हणजे अडीच-पावणेतीन लाख रुपये खर्च माणसांच्या पगाराकडे झाला आहे आणि त्यांपैकीं कंपोझिंगचा खर्च सुमारें २२५०० रुपये झालेला आहे. व मुद्रणाचा खर्च म्हणजे प्रेसमनचा खर्च ५॥ हजार रुपये झाला आहे. हा खर्च खेरीजकरून इतर सर्व खर्च संपादनखातें, व्यवस्थाखातें यांवर झालेला आहे. म्हणजे सामान्यतः या कामाला अनेक संपादक व कारकून यांनीं एकत्र होऊन चालविलेल्या कामाचें स्वरूप आलेलें आहे व भांडवलवाल्यांनां कांहींच डिव्हिडेंड मिळालें नसल्यामुळें या कामास एकाद्या सोशलिस्ट कंपनीचें स्वरूप आलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. म्हणजे ही कंपनी शेअरहोल्डरांची नसून केवळ काम करणाऱ्यांची होती असें सहजच सिद्ध झालें. व जोरानें पुस्तकें काढणें, जोरानें गिऱ्हाईक मिळविणें या क्रियांवरच आम्ही आपला कारभार यशस्वी केला असें वाटतें. ज्या कार्याची ज्याच लोकांनां जरूर आहे पण ती जरूर वाटणारा वर्ग थोडा आहे

अशा स्थितींत जरूर वाटणारा वर्ग वाढविणें हा धंद्यांतलाच भाग होय. आणि तें काम आपण केलें तर उपयुक्त वाङ्मयकार्यास पैशाची तूट पडावयाची नाहीं अशी माझी समजूत आहे.

दर सालची कंपनीची प्राप्ति खालीलप्रमाणें आहे.

साल	रक्कम
१९१७–१८	१३९०४–११–४
१९१८–१९	२३२९१– २–३
१९१९–२०	२७३८१–११–९
१९२०–२१	३४६१०– २–९
१९२१–२२	१९०२९– ४–८
१९२२–२३	३३९८४– ९–०
१९२३–२४	४२८७०– ६–३
१९२४–२५	५१२०२–१२–६
१९२५–२६	४७०९९– ०–३
१९२६–२७	२४०६३– १–९

हें एकंदर उत्पन्न पाहतां व छापखान्याकडे लागलेलें भांडवल केवळ १५००० रुपये आहे असें पहातां असें दिसून येतें कीं धंदा म्हणजे मुख्यतः अनेक व्यक्तींनीं एकत्र काम करणें हेंच आहे आणि त्याला लागणाऱ्या साधनसामुग्रीची किंमत त्या मानानें फारच अल्प असते. व भांडवलाचा उपयोग केवळ प्रारंभीची सामुग्री जुळविण्यासाठीं आणि माणसें केंद्रीभूत करण्यासाठीं लागणारा विश्वास उत्पन्न करण्यासाठींच असतो.

ज्ञानकोशाचें चिरस्थायित्व होण्यास जर कांहीं गोष्टी कारणीभूत झाल्या असतील तर त्यांपैकीं एक गोष्ट म्हटली म्हणजे आमच्यावर असलेलें कर्ज ही होय. हें कर्ज फेडण्यासाठीं नवीन खटपटी कराव्या लागणार व ज्ञानकोश अनेक भाषांत करण्याची योजना करावी लागणार. त्यामुळें भवितव्य काय होईल याची आज कल्पना करतां येत नाहीं. ज्ञानकोश अनेक भाषांत करण्याचा प्रयत्न केला तर त्याचे अनेक परिणाम

होतील. हिंदुस्थानांतील प्रत्येक व्यक्तीस स्वभाषेंतून सर्व ज्ञान प्राप्त करून घेण्याचा सोय तर होईलच पण देशाच्या प्रत्येक भागांत स्वभाषा-सेवक वर्ग निर्माण होऊन तो वर्ग एकमेकांशी संबद्ध राहील. व त्याचे भावी काळांत बरेच मोठे परिणाम होतील अशी माझी अटकळ आहे.

समाप्त

ज्ञानकोश इतिहास—परिशिष्टें.

(परिशिष्ट नं. १ योजना.)

महाराष्ट्रीय ज्ञानकोशाच्या घटनेची योजना.

(ता. ३१ मार्च १९२७ तारखेस चालकांपुढें प्रस्तुत योजना ठेविली ती त्यांच्या हुकुमानें विद्वान मंडळींच्या परीक्षणार्थ प्रसिद्ध करीत आहों—

श्रीधर व्यंकटेश केतकर)

(१) ज्ञानकोश हा कसा करावयाचा या संबंधानें संपादकीय योजना चालक मंडळींपुढें आज ठेवण्यांत येत आहे. आपणांपैकीं ज्या कांहीं मंडळींनीं अनेक सूचना केल्या त्यांपैकीं प्रत्येकीचा योग्य विचार करून प्रस्तुत योजना बनविली आहे.

(२) मागें २५ मे १९१६ रोजीं जो " प्रास्पेक्टस " काढिला होता त्यांत ज्ञानकोशाच्या घटनेची योजना अंशतः प्रसिद्ध केली होती त्यापेक्षां ही योजना अधिक सविस्तर लिहिण्यांत येत आहे. अनुभवानें कांहीं गोष्टी अधिक समजल्यामुळें पूर्वीच्या कल्पनेंत कांहीं ठिकाणीं बदल करण्यांत येत आहे. त्या प्रसिद्धिपत्रकांत सांगितलें होतें कीं, ज्ञानकोश महाराष्ट्रीय दृष्टीनें बनवावयाचा आहे; ती मूळ कल्पना जशीच्या तशीच ठेवली आहे, आणि जो फेरबदल झाला आहे तो, तें काम कोणाकडून कसें करून घ्यावयाचें या संबंधींच्या योजनेंत झाला आहे.

(३) ज्ञानकोशाचें काम नवीन संशोधन करण्याचें नाहीं. आज जें लोकांत ज्ञान उपलब्ध असेल तें संकलित करावयाचें आहे. आपल्या इतिहासासंबंधानें, प्राचीन भूगोलज्ञानासंबंधानें, जे कांहीं पाश्चात्त्यांनीं, अगर अर्वाचीन पद्धतीच्या एतद्देशीय संशोधकांनीं शोध लावले आहेत ते सर्व तपासून पहावयाचे आहेत, आणि त्यांतील ग्राह्य भाग शोधून घ्यावयाचा आहे. हें काम सोपेंहि नाहीं व अत्यंत बिकटहि नाहीं. पाश्चात्त्यांचे टीकात्मक लेख ज्यांत आले आहेत असे ग्रंथ सुमारें मुख्यतः ५०० आहेत.एक सुशिक्षित पदवीधर त्यांतील ग्राह्य भागाचा मराठींत गोषवारा काढावयास लागला तर सुमारें दर आठवड्यास एक ग्रंथ पडतो. हें इंडियन ॲंटिक्वरीच्या चार वर्षग्रंथांचें पृथक्करण मुंबई युनिव्हर्सिटीच्या एका तरुण पदवीधराकडून करवून अनुभवानें ठरविल आहे.

(४) कांहीं मंडळींनीं आम्हांस अशी सूचना केली कीं, सर्व ग्रंथ चार वर्षें तयार करून पांचव्या वर्षीं छापून एकदम वीस भाग लोकांच्या हातीं द्यावयाचे हा जो आमचा विचार आहे तो आम्हीं बदलावा, आणि आतांपासूनच एक

एक ग्रंथ तयार करून तो छापून लोकांच्या हातीं द्यावा. कां कीं पांच वर्षें, लोकांकडून पैसे घ्यावयाचे आणि त्यांच्या हातांत पांच वर्षें कांहींएक द्यावयाचें नाहीं ही पद्धति व्यवहार्य नाहीं. सकृद्दर्शनी ही कल्पना चांगली वाटते; कां कीं, सर्व पैसे देण्यापूर्वी वाचकांना कांहींतरी मोबदला मिळतो. शिवाय " आंध्रविज्ञानसर्वस्वमु " (तेलगू सायक्लोपिडिया) नें हीच पद्धति अमलांत आणिली आहे. प्रत्येक अंकांत कशावर आर्टिकलें आणावयाचीं हें अगोदरच योजून मग प्रत्येक अंक पूर्वी ठरविलेल्या अनुक्रमानें प्रकाशक प्रसिद्ध करितात. या पद्धतीनें त्यांनीं दोन हजार पानें प्रसिद्धहि केलीं आहेत. " हिंदी विश्वकोशा " नें जवळ जवळ तोच प्रकार केला आहे. सहा आण्यास ३२ पृष्ठें याप्रमाणें "विश्वकोश " कार वाचकांच्या हातीं देत आहेत. ही पद्धत व्यवहार्य नाहीं असें आम्हीं ठरविलें यांचीं कारणें येणें प्रमाणें:—

ज्ञानकोश करण्याचें मुख्य काम जें अस्तित्वांत असलेल्या ज्ञानाची तपासणी करावयाचें आणि तें जमा करून पद्धतशीर रीतीनें वाचकांपुढें मांडावयाचें तें या पद्धतीनें साध्य होत नाहीं. उदाहरणार्थ, वेदांमध्यें एकंदर किती महत्त्वाचे विषय आहेत याची तरी आम्हांस आज पूर्ण माहिती कोठें आहे? आज वेदांतून, महाभारतांतून, व बृहत्संहितेसारख्या ग्रंथांतून किती महत्त्वाचे विषय आहेत हें सामान्य मंडळानें अगोदर काढणें निराळें आणि त्यांचें शास्त्रपूर्ण पृथक्करण करून त्यांतील माहिती विषयवार मांडणें निराळें. चोख काम करण्याचा प्रकार म्हटला म्हणजे अनेक ग्रंथांचें पृथक्करण करून व अनेक प्रकारची माहिती मिळवून जसे विषय पडतील तसे प्रथम पडूं देणें आणि मागाहून ग्रंथ प्रसिद्ध करणें. असें करीत असतां ग्रंथाचा पहिला भाग व शेवटचा भाग एकदमच तयार होईल. " कर्ण " याची माहिती दुसऱ्या तिसऱ्या भागांत येईल व " ययाति " वरील माहिती सतराव्या अठराव्या भागांत येईल. अरबस्तानावरील माहिती पहिल्या दुसऱ्या भागांत येईल व सर्व्हियांतील माहिती शेवटच्या कोणत्या तरी भागांत येईल " तेलगू सायक्लोपिडिया " नें ग्रंथाचे भाग एकामागून एक काढावयाचें ठरविलें आहे तथापि त्या ग्रंथाच्या संपादकाशीं संभाषण करतां असें कळलें कीं त्यांनीं हा ग्रंथ प्रारंभीचा म्हणून आरंभिला आहे आणि त्यांच्या पद्धतीनें जे दोष ग्रंथांत राहतील त्यांना इलाज नाहीं म्हणून राहूं द्यावेत असें ठरविलें आहे. बाबू नरेंद्रनाथ वसु यांनीं जो हिंदी विश्वकोश हातीं घतला आहे त्याला प्रारंभीची मदत म्हणजे त्यांनींच बनविलेला व पूर्णपणें प्रसिद्ध केलेला बंगाली विश्वकोश आहे आणि त्याचेंच हिंदी विश्वकोश हें ' सुधारून वाढविलेलें ' रूपांतर आहे. इतकें अमूनहि आम्ही एवढें सांगतों कीं, त्यांचा प्रयत्न विशेष नांवाजण्यासारखा नाहीं. आम्हीं बंगाली " विश्वकोश " वाचून पाहिला नाहीं. तथापि

सुधारून वाढविलेल्या हिंदी आवृत्तींचे भाग वाचून पाहिले आहेत. व त्याविषयीं आम्ही एवढेंच सांगतों कीं तो ग्रंथ सुशिक्षित महाराष्ट्रीय जनतेमध्यें आदर उत्पन्न करण्यासारखा नाहीं त्या ग्रंथाची जी स्तुति थोडीबहुत ऐकूं येते ती पभिप्राय देणाऱ्यांच्या मार्मिकतेची द्योतक नसून सौजन्याची द्योतक आहे.

(५) ज्ञानकोश १० हजार पृष्ठांचा बनवावयाचा आहे हें मागेंच सांगितलें आहे. दर पृष्ठांत सरासरी ७२५ शब्द येतील. माहितीं अकारविल्ह्यानें येईल. दहा हजार पृष्ठांचा विनियोग कसा करावयाचा यांचें सामान्य कोष्टक येणेंप्रमाणें:—

दहा हजार सुपररायल अष्टपत्री पृष्ठांपैकीं ५००० पृष्ठें शास्त्रीय विषयासाठीं व व्यापार, कला इत्यादिकांसाठीं ठेवावयाचीं, ३५०० पृष्ठें आर्यसंस्कृतीच्या निदर्शनासाठीं ठेवून १५०० पृष्ठें बाह्यसंस्कृतीच्या स्पष्टीकरणार्थ द्यावयाचीं आहेत.

१५०० पृष्ठें बाह्यसंस्कृतीच्या स्पष्टीकरणार्थ आहेत. म्हणजे भारतीयेतर राष्ट्रांचे इतिहास, कायदा, समाजस्थिति, शासनसंस्था, कलाकौशल्य, वाङ्मय, ख्रिस्त—महंमदीयादि संप्रदाय व त्यांचें पारमार्थिक ज्ञान इत्यादि विषयांसाठीं आहेत. बाह्यांचें शास्त्रीय ज्ञान खेरीजकरून इतर माहितीसाठीं हीं पृष्ठें लाबिलीं जातील.

५००० पृष्ठें शास्त्रीय ज्ञानासाठीं योजिलीं आहेत. तीं अनेक भौतिक शास्त्रें व त्यांचा व्यावहारिक उपयोग यांजकडे दिलीं जातील.

(६) शास्त्रीय भागांकडे ११०० पानें दिलीं आहेत, त्यांत वैद्यक, शेतकी, व यांत्रिककला व अनेक उद्योगधंदे यांच्या दृष्टीनें उपयोगी जो शास्त्राचा भाग आहे त्याकडे अधिक लक्ष देण्याचें योजिलें आहे. उदाहरणार्थ हजारों कृमीसंबंधानें ज्ञान द्यावें. मनुष्याच्या सुखदुःखास कारणीभूत होणाऱ्या कृमींसंबंधानें (Insects of Economic importance) अधिक माहिती द्यावी असा शास्त्रीय लेखकमंडळानें (प्रो० गोडबोले M.Sc; रा. रानडे M.Sc; प्रो. देशपेकर M. A. M. Sc. रा. रा. रा. त्र्यं. देशमुख B. Ag. यांनीं) ठरविलें आहे. शास्त्रीय लेखकमंडळानें आणखी ठरविलेल्या गोष्टी येणेंप्रमाणें आहेत.

(अ)प्राणी, वनस्पती अगर खनिज पदार्थ यांचीं प्रचारांतील नांवें घेऊन त्याखालीं माहिती द्यावयाची. शास्त्रीय नांवाखालीं माहिती द्यावयाची नाहीं. [व्यवहारासाठीं ज्या उद्भिज, अगर खनिज वस्तूंचा संबंध आला आहे असे पदार्थ निवडून त्यांची यादी शास्त्रीयमंडळानें केली आहे ती छापून इतर शास्त्रज्ञांकडे अभिप्रायार्थ पाठविण्याचें योजिलें आहे]

एक ग्रंथ तयार करून तो छापून लोकांच्या हातीं द्यावा. कां कीं पांच वर्षें, लोकांकडून पैसे घ्यावयाचे आणि त्यांच्या हातांत पांच वर्षें कांहींएक द्यावयाचें नाहीं हीं पद्धति व्यवहार्य नाहीं. सकृद्दर्शनी ही कल्पना चांगली वाटते; कां कीं, सर्व पैसे देण्यापूर्वी वाचकांना कांहींतरी मोबदला मिळतो. शिवाय " आंध्रविज्ञानसर्वस्वमु " (तेलगू सायक्लोपिडिया) नें हींच पद्धति अमलांत आणिली आहे. प्रत्येक अंकांत कशावर आर्टिकलें आणावयाचीं हें अगोदरच योजून मग प्रत्येक अंक पूर्वी ठरविलेल्या अनुक्रमानें प्रकाशक प्रसिद्ध करितात. या पद्धतीनें त्यांनीं दोन हजार पानें प्रसिद्धहि केलीं आहेत. ' हिंदी विश्वकोशा " नें जवळ जवळ तोच प्रकार केला आहे. सहा आण्यास ३२ पृष्ठें याप्रमाणें "विश्वकोश " कार वाचकांच्या हातीं देत आहेत. ही पद्धत व्यवहार्य नाहीं असें आम्हीं ठरविलें यांचीं कारणें येणें प्रमाणें:—

ज्ञानकोश काढण्याचें मुख्य काम जें अस्तित्वांत असलेल्या ज्ञानाची तपासणी करावयाचें आणि तें जमा करून पद्धतशीर रीतिनें वाचकांपुढें मांडावयाचें तें या पद्धतीनें साध्य होत नाहीं. उदाहरणार्थ, वेदांमध्यें एकंदर किती महत्त्वाचे विषय आहेत याची तरी आम्हांस आज पूर्ण माहिती कोठें आहे? आज वेदांतून, महाभारतातून, व बृहत्संहितेसारख्या ग्रंथांतून किती महत्त्वाचे विषय आहेत हें सामान्य अंदाजानें अगोदर काढणें निराळें आणि त्यांचें शांतपणें पृथक्करण करून त्यांतील माहिती विषयवार मांडणें निराळें. चोख काम करण्याचा प्रकार म्हटला म्हणजे अनेक ग्रंथांचें पृथक्करण करून व अनेक प्रकारची माहिती मिळवून जसे विषय पडतील तसे प्रथम पडदे देणें आणि मागाहून ग्रंथ प्रसिद्ध करणें. असें करीत असतां ग्रंथाचा पहिला भाग व शेवटचा भाग एकदमच तयार होईल. " कर्ण " याची माहिती दुसऱ्या, तिसऱ्या भागांत येईल व " ययाति " वरील माहिती सतराव्या अठराव्या भागांत येईल. अरबस्तानावरील माहिती पहिल्या दुसऱ्या भागांत येईल व सर्व्हियांतील माहिती शेवटच्या कोणत्या तरी भागांत येईल " तेलगू सायक्लोपिडिया " नें ग्रंथाचे भाग एकामागून एक काढावयाचें ठरविलें आहे तथापि त्या ग्रंथाच्या संपादकाशीं संभाषण करतां असें कळलें कीं त्यांनीं हा ग्रंथ प्रारंभीचा म्हणून आरंभिला आहे आणि त्यांच्या पद्धतीनें जे दोष ग्रंथांत राहतील त्यांना इलाज नाहीं म्हणून राहूं द्यावेत असें ठरविलें आहे. बाबू नरेंद्रनाथ वसु यांनीं जो हिंदी विश्वकोश हातीं घतला आहे त्याला प्रारंभीची मदत म्हणजे त्यांनींच बनविलेला व पूर्णपणें प्रसिद्ध केलेला बंगाली विश्वकोश आहे आणि त्याचेंच हिंदी विश्वकोश हें ' सुधारून वाढविलेलें ' रूपांतर आहे. इतकें असूनहि आम्ही एवढें सांगतों कीं, त्यांचा प्रयत्न विशेष नांवाजण्यासारखा नाहीं. आम्हीं बंगाली " विश्वकोश " वाचून पाहिला नाहीं तथापि

सुधारून वाढविलेल्या हिंदी आवृत्तीचे भाग वाचून पाहिले आहेत. व त्याविषयीं आम्ही एवढेंच सांगतों कीं तो ग्रंथ सुशिक्षित महाराष्ट्रीय जनतेमध्यें आदर उत्पन्न करण्यासारखा नाहीं त्या ग्रंथाची जी स्तुति थोडीबहुत ऐकूं येते तीं अभिप्राय देणाऱ्यांच्या मार्मिकतेची द्योतक नसून सौजन्याची द्योतक आहे.

(५) ज्ञानकोश १० हजार पृष्ठांचा बनवावयाचा आहे हें मागेंच सांगितलें आहे. दर पृष्ठांत सरासरी ७२५ शब्द येतील. माहितीं अकारविल्ह्यानें येईल. दहा हजार पृष्ठांचा विनियोग कसा करावयाचा यांचें सामान्य कोष्टक येणेंप्रमाणें:—

दहा हजार सुपररायल अष्टपत्री पृष्ठांपैकीं ५००० पृष्ठें शास्त्रीय विषयासाठीं व व्यापार, कला इत्यादिकांसाठीं ठेवावयाचीं, ३५०० पृष्ठें आर्यसंस्कृतीच्या निदर्शनासाठीं ठेवून १५०० पृष्ठें बाह्यसंस्कृतीच्या स्पष्टीकरणार्थ द्यावयाचीं आहेत.

१५०० पृष्ठें बाह्यसंस्कृतीच्या स्पष्टीकरणार्थ आहेत. म्हणजे भारतीयेतर राष्ट्रांचे इतिहास, कायदा, समाजस्थिति, शासनसंस्था, कलाकौशल्य, वाङ्मय, ख्रिस्त—महंमदीयादि संप्रदाय व त्यांचें पारमार्थिक ज्ञान इत्यादि विषयांसाठीं आहेत. बाह्यांचें शास्त्रीय ज्ञान खेरीजकरून इतर माहितीसाठीं हीं पृष्ठें लाबिलीं जातील.

५००० पृष्ठें शास्त्रीय ज्ञानासाठीं योजिलीं आहेत. तीं अनेक मौतिक शास्त्रें व त्यांचा व्यावहारिक उपयोग यांजकडे दिलीं जातील.

(६) शास्त्रीय भागांकडे १५०० पानें दिलीं आहेत, त्यांत वैद्यक, शेतकी, व यांत्रिककला व अनेक उद्योगधंदे यांच्या दृष्टीनें उपयोगी जो शास्त्राचा भाग आहे त्याकडे अधिक लक्ष देण्याचें योजिलें आहे. उदाहरणार्थ हजारों कृमीसंबंधानें ज्ञान द्यावें. मनुष्याच्या सुखदुःखास कारणीभूत होणाऱ्या कृमींसंबंधानें (Insects of Economic importance) अधिक माहिती द्यावी असा शास्त्रीय लेखकमंडळानें (प्रो० गोडबोले M.Sc; रा. रानडे M.Sc; प्रो. देगवेकर M. A. M. Sc. रा. ना. रा. त्र्यं. देशमुख B. Ag. यांनीं) ठरविलें आहे. शास्त्रीय लेखकमंडळानें आणखी ठरविलेल्या गोष्टी येणेंप्रमाणें आहेत.

(अ)प्राणी, वनस्पती अगर खानेज पदार्थ यांनीं प्रचारांतील नांवें घेऊन त्याखालीं माहिती द्यावयाची. शास्त्रीय नांवाखालीं माहिती द्यावयाची नाहीं. [व्यवहारासाठीं ज्या उद्भिज, अगर खनिज वस्तूंचा संबंध आला आहे असे पदार्थ निवडून त्यांची यादी शास्त्रीयमंडळानें केली आहे ती छापून इतर शास्त्रज्ञांकडे अभिप्रायार्थ पाठविण्याचें योजिलें आहे]

(७) आपल्या मंडळास साहाय्य दुसऱ्या एका दिशेनें मिळालें आहे. रा. चांदोरकर यांनीं धुळे येथें एक मंडळ स्थापन केलें आहे (त्यांत दहा बारा मंडळी आहे), त्यांनीं रा. राजवाडे यांच्या वीस खंडांची सूची केली आहे. त्याच मंडळाकडे आम्हीं शिलालेख, ताम्रपट इ० जीं लिखाणें प्रसिद्ध झालीं आहेत, त्यांचें पृथक्करण करून प्राह्यांश काढण्याचें काम दिलें आहे. रा. चांदोरकर यांनीं कामास आरंभहि केला आहे.

(८) आर्यसंस्कृत्यात्मक जो भाग तयार करावयाचा तो बनविण्याच्या पायऱ्या येणेंप्रमाणें आहेत.—

पहिली पायरी म्हटली म्हणजे संशोधकांच्या लेखांचें पृथक्करण करणें व गोषवारा काढणें होय.

दुसरी पायरी म्हटली म्हणजे त्यांच्या लेखांत संशोधकांनीं संस्कृत ग्रंथांचें व शिलालेखांत आलेल्या ज्या नांवांचीं अगर तारखांचीं अवतरणें केलीं असतील तीं अवतरणें व उल्लेख तपासून पहाणें हें होय.

तिसरी पायरी म्हटली म्हणजे कांहीं संस्कृत ग्रंथांचें आणि ग्रीक व अरब भूगोलवेत्त्यांच्या प्राचीन ग्रंथांच्या भाषांतरांचें स्वतः पृथक्करण करणें होय. त्या ग्रंथाचें स्वतः पृथक्करण करण्याचें काम शेवटीं ठेवलें ओह याचें मुख्य कारण हें कीं, पाश्चात्त्य संशोधकांचें काम वाचून तें तपासतां तपासतां अर्वाचीन तऱ्हेची दृष्टि उत्पन्न होऊन मग संस्कृत ग्रंथांचें पृथक्करण करतांना त्यांतून काय घ्यावयाचें हें समजेल.

कांहीं जर्मन ग्रंथांचें शब्दशः इंग्रजींत भाषांतर करवून मग त्याच्या टीपा काढावयाच्या आहेत. त्यास खर्च काय लागतो हें पाहण्यासाठीं एक ग्रंथ (विंटरनिट्झचा भारतीय वाङ्मयाच्या इतिहासाचा पहिला भाग) पण. पर्णे भाषांतर करण्यासाठीं एका जर्मनांच्या सुशिक्षितिसे [Miss E. V. Kohn LL. A. of the Universities of St. Andrews and Jena] भाषांतर करण्यास दिला आहे.

(९) भारतीय इतिहास व संस्कृति यासंबंधाची सामान्य योजना येणेंप्रमाणें आहेः—

भारतीय इतिहास आणि संस्कृति (पृ. ३५००)

हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास पृ. ६००, हिंदुस्थानांतिल प्राचीन आणि अर्वाचीन ललितकला पृ. १५०, संस्कृत गीर्वाणाचा इतिहास पृ. ३५० मराठी गीर्वाण (भाषा-व्याकरण यांसहित) पृ. ३००, महाराष्ट्रीयेतर हिंदुस्थानांतील गीर्वाण पृ. ३००, महाराष्ट्रेतिहास पृ. ६२५, हिंदुस्थानांतिल मुसुलमानांचा इतिहास पृ. २५०, युरोपियांचा हिंदुस्थानांतिल इतिहास पृ. २२५, हिंदुस्थानचा इतर इतिहास पृ. ४००, इतर ३००.

हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास (पृ. ६००)

वेदकाल. पृ. २००.

(अ) आर्य हिंदुस्थानांत येण्यापूर्वीची हिंदुस्थानची सामाजिक आणि सांस्कृतिक स्थिति. प्रास्तरसंस्कृति (Paleolithic and Neolithic) चीं अवशेषें आणि हिंदुस्थानांतिल आधुनिक मानवजातींच्या स्थितिज्ञानाच्या साहाय्यानें पृ. १०, (आ) आर्य लोकांची पूर्वपीठिका-जेव्हां भारतीय आर्यांचे पूर्वज आणि इराणी लोकांचे पूर्वज एकत्र होते, आणि जेव्हां यूरोपीय आर्य लोकहि आपल्या पूर्वजांपासून वेगळे झाले नव्हते त्या काळासंबंधाच्या संशोधनाचा गोषवारा पृ. ३०, (इ) वेदकालीन वृत्तपरंपरांचा गोषवारा, वेदकालीन राजकीय घडामोडी, वेदविहित राष्ट्रें,वेदकालीन राजांसंबंधानें पौराणिक उल्लेख, वेदोक्त वृत्तांचें सार, वेदकालीन शासनसंस्था पृ. ६०, (ई) वेदकालीन सामाजिक आणि आर्थिक स्थिति पृ. ४०, (उ) विविध पृ ६०.

वेदकालापासून मुसुलमानी स्वारीपर्यंत. (पृ. ४००).

(अ)इतिहासपुराणोक्त वृत्तांचा कालनिर्णय पुराणांतील इतिहाससाहित्य पृ. २४, (आ) ऐतिहासिक, पौराणिक व बौद्ध पुरुषांचीं चारित्रें पृ. २००, (इ) बौद्ध संप्रदायाचा इतिहास. पृ. १६, (ई) ग्रीकांच्या स्वारीची ऐतिहासिक माहिती पृ. ८, (उ) चंद्रगुप्तवंश पृ. ८, (ऊ) शक, यवन, पल्हव आणि हूण यांचा हिंदुस्थानांतील इतिहास पृ. ८, (ऋ) जुन्या तामिळ ग्रंथांतील माहितीवरून निघणारा दक्षिण देशचा इतिहास (सांस्कृतिक) पृ. ८, (ॠ) चाणक्याची शासननीति पृ. ८, (ऌ) बुद्धापासून मुसुलमानी स्वारीपर्यंत सर्व - सामान्य पर्यालोचन पृ. २४, (ऐ) दक्षिणेतील इतिहासाचें सामान्य पर्यालोचन पृ. १२, (ओ) निरनिराळीं मतें आणि संप्रदाय, जैनमत, चार्वाकमत इत्यादि. पृ. १०, (औ) प्राचीन आर्थिक इतिहास, पृ. २०, (क) धर्मशास्त्राव्यतिरिक्त वाढळून येणारा शासनसमुच्चय पृ. १०, (ख) आर्यसंस्कृतिवर्धनाचा इतिहास पृ. १०, (ग) विविध पृ. ३४.

प्राचीन हिंदुस्थानीय वैदिक, पारमार्थिक आणि कलाविषयक स्थिति आणि त्यांचें अर्वाचीन स्वरूप. (पृ. १५०.)

(क) पारमार्थिक ज्ञान आणि परमार्थसाधनें यांचा सामान्य इतिहास पृ. १५, (ख) संगीत आणि वाद्य (प्राचीन आणि अर्वाचीन) पृ. १५, (ग) नृत्त (प्राचीन ग्रंथ, विविध जातींचीं नृत्यें, महाराष्ट्रीय नृत्य) पृ. ९, (घ) स्त्रीपुरुषविभूषण [प्राचीन व अर्वाचीन] पृ. ६, (च) चित्रकला प्राचीन व अर्वाचीन पृ. १०, (छ) नाट्य, प्राचीन नाट्यशास्त्र व अर्वाचीन नाट्यशास्त्र पृ. १५, (ज) मूर्तिकर्म, पृ. १०, (झ) गृहशिल्प, देवालयशिल्प इत्यादि पृ. १५, (ट) पारमार्थिक आणि गृह्यवस्तूंचें शिल्प. प. ५, (ठ) विविध प. ५०.

**संस्कृत गीर्वाण [वैदिक आणि पाणिनीय आणि प्राकृत रु
व गीर्वाण]. (पृ. ३५०.)**

(क) वेदग्रंथवर्णन पृ. १२, (ख) रामायण आणि महाभारत (यांच्या घटनेचा इतिहास व कथाभाग) पृ. २०, (ग) इतिहासपुराणें, कथासरित्सागर यांचा उत्तरकालीन संस्कृत गीर्वाणाशीं संबंध पृ. १३, (घ) कालिदास, भवभूति, सुबंधु, बाण, भास, दंडी, मयूर, अश्वघोष, भट्टी, भारवि' माघ, नैषधीय इत्यादिकांवर निबंध पृ. ४०, (च) प्राकृत गीर्वाण पृ. २०, (ज) पाली अपभ्रंश. पृ. १५, (झ) षड्दर्शनें, पृ. ६०, (ट) शास्त्रीय संस्कृत गीर्वाणाचें समालोचन . यांत भौतिक शास्त्राखेरीज इतर शास्त्रांसाठीं म्हणजे विशेषेंकरून शिक्षा, व्याकरण, निरुक्त, छंदस, साहित्य, इत्यादिकांसाठीं राखून ठेवलेल्या जागेचा समावेश होतो) पृ. १००, (ठ) शास्त्रीयेतर संस्कृत वाङ्मयाचें समालोचन पृ. ३०, (ड) विविध पृ. ४०.

मराठी भाषा, व्याकरण आणि गीर्वाण (पृ. ३००)

(क) मराठी गीर्वाणाचा संस्कृत व इतर गीर्वाणाशीं संबंध, पृ. ५, (ख) मराठी शब्दशास्त्र (व्युत्पत्ति आणि नियम) पृ. ६, (ग) मराठी व्याकरण (ऐतिहासिक दृष्टीनें) पृ. ८, (घ) मराठी व्याकरण (निरपेक्ष दृष्टीनें) पृ. ९. (च) ज्ञानेश्वरीपूर्वीचें मराठी वाङ्मय पृ. ४, (ज) ज्ञानेश्वरकालीन पृ. ६, (झ) ज्ञानेश्वरापासून रामदासापर्यंत. पृ. १०, (ट) रामदासाचें व त्याच्या संप्रदायाचें गीर्वाण पृ. ८, (ठ) इतर संप्रदायांचें गीर्वाण--शके १७४० पूर्वीचे. पृ. १० (ड) इतर संप्रदायांचें गीर्वाण-शके १७४० नंतरचें पृ. १०. (ढ) मोरोपंतीय ग्रंथ पृ. १०, (त) मराठी ललित गीर्वाण पृ, ४ (थ) शके १७४० पर्यंतच्या गीर्वाणाचें पर्यालोचन पृ. १५, (द) वैदर्भीय कवि पृ. ३, (ध) शके १७४० नंतरच्या नाटकें, काव्यें, कादंबऱ्या, व इतर शास्त्रीय ग्रंथाव्यतिरिक्त इतर गीर्वाणाचें पर्यालोचन आणि अर्वाचीन ऐहिक संप्रदायांचें पर्यालोचन आणि त्यांचा महाराष्ट्रीयेतर वाङ्मयाशीं आणि चळवळीशीं संबंध पृ. ३०, (न) मराठींच्या उपभाषा पृ. १०, (प) वृत्तपत्रांचा इतिहास पृ. ५, (फ) प्रसिद्ध लेखकांचीं आणि कवींचीं चरित्रें. पृ. ७५, (ब) विविध. पृ. ७५.

महाराष्ट्रीयेतर हिंदुस्थानीय गीर्वाण (पृ. ३००)

[येथें गीर्वाण या शब्दाचा अर्थ केवळ ललितगीर्वाण असा न धरितां राष्ट्राच्या सर्व खटाटोपींचीं व आयुष्याशीं निदर्शक वाक्यें,म्हणी दंतकथा,मंत्र,तंत्र,खुळया कल्पना इत्यादिकांचा समावेश होतो. मात्र त्याविषयीं त्यांच्यामध्यें लेख असले पाहिजेत]. (अ) हिंदी पृ. २५. (आ) तामिळ पृ. २५, (इ) तेलगू पृ. १५. (ई) मलयाली पृ. १०, (उ) कानडी पृ. १०, (ऊ) गुजराथी पृ. १५'

(ऋ) उर्दू पृ. १५, (ॠ) भाटांचें गीर्वाण पृ. ५, (ऌ) बंगाली पृ. २०, (ए) उडिया पृ. १०, (ऐ) ब्रह्मी पृ. १०, (ओ) नेपाळी पृ. ७, (ओ) सिंधी पृ. ३, (क) आसामी पृ. ३, (ख) पुष्तु पृ. २, (ग) चरित्रें पृ. ७५, (घ) हिंदुस्थानीय प्राकृत गीर्वाणार्चे सामान्य स्वरूप, आणि आधुनिक वाङ्मयविषयक प्रवृत्ति पृ. १०, (च) बंगाली, गुजराथी, उर्दू, तामिळ, तेलगू नाटकें पृ. १०, (ज) मराठी भाषेचा व गीर्वाणाचा इतर भाषांशीं व गीर्वाणाशीं संबंध पृ. १०, (झ) हिंदीच्या उपभाषा आणि त्यांचें व्याकरण पृ. १०, (ट) विविध पृ. १०

महाराष्ट्रीय इतिहास (पृ. ६२५.)

(१) महाराष्ट्रीयांच्या इतिहासाचें हिंदुस्थानीय आणि जागतिक इतिहासांत स्थान पृ. ५, (२) महाराष्ट्राचा हिंदुस्थानांतिल इतर भागाशीं सांस्कृतिक संबंध पृ. ५, (३) देवगिरिच्या यादवांच्या नाशापर्यंतचा महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास पृ. १५, (४) दिल्लीच्या मुसुलमानांची सत्ता आणि स्थानिक मुसुलमानी राज्यें पृ. ५, (५) शिवकाल पृ. २५, (६) शिवाजीच्या मृत्यूपासून बाळाजी विश्वनाथ पर्यंत. पृ. ५, (७) निजाम पृ. ५, (८) महाराष्ट्रवर्धन (१७६० इ. पर्यंत) पृ. १५, (९) पाणिपतची लढाई पृ. ५, (१०) पेशव्यांचें राज्य–१८१८ इसवी पर्यंत पृ. ३०, (११) त्यानंतरचें शतक पृ. ५, (१२) आर्थिक इतिहास पृ. १०, (१३) महाराष्ट्रांतील जाति आणि तत्संबंधीय मानवशास्त्र पृ. १०, (१४) महाराष्ट्रांतील कायदा पृ. १०, (१५) महाराष्ट्रांतील आणि विशेषेंकरून पुण्यांतील समाजचरित आणि सामाजिक घटना पृ. १०, (१६) महाराष्ट्रांतील किल्ले आणि महाराष्ट्रचें लढाऊ दृष्टीनें भूगोलवर्णन पृ १०, (१७) मारी निवडक लढायांचीं आणि मोहिमांचीं वर्णनें पृ १० (१८) चरित्रें पृ. ३०९, (१९) महाराष्ट्राबाहेरील मराठी राज्यें पृ. २०, (२०) नागपुरकर भोंसल्यांचा इतिहास पृ. ४५, (२१) महाराष्ट्रांतिल ऐतिहासिक गीर्वाण पृ. ५, (२२) शिक्षण [१ वाङ्मयविषयक आणि शास्त्रीय, २ राजकीय (शासनात्मक), ३ स्त्रीशिक्षण, ४ लष्करी, ५ व्यावहारिक]. पृ १५, (२३) विविधविषय, नगरशासन, पंचायती, शिष्टसंप्रदाय, दरबारी रीती, राजांचीं आणि पेशव्यांचीं लग्नें, देवळांस देणग्या, राजाश्रय पृ. २५, (२४) ब्राह्मणांच्या धर्मशास्त्रीय आणि शासनविषयक चळवळी पृ. १०, (२५) ऐतिहासिक अवशेष पृ ५ (२६) अनिर्दिष्ट विविध पृ २०.

मुसुलमानांचा हिंदुस्थानीय इतिहास (पृ. २५०)

(१) मुसुलमानांच्या जातींचे आणि मध्यआशियांतील जातींचें मानवशास्त्र पृ. ८, (२) मुसुलमानी संप्रदायाचा राजकीय संबंध (महंमदपासून

पॅन इस्लामिझम पर्यंत) पृ. १७, (२) गुलाम घराण्यापूर्वीच्या मुसुलमानी, स्वाऱ्या पृ. ४, (४) गुलाम घराण्यापासून मोगलांपर्यंत पृ. ३५, (५) मोंगल घराण्याचा इतिहास (उदय, भरभराट आणि पाडाव) पृ. ३५, (६) चरित्रें.-१गिझनीचा महमूद,२ तैमुरलंग, ३ चेंगीजखान, ४ हिमू,५ शेरशहा, ६ अकबर, ७ औरंगझेब, ८ नादीरशहा, ९ तट्यदबंधू, १० बहादुरशहा, ११ सुलताना रोझिया, १२ नूरजहान इ. पृ. २५, (७) मुसुलमानी कारकीर्दीतील कायदा पृ. १७, (८) सामाजिक स्थिति (गीर्वाण आणि कलाकौशल्याखेरीज) पृ. १०, (९) मुसलमानांची युद्धकला पृ. ९, (१०) विविध पृ. ९०.

यूरोपीयांचा हिंदुस्थानांतील इतिहास. (पृ. २२५.)

(१) पोर्तुगीज, फ्रेंच, डच वगैरेचा इतिहास पृ. १०, (२) आधुनिक यूरोपीय राजकारणें (हिंदुस्थानसंबंधाचीं) पृ. १०, (३) ईस्ट इंडिया कंपनी पृ. २, (४) इंग्रजी सत्तेचा इतिहास पृ. २५, (५) हिंदुस्थानचे निरनिराळे भाग जिंकल्यानंतरचा मुलकी इतिहास. (अ) राज्यव्यवस्थेचा, (आ) व्यापारधंद्यासंबंधाचा, (इ) आगगाड्यांचा (ई) कायद्याचा पृ. १२५, (६)चरित्रें पृ. १०, (७) हिंदुस्थानांतील यूरोपीयांच्या आधुनिक राजकीय सामाजिक, आणि पारमार्थिक चळवळी पृ. ५, (८) १८५७ साल पृ. ५, (९) सत्तावन सालानंतरच्या एतद्देशीय संस्थानिकांचा ब्रिटिश रिसायतीशीं संबंध पृ. १०, (१०) किरकोळ (आधुनिक स्थितीचें निदर्शन करण्यासाठीं योजिलेला कांहीं भाग निरनिराळ्या शास्त्राखालीं वर्णिला आहे. उदाहरणार्थ शेतकी, जंगल, भूशास्त्र, शासनशास्त्र, कायदा, वगैरे) पृ. २३.

हिंदुस्थानच्या इतिहासाचा उरलेला भाग (पृ. ४००)

(१) रजपूत पृ. ४५, (२) शीख व पंजाब, (पंजाबी वाङ्मयासह) पृ. २२, (३) नेपाळ पृ. १०,(४) भूतान पृ. ५, (५) ब्रह्मदेश पृ. ५, (६) सिलोन पृ. ५, (७) विजयानगर पृ. १०. (८) त्रावणकोर व मलबार पृ. ५,(९) जर्मन वसाहती व तत्संबंधींचें राजकारण पृ. ५, (१०) जंजिरा पृ. ७, (११) गोंड राज्यें पृ. २, (१२) ओरिसांतील राज्यें पृ. २, (१३) जव्हार पृ. ८, (१४) इंग्रजांचीं महाराष्ट्रीय दोस्तसरकारें व त्यांची आजची स्थिति पृ. १५, (१५) प्राचीन हिंदुस्थानांत तयार झालेला राजधर्म व राजव्यवहार पृ. २०, (१६) चरित्रें पृ. २५ ,(१७) विविध पृ. ९.

(१०) ज्ञानकोशार्थ देश्य व बाह्य संस्कृतींची माहिती देण्यासाठीं जी जागा राखून ठेवली आहे, तींतच भूपृष्ठवर्णनाचा अंतर्भाव होतो, त्यामुळें भूगोलासाठीं स्वतंत्र पृष्ठें राखून ठेवली नाहींत.

भूपृष्ठवर्णन—हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांचें व महाराष्ट्रांतील प्रसिद्ध ग्रामांचें वर्णन व निरनिराळ्या देशांचीं वर्णनें हें द्यावयास मुबलक साहित्य उपलब्ध आहे. सरकारी ग्याझेटीअर्स, निरनिराळ्या इंग्रजी, मराठी व हिंदी मासिकांतून व वृत्तपत्रांतून आलेले वर्णनपर लेख, तसेंच धार्मिकदृष्ट्या भूपृष्ठवर्णन म्हणजे तीर्थादिकांची माहिती लिहिण्यासाठीं अनेक माहात्म्यग्रंथ हीं सर्व उपयोगितां येतील. आणि हें काम सामान्य पदवीधर सुशिक्षितांकडून होईल. निरनिराळ्या देशांचीं वर्णनें इंग्रजींत व फ्रेंचमध्यें पण मुख्यत्वेंकरून इंग्रजीमध्येंच जे अनेक ग्रंथ आहेत त्यांवरून तयार करविता येतील. हिंदुस्थानांतील व हिंदुस्थानाजवळील देशांचीं जीं जुनीं नांवें आहेत त्या सर्वांचा प्रस्तुत समावेश करितां येईल. जुनीं नांवें पुष्कळदां लोकांस परिचित नसतात. उदाहरणार्थ, सयाम देश घ्या. याचा ब्रह्मी ग्रंथांतून उल्लेख द्वारावती या नांवानें केला आहे. तार्तरिस खरोष्ट्र देश हें नांव होतें. तर अशा प्रसंगीं जुन्या हिंदु नांवाची ओळख करून दिली पाहिजे.

(१२) बाह्यसंस्कृतींवरील लेखांसाठीं जी जागा राखून ठेविली आहे तिचा चटवडा येणें प्रमाणें.—

(१३) बाह्यसंस्कृतीवरील लेखांसाठीं १५०० पृष्ठें घालावींत असा विचार केला आहे व तीं पृष्ठें कशीं काय वांटून द्यावींत यांचें पृथक्करणहि दिलें आहे. आपणास बाह्य गोष्टीविषयीं जें कौतुक आहे तें व त्या जाणण्याविषयींची आवश्यकता हीं लक्षांत घेतलीं असतां इतकीं पृष्ठें कमी नाहींत हें लक्षांत येईल.

बाह्यसंस्कृतीवरील लेखांविषयीं एक कबूलीजबाब दिला पाहिजे तो हा कीं, आपल्या देशांत पुष्कळ विषयांवर स्वतःच्या ज्ञानानें लिहिण्याला लायक असे लोकच नाहींत. हिंदुस्थानांतील भाषा वगळल्या तर ब्रह्मी, सिंहली, फारशी, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन, चिनी, जपानी, इटालियन व पोर्तुगीज इतक्या भाषा जाणणारे लोक महाराष्ट्रीयांत आढळले तथापि अरबी, हिब्रू, तिबेटी, सयामी इत्यादि संस्कृतीच्या इतिहासाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाच्या भाषा अल्प प्रमाणानें देखील जाणणारे लोक मिळाले नाहींत, तिबेटी जाणणारा एक बंगाली गृहस्थ परिचयाचा आहे व हिब्रू व मराठी जाणणारा मनुष्य मिळणें अशक्य नाहीं अशी माझी समजूत आहे.

हिब्रू व मराठी जाणणारा मनुष्य येथील बेनी इस्त्रायलांत मिळणें शक्य असलें तरी, जुनी असुरभाषा, मिसरी इत्यादि भाषांची काय वाट लावावयाची?

वरील गोष्टीविषयीं आम्हांस एवढेंच सांगावयाचें आहे कीं, अनेक भाषांच्या महाराष्ट्रांतील अज्ञानामुळें इंग्रज, फ्रेंच व जर्मन ग्रंथकारांच्या लेखांवर विश्वास ठेवून आम्हांस लिहावें लागणार. आपल्या लोकांकडून परीक्षण करवून त्यांचे लेख थोडे तरी तपासून घेण्याचें कार्य आमच्या हातून व्हावयाचें नाहीं.

बाह्य संस्कृति (पृ. १५००)—(अ) जाति आणि संस्कृति पृ. १४०, (आ) बाह्यांच्या शासनसंस्था आणि बाह्यांचे इतिहास पृ. ६००, (इ) बाह्य गीर्वाण व बाह्यांचें हिंदुस्थानीय गीर्वाण पृ. २५०, (ई) बाह्यांची कलाकौशल्यें पृ. २००, (उ) इतर अनिर्दिष्ट विषय पृ. ३१०.

(अ) **जाति आणि संस्कृति** (पृ. १४०,) चिनी संस्कृति व जाति पृ. २७, मध्यआशिया जाति आणि संस्कृति पृ. २७, यूरोपीय जाति आणि संस्कृति पृ. २७, दक्षिण द्वैपायन (Oceanic) जाति आणि संस्कृति पृ. १७, पाताळ-मानव्य (Homo Americanus) जाति आणि संस्कृति पृ. १७, सिद्दी मानव्य (Homo Africanus) जाति आणि संस्कृति पृ. १७.

(आ) बाह्यांच्या शासनसंस्था आणि बाह्यांचे इतिहास (पृ. ६००), प्राचीन ग्रीक, रोमन पल्हव, बाबीलोनी, मिसरी, असुरी, खाल्डिया, पेरू, मेक्सिको इत्यादि पृ. १००, ब्रिटिशसाम्राज्य पृ. ८५, अमेरिका पृ. २५, फ्रेंच पृ. ३०, जर्मन पृ. ३०, रशियन पृ. १५, इटालियन पृ. १५, स्वीस पृ. १५, तुर्की पृ. १५, डच पृ. १५, स्पॅनिश, फिरंगी, स्कँडिनेव्हियन, डॉनिश, ग्रीक, पृ. ३०, चिनी पृ. ३०, जपानी पृ. ३०, मध्य-अमेरिका पृ. १५, ब्राझील पृ. १५, इतर दक्षिण अमेरिका पृ. १५, यूरोपियांच्या वसाहती पृ. ३०, ख्रिस्ती संप्रदाय पृ. ४०, इस्लाम पृ. ४०, इतर पृ. १०

(इ) बाह्य गीर्वाण आणि बाह्यांचें हिंदुस्थानीय गीर्वाण (पृ २३) [गीर्वाण या शब्दाचा अर्थ मागें सांगितल्याप्रमाणेंच समजावा. हिंदुस्थानासंबंधानें पाश्चात्त्य संशोधक व लेखक यांचा व हिंदुस्थानांतील लोकांनीं स्वदेशासंबंधानें इंग्रजींत लिहिलेल्या लेखांचा व ग्रंथांचा समावेश आंग्लो इंडियन या सदरासाठीं ठेवलेल्या जागेंत होईल.] ब्रिटिश ३५, आंग्लोइंडियन पृ. २३, फ्रेंच पृ. २५, जर्मन पृ. २५, इटालियन पृ. १०, इतर यूरोपियन पृ. १०, फारशी (हिंदुस्थानांतील फारशी) पृ. १०, आरबी पृ. १०, चिनी पृ. २५, जपानी पृ. १५, सिलोनी पृ. १०, सयामी पृ. ५, तिबेटी पृ. ५, अमेरिकन पृ. ५, जावा, बली वगैरे पृ. ७, प्राचीन गीर्वाण, ग्रीक, झेंदावेस्ता इ. पृ. ३०.

(ई) कलाकौशल्यें (पृ. २००) प्राचीन यूरोपीयन पृ. ५०, अर्वाचीन यूरोपीयन पृ. ५०, मुसुलमानी पृ. ३५, वन्य पृ. ३०, चिनी आणि जपानी पृ. ३५.

शास्त्रें

(उ) इतर अनिर्दिष्ट विषय (पृ. ३१०)

(१४) शास्त्रासंबंधीं व तदंगभूत कलासंबंधीं ५००० पृ. योजिलीं आहेत त्यांचा बटवडा येणेंप्रमाणें—

अध्यापनशास्त्र पृ. १२, इतिहाससंशोधनशास्त्र पृ. २५, इतिहाससंबद्ध शास्त्रें (शिलालेख, नाणीं, जुनें लेख इ. अभ्यास) पृ. १३, इंद्रियविज्ञानशास्त्र पृ. ७५., कायदा (आंग्ल धर्मशासनपद्धति) पृ. १५०, कृमिशास्त्र पृ.५०, कृषिकर्म-विद्या पृ २००, खनिज द्रव्यें व खनिखोदन पृ १००, गणित पृ. १००, जंगल-विषयक अर्थशास्त्र पृ. १००, सूक्ष्मजीवशास्त्र पृ. ५०, जातिवर्णन व जातींचा इतिहास (यात हिंदुस्थानांतील सुमारें ३६०० व बाहेरील सुमारें ४०० जातींचा माहिती येईल.) पृ.५००, ज्योतिःशास्त्र पृ. १००, धंदे(निरनिराळे) पृ. ३००, धर्मशास्त्र पृ १५० , नगररचना पृ. १०, नौकाबंधन पृ. ५०, पदार्थविज्ञान-शास्त्र पृ. २५०, प्राणिशास्त्र पृ. ७५, फलज्योतिष पृ. १०, भाषाशास्त्र १००, भूशास्त्र पृ. १००, भौतिक भूपृष्टवर्णन पृ. ५०, मानसशास्त्र पृ. ७५, युद्धकला (प्राचीन व ऐतिहासिक) पृ. ५०, युद्धकला आधुनिक पृ. १००, रसायन-शास्त्र पृ. २००, वनस्पतिशास्त्र पृ. २००, वास्तुसौंदर्यशास्त्र पृ. ६०, शारीर-शास्त्र पृ. ७५, शासनशास्त्र व अर्थशास्त्र पृ. १००, समाजशास्त्र पृ. १००, यंत्रशिल्पशास्त्र पृ. २००, स्थापत्यशास्त्र (Civil Engineering). पृ. १००, लोहमार्गवाहन पृ. ५०, विद्युच्छक्ति पृ. ५०, वैद्यकशास्त्र एतद्देशीय व बाह्य. निदान व चिकित्सा पृ.४००, संगीतशास्त्र पृ. ५०, साहित्यशास्त्र पृ ५०.

अवशिष्ट शास्त्रें (पृ. ६७०)

(१५)शास्त्रीय ज्ञानाचा व्यवहारांत उपयोग करण्यासाठीं जीं यंत्रें,आऊतें, इत्यादि बनविलीं असतात, त्यांच्यासाठीं जी स्वतंत्र जागा राखून ठेविली आहे तिचा अंतर्भाव निरनिराळ्या सदरांत होतो. उदाहरणार्थ, उष्णतामापक यंत्र [थर्मामिटर] याचा समावेश उष्णतेवरील लेखासाठीं जी जागा सोडिली आहे तिच्यांतच होईल. प्रकाशलेखना[फोटोग्राफी]साठीं जी जागा राखिली आहे, तिचा समावेश प्रकाशावरील लेखासाठीं ठेवलेल्या जागेंत न करितां निरनिराळ्या धंद्यासाठीं जी जागा ठेवली आहे तिच्यांत केला आहे.

(१६) निरनिराळ्या शास्त्रांवर लेखक सांपडले आहेत एवढेंच नव्हे तर देशांतील व बाहेर देशांतून आपल्याकडे येऊन आतां देशांतीलच बनलेल्या कलांवर लेखक सांपडले आहेत.

कांचकाम, मद्यें [गांवठी व विदेशी] तयार करणें, साखर करणें, गंधी-काम, मुद्रणकला, कागद करणें, साबणगारी, सोनारकाम, लोहारकाम, विण-काम, मूर्तिकर्म, सुतारकाम, सूत काढणें, तेलें करणें, चामडीं कमावणें, पुस्तकें बांधणें, घड्याळें करणें, कल्हई [परंपरागत व अर्वाचीन] करणें इत्यादि अनेक प्रकारच्या विषयांवर लेखक सांपडले आहेत, तथापि त्याबरोबर हेंहि कबूल केलें पाहिजे कीं, कांहीं निरनिराळे धंदे असे आहेत कीं त्यांचे कारखा-गार महाराष्ट्रांत नाहींत आणि त्याविषयींचें ज्ञान आज तर अनुभविक

लेखकांडून लिहिलें न जातां तें पुस्तकी विद्येप्रमाणें असेल. उदाहरणार्थ जुन्या तऱ्हेनें तोफा तयार करणारे कारागीर नेपाळांत जरी अजून आहेत तरी आपणांमध्यें उरले नाहींत, व नवीन प्रकारची तोफा करण्याची कला राजकीय परिस्थिति बदलल्याशिवाय देणें शक्य नाहीं. त्यामुळें या संबंधाची माहिती जवळ जवळ भाषांतरवजा होणार. भाषांतरवजा याचा अर्थ मूळग्रंथ न समजतां शब्दास शब्द ठेवून लिहिलेली असा मात्र नव्हे, तर चांगल्या शास्त्रज्ञानें मूळ ग्रंथ वाचून तो समजून घेऊन त्याच्या अनुरोधानें लिहिलेली असा समजावा.

शास्त्रीय संज्ञा

(१७) या ग्रंथांत पाश्चात्त्यशास्त्रें अनेक येणार, त्यांच्यासाठीं संज्ञा काय योजावयाच्या यासंबंधानें, आमचे कांहीं निर्णय येणेंप्रमाणें झाले आहेत. (१) होतां होईं तों मुख्य संज्ञा संस्कृत व मराठी भाषेंतील शब्द घेऊन बनवावयाच्या. (२) इंग्रजी, अरबी अगर फारसी संज्ञा अजीबात वगळावयाच्या असें मात्र नाहीं, तथापि ज्या परक्या भाषेंतील संज्ञा घ्यावयाच्या त्या कुणब्यांसहि ठाऊक असतील अगर बऱ्याच वर्गांत प्रचलित असून उच्चारास कठीण नसतील, तरच घ्यावयाच्या. (३) संज्ञा शोधतांना, आजपर्यंत मराठींत शास्त्रीय विषयांवर झालेलें सर्व लिखाण तपासावयाचें, कां कीं सर्वांत उपयुक्त संज्ञा त्याच पद्धतीनें मिळतील. बंगाली व तेलगू ज्ञानकोशांतील संज्ञा फारशा उपयुक्त होतील असें वाटत नाहीं. बंगाली व हिंदी ज्ञानकोश वाचतांना त्या कोशकारास संस्कृत भाषेचे सांधिनियम तरी ठाऊक होते किंवा नाहीं असा संशय जागोजाग येतो. तथापि त्यांत कांहीं तरी ग्राह्यांश सांपडेलच. नागरीप्रचारणी सभेनें काढलेल्या संज्ञा, प्रो० लक्ष्मण गणेश साठे यांच्या रसायनशास्त्राच्या संज्ञा आणि प्रो. रानडे यांच्या कोशांत जर कांहीं संज्ञा सांपडल्याच तर त्या, या सर्वांचा विचार करून निराळी संज्ञामाला बनवितां येईल. यांत्रिक विषयांवर अनेक संज्ञा मुंबईच्या व इतर ठिकाणच्या मजुरांनीं बनविल्या आहेत, त्या बऱ्याच महत्त्वाच्या आणि प्रसंगीं मोठ्या मौजेच्या आहेत. त्याप्रकारच्या अनेक रा० रा० दिवाकर यशवंत फाटक यांनीं जमा केल्या आहेत. मासल्यासाठीं दोन तीन येथें देतों. म्यूल-गाडीखालें, टेपरगायदूस, नट-नटी, बोल्ट-सूत्रधार, इ०. (४) संज्ञा बनवितांना यूरोपियन संज्ञांचें भाषांतर करावयाचें नाहीं हें उघड आहे. कारण कित्येक यूरोपियन संज्ञाच चुकलेल्या आहेत. उदाहरणार्थ 'थर्मामीटर' शब्द घ्या. थर्मामीटर या शब्दाचें उष्णतामापक यंत्र असें भाषांतर होतें. भाषांतर बरोबर आहे. मात्र थर्मामीटरनें एकंदर उष्णता मोजली जात नाहीं तर उष्णतेचा कस मोजला जातो. एक पेलाभर गरम चहामध्यें उष्णतेचें साकल्य पेटवलेल्या

आगकाडीपेक्षां पुष्कळ अधिक आहे. पण थर्मामीटर सारख्या यंत्रानें मोजली जाणारी पेटलेल्या काडीची उष्णता गरम चहाच्या पेल्याच्या उष्णतेपेक्षां पुष्कळ अधिक आहे. इंग्रजी शब्दास प्रतिशब्द बनवावयाचा नाहीं तर शास्त्रीय कल्पना देश्य शब्दांत व्यक्त करावयाची आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आम्हांस शास्त्रीय संज्ञांसाठीं अडचण मुळींच नडणार नाहीं आणि आजकालच्या नेड्यावांकड्या इंग्रजी संज्ञांपेक्षां अधिक शुद्ध आम्हांस वापरतां न आल्या तर आम्हीं आपलें काम चांगलें केलें नाहीं असें समजूं [१८ या योजनालेखाचा १८ वा भाग कोणत्या विषयावरील लेखकास काय मोबदला द्यावा या संबंधाचा आहे. व तो चालकांच्या सूचनेवरून प्रसिद्धिपत्रकांतून गाळला आहे.]

(१९) आपणापैकीं रा० रा० निळकंठराव भवाळकर यांनीं १५ मार्च १९१६ रोजीं ज्ञानकोशाच्या कल्पनेच्या पसंतीचें एक पत्र लिहिलें त्यांत ते लिहितात " आपण ५ वर्षांत ज्ञानकोश पुरा करण्याचें आश्वासन देतां तें आपण खरें करून कसें दाखविणार, तें करण्याची योजना आपली कशी काय आहे हें आपण स्पष्टपणें चालकपंडळापुढें मांडावें व तें मांडल्यानंतर मीं प्रास्पेक्टसवर सही करीन एरव्ही करणार नाहीं. " मी त्यांच्यापत्राप्रमाणें चालक मंडळीपैकीं कांहीं मंडळीपुढें ५ वर्षांत ग्रंथ पुरा करण्याची योजना सामान्य तऱ्हेनें वर्णन करून मांडली होती. ती योजना आतां अनुभवांतीं थोडाबहुत फेरबदल करून पुन्हां आपणापुढें ठेवीत आहें.

(२०) पांच वर्षांत ग्रंथ पुरा करून छापावयाचा ही योजना पूर्ण करावयाची. त्यांत ग्रंथ तयार करण्याकडे चार वर्षें दिलीं आहेत व छापण्यासाठीं एक वर्ष ठेवलें आहे. एक वर्षांत ग्रंथ छापून काढावयाचें काम जबर आहे हें खरें.कां कीं तसें करावयाचें झाल्यास निदान चाळीस कंपाझीटर्स या कामाकडे गुंतविले पाहिजेत आणि जे छापखाने आमच्या कामासाठीं चाळीस कंपाझीटर्स गुंतवूं शकतील व त्यास लागणारा टाईप पाडीत रहातील असे छापखाने महाराष्ट्रांत फार थोडे आहेत तथापि हें अशक्य नाहीं एवढेंच सांगतों. खुद्द नागपूरमध्येंच छापखाने दिवसानुदिवस वाढत आहेत व आहेत ते सुधारत आहेत मुंबईतील एका इंग्रज छापखानदारास स्वतः भेटून हें काम आपण एका वर्षांत छापून देऊं शकाल काय असा प्रश्न केला असतां त्यांनीं कांहीं अटींवर होकाराचें उत्तर दिलें.

(२१) आतां चार वर्षांत ग्रंथ तयार होईल काय? एवढाच प्रश्न उरला. त्याचें उत्तर येणेंप्रमाणें आहे–काम करण्यास सोपें-कठीण या दृष्टीनें ग्रंथाचे पुढील भाग पडतात.(१)शास्त्रीय विषय. उदाहरणार्थ गणित, रसायनशास्त्र,भूगर्भशास्त्र इ०, (२) आंग्ल वैद्यक, शेतकी, पशुवैद्यक, आर्यवैद्यक, शिल्पशास्त्र, कायदा

इत्यादि व्यावहारिक शास्त्रें. (३) हिंदुस्थानखेरीज इतर देशांचे वृत्तांत, (४) निरनिराळ्या देशांचीं वाङ्मयें, व बौद्धिक इतिहास. (५) निरनिराळ्या परमार्थ संप्रदायांचे (उदाहरणार्थ ख्रिस्ती, मुसुलमान इत्यादि) इतिहास, (६) समाजशास्त्र, अर्थशास्त्र, शासनशास्त्र इत्यादि (ज्यांत वादग्रस्त विषय अनेक आहेत अशीं शास्त्रें), (७) हिंदुस्थानचा राजकीय, वाङ्मयविषयक, बौद्धिक सांस्कृतिक इतिहास व भूगोलवर्णन: यांपैकीं प्रत्येक विषयाची विल्हेवाट येणेंप्रमाणें.

गणित–रसायनादि शास्त्रें निरनिराळ्या मंडळीस दिलीं आहेत एवढेंच नव्हें तर एकच शास्त्र तोडून निरनिराळ्या मंडळीस द्यावयाचें योजिलें आहे. रसायनशास्त्र घ्या. याचा सर्व सामान्य संपादक एक राहील, आणि त्याचें काम विषयाची विभागणी करून एक एक भाग निरनिराळ्या लोकांस वाटून देणें, त्यांकडून आलेले लेख तपासून संज्ञा (terminology) सर्वसामान्य करणें, प्रुफें तपासणें इत्यादि प्रकारचें राहील.

व्यावहारिक शास्त्रांची देखील गोष्ट तशीच आहे. शेतकी हें शास्त्र दहाबाराजणांमध्यें वांटलें गेलें असल्यामुळें कित्येकांनां दहा तर कित्येकांनां पंचवीस पृष्ठें असा मजकूर लिहावा लागेल. आमच्या आफीसाच्या बाहेरील लेखकांस पंचवीस–तीस पृष्ठांपेक्षां जास्त मजकर लिहावयास द्यावयाचा नाहीं असें योजिलें आहे. सर्व लेखकांशीं मोबदल्यासंबंधानें करार न झाल्यामुळें त्यांचीं नांवें दिलीं नाहींत. ज्या ज्या लेखकांशीं करार करीत आहों त्या त्या लेखकांस १ डिसेंबर १९१९ च्या अगोदर लेख आमच्या हातीं आला पाहिजे असें सांगत आहों. पुढील एक वर्ष त्या लेखांच्या संपादकीय परीक्षणार्थ लागेल. संपादकीय परीक्षणामध्यें पुढील गोष्टींचा मुख्यतः समावेश होतोः (१) आपण विषयाचे भाग कितीहि कसोशीनें पाडले तरी लेख निरनिराळ्या लेखकाकडून आला असल्यामुळें पुनरुक्तीचा भीति आहे. सर्व लेख एकत्र करून वाचतांना पुनरुक्ति काढावी लागेल (२) सर्व ग्रंथ एकच असल्यामुळें त्यात संज्ञासंबंधानें एकवाक्यता ठेवावी लागेल. एक शास्त्र इतर शास्त्रांशीं संबद्ध असल्यामुळें अनेक शास्त्रांस अशा ज्या कांहीं संज्ञा आहेत, त्यांसाठीं मराठी संज्ञा निरनिराळ्या लेखकांकडून निरनिराळ्या वापरल्या जाऊं नयेत यासाठीं खबरदारी घेतली पाहिजे. (३) सर्वसामान्य संपादकीय काम म्हणजे शुद्धलेखनाच्या चुकांची दुरुस्ती वगैरे निरनिराळ्या देशांचीं वाङ्मयें व बौद्धिक इतिहास हें काम अंशकरून बाहेरून व अंशकरून आफीसमध्येंच तयार होईल. (४) अर्थशास्त्र व शासनशास्त्र यांचे अधिक विभाग पाडले जाऊन सुमारें ३५ लेखकांकडे हें काम सोंपविलें जाईल.

(२२) हिंदुस्थानचा राजकीय, सांस्कृतिक, वाङ्मय विषयक, बौद्धिक इतिहास व भूगोलवर्णन हा विषय ठरीव वेळांत संपवावयास खरा खरा कठीण आहे तरी देखील हा चार वर्षांत तयार होईल असा माझा भरंवसा आहे. हा भरंवसा एक वर्ष जे प्रयोगासाठीं काम केलें त्यावरून उत्पन्न झाला आहे.

(२३) ग्रंथरचनेबरोबर सूची तयार करण्याचें काम चालू आहे. तिचा उपयोग ग्रंथांतील पुनरुक्ति व परस्परविरुद्धता हे दोष दाखविण्याकडे व ते काढून टाकण्याकडे होईल.

(२४) संस्कृतिविषयक जो मजकूर द्यावयाचा त्याची तात्पुरती योजना वरीच विस्तृत दिली आहे, आणि शास्त्रीय विषयांसाठीं जीं पृष्ठें राखून ठेवलीं आहेत त्यांचा बटवडा दिला नाहीं. निरनिराळ्या शास्त्रांसाठीं जीं पृष्ठें राखून ठेवलीं आहेत, त्यांची योजना देखील अगदीं कायमची समजूं नये. कारण अधिक अनुभवानंतर व इतर लोकांकडून ज्या कांहीं सूचना मागविल्या आहेत त्या आल्यानंतर यांत फेरबदल होईलच. निरनिराळ्या शास्त्रीय विषयावरील लेखांची विषयसूचि तयार झाली नाहीं याचें मुख्य कारण हें कीं प्रत्येक शास्त्राचा सामान्य संपादक अजून नेमला गेला नाहीं. प्रत्येक शास्त्राचा मुख्य संपादक विषयसूचि तयार करून मग त्या शास्त्रांतील विषयांचा बटवडा निरनिराळ्या लेखकांमध्यें करील. ज्या आमच्या शास्त्रीय मंडळाच्या सल्लयानें पानांचा बटवडा निरनिराळ्या शास्त्रांमध्यें केला त्यांनीं कांहीं विषयसूची तयार केल्या आहेत तथापि आजच त्या प्रसिद्ध कराव्यात असें त्यांचें मत नाहीं. याचें कारण त्यांनीं पुढें दिलेल्या पत्रांत दिलेंच आहे.

(२५) आपले यंत्रशिल्पशास्त्रावरील लेखक रा. रा. दिवाकर यशवंत फाटक, तैलयंत्रज्ञ उमरावती यांनीं सूचना केली होती कीं सर्व ज्ञानकोश एकच पुस्तक समजून सर्व विषय सरसकट न करतां निरनिराळ्या शास्त्रांवर निरनिराळे भाग प्रसिद्ध करावेत आणि प्रत्येक भागामध्यें माहिती अकारविल्ह्यानें द्यावी, चालकांपैकीं कांहीं मंडळींस (विशेषतः रा. धुंडीराज ठेंगडी च माधवराव पाध्ये यांस) ही कल्पना आवडल्यामुळें त्यासंबंधानें त्यांनीं या प्रश्नाचा अधिक विचार करण्यासाठीं शिफारस केली होती. ती सूचना शास्त्रीय मंडळापुढें ठेवली तेव्हां त्यांचें प्रतिकूल मत आलें. निरनिराळ्या शास्त्रांचे निरनिराळे भाग प्रसिद्ध करण्याची कल्पना आतां कायमची सोडून दिली आहे. याविषयींचें त्यांचें पत्र येणेंप्रमाणें.—

२४।३।१७

वि. वि.

आपणांकडून सर्व शास्त्रांची विषयसूचि तातडीनें तयार करून देण्यासंबंधाचें पत्र आलें होतें व त्यासंबंधानें आपणास आम्हीं आपलें म्हणणें

रा. देशमुख यांच्यामार्फत तोंडी कळविले होते. आपण उत्तर लेखी मागतां तर तें पाठवीत आहों.

आम्ही विशेषेंकरून रसायन, पदार्थविज्ञान, प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र व कृषिकर्मविद्या ह्या शास्त्रांची विषयसूचि करण्याचें काम हातीं घेतलें. सूची तयार करतांना एका विषयाचा अनेक शास्त्रांशीं संबंध आहे असें शेकडों विषय आल्यामुळें आम्हांस प्रत्येक शास्त्राच्या सूचीमध्यें त्याच त्याच विषयांच्या नांवांची पुनरुक्ति करणें बरें वाटलें नाहीं. एका विषयावरच पण निरनिराळे भाग लिहिले गेले पाहिजेत. तथापि विषयसूचि करतांना विषयांची पुनरुक्ति करणें टाळलें पाहिजे. एक विषय अनेक शास्त्रांसाठीं येतोहेंयांसें मास्त्यासाठीं उदाहरणें येणें प्रमाणें:

क्यामेरा	[पदार्थविज्ञानशास्त्र व प्रकाशलेखन].
रंग [Colour]	[पदार्थविज्ञानशास्त्र व रसायनशास्त्र].
रंग [Dye]	[रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र व खनिजशास्त्र].
ग्रहणें	[पदार्थविज्ञान, ज्योतिष व रसायनशास्त्र].
स्पेक्ट्रॉस्कोपी	[पदार्थविज्ञान, ज्योतिष व गणितशास्त्र].
नेत्र	[पदार्थविज्ञान व इंद्रियविज्ञान].
वातावरण	[पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, दिनचर्याशास्त्र Meteorology].
शक्ति [Energy]	[पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, सांख्यतत्त्वज्ञान]
द्रव्य [Matter]	[पदार्थविज्ञान,रसायनशास्त्र,वैशेषिक दर्शन इ.].
सरलक्षेप[Radiation]	[पदार्थविज्ञान, ज्योतिष].
सूर्य	[पदार्थविज्ञान, रसायन, ज्योतिषशास्त्र, परमार्थ-साधनशास्त्र, फल ज्योतिष इ.].
पृथ्वी	[पदार्थविज्ञान, रसायन, भूगर्भशास्त्र,भूपृष्ठवर्णन, इतिहास, ज्योतिषशास्त्र].
बाष्पांचें द्रवीकरण	[पदार्थविज्ञान, रसायन, उद्योगधंदे].
विद्युद्गतिसाधकयंत्र (Dynamo)	[पदार्थविज्ञान, यंत्रशिल्पशास्त्र, उद्योगधंदे].
विद्युद्दीप [Electrical lightening]	[पदार्थविज्ञान, यंत्रशिल्प, नगरविषयक अर्थशास्त्र].
एक्स किरण[X Rays]	[पदार्थविज्ञान, वास्तवैद्यक].
भरती ओहटी	[ज्योतिष, पदार्थविज्ञान,गणितशास्त्र, नौकानयन].
विमानविद्या	[पदार्थविज्ञान, यंत्रशिल्पशास्त्र].
ध्वनि	[पदार्थविज्ञान व संगीतशास्त्र].

ध्वनि [साहित्यशास्त्र].

श्रोत्रेंद्रिय [पदार्थविज्ञान, इंद्रियविज्ञान].

विद्युत्पृथक्करण [Electrolysis] } पदार्थविज्ञान, रसायन, यंत्रशिल्पशास्त्र].

दूध [पशुवैद्यक, वैद्यक, उद्योगधंदे, सूक्ष्मजीवशास्त्र, आरोग्यशास्त्र, रसायनशास्त्र, इ.]

कापूस [शेतकी, कीटकशास्त्र, वनस्पतिशास्त्र, उद्योगधंदे, इ.]

यांप्रमाणें शेकडों उदाहरणें देतां येतील.

ज्या अर्थी आम्हां चौघांपैकीं कोणीहि कोणत्याहि शास्त्राचा मुख्य संपादक होण्यांस तयार नाहीं [कां, कीं आमच्यापेक्षां शास्त्रीयज्ञानाच्या बाबतींत अधिक योग्यतेचीं माणसें आहेत] व ज्या अर्थी लेखांसंबंधाचीं जबाबदारी दुसऱ्या संपादकांवर आहे त्यांअर्थी आम्ही बनवीत असलेली विषयसूचि संपूर्णच आपण प्रसिद्ध करूं नये असें आमचें मत आहे विषयलेखनाची जबाबदारी आम्हीं चुकविण्याचा प्रयत्न करतों असें मात्र आपण समजूं नये. आम्हीं बनविलेल्या विषयसूचीवर निरनिराळ्या शास्त्रांच्या संपादकांचा शिक्का बसला म्हणजे मात्र त्या प्रसिद्ध करण्यास मुळींच हरकत नाहीं.

याशिवाय आणखी एक गोष्ट म्हटली म्हणजे. आम्हीं संज्ञांसंबंधानें जे नियम ठरविले व जे आपणांस मान्यहि झाले ते नियम पाळून अगोदर मुख्य संज्ञा बनविल्या पाहिजेत आणि मागाहून त्यां वापरून विषयसूचि प्रसिद्ध केली पाहिजे. मराठींत शास्त्रीय विषयांवर सुमारें तीनशेपेक्षां अधिक पुस्तकें आहेत तीं सर्व तपासून त्यांतील संज्ञा उकरून काढावयास सुमारें सहा महिने लागतील.

सध्यां मराठींत शास्त्रशुद्ध ग्रंथवर्णन [Biblioagrphy] नाहीं. जर कोणी निरनिराळ्या शास्त्रें व मासिकांतील निरनिराळे लेख हीं सर्व एकत्र करून आणि त्यांचें तत्त्वज्ञानयुक्त वर्णन करून प्रसिद्ध केलीं असतीं तर आमचा मार्ग बराच सुकर झाला असता. सध्यां जे अनेक इंग्रजी-मराठी कोश आहेत त्यांच्याकडे अवलोकन केलें असतां खेद उत्पन्न होता. शास्त्रीय विषयांतर्गत शब्दास प्रतिशब्द फारच थोडक्या प्रसंगीं दिले आहेत.

असो, एका विषयाचीं अभ्यासें अनेक शास्त्रांत समाविष्ट होतो हें

दाखविण्यास मार्ग जी यादी दिली तीवरून निरनिराळ्या शास्त्रांचे ग्रंथ करावे या विचाराची अप्रयोजकता सहज सिद्ध होईल.

आपले स्नेहांकित,

भिकाजी विनायक डेग्वेकर,

एम्. ए. एम् एस्सी. एल्एल. बी.

शंकर नागनाथ गोडबोले, एम्. एस्सी.

यशवंत बाळकृष्ण रानडे, एम् एस्सी.

रामचंद्र त्र्यंबक देशमुख, बी. एजी.

(२६) कायद्यासंबंधाच्या विषयसूचीसंबंधाचें काम रा. भवानीशंकर नियोगी (M. A. LL. M.) व रा. दत्तोपंत कटाळे (B. A. LL. M.) यांस दिलें होतें. रा. भवानीशंकर म्हणजे जाडें प्रकरण आहे. त्यास प्रथम 'कार्य कोणत्या तत्त्वावर करावयाचें' हें चांगलें विचारपूर्वक ठरवावयाचें असतें, आणि रा. कटाळे यांस काम पूर्णत्वानें केलेलें ('?रो') पाहिजे आहे. विषय-सूचीसंबंधानें घाई करण्याचें त्यांनीं नाकारिलें व नाकारण्याचें कारण त्यांनीं लेखी सादर केलें आहे. त्यांनीं जें कार्यध्येय ठेवलें आहे व जो कार्यक्रम सुच-विला आहे, तो दोघांच्याहि लोकविश्रुत विद्वत्तेस साजेलसाच आहे त्या कार्य-क्रमासंबंधानें आपणांस कल्पना यावी म्हणून त्यांचें पत्र आपणांपुढें ठेवीत आहे.

सा न वि. वि. २९ मार्च १९१७

ज्ञानकोशांतील कायद्याच्या भागांची विषयसूची मी तयार करावी असें आपलें पत्र मला वांहीं दिवसांपूर्वी पोंचलें. रा. रा दत्तोपंत कटाळे बी. ए. एल्. एल्. एम्. आणि इतर कायदेपंडितांबरोबर अनेक संभाषणें व वादविवाद करून शेवटीं आम्ही असें ठरविलें आहे कीं आमची एकंदर कायद्यासंबंधानें : मुक्त्चय'त्मक कल्पना जोपर्यंत आपणास पसंत पडली नाहीं तोंपर्यंत सूची करण्याची घाई केल्यास बरेच श्रम फुकट जातील. हिंदुस्थानांत सध्यां चालू असलेल्या इंग्रजी कायद्यासंबंधानें कोण-तीच अडचण नाहीं. मुख्य अडचण "हिंदु कायद्या" च्या विवरणासंबंधानेंच आहे. म्हणून "हिंदू कायदा" म्हणजे काय याबद्दल जोपर्यंत आपलें व आमचें मतैक्य झालें नाहीं तोंपर्यंत त्याचा विषयानुक्रम तयार करणें व्यर्थ होय असें आम्हीं समजतों तें एकदां मतैक्य झालें म्हणजे मग विषयानुक्र-मणिका बनविणें कठिण नाहीं. यासंबंधानें आम्ही आपला विचार येणेंप्रमाणें मांडतों.

(१) इंग्रजी न्यायकोर्टें आपल्या देशांत हिंदूंच्या ज्या कायद्याची अंमलबजावणी करतात तेवढाच हिंदु कायदा अशी त्याची आकुंचित कल्पना

र करतां हिंदु लोकांचा सर्व ठिकाणीं लागू पडणारा कायदा स्पष्ट केला पाहिजे सर्व ठिकाणीं लागू पडणारा कायदा व त्याचीं सर्व अंगें द्यावयाचीं हें तत्त्व आम्हीं आपल्या पुढें मांडतोंच; तथापि चांगला उत्तम शास्त्री विशेषतः मीमांसक आमच्या मदतीस असल्याशिवाय आमचें कार्यध्येय साधावयाचें नाहीं अशीहि आमची समजूत आम्हीं व्यक्त करितों.

(२) देशांतील निरनिराळ्या शासनसंस्थांकडून अमलबजावणी होत असलेला हिंदूंचा कायदा हा इंग्रजी न्यायकोर्टांत चालू असलेल्या कायद्यापेक्षा जास्त विविध आणि विस्तृत असल्यामुळें ब्रिटिश न्यायकोर्टांनीं फेरबदल करण्यापूर्वी हिंदू कायद्याचें मूळस्वरूप काय होतें याचा शोध प्रथम झाला पाहिजे. व नंतर ब्रिटिश व इतर कोर्टांनीं पांडित्य करून त्याचें रूप कसें बदललें हें सांगितलें पाहिजे.

वर सांगितल्यापैकीं आमचा दुसरा मुद्दा अधिक स्पष्ट करून सांगतों. इंग्रजांहून भिन्न अशी यूरोपीय राष्ट्रें देखील या देशांत हिंदु कायद्याची अंमलबजावणी करीत आहेत. गोव्यातील पोर्तुगीजांच्या व पाडिचरीस फ्रेंचांच्या कोर्टांच्या निकालांत व इंग्रजी कोर्टांच्या निकालात एकाच विषय संबंधानें कायद्यात फरक सांपडतो. महाराष्ट्रीयांचीच गोष्ट घ्याना. इंग्रजी घडणीच्या हिंदू कायद्याहून पोर्तुगीज मुलुखात प्रचारात असलेला हिंदु कायदा व निझाम-कोल्हापूर व सांगली यासारख्या देशी संस्थानात उपलब्ध असलेला कायदा भिन्न आहे व त्यांतील भेदाचें परीक्षण व्हावयास पाहिजे आहे. इंग्रजांचे मांडलिक असलेल्या देशी संस्थानातील चालू कायद्यात व इंग्रजी राज्यातील कायद्यांत फार महत्त्वाचा फरक नसला तरी पण साम्यभेदाचें परीक्षण व्हावयास पाहिजे. याशिवाय दुसरें असें कीं संस्थानाच्या वारसासंबंधीं हक्काचे तंटे व संस्थानाविरुद्ध केलेलीं अपीलें इंग्रजांच्या परराष्ट्रखात्यांतील गोठमोठ्या अधिकाऱ्यांकडे निकालाकरितां व अमलबजावणीकरितां जातात. 'हिंदु कायद्या' प्रमाणें त्याचा निकाल करताना हिंदु कायद्याचा आणि तदंतर्गत विवेचनपद्धतीचा यथाशक्ति अवलंब केला जातो. आणखी पण कोर्टाबाहेरील हिंदु कायद्याचें हें उदाहरण होय. येथें आणखी हें सांगितलें पाहिजे कीं, इंग्रजी साम्राज्यांतील इतर दुय्यम प्रतीच्या शासनविभागांत--उदाहरणार्थ अंदमान व गियाना येथें-तसेंच साम्राज्याबाहेरील इतर देशांत--उदाहरणार्थ अफगाणिस्तान व तार्तरी येथें, प्रचलित असलेला हिंदू संबंधाचा कायदा विचारांत घेतला पाहिजे. ठिकठिकाणीं बरेच महत्त्वाचे फरक दिसतात. अंदमान येथें विवाहविषयक कायदा बराच बदलला आहे आणि ब्रिटिश गियानामध्यें हिंदू पद्धतीचीं लग्नें तेथील शासकवर्ग मान्य करीत नाहीं. उलटपक्षीं नेपाळसारख्या हिंदु राज्यात तर मध्यांचें चालू असलेल्या

कायद्याचें स्वरूप बरेंच भिन्न आहे. ज्या प्राचीन संस्था ब्रिटिश हिंदुस्थानांत रूढ असलेल्या दिसत नाहींत त्यांचा पगडा नेपाळांत अद्याप आहे.

आपणास जातीच्या पंचायतीसारख्या शासनसंस्था विचारांत घेतल्या पाहिजेत, का कीं पुष्कळ ठिकाणीं त्यांचे निकाल उपलब्ध आहेत. संबळपूरच्या झाडिया ब्राह्मणांच्या व जोधपूरच्या अनेक मारवाडी जातींच्या पंचायतींचे निवाडे अनेक वर्षे लिहिले जात आहेत. यांपैकीं बऱ्याच निवाडयांतून इंग्रजी कोर्टांस अगदीं अपरिचित असा पुष्कळ भाग सांपडेल असें आम्हांस वाटतें. कालांतरानें त्या सर्वांचा इंग्रजी राज्यांतील न्यायपद्धतीवर परिणाम होणार आहे. बडोदें राज्यांत तर पंचायतींचें शासन कायद्यानें नियमित करण्याचा यत्न झाला आहे व देवास [पाती २] येथेंहि तोच प्रयत्न झाला आहे. सिलोनमधील हिंदु कायदा हिंदुस्थानच्या कायद्यापेक्षां थोडा तरी भिन्न आहेच.

हें सर्व मी व्यक्तीस लागू असणाऱ्या हिंदु कायद्यासंबंधानें म्हणत आहे. जर प्राचीनकाळीं प्रचलित असलेल्या कायद्यासंबंधानें लिहावयाचें असलें तर फारच निराळ्या रीतीनें प्रयत्न करावयास हवा. प्राचीनकाळीं अमलांत असलेली समाजरीती, राजशासनाचा किंवा राजशासनानें अधिकार देऊन अस्तित्वांत आणलेल्या श्रेष्ठ संस्थांच्या (उदाहरणार्थ, व्यापारी श्रेणी, कुटुंब व जाती यांच्या) नियमांचा अभ्यास झाला पाहिजे. तसेंच शिलालेख ताम्रपट इत्यादि राजशासनें तपासून व ऐतिहासिक वृत्तें पाहून समाजांत निग्रहानुग्रहरूपी झालेले नियम शोधून काढून धर्मशास्त्रापासून भिन्न तथापि धर्मशास्त्राच्या छायेखालींच चालणारा असा कायदा शोधून काढला पाहिजे.

ब्रिटिश राज्यांतील चालू असलेल्या कायद्याचें स्वरूप जाणून घेणाऱ्या पुष्कळशा जिज्ञासूंस या धर्तीवर तयार केलेल्या बऱ्याच विवरणाचा फारसा उपयोग होणार नाहीं हें आम्हीं जाणून आहों तरी पण कायद्यावरील लेख तत्त्वज्ञानयुक्त करावे असा आम्ही आग्रह धरतों. ज्ञानकोशांतील लेख हे कोर्टांत वकीलांच्या कारकुनांस उपयोगी पडणाऱ्या ज्ञानापेक्षां पुष्कळ खोल विचाराचे असले पाहिजेत कारण अशा लोकांस उपयोगी पडणाऱ्या कायद्याचे समुच्चयग्रंथ नेहमीं पाहण्यांत आहेत. पंडितवर्गासच शोभेल असें जें आपण ज्ञानकोशाचें काम हातीं घेतलें आहे त्या कामांत शास्त्रशुद्ध ग्रंथरचना पाहिजे. सामान्य वर्गाकरितां उपयोगी माहिती घालावी, त्यास आम्ही नाहीं म्हणत नाहीं; तथापि पंडितवर्गास साजेलसें विवेचन अधिक अवश्य आहे. राजकीय व वाङ्मयात्मक इतिहासाची सूचि आधींच तयार न करण्यांत जीं आपलीं कारणें आहेत तींच कायद्याविषयींचा जो भाग कोशांत घालावयाचा आहे

त्यास लागू आहेत. हिंदु कायद्याची सूचि देण्याचें आम्हीं नाकारीत असूनहि कार्यपद्धतीसंबंधानें खालील सूचना करीत आहोंत.

(१) श्रौत, गृह्य व धर्म यांवरील सूत्रांची आणि स्मृतींची विषयवार सूचि कोणा तरी धर्मशास्त्रपंडिताकडून करून घ्यावी.

(२) आपल्या धुळ्याच्या मंडळाकडून शिलालेखादि शासनांतून निघणारा कायदा काढून घ्यावा.

(३) इतिहास, पुराण व राजतरंगिणीसारख्या इतर ऐतिहासिक ग्रंथांतून कायद्याच्या नियमांचें ग्रथन कोणा तरी तज्ज्ञ माणसाकडून करून घ्यावें.

(४) समाजघटनेच्या म्हणजे चातुर्वर्ण्यविषयक नियम, चातुर्वर्ण्यविषयक संस्कार, आणि समाजाकडून बहिष्कार व स्वीकार या संबंधाचे नियम, तत्संबंधी व्रात्यस्तोमादि विधी, आणि जातिविषयक गीर्वाणमध्यें सांपडणारा कायदा, हा सर्व कायदा मानववंशशास्त्रज्ञानें धर्मशास्त्राच्या साहाय्यानें शोधून काढला पाहिजे.

या पद्धतीनें जेव्हां समग्र पृथक्करण तयार होईल आणि निरनिराळ्या विषयांस लागू होणाऱ्या धर्मशास्त्राच्या आज्ञा व त्यांचें कायद्याशीं असणारें साम्य व भेद यांचा तपशील तयार होईल तेव्हां हिंदु कायद्याचा योग्य अभ्यास होईल.

आमची योजना आपणास पसंत पडेल अशी आशा आहे.

आपला,

भवानीशंकर नियोगी.

या संबंधानें आपणांस सांगितलें पाहिजे कीं रा० भवानीशंकर नियोगी यांच्या योजनेस आमची सहानुभूति आहे. एवढेंच नव्हे तर आपणांतील जबर पाखंडी व दुसऱ्याच्या कामाचें सूक्ष्मदर्शक यंत्रानें परीक्षण करणारे रा० भवाळकर यांनीं देखील रा० शंकरराव नियोगी यांच्या योजनेस अंतःकरण पूर्वक मान डोलावली आहे.

(२७.) प्रो. गर्दे (हिस्लाप) यांच्या साहाय्यानें ज्ञानकोश मंडळाच्या संपादन खात्यांतील मंडळींपैकीं एक रा. रा. यशवंतराव दाते बी. ए. एल्एल्. बी. यांनीं गणित विषयाची तात्पुरती योजना बनविली आहे ती येणेंप्रमाणें.

गणितशास्त्र

I PURE.	१ शुद्ध.
1 ARITHMETIC	१ अंकगणित.
(a) Numbers	(अ) संख्या मांडण्याची पद्धति.
(b) Rule of three, five &c.	(ब) त्रैराशिक, बहुराशिक वगैरे.

2 ALGEBRA	२ बीजगणित
[I] Algebraic notation & Rules	[१] बीजगणिताची लेखनपद्धति व सामान्य नियम.
[2] Equations	[२] समीकरणे.
[3] Progressions	[३] श्रेढी व्यवहार.
[4] Continued fractions & indeterminate equations	[४] सतत भिन्न व कुट्टक.
[5] Permutations & Combinations	[५] प्रस्तार व संघविचार.
[6] Involution & Evolution	[६] घात व मूळ.
[7] Binomial & multinomial Theoroms	[७] द्विपद व अनेकपद-घात
[8] Exponential theorom	[८] घातसिद्धांत
[9] Maxima & Minima	[९] गरिमा व लघिमा.
3 THEORY OF EQUATIONS	३ समीकरणमीमांसा.
[I] Ordinary Theory	[१] साधारण विचार.
[2] Approximations to roots	[२] मूल सान्निध्य.
[3] Numerial Equations (Horner's & Newton's method)	[३] गुण अंकावरून मूलशोधन. (हॉर्नर व न्यूटन यांची रीति)
[4] Special theory for the quadratic, cubic & the biquadratic & their algebraic solution.	[४] वर्ग, घन, आणि वर्ग वर्ग-समीकरणासंबंधी विचार व त्यांच्या मूलशोधनाची वैजिक पद्धति.
4 Imaginary & Complex numbers & their application to binomial equations.	४ कल्प [वैकल्प] व संमिश्र संख्या व त्यांचा द्विपदसमीकरणांत उपयोग.
5 Determinants.	५ निर्धारक.
[1] Properties.	[१] धर्म.

(2) Applicaton to eqations & ellimination.	[२] अनेक बीजसमीकरण सोडविण्यांत उपयोग. बीजनिर्मूलन पद्धति.
[3] Application to geometry.	[३] सशर भूमितींतिल कांहीं निर्धारक.
6 Logarithms.	६ लागरिथम.
[1] History	[१] इतिहास.
[2] Application.	[२] उपयुक्तता (उपयोग)
7 Geometry.	७ भूमिति.
(A) Plane.	(अ) एक समपृष्ठगत.
[1] Line.	[१] रेषा.
[2] Angle.	[२] कोन.
[3] Surface.	[३] पृष्ठ
[4] Triangle	[४] त्रिकोण.
[5] Quadrilateral	[५] चतुष्कोण.
[6] Polygon	[६] बहुकोण.
[7] Curve	[७] वक्र.
[8] Circle	[८] वर्तुळ.
[9] Locus	[९] बिंदुमार्ग.
[10] Projection &c.	[१०] छाया वगैरे.
(B) Solid.	(ब) अनेकपृष्ठांतर्गत व गोल पृष्ठगत.
[1] Plane	[१] एक पृष्ठ
[2] Tetrahedron	[२] चतुःपृष्ठ
[3] Polyhedron	[३] अनेक पृष्ठ
[4] Cone	[४] शंकु
] 5] Cube	[५] घनाकृति
[6] Cylinder	[६] वर्तुलस्तंभ, (वृत्तचिति)
[7] Sphere	[७] गोलक
[8] Prism &c.	[८] समपार्श्व वगैरे
(C) Analytical	(क) बीजभूमिति.
[1] Axis	[१] मूलशर.
[2] Co-ordinate	[२] कार्यशर.

[3] Straight lines (graph)	[३] समीकरण रेषालेखन.
[4] Conic Sections	[४] शंकुच्छेद.
[5] Circle	[५] वृत्त.
[6] Parabola	[६] शंकुसमच्छेद वक्र.
[7] Hyperbola	[७] अधिच्छेद वक्र.
[8] Ellipse	[८] उपवृत्त.
[9] Focus	[९] मध्यबिंदु केंद्र.
[10] Curves (other)	[१०] वक्रें (यांची थोडक्यांत माहिती व कांहीं प्रसिद्ध वक्रें).
8 Trigonometry	८ त्रिकोणमिति.
[1] Elementary plane	[१] समतल त्रिकोणमिति.
[2] Spherical	[२] गोलपृष्ठगत त्रिकोणमिति
9 Infinitesimal Calculus	९ सूक्ष्मांचें गणित.
[1] Differenciations & their uses	[१] सूक्ष्मावयवलांछ्य. (उपपत्ति व उपयोग)
[2] Integrations & their uses	[२] सूक्ष्मसंचयनें. (उपपत्ति वे उपयोग)
[3] Areas & lengths of curves	[३] वक्रांचें क्षेत्रफळ व दैर्घ्य. (या पद्धतीनें काढणें)
[4] Volume of Solids for-med by the revolution of curves	[४] वक्रपरिभ्रमणकृत घनफळ.
II APPLIED	शास्त्रांतर्गत व्यवहार
1 MECHANICS	१ यंत्रप्रेरणाशास्त्र.
[I] Kinematics	[१] गतिगणित.
[2] Kinetics	[२] जडगतिगणित.
2 HYDROMECHANICS	२ जलप्रेरणाशास्त्र.
3 DYNAMICS	३ गतिशास्त्र.
(A) Rigid Bodies	(अ) जडगतिशास्त्र
(I) Laws of motion	[१] गतिनियम.

(a) In a st. line	(अ) सरळगति.
(b) ,, circle	(ब) वृत्तकक्षागति.
(c) ,, Parabola	(क) शंकुसमच्छेदकक्षा.
(d) ,, Ellipse	(ड) उपवृत्तकक्षा.
(2) Gravity	[२] गुरुत्वाकर्षण
(3) Elasticity	[३] स्थितिस्थापकता.
[B] Dynamics of a particle	(ब) बिंदुगतिशास्त्र.
4 STATICS.	४ स्थैर्यशास्त्र.
(I) Force	[१] शक्ति.
(2) Equilibrium	[२] शक्तिसम ता.
(3) Centre of gravity	[३] गुरुत्वमध्य.
(4) Attraction	[४] आकर्षण.
(5) Friction	[५] घर्षण.
(6) Lever &c.	[६] तरफ, वगैरे.
5 HYDROSTATICS	५ जलस्थितिशास्त्र.
(I) Pressure	[१] दाब.
(2) Equilibrium	[२] समता (शक्ति).
III MISCELLANEOUS	३ विविध.
I ASTRONOMY	१ ज्योतिषशास्त्र.
(I) History	[१] इतिहास.
(2) Stellar system and terms	[२] तारागण व अनेकविध वेध.
(3) Planets	[३] ग्रह.
(4) Ecllipse	[४] ग्रहणविचार.
2 HISTORY OF MATHEMA-TICS	२ गणितशास्त्राचा इतिहास.
3 THEORY OF PROBABILITY	३ संभाव्यतामानविचार.
4 THEORY OF NUMBERS	४ संख्यामीमांसा.
5 PERSPECTIVE	५ यथादर्शनचित्रशास्त्र.
6 INTERPOLATION	६ मध्यपदनिश्चय.

7 TABLES	७ कोष्टकें व तक्ते.
8 MAJIC SQUARES	८ कूट कोष्टकें.
9 KNOTS	९ गमतीचीं वक्रें

(२८) डॉ. शंकर पांडुरंग गोगटे एल्. आर. सी. पी. ॲण्ड एस्. (एडिंबरी) यांजकडून आंग्लवैद्यकासंबंधानें सूचना आल्या आहेत त्या येणेंप्रमाणें:—

"वि० वि० माझी "वाह्यवैद्यका" च्या विवेचनासंबंधानें योजना सर्व पूर्णपणें झाली नाहीं. वाह्यवैद्यकांत यूरोपीअन वैद्यकाखेरीज युनानी, चिनी, वैद्यकाचा अंतर्भाव होईल यासाठीं मी बाह्यसंबंधानें योजना न बनवितां केवळ यूरोपीय आणि त्यांतल्या त्यांत देखील आंग्लवैद्यकापुरता विचार केला आहे. आतांपर्यंतचा जो विचार झाला त्यापासून जें काय निष्पन्न झालें तें येणेंप्रमाणें.-

एनसायक्लोपिडिआ ब्रिटानिका व आपण हातीं घेतलेला ग्रंथ यांत बरीच तफावत रहाणार आहे. आपण आर्यवैद्यकास बरेंच महत्त्व देणार आहांत, यासाठीं आंग्लवैद्यकावर ब्रिटानिकामध्यें जो भाग आहे त्यांत गाळावा कोणता याचा मी विचार करतां मला असें वाटलें कीं, ब्रिटानिकांत वैद्यांचीं व वैद्यक संशोधकांचीं दोनशें चरित्रें आहेत त्यांपैकीं बहुतेकांची आपणांस आवश्यकता नाहीं. शास्त्राच्या इतिहासांत महत्त्वाचीं कार्यकर्त्या पुरुषांचीं नांवें व चरित्रें येतीलच.

पाश्चात्त्य व देशी वैद्यकास,सामान्य असें वैद्यशास्त्राचें निदान,व चिकित्सा [औषधियोजना] असे दोन भाग होत. शारीरशास्त्र [Anatomy] व इंद्रियविज्ञान [Physiology] हीं वैद्यशास्त्राशीं संबद्ध अशीं दोन शास्त्रें पाश्चात्त्य आयुर्वेदांत प्रमुख होत. या दोन शास्त्रांसाठीं आपण निराळी जागा राखून ठेवलीच आहे, आणि सूक्ष्मजीवशास्त्रासाठीं देखील पानें राखून ठेवलींच आहेत. सार्वजनिक आरोग्य व पशुवैद्यक वगळतां निदान व चिकित्सा म्हणजे औषधियोजना हेच दोन भाग मुख्य रहातात. सामान्य वाचकांच्या दृष्टीनें आपल्या अगर पाश्चात्त्यांच्या आयुर्वेदाचा मुख्य उपयुक्त भाग म्हटला म्हणजे अनेक महत्त्वाच्या रोगांचें निदान व औषधियोजना हीं मुख्य होत. अनंत रोगांपैकीं किती रोगांचीं निदानें व चिकित्सा द्याव्यात हें अजून मी ठरविलें नाहीं.कारण ही गोष्ट आपल्या देशांत कोणते रोग आहेत एवढ्यावरच ठरवावयाची नाहीं. "यलो फीव्हर" संबंधानें कांहीं तरी माहिती दिलीच पाहिजे असें वाटतें. आंकडेशास्त्र काढून कोणता रोग दरहजारीं किती लोकांत होतो हें पाहून देखील ठरविणें योग्य होणार नाहीं. उदा. घटसर्प फार थोडयांस होतो म्हणून तो वगळावा असेंहि मला वाटत नाहीं. कोणता रोग लेखनार्ह आहे आणि कोणता नाहीं हें अजून ठरलें नाहीं. प्रत्येक अवयवाचें

शारीरशास्त्र व अवयवांशीं संबद्ध असलेल्या रोगाखालीं द्यावें आणि शारीरशास्त्रलेखक आणि रोगावर लिहिणारा शस्त्रवैद्य हे भिन्न असण्याचा जरूर नाहीं रोगवर्णनानुसंधानानें तत्संबंधींचें शारीरशास्त्र लिहावें. दुसऱ्या ठिकाणीं शारीरशास्त्र देऊं नये. प्रत्येक रोगाचें विवेचन कसें करावें यासंबंधा मला जें काय वाटतें तें येथें देतों.—

प्रत्येक रोगावरील लेखाचे भाग येणेंप्रमाणें असावेत.

१ **प्रत्येक रोगाचीं व्याख्या.**

२. **त्या रोगासंबधाचें** शारीरशास्त्र (Anatomy),व त्यानंतर त्या शरीरभागाचं इंद्रियविज्ञान (Physiology) शारीरशास्त्र वर्णन करतांना चित्रेंहि द्यावींत.

३. **रोगवर्णन**

[अ] **व्यथावर्णन**, अवयवाच्या रोगाची रोग्याच्या दृष्टीनें मांडणी. त्यांत होत असलेल्या व्यथेचें वर्णन करणें [उदा. शूळ, खोकला, छातींत दुखणें, जळजळणें इ]

[आ] **लक्षणविज्ञान**, उर्फ वैद्याच्या दृष्टीनें त्याच रोगाची मांडणी— बाह्यदृष्टीनें अगर यंत्राच्या साहाय्यानें त्या रोगाचें वर्णन करणे व दोन्हींचा विचार करून सर्व चिन्हांचें वर्णन करणें.

४ **रोगनिदान**, शरीरांतील एकंदर अनिष्ट परिणामांचें वर्णन केवळ डोळ्यांनीं पाहून अगर सूक्ष्मदर्शक यंत्राच्या साहाय्यानें ठरविणें.[Pathology]

५ **सदृशभेददर्शन**, सर्व चिन्हांवरून रोग कोणता हें ओळखणें, आणि इतर रोगाशीं साम्यता व भिन्नत्व यांचें वर्णन [Differential]. Diagnosis]

६. **रोगगतिपूर्वावलोक** (Prognosis) रोग पुढें वाढेल कितपत, कमी केव्हां होईल, कसा होईल याविषयीं भविष्य वर्तविणें.

७. **चिकित्सा** औषधोपचार व शस्त्रक्रिया [त्या रोगासंबधाची].

८. **रुग्णशुश्रूषा**, अथवा रोगगतिनिरोधक शास्त्र. (Prophylaxis)

एतद्देशीय आयुर्वेदाच्या दृष्टीनें जरी रोगाचें विवेचन करावयाचें झालें, तरी लेखरचनाक्रम होईल तितका या क्रमानेंच ठेवण्याविषयीं वैद्यास सूचना करावी. वैद्यांनां प्रथमतः तो रोग जुन्या वैद्यकास मान्य आहे किंवा नाहीं येथून विचार करावा लागेल.

देशी वैद्यकांच्या साहाय्यानें जमविलेली माहिती अगोदर घालावी अगर पाश्चात्त्य माहिती अगोदर घालावी हा विचार आपला आहे.

स्त्रियांचे रोग, लहानमुलांचे रोग, सूतिकाशास्त्र तसेंच कानाचे, नाकाचे घशाचे व डोळ्यांचे रोग या सर्वांसंबंधानें माहिती वर सुचविलेल्या अनुक्रमानें होईल तितकी घालावी.

९. थोडीबहुत माहिती सूक्ष्मजीवशास्त्राबद्दलहि घालावी, आणि शक्य असल्यास त्यांचीं रंगीत चित्रेंहि घालावींत. तीं ब्रिटानिकांत नाहींत, तरी आपणांस घालणें अवश्य आहे.

सिताबर्डी,
२८। ३।१९१७

आपलें.
शं. पां. भागेट.

(२९) रा० रा० शंकरराव नियोगी यांच्या मराठी पत्राचें इंग्रजी रूपांतर (हें येथें देत नाहीं.)

(३०) याप्रमाणें ग्रंथरचनेची आमची ठरलेली योजना व त्यासंबंधानें मिळविलेल्या सूचना आपणांपुढें ठेवीत आहें. सूचनांची जीं पत्रें आहेत तीं प्रथम पत्र पाठविणाराशीं अनेकदां बोलणीं व वादविवाद झाल्यानंतर त्याजकडून मुद्दाम लिहविलीं आहेत. प्रस्तुत ग्रंथयोजनेची दिशा आपणांस पसंत पडेल अशी आशा आहे. या योजनेंत अनुभवानें पुढें फरक पडणार आहे.

आपला
श्रीधर व्यंकटेश केतकर.

[३१।३।१९१७.]

(परिशिष्ट, नं. २)

संपादनखात्याचे नियम.

मंत्रिमंडळ.

(१) संपादकांस कामांत सल्ला देण्यासाठीं एका मंत्रिमंडळाची नेमणूक संपादकाच्या सल्ल्यानें डायरेक्टरांकडून होईल, आणि त्यापैकीं प्रत्येकाच्या परिश्रमाबद्दल मोबदला काय द्यावा हें चालक मंडळी ठरवितील.

(२) मंत्रिमंडळांतील सर्व सभासद नागपूरचेच राहतील. सल्लागारांची नेमणूक (होतांहोईतों) आगष्ट (१९१७) नंतरच्या बैठकींत मंजुरीसाठीं डायरेक्टरांकडे पाठविली पाहिजे.

(३) मंत्रिमंडळाच्या सल्ल्याप्रमाणें मुख्य संपादकानें वागलेंच पाहिजे असें नाहीं.

(४) मंत्रिमंडळांतील सल्लागारांस जो मोबदला द्यावयाचा तो ज्ञानकोश बाहेर पडेपर्यंत एकंदर कामासाठीं ठरविला जाईल.

(५) मंत्रिमंडळाच्या कामामध्यें ज्ञानकोशाच्या मजकुरांतील (अ) आपापल्या विषयासंबंधानें उणीव शोधणें, (आ) पुनरुक्ती दाखवून देणें, (इ) विभागसंपादकांकडून आलेल्या मजकुरास संक्षेप द्यावयाचा असला तर त्यासंबंधानें सल्ला देणें, (ई) ज्ञानकोशांतील संज्ञांसंबंधानें एकीकरण करावयाचें असल्यास मंत्रिमंडळाच्या सभेंत सूचना करणें, (उ) आपापल्या विषयांसंबंधाचीं शेवटचीं मुद्रितें (फायनल प्रुफें) तपासणें, व (ऊ) छापण्यास शिफारस करणें, इत्यादि, यांचा समावेश होतो.

(६) मंत्रिमंडळांतील समासदानें महिन्यांतून निदान एकवेळ संपादकांस भेटण्यास आलेंच पाहिजे, व मंत्रिमंडळाच्या सर्व बैठकींस हजर राहणें हेंहि त्याचें कर्तव्य आहे.

(७) लिहून आलेल्या मजकुराच्या पानांची सूची कशी करावी या संबंधानें ज्ञानकोशांतील सूचीकारास नियम करून देणें हेंहि त्याचें काम आहेच.

(८) मंत्रिमंडळानें विभागसंपादकानें लिहिलेल्या मजकुराच्या खरेपणाबद्दल ढवळाढवळ करूं नये. जर तपासतांना चुका आढळल्या, तर त्या दाखवून द्याव्यात, व संपादकाच्या मार्फत विभागसंपादकाच्याकडे पाठवाव्यात. कारण मजकुराच्या सत्यतेविषयीं जबाबदार विभागसंपादकच राहतील, आणि आलेला मजकूर ठरींव जागेंत बसविण्यासाठीं काय करावें हें ठरविणें मंत्रिमंडळाचें मुख्य कर्तव्य राहील.

विभागसंपादक व लेखक.

(९) प्रत्येक शास्त्रीय विषयासंबंधानें अगर ज्ञानकोशाच्या मोठ्या विभागासंबंधानें जे विभागसंपादक नेमावयाचे त्यांची नेमणूक (होतांहोईतों) ता.१ आगष्ट (१९१७)च्या आंत व्हावी, व ता.१ आगष्टनंतर होणाऱ्या पहिल्या चालक मंडळाच्या सभेंत तिजबद्दल मंजुरी घेतली जा ं.

(१०) विभागसंपादकांकडून आपापल्या विषयांसंबंधानें लेखकांची नेमणुकीसाठीं शिफारस ता. १ सप्टेंबरच्या आंत करण्यांत यावी आणि सप्टेंबर नंतर जी पहिली चालक मंडळीची बैठक होईल, त्यांत त्यांची मंजुरी व्हावी.

(११) लेखकांस मिळावयाच्या मोबदल्यासंबंधानें प्रथम सूचना विषयविभागसंपादकांडून यावी आणि ती आल्यानंतर त्यावर आपला शेरा लिहून संपादकानें चालक मंडळीस सादर करावी.

(१२) विभागसंपादकांस इसार म्हणून ठरलेल्यां रकमेच्या एकदशांश रक्कम त्यांच्या नेमणुकींची मंजुरी झाल्यानंतर १५ दिवसांच्यां आंत पाठवावी. लेखकांकडून लेख लिहिण्यासंबंधानें कबुलायत लिहून घ्यावी व लेखकांची नेमणूक विषयसंपादकाच्या शिफारसीनें आणि मुख्य संपादकाच्या सल्लयानें

चालकमंडळानें केल्यानंतर ठरलेल्या रकमेचा दशांश लेखकांकडे पाठवावा.

(१३) प्रत्येक लेखाचा मोबदला तो लेख चालकमंडळीकडून पास झाल्यानंतर देण्यांत येईल.

(परिशिष्ट नं. ३)

कायक्रमाबद्दल संपादकीय योजना.

(फक्त लेखक, विभागसंपादक व उपसंपादक यांच्या अवलोकनासाठीं)

[ता. २०।७।१८]

(१) तारीख १ डिसेंबर १९१९ पर्यंत कच्चा ज्ञानकोश संपूर्ण तयार झालाच पाहिजे असा ठराव (योजना २१ परिच्छेद पहा) व्यक्त झाला असल्यामुळें त्या तारखेपर्यंत करावयाचीं कामें पुढें दिल्याप्रमाणें आंखलीं गेलीं आहेत.

(२) ज्ञानकोशाचा सांस्कृतिक विषय बहुतांशीं ज्ञानकोशाच्या कार्यालयांत होणार असून तो करण्याच्या पायऱ्या येणेप्रमाणें आहेत. (अ) ग्राह्यविषयार्थ ग्रंथशोधन, (आ) ग्राह्यांशशोधन, (इ) ग्राह्यांशनिष्कर्षण, (ई) ग्राह्यांशांचें सूचीकरण, (उ) विषयवार वर्गीकरण.

(३) वरील पांच कार्यांपैकीं पहिलीं दोन कार्यें मुख्य संपादकांकडून होतील. कोणकोणत्या ग्रंथांतून कायकाय मजकूर घ्यावयाचा,याची नोंद १ ता. जान्युआरी १९१९ पर्यंत तयार व्हावयाची आहे.

(४) या नोंदींत खालील स्थळीं उपलब्ध असणाऱ्या ग्रंथांचा समावेश करण्यांत येईल.

१ सेकंडक्लास सायंटिफिक लायब्ररी—नागपूर.

२ सेक्रेटरीएट लायब्ररी—नागपूर.

३ रॉयल एशिआटिक सोसायटीची लायब्ररी—मुंबई.

४ मराठी ग्रंथसंग्रहालय—मुंबई.

५ इंपीरिअल लायब्ररी—कलकत्ता.

६ रॉयल एशिआटिक सोसायटीची लायब्ररी—कलकत्ता.

वरील ठिकाणीं जे ग्रंथ अनुपलब्ध परंतु महत्त्वाचे असतील ते विकत घ्यावयाचे व त्यांवरून कार्य करून घ्यावयाचें.

(५) **ग्राह्यांश निष्कर्षण**—वरील ग्रंथांतील ग्राह्यांश सूचनापत्रांबरहुकूम काढावयावा आहे. हें कार्य व तसेंच काढलेला ग्राह्यांश मूळग्रंथाप्रमाणेंच आहे किंवा नाहीं हें तपासून पहावयाचें काम, हीं दोनहि कामें

नागपुर व पुणें येथील कार्यालयांतील संपादकीय कामाच्या व्यवस्थापकांकडे राहतील हीं कामें ता. १ डिसेंबर १९१९ पर्यंत पूर्ण झालीं पाहिजेत.

(६) **ग्राह्यांशाचें सूचीकरण**—लिहिलेल्या मजकुराचीं सूचीपत्रें तयार करणें व तीं तपासणें यासाठीं नागपूर कार्यालयामध्ें एक स्वतंत्र अधिकारी नेमला जाऊन त्याच्या देखरेखीखालीं हें काम ता. १ जानेवारी १९२० पर्यंत पूर्ण व्हावें.

(७) **विषयवार वर्गीकरण**—सूचीपत्रें तयार करून तपासून झाल्यानंतर ग्रंथानुरोधनानें तयार केलेला सर्व मजकूर विषयवार लावावयाचा हें कार्य ता. १ फेब्रुवारी १९२० च्या सुमारास संपावें.

(८) **परायत्त म्हणजे कार्यालयाच्या बाहेर होणाऱ्या कामाविषयीं विचार**—ता. १ जानेवारी १९१९ च्या सुमारास सर्व विभागसंपादकाकडून त्या तारखेपर्यंत किती काम झालें याबद्दल विचारणा होईल. ज्यांचें काम मुळींच झालें नसेल अगर अतिशय थोडें झालें असून मुदतींत संपण्याचा रंग दिसत नसेल त्यांजकडून तें काम काढून घेऊन दुसऱ्याकडे द्यावयाचें अगर येथेंच कार्यालयांत तयार करावयाचें याविषयीं विचार होईल.

(९) **ग्रंथांतरी अनुपलब्ध माहिती**—वर दर्शविल्याखेरीज पुढें दिलेल्या प्रकारची व इतर माहिती पत्रव्यवहारानें मिळवावी लागेल; उदाहरणार्थः—आशिया, आफ्रिका, यूरोप, अमेरिका वगैरे हिंदुस्थानच्या बाहेरच्या प्रदेशांत राहणाऱ्या हिंदी लोकांबद्दल व हिंदुसंस्कृतीच्या अवशेषांबद्दल व अभ्यासाबद्दल माहिती मिळवावी लागेल. या कामाची जबाबदारी नागपूर येथील संपादकीय कार्याच्या व्यवस्थापकांकडे राहील.

(१०) **स्थानिक माहिती**—उदाहरणार्थ, मुंबईची निरनिराळ्या जिन्नसांच्या व्यापारासंबंधानें, व जाती वगैरे कांहीं समाजघटकांचा सद्यः स्थितीसंबंधानें माहिती पत्रव्यवहार करून अगर तेथील प्रत्यक्ष अवलोकनानें मिळवावी लागेल. या कार्याची जबाबदारी योग्य कार्यकर्ता मिळाल्यानंतर त्याच्यावर सोंपविण्यांत येईल. ही माहिती ता. १ डिसेंबर १९१९ ला तयारपाहिजे.

(११) **संज्ञाकोश**—शास्त्रीय संज्ञांचें एकीकरण करण्याकरितां एक संज्ञाकोश तयार करावा लागेल त्याची सामुग्री अगोदर जमवून ठेवावयाची आहे व त्याकरितां एका अधिकाऱ्याची योजना या कामाकडे केली आहे. त्यानें संज्ञाकोशास उपयोगी पडतील अशीं सर्व पुस्तकें शोधून काढून त्यांची किंमतीसह यादी तयार करून मुख्य संपादकाकडे ता. १ जानेवारी १९१९ च्या आंत पसंतीकरितां पाठवावी. सर्व पुस्तकें ता. १ जून १९१९ पर्यंत कार्यालयांत

चालकमंडळानें केल्यानंतर ठरलेल्या रकमेचा दशांश लेखकांकडे पाठवावा.

(१३) प्रत्येक लेखाचा मोबदला तो लेख चालकमंडळीकडून पास झाल्यानंतर देण्यांत येईल.

(परिशिष्ट नं. ३)

कायक्रमावदल संपादकीय योजना.

(फक्त लेखक, विभागसंपादक व उपसंपादक यांच्या अवलोकनासाठीं)

[ता. २०।७।१८]

(१) तारीख १ डिसेंबर १९१९ पर्यंत कच्चा ज्ञानकोश संपूर्ण तयार झालाच पाहिजे असा ठराव (योजना २१ परिच्छेद पहा) व्यक्त झाला असल्यामुळें त्या तारखेपर्यंत करावयाचीं कामें पुढें दिल्याप्रमाणें आंखलीं गेलीं आहेत.

(२) ज्ञानकोशाचा सांस्कृतिक विषय बहुतांशीं ज्ञानकोशाच्या कार्यालयांत होणार असून तो करण्याच्या पायऱ्या येणेप्रमाणें आहेत. (अ) ग्राह्यविषयार्थ ग्रंथशोधन, (आ) ग्राह्यांशशोधन, (इ) ग्राह्यांशनिष्कर्षण, (ई) ग्राह्यांशांचें सूचीकरण, (उ) विषयवार वर्गीकरण.

(३) वरील पांच कार्यापैकीं पहिलीं दोन कार्यें मुख्य संपादकांकडून होतील. कोणकोणत्या ग्रंथांतून कायकाय मजकूर घ्यावयाचा,याची नोंद १ ला. जान्युआरी १९१९ पर्यंत तयार व्हावयाची आहे.

(४) या नोंदींत खालील स्थळीं उपलब्ध असणाऱ्या ग्रंथांचा समावेश करण्यांत येईल.

१ सेकंडक्लास सायंटिफिक लायब्ररी—नागपूर.

२ सेक्रेटरीएट लायब्ररी—नागपूर.

३ रॉयल एशिआटिक सोसायटीची लायब्ररी—मुंबई.

४ मराठी ग्रंथसंग्रहालय—मुंबई.

५ इंपीरियल लायब्ररी—कलकत्ता.

६ रॉयल एशिआटिक सोसायटीची लायब्ररी—कलकत्ता.

वरील ठिकाणीं जे ग्रंथ अनुपलब्ध परंतु महत्त्वाचे असतील ते विकत घ्यावयाचे व त्यांवरून कार्य करून घ्यावयाचें.

(५) **ग्राह्यांश निष्कर्षण**—वरील ग्रंथांतील ग्राह्यांश सूचनापत्रांबरहुकूम काढावयाचा आहे. हें कार्य व तसेंच काढलेला ग्राह्यांश मूळग्रंथाप्रमाणेंच आहे किंवा नाहीं हें तपासून पहावयाचे काम, हीं दोनहि कामें

नागपुर व पुणें येथील कार्यालयांतील संपादकीय कामाच्या व्यवस्थापकांकडे राहतील. हीं कामें ता. १ डिसेंबर १९१९ पर्यंत पूर्ण झालीं पाहिजेत.

(६) **ग्राह्यांशाचें सूचीकरण**—लिहिलेल्या मजकुराचीं सूचीपत्रें तयार करणें व तीं तपासणें यासाठीं नागपूर कार्यालयामध्यें एक स्वतंत्र अधिकारी नेमला जाऊन त्याच्या देखरेखीखालीं हें काम ता. १ जान्युआरी १९२० पर्यंत पूर्ण व्हावें.

(७) **विषयवार वर्गीकरण**—सूचीपत्रें तयार करून तपासून झाल्यानंतर ग्रंथानुरोधनानें तयार केलेला सर्व मजकूर विषयवार लावावयाचा हें कार्य ता. १ फेब्रुवारी १९२० च्या सुमारास संपावें.

(८) **परायत्त म्हणजे कार्यालयाच्या बाहेर होणाऱ्या कामाविषयीं विचार**—ता. १ जानेवारी १९१९ च्या सुमारास सर्व विभागसंपादकाकडून त्या तारखेपर्यंत किती काम झालें याबद्दल विचारणा होईल. ज्यांचें काम मुळींच झालें नसेल अगर अतिशय थोडें झालें असून मुदतींत संपण्याचा रंग दिसत नसेल त्यांजकडून तें काम काढून घेऊन दुसऱ्याकडे द्यावयाचें अगर येथेंच कार्यालयांत तयार करावयाचें याविषयीं विचार होईल.

(९) **ग्रंथांतरी अनुपलब्ध माहिती**—वर दर्शविल्याखेरीज पुढें दिलेल्या प्रकारची व इतर माहिती पत्रव्यवहारानें मिळवावी लागेल; उदाहरणार्थः—आशिया, आफ्रिका, यूरोप, अमेरिका वगैरे हिंदुस्थानच्या बाहेरच्या प्रदेशांत राहणाऱ्या हिंदी लोकांबद्दल व हिंदुसंस्कृतीच्या अवशेषांबद्दल व अभ्यासाबद्दल माहिती मिळवावी लागेल. या कामाची जबाबदारी नागपूर येथील संपादकीय कार्याच्या व्यवस्थापकांकडे राहील.

(१०) **स्थानिक माहिती**—उदाहरणार्थ, मुंबईची निरनिराळ्या जिन्नसांच्या व्यापारासंबंधानें, व जाती वगैरे कांहीं समाजघटकांचा सद्यःस्थितीसंबंधानें माहिती पत्रव्यवहार करून अगर तेथील प्रत्यक्ष अवलोकनानें मिळवावी लागेल. या कार्याची जबाबदारी योग्य कार्यकर्ता मिळाल्यानंतर त्याच्यावर सोंपविण्यांत येईल. ही माहिती ता. १ डिसेंबर १९१९ ला तयार पाहिजे.

(११) **संज्ञाकोश**—शास्त्रीय संज्ञांचें एकीकरण करण्याकरितां एक संज्ञाकोश तयार करावा लागेल त्याची सामुग्री अगोदर जमवून ठेवावयाची आहे व त्याकरितां एका अधिकाऱ्याची योजना या कामाकडे केली आहे. त्यानें संज्ञाकोशास उपयोगी पडतील अशीं सर्व पुस्तकें शोधून काढून त्यांची किंमतीसह यादी तयार करून मुख्य संपादकाकडे ता. १ जानेवारी १९१९ च्या आंत पसंतीकरितां पाठवावी सर्व पुस्तकें ता. १ जून १९१९ पर्यंत कार्यालयांत

यावींत. संज्ञाकोशाच्या कामास ता. १ जून १९१९ रोजीं सुरवात होऊन तो ४ महिन्यांत पूर्ण व्हावा.

(१२) **संदर्भपरीक्षण**—अवतरणें मूळ ग्रंथांशीं ताडून पाहण्याची पर्वतयारी करण्यासाठीं एका अधिकाऱ्याची योजना झाली आहे. या कामास उपयुक्त मूळग्रंथांची यादी त्यानें लिहिलेला मजकूर पाहून करावी. ही यादी १ जानेवारी १९१९ पर्यंत त्याजकडून तयार झाली पाहिजे. सर्व ग्रंथ ता. १ सप्टेंबर १९१९ पर्यंत कार्यालयांत येतील. संदर्भपरीक्षणास सुरवात ता. १ फेब्रुवारी १९१९ नंतर होईल. आणि ता. १ जुलै १९२० च्या सुमारास हें कार्य पुरें व्हावें.

(१३) ठरलेल्या कामाची जबाबदारी विभागसंपादकांखेरीज ज्या अधिकाऱ्याकडे असेल त्यानें आपलें कार्य करण्यासाठीं खर्चाचें अंदाजपत्रक लवकर मुख्य संपादकाकडे पाठवावें आणि कार्य मुदतींत संपण्यास अडचण असल्यास ती मुख्य संपादकास तावडतोब कळवावी.

(१४) लक्षांत ठेवावयाच्या तारखा:—

ता १ जानेवारी १९१९—प्राह्यांशसंशोधनास उपयुक्त ग्रंथांची यादी तयार करणें.

ता. १ जानेवारी १९१९—विभागसंपादकांशीं पत्रव्यवहार व त्यांच्या कामाचें पर्यालोचन व विभाग संपादक कायम करणें अगर त्यांजकडून काम काढून घेणें.

ता. १ जानेवारी १९१९—संज्ञाकोशास उपयुक्त ग्रंथांची यादी तयार करणें.

ता. १ जानेवारी १९१९—संदर्भपरीक्षणास उपयुक्त ग्रंथांची यादी तयार करणें:

ता. १ जून १९१९—संज्ञाकोशास उपयुक्त ग्रंथ जमविण्याचें कार्य पूर्ण.

ता. १ जून १९१९—संज्ञाकोशास प्रारंभ.

ता. १ सप्टेंबर १९१९—संदर्भपरीक्षणग्रंथ जमविण्याचें कार्य पूर्ण.

ता. १ आक्टोबर १९१९—संज्ञाकोश हस्तलिखित पूर्ण.

ता. १ डिसेंबर १९१९—प्राह्यांशशोधन पूर्ण.

ता. १ जानेवारी १९२०—सूचीकरण व सूचीपरीक्षण पूर्ण व्हावयाचें.

ता. १ फेब्रुवारी १९२०—प्राह्यांशाचें विषयवार वर्गीकरण पूर्ण.

ता. १ फेब्रुवारी १९२०—सूचीपत्रांची वर्णानुक्रमरचना.

(१५) ता. १ **डिसेंबर १९१९—नंतर करावयाचीं कामें पुढील प्रमाणें आंखण्यांत येतील.**

(१) संदर्भपरीक्षणः—हें कार्य, ता.१ फेब्रुवारी १९२० पासून ता.१जुलै १९२० पर्यंत संपूर्ण होईल असें वाटतें.

(२) प्राह्यांशांचें एकीकरण व लेखांत रूपांतरः—हें कार्य, ता.१ डिसेंबर १९२० पर्यंत आटोपेल.

(३) बाहेरून आलेल्या कामाची छाननी व संज्ञांचें एकीकरणः—हीं कामें ता. १ जुलै १९२० पर्यंत पुरीं होतील.

(४) ग्रंथ छापण्यासंबंधीचा पत्रव्यवहार व करारः—१ डिसेंबर १९२० पर्यंत नक्की करावा.

(५) चित्रें व नकाशे यांचें कामः—संपादनखात्याबरोबर एका स्वतंत्र तज्ज्ञ मनुष्याची ता.१ डिसेंबर १९१९ च्या सुमारास नेमणूक करून त्याजकडे या कार्याचीं जबाबदारी देण्यांत येईल. त्यानें हें काम ता. १ डिसेंबर १९२० पर्यंत तयार करविलें पाहिजे.

(६) हस्तलिखित प्रत तयार करणेः—हें काम ता. १ फेब्रुवारी १९२१ पर्यंत पूर्ण होईल असा अजमास आहे.

श्रीधर व्यंकटेश केतकर.

(परिशिष्ट नं. ४)

द्रव्याभावामुळें दप्तरांतच राहिलेली योजना.

प्रस्तुत २७।७।१८ रोजींच्या अहवालांतून प्रसिद्ध केलेली योजना अमलांत आणण्यासाठीं भांडारकर इन्स्टिटयूट, व भारतेतिहास संशोधकमंडळ व इतर चारपांच संस्था यांचीं अनेक नकला करून सर्वत्र वाटून घेऊं या धोरणावर सहकारिता मागितली होती पण कोणीकडूनच मदत न आल्यामुळें योजना दप्तरींच पडून राहिली.

शिलालेख ताम्रपटादि चिरजिवीलेखसूची—येथें हीं एक सूचना केली पाहिजे कीं प्राचीन इतिहासाच्या लेखांचें काम उत्तम प्रकारचें व्हावयास पुढील गोष्टींची आवश्यकता आहे.—

आपल्याकडे भारतीय संस्कृतीच्या प्रत्येक अंगांवर पंडित नाहींत. खुद्द इंग्लंडमध्यें संस्कृत ग्रंथांचा ऐतिहासिक रीत्या अभ्यास करणारे चारपांच संस्कृत विद्याविशारद लोक आहेत व दोनचार नाणकपंडित आहेत. शिवाय पुराणवस्तुसंशोधनखात्यांत काम केलेलीं माणसें आहेत व सांपडलेलें ज्ञान एकत्र करण्याच्या कामांत अनेक लोकांचें साहाय्य आहे. अशी


परिस्थिति असल्यामुळें इंग्लंडमध्यें. या विषयांवर तज्ज्ञ सांपडूं शकतात. यापेक्षां जास्त चांगली व्यवस्था फ्रान्स व जर्मनी या देशांत आहे त्यांचाहि ह्यांस उपयोग होतो. ती सर्व मंडळी मिळून विषय वांटून घेऊन काम करूं शकतात. आपल्याकडे विषय वांटले असतां ज्याच्यावर सोंपवितां येतील अशीं मोजकीं फारच थोडीं असतात आणि यासाठीं हें काम आपणास करावयाचें झाल्यास पुढील पद्धतीचा स्वीकार करावा लागेल. या पद्धतीनें झालेलें काम अर्वाचीन पाश्चात्य पंडितांनीं केलेल्या कामापेक्षाहि उत्तम होईल असा अनुभव आहे.

प्राचीन इतिहासावरील लेख निर्दोष होण्याकरितां ज्या साधनांची आवश्यकता आहे तीं येणेप्रमाणें:—(१) सर्व उपलब्ध शिलालेख भाटादि विविधजाति लिखाणांचीं यादी व सूची. या यादीमध्यें प्रत्येक लिखाणाचा काल, स्थल, गोषवारा व आंत असलेलीं विशेषनामें व त्यांत दिसून येणारीं सामाजिक, आर्थिक, राजकीय व कायदासंबंधांचीं विधानें नमूद केलेलीं असावींत. अशीं सर्व लिखाणें निरनिराळ्या कार्डांवर उध्दृत करून त्यांचा उपयोग करून त्यावयास पुढें दिल्याप्रमाणें निरनिराळ्या सूच्या तयार पाहिजेत: (अ) व्यक्तिवर्णनात्मक सूची, (आ) स्थलनामसूची, (इ) कालसूची, (ई) व ऐतिहासिक व अर्थशास्त्रीय गोष्टीविषयींचीं सूचीं. (२) नाण्यांवरील बहुतेक या विद्या उपलब्ध असल्यामुळें त्यांचीं सूचीं तयार करण्याचें कारण पडणार नाहीं. परंतु या सर्व यादी आपल्या कार्यालयांत आपल्या मालकीच्या असणें अवश्य आहे. (३) ग्रंथांतर्गत ऐतिहासिक महत्त्वाचे उल्लेख वगैरे इंडियन अँटिक्वरि व इतर पंडितग्रंथांत येऊन गेले आहेत व त्यांचे गोषवारे व सूचीकार्यालयांत तयार होत आहेत. तेव्हां त्यासंबंधानें विशेष सूचना करावयाची नाहीं.

या सर्व गोष्टी ता. १ डिसेंबर १९१९ च्या आंत व्हावयात; कां कीं १९२० सालीं जर ग्रंथांतर्गत मजकुराचें एकीकरण व्हावयाचें आहे तर त्यावरूनच हा पुरावा उपयोगीं पडेल अशा रीतीनें तयार पाहिजे. यास खर्च सुमारें पुढें दिल्याप्रमाणें येईल:—

(१) पुस्तकें (सिलोन, ब्रह्मदेश वगैरे देशांवरील पुस्तकांसह)	१५०० रु.
(२) कार्डां	१५०० रु.
(३) कार्डांकरितां कपाटें	२०० रु.
(४) लेखक (४ पदवीधर १ वर्षभर दरमहा ५० रु प्रमाणें।	२४०० रु
(५) सूचीपत्रलेखक (५ पदवीधर व एक साहाय्यक ७५ रु. प्रमाणें)	९०० रु
(६) परीक्षक व दिग्दर्शक (अर्धा वेळ)	६०० रु
एकूण	७१०० रु.

एवढी मोठी रक्कम खर्च होईल खरी, तथापि हा खर्च केल्याने कांग. स्याहि ऐतिहासिक प्रश्नावर आमच्या लेखकवर्गास अधिक निर्भयपणे लिहितां येईल व पाश्चात्त्य ग्रंथकारांस देखील आमचा ग्रंथ आदरपूर्वक उपयोगावा लागेल



(परिशिष्ट नं. ५)

महाराष्ट्रापुढील धर्मशास्त्रीय प्रश्न

आणि

ज्ञानकोशकारांची अडचण.

[१७ डिसेंबर १९१८ च्या केसरीतील पत्र]

महाराष्ट्रीय ज्ञानकोशामध्ये धर्मशास्त्राचे अनेक प्रश्न येणार आहेत व त्यांवर लिहिताना ज्या अडचणी उपस्थित होतात त्या वाचकवर्गापुढे मांडल्या पाहिजेत, आणि त्यासंबंधाने प्रत्येक सुशिक्षिताने विचारहि केला पाहिजे.

धर्मशास्त्रासंबंधाने सामान्य जनांची अपेक्षा अशी असणार की, त्यांस विधिपर अगर निषेधपर स्पष्ट वाक्ये पाहिजेत. धर्मशास्त्राच्या ग्रंथांतील वचनांचे पृथक्करण करून, अनेक परस्परविरोधी वचने वाचकांसमोर मांडली असता त्यास कौतुक किंवा मौज वाटेल. परंतु कार्याकार्यज्ञान होणार नाही. परस्परविरुद्ध वचनापैकी ग्राह्य व अग्राह्य कोणते याविषयी ज्ञानकोशकारांनी म्हणजे ज्ञानकोशमंडळ ज्या धर्मशास्त्रज्ञ मंडळाकडे हे काम सोपवील त्यांनी कार्याकार्यविषयक निर्णय दिला तर त्याची किंमत काय? आणि त्यांस लोकमान्यता कशी प्राप्त होणार? परस्परविरुद्ध विधाने असली तर त्यांची संगति कशी लावावी, त्यांतील योग्य नियम कसा ठरवावा, इत्यादि गोष्टीविषयी धर्मशास्त्रांतच नियम आहेत. पण ते नियम पूर्णपणे पाळले आहेत की नाहीं हे कसे ठरणार? व जरा ते पूर्णपणे पाळले तरी विकल्पास म्हणजे स्वेच्छानिर्णयास क्षेत्र राहतेच: आणि त्यामुळे परस्परविरुद्ध विधानांतील ग्राह्य नियम काढण्याच्या क्रियेविषयी प्रश्न उपस्थित होतोच

धर्म याची जर मीमांसकांची व्याख्या घेतली तर आज धर्मशास्त्रावर जे अनेक ग्रंथ झाले आहेत त्यांतील बराचसा भाग धर्मशास्त्रांत येतो किंवा नाही हाच प्रश्न उपस्थित होणार.

धर्मशास्त्रांत पुनःपुनः उच्चारण केले आहे की, शब्दप्रामाण्य वेदसच आहे, इतर ग्रंथांस नाही. " केवळ श्रुतिनियमांचे अवलंबन करा " किंवा

" सर्व श्रुतिनियमांचें अवलंबन करा " असें आज कोण म्हणणार आहे? श्रुतींच्या खालोखाल अधिकाराचे ग्रंथ म्हटले म्हणजे कल्पसूत्रें. आपस्तंबाश्वलायनादि सूत्रांचा अनुयायी जो ब्राह्मण असेल त्यास आपलें सूत्र श्रुतींच्या खालोखाल महत्त्वाचें वाटतें; परंतु त्याचें सुद्धां अवलंबन केलें असतां सप्रत्यवाय दोष उत्पन्न होणार नाहीं काय? उदाहरणार्थ, आश्वलायनसूत्री ब्राह्मणांस म्हणजे सर्व कऱ्हाडे ब्राह्मणांस आणि निम्याऊन अधिक कोंकणस्थ, देशस्थांस " शूलगव " करणें कर्तव्य आहे! तथापि शूलगवाचा म्हणजे बैल मारण्याचा विधि, दरमहिना-पंधरा दिवसांनीं एखादा ब्राह्मण करूं लागला तर तो ब्राह्मण समाजांत राहील किंवा नाहीं याची शंकाच आहे.

कलियुगांत अमुक विधी करावयाचे नाहींत असें जरी स्मृतिवचन असलें तरी प्रत्येक स्मृतिवचनाची मान्यता वेदमूलकत्वावरच असावयाची ना? वेदांत कलियुगाचा उल्लेख आहे काय? आणि कलांमध्यें निराळा धर्म असावा असा आदेश वेदांत कोठून सांपडणार?

जेथें शास्त्रवचन निश्चयात्मक नाहीं, तेथें रूढि घ्यावयाची असें कोणी म्हणेल पण आज रूढि घ्यावयाची ती कोणामधील? बहुजनसमाजाची म्हणजे शूद्रातिशूद्रांतील रूढि घ्यावयाची कीं ब्राह्मणांची घ्यावयाची, ब्राह्मणांतल्यांत इंग्रजी शिकलेल्यांची मान्य धरावयाची, किंवा बहुतांशीं रूढीवर अवलंबून राहणाऱ्या व शास्त्राभ्यासापेक्षां क्रिया शिकलेल्या अशा भिक्षुकवर्गाची रूढि घ्यावयाची, कीं जे थोडे धर्मशास्त्रज्ञ समाजांत असतील त्याची रूढि घ्यावयाची? ज्यांच्यांतील रूढि घ्यावयाची असा शिष्टवर्ग कोणता व कसा शोधावयाचा?

या तऱ्हेचे अनेक प्रश्न आमच्यापुढें येतात, आणि त्या प्रश्नांनां उत्तरें देण्यास आम्हास लोकमताची अपेक्षा भासते. लोकमत घेण्यापूर्वी लोकांस आमचा कार्यक्रम समजावून दिला पाहिजे.

ज्ञानकोशाचें कार्य पार पाडण्यासाठीं जे कार्यविभाग व कालविभाग केले आहेत ते येणेंप्रमाणें:—

ता. १ डिसेंबर १९१९ च्या आंत कच्चा ज्ञानकोश तयार करावयाचा आणि पुढील १२ महिन्यांत त्याची, छापखान्याकरितां हस्तलिखित प्रत तयार करावयाची आणि तो पुढें छापून काढावयाचा.

कच्च्या ज्ञानकोशांत धर्मशास्त्राची तयारी येणेंप्रमाणें राहील. धर्मशास्त्रांतर्गत अनेक विषयांविषयीं माहिती व मतें यांचें पृथक्करण करून प्रथम तें सर्व विषयवार मांडून ठेवावयावें. हें कार्य ता. १ डिसेंबर १९१९ च्या सुमारास तयार होईल अशी अपेक्षा आहे. हें लक्षांत ठेवून खालील गोष्टींचा विचार करावा, आणि आम्हीं काय करावें याविषयीं मत द्यावें.

आज ज्ञानकोशकारांस खालील निरनिराळ्या प्रकारचा विकल्प आहे:—

एक तर हिंदुराज्याबरोबर धर्महि गेला असें गृहीत धरून पूर्वी म्हणजे सुमारें १०० वर्षांपूर्वी हिंदु म्हणून जे लोक होते ते कोणत्या आचारानें वर्तत होते, आणि त्यांत निरनिराळ्या काळीं कसे फेरफार होत गेले, यांचें केवळ ऐतिहासिक विवेचन द्यावयाचें, आणि सध्यां इंग्रज जेवढें हिंदूंचें धर्मशास्त्र हिंदूंनां पाळावयास लावतात तेवढेंच मान्य करावयाचें.

बरील दृष्टि जरी ठेवली तरी अशी अडचण उत्पन्न होते कीं, इंग्रजी कायदा हिंदूंचे धर्मशास्त्र हिंदूंस लागू आहे असें गृहीत धरतो; आणि आपण त्यांत कांहीं फेरबदल करीत नाहीं. नुसता हिंदुंच्या कायद्याचा आपण अर्थ करतो असाहि बाणा इंग्रजी कायद्याचा आहेच. हिंदूंचें धर्मशास्त्र जर मृत झालें नाहीं असें म्हणावें तर आजचा धर्म ठरविणारी संस्था कोठें आहे? प्रत्येक संस्कृतींच्या कायद्यामध्यें परस्परविरुद्ध वचनें असतातच; पण संशयनिर्णायक संस्था त्यांच्यांत जिवंत असल्यामुळें अमुक स्थळीं धर्म काय आहे, याविषयीं संशय रहात नाहीं, व राहिला तरी त्याचा निर्णय करण्यास कोणापुढें जावें हें ठरलेलें असतें आणि दरघटकेस हें संशयनिर्णयाचें काम चालूच असतें तशी हिंदुधर्माला सध्यां सर्वमान्य संशयोच्छेदी संस्था आहे काय?

धर्मशास्त्र जिवंत आहे,आणि आजचा धर्म विधिनिषधेपर स्पष्ट वाक्यांनीं दिला पाहिजे; ही वृत्ति आपण घेतली तर पुनः पूर्वोक्त प्रश्न उपस्थित होतो कीं, आम्ही जें धर्मनिर्णायक मंडळ नेमूं त्याच्या निर्णयास महाराष्ट्रजनता काय किंमत देईल? आम्ही त्यांत विद्वान धर्मशास्त्रज्ञ आणि व्यवहारवेत्ते हे जरी अनेक घेतले तरी त्यांच्या निर्णयास अधिकार कितीसा उत्पन्न होईल? महाराष्ट्रांमध्यें एखादी कायमची धर्मनिर्णायक संस्था असती तर तिचा उपयोग अशा प्रसंगीं झाला असता. शिवाय लोकांनां आजचें धर्मशास्त्र सांगण्याचा अधिकार व जबाबदारी हीं ज्ञानकोशमंडळानें का घ्यावींत? यांत एक उपाय आणखी आहे कीं, शंकराचार्यांच्या पीठासारख्याकडून हें काम खरोखर व्हावें व तें तसें व्हावयास पाहिजे. कां कीं, त्यांचाच हा परंपरागत अधिकार आहे. तथापि तो अधिकार आज बरींच वर्षें निद्रिस्थ स्वरूपांत आहे; परंतु शंकराचार्यांच्या पीठाकडून जर आमचे धर्मशास्त्रावरील लेख तपासले गेले, आणि अनेक संशयोच्छेदी वाक्यें लिहिलीं गेलीं तर ज्ञानकोशांतर्गत धर्मशास्त्रीय भागास बरीच मान्यता मिळेल.

आमच्यापुढें आणखींहि एक अडचण आहे. सरकारच्या खानेसुमारीच्या खात्यामध्यें आणि एथनोग्रफीच्या खात्यामध्यें जातिविषयक चौकशी चालू असतां अनेक प्रकारचे घोटाळे उपस्थित होऊन त्यांनीं जातींचें वर्गीकरण

चातुर्वर्ण्यपद्धतीनें करण्याचा नाद सोडून दिला, आणि जातींचा यादी इंग्रजी आकारविल्हेनें (Alphabetically) करण्याचें ठरविलें. यासारख्या सुंदासुंदीच्या प्रश्नावर आम्ही कोणत्या अधिकारानें निर्णय करावा.

या पत्राच्या वाचकापुढें आम्ही लिहिण्याचे खालीं चार प्रकार ठेवीत आहोंत. त्यांतून कोणत्या प्रकारचा आम्हीं अवलंब करावा याविषयीं विचार करणें वाचकांकडे आहे

पहिला प्रकार—वर्गीकरणांत केवळ ऐतिहासिक दृष्ट्या विवेचन द्यावें, आणि रूढ्याचा धर्म काय आहे यापलीकडे पूर्ववृत्त धारण करावी.

दुसरा प्रकार—आम्हांस जें धर्मरूढ्यांचें साहाय्य होईल त्या साहाय्यानें मिश्र टेबू येईपर्यंतचा खुशाल निर्णय द्यावा; आणि आमच्या निर्णयास काय किंमत द्यावयाची हें महाराष्ट्रानें मागून ठरवावें.

तिसरा प्रकार—महाराष्ट्रांतील सर्व हिंदु जनतेनें एकत्र होऊन एखादी धर्मनिर्णायक सभा केला आणि तिनें एका वर्षाच्या अवधींत आधुनिक धर्मविषयक बाबींचा निर्णय करून तर नेऊन आम्हीं स्वाधीन द्यावें.

चौथा प्रकार—महाराष्ट्रानें ठिकठिकाणीं सभा भरवून जगद्गुरूंस आपले लेख तपासून देण्यास विनंति केली आणि जगद्गुरूंकडून ती विनंति मान्य झाली तर जगद्गुरूंकडून आपले लेख तपासून घ्यावेत.

वरील चार प्रकारांपैकीं आम्ही कोणत्या उपायांनें अवलंबन करावें हें या पत्राच्या वाचकांनीं ठरवावें. ज्ञानकोशाच्या वर्गणीदारांनीं आणि हिस्सेदारांनीं, म्हणजे ज्या लोकांनीं पैसा आम्हीं घेऊन त्यांस लौकर ग्रंथ देण्याची जबाबदारी अंगिकारीत आहों त्यांनीं तर यापरीस आपलें मत जरूर कळविण्याची कृपा करावी.

श्रीधर व्यंकटेश केतकर.

(परिशिष्ट नं. ६)

डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर, एम्. ए. पीएच्. डी. संपादक महाराष्ट्रीय ज्ञानकोश यांजकडून मुंबईतील व्यापारी वर्गास स्नेहपूर्वक विनंती.

" महाराष्ट्रीय ज्ञानकोश " या ग्रंथांतील व्यापारी माहिती तयार करण्यासाठीं मंडळाचा प्रतिनिधि आपणाकडे येईल तेव्हां आपण माहिती देण्याची कृपा करावी.

ज्या बाजारांची माहिती पाहिजे असे बाजार येणेप्रमाणे

१ जव्हेरीबझार, २ शेअरबझार, ३ रूबझार, ४ धान्यबझार, ५ अत्तरी बझार, ६ मसालेबझार, ७ महुडाबझार, ८ तांबे पितळबझार, ९ लोखंड-बझार, १० गोणपाटबझार, ११ काच्याबझार, १२ सूतबझार, १३ सराफ-बझार, १४ कापडबझार, १५ औषधीबझार, १६ कागदबझार, १७ रेशीम-बझार, १८ कपडा तुकडा (कटपीस) बझार, १९ खोळसाबझार, २० गवत-बझार, २१ भाजी फळफळावळबझार, २२ चमडाबझार, २३ बूटबझार, २४ बिलोरीबझार, २५ घी बझार, २६ वीट फत्तर वगैरे.

प्रत्येक बझारसंबंधानें अवश्य असलेली माहिती

(१) आपल्या बाजारांत खरेदी-विक्रीची पद्धत कशी असते? मालाच्या किंमती, चालू बाजारभाव, पुढील तेजीमंदीच्या धोरणाविषयींची माहिती देणारीं पत्रकें, मासिकें वगैरे आहेत काय? हजर मालाचा सौदा अगर सट्टे ह्यांच्या खरेदी विक्रीची पद्धत (मग ती जथाबंध असो अगर परचुरन असो) कशी आहे? पतीवर माल देण्याची तऱ्हा कशी आहे? सौदा करण्यास रक्कम किती अनामत ठेवावी लागते.

(२) दोन बाजारांच्या भावांतील फेरबदलाचा एकमेकांशीं संबंध कसा असतो? (हा फेरबदल दोन पेटांच्या एकाच मालाच्या भावामधील फेर-बदल असो किंवा एकाच पेटेच्या निरनिराळ्या बाजारांतील भावाच्या फेर-बदलाविषयीं असो, दोहोंसंबंधानें माहिती अवश्य आहे)?

(३) बाजार ज्यांच्या हातीं आहे त्यांची जात काय? त्यांच्या व्यव-हारांत भाषा कोणती चालते?

(४) मालाच्या निरनिराळ्या जाती किती आहेत?

(५) हिशेबाची पद्धत कशी आहे?

(६) आपल्या बाजारांत संघ (असोसिएशन) आहेत काय?

(७) आपल्या बाजारांत रोकड बाजारांतील तेजीमंदीवर भाव कितपत अवलंबून असतात? केवळ स्थानिक चढाओढीवर कितपत भाव अवलंबून असतात? माल रोखण्याचा प्रयत्न केल्यास आपल्या बाजारांतील मालाच्या किंमती कितपत वाढू शकतील? गिऱ्हाइकास आपण ठरवू त्या भावानें माल द्यावा लागेल असें केव्हां शक्य होतें आणि केव्हां होत नाहीं?

(८) आपल्या बाजारांत " मक्तेदार " म्हणजे माल रोखणें शक्य होण्यासाठीं रोखणारानें केवढी खरेदी केली असतें असें अनुभवानें दिसून आलें आहे. माल रोखण्याचें काम कांहीं मोठे एकएकटे व्यापारीच करतात किंवा तसें करणाऱ्या व्यापाऱ्यांचे उघड किंवा गुप्त संघ आहेत?

(९) एकपक्षीं कलकत्त्याचा, कराचीचा आणि रंगूनचा बाजार आणि दुसऱ्यापक्षीं मुंबईचा बाजार ह्याच्या किंमती कितपत परस्परावलंबी आहेत? ह्या परस्परावलंबी नसून त्या लिव्हरपूलवर अवलंबून आहेत काय?

(१०) लिव्हरपूलवर कोणत्या मालाच्या किंमती अवलंबून आहेत? रंगूनला बाजारांत लिव्हरपूलला प्रतिस्पर्धी युरोपांतील दुसऱ्या पेठा नाहींत काय? नसल्यास का नाहींत? फ्रान्स, जर्मनी, बेल्जम, हालंड, डेन्मार्क वगैरे देशांच्या मुंबई येथील कौन्सलांनीं मुंबईहून खरेदी करण्यास आपल्या देशांतील व्यापाऱ्यांस वळविण्यासाठीं प्रयत्न केला आहे काय? मुंबईच्या बाजारांत इतर देशांनीं खरेदी करावी म्हणून येथील व्यापाऱ्यांचे कांहीं प्रयत्न झाले आहेत काय?

(११) आपल्या बाजाराच्या माहितीसंबंधीं कोणकोणतीं वुकें आहेत?

महाराष्ट्रीय ज्ञानकोश हा दहा हजार पृष्ठांचा (सुपरायल आक्टेव्हो आकार) मराठींत ग्रंथ होणार आहे. म्हणजे ५०० पृष्ठांचा एक भाग असे वीस भाग होतील ग्रंथाची किंमत शंभर रुपयांपेक्षां कमी किंवा अधिक वर्गणी देण्याच्या वेळेवर अवलंबून आहे. ग्रंथ फार मोठा असल्यामुळें हजार प्रती छापून विकावयास ठेवतां येणें शक्य नाहीं. व यामुळें आगाऊ वर्गणीदार होणें अवश्य आहे. अधिक माहिती रा. रा. वामन सदाराम संत बी. ए. (आरेगान अमेरिका) प्रतिनिधि ज्ञानकोश मंडळ मोहनबिल्डिंग पांजकडे मिळेल.

(परिशिष्ट नं ७.)

महाराष्ट्रीय ज्ञानकोशकाराचे महाराष्ट्रांतील नृत्याभिज्ञ स्त्रीपुरुषांस प्रश्न.

[मुंबई ९।१।१९१९]

गेलीं शेकडों वर्षें नृत्यकलेचा व तत्संबंधीच्या शास्त्रांचा ऱ्हास होत आहे. व संस्कृत ग्रंथ वाचणारे पंडित व नृत्यकला जाणणारे स्त्रीपुरुष यांमध्यें संबंधाभाव झाल्यामुळें नृत्याविषयीं सशास्त्र माहिती देणारे लोक दुर्मिळ झाले आहेत. शास्त्र व कला यांचा झालेला फारकत दोघांसहि अपायकारक आहे. ज्ञानकोशकारांस या दोहोंचेंहि जरूर आहे. नृत्यविषयक संस्कृत शास्त्रकारांचें ज्ञान आणि आजचें नृत्य या दोहोंची माहिती ग्रंथांत आली पाहिजे हें ग्रंथध्येय आहे प्रचलित नृत्याविषयीं जी माहिती ग्रंथांत घालावयाची ती कांहीं पद्धतीनें गोळा झाली पाहिजे, आणि नृत्यशास्त्रांत असलेली माहिती आम्हांस पद्धतशीर

रीतीनें पाठविणें शक्य व्हावें यासाठीं पुढील प्रश्नमालिका तयार केली आहे. नृत्यकलेवर व्यासंग असलेली मंडळी या प्रश्नांस उत्तरें देऊं शकतील असें वाटतें. जहागिरदार, संस्थानिक इत्यादि नृत्यकलेच्या ज्या आश्रयदात्यांकडे हें पत्रक येईल त्यांनीं तें योग्य मंडळीकडे पाठविण्याची व्यवस्था करावी.

सर्वसामान्य नृत्यकलाभिज्ञ मंडळीकडून सहजच मऊं शकेल अशी माहिती म्हटली म्हणजे नांचांचीं वर्णनें व नांवें. हीं वर्णनें मेहनत घेतलीं असतां शास्त्रीय भाषेंत लिहितां येणें कठिण नाहीं. तथापि तशीं लिहिणें जरूर नाहीं. प्रत्येक नाचांत शरीराच्या हालचाली म्हणजे अभिनय वर्णन करतांना (अ) अंगें, म्हणजे डोकें, हाताचे पंजे, कुशी, कंबर, पाय, मान; (आ) प्रत्यंगें म्हणजे खांदे, बाहू, पोट, मांड्या, पोटऱ्या, भरोवट, गुडघे व हाताचे कोपरे; (इ) आणि उपांगें म्हणजे डोळे, पापण्या, बुबुळें, गाल, नाक, तोंड, दांत, जीभ, हनुवटी, चेहरा या तीनहि प्रकारच्या अभिनयस्थानांच्या हालचालींचें वर्णन करावें. नाचतांना केलेल्या अंगविक्षेपांचीं उर्फ अभिनयांचीं चित्रें देतां आलीं तर उत्तमच होईल.

नृत्यवर्णनाची शास्त्रीय भाषा तयार झाली आहे ती येणेप्रमाणें.—गाणें ज्याप्रमाणें स्वरांत लिहितां येतें त्याप्रमाणें प्रत्येक नाच अभिनयांत लिहितां येतो. स्वाभाविक क्रिया करतांना जे अंगविक्षेप होतात अगर ज्या क्रिया होतात त्यापैकीं प्रत्येक अंगाच्या, प्रत्यंगाच्या व उपांगाच्या प्रत्येक निरनिराळ्या क्रियांस नांवें दिलीं गेलीं आहेत. त्यामुळें सर्व प्रकारच्या हालचाली (अभिनय) थोडक्यांत लिहितां येतात. अनेक प्रकारचे अभिनय एकत्र होऊन नृत्य होतें.

माहितीचे मुद्दे.

(१) **नाचांविषयीं विचार**—(अ) कलेच्या दृष्टीनें, व (आ) ऐतिहासिक दृष्टीनें म्हणजे कोणता नाच कोणाकडून आला वगैरे नृत्यविषयक संशोधकास अवश्य असल्यामुळें वर्णनास घेतलेल्या नाचांचें सूक्ष्मवर्णन दिलेलें चांगलें.

(२) **नाचांचें वर्गीकरण**—नाचांचें वर्गीकरण शक्य होईल तोंपर्यंत नृत्याच्या हेतूवरून करावें. नृत्याचे हेतू सामान्यतः तीन असतातः (अ) शरीरचापल्य व हालचालींतील गोंडसपणा दाखवून प्रेक्षकांस आश्चर्यचकित करणें, (आ) संगीतास जोड म्हणून आपल्या पायांनीं अगर घंटांनीं नाद उत्पन्न करून, किंवा नादास योग्य असे अंगविक्षेप करून, श्रोत्याच्या किंवा प्रेक्षकांच्या मनावर एकभाव उत्पन्न करणें, (इ) स्मरणानें पूर्वानुभूत विकार जागृत करतां येतात म्हणून, सर्वांस परिचित असलेल्या क्रियांचीं अगर

ऐतिहासिक, पौराणिक व नाट्यविषय झालेल्या कथांची, प्रसंगांची, अगर व्यक्तींचा भावविषयक स्मृति उत्पन्न करणें. या तीन हेतूंपैकीं प्रत्येक नाचाचें वर्णन करतांना जो हेतु. प्रधान असेल त्या वर्गांत तो नाच घालावा.

(३) कोणत्या नाचास कोणता अंगविक्षेप अनुरूप आहे याविषयीं अनुभवानें मत लिहावें.

(४) स्मृति उत्पन्न करण्यास योग्य अशा व्यवहारांतील कोणत्या प्रसंगांची नक्कल नृत्यांत येते. कोणत्या पौराणिक प्रसंगांची आटवण देणारा अभिनय आज भावजागृति करूं शकत नाहीं भावजागृति करूं शकतील अशा कोणत्या अर्वाचीन गोष्टी नाचांत आढळतात?

(५) नृत्यविषयक धंदा करणाऱ्या स्त्रियांत आपला समाजांतील दर्जा अधिक उच्च तऱ्हेचा व्हावा म्हणून कांहीं चळवळी अगर खटपटी झाल्या आहेत काय ? नृत्यांगना स्त्रियांच्या धंद्यास शिस्त लावण्यासाठीं बलाहीन वारांगनांमधून पृथक्त्व स्थापन करण्यासाठीं व आश्रयदात्यांसहि नियमांनीं बांधण्यासाठीं कांहीं संस्था आहेत काय ? सुधारकांच्या बहिष्कारोपदेशक चळवळीमुळें, धंद्याची बदनामी अगर नुकसान झालें आहे काय ? धंद्यातील स्त्रियांस कांहीं विशिष्ट नियमांनीं अगर शिस्तीनें वागविण्याचा प्रयत्न झाला आहे काय ?

(६) नृत्यांगनांचें सध्यांचें शिक्षण कसें होतें ? नृत्याचार्यांत पुरुषच आहेत काय ? असल्यास ते कोणत्या जातीचे असतात ? त्यांचें शिक्षण कसें काय असतें ? नृत्याच्या शिक्षणक्रमास सुरवात केव्हां होते. नृत्य शिकणाऱ्या स्त्रिया पिढ्यानुपिढ्या तोंच धंदा करणारांतच असतात अगर इतरांत असतात. नृत्याचें शिक्षण देणारांमध्यें कांहीं नंदिकेश्वराचें अभिनयदर्पण किंवा भरतमुनिचें नाट्यशास्त्र यांसारख्या ग्रंथांशीं परिचित असतो काय ?

(७) सध्यां नृत्याचीं उपकरणें (पायांतील चाळ वगैरे) कोणकोणतीं आहेत? त्यांच्या उपयोगासंबंधानें आजच्या व्यवहारांत कांहीं आखाडे अगर नियम झाले आहेत काय ?

(८) नृत्यास अनुकूल असा वेष कसा सजवावा, सकाळच्या नृत्यास अमुक, संध्याकाळच्या नृत्यास अमुक, देवापुढील नृत्यास अमुक आणि लग्नामुंजींतील नृत्यप्रसंगीं तमुक वेष असावा, असें प्रसंगाच्या, दिवसांच्या भागांच्या, ऋतूंच्या व नृत्याच्या प्रकारांवरून ठरतें काय ?

(९) महाराष्ट्रांतल्या महाराष्ट्रांत नृत्यविषयक भेद आहेत काय ? अमुक नाच कोंकणांत अधिक, अमुक देशावर अधिक, कानडी मुलखांत अमुक नाच दिसतो तो इतरत्र दिसत नाहीं असें कांहीं आहे काय ?

(१०) अमेक माणसें जमास लागतात असें नाच कोणकोणते आहेत ? त्यांच्या हालचालींचें व मंडलाचें वर्णन करावें.

(११) यूरोपियन लोकांच्या नाचाचा परिणाम परंपरागत नाचावर कांहीं होत आहे काय ?

(१२) आजचे महाराष्ट्रात जे नृत्याचे प्रकार प्रचलित आहेत ते परंपरागत महाराष्ट्रीयच आहेत कीं उत्तरहिंदुस्थानाकडून आले आहेत, किंवा दक्षिणेकडून आले आहेत. भिल्ल व कोळी यांसारख्या वन्य जातिकडून कांहीं नाच आले आहेत काय ? पशुपक्ष्यांचें अनुकरण नृत्यांत किती पडतें ?

(१३) लोकांच्या नृत्यविषयक अभिरुचीविषयीं काय म्हणतां येईल ?

(१४) नृत्यांगनांचें सामान्यतः उत्पन्न काय असतें ? त्यांच्या अंगचे हुंगाम कोणते ? महाराष्ट्रीय नर्तकीस, उत्तरहिंदुस्थानांतील, कानडी गुजराथी किंवा मुसुलमान नर्तकीची स्पर्धा कितपत भोवते. महाराष्ट्राबाहेर महाराष्ट्रीय नृत्यागनांस क्षेत्र आहे काय ? विवाहाचा प्रश्न तुलना माहिती ता. १ जुलै १९१९ च्या आंत संपादक महाराष्ट्रीय ज्ञानकोश नागपूर यांच्याकडे पाठवावी.

(परिशिष्ट नं ८)

महाराष्ट्रीय ज्ञानकोशकारांचा सर्व जातींच्या पुढाऱ्यांस नम्र विनंति.

वि. वि. महाराष्ट्रीय ज्ञानकोशांत हिंदुस्थानांतील अनेक जातींविषयीं माहिती येणार आहे. आणि त्यांतल्याप्रमाणें महाराष्ट्रांतील जातीविषयीं वर्णन विशेषेंकरून येणार आहे. निरनिराळ्या जातींविषयीं सेन्सस रिपोर्ट, एथ्नॉग्रॉफिक सर्व्हे, गॅझेटिअर व स्वतंत्र पुस्तकें यांतील माहितीचें कांहीं काम मंडळाच्या संपादकीय कारखान्यात चालूच आहे. तथापि अशी बरीचशी माहिती आहे कीं ती या ग्रंथांतून मुळींच उपलब्ध नसते. अशी माहिती गोळा करणें भाग आहे. ज्ञानकोशांत निरनिराळ्या जातींसंबंधानें आजचें समाजचित्र यावयाचें तें बरोबर यावें यासाठीं प्रत्येक प्रकारची खटपट आलीच पाहिजे. आपल्या जातींसंबंधानें चुकीची माहिती का प्रसिद्ध झाली असेल या संबंधाची जागीव प्रत्येक जातींतील सुशिक्षित वर्गास असेल. तर प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांतील चुका वगैरे प्रत्येक जातीच्या पुढाऱ्यांनीं आमच्या नजरेस आणल्यास आम्ही आभारी होऊं.

निरनिराळ्या जातींच्या लेखकांनीं स्वतःच्या जातीविषयीं माहिती खालील मुद्द्यांस धरून ता. १ डिसेंबर १९१८ च्या आंत पाठवावी.

१ आपल्या जातींत अजमासें एकंदर लोकसंख्या काय आहे ? जातीचें मुख्य वसतीचें ठिकाण कोणतें ? तेथें किती वस्ती आहे ?

२ आपल्या जातीस पंचायत आहे काय ? गांवोगांवीं पंचायती असल्या तरी सर्वसामान्य पंचायत आहे काय ?

३ पंचायतीचा अध्यक्ष निवडला जातो कीं तो वंशपरंपरेनें असतो ?

४ जातीचीं देवळें, चाळी, घरें, जमीनजुमला वगैरे स्थावर व जंगम मालमत्ता काय आहे ? त्यांवर सत्ता कोणाची आहे ? त्याची सरासरी किंमत काय आहे?

५ जातीचा कर कसा वसूल करतात ?

६ पंचायतीचे निवाडे लिहून ठेवण्याची पद्धत आहे काय ? असल्यास किती वर्षांचे निवाडे लिहिले गेले आहेत ?

७ पंचायतीचे निकाल अमलांत आणण्याकरितां कोणतीं शासनें करणें जातीच्या स्वाधीन आहे?

८ शासनें करण्याच्या अधिकारास सरकारकडून मंजुरी मिळाली आहे काय ?

९ जातींच्या पंचायतीपुढें नित्य प्रश्न कोणते येतात आणि महत्त्वाचे नैमित्तिक प्रश्न आजपर्यंत कोणकोणते आले ?

१० आपल्या ज्ञातींच्या सदृश तथापि तींहून भिन्न अशा कोणत्या जाती आहेत ?

११ कोणत्या जातीबरोबर अन्नोदकव्यवहार चालतो.

१२ जातीच्या पोटजाती किती ? कोणत्या पोटजातींबरोबर लग्नव्यवहार सुरू झाला आहे ?

१३ आपल्या जातीमध्यें विवाहादि संस्कार कोणते भिक्षुक करतात ?

१४ जातीचे कोणते प्रश्न जातच सोडविते व कोणत्या प्रश्नावर ब्राह्मणांचा सल्ला घेण्यांत येतो आणि ब्राह्मणांनीं काढून दिलेल्या शास्त्राधारावरून कोणत्या प्रश्नाचा निकाल करण्यांत येतो ?

१५ ज्ञातीचें चातुर्वर्ण्यव्यवस्थेंत स्थान कोणतें आहे? यासंबंधीं जातींचें म्हणणें लोकमान्य कितपत झालें आहे ? यासंबंधाचे निवाडे केव्हां केव्हां व कसे झाले आहेत ?

१६ ज्ञातिसंबंधाचे कागदपत्र काय आहेत ? ते कोणापाशीं आहेत ? (त्यांच्या नकला मिळणें शक्य असल्यास त्या पाठविणें).

१७ ज्ञातींच्या इतिहासासंबंधानें केवळ दंतकथा काय आहेत ? कागदोपत्रीं आधारावरून काय निष्पन्न झालें आहे ?

१८ गेल्या तीन चारशें वर्षांत जातींचीं स्थलांतरें कांहीं झालीं आहेत काय ? व स्थलांतरांचीं कारणें काय ?

१९ इंग्रजी राज्यापूर्वी जातीचा आचार कसा काय होता ? त्यांत फेरबदल काय होत चालला आहे ?

२० जातींत पुनर्विवाह आहे काय ? जातींतील विधवांची व निराश्रित मुलांची तरतूद जातीनें काय केली आहे ?

२१ जातींतील पुरुषांस रखेल्यांपासून झालेल्या मुलांची एखादी निराळी जात बनली आहे काय ?

२२ जातींतल्या स्त्रियांस अधर्मव्यवहारानें सजातीय पुरुषांपासून झालेल्या संततीचें भवितव्य काय होतें ?

आडनांवें, गोत्रें, देवकें वगैरेंच्या याद्या, जातींतील कांहीं मोठ्या किंवा प्रसिद्ध स्त्रीपुरुषांसंबंधानें सचित्र माहिती, स्त्रीपुरुषांचे पोषाख व दागिने यांच्याविषयीं बोध करणारीं चित्रें, जातीच्या फंडानें अगर पंचायतीच्या निवाड्यांचे रिपोर्ट छापले असल्यास ते; ही सर्व माहिती संपादक महाराष्ट्रीय ज्ञानकोश, धनतोली नागपूर या पत्त्यावर पाठवावी. कळावें हे विज्ञापना.

आपला,

गोविंद चिंतामण तांबे (बी. ए., एल्एल्. बी.)

महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळ, लिमिटेड, नागपर.

(परिशिष्ट, नं. ९)

वाचनालयास ग्रंथालय जोडण्यासंबंधी योजना.

महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळ लिमिटेड, नागपूर.

पुणें शाखा ४८१ शनवार पेठ.

सेक्रटरी.....वाचनालय यांस

वि. वि. आपलें एक वाचनालय आहे. तथापि त्या वाचनालयास आपण ग्रंथसंग्रह जोडला आहे किंवा नाहीं, हें दळत नाहीं. आपणास आपल्या वाचनालयास ग्रंथालयाचें स्वरूप देतां यावें म्हणून आम्ही खालील योजना सुचवितों. ती योजना आपणांस शक्य होण्यासाठीं आम्हीं शक्य ती मदत करूं. आपल्या वाचनालयाच्या हितचिंतकांपुढें विचार करण्यासाठीं आम्ही एक योजना मांडतों.

आपली अशी इच्छा आहे कीं, आपल्या वाचनालयास ग्रंथालयाचें स्वरूप यावें, त्यानें चांगल्या ग्रंथांचा संग्रह करावा. आणि लोकांस वाचनाची

१ आपल्या जातींत अजमासें एकंदर लोकसंख्या काय आहे ? जातीचें मुख्य वसतीचें ठिकाण कोणतें ? तेथें किती वस्ती आहे ?

२ आपल्या जातीस पंचायत आहे काय ? गांवोगांवीं पंचायती असल्या तरी सर्वसामान्य पंचायत आहे काय ?

३ पंचायतीचा अध्यक्ष निवडला जातो कीं तो वंशपरंपरेनें असतो ?

४ जातीचीं देवळें, चाळी, घरें, जमीनजुमला वगैरे स्थावर व जंगम मालमत्ता काय आहे ? त्यांवर सत्ता कोणाची आहे ? त्याची सरासरी किंमत काय आहे?

५ जातीचा कर कसा वसूल करतात ?

६ पंचायतीचे निवाडे लिहून ठेवण्याची पद्धत आहे काय ? असल्यास किती वर्षांचे निवाडे लिहिले गेले आहेत ?

७ पंचायतीचे निकाल अमलांत आणण्याकरितां कोणतीं शासनें करणें जातीच्या स्वाधीन आहे?

८ शासनें करण्याच्या अधिकारास सरकारकडून मंजुरी मिळाली आहे काय ?

९ जातीच्या पंचायतीपुढें नित्य प्रश्न कोणते येतात आणि महत्त्वाचे नैमित्तिक प्रश्न आजपर्यंत कोणकोणते आले ?

१० आपल्या ज्ञातीच्या सदृश तथापि तींहून भिन्न अशा कोणत्या जाती आहेत ?

११ कोणत्या जातीबरोबर अन्नोदकव्यवहार चालतो.

१२ जातीच्या पोटजाती किती ? कोणत्या पोटजातींबरोबर लग्नव्यवहार सुरू झाला आहे ?

१३ आपल्या जातीमध्यें विवाहादि संस्कार कोणते भिक्षुक करतात ?

१४ जातीचे कोणते प्रश्न जातच सोडविते व कोणत्या प्रश्नावर ब्राह्मणांचा सल्ला घेण्यांत येतो आणि ब्राह्मणांनीं काढून दिलेल्या शास्त्राधारावरून कोणत्या प्रश्नाचा निकाल करण्यांत येतो ?

१५ ज्ञातीचें चातुर्वर्ण्यव्यवस्थेंत स्थान कोणतें आहे? याविषयीं जातींचें म्हणणें लोकमान्य कितपत झालें आहे ? यासंबंधाचे निवाडे केव्हां केव्हां व कसे झाले आहेत ?

१६ ज्ञातिसंबंधान कागदपत्र काय आहेत ? ते कोणापाशीं आहेत ? (त्यांच्या नकला मिळणें शक्य असल्यास त्या पाठविणें).

१७ ज्ञातीच्या इतिहासासंबंधानें केवळ दंतकथा काय आहेत ? कागदोपत्रीं आधारावरून काय निष्पन्न झालें आहे ?

१८ गेल्या तीन चारशें वर्षांत जातींचीं स्थलांतरें कांहीं झालीं आहेत काय ? व स्थलांतरांचीं कारणें काय ?

१९ इंग्रजी राज्यापूर्वी जातीचा आचार कसा काय होता ? त्यांत फेरबदल काय होत चालला आहे ?

२० जातींत पुनर्विवाह आहे काय ? जातींतील विधवांची व निराश्रित मुलांची तरतूद जातीनें काय केली आहे ?

२१ जातींतील पुरुषांस रखेल्यांपासून झालेल्या मुलांची एखादी निराळी जात बनली आहे काय ?

२२ जातींतल्या स्त्रियांस अधर्मव्यवहारानें सजातीय पुरुषांपासून झालेल्या संततीचें भवितव्य काय होतें ?

आडनांवें, गोत्रें, देवकें वगैरेंच्या याद्या, जातींतील कांहीं मोठ्या किंवा प्रसिद्ध स्त्रीपुरुषांसंबंधानें सचित्र माहिती, स्त्रीपुरुषांचे पोषाख व दागिने यांच्याविषयीं बोध करणारीं चित्रें, जातीच्या फंडाचें अगर पंचायतीच्या निवाड्यांचे रिपोर्ट छापले असल्यास ते; ही सर्व माहिती संपादक महाराष्ट्रीय ज्ञानकोश, धनतोली नागपूर या पत्त्यावर पाठवावी. कळावें हे विज्ञापना.

आपला,
गोविंद वितामण तांबे (बी. ए., एल्एल्. बी.)
महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळ, लिमिटेड, नागपर.

———

(परिशिष्ट, नं. ९)

वाचनालयास ग्रंथालय जोडण्यासंबंधी योजना.

महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळ लिमिटेड, नागपूर.
पुणें शाखा ४८१ शनवार पेठ.

सेक्रेटरी.....वाचनालय यांस

वि. वि. आपलें एक वाचनालय आहे. तथापि त्या वाचनालयास आपण ग्रंथसंग्रह जोडला आहे किंवा नाहीं, हें दळत नाहीं. आपणास आपल्या वाचनालयास ग्रंथालयाचें स्वरूप देतां यावें म्हणून आम्ही खालील योजना सुचवितों. ती योजना आपणांस शक्य होण्यासाठीं आम्ही शक्य ती मदत करूं. आपल्या वाचनालयाच्या हितचिंतकांपुढें विचार करण्यासाठीं आम्ही एक योजना मांडतों.

आमची अशी इच्छा आहे कीं, आपल्या वाचनालयास ग्रंथालयाचें स्वरूप यावें, त्यानें चांगल्या ग्रंथांचा संग्रह करावा. आणि लोकांस वाचनाची

अभिरुचि लागावी. अभिरुचि बळावल्यानें वाढतेंच. परंतु कोणत्याहि गोष्टीला स्वरूप येण्यापूर्वी थोडाबहुत पैसा प्रथम खर्च करावा लागतो तो पैसा लोकांत अभिरुचि वाढल्यानंतर भरूनहि निघतो. ज्ञानकोशाची किंमत १०० रुपयांच्या वर आहे. तो घेण्यास आपणांस सामर्थ्य नाहीं, वाचनालयासाठीं अगोदर पैसा कोणी खर्च करावा इत्यादि अडचणी ज्या आपल्या मनांत येतात त्यांस तोड म्हणून ही सूचना आपल्याकडे पाठविण्यांत येत आहे, तिचा आपण विचार करावा. ज्ञानकोशाचा प्रसार खेडोखेडीं व्हावा अशी ज्ञानकोश-मंडळाच्या चालकांची इच्छा आहे; आणि त्यांनीं आपलें मंडळ ही एक शिक्षणसंस्था आहे अशा दृष्टीनेंच आपलें कार्य चालविलें आहे.

आपणांस जी योजना सुचवीत आहों ती येणेप्रमाणें:—

(१) वाचनालयाच्या हितचिंतकांनीं पुस्तकांत पांचशें रुपये घाला वयाचे असा निश्चय करावा.

(२) हे रुपये तीन वर्षांत खर्च करण्याचें ठरवावें

(३) दरमहा या पांचशेपैकीं सुमारें १५ पासून २० रुपये खर्च करावे.

(४) हे पैसे देण्यासाठीं एकापासून पांच हितचिंतक करावेत. एकच असल्यास चांगला; आणि त्यांनीं दिलेली रक्कम कर्जाऊ म्हणून समजण्यांत यावी, आणि तीवर त्यांस दरमहा दरशेकडा १० आणेप्रमाणें व्याज द्यावें.

(५) आपल्या वाचनालयाच्या वर्गणीदारांची जी कमिटी असेल त्या कमेटीनें हितचिंतक सावकारांस असें लिहून द्यावें कीं, जोपर्यंत आपली रक्कम फिटली नाहीं तोपर्यंत ग्रंथालयांतील सामानावर आपला सावकारी हक्क राहील

(६) आपण जो या प्रकारचा करार कराल तो साक्षीकरतां आमच्याकडे नोंदवावा.

(७) दरमहा आपण जे पैसे पुस्तकांत खर्च कराल त्यांतील पांच रुपये ज्ञानकोशास वर्गणी म्हणून भरावी.

(८) जेव्हां वर्गणीदार वाढून लायब्ररी त्यांच्याच बळावर चालेल आणि सावकाराचे रकमहि पुरीं करण्यांत येईल; तेव्हां त्या सावकारांचें सर्व रकम पोचल्याबद्दलचें कबुलायतपत्रक आमच्याकडे नोंदण्यास पाठवावें.

आपणांकडून अनुकूल उत्तर आलें आणि अशाच दुसऱ्या वाचनालयांकडूनहि उत्तर आलीं, तर सर्व वाचनालयांत हिशोबांच्या वह्या, वर्गणाच्या छापील पावत्या इत्यादि गोष्टी पुरविण्यास आम्ही खटपट करूं, आणि सर्व वाचनालयांस एकत्र जोडणारी, वाचनालयांस पुस्तकांना पुरवठा करणारी, नवीन पुस्तकांची माहिती देणारी आणि पुस्तकें वाचनाकरितां उसनी देणारी अशा निराळी सरकारांत रजिस्टर केलेली संस्था काढून तिच्या हातीं

पुढील काम सोपविण्याचा विचार होईल. तो विचार मूर्त स्वरूपास आणण्यापूर्वी आपल्यासारख्या वाचनालयांना त्याविषयीं सल्लाहि घेण्यांत येईल. कळावें, पत्राचें उत्तर यावें, ही विज्ञापना.

आपला

श्रीधर व्यंकटेश केतकर.

मुख्य संपादक-महाराष्ट्रीय ज्ञानकोश.

(परिशिष्ट नं १०)

कार्याचें धोरण आणि पद्धति.

[१।४।१९ च्या प्रसिद्धपत्रकांतून.]

कार्यपद्धति.

ज्ञानार्चे पात्रांतर—कार्यालयाबाहेर इतर लेखकांकडे असे विषय दिलेले आहेत कीं ज्या विषयांवरील ज्ञान निश्चित असून तें पाश्चात्य व देशी ग्रंथांतून मांडलें गेलें आहे. परंतु तें निराळ्या भाषांत असल्यामुळें मराठी भाषेत मांडावयाचेंच काय तें मुख्य काम आहे. या विषयांस तज्ज्ञांची जरूर विशेष असल्यामुळें तें कार्यलयांत करण्याचें न ठरवितां बाहेर तज्ज्ञांकडे सोपविण्यांत आलें आहे. प्रसंगीं तज्ज्ञ आपापल्या व्यवसायांत गुंतलेले असल्यामुळें त्यांस स्वतः लेखनाचें काम करणें इतर व्यवसाय संभाळून करितां आलें नाहीं ही गोष्ट लक्षांत आल्यामुळें जेथें जरूर भासली तेथें मंडळातर्फे त्या त्या विषयांत अभिज्ञ असा पगारी मदतनीस त्यांच्याकडे काम करण्यास दिला आहे. या योजनेमुळें तज्ज्ञांच्या ज्ञानाचा फायदा मिळून लेखन लौकर होईल या लेखाची तपासणी व अंतिम संपादन पुन्हां आफिसांत करावें लागणारच.

संक्षेपिका—वरील कामाखेरीज ज्ञानकोशाचें मुख्य काम नव्हे तरी ज्ञानकोशलेखनास अत्यावश्यक असें संज्ञाकोशाचें काम चालू आहे. या कामाकरितां आम्हीं प्रसिद्ध केलेल्या वाङ्मयसूचीचा अत्यंत उपयोग झाला आहे. संज्ञाकोशाची आवश्यकता मराठी भाषेमध्यें अत्यंत असून पुष्कळ लेखकांनी ही उणीव जनेपुढें मांडली आहे. परंतु ज्ञानकोशास संज्ञाकोशाखेरीज गत्यंतरच नसल्यामुळें वाङ्मयसूचीप्रमाणें संज्ञाकोशाहि ज्ञानकोशमंडळास तयार करणें भाग आहे.

हा संज्ञाकोश तयार करतांना मुख्य गोष्ट ही लक्षांत ठेविली पाहिजे की, टांकसाळीप्रमाणें प्रत्येक इंग्रजी शास्त्रीय पारिभाषिक शब्दास नवीन मराठी

शब्द पाडावयाचा नाहीं. तर आज जे भाषेमध्यें शब्द रूढ झाले असतील अथवा पूर्वीच्या लेखकांनीं जे शब्द वापरले असून अन्वर्थक व शुद्ध असतील अगर प्रचारांत येऊन गेल्यामुळें यौगिक अर्थानें नसले तरी रूढार्थानें विशिष्ट गुणधर्मवाचक बनले असतील, ते शब्द तसेच ठेवावयाचे; व जेथें मुळींच शब्द प्रचारांत नसतील तेथें व नवीन शब्द पाडण्याच्या उपायाचा अवलंब करावयाचा. यासाठीं प्रथम मराठी भाषेमध्यें आजपर्यंत शास्त्रीय विषयावर कोणकोणते ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत ते पाहिले पाहिजेत. या पुस्तकांची नोंद आमची वाङ्मयसूची तयार केल्यामुळें आम्हांस मिळाली. त्याजबरोबर हेंहि लक्षांत बाळगिलें पाहिजे कीं, अलीकडे वीस-पंचवीस वर्षांत मराठीमध्यें शास्त्रीय स्वतंत्र अगर भाषांतररूपी ग्रंथ फार थोडे झाले असून बरेचसें शास्त्रीय विषयांवरील वाङ्मय लहान लहान लेखरूपानें निरनिराळ्या मासिक वगैरे नियतकालिकांतून प्रसिद्ध झालें आहे. याकरितां आपणांस ज्या शास्त्रीय विषयावरील संज्ञा पहावयाच्या आहेत त्या विषयावरील वाङ्मय कोणकोणत्या नियतकालिकांत कोठें सांपडेल हें पहाणें अवश्य आहे. हें वाङ्मय दाखविण्याचेंहि काम वाङ्मयसूचीनें केलें आहे. याप्रमाणें शास्त्रीय मराठी वाङ्मय कोठें उपलब्ध आहे हें कळण्यानंतर, तें सर्व वाङ्मय जमवून त्यांतील संज्ञा निवडण्याचें काम कार्यालयांत सुरू झालेलें आहे; व तें आमच्या कार्यक्रमाप्रमाणें ता. १ डिसेंबर १९१९ रोजी पूर्ण होईल.

ग्रंथाचें घोरण

आजपर्यंत ज्या निरनिराळ्या सूचना विचारांत घेतल्या त्यांवरून ग्रंथाचें घोरण पुढें दिल्याप्रमाणें आंखण्यांत आलें आहे.

सामान्यः— [१] माहिती समजण्यास सुलभ अशा तऱ्हेनें लिहिली जावी.

[२] माहिती महाराष्ट्राविषयीं सविस्तर, हिंदुस्थानची बरीचशी, आणि इतर देशांची संक्षेपानें द्यावयाची

[३] महत्त्वाच्या विषयांवर चांगला अभ्यास करूं पाहणारास अधिक माहिती होण्यासाठीं, आम्हांस आधारभूत अधिक अभ्यासास उपयोगी अशा ग्रंथांची माहिती लेखांतीं द्यावयाची.

[४] लेख होतां होईतों फार लांब लिहावयाचे नाहींत. आठ पृष्ठांपेक्षां अधिक लांबीचा लेख क्वचितच यावा.

[५] चित्रें देतांना पुस्तकसौंदर्यापेक्षा विषयाच्या फोडीकडे अधिक लक्ष पुरवावें. नकाशे, भूमितिविषयक आकृती, प्राणिशास्त्रावरील लेखाच्या स्पष्टीकरणासाठीं पशुपक्ष्यांचीं चित्रें अवश्य घालावींत.

[६] ज्या दिवशीं तह होईल त्या दिवसापर्यंतचा इतिहास ज्ञानकोशांत आणावयाचा, असें जगाच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक इतिहासाचें धोरण असावें

सांस्कृतिक-सांस्कृतिक भाग म्हणजे इतिहास, वाङ्मय, कलाकौशल्यें व लोकांची बौद्धिक प्रगति दाखविणारें तत्त्वज्ञान, यासंबंधाच्या धोरणाचीं मुख्य अंगें येणेंप्रमाणें:--

भारतीय संस्कृतीचें म्हणजे हिंदु संस्कृतीचें आणि हिंदुस्थानीय कलाकौशल्याचें विवेचन जितकें सविस्तर देतां येईल तितकें द्यावयाचें. हिंदुस्थानांत वेदकालापासून आजच्या प्रस्थानत्रयीपर्यंतचे जे अनेक विचारसंप्रदाय झाले त्यांची माहिती सविस्तर द्यावयाची. बौद्ध, जैन, लिंगायत, महानुभाव इत्यादि संप्रदायासंबंधानें तटस्थवृत्ति धारण करून लेख लिहिले जावे. निरनिराळ्या संप्रदायाचें मतें चुकीचीं कीं बरोबर याविषयीं विवेचन ज्ञानकोशकारांस कर्तव्य नाहीं. निरनिराळ्या संप्रदाच्या मतांचें स्पष्टीकरण करावयाचें. त्यांचें एकंदर भारतीय विचारौघांत स्थान स्पष्ट करावयाचें. संप्रदायाच्या संकोचाविषयीं जी कारणें घाटतील तीं द्यावयाचीं. वादविवाद संप्रदायांच्या मतांच्या सत्यासत्यविवेकासाठीं करावयाचा नसून फक्त अमक्या संप्रदायाचें अमुक एक मत आहे, काय येवढ्यापुरताच असा तर येऊं द्यावयाचा.

इतिहासविषयक लेखांत गतकालीन वास्तविक स्थिति जितकी ज्ञात असेल अगर तिजसंबंधानें जितकी माहिती आज संशयरहित असेल तितकीच द्यावयाची. गतकालासंबंधींचें सत्य आणि गतकालासंबंधानें समजूत यांचें पृथक्करण जितकें स्पष्ट होईल तितकें करावयाचें. ऐतिहासिक प्रश्नासंबंधानें नवीन शोध करण्याचें काम ज्ञानकोशकारांचें नाहीं. झालेला शोध, अगर शोधार्थ झालेला प्रयत्न यांचें एकीकरण करून तें सुलभतेनें वाचकांपुढें मांडावयाचें हेंच ज्ञानकोशाचें कार्य आहे.

आधुनिक सामाजिक परिस्थितीसंबंधानें जितकी माहिती जुळवून आज मांडतां येईल तितकी मांडण्याचा प्रयत्न करावा. याप्रमाणें नृत्य, व्यापार, जातींची माहिती यांविषयीं ग्रंथांत नसलेली माहिती गोळा करण्याचा थोडाबहुत प्रयत्न होत आहे [विशेष माहिती मागविली असतां मिळेल].

शास्त्रीय विषयांच्या लेखांचें सामान्य स्वरूप येणेंप्रमाणें:--

[१] शास्त्रावर सर्वसामान्य एक लेख येऊन त्या शास्त्रांत ज्या अनेक विषयांचें विवेचन होतें, त्या विषयांवर निराळे लेख यावे. जेथें शक्य असेल तेथें सर्वसामान्य वाचकांस लागणारा मजकूर आणि विशेष उपयोगी पडणारा मजकूर यांचें पृथक्करण केलें जावें व शक्य झाल्यास ते निरनिराळ्या टाईपांत द्यावे.

शब्द पाडावयाचा नाहीं. तर आज जे भाषेमध्यें शब्द रूढ झाले असतील अथवा पूर्वीच्या लेखकांनीं जे शब्द वापरले असून अन्वर्थक व शुद्ध असतील अगर प्रचारांत येऊन गेल्यामुळें यौगिक अर्थानें नसले तरी रूढार्थानें विशिष्ट गुणधर्मवाचक बनले असतील, ते शब्द तसेच ठेवावयाचे; व जेथें मुळींच शब्द प्रचारांत नसतील तेथें व नवीन शब्द पाडण्याच्या उपायाचा अवलंब करावयाचा. यासाठीं प्रथम मराठी भाषेमध्यें आजपर्यंत शास्त्रीय विषयांवर कोणकोणते ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत ते पाहिले पाहिजेत. या पुस्तकांची नोंद आमची वाङ्मयसूची तयार केल्यामुळें आम्हांस मिळाली. त्याजबरोबर हेंहि लक्षांत बाळगिलें पाहिजे कीं, अलीकडे वीस-पंचवीस वर्षांत मराठीमध्यें शास्त्रीय स्वतंत्र अगर भाषांतररूपी ग्रंथ फार थोडे झाले असून बरेचसें शास्त्रीय विषयांवरील वाङ्मय लहान लहान लेखरूपानें निरनिराळ्या मासिक वगैरे नियतकालिकांतून प्रसिद्ध झालें आहे. याकरितां आपणांस ज्या शास्त्रीय विषयावरील संज्ञा पहावयाच्या आहेत त्या विषयावरील वाङ्मय कोणकोणत्या नियतकालिकांत कोठें सांपडेल हें पहाणें अवश्य आहे. हें वाङ्मय दाखविण्याचेंहि काम वाङ्मयसूचीनें केलें आहे. याप्रमाणें शास्त्रीय मराठी वाङ्मय कोठें उपलब्ध आहे हें कळण्यानंतर, तें सर्व वाङ्मय जमवून त्यांतील संज्ञा निवडण्याचें काम कार्यालयांत सुरू झालेलें आहे; व तें आमच्या कार्यक्रमाप्रमाणें ता. १ डिसेंबर १९१९ रोजी पूर्ण होईल.

ग्रंथांचें घोरण

आजपर्यंत ज्या निरनिराळ्या सूचना विचारांत घेतल्या त्यांवरून ग्रंथांचें घोरण पुढें दिल्याप्रमाणें आंखण्यांत आलें आहे.

सामान्यः— [१] माहिती समजण्यास सुलभ अशा तऱ्हेनें लिहिली जावी.

[२] माहिती महाराष्ट्राविषयीं सविस्तर, हिंदुस्थानची बरीचशी, आणि इतर देशांची संक्षेपानें द्यावयाची

[३] महत्त्वाच्या विषयांवर चांगला अभ्यास करूं पाहणारास अधिक माहिती होण्यासाठीं, आम्हांस आधारभूत अधिक अभ्यासास उपयोगी अशा ग्रंथांची माहिती लेखांतीं द्यावयाची.

[४] लेख होतां होईतों फार लांब लिहावयाचे नाहींत. आठ पृष्ठांपेक्षां अधिक लांबींचा लेख क्वचितच यावा.

[५] चित्रें देतांना पुस्तकसौंदर्यापेक्षां विषयाच्या फोडीकडे अधिक लक्ष पुरवावें. नकाशे, भूमितिविषयक आकृती, प्राणिशास्त्रावरील लेखांच्या स्पष्टीकरणासाठीं पशुपक्ष्यांचीं चित्रें अवश्य घालावींत.

[६] ज्या दिवशीं तह होईल त्या दिवसापर्यंतचा इतिहास ज्ञानकोशांत आणावयाचा, असें जगाच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक इतिहासाचें धोरण असावें.

सांस्कृतिक-सांस्कृतिक भाग म्हणजे इतिहास, वाङ्मय, कलाकौशल्यें व लोकांची बौद्धिक प्रगति दाखविणारें तत्त्वज्ञान, यासंबंधाच्या धोरणाचीं मुख्य अंगें येणेंप्रमाणें:--

भारतीय संस्कृतीचें म्हणजे हिंदु संस्कृतीचें आणि हिंदुस्थानीय कलाकौशल्याचें विवेचन जितकें सविस्तर देतां येईल तितकें द्यावयाचें. हिंदुस्थानांत वेदकालापासून आजच्या प्रस्थानत्रयीपर्यंतचे जे अनेक विचारसंप्रदाय झाले त्यांची माहिती सविस्तर द्यावयाची. बौद्ध, जैन, लिंगायत, महानुभाव इत्यादि संप्रदायासंबंधानें तटस्थवृत्ति धारण रूरून लेख लिहिले जावे. निरनिराळ्या संप्रदायाचें मतें चुकीचीं कीं बरोबर याविषयीं विवेचन ज्ञानकोशकारांस कर्तव्य नाहीं. निरनिराळ्या संप्रदाच्या मतांचें स्पष्टीकरण करावयाचें. त्यांचें एकंदर भारतीय विचारौघांत स्थान स्पष्ट करावयाचें. संप्रदायाच्या संकोचाविषयीं जी कारणें घाटतील तीं द्यावयाचीं. वादविवाद संप्रदायांच्या मतांच्या सत्यासत्यविवेकासाठीं करावयाचा नसून फक्त अमक्या संप्रदायाचें अमुक एक मत आहे, काय येवढ्यापुरताच आला तर येऊं द्यावयाचा.

इतिहासविषयक लेखांत गतकालीन वास्तविक स्थिति जितकी ज्ञात असेल अगर तिजसंबंधानें जितकी माहिती आज संशयरहित असेल तितकीच द्यावयाची. गतकालासंबंधींचें सत्य आणि गतकालासंबंधानें समजूत यांचें पृथक्करण जितकें स्पष्ट होईल तितकें करावयाचें. ऐतिहासिक प्रश्नासंबंधानें नवीन शोध करण्याचें काम ज्ञानकोशकारांचें नाहीं. झालेला शोध, अगर शोधार्थ झालेला प्रयत्न यांचें एकीकरण करून तें सुलभतेनें वाचकांपुढें मांडावयाचें हेंच ज्ञानकोशाचें कार्य आहे.

आधुनिक सामाजिक परिस्थितीसंबंधानें जितकी माहिती जुळवून आज मांडतां येईल तितकी मांडण्याचा प्रयत्न करावा. याप्रमाणें नृत्य, व्यापार, जातींची माहिती यांविषयीं ग्रंथांत नसलेली माहिती गोळा करण्याचा थोडाबहुत प्रयत्न होत आहे [विशेष माहिती मागविली असतां मिळेल].

शास्त्रीय विषयांच्य लेखांचें सामान्य स्वरूप येणेंप्रमाणें:--

[१] शास्त्रावर सर्वसामान्य एक लेख येऊन त्या शास्त्रांत ज्या अनेक विषयांचें विवेचन होतें, त्या विषयांवर निराळे लेख यावे. जेथें शक्य असेल तेथें सर्वसामान्य वाचकांस लागणारा मजकूर आणि विशेष उपयोगी पडणारा मजकूर यांचें पृथक्करण केलें जावें व शक्य झाल्यास ते निरनिराळ्या टाईपांत द्यावे.

[२] नवीन पाडलेल्या संज्ञा ज्या परकीय भाषांच्या शब्दांचें रूपांतर असतील तेथें मराठी संज्ञेच्या शेजारींच कंसांत परकीय संज्ञा दिली जावी.

[३] ज्ञात वस्तूंच्या साहाय्यानें अज्ञात वस्तूंची माहिती करून द्यावयाची या अध्यापनशास्त्राच्या नियमानुसार असें करावयाचें कीं, शास्त्रीय विषयांची माहिती शास्त्रीय नांवाखालीं न देतां लोकपरिचित नांवाखालीं द्यावयाची; उदाहरणार्थ, माशी व विंचु या सदराखालीं प्राणिशास्त्रदृष्ट्या ज्या कुलांत अगर वंशांत हे प्राणी मोडतात त्या कुलांची व वंशांची माहिती दिली जावी.

[४] शास्त्रीय संज्ञा पूर्वीच्या लेखकांनीं वापरल्या असतील त्या द्यावयाच्या किंवा नाहीं, याचा विचार केल्याशिवाय नवीन संज्ञा वापरावयाच्या नाहींत. ज्ञानकोश पूर्वीच्या लेखकांनीं वापरलेल्या संज्ञांस बंद नाहीं; पण पूर्वीच्या लेखकांनीं वापरलेल्या संज्ञांचा विचार केल्याशिवाय नवीन संज्ञा द्यावयाच्यां नाहींत हें ध्येय समोर ठेवावें.

[५] एकाच शास्त्रावर [उदाहरणार्थ; ज्योतिष, संगीत, नृत्य, युद्धकला, वैद्यक, गणित, रसायन इत्यादि ज्ञानविषयावर] जर जुने भारतीय व अर्वाचीन यूरोपीय यांची विवेचनाची पद्धति भिन्न असेल तर जुनें आणि नवें या दोहोंसहि स्थान द्यावयाचें. पण त्यांची भेसळ होऊं द्यावयाची नाहीं.

[६] मंत्रशास्त्र, फलज्योतिष व अतींद्रिय ज्ञान देण्याचा दावा बाळगणाऱ्या "शास्त्रा" संबंधानें संपादकीय संशयवृत्ति ठेविली जाऊन, शास्त्रांच ग्रंथ व त्यांच्या वादांचें ऐतिहासिक विवेचन हीं दिलीं जावीं व त्या शास्त्रांच्या पुरस्कर्त्यांचा आग्रह काय आहे तो दिला जावा.

यशवंत रामकृष्ण दाते (बी. ए. एल्एल्. बी.)
संपादकीय कार्यव्यवस्थापक.

(परिशिष्ट नं. ११.)
ज्ञानकोशसंस्थेची संपत्ति व तिचें शिक्षणसंस्था व ज्ञानोत्पादक संस्था या दृष्टीनें अवलोकन.

[१।९।२० तारखेच्या अहवालांतील उतारा.]

ज्ञानकोश करतांना अत्यंत अवश्य अशींच पुस्तकें द्यावयाचीं असा नियम करून देखील बरींच पुस्तकें द्यावीं लागलीं आणि त्यामुळें एक महत्त्वाचा संग्रह तयार झाला. याची हिशोबी किंमत सुमारें रु. ५००० आहे. तथापि या संग्रहाचें महत्त्व तो ज्या पद्धतीनें व ज्या तत्त्वांवर तयार झाला त्यामुळें मोठें आहे. आपल्या हिताहिताच्या प्रश्नांविषयीं देशांत ज्ञानवृद्धि

व्हावी आणि सर्व प्रकारचें ज्ञान लोकांस व्हावें हा हेतु साध्य करण्यासाठीं बद्धपरिकर झालेल्या लोकांचा हा ग्रंथसंग्रह होय.

हा ग्रंथसंग्रह करण्यासाठीं आणि ज्ञानकोश तयार करण्याची अवश्य पायरी म्हणून 'महाराष्ट्रीय वाङ्मयसूचि' तयार करावी लागली. तिच्या कांहीं प्रती उरल्या आहेत.

ज्ञानकोश म्हणजे सर्व विषयांवरील वाङ्मय होय. ज्ञानकोशकारांचें मुख्य काम म्हणजे सर्व विषयांवरील उपलब्ध ज्ञानाचें संकलन करून तें थोडक्यांत व सुसंबद्ध रीतीनें मांडावयाचें. याच्याकरितां प्रथम तयारी म्हणजे ज्ञानक्षेत्राचें अवलोकन करणें ही होय. जगांत निरनिराळ्या विषयांवरील ज्ञानाची प्रगति कोठपर्यंत झाली आहे व कोणकोणत्या विषयांवरील ज्ञान जगापुढें मांडलें गेलें आहे याचें निरीक्षण करतांना आणि त्या निरीक्षणावर ज्ञानकोशाची रूपरेषा आखतांना आपणापुढें मुख्य गोष्ट जी येते ती ही कीं, जें ज्ञान आज ज्ञानकोशरूपानें महाराष्ट्रीय वाचकवर्गापुढें मराठींत मांडावयाचें आहे त्यापैकीं किती ज्ञानाचें क्षेत्र महाराष्ट्रीय वाङ्मयानें आक्रमण केलें आहे? हें क्षेत्र कळावें म्हणून ज्ञानकोशकारांनीं प्रथम महाराष्ट्रीय वाङ्मयसूचीचें काम हातीं घेऊन तें फारच अल्पावधींत संपविलें.

या वाङ्मयसूचीवरून आपणांस असें दिसून येईल कीं एकंदर ज्ञानक्षेत्राचा फारच थोडा अंश मराठी वाङ्मयानें व्यापिला आहे. ज्ञानक्षेत्राचें परीक्षण करण्याकरितां व मराठी वाङ्मयांतून उपलब्ध होणाऱ्या माहितींत भर टाकण्याकरितां इतर भाषांतील ग्रंथांकडे नजर टाकावी लागते. प्रमुख यूरोपीय भाषांतील ग्रंथांनीं किती ज्ञानांगावर प्रकाश पडला आहे हें पाहण्याकरितां ब्रिटिश म्युझियमच्या विषयवार, व यूरोपीय संस्कृत, प्राकृत, पाली, मराठी, गुजराथी इत्यादि भाषांतील कॅटलॉग मागवावे लागले.

संस्थेस स्वतःची ग्रंथशाला पूर्णपणें करतां येणें शक्य नाहीं. बरेचसे ग्रंथ फार किंमतीचे असल्यामुळें व ते मुंबई येथील रॉयल एशिआटिक सोसायटीच्या व कलकत्ता येथील इंपीरियल या लायब्ररीमध्यें मिळण्यासारखे असल्यामुळें त्यांचा तेथून आणून व उपयोग करण्यांत आला. फक्त अवश्य तेवढेच विकत घेण्यांत आले.

ज्ञानकोशकारांस स्वतःचा-विशेषतः वैदिक वगैरे ग्रंथांचा-संग्रह बराच वाढवावा लागला. आतांपर्यंत ज्ञानकोशाचा ग्रंथसंग्रह किती वाढला आहे याची कल्पना थोडक्यांत येथें देतों.

ज्ञानकोशग्रंथसंग्रह—वैदिक वाङ्मयांतर्ग्यें चारहि वेदांच्या संहिता, यजुर्वेदाच्या तैत्तिरीय शाखेशिवाय माध्यंदिन, काण्व, मैत्रायणीसंहिता, पंडितकृत वेदार्थयत्न, शुक्ल-कृष्ण यजुर्वेदासह सर्व संहितांचीं इंग्रजी भाषांतरें, सर्व वेदांच्या

पदानुक्रमणिका व मॅक्डोनेल आणि कीथ यांची वैदिकविषयसूचि इत्यादि ंथ प्रथम येतात. ब्राह्मणग्रंथांमध्ये ऐतरेय, तैत्तिरीय, शतपथ, शांखायन, सामविधान, षड्विंश, दैवत, गोपथ हीं प्रमुख आहेत. आरण्यक व उपनिषद्ग्रंथांमध्ये ऐतरेय व तैत्तिरीय आरण्यकें आणि ईशावास्य, केन, कठ, ऐतरेय, छांदोग्य, तैत्तिरीय, प्रश्न, वृहदारण्यक, माडुक्य, मुंडक, श्वेताश्वतर, गणेशाथर्वशीर्ष व नृसिंहपूर्वोत्तरतापनीय, उपनिषत्समुच्चय इत्यादिकांचा संग्रह आहे. श्रौतसूत्रांपैकीं आश्वलायन, द्राह्यायण, बौधायन शांखायन, सत्याषाढ इत्यादि सूत्रें व आधानपद्धति वगैरे ग्रंथ मिळविले आहेत, गृह्यसूत्रांत, आश्वलायन, गोभिलीय, शांखायन, पारस्कर, खादिर, सत्याषाढ, आपस्तम्ब, द्राह्यायण, व संस्काररत्नमाला हे ग्रंथ जमविले आहेत. वेदांगामध्यें शिक्षादिवेदषडंग, तैत्तिरीय प्रातिशाख्य-निरुक्त चरणव्यूह-बृहद्देवता इत्यादि ग्रंथ संगृहीत केले आहेत. यांखेरीज वेदाभ्यासविषयक ग्रंथांमध्यें ' ओरायन ', व्हिसिटिंयूडस ऑफ आर्यन सिव्हिलिझेशन, आर्योतिहास व भूगोल, आर्यगृहस्थिति-नीतिशौर्य व उन्नति, आर्यदेश व तत्संबंधी वृत्तान्त, आर्य लोक व त्यांचें बुद्धिवैभव, आर्य लोकांचें मूलस्थान, आर्यावर्तिक होम अँड इट्स आर्क्टिक कॉलनीज, प्रस्थानभेद इत्यादि ग्रंथ महत्त्वाचे आहेत.

स्मृति व धर्मशास्त्र या विषयावर स्मृतिसमुच्चय अष्टादशस्मृति, याज्ञवल्क्यस्मृति, स्मृतिकौतुभ, स्मृत्यर्थसार, गौतम, बौधायन इत्यादि धर्मसूत्रें आचारभूषण, आचारेन्दुशेखर, पितृमेधसूत्रें, द्वादशमयूख, दत्तकमीमांसा, दत्तकचंद्रिका, यतिधर्मसंग्रह, व्यवहार बाळंभट्टी इत्यादि अनेक ग्रंथ आहेत.

दर्शनें व वेदान्त या विषयावर षड्दर्शनचिंतनिका, सर्वदर्शनसंग्रह, पातजल. यागसूत्रें, अनेक भाष्यसहित ब्रह्मसूत्र, वेदान्तसूत्रें, खण्डनखंडखाद्य, जीवन्मुक्ति विवेक, जैमिनीय न्यायमाला, त्रिस्थलीसेतु, यतीन्द्रमतदीपिका-वाक्यवृत्तिः इत्यादि सुमारें ४५ ग्रंथ आहेत.

पुराणग्रंथांमध्यें रामायण, महाभारत व भागवत हीं मूळ व भाषांतरासह असून महाभारतासंबंधीं वर्णानुक्रमणी, विषयानुक्रमणी व सोरेन्सनची नामसूची हे ग्रंथ आहेत. याखेरीज अग्निपुराण, पद्मपुराण, ब्रह्मपुराण, मत्स्यपुराण वायुपुराण, विष्णुपुराण, सौरपुराण, नृसिंहपुराण, स्वयंभूपुराण, सूतसंहिता, वृहद्ब्रह्मसंहिता, जैमिनीय अश्वमेध इत्यादि अनेक पुराणग्रंथ असून त्यांस साहाय्यक असे कुरुयुद्धांतील भारतीय राष्ट्र, कलियुगांतील राजघराणीं, पुराणनिरीक्षण इत्यादि उपग्रंथ आहेत व जैन सांप्रदायिक आदिपुराण, उत्तरपुराण, महावीरपुराण, हरिवंशपुराण इत्यादि पुराणग्रंथ आहेत.

तांत्रिकवाङ्मयापैकीं तंत्राभिधान, षट्चक्रनिरूपण, प्रपंचसारतंत्र, कुलचूडामणितंत्र, काळीविलासतंत्र, श्रीचक्रसंभारतंत्र, राजतंत्र, महानिर्वाणतंत्र

ज्ञानार्णवतंत्र, तंत्रतत्त्व, तत्रांतील सृष्टयुत्पत्ति इत्यादि तंत्रग्रंथ आहेत.

वाङ्मयेतिहास या विषयावरील संग्रहांत-विशेषतः संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासावर-प्राचीन संस्कृत वाङ्मयाचा इतिहास-मॅक्समुल्लर; भारतीय वाङ्मयाचा इतिहास—वेबर, विंटरनित्झ [जर्मन आणि इंग्रजी]; सिंहली वाङ्मयाचा इतिहास—गायगर; संस्कृतटेक्स्ट—म्यूर; हे ग्रंथ मुख्य आहेत.

भाषा व व्याकरण या विषयावरील ग्रंथांत कानडी वाङ्मय, अंदमानी मॅन्युअल, खासी ग्रामर, चिनी मॅन्युअल, जपानी भाषा, द्राविड भाषा-प्राकृतप्रकाश, फ्रेंच व्याकरण, मराठी-बंगाली शिक्षक, अवेस्ता व्याकरण, वैदिक व्याकरण, पाणिनीय सूत्रसूची, परिभाषेन्दुशेखर, सुबन्त व तिङन्तविचार, पिशेलचें प्राकृत व्याकरण, तुलनात्मक भाषाशास्त्र, भाषाशास्त्र-संकृत व्याकरणपद्धति, सौराष्ट्रव्याकरण, नवीन मराठी व्याकरण इत्यादि ग्रंथ महत्त्वाचे आहेत.

याखेरीज कृषिशास्त्र, गणित व ज्योतिःशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, भूस्तर-शास्त्र, रसायनशास्त्र, मानसशास्त्र इत्यादि विषयांवर मराठींत उपलब्ध असलेले शक्य ते सर्व ग्रंथ मिळविले आहेत.

भरतखंडांतील बौद्ध, जैन इत्यादि संप्रदायविषयक ग्रंथांमध्यें जैनसंप्रदायी पुराणग्रंथांखेरीज इतर सुमारें १२ महत्त्वाचे ग्रंथ, बौद्ध वाङ्मयांपैकीं जातक कथा, बौद्धवाङ्मयेतिहास—विंटरनित्झ (जर्मन व इंग्लिश), बौद्धधर्म, बौद्धकला-बर्जेस, इत्यादि ग्रंथ व पारशी धर्मविषयक अवेस्ता भाषेंतील गेल्डनेर याचा मोठा ग्रंथ, अवेस्ता कोश, झेंद अवेस्ता-डार्मेस्टेटर, गाथा, वेन्दिदाद, यस्न वगैरे यांचे गुजराथी पाठ, जे. जे. मोदींकृत पारशी संस्कारावरील पुस्तकें मुसुलमानी कुराणाचें भाषांतर, ख्रिस्ती बायबल व मिशनविषयक ग्रंथ इत्यादिकांचा संग्रह केला आहे.

त्याप्रमाणेंच निरनिराळ्या जातींच्या माहितीवरील, सुमारें शंभरावर पुस्तकें जमविलीं आहेत.

इतिहास व भूवर्णन या विषयांमध्यें बाह्यदेशवर्णनात्मक ग्रंथ सुमारें ४० असून त्यांत हिरोडोटसचा ग्रंथ, मेरीव्हेलचें रोमन साम्राज्य यांसारखे महत्त्वाचे ग्रंथ आहेत. भरतखंडाच्या प्राचीन इतिहासाबद्दल व्हिन्सेंट स्मिथ, कृष्णस्वामी अय्यर, पार्गिटर भारतीय साम्राज्य, रॅप्सन यांचा नाण्यावरील ग्रंथ, गुप्त व अशोककालीन शिलालेख, मुजुमदार यांचा समाजस्थितीसंबंधी ग्रंथ इत्यादि महत्त्वाचे ग्रंथ असून, राजतरंगिणी, दिल्ली, धारचें प्राचीन वृत्त, नेपाळवर्णन, पल्लव, मध्यप्रान्त व वऱ्हाड यांमधील शिलालेख, मध्यप्रांत व वऱ्हाडचा इतिहास इत्यादि अनेक उपयुक्त ग्रंथ आहेत.

महाराष्ट्रेतिहास या विषयावर तर फारच महत्त्वाचा संग्रह जमविला आहे. यामध्यें बखरी, कागदपत्रें छापलेले ग्रंथ, राजवाडे यांचे साधनांचे खंड, निरनिराळ्या घराण्यांचे इतिहास, खरे, पारसनीस, यांनीं प्रसिद्ध केलेले व काव्येतिहाससंग्रह, इतिहाससंग्रह, इतिहास आणि ऐतिहासिक इत्यादि नियतकालिकांत प्रसिद्ध झालेले कागदपत्र शक्य तितके जमा केलेले आहेत.

अर्थशास्त्र व व्यापारविषयक सुमारें ३० मुख्य मुख्य ग्रंथ जमविले आहेत.

संदर्भग्रंथांमध्यें प्रथम एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका, एन्सायक्लोपीडिया ऑफ रिलिजन अँड एथिक्स, सायक्लोपिडिया ऑफ इंडिया, तेलगु एन्सायक्लोपीडिया, भरतखंडाचा अर्वाचीन कोश, हे मोठे कोश असून शब्दकोशांमध्यें मोल्स्वर्थ आणि कँडी, बाबा पदमनजी, रानडे यांचे इंग्रजी-मराठी व मराठी-इंग्रजी कोश, आपटे यांचे संस्कृत-इंग्रजी व इंग्रजी संस्कृत कोश, संस्कृत-प्राकृत कोश (गोडबोले), गीर्वाणलघुकोश, अमरकोश, हिंदीकोश, इंग्रजी-जर्मन व जर्मन-इंग्रजी कोश, सिंधीकोश, इंग्रजीकोश २, अवेस्ताकोश हे प्रमुख आहेत. त्यानंतर ब्रिटिशम्यूझियम, इंपीरियल लायब्ररी, रॉयलएशियाटिक लायब्ररी-मुंबई शाखा, व इतर अनेक कॅटलागांचा संग्रह केला आहे. १९११ च्या खानेसुमारीचे रिपोर्ट व इंपिरियल गॅझेटिअर हिंदुस्थानसरकारकडून मिळालेले आहेत. मुंबईइलाख्याचे डिस्ट्रिक्ट गॅझेटियर रा. बेदरकर वकील उमरावती यांनीं वापरावयास दिले आहेत. यांखेरीज प्रांतिक सरकारचे ॲडमिनीस्ट्रेशन रिपोर्ट दरवर्षी येत आहेत.

वरील ग्रंथांखेरीज विविध विषयांवरचे अनेक ग्रंथ कोशानें खरेदी केले आहेत. व अशा रीतीनें त्याचें ग्रंथभांडार फार उपयुक्त झालें आहे.

भुक्तोर्वरित—नंतर ज्या विषयांवर विशेषसे परिश्रम व आजपर्यंत न झाल्यामुळें फारसें वाङ्मय उपलब्ध नाहीं अशा विषयांची मांडणी करण्याकरितां पूर्व तयारी करावी लागली. उदाहरणार्थ ऋग्वेदांतील ऐतिहासिक व सामाजिक माहिती मिळविण्याकरितां सर्व ऋग्वेद संहितेचें पादशः पृथक्करण करावें लागलें. निरनिराळ्या वेदसंहितांच्या तुलना नव्यानेंच कराव्या लागल्या व ऐतिहासिक कागदपत्रांचेंहि पृथक्करण करण्याचें काम जोरानें चालू आहे. मराठी किंवा इंग्रजी भाषेंत वैदिक विषयांवर चांगलेसे ग्रंथ नसल्यामुळें कांहीं जर्मन ग्रंथांचीं भाषांतरें करावीं लागलीं व हीं भाषांतरें एकदम जर्मन भाषेतून मराठींत करणारे लेखक न मिळाल्यामुळें प्रथम जर्मनमधून इंग्रजींत व नंतर इंग्रजीमधून मराठींत याप्रमाणें काम करावें लागलें. असे बरेचसे ग्रंथ जर्मनमधून प्रथम इंग्रजींत आणून नंतर मराठींत उतरण्यांत आलें. त्याप्रमाणेंच अवेस्ता जाणणारा मराठीमध्यें लेख लिहून देण्यासारखा लेखक न मिळाल्या-

मुळें तेंहि बरेचसें काम आधिनमर्दक करावें लागतें व त्यासाठीं पूर्व तयारी म्हणून अवेस्ताव्याकरणाचें व अवेस्ताभाषेतील गाथा वगैरे कांहीं ग्रंथांचे मराठींत तर्जुमे करावे लागले.

तेव्हां याप्रमाणें अनेक प्रकारचें पूर्वतयारीच्या स्वरूपांचें साहित्य ज्ञानकोशकारांनां कार्यालयांत तयार करून घ्यावें लागतें आहे, ग्रंथसंग्रहहि बराच वाढवावा लागला आहे व ज्ञानकोश छापून झाल्यानंतर या पूर्वतयारीरूपी साहित्याचा प्रत्यक्ष ज्ञानकोशांत अंतर्भाव करणें अशक्य आहे. या भुक्तोर्वरितांचें पुढें काय करावयाचें व ज्ञानकोशाच्या ग्रंथसंग्रहांतील पुढें नीटपणें व्यवस्था कशी होईल याची तजवीज करणें हे प्रश्न ज्ञानकोशाच्या भागीदार वगैरे हितचिंतकांनीं आतांपासूनच विचारांत घेण्यासारखे आहेत. [हा संग्रह या वेळच्या ता आहे. त्यानंतर पुढें यांत अनेक पुस्तकांची भर पडत गेली आहे.]

भुक्तोर्वरितांचें स्वरूप—इतिहास लिहिण्यापूर्वी अनेक तऱ्हेची सामुग्री जुळवावी लागते. जेव्हां हें काम मंदपणानें चालतें तेव्हां जो काम करतो तो आपलें काम पुढच्यांस उपयोगी पडावें म्हणून छापून ठेवतो. उदाहरणार्थ, एका विशिष्ट प्रकारचे निरनिराळ्या ग्रंथांत आलेले शब्द. एक संशोधक तेवढेंच काम करून मोकळा होतो. फावल्या वेळांत जें संशोधन होतें त्याच्या अनेक पट संशोधन माणसें एका कामांतच पूर्णपणें गढलीं असतां व्हावयाचें. शिवाय हा कच्चा माल जो संशोधक छापून काढतो तो पुढें केव्हां तरी कोणीतरी संगतवार इतिहास लिहावा या इच्छेनें छापतो. ज्ञानकोशांत संगतवार माहिती द्यावयाची, फक्त निर्णय द्यावयाचे, पानहाळास फार वेळ नाहीं, अशी स्थिति असल्यामुळें पुष्कळ गोष्टींत चूक टाळण्यासाठीं संपूर्ण अवलोकन अगोदर करून मग संक्षेप द्यावा लागतो. किती परिश्रम केल्यानंतर आम्ही विशिष्ट ओळ लिहिली आहे याची कल्पना आमची पूर्व तयारी प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय होणें अशक्य आहे. आगि जितक्या मानानें ते परिश्रम लोकांस दिसणार नाहींत तितक्या मानानें आमच्या विद्वानांवर लोकांचा विश्वास बसणार नाहीं. यासाठीं जें संशोधन अगोदर होऊन मग निर्णय ज्ञानकोशांत समाविष्ट करण्यांत येतो तें संशोधन चिकित्सकांस अवश्य अशा संशयी दृष्टीनें लोकांनां तपासण्यास सुलभ जावें यासाठीं कांहीं प्रयत्नहि झाला पाहिजे. ज्ञानकोशाच्या कच्च्या मालाचें महत्त्व पंडितवर्गास थोर आहे. यार्चे स्वरूप दाखविण्यासाठीं यांपैकीं कांहीं मालाचें वर्णन दिलें पाहिजे.

(१) ऋग्वेदांतील प्रत्येक पादाचें तो पाद स्तुतिपर याचनापर किंवा ऐतिहासिक महत्त्वाचा आहे या दृष्टीनें झालेलें वर्गीकरण.

(२) चारहि वेदांच्या संहितांतील सर्व शब्दांचें विषयानुसार वर्गीकरण करतां यावें या हेतूनें प्रत्येक शब्दाच्या केलेल्या कार्डा १॥ लाखांवर.

(३) प्रत्येक जिल्ह्याचे शतकानुसार राज्यकर्ते दाखविणारें आणि स्थानिक इतिहास आणि विशिष्ट कालास पुरावा काय आहे तो दाखविणारें कोष्टक.

(४) तात्पुरत्या केलेल्या शकावल्या.

(५) पुराणांतील अनेक महत्त्वाच्या उल्लेखांची टांचणें.

हें सर्व साहित्य लोकांपुढें छापून बाहेर पडलें नाहीं तरी कोठें तरी सार्वजनिक ठिकाणीं सुरक्षित ठेवावें हें अवश्य आहे. ज्ञानकोश प्रसिद्ध झाल्यानंतर संस्था मोडावी किंवा कायम ठेवावी याचा विचार करतांना या मालाचा विचार करावा.

ज्ञानकोश विद्यापीठ—ज्ञानकोशाचें कार्यक्षेत्र फार विस्तृत असल्यामुळें अनेक लेखक निरनिराळ्या कार्याकरितां योजलेले असतात. या सर्व लेखकांमध्यें एकसूत्रीपणा रहावा व परस्परविचारविनियम व्हावा म्हणून " ज्ञानकोश विद्यापीठ " नांवाची संस्था स्थापन करावी लागली. ज्ञानकोशांतील सर्व लेखकवर्ग या सभेचे सभासद गणले जातात. या सभेची बैठक प्रत्येक पंधरवड्यास होते त्यावेळीं सर्वांनीं एकत्र जमून एकानें कांहीं तरी विषय विवेचनास घेऊन त्याला अनुसरून इतरांनीं संभाषणात्मक वादविवाद करावयाचा व आपल्या वाचनांत प्रस्तुत विषयासंबंधीं काय माहिती आली असेल ती सांगावयाची असा कार्यक्रम असतो. या संस्थेचीं अधिवेशनें नियमितपणें आतांपर्यंत चालत आलेलीं आहेत व मुख्य कार्य पुण्यास आल्यापासून वैदिक विषयांवर १०, ऐतिहासिक विषयांवर ३, भौतिक विषयांवर २, व इतर विषयांवर ५, अशीं व्याख्यानें झालीं. या सभेच्या योगानें ज्ञानकोशाच्या निरनिराळ्या संपादकीय खात्यांत कोणकोणतें काम चाललेलें आहे. व निरनिराळे लेखक कोणकोणती नवीन माहिती तयार करीत आहेत हें सर्व लेखकांस समजतें व एकमेकांच्या ज्ञानाचा परस्परांस फायदा मिळून लेखनाच्या कामास मदत होते.

समाजशास्त्रमंडळ—ज्ञानकोशाकरितां अशाच तऱ्हेचें दुसरें एक कार्य ज्ञानकोशांतील मंडळीसच पुढाकार घेऊन करावें लागलें; तें समाजशास्त्रमंडळाची स्थापना हें होय. या मंडळाचे डॉ. केतकर व रा. दाते हे चिटणीस असून त्यांत इतिहाससंशोधक रा. वि. का. राजवाडे, रा. द. वा. पोतदार, रा. शं रा. राजवाडे, सरदार खं. चिं. मेहेंदळे व रा. स. मा. दिवेकर हे सभासद आहेत. समाजशास्त्रीय विषयांवर मराठींत मुळींच वाङ्मय नसून इंग्रजींतहि फार थोडें आहे. तेव्हां या विषयाचा फारसा अभ्यासच इकडे झालेला नाहीं. याकरितां या मंडळामार्फत अभ्यासवर्ग तयार करणें व समाजशास्त्रीय वाङ्मयाचा मराठींत पाया घालणें या गोष्टी करावयाच्या आहेत व

र्‍यांचा ज्ञानकोशाच्या कामीं फार उपयोग होणार आहे हें निराळें सांगावयास नकोच. ही संस्था अर्थातच स्वतंत्र आहे व तिच्या सदस्यत्वाची फी रु. २५० आहे.

यशवंत रामकृष्ण दाते
संपादकीय कार्यव्यवस्थापक.

[ज्ञानकोश विद्यापीठ आणि समाजशास्त्रमंडळ या दोन्ही संस्था दोड-वर्षांवर टिकल्या नाहींत. ज्ञानकोशाच्या गिऱ्हाइकीच्या वाढीसाठीं डॉ. केतकर यांस पुष्कळ फिरावें लागलें तेव्हां या दोन्ही संस्थांकडे दुर्लक्ष करावें लागलें.]

(परिशिष्ट नं. १२)

पाध्ये यांचे आक्षेप.

ता. २४-१०-१९२० रोजीं शेहरहोल्डरांच्या साधारण सभेंत हिशेब तपासण्यास मुकरर केलेल्या आह्मां कमेटीदारांचा रिपोर्ट खालील प्रमाणें आहे:—

१ कंपनीच्या हुकुमाप्रमाणें ता. २६ माहे सप्टेंबर सन १९२० रोजीं मंडळाच्या भागीदारांच्या सभेंत मंजूर करण्याकरितां जो जमाखर्च, पुढें मांडला गेला होता, तो तपासून रिपोर्ट करणें आमचें काम आहे. ह्या जमा-खर्चांत मंडळाच्या संस्थापनेपासून ता. ३१ मार्च १९२० पर्यंतचा हिशेब आलेला आहे. जमाखर्चाचे कांहीं आंकडे दरसालचे आंकडे मिळवून झालेले आहेत; व कांहीं आंकडे एप्रिल १९१९ पासून १९२० पर्यंतचे आहेत. करितां भागी-दारांपुढें ठेवलेल्या पूर्ण ताळेबंदाबद्दल यथाप्रमाण रिपोर्ट करण्यापूर्वी, मागील सालच्या हिशेबबद्दा, हिशेबांतील रकमांची मंजूरी अथवा गैरमंजूरी दाख-विणारे डायरेक्टरांच्या सभेंतील ठराव, त्या हिशेबांच्या संबधानें ऑडिटरनें केलेले रिपोर्ट, व्हौचरच्या फायली व इतर वेळोवेळीं लागणारे कागद आह्मांस देण्याविषयीं विनंति केली पण ती कंपनीच्या चालकांनीं मान्य केली नाहीं. डायरेक्टरांच्या प्रोसिडिंग संबंधीं कांहीं सुटीं टिपणें, अव्वल-पासूनची खतावणी, १९१९-२० सालचा रोजनामा व व्हौचर फायली (१९-२०) येवढेच कागद आजपर्यंतच्या खटपटीनें मिळाले. हिशेब व मागील मिनीट बुकें, पत्रव्यवहार वगैरे कागद न दाखवितां **प्राक्झींच्या बळावर** आंकड्यांची जंत्री पास करून घेण्याविषयीं सुरवातीपासून अखेरपर्यंत मॅनेजर यांनीं जो हट्ट दाखविला, तो २४ आणि २६ तारखेच्या सभेंत भागीदारांनीं

व्यक्त केलेच्या इच्छेच्या व ठरावाच्या विरुद्ध असतांहि त्यांनीं पुष्कळ अंशीं तडीस नेला आहे. हल्लींचे चेअरमन डॉ. खरे ह्यांनीं कांहीं बाबतींत औदार्य दाखविलें नसतें तर आह्मांस हल्लींचा तुटपुंजा रिपोर्टहि करतां आला नसता. हिशेब पाहण्यास सुरवात केली तेव्हां पहिले दोन दिवस कंपनीचे हिशेब-नवीस रा. टिळक ह्यांनीं मोकळ्या मनानें हिशेब समजावण्याची व आंकडेमोड करण्याविषयींची तसदी घेतली. रा० टिळक ह्यांनीं हिशेब व्यवस्थित लिहिले आहेत व त्यांस दोन दिवसांनंतर त्यांच्या लगतच्या वरीष्ठांपासून उलट हुकूम न मिळता,तर सर्व हिशेब त्यांच्या साहाय्यानें अखेरपर्यंत समजणें सुलभ झालें असतें. कंपनीनें ठेवलेल्या हिशेबांत अथवा व्हौचरफायलींमध्यें स्वरूपाची चूक नसून–म्हणजे लेखकाची चूक नसून—पद्धतीची चूक आहे. तिचा उल्लेख आह्मी पुढें करणार आहोंत. कंपनीचे कागदपत्र मोकळ्या मनानें कंपनीच्या चालकांनीं आमच्यापुढें न ठेवल्यामुळें आम्हांस हिशेब तपासण्याचें समाधान झाल नाहीं व आपल्यास समाधानकारक रिपोर्ट सादर करतां आला नाहीं, यांत आमचा नाइलाज आहे.

आक्षेप नं. १

२ कंपनीच्या कायद्यानें आंखून दिलेल्या नक्षाप्रमाणें किंवा होतां होईल तों त्यांचेजवळ येणाऱ्या नक्षाप्रमाणें खुलासेवार ताळेबंद ठेविला असतां तर भागीदारांच्या पुढें पुष्कळ तपशील आला असता. पण हल्लींचा ताळेबंद इतका संक्षिप्त व संदिग्ध भाषेंत लिहिला आहे कीं त्याचा अर्थ वाचणारास समजत नाहीं; करितां हा ताळेबंद कायद्याप्रमाणें नाहीं असा आमचा पहिला आक्षेप आहे.

उदाहरणार्थ, 'कर्ज', 'ठेव' , 'तसलमात जमा' , 'मिस् कोहन भाड्यासाठीं', 'तसलमात नांवें', 'व्याज दिलेलें', 'मिळालेलें व्याज', 'सादीलछपाई' वगैरे उल्लेख अर्थाचा खुलासा करणारे नाहींत. आंकड्यांवर टीपा देऊन रकमा कमी अधिक झाल्याविषयीं निराळा खुलासाहि भागीदारांपुढें मांडलेल्या ताळेबंदास जोडून दिलेला नाहीं. ताळेबंदासंबंधानें आंकड्यांचा व तपशीलांचा समज करून घेण्यासाठीं कांहीं भागीदारांनीं खतावणी व रोजखर्डा वगैरे अवश्य कागद ता. २६ । ९ । २० रोजीं मागाविले होते ते कंपनीच्या ऑफिसांत

आक्षेप नं. २

नव्हते म्हणून ता. २४ ची सभा मुद्दाम भरविली होती, व त्या सभेच्या पूर्वी भागीदारांनीं काढलेल्या शंका समाधान करण्याचीं अवश्य साधनें देण्याविषयीं ठरविलें गेलें असतांहि वेळींच कागदपत्र न दाखविल्यामुळें आमची हिशेब तपासणारी कमेटी मुकरर केली गेली आहे. इतकें असूनहि अशा अधिकृत कमेटीस वाटेल तो खुलासा आणि पडताळा पहाण्यास कंपनीचे कागदपत्र पाहण्यास मनाई झाली असावी हें योग्य आहे किंवा नाहीं ह्याचा भागीदारांनीं विचार करावा.

पर दिलेल्या ताळेबंदांतील शब्द आणि वाक्यें कशीं सन्दिग्ध आहेत तीं पहा—

१ 'कर्ज' रु. २५०० काढलेलें दिसतें, पण हें काढण्याची आवश्यकता, व्याजाचा दर, कोणापासून काढलें वगैरे कांहीं खुलासा ताळेबंदावरून किंवा डायरेक्टरांच्या रिपोर्टावरून कळत नाहीं.

२ 'ठेव' लोकांच्या ठेवी ठेवणें अथवा लोकांस रकमा कर्जाऊ देणें, हें ज्ञानकोश मंडळाच्या कार्यक्षेत्राबाहेर आहे असें आम्हांस वाटतें. करितां एखाद्या बाईची ठेव ठेवून तिला त्यावर व्याज देणें ह्यासाठीं डायरेक्टरांनीं विशेष ठराव केले असल्यास अथवा कंपनीच्या हेतुक्षेत्रांत बदल केला असल्यास त्याचा खुलासा झाला नाहीं. ठेवीची रकम कोणाची व काय व्याजानें आहे हें अर्थात ताळेबंदावरून कळत नाहीं. आक्षेप नं. ३

३ 'तसलमात जमा' आणि तसलमात नावें' ह्या शब्दांवरून होणारा बोध ह्या सदराखालील हिशेबांच्या वस्तुस्थितीस धरून नाहीं. हिशेब वह्यांवरून पाहिलें असतां असें दिसतें कीं, कंपनीच्या पैशाचा उपयोग कंपनीचे मॅनेजर डॉ. केतकर, आणि त्यांच्या हाताखालील लोक ह्यांच्या कांहीं काळ तरी खाजगीकडे होत असतो. त्यास डायरेक्टरांनीं मंजुरी दिली असल्यास ती अर्थात आम्हांस उपलब्ध नाहीं. कंपनीच्या नौकरांच्या पगार-खात्याशिवाय हीं खातीं निराळीं आहेत, हें सांगण्यास नकोच. इतकेंच नव्हे तर खुद्द डॉ. केतकर ह्यांचें खाजगीचें खातें ह्याशिवाय वेगळें आहे. असें असून सर्वसामान्य तसलमात खात्यांत डॉ. केतकर ह्यांच्याकडे पडलेल्या खाजगी रकमांची जमा व नावें आहेत. ह्या तसलमात खात्याविषयीं विशेष ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट अशी आहे कीं, अनेक लोकांची जमा व नावें एकाच खात्यांत तसलमात आहेत. आक्षेप नं. ४

हा हिशेब महाजनी पद्धतीस सोडून आहे असें आमचें मत आहे. विवक्षित इसमाकडे किती येणें आहे हें या खतावणीवरून ह्या तसलमाती पद्धतीमुळें स्पष्ट होऊं शकत नाहीं. आक्षेप नं. ५

"मिस् कोहनभाड्यासाठीं ६९७ रु." ही रकम मिस् कोहन यांस दिली आहे असें दिसतें. पण ती त्यांनां विलायतेंतील घराच्या भाड्यासाठीं अथवा इकडे येण्यासाठीं वगैरे खुलासा ताळेबंदावरून होत नाहीं. पण ती रकम त्यांनां कायमची दिली किंवा कांहीं वेळांकरितां दिली व तिला डायरेक्टरांची मंजुरी आहे किंवा नाहीं कळत नाहीं. बाकीच्या सन्दिग्ध सदरासंबंधानेंहि असेंच म्हणतां येईल, परंतु इतकेंच पुरे.

४ कंपनीच्या कायद्यानें घालून दिलेल्या नक्षापासून भिन्न तऱ्हेचा ताळेबंद केल्यामुळें एवढाच घोंटाळा झाला आहे असें नव्हे, स्टॉक इन ट्रेड आक्षेप नं. ६

अथवा कंपनीच्या कारखान्यांत तयार असलेला माल हें सदर ताळेबंदांतून अजीबात गाळलें आहे. ह्यामुळें चार वर्षांच्या अखेर ताळेबंदांतील अखेर तारखेपर्यंत कंपनीच्या हातीं किती किंमतीचा माल आहे हें समजण्यास साधन नाहीं. स्टॉकबुक आहे कां विचारलें असतां तें दाखविलें गेलें नाहीं.

(१) मिस कोहन ह्यांच्याकडून भाषांतर झालेलीं पुस्तकें.

(२) कंपनीने वाङ्मय सूची नांवाच्या काढलेल्या पुस्तकाच्या कॉप्या.

(३) मिस् कोहनशिवाय इतर सुप्रसिद्ध लेखकांकडून मोबदला देऊन मिळविलेले लेख.

४ आजपर्यंतचा तयार झालेला ज्ञानकोश हा स्टॉक इन ट्रेड या सदराखालीं दाखविला जाणें जरूर होतें असें आम्हांस वाटतें.

ता. २४ आणि २६ च्या डॉ. केतकर यांच्या भाषणांत वारंवार अशी विधानें येत कीं, बॅलन्सशीट आडीटरानें तपासून कायदेशीर सर्टीफिकीट दिलें आहे, त्याच्या पलीकडे जाणें शेअरहोल्डरांचें काम नव्हे. आमच्या मतें ही समजूत चुकीची आहे. कंपनीस वाटेल ते हिशेब वाटेल त्या रीतीनें तपासून समाधान करून घेण्याचा अधिकार आहे व तो कसा योग्य आहे हें खालील मोक्या विवेचनावरून समजेल.

५ ऑडिटरांनीं रोजखर्डा खतावणी व व्हौचर्स ह्यांवर केलेल्या उद्या पेन्सिलीच्या खुणांवरून सर्व व्हौचर्स व हिशेब तपासले पाहिजेत असें वर वर पहाणारांचा समज होतो. परंतु हा भ्रम आहे. ताळेबंदाच्या शेवटीं दिलेल्या सर्टीफिकीटावरून हिशेबाच्या संबंधीं ऑडिटरांनी निराळ्या उजराचा रिपोर्ट दिला आहे असें दिसत नाहीं करितां हिशेबांत त्यांचा कांहीं उजर नाहीं असें धरून पुढील शेरे आहेत.

व्हौचर फायलींतील व्हौचर्स ह्यांस व्हौचर्स म्हणतां येणार नाहीं. अशीं अनेक चिठोरीं आहेत. उदाहरणार्थ, रक्कम देणाऱ्यानें दिलेली 'चिठी रक्कम घेणाऱ्याची पावती होऊं शकत नाहीं, किंवा खर्च करणाऱ्यानें अमुक खर्च केला असें लिहून दिलें म्हणजे त्या चिठीस व्हौचरचें स्वरूप येत नाहीं. अशा अनेक बेतपाशिली व बेकायदेशीर चिठ्या व्हौचर म्हणून पास केल्या गेल्या आहेत असें म्हणणें भाग पडतें.

आक्षेप नं. ७

आडिटरांपुढें कायद्याप्रमाणें ठेवणें अवश्य असलेलें डायरेक्टरांचें मिनिटबुकच ठेवलें नसल्याचा उजर न करितां त्यांनीं हिशेब कसा तपासला हें समजत नाहीं. कंपनीच्या कायद्याचें कलम ८३ व रूल ७५ टेबल ए प्रमाणें कंपनीनें पुस्तकें ठेवलेलीं नाहींत असा उजर करणें ऑडीटरांचें काम होतें. असे कांहीं खर्च आहेत कीं, जे कंपनीच्या मॅनेजरानें करणें आम्हांस वाजवी वाटत नाहीं परंतु मॅनेजरास कंपनीच्या डायरेक्टरांनीं कोणते खर्च व किती मिती

आक्षेप नं. ८

नेमणूक करण्याची परवानगी दिली आहे हें समजण्याचें साधन जें मिनीटबुक तेंच आम्हांस उपलब्ध नसल्यामुळें खर्च गैर कायदेशीर आहे म्हणतां येत नाहीं, व कायदेशीर आहे असेंहि म्हणतां येत नाहीं. पण मॅनेजरानें कोणा-सहि कंपनीच्या पैशांतून बक्षिसें देऊन आपलें औदार्य दाखविणें विशेष मंजूरीवांचून अयोग्य आहे असें आम्हांस वाटतें. शेअर-होल्डर यांच्या नजरेस आणण्याजोग्या अनेक गोष्टींपैकीं एक गोष्ट अशी आहे कीं, मॅनेजरानें केलेला खर्च स्वतःच मंजूर करण्याची वहिवाट व्हौचरावरून दिसते. बोर्ड ऑफ डायरेक्टरांची मंजूरी आहे किंवा नाहीं दिसत नाहीं पण ही मोठी तत्त्वाची चूक आहे हें नमूद करणें कमिटीस अवश्य वाटतें.

५ आम्ही पुढें ज्या दोन व्यवहाराबद्दल उजर करीत आहोंत त्याचा डॉ० केतकर ह्यांच्याशीं प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंध येत असल्यामुळें कंपनींचीं प्रोसिडींग बुकें व इतर कागदपत्रें शेअरहोल्डरांपुढें न मांडण्याचा डॉ० केतकर ह्यांनीं धरलेला हट्ट नाजुक व अस्थानी होता असें म्हणणें भाग आहे. कागद-पत्र पुढें नसल्यामुळें फक्त शंका आणि संशय पुढें मांडणें कमिटीस भाग पडत आहे त्यास आमचा नाइलाज आहे.

सौ. शीलवतीबाई केतकर ह्या लग्न होण्यापूर्वी इंग्लंडहून हिंदुस्थानास येण्यास लढाईसंबंधीं प्रतिबंध गेल्यावर निघाल्या, तेव्हांपासून त्यांस अडीचशें रुपये दरमहा वेतन देण्याची सुरवात झाली व येण्याच्या भाड्याच्या खर्चा-चीहि तजवीज केली गेली ! असें ता. ८-१०-२० च्या सेक्रेटरीच्या कार्डा-वरून कळतें. ही तजवीज म्हणजे ६९७ रु. त्यांस दिले गेले. ही रक्कम त्यांस कांहीं दिवसांकरितां दिली गेली आहे किंवा कसें याचा निश्चय ताळेबंदांतील वाक्यरचनेवरून होत नाहीं. ताळेबंदांत ती खर्ची रक्कम नसून आगाऊ दिसते पण कार्डावरून दुसरा अर्थ निघतो. अधिक निश्चय करण्यास साधन नाहीं. कंपनी व श्री कोहनबाई ह्यांच्यामध्यें झालेले करारमदार डॉ. केतकर ह्यांच्या मार्फत झालेले आहेत. हा पत्रव्यवहार शेअरहोल्डरांपुढें मांडीपर्यंत त्यांचें ह्या बाबतींत समाधान होणें कठीण जाईल. आक्षेप नं. ९

ज्ञानकोशाच्या कार्यारंभापूर्वीपासून मिस कोहन यांस विन्टर-निट्झच्या जर्मन ग्रंथाचें भाषांतर करण्याचें डॉ.केतकर यांनीं ठरविलें असें ता. ८।१०।२० च्या रा. गो. चिं. तांबे यांच्या कार्डावरून दिसतें. परंतु मंड-ळानें हें ठरवीपर्यंत डॉ. केतकर यांस याविषयीं ठराव कसा करतां आला व पुढें त्यांचा मंडळाशी कसा परिचय झाला वगैरे अनेक गोष्टींचा खुलासा लागत नाहीं. कार्डामुळें अनेक शंका उत्पन्न होतात. समाधान रा. तांबे व कंपनीच्या कागदांनीं केलें पाहिजे.

डायरेक्टरांच्या सभेच्या कारवाईचीं टिपणें (Notes) [मिनिट बुक नव्हे] दाखविण्याची ज्ञानकोशमंडळ ह्यांचे चेअरमन यांनी मेहेरबानी केल्यामुळें त्यावरून असें दिसतें कीं, मिस कोहन यांनीं एका पौंडास १५ पानें या भावानें विंटरनिट्झ या जर्मन ग्रंथकाराचा संस्कृत वाङ्मयाचा इतिहास भाषांतर रूपानें लिहिला त्याची प्रथमावृत्ति काढण्याचा हक्क सौ० शिलवतीबाईस कांहीं मोबदला न घेतां ता. २०-७-२० रोजीं बहाल केला आहे. भाषांतरास आलेला खर्च तरी बाईपासून परत घेणें कंपनीच्या हितदृष्टीनें रास्त झालें असतें. शिवाय अशा रीतीनें कंपनीची मालमत्ता फरोक्त करण्याचा डायरेक्टर ह्यांच्या अधिकारांतील गोष्ट आहे किंवा नाहीं हा प्रश्न निराळाच आहे. निदान कंपनीस कर्ज काढावें लागत आहे, अशा प्रसंगींच्या व्यवहारांतील डायरेक्टरांचें औदार्य अप्रासंगिक आहे असें या कमिटीचें मत आहे.

आक्षेप नं. १०

६ ताळेबंदाच्या सालीं संपादकीय खर्चासाठीं १४५११ रुपये खर्च झाले आहेत. पैकीं २५२६ रुपये मिस कोहन यांच्या कामाचा मुघाहिरा आहे; व ६९७ चा प्रवासखर्च अर्थात याशिवाय आहे. या रकमेच्या तपसीलापैकीं दुसरी मोठी रक्कम डॉ. केतकर याचा पगार ३६७१ होय. यांत मॅनेजर (डॉ. केतकर) या नात्यानें मिळालेले १२०० रुपये धरले आहेत. म्हणजे डॉ. केतकर आणि त्यांच्या सहधर्मचारिणी यांस ताळेबंदाच्या सालीं ६८९४ रुपये मिळाले. यांमध्यें डॉ. साहेब यांचा प्रवास व इतर खर्च आला नाहीं हा निरनिराळ्या खात्यांवर वांटून दिला असल्यामुळें कमिटीस एकत्र करितां आला

याप्रमाण व्यापक खर्चापकी, मोठा भाग डॉ. केतकर यांस प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीनें मिळत असतांहि प्रस्तुतच्या डायरेक्टरांनीं डॉक्टर यांस मिळत असलेला ३०० रु. चा दरमहा १२५ रुपयांनीं वाढविला आहे आणि या बढतीबद्दल भागीदारांची मंजुरी मागितली जात आहे.

(अ) डॉ. साहेबांचा दरमहा ३०० रुपये पगार ठरला होता तो ज्ञानकोश पुरा बाहेर पडल्यापर्यंतचा ठरला होता. कंपनीच्या सुरवातीस डॉ. यांनीं कंपनीचें काम अनन्य दृष्टीनें करण्याचें कबूल केलें होतें. निदान कंपनीकडे नोकर राहून आपला वेळ आणि बुद्धि दुसऱ्या अनेक कामांकडे खर्च करण्याविषयीं डॉ. साहेबांनी परवानगी घेतली असल्याचें आम्हांस उपलब्ध कागदपत्रावरून दिसत नाहीं. दुसरीं अनेक कामें करण्याविषयीं डायरेक्टरांनीं परवानगी दिली असल्यास ती कंपनीचें मिनिटबुक नसल्यामुळें सांगतां येत नाहीं. परंतु कमिटीस असें वाटत आहे कीं, ज्ञानकोशाचें--अनन्यदृष्टीनें तो संपेपर्यंत काम करणें हें त्यांचें कर्तव्य होतें. पण तें त्यांनीं केलें नाहीं असें म्हणावें लागतें. डॉ. केतकर हे खालील संस्थांचे मुख्य चालक आहेत.

१ डॉ. केतकर ह्यांची बँक ही ज्ञानकोश मंडळाच्या रजीस्टर्ड आफीसाच्या वरच्या मजल्यावर आहे.

२ विद्यामंदिर हेंहि ज्ञानकोशमंडळाच्या आफीसाच्या वरील मजल्यावर आहे.

३. चातुर्वण्य संस्कारपीठ हें डॉक्टर साहेबांबरोबर पुण्यास गेलें.

४. समाजशास्त्र शाळा. पुणें येथें.

५. स्त्रीकर्म सदन–सौ. शिलवतीबाईंनीं हें नुकतेंच पुण्यास काढलें असून याच्या रचनेकडे डॉ. केतकर यांचें तूर्त विशेष लक्ष आहे.

सारांश, ज्ञानकोशमंडळाशिवाय डॉ. केतकरांच्या तनमनधनास व्यग्र करणारे पांच उद्योग आहेत. हें कारण डॉ. साहेब ह्यांचे वेतन वाढविण्यास योग्य नसून त्यांचें वेतन कमी करण्यास योग्य आहे, असें कमिटीचें मत आहे. डॉ. केतकर ह्यांनीं प्रसिद्ध केलेल्या अंदाजाप्रमाणें ज्ञानकोशाची प्रेसकॉपी १९२० च्या डिसेंबरांत तयार व्हावयाची होती. असें अनेक प्रसिद्धीपत्रें पाहून दिसतें. परंतु ती तशी तयार न होण्याचें कारण कमिटीच्या मतें त्यांचें कार्यबाहुल्य होय. कारणें कांहीं असोत, स्वतःच्या अंदाजाप्रमाणें ठरलेलें काम तयार न होणें हें पगार वाढण्यास योग्य कारण नाहीं.

कंपनीचें भांडवल वाढवावें लागलें यांचें कारण ज्ञानकोशाचें काम डॉ. केतकर ह्यांच्या हातून अंदाजलेल्या रकमेंत उरकण्याचें दिसेना म्हणून होय. परंतु हें कारण डॉ. केतकर यांचा पगार वाढविण्यास योग्य नाहीं. कंपनीचें भांडवल वाढविलें तरी कंपनीचें मुख्य काम वाढलें नाहीं. पैसे जमा करण्याचा खर्च वाढेल; परंतु ह्यामुळें ज्ञानकोशाचें काम वाढलें म्हणतां यावयाचें नाहीं. ७२५ शब्दांचें एकएक पान ह्याप्रमाणें १०००० पानें ज्ञानकोशाचीं व्हावयाचीं; त्यांत वाढ करण्याचें डायरेक्टरांनीं ठरविलें असल्यास माहिती नाहीं.

सारांश कोणत्याहि दृष्टीनें खुद्द डॉ. केतकर यांचा पगार वाढविण्यास सबळ कारण हिशेबाकडे व कामाकडे पाहतां दिसत नाहीं.

७. डॉ. केतकर ह्यांनीं खुद्द नागपुरांत स्वतःच्या दोन संस्था–केतकर ह्यांची बँक व विद्यामंदिर अशा ठेविल्या आहेत–व $\frac{2}{9}$ घराचें भाडें डॉ. केतकर देत असतात. ह्यावरून त्यांचा या बाबतींत निःपक्षपातीपणा उघड दिसतो. परंतु डॉ. केतकर यांचा नागपुरांत व महाराष्ट्रांत प्रवास होतो त्याचा खर्च ते सहाहि संस्थांवर वांटून देतात असें दिसत नाहीं. ज्ञानकोशाच्या कामाकरितां ते प्रवास करितात तेव्हां ते बाकीच्या कोणत्याहि संस्थेचीं कामें करीत नाहींत, किंवा त्या संस्थेबद्दल प्रवास करितात त्यावेळीं ते ज्ञानकोशाचें काम करीत नाहींत, असा तर्क काढणें स्थितीविरुद्ध होईल असें वाटतें. करितां त्यांच्या

प्रवासाचा खर्च ह्या सर्व संस्थांवर सारखा कां वांटला जाऊं नये ह्याचा भागीदारांनींच विचार करावा.

८. ज्ञानकोशाचीं हल्लीं तीन ऑफीसें आहेत; नागपुर, मुंबई व पुणें. पैकीं पुण्यास ज्ञानकोश आफीसमध्यें कांहीं लेखक नोकर ठेवून काम चालविलें आहे असें दिसतें. पुण्याच्या मंडळीस जाण्यायेण्यास सोईचें स्थान ह्याशिवाय ज्ञानकोशास मुंबई ऑफीसची जरूरी नाहीं असें वाटतें. ऑफीसें अधिक राहिल्यास कोर्टाच्या अधिकारासंबंधीं कदाचित भानगडी उपस्थित होतील.

९. ज्ञानकोशाचीं वेळोवेळीं प्रसिद्धपत्रकें बाहेर आलीं यावरून अंतस्थ खरी माहिती नसणाऱ्या माणसाची कल्पना होण्याचा संभव आहे कीं, ज्ञानकोश हा महाराष्ट्रांतील प्रसिद्ध विद्वान मंडळाचा समुच्चयच आहे.

ज्ञानकोशमंडळाचें काम महाराष्ट्रांतील निरनिराळ्या विद्वानांच्या सल्ल्यानें आणि लेखकसाहाय्यानें चाललें आहे असा समज १९१७-१८ चा 'संपादकीय अहवाल' तसेंच ३१-३-१७, ४-१०-१७, व ११-१०-१७ च्या प्रसिद्धीपत्रकांवरून होतो. ज्या निरनिराळ्या तज्ज्ञांचें ज्ञानसाहाय्य ज्ञानकोशांत येणाऱ्या नानाविषयांत मिळणार होतें त्यांचीं नावें त्यांच्या अधिकारासह व किताबासह या पत्रकांतून वाचून महाराष्ट्रीयांचा ग्रह ज्ञानकोशाबद्दल अत्यंत अनुकूल होऊन ते शेअर घेण्यास अथवा वर्गणीदार होण्यास कान्हेरांच्या सांगण्यावरून तयार होतात. परंतु निरनिराळ्या विद्वानांकडून ज्ञानकोशास आजपर्यंत काय लेखनसाहाय्य झालें यांचा आम्हीं १४५५१ रुपयांच्या संपादकीय खर्चाच्या एका सालच्या तपशिलावरून निश्चित करण्याचा प्रयत्न केला. यावरून महाराष्ट्रांतील विद्वानांच्या वांट्यास संपादकीय खर्चापैकीं फार थोडा भाग-म्हणजे तो नमूद करण्याजोगाच नाहीं-आला असावा असें दिसतें. १४५५१ पैकीं जवळजवळ ६००० रु डॉ. केतकरांच्या विद्वान दांपत्याच्या पदरीं पडले असून बाकीची रक्कम पुणें येथील आफीसांत काम करणाऱ्या १०-१२ पदवीधरांवर खर्च होत आहे. या खर्चापैकीं १०० रु. रा. यशवंतराव दाते बी. ए. एल्एल्. बी. या गृहस्थांस मिळत असून बाकीच्या सुमारें १० पदवीधरांच्या वांटयांस ५०-५५ रुपयांपेक्षां अधिक मासिकवृत्ति येत नाहीं. हे पदवीधर फार नवीन; नुकतेच कॉलेजांतून बाहेर पडलेले असले पाहिजेत; नाहींपेक्षां डॉ. केतकर आणि त्यांच्या पत्नी यांच्या मासिकवृत्तीच्या मानानें त्यांस इतकी कमी वृत्ति ज्ञानकोशमंडळाच्या मुख्य चालकांनीं दिली नसती. या रीतीनें ऑफीसांत बच्चा मंडळीकडून झालेला ज्ञानकोश अखेरपर्यंत कच्चा राहील अशी भीति वाटतें. कंपनीनें ५०,००० चें एक लक्ष भांडवल केलें तरी महाराष्ट्रीय विद्वान मंडळाचें भपक्याकरितां प्रथम दाखविलेलें साहाय्य ज्ञानकोशमंडळाच्या पदरांत पडूं नये, ही ज्ञानकोशाची फारच मोठी हानि झाली

आहे असें कमिटीचें मत आहे. स्टॉकबुक किंवा लेख पाहण्याची संधि न दिल्यामुळें ज्ञानकोशाचें हल्लीं होत असलेलें काम टाकाऊ आहे कीं विकाऊ आहे याविषयीं कांहीं लिहितां येत नाहीं. डॉ. यांनीं एक म्हाल्यूम येथें आणला होता पण तो लागलीच परत नेला.

१९१७--१८ चा संपादकीय अहवाल पाहतां आणि हल्लीं पुणें येथील संपादकीय लेखकवर्ग पाहतां असें म्हणावयास कांहीं हरकत दिसत नाहीं कीं, हल्लींची पुणें येथील संपादकीय कचेरी नागपूर येथील संपादकीय कचेरीपेक्षां कोणत्याहि प्रकारें सरस म्हणतां यावयाची नाहीं. नागपूर येथील ऑफिसांत एकंदर ३०—३१ विद्वानांचें त्यावेळीं रा. यशवंत रामकृष्ण दाते बी. ए. एल्एल्. बी. यांच्या देखरेखीखालीं साहाय्य मिळत होतें व त्याच-वेळीं प्रो. राजवाडे एम्. ए. यांच्या हाताखालीं पुण्यास ९--१० पदवीधर काम करीत होते. नागपूर येथून पुण्यास ऑफीस नेऊन तें नागपुरच्याच रा. दाते या इसमांच्या हातीं ठेविलें आहे व लेखनसाहाय्यकांची संख्या दोन्ही ऑफीसांची मिळून १०--१२ पदवीधरांवर (४१ पदवीधरांच्या जागीं) आली आहे, व ध्यानांत घेण्याजोगी मजा ही आहे कीं १९१७--१८सालीं काम करीत असलेल्या पदवीधरांपैकीं हल्लीं कामावर फारच थोडे पदवीधर आहेत. यांचें कारण इतरांच्या विद्वत्तेस डॉ. साहेब फार कमी किंमत देतात असें शोधाअंतीं कळतें.

१८. नागपूर शहराच्या डायरेक्टरांच्या देखरेखीखालीं नागपूर येथें ज्ञानकोशाच्या पाटीपेक्षां कांहींएक कारभार नाहीं. हिशेब, कागदपत्र, काम वगैरे सर्व पुण्यास आहे असें सांगण्यांत येतें. तेव्हां अशा स्थितींत डायरेक्ट-रांस देखरेखीचें काम कसें करतां येत असेल याची वाचक शेअरहोल्डरांनीं कल्पना करावी. डॉ.रे एम्. डी. व रा. कठाळे एल्एल्. एम्. हे गृहस्थ नागपुरा-तील उद्योगव्यग्र विद्वान आहेत. व ऑफीस नागपुरांत असतें तरी त्यांस देखरेखीसाठीं फारसा वेळ देतां आला नसता. मग त्यांस नागपुराहून व रा. फडके यांस अकोल्याहून, ज्ञानकोशाच्या पुणें येथून होणाऱ्या कामाची देखरेख ठेवण्यास किती अडचण पडत असेल याचा आपण विचार करावा. रजिस्टर्ड ऑफीसांत हिशोब, मिनिटबुकें वगैरे असावींत हेंच डायरेक्टरांस अधिक सोईचें झालें असतें व त्यांची तकलीफ त्यामुळें कमी झाली असती असें कमि-टीस वाटतें. या सालच्या ताळेबंदास जोडून जो रिपोर्ट आहे त्यावरून कळतें कीं, पुण्याहून संपादकीय ऑफीस मुंबईस जाणार आहे. ता. २६ सप्टेंबर रोजीं मॅनेजर डॉ. केतकर यांनीं आपला या बाबतींतील बेत फिरला असल्याचें सांगितलें होतें. त्याविषयीं निश्चित बेत काय आहे हें कळण्यास कमिटीस मार्ग

नाहीं. खर्चाच्या दृष्टीनें ही महत्त्वाची बाब आहे व खर्च फार लागेल असें रिपोर्टांत म्हटलें आहे. करितां ही गोष्ट आपल्या नजरेस आणीत आहोंत.

सही–मा. कृ. पाध्ये (बी. ए. बी. एल्. हा. व. नागपूर) "स. कृ. फाटक (डायरेक्टर पुलगांव मिल) " एम्. जी. लोक्रस (सु. आफीस इ. ज. रेजिस्ट्रेशन)

स्पष्टीकरणार्थ टीप

रा. पाध्ये व त्यांचे मित्र हे चळवळ करीत होते तेव्हां त्यांचा हेतु असा होता कीं कांहीं तरी गडबड उत्पन्न करून काम बंद ठेवावें आणि दुसरी सभा बोलवावी, आणि ब्यालेन्स शीट पास करणें नापास करणें जरी शक्य नाहीं तरी तहकूब करावें; त्यांनीं हिशोब पाहण्याची इच्छा दाखविली तर तुम्ही तो पहा असें म्हणून त्यावेळेच्या अध्यक्षांनीं आक्षेपांना संधि दिल्यानंतर ब्यालेन्सशीट पास करण्यासाठीं दुसरी सभा बोलावली. ती सभा भरली. पण पाध्ये व त्यांचे अनुयायी यांस चळवळ करण्यास आणखी सवड हवी होती. जी दुसरी सभा भरली त्या सभेच्या वेळेस आम्हांस तेरा दिवस मिळाले ते अपुरे होते वगैरे सबबी रा.पाध्ये यांनी समुच्चयानें उत्पन्न केल्या तेव्हां त्यास आणखी संधि देण्यासाठीं अध्यक्ष डॉ. खरे यांनीं पुन्हां सभा तहकूब केली.

रा. पाध्ये यांनी पहिल्या सभेच्या नंतर डॉ.केतकर यांच्या विरुद्ध लोकमत उत्पन्न करण्यासाठीं एक पत्र नागपूरच्या महाराष्ट्रांत छापलें. त्या पत्रास डॉ. केतकर यांनीं उत्तर दिलें पण तें महाराष्ट्रकारानीं छापलें नाहीं. येणेंप्रमाणें सभा तहकूब करीत जावी आणि मधल्या काळांत डॉ. केतकर यांच्या विरुद्ध लोकमत करीत जावें, सभा तहकुबी नंतर चळवळ करून प्राक्झी मिळविण्याची खटपट करावी.असा पाध्ये मंडळीचा उपक्रम होता.सभा नागपुरास होई. डॉ. केतकर पुण्यास असत आणि त्यामुळें नागपूरच्या डॉ. केतकर विरुद्ध असलेल्या मंडळीस डॉ. केतकरांच्या विरुद्ध खोट्या गप्पा सांगून चळवळ करणें सोपें जात असे. सभातहकुबी ही कंपनीच्या निवडणुकी लढविण्याची एक शकल आहे ही गोष्ट अध्यक्ष डॉ. खरे यानीं ओळखली होती व त्यांनीं वर्तमानपत्राकडे कांहीं मजकुर पाठविणें मना केलें. तेव्हां रा. पाध्ये यांनीं स्वतःस चौकशी करण्यासाठीं अधिकारी नेमलें आहे असें सांगून एक आमक विद्वानें केलेला एक रिपोर्ट तयार केला आणि तो शेअर होल्डरांकडे पाठविला. तोच वर दिला आहे. त्यावेळेस त्यांच्या विश्वासघातकी वर्तनास तोड म्हणून सभेचें स्थानांतर करून सभा पुण्यास बोलावली.

पाध्ये आणि मंडळी हो कंपनीच्या कारभाराची तपासणी करणारी,शेअर होल्डरांना त्याविषयी आपलें मत कळविण्यास अधिकार दिलेली मंडळी मुळीच नव्हती. कंपनीच्या व्यवहारांत लबाडी झाली असती तर इन्स्पेक्टर नेमून रिपोर्ट करविण्यास सरकारी योजना आहे. पण तसा इन्स्पेक्टर नेमावयास कंपनीच्या शेअरहोल्डरांपैकीं निदान एकदशांश मंडळींनीं अर्ज केला पाहिजे व तो इन्स्पेक्टर सरकारनें नेमला पाहिजे. पाध्ये कमेटी तशा स्वरूपाची नव्हती तर ती तक्रार करणाऱ्या मंडळीनां काम बंद पाडून तक्रार सभेपुढें मांडण्यासाठीं अधिकार दिलेली कमेटी होती.

रा. पाध्ये यांचा डाव असा होता कीं, आपणास चौकशी करण्याकरत नेमलें आहे असें लोकांस भासवावें लोकांच्या प्रार्थना मिळाल्यास डायरेक्टर म्हणून निवडून यावे. म्हणजे पुढें आपल्या विश्वासघाताबद्दल आपणांस कोणीहि पकडणार नाहीं. रा. पाध्ये यांचा या प्रकारचा डाव असल्यामुळें तो डाव फसविण्यासाठीं मला पुणें येथें सभा बोलावून तो डाव फसविणें अवश्य होतें आणि तें मी केलें. तसें करण्यास मला एवढेंच सांपडलें कीं गेल्या सभेच्या प्रोसिडिंगमध्यें अध्यक्षांनीं दुसऱ्या सभेची वेळ ठरविली होती पण स्थान ठरविलें नव्हतें. आणि त्या गोष्टीचा फायदा घेऊन मी सभेचें स्थानांतर करूं शकलों. माझ्या मनांत संशयी लोकांनां पुरी संधि द्यावयाची होती पण शत्रुत्व बाळगणाऱ्या लोकांनां संधि द्यावयाची नव्हती. आणि त्यामुळें मी सभा पुण्यास भरविण्याचा हट्ट त्यावेळेस धरला असता तर तें चाललेंहि असतें. कारण सभेच्या कामाच्या दिरंगाईमुळें जादा चालक खरे व कठाळे हे दोघेहि मुदत संपल्यामुळें डायरेक्टरच्या पदापासून च्युत होत होते आणि त्यामुळें मी आणि रा. फडके असे दोघे मिळून वाटेल तिकडे सभा भरवून वाटेल तें करूं शकलों असतों पण तसें करणें म्हणजे डॉ. खरे यांचा विनाकारण अपमान होईल असें वाटलें. डॉ. खरे यांची वृत्ति अशी होती कीं कोणत्याहि मनुष्याला विनाकारण संशयाला जागा राहूं नये म्हणून विरुद्ध पक्षास पूर्ण मुभा द्यावी पण विरुद्ध पक्ष केवळ संशय उत्पन्न करून कंपनीचे नुकसान कसें करूं शकतो याची त्यास असावी तितकी जाणीव नसावी असें वाटतें.

या जुन्या वादविवादाचें आज महत्त्व उरलें नाहीं. तथापि जे या वादांत जाऊं इच्छितील त्यांनां माझ्याविरुद्ध घेतलेले आक्षेप कोणत्या स्वरूपाचे होते, आणि ते आक्षेप घेतांना काय विचार केले आहेत तें पहावयास पूर्ण संधि यावी हेतूनें मुद्दाम विरुद्ध पक्षाचें म्हणणें पूर्णपणें दिलें आहे आतां या विषयासंबंधी लिहिलेला लांबलचक खेदप्रमाणें:—

ता री ख ३१ मा र्च १९२० रो ज र्चि

भांडवल, कर्ज व ठेव.	रक्कम					
	रु.	आ	पै	रु.	आ.	पै.
अधिकृत भांडवल—						
१०० रु. प्र. १००० भाग	१०००००	०	०			
विक्रीस काढलेलें भांडवल १०० रु प्र. १००० भाग	१०००००	०	०			
विकी झालेलें भांडवल १०० रु. प्र. ६३७ भाग	६३७००	०	०			
भागणी केलेलें भांडवल १०० रु. प्र. ५१२ भाग	५१२००	०	०			
६० रु. प्र. १२५ भाग	७५००	०	०			
जप्त केलेल्या ३ भागांचे पैसे	४०	०	०			
	५८७४०	०	०			
भागणीपैकीं येणें	२३५२७	६	११	३५२१२	९	६
हिस्साअर्जावरोवरची रक्कम						
१० रु. प्रमाणें २८ अर्ज	२८०	०	०			
५ रु. प्रमाणें २ अर्ज	१०	०	०	२९०	०	०
मागावरील अनामत ठेव				४०	०	०
ज्ञानकोशाकरितां वर्णणी—						
प्रकार पहिला १२१ जण	९७९७	८	०			
प्रकार दुसरा ४३६ जण	१३०५५	४	९			
प्रकार तिसरा २४८ जण	४०४९	०	०	२६९०१	१२	९
कर्ज				२५००	०	०
ठेव				१२५०	०	०
तसलमात जमा				३३९	५	३
एकूण...				६६५३३	/११	१

१८ जून १९२०
४८१ शनवार पुणें.

(सही) खरे आणि कंपनी
आडिटर्स.

(सही) ग. ना. टिळक, हिशेवनीस.

मं ड ळा ची सां प त्ति क स्थि ति

मालमत्ता, खर्च, ठेव.	रक्कम रु.	आ.	पै.	रु.	आ.	पै.
सामान-लांकडी सामान	१०७	०	३			
पुस्तकें	२९८५	९	९			
आरंभीचा खर्च } स्टॅच्युटरी				३८९२	१०	०
स्थायिकतेचा } रिपोर्टाप्रमाणें				६११	२	९
१-४-१९१७ ते ३१-३-१९१८				१२११	१२	४
चा खर्च हिशेबाच्या तक्त्याप्रमाणें				७७७९	९	११
१-४-१९१८ ते ३१-३-१९१९						..
चा खर्च हिशोबाच्या तक्त्याप्रमाणें				२१४२०	१	१
वारलोन सर्टिफिकिटें १२०० चीं				९३०	०	०
बँकेतील शिल्लक-पूना बँक	२६५	१३	६			
सेंट्रल बँक नागपूर	१०४०	४	६	१३०६	२	०
आगाऊ-कागदासाठीं निर्णयसागरला	४७००	०	०			
मिस् कोहन भाड्यासाठीं	६९७	२	०	५३९७	२	०
तसलमांत नांवें						
जवळचीं शिल्लक-पुणें कचेरी	१०७८	२	७	३७८	०	५
नागपूर कचेरी	३२५	४	०			
मुंबई कचेरी	१५७	३	०			
दोंघ प्रचारक	६९८	६	३			
नफातोटा हिशोब-नोंदणी	११०	१३	७	२२५८	१५	१०
व्याज दिलेलें	११८	४	६			
टपाल	४८३	९	०			
विक्री व प्रसिद्धी	२९६४	१०	६			
संपादकीय खर्च	१४५५१	५	३			
वाङ्मयसूचि	२९८	४	०			
कचेरी खर्च	४५५२	९	८			
सादील छपाई	४६८	११	०			
कमी--किरकोळ जमा	२३५४८	३	६			
नफातोटा खातें	१	२	०			
मिळालेलें व्याज	२०६	८	२			
सूचि विक्री	९६	६	६			
	१८९४	०	०			
	२२००	०	९	२१३४८	२	९
एकूण...				६६५३३	११	१

नागपूर
२०-६-२० } (सही) नारायण खंडेराव फडके } ऑनररी
(सही) नारायण भास्कर खरे. } डिरेक्टर्स

मागील पानावरील जमाखर्चावद्दलचा आडिटर्सचा शेरा

" आम्हीं वरील हिशोबाचा तक्ता जमाखर्च व पावतीबुकें यांसह तपासून पाहिला आहे व तो बरोबर आहे अशी आमची खात्री आहे. आम्हाला जी माहिती लागली व जें स्पष्टीकरण जरूर वाटलें तें सर्व मिळालें. त्यावरून भागीदारांस आम्ही असें जाहीर करतों कीं आमच्या समजुतीप्रमाणें व जी माहिती व स्पष्टीकरणें आम्हांस मिळाली व जीं पुस्तकें आम्हांस दाखविण्यांत आलीं त्यांवरून आम्हीं असें आश्वासन देतों कीं,हा तक्ता मंडळाची या वेळची खरी स्थिति दाखवितो व हा वस्तुस्थित्यनुरूप व कायद्यासमाणें तयार केलेला आहे. "

खरे आणि कंपनी

ब्यालेन्सशीट नापास करण्याची शक्ति पाध्येकंपूस कधींच नव्हती कारण रा. पाध्ये यांनां जरी १५ मतें होतीं तरी रा. फडके यांचीं १५ त्यांच्याविरुद्ध होऊन माझीं २५ मतें होतींच. मला हाणून पाडण्यास माझ्या विरुद्ध २५ माणसें जमा करणें अवश्य होतें व पंचवीस मंडळी जमवणें देखील सोपें नसतें आणि जी मंडळी जमतील ती त्यांच्या तर्फेची जमतील असेंहि नाहीं. तर डॉ. केतकर यांच्या प्रामाणिकपणाविरुद्ध बभ्रा करून जो अपशकून करता येईल तेवढाच काय तो करणें विरुद्धांस शक्य होतें.

(परिशिष्ट नं. १३)

आक्षेपांस उत्तर.

नागपूरचे वकील रा. महादेव कृष्ण पाध्ये यांनीं ज्ञानकोशाच्या अनेक हिस्सेदारांकडे कांहीं पत्रकें पाठवून त्यांसोबत,कंपनीच्या कामामध्यें गैरव्यवस्था आहे, कंपनीचे पैसे डॉ. केतकर गिळंकृत करीत आहेत, कंपनीचे डायरेक्टर आणि ऑडिटर आपलें काम बरोबर करीत नाहींत व सध्यांच्या व्यवस्थेंत बदल करणें अवश्य आहे, तर आम्हांला (डायरेक्टर निवडून येण्यासाठीं) आपली प्राक्झी द्या, अशा अर्थाचीं पत्रें पाठविलीं आहेत.

पाध्ये व इतर दोघे गृहस्थ यांस कंपनीचे (एप्रिल १९१९–२० मार्चपर्यंतचे) हिशोब पाहण्यास परवानगी दिली होती. त्यांनीं त्याचा जो अहवाल डायरेक्टराकडे पाठवावयाचा तो Private and confidential म्हणून शेअरहोल्डरांकडे पाठविला व तो प्राक्झी मिळविण्याच्या हेतूनें तयार केला. या अहवालांतील बराचसा भाग अप्रस्तुत आहे, म्हणजे ताळेबंदाच्या वर्षाला धरून व ताळेबंदासंबंधानेंच तो अहवाल नाहीं. त्यांतील अनेक विधानें सत्यास सोडून आहेत, व कांहीं वाचकांच्या मनांत सत्यापेक्षां निराळा अर्थ यावा अशा तऱ्हेनें मांडलीं आहेत. उदाहरणार्थ, मिस् कोहन (आतां सौ० शीलवती केतकर) यांस मिळालेल्या पैशासंबंधानें विधान घ्या. एक वर्षांत २५२६ रुपये त्यांस मिळाले असें लिहिलें आहे तें अजीबात खोटें आहे. लंडन ऑफिसचा अनेक वर्षांचा हा एकंदर खर्च होय. लंडन ऑफीसचा हिशोब पुरा करून तें खातें बंद केल्यामुळें तो खर्च या वर्षांत पडला आहे.

तसेंच कंपनीचे पैसे खासगी कामाकडे वापरतों असें त्यांनीं तसलमात यावर टीका करतांना लिहिलें आहे. ज्ञानकोशाच्या कामासाठीं कोणाहि ज्ञानकोशमंडळांतील लेखकास वगैरे पैसे दिले असले म्हणजे हिशोब येण्यापूर्वी ते पैसे तसलमातखातीं त्याच्या नांवें पडतात किंवा पगाराची तारीख होण्यापूर्वी किरकोळ दिलेले पैसे तसलमातखातीं पडतात.

कंपनींचें काम चांगलें चाललें आहे असें दाखविणाऱ्या गोष्टीच कंपनीचे दोष म्हणून दाखविल्या आहेत. उदाहरणार्थ, कंपनीचें आम्ही भांडवल वाढविलें व कंपनीचें काम एक लाखांत न करतां तीन लाखांत करण्याचा आमचा सभ्यांचा इरादा आहे याबद्दल रा. पाध्ये यांचें अकांडतांडव वाचावें.

कंपनीला पैसा शेअरहोल्डर आणि वर्गणीदार या दोन वर्गांकडून मिळतो. शेअरहोल्डर म्हणजे वस्तुतः ग्रंथाचे ग्राहक. कंपनीचें भांडवल वाढविणें म्हणजे अधिक शेअरहोल्डर मिळविणें व अधिक ग्रंथ खपविणें होय. सभ्यांच आमचे शेअरहोल्डर आणि वर्गणीदार मिळून १६००वर झाले आहेत. एक लाखाचा धंदा करावयाचा म्हणजे सोळाशेपैकीं सहाशेंच्या वर्गण्या परत करावयाच्या ! ! पाध्ये यांस तीन लाखांचा वाऊ वाटतो. हा व्यवहार त्यांची छाती दडपणारा आहे.हें त्यांचें म्हणणें खोटें नाहीं; पण तीन लाख अशक्यहि नाहींत. आम्ही आणखी चौदाशें पुस्तकें खपविलीं म्हणजे तीन लाखांचा व्यवहार केला असें होईल. व्यवहार मोठा केल्यानें शेअरहोल्डरांचें नुकसान कसें होतें हें समजत नाहीं. भांडवल वाढविणें म्हणजे शेअर अधिक खपविणें आणि प्रत्येक शेअरहोल्डरवरचें जोखीम कमी करणें. हिस्से खपविणें किंवा वर्गणीदार मिळविणें या पुस्तकें खपविण्याच्या दोन प्रकारांपैकीं शेअरहोल्डर वाढविणें हाच प्रकार अधिक श्रेयस्कर आहे. वर्गणीदार वाढविण्यास कंपनीची तारण रक्कम म्हणजे भांडवल अधिक वाढवावें लागतें. कारण शेअरहोल्डर हे वर्गणीदारांस तारण असतात. कंपनीला तीन हजार पुस्तकें खपवावयाचीं, म्हणजे तीन लाखांचा व्यवहार करावयाचा. हा व्यवहार करावयाचा तो कंपनीचें भांडवल पन्नास हजार असतां व्हावयाचा नाहीं. ज्या कंपनीची जबाबदारी पन्नास हजार तिच्यावर वर्गणीदारांची अडीच लाखांची जबाबदारी टाकावी कशी?तशी जबाबदारी टाकणें शेअरहोल्डरांच्या किंवा वर्गणीदारांच्या हिताचें नाहीं. ज्या कंपनीची जबाबदारी एक लाखाची तिच्यावर लाख-दीड लाखाची जबाबदारी टाकावयास हरकत नाहीं. तेव्हां केवळ वर्गणीदार वाढविण्यापेक्षां शेअरहोल्डर म्हणजे जबाबदारी घेणारे वर्गणीदार वाढविणें बरें, हें व्यवहारतत्त्व थोडासा विचार केल्यास रा. पाध्ये यांसहि समजण्यासारखें आहे.

कंपनीला एका लाखांतच व्यवहार करावयाचा नसून पांच लाखांपर्यंत व्यवहार करण्याची कंपनीची महत्त्वाकांक्षा होती, एक लाखापर्यंतच रक्कम

गोळा झाली तरी काम कसें करावें अशीहि एक योजना होती. एक लाखापेक्षा अधिक रकमांचा व्यवहार करण्याच्या योजनांवर रा. पाध्ये व त्यांच्या दुसऱ्या सहकाऱ्यांच्या सह्या झाल्या आहेत, व ते कागद पूर्वी छापून प्रसिद्धहि झाले आहेत. ज्ञानकोशाला सध्यां जें स्वरूप आलें आहे तें रा. पाध्ये यांच्या आवांक्याबाहेर आहे हें रा. पाध्ये यांनीं महाराष्ट्रांत छापलेल्या पत्रांत मन मोकळें करून सांगितलें हें योग्यच आहे. पण अशा प्रसंगीं ज्ञानकोशाच्या कामांत अव्यवस्था आहे म्हणून ती दुरुस्त करण्याचें ते अंगावर घेतात, आणि लोकांची प्राक्षी मागतात ही गोष्ट त्यांच्या धैर्याचो आणि विनोदी स्वभावाची द्योतक आहे. रा. पाध्ये यांचा एक आक्षेप असा आहे कीं, चालकांनीं विंटरनिझट्र्चें भाषांतर छापण्यास सौभाग्यवती केतकर यांस फुकट परवानगी दिली. मिस् कोहन यांनीं ज्ञानकोशासाठीं भाषांतर केलें तें इंग्रजींत केलें. त्यांतील जो भाग घेण्याजोगा म्हणून वाटला तो ज्ञानकोशानें घेतला. ग्रंथाचें इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध व्हावें म्हणून ज्ञानकोशमंडळास अनेक यूरोपीय व एतद्देशीय विद्वानांनीं पत्रें लिहिलीं. हें भाषांतर लोकांस पाहिजे आहे, पण छापण्याचा खर्च कोणी करावा हा प्रश्न पुढें येतो. ज्ञानप्रसाराच्या दृष्टीनें हें भाषांतर छापणें उपयुक्त होईल. कोणास हें छापावयाचें झाल्यास ज्ञानकोशाचे चालक आनंदानें परवानगी देतील. अनेक पुस्तकप्रकाशकांकडे ज्ञानकोशमंडळानें पत्रव्यवहारहि केला. पण अजून कोणी तें पतकरीत नाहीं. रा. पाध्ये यांस जर हें भाषांतर छापावयाचें असेल तर त्यांसहि मंडळ परवानगी देईल. हें छापून पैसे मिळण्याचा संभव कमी. जर कोणी अभिमानानें किंवा प्रेमानें छापील तर तें छापलें जाईल. अशा प्रसंगीं सौ० शीलवती केतकर यांनीं तें आपल्या खासगी खर्चानें छापण्याचा विचार केला होता. परवानगी मिळाली असें लिहिलें आहे तें खोटें आहे. अजून छापण्यास त्यांनां परवानगी दिली नाहीं; पण छापण्याच्या परवानगीसाठीं काय द्याल, असा जबाब डायरेक्टरांनीं त्यांस विचारला आहे. इंग्रजी भाषांतराचा महाराष्ट्राबाहेर उपयोग आहेच. हें छापण्याची जबाबदारी जर दुसरें कोणी घेईल तर ज्ञानकोशमंडळास व सौभाग्यवती शीलवती यांस आनंदच होईल, आणि रा. पाध्ये जर छापावयास घेतील तर अधिक आनंद होईल. ते छापखानदार आहेत व ते सहज छापूं शकतील.

रा. पाध्ये हे पूर्वी ज्ञानकोशाचे एक कायमचे डायरेक्टर असतां त्यांनीं छपाईचें काम घेतलें. ते त्या वेळेस अध्यक्षहि होते. त्यामुळें प्रसंग असा उत्पन्न होई कीं, छपाईखात्यावर देखरेख करणारास आपले अध्यक्ष म्हणून त्यांस मान द्यावा लागे, आणि छपाईदार म्हणून त्यांच्यापासून काम चोख रीतीनें काढून घेण्यासाठीं निराळ्या तऱ्हेनें वागावें लागे. या तऱ्हेनें वागतांना अनेक

प्रकारें असमाधानकारक स्थिति उत्पन्न झाली. पुढें असें दिसून आलें कीं, मॅनेजिंग डायरेक्टरखेरीज जो डायरेक्टर कंपनीशीं करार करतो तो डायरेक्टर रहात नाहीं. या नियमानें रा. पाध्ये कंपनीचे डायरेक्टर राहूं शकले नाहींत. वरील कायद्याची अंमलबजावणी करणें डॉ. केतकर यांजकडे आलीं पुढें रा. पाध्ये व त्यांचे दुसरे दोन सहकारी यांसहि कंपनीच्या डायरेक्टरांत निवडून येतां आलें नाहीं. कंपनी आपलें छपाईचें काम रा. पाध्ये यांच्या देशसेवक छापखान्याकडून करून घेत होती आणि कित्येक हजार रुपयांचें काम देशसेवक छापखान्यानें केलें. पुणें येथें मुख्य कार्याचें ऑफिस आल्यानंतर आमच्याकडून छपाईचेंहि काम रा. पाध्ये यांस मिळेनासें झालें, आणि निर्णयसागर छापखान्यास काम देण्याचें आम्हीं ठरविल्यामुळें रा. पाध्ये यांस नाखूष होण्यास आणखी एक कारण झाले.

रा. रा. पाध्ये यांनीं डॉक्टर केतकर यांचा पगार कमी करण्यासाठीं जीं कारणें दिलीं आहेत तीं देखील फार मौजेचीं आहेत तीं पुन्हां एकदां वाचून त्यांवर विचार करावा अशी आमची शिफारस आहे.

रा. पाध्ये यांस थोडेसें करमणुकीचेंहि लिहिणें लिहितां येतें असें दिसतें. त्यांच्या रिपोर्टाच्या नवव्या परिच्छेदांत रा. पाध्ये, फाटक व लोकस ही त्रयी ज्ञानकोशाचें काम विकाऊ आहे हें ठरविण्यास परीक्षक म्हणून नेमली गेली आहे अशी आपली समजूत व्यक्त करते;आणि आम्हीं त्यांस लेख पहाण्याची संधि न दिल्यामुळें तें काम त्यांस करतां येत नाहीं म्हणून दिलगिरी प्रदर्शित करते. पाध्ये कमेटीची साक्षरता त्यांनीं पाठविलेल्या पत्रकावरून सहज व्यक्त होणार आहे. या प्रकारच्या त्रयीकडे ज्ञानकोशाच्या मजकुराची योग्यता ठरविण्याचें काम सोंपविण्यापूर्वी सर्व महाराष्ट्रास वेड लागावयास पाहिजे. एरव्हीं या प्रकारचें काम असल्या प्रकारच्या त्रयीकडे कोणी पाठवील असें वाटत नाहीं. रा. लोकस व फाटक यांनीं अहवाल वाचून सही केली असती तर बरें झालें असतें !

रा. पाध्ये इत्यादि त्रयीच्या रिपोर्टांत केलेलीं इतर विधानें इतकीं क्षुल्लक आहेत कीं, त्यांवर अधिक लिहावयाची आवश्यकता नाहीं. रा. पाध्ये किंवा त्यांचे स्नेही यांस कोणी साक्षी दिल्यास आमची हरकत नाहीं. पण जीं विधानें करून रा. पाध्ये साक्षी मागतात तीं विधानें खोटीं, भ्रामक आहेत, एवढें सांगितलें व पाध्ये यांच्या ज्ञानकोशविषयक वृत्तीचा इतिहास हिस्सेदारांस अवगत असला म्हणजे झालें. कंपनीच्या सुस्थितीविषयीं आणि भक्कमपणाविषयीं कोणासहि शंका घेण्याचें कारण नाहीं. रा. पाध्ये यांनीं लोकांकडे भ्रामक पत्रें पाठविल्यामुळें पुष्कळ लोकांस रा. पाध्ये यांनीं सुरू केलेली चौकशी

अधिक पूर्ण व्हावी अशी इच्छा असणें स्वाभाविक आहे. आमची त्यांस सहानुभूति आहे. सर्व प्रकारचे कागद पहावयाचें काम करणाऱ्यास पुणें ऑफिसांत येऊन कागद पहावे लागतील. नागपूरच्या लोकांस पुण्याचे कागद दिसत नाहींत म्हणून पाध्ये कमिटीची तक्रार रास्त आहे आणि पुणें येथील शेअरहोल्डरांनीं एखादी कमिटी नेमून ऑफिसची 'कसून तपासणी केल्यास आम्हांस आनंद आहे आणि हें शक्य होण्यासाठीं मुद्दाम पुणें येथेंच ता. १९ डिसेंबरची सभा बोलावली आहे.

रा. पाध्ये यांच्या पत्रानें गैरसमज होऊन कोणी त्यांच्या किंवा इतरांच्या नांवानें प्राक्झी पाठविला असल्यास तो रद्द करण्यासाठीं " सेक्रेटरी—महाराष्ट्रीय ज्ञानकोशमंडळ लिमिटेड, नागपूर " यांस तावडतोब कळविण्याची कृपा करावी.

श्री. व्यं. केतकर.

कुमारी इडिथ व्ही. कोहन (सौ. शीलवती केतकर) यांचें आतांपर्यंत काम झालें आहे तें येणेंप्रमाणें:—

इंग्लंडमध्यें—विंटरनिट्झ यांच्या 'हिस्टरी ऑफ इंडियन लिटरेचर' या जर्मन ग्रंथाचें भाषांतर भाग, २, पृ. १–४८३ आणि १–२८८.

पुणें-ऑफिसांत ६ महिन्यांत—

१ आर. फ्रेडरिक यांनीं प्रसिद्ध केलेली बलिबेटांतील कविभाषा, संस्कृत आणि वाङ्मय यांविषयीं माहिती; हिचा 'यावद्वीपसंस्कृति' या प्रकरणामध्यें समावेश केला आहे.

२ कविभाषेंतील नागरकृतागम या ग्रंथाचा डॉ. कर्ननें केलेल्या डच भाषांतरावरून सारांश. याचाहि यावद्वीपसंस्कृतीमध्यें समावेश केला आहे.

३ कांबोज, सयाम, कोचीन चीन, ब्रह्मदेश इत्यादि देशांविषयीं लासेन यानें 'इंग्लिश आल्टरटुम्स्कुन्डे' या ग्रंथांत दिलेल्या माहितीचा गोषवारा.

४ डॉ. गायजर यांच्या सिंहली वाङ्मयावरील ग्रंथाचा गोषवारा पृ. १–९३.

५ 'ग्रीक नाटयाचा भारतीय नाटयावर परिणाम' या इ. विंडिश यांच्या ग्रंथाचा गोषवारा.

६ लि. श्रोडर यांच्या 'मिस्टिरिअम उंड मिमस इम ऋग्वेद' या ग्रंथाचा गोषवारा, पृ. १–४८१.

७ 'म्युसी गिमे' या फ्रेंच ग्रंथमालेंतील 'प्राचीन सयाम' या ग्रंथाचा गोषवारा.

८ वेबर यांच्या 'वेदिक मीटर' या लेखाचा गोषवारा, पृ. सं. सुमारें २००.

९ जावा, बली, ससक या बेटांतील ग्रंथाच्या डच यादीवरून तेथील ग्रंथांची माहिती.

१० पिशेल यांच्या 'प्राकृत ग्रामर' या ग्रंथाचें भाषांतर पृ. १–१४४.

११ जे. जॉली यांच्या 'मेडिसिन' या ग्रंथाचें भाषांतर पृ. १–१२३.

१२ वेबर याच्या 'इंडिश स्टुडियन' या मालिकेच्या (पूर्ण) आठरा... ग्रंथांची अनुक्रमणिका व त्यांतील कांहीं विषयांवर टीपा.

१३ लासेन याच्या इंडिश 'आल्टरटुम्स्कुन्डे' या मालिकेच्या (पूर्ण) चार ग्रंथांची अनुक्रमणिका व त्यांतील कांहीं विषयांवर टीपा.

१४ ए. हिलेब्रांड्ट याच्या 'रिच्युअल लिटरेचर' या ग्रंथाच्या कांहीं भागाचा गोषवारा.

यांपैकीं १–७ व ९ यांपैकीं बऱ्याचशा भागांचा पहिल्या विभागांत समावेश केला आहे.

यांखेरीज मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या लायब्ररीमध्ये कांहीं जर्मन ग्रंथांतील टीपाकरितां माहिती जमविण्याच्या कामीं त्य मदत झाली आहे; कळावें हे विनंति.

यशवंत रामकृष्ण दाते.
संपादकीय कार्यव्यवस्थापक

(परिशिष्ट नं. १४)

पाध्ये यांचें प्रत्युत्तर.

रा. केतकर ज्ञानकोशाचे मॅनेजर व संपादक यांनीं शेअरहोल्डरांकडे तपासकमेटीच्या रिपोर्टाचें उत्तर पाठविलें आहे. ता. १९–१२–२० रोजीं नागपूर येथें कंपनीची तहकुबसभा भरणार आहे व रा. केतकर यांनीं पुणें येथें बोलाविलेली सभा बेकायदेशीर आहे असें मंडळाचे अध्यक्ष डॉ. खरे, डायरेक्टर रा. कठाळे व सेक्रेटरी रा. गोविंद चिंतामण तांबे यांनीं त्यांस कळविलें आहे. करितां सभा नागपुरासच होईल. त्याच्या आधीं रिपोर्टास पाठविलेलें रा. केतकरांचें उत्तर कितपत समर्पक आहे हें खालील गोष्टीवरून दिसून येईल. रा. पाध्ये खाजगी रीतिनें मजवर नाखुष झाले आहेत करितां त्यांस तपास कमेटीत मुकरर करूं नये, अशी तक्रार २६-१०-२० च्या समेत रा. केतकरांनीं केली असती तर रा. भवाळकर किंवा दुसरा एखादा मंडळाचा इतिहास माहीत असणारा गृहस्थ दोन नवीन गृहस्थांबरोबर मुकरर केला गेला असता

खाजगी नाखुषीबद्दलचा खुलासा रा. पाध्ये अलाहिदा करतील. कारण रिपोर्टांतील आक्षेपाशीं तिचा कांहीं संबंध नाहीं. डॉ. केतकर यांच्या उत्तरांत जो भाग कमिटीच्या रिपोर्टासंबंधाचा आहे तेवढ्यापुरतीं खालीलउत्तरें प्रयुक्त्तरें आहेत. हिशेबासंबंधीं वर्तमानपत्रांत चर्चा करूं नये असें डॉ. केतकर यांनीं अभिवचन घेतल्यामुळें रिपोर्टावर खाजगी (Private and Confidential) म्हणून लिहून, आमच्या जवळ असलेल्या थोड्या प्रती, शेअरचीं बहुतेक रक्कम भरलेल्या कांहीं उत्सुक गृहस्थांस दिल्या गेल्या आहेत. कंपनीचे अध्यक्ष, मॅनेजर व सेक्रेटरी यांचेकडे रजिस्टर्ड ऑफिसांत आम्ही ता. १–१२–२० रोजीं हा रिपोर्ट सर्व शेअरहोल्डरांच्याकडे पाठविण्यासाठीं आणि सभेपुढें ठेवण्यासाठीं सादर केला आहे. केतकर यांनीं सर्व शेअरहोल्डरांस पाठविलेल्या उत्तराबरोबर हा रिपोर्ट पाठविला नाहीं ही त्यांची चूक आहे.

खालील मजकुरांत कमिटीचा आक्षेप थोडक्यांत दिला आहे व त्यावर रा. केतकरांचें उत्तर दिलें आहे व उत्तर नसल्यास नाहीं म्हणून दिलें आहे व नंतर कमिटीचें प्रत्युत्तर दिलें आहे.

आक्षेप नं. १ — ज्ञानकोश स्वरूपांत येण्यास पांच वर्षें पुरीं आहेत हा अंदाज जाऊन ह्या जागीं जसजसा भाग छापला जाईल तसतसा भाग लिहून प्रेसमध्यें पाठवावयाच्या धोरणानें वीस ग्रंथांस ६ वर्षें अधिक लागतील व तोंपर्यंत संपादकीय आणि छपाई असे दोन्ही खर्च चालले पाहिजेत.

उत्तर — नाहीं.

आक्षेप नं. २ — आतांपर्यंत ज्ञानकोशाचीं फक्त सातअष्टमांश कच्चीं टिपणें झालीं आहेत.

उत्तर — नाहीं.

आक्षेप नं. ३ — ताळेबंद कंपनीच्या कायद्याचे नक्षाप्रमाणें नाहीं;संदिग्ध लिहिलेला आहे.

उत्तर — कांहीं नाहीं.

आक्षेप नं. ४ — कंपनीनें आपणापाशीं २५०० रु. चौ ठेव ठेविली ती कंपनीच्या हेतूस सोडून बेकायदेशीर आहे.

उत्तर — नाहीं.

आक्षेप नं. ५ — व्हौचर फायलींतील कांहीं व्हौचरांस व्हौचर म्हणतां येणार नाहीं असे आहेत.

उत्तर — कांहीं नाहीं.

आक्षेप नं. ६ — डायरेक्टरांचें मिनिटबुक नाहीं. १९२० सालची प्रोसिडिंग्जची सुट्या कागदावर टिपणें आहेत. कं. का. कलम ८३ रूल, ७५ टेबल अ प्रमाणें हा गुन्हा आहे.

उत्तर — कांहीं नाहीं.

डॉ. केतकर आणि त्यांचें कुटुंब यांच्या मुशाहिऱ्याविषयीं प्रश्न असल्यामुळें त्यांनींच प्राक्झोच्या बळावर हिशेब न दाखविण्याविषयीं मांडलेला हट्ट नाजुक होता. आक्षेप नं. ७

कांहीं नाहीं. उत्तर

ज्ञानकोशाच्या कार्यारंभापूर्वीपासुन मिस् कोहन यांशीं भाषांतर करण्याचें ठरावलें. मंडळाच्या ठरावांचून असें करतां येत नव्हतें. आक्षेप नं. ८

कांहीं नाहीं. उत्तर

ज्ञानकोशाचें काम महाराष्ट्रांतील निरनिराळ्या प्रसिद्ध विद्वानांच्या साहाय्यानें करावयाचें आहे असें रा. केतकर यांनीं निरनिराळ्या प्रसिद्ध पत्रकांतून प्रसिद्ध केलें आहे. पग त्या विद्वानांचें साहाय्य कितपत मिळालें व मिळालें नसल्यास कां नाहीं ? ५०००० चे एक लाख भांडवल वाढलें तरी महाराष्ट्रीय विद्वानांचें साहाय्य मिळूं नये ही ज्ञानकोशाची सर्वांत मोठी हानि झाली आहे. आक्षेप नं. ९

कांहीं नाहीं. उत्तर

५० हजारांचें भांडवल व जवळ जवळ एवढीच रक्कम शेअर-होल्डरांच्या कडून मिळवून लाख रुपयांत ज्ञानकोश मूर्त स्वरूपांत येईल, असा पहिला अंदाज जाऊन त्याच कामाला आतां संपादन व छापखाना मिळून ३लाख रु. अधिक उभे करावे लागतील,असें डायरेक्टरांचें म्हणणें आहे आक्षेप नं. १०

कंपनीचें काम एक लाखांत न करतां तीन लाखांत करण्याचा इरादा आहे. हें काम चांगलें आहे पण याबद्दल रा. पाध्यांचें अकांड तांडव. आहे. पाध्ये यांस तीन लाखांचा बाऊ वाटतो। सध्याच शेअरहोल्डर व वर्गणीदार मिळून १६०० च्यावर झाले आहेत. मग साठ हजार रुपये वापस करावेत काय ? तीन लाख रुपये उभे करणें अशक्य नाहीं. आणखी १४०० बुकें खपला म्हणजे झालें. उत्तर.

चांगलें कसें ? किती लाख रुपये खर्च करून ज्ञानकोश डॉ केतकर आमच्या हातीं देणार हा प्रश्न आहे. हल्ली ६३ हजार रुपये खर्च होऊन गेले आहेत. तथापि ज्ञानकोशाची प्रेसकॉपी तयार नाहीं. व पुढील सहा वर्षांत हल्लींप्रमाणें खर्च धरला तर ३० हजारांप्रमाणें १८० हजार अधिक खर्च लागेल. यांत छपाईचा खर्च नाहीं. शिवाय सहा वर्षांत कोश शिळा होईल तें वेगळेंच. शिवाय १० वर्षांनंतर शेअरहोल्डरांनीं व्याजाचा विचार करावयाचा नाहीं तें नाहींच.आणखी १४०० बुकें संपविलीं म्हणजे तीन लाख रुपये उभे रहातील पण बुकें अस्तित्वांत आल्यावाचून ? बुकाशिवाय प्रत्येक वर्गणीदाराची रक्कम ही शेअरहोल्डरावर कर्ज आहे. शेअरहोल्डर हा ऋणको आणि वर्गणीदार धनको आहे. रिपोर्टाच्या साली ६३७ शेअरहोल्डर ऋणकोवर८०५ प्रत्युत्तर

वर्गणिदारांचें कर्ज आहे. कारण त्यांस कॉपी देणें म्हणजे ज्ञानकोश मूर्त स्वरूपांत न आल्यास त्यांच्या रकमा परत देणें भाग आहे. शेअरहोल्डरांस हे रुपये द्यावे लागतील. १६०० वर्गणीदार व शेअरहोल्डर रिपोर्टाच्या काळांत नाहींत. आमची टीका ब्यालन्सशीटपुरती आहे.

आक्षेप नं. ११ — हिशेब व कागदपत्र दाखविले नाहींत.

उत्तर — हें कबूल आहे व त्याकरितां डॉक्टर नागपूरचें रजिस्टर आफिस सोडून पुण्यास सभा बोलावीत आहेत. व पुणें येथील शेअरहोल्डरांची कमिटी नेमून तिजकडून कसून तपासणी करून आनंद (?)करण्याच्या विचारांत आहेत. जबाब पृष्ठ ४, प्यारा १०.

प्रत्युत्तर — ब्यालन्सशीट व हिशेब मंजूर करण्यास नागपुरांत सभा भरविली. नागपुरांत नेमलेल्या कमिटीस हिशेब व कागदपत्र न दाखवितां पुण्यातील नवीन मुकरर करूं घातलेल्या कमिटीस कागदपत्र दाखविण्याच्या तयारीचें कारण काय ? नागपूरच्या कमिटीकडून कसून तपासणी होणार नाहीं अशी डॉ. यांस भीति वाटते कीं काय ? रजिस्टर आफिसांत जे कागदपत्र व हिशेब आणि पुस्तकें ठेवणें अवश्य होतें तीं तेथें न ठेवतां पुण्यास ठेवल्यावर, नागपुरास नांवापुरतें कंपनीचें रजिस्टरर्ड ऑफिस कशासाठीं ठेवलें आहे ?

आक्षेप नं. १२ — कंपनीच्या पैशांचा उपयोग कांहीं काळ तरी डॉ. केतकर आणि इतर करतात. जणूं काय ज्ञानकोश खाजगी ब्यांक आहे. शिवाय हा तसलमात जमाखर्च एका खात्यांत ठेवणें महाजनी पद्धतीस धरून नाहीं.

उत्तर — ज्ञानकोशाच्या कामासाठीं कोणाहि लेखकांस पैसे दिले म्हणजे हिशेब येण्यापुर्वी पैसे तसलमात नांवे पडतात.

प्रत्युत्तर — उत्तर पूर्ण नसून वस्तुस्थितीस धरून नाहीं हें हिशेबवही पाहिल्यानें समजेल.

आक्षेप नं. १३ — ताळेबंदाच्या सालीं १४५५१ रुपये खर्च झाले. त्यांपैकीं २५२६ रुपये मिस् कोहन यांचा मुषाहिरा व ६९७ प्रवासखर्च. शिवाय डॉक्टर व त्यांचें कुटुंब यांस ताळेबंदाच्या सालीं १४५५१ पैकीं ६८९४ रुपये मिळालें. बाकीची रक्कम महाराष्ट्रीय एडिटरांस दिली गेली. २५० रुपये महिना कोहन बाईस व त्यांच्यापेक्षा अधिक योग्यतेचे एडिटर डॉ. केतकर यांस ३०० रु. महिना. रा. यशवंतराव दाते बी. ए. एल्एल् बी. यांस रु. १०० महावार. इतर विद्वानांस ५०-५५ रुपये. महाराष्ट्रांत विद्वानांची किंमत एडिटर काय करतात हें यावरून दिसतें.

उत्तर — सौ. लीलावतीबाई केतकर यांस एका वर्षांत २५२६ रु. मिळाले हें खोटें. सबब आकड्यांचा अभ्यास वर्षांचा सर्व या वर्षांत पडला [illegible]

उत्तर अपूर्ण. हें ताळेबंदावरून कसें समजावयाचें ? मिस् कोहनबाईंच्या खर्चाबद्दल रा. तांबे यांच्या सहीचें कार्ड व हल्लीं उत्तरांतील माहिती याशिवाय दुसरें माहितीचें साधन काय ? — प्रत्युत्तर

डॉ. केतकर यांचा पगार ३०० चा ४२५ केला असून तो मंजुरीसाठीं सर्व शेअरहोल्डरांच्या पुढें आला आहे व त्यास कमिटीचीं खालीं दिलेलीं उत्तरें आहेत— — आक्षेप नं. १४

(१) रा. केतकर यांनीं अनन्य दृष्टीनें २०० रुपयांवर संपादकाचें व १०० रु. वर मॅनेजरचें काम पतकरलें होतें. पण हल्लीं ते ज्ञानकोशाशिवाय दुसरे पांच व्यवसाय करीत असतात.

(२) कंपनीचें भांडवल वाढलें तरी ज्ञानकोशाचें संपादनाचें अथवा व्यवस्थेचें काम वाढलें नाहीं.

(३) डिसेंबर १९२० अखेर ज्ञानकोशाची प्रेसकॉपी खुद्द रा. केतकर यांच्या आश्वासनाप्रमाणें व्हावयाची पण ती झाली नाहीं.

हीं कारणें फार मौजेचीं आहेत. तीं पुन्हा वाचून विचार करावा. — उत्तर

वाढता पगार घेणें मौजेचें तर खरेंच; पण तें घेणारास; देणारास नव्हे. कमिटीच्या रिपोर्टांतील सविस्तर कारणें जरूर वाचून पाहावींत. जे प्रश्न गळीं उतरूं पहातात ते हंसण्यावर किंवा रागावर घालवावे हें विवादकौशल्य आहे. डॉ. केतकर रागावले नाहींत हा त्यांच्या आत्मसंयमनाचा नमुना आहे. — प्रत्युत्तर

विंटरनिट्झच्या ग्रंथाचें भाषांतर कंपनीच्या खर्चानें करून प्रथमावृत्तीचा हक्क कांहीं मोबदला न घेतां सौ० शीलवतीबाईस बहाल केला. — आक्षेप नं. १५

परवानगी मिळाली हें खोटें आहे पण छापण्याच्या परवानगीसाठीं काय द्याल असा जबाब डॉक्टरांनीं त्यांस विचारला आहे. — उत्तर

प्रोसिडिंग टिपणांतील उत्तर वाचा: Extract from Scrapy notes of the preceedings of Directors, on loose sheets D. 20-7-20 "The proposal about publishing Winternitz Translation considered & resolved that the Company should not publish that work for the present; Misses Shilwati Bai Ketkar be allowed to publish the first edition, the Company reserving the rights for subsequent editions." रा. केतकरांचा जबाब खोटा कीं प्रोसिडिंग खोटें ? — प्रत्युत्तर

ज्ञानकोशाचें काम टाकाऊ आहे कीं विकाऊ आहे हें समजण्यास लेख पाहण्याची संधि दिली गेली. आणिलेला व्हाल्यूम परत नेला. — आक्षेप नं. १६

ज्ञानकोशाच्या मजकुराच्या परीक्षेची योग्यता ठरविण्याचें काम कमिटीकडे सोपविलें नव्हतें. रा. फाटक आणि लोक्रस यांनीं अहवाल न वाचतां त्यावर सही केली.

उत्तर

आजपर्यंत खर्च झालेल्या पैशांचें चीज करणारें काम होत आहे. किंवा नाहीं हें पहाणें हिशेब तपासणारांचें एक काम आहे. कमिटी तज्ज्ञ नसली तरी तिला तज्ज्ञांचें साहाय्य घेण्यास प्रत्यवाय नव्हता. डॉ. केतकरांस २५० रु. पगार देण्यालायक महाराष्ट्रांत एकच विद्वान मिळाला आणि तो

प्रत्युत्तर

म्हणजे सौ. शीलवतीबाई आणि त्यापेक्षां अधिक विद्वान काय ते खुद्द. उभयतां दांपत्यानें सर्व विद्वत्वशोषण केल्याचा जादू डोळ्यांत भरल्यामुळें कमिटीच्या अंगीं साक्षरतेपलीकडे योग्यता न दिसणें हा त्यांचा दोष नाहीं. कमिटीची साक्षरता त्यांनीं कमिटीच्या प्रत्येक व्यक्तीच्या वांट्यास दिली असती तर रिपोर्ट न वाचतां सही केली असें विधान त्यांस करवतेना.

माधवराव पाध्ये
सखारमपंत फाटक
मुकुंदराव लोक्रस

रा. पाध्ये मंडळींचे जे आक्षेप टेक्निकल स्वरूपाचे आहेत. त्यांस उत्तर देण्याचें विशेष कारण नाहीं.शास्त्रीय स्वरूपी वाद पुन्हां उकरण्यांत आजच्या वाचकांस महत्व नाहीं. रा. पाध्ये यांचा या वेळचा मुख्य आक्षेप मिसेस केतकर यांच्या देणगीसंबंधाचा होय. तर त्यासंबंधानें थोडासा खुलासा केला म्हणजे झालें, मिस कोहन यांस काम दिलें तें कां आणि डॉ. केतकर यांनां वढती काय म्हणून दिली हे दोन प्रश्न कायते महत्वाचे आहेत त्यांस उत्तर मुख्य पुस्तकांत दिलें असल्यामुळें येथें त्यावर विशेष चर्चा करण्याचें कारण नाहीं. रा. पाध्ये यांनीं यांत दिलेले बरेचसे आंकडे चुकीचे आहेत. उदाहरणार्थ त्या सालांतले १४५५१रुपये खर्च झाले. पैकी ६८९४ रुपये डॉ. केतकर यांस आणि त्यांच्या कुटुंबास मिळाले हें विधान खोटें आहे. खर्च २३५४८ रुपये झाला. आणि डॉ. केतकर यांस त्याच्यापैकीं फक्त ३६०० रुपये व मिसेस केतकर यास १२५० रुपये मिळाले होते.

विंटरनिटझचें भाषांतर प्रसिद्ध करण्यासंबंधानें रा.पाध्ये यांनीं प्रोसिडिंग बुकांतलीं कांहीं वाक्यें छापलीं पण पुढचें एक वाक्य त्यांनीं गाळुन टाकलें तें वाक्य That Mrs Ketkar should be informed to send her formal application direct and to state what royalty she is prepared to pay हें वाक्य गाळून इतर भाग मात्र रा. पाध्ये यांनीं प्रसिद्ध केला.कांहीं दिवसांनीं तात्पुरता समेट झाल्यानंतर रा.पाध्ये यांस त्यांनीं असें Haef fruh लिहिलें तेव्हां ते म्हणाले कीं आम्हांस केस जिंकावयाची होती व त्या दृष्टीनेंच आम्ही काय केलें तें पाहिलें पाहिजे ?

(परिशिष्ट नं. १५.)

ग्रंथोत्पत्तीनंतर

ज्ञानकोशावर झालेली टीका.

स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्राची आवश्यकता.

(ले. धनंजय रा. गाडगीळ बी. ए, एम्. लिट् केंब्रिज.)

ज्ञानकोशांतील अर्थशास्त्रावरील निबंधांत हिंदी अर्थशास्त्र हें एक पोटकलम घातलें आहे, व या पोटकलमांत प्रथम हिंदी अर्थशास्त्र स्वतंत्र असण्याची जरूरी दाखवून नंतर आपल्या समाजरचनेचा, आपल्या सांस्कृतिक परंपरेचा व हल्लींच्या आपल्या राजकीय स्थितीचा आपल्या आर्थिक रचनेवर काय परिणाम होतो याचा विचार केला आहे. स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्राची बिलकुल जरूरी नाहीं, किंवहुना असें स्वतंत्र अर्थशास्त्र आहे असें दर्शविण्याचा प्रयत्न करणेंच अर्थशास्त्रविषयक चुकींच्या कल्पना पसरविण्यास कारण होईल असें आमचें मत आहे. नवीन हिंदी अर्थशास्त्र जन्मास आलें कीं हिंदुस्थानची आर्थिक उन्नति लवकरच होणार हा समजहि आम्हांस चुकीचा वाटतो. ज्ञानकोशकार या नवीन शास्त्रास निर्माण करण्यास मुख्य कारण काय देतात तर हिंदी समाजाची घटना इंग्रजी समाजाचे घटनेहून भिन्न आहे. 'पाश्चात्य विद्वानांनीं ठरविलेले सिद्धांत आयते उचलून ते तंतोतंत इकडे लागू करून हिंदुस्थानची आर्थिक उन्नति करण्याच्या प्रयत्नास यश येणें तर शक्यच नाहीं." हें खरें व अलीकडचा कोणी अर्थशास्त्रज्ञ आपले सिद्धांत चोहोंकडे "तंतोतंत" लागू पडतात असें म्हणण्याइतका वेडगळ नाहीं. पण ते चोहोंकडे सारखे लागू पडत नसले म्हणून प्रत्येक राष्ट्राचें एक निराळें अर्थशास्त्र निर्माण करावें असेंहि कोणी प्रतिपादन करीत नाहीं. खुद्द लिस्ट सुद्धां राष्ट्रीयदृष्ट्या आर्थिक उन्नतीचा प्रयत्न करीत असतां हरएक राष्ट्राची परिस्थिति निरनिराळी असते याचा विचार करावा एवढेंच म्हणत होता. शिवाय लिस्टच्या वेळेस अर्थशास्त्राचे सिद्धांत फार अपूर्ण होते व अर्थशास्त्राचा एकंदर ओघ केवळ तात्त्विक होता हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

या हिंदी अर्थशास्त्राला ज्ञानकोशकार अर्थशास्त्राचें व्यावहारिक अंग असें एके ठिकाणीं म्हणतात; आणि शिवाय "हिंदी अर्थशास्त्र तयार करण्याकरितां प्रथम हिंदी समाजाची, त्याच्या बौद्धिक परंपरेची, सांस्कृतिक इतिहासाची, वाङ्मयाची, तसेंच प्रस्तुतच्या परिस्थितीची लेखकास चांगली माहिती पाहिजे" असें त्यांचें मत आहे. ज्ञानकोशकार आपणांस आर्थिक प्रश्नांचा व्यावहारिक दृष्ट्या विचार करतांना आपली परिस्थिति-सामाजिक, भौगोलिक, सांस्कृतिक इत्यादि-यूरोपीय देशांहून भिन्न आहे हें समजून पुढें

पाऊल टाकावें असा केवळ इषारा देऊन जर रहाते तर आमचें कांहींच म्हणणें नव्हतें. पण त्यांच्या निबंधांत हरकत घेण्यास मुख्य जागा म्हणजे त्यांनीं सामाजिक रचनेला, आपल्या कलियुगाच्या कल्पना इत्यादि गोष्टींनां आर्थिक प्रगतीला वळण लावण्यांत फाजील महत्व दिलें आहे व पर्यायानें कां होईना, हिंदी आर्थिक घटना म्हणजे कांहीं विशेष असें सुचविण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्याकडे राष्ट्रीय भावनेच्या भलत्याच ओघामुळें ' आपणांत इतर देशांपेक्षां सर्व बाबतींत कांहीं और आहे ' असें भासविण्याची प्रवृत्ति झाली आहे. अर्थशास्त्रांत या प्रवृत्तीचें उत्तम उदाहरण म्हणजे प्रो. राधाकमल मुकर्जी यांचीं लिखाणें होत. असल्या अंध राष्ट्रभक्तांच्या मालिकेत ज्ञानकोशकारांनां गोंवणें शक्य नाहीं हें आम्हीं समजून आहों; पण " हिंदी अर्थशास्त्र निर्माण करण्याची वेळ आली आहे " अशा प्रकारच्या शब्दप्रयोगामुळें या प्रवृत्तीस आणखी उत्तेजन मिळण्याचा संभव आहे. आपल्या सामाजिक परिस्थितींत व यूरोपीय परिस्थितींत फरक बराच आहे हें खरें, पण हा फरक आर्थिक बाबतींत फारसा महत्त्वाचा नाहीं. आर्थिक प्रगति अथवा आर्थिक स्थित्यंतरें केवळ भौगोलिक अथवा नैसर्गिक कारणांवरच अवलंबून नसतात. पण आजच्या आपल्या परिस्थितींत आपल्या सामाजिक रचनेमुळें उत्पन्न झालेले अडथळे फारसे महत्त्वाचे नाहींत; त्यांनीं अर्थशास्त्रीय सिद्धांताच्या क्रियेंतील घर्षण फार तर थोडेसें वाढेल इतकेंच असें आमचें म्हणणें आहे. हीं विधानें सिद्ध करण्याकरितां ज्ञानकोशकारांनी नमूद केलेल्या एक दोन मुद्द्यांचा थोडासा तपशीलवार विचार करूं.

ज्ञानकोशकार जातिभेदाच्या अनिष्ट परिणामांवर विशेष जोर देतात. सुरुवातीस व जातिभेदामुळें आर्थिक प्रगतीस थोडेसे अडथळे येतात हें आम्हीं कबूल करतों. यांपैकीं मुख्य अडथळा म्हणजे आपल्या समाजांत कलांचें अथवा शास्त्रांचें ज्ञान जितकें लवकर पसरावें तितकें पसरत नाहीं; यामुळें ज्ञानाची वाढ खुंटते व आर्थिक प्रगतीचा वेग कमी होतो. डॉ. व्हकरनें आपल्या हिंदुस्थानांतील शेतकीच्या सुधारणेवरील रिपोर्टांत नमूद केलें आहे कीं हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतांतून व जिल्ह्यांतून शेतकीच्या चांगुलपणाचें मान फार भिन्न आहे. इतकेंच नव्हे तर एकाच खेड्यांत निरनिराळ्या जाती निरनिराळ्या पद्धतीनें शेतें वाहतांना आढळून येतात. कांहीं जाती बऱ्याच सुधारलेल्या पद्धतीचा अवलंब करतात पण इतर जाती या सुधारणांचा कांहींच उपयोग करून घेत नाहींत. जातिभेद नसते व सर्व जातींतून रोटिबेटिव्यवहार सुरू असता तर इतका फरक सांपडणें शक्य नव्हतें व आपलें एकंदर शेतीचें मान बरेंच वाढतें हें उघड आहे. आपल्या समाजघटनेमुळें सर्व समाजाच्या राहणीस सामान्य स्वरूप येऊं शकत नाहीं ह

ज्ञानकोशकारांचें म्हणणेंहि खरें आहे.इतकेंच कीं, हल्लींचा एकंदर कल सामान्य स्वरूप येण्याकडे आहे व जातिभेदाचा या बाबतींतला परिणाम बराच कमी होत चालला आहे. पण हीं जीं दोन उदाहरण दिलीं तीं एवढेंच दर्शवितात कीं जातिभेदामुळें आर्थिक घर्षण वाढतें व अर्थशास्त्रीय सिद्धांताच्या क्रिया इतर समाजांत जितक्या लवकर घडून येतात तितक्या लवकर त्या हिंदुस्थानांत घडून येत नाहींत. याहून अधिक आर्थिक रचनेवर जातिभेदाचा परिणाम कांहीं होत नाहीं.

'पदार्थांची निपज करतांना श्रमविभागाच्या तत्त्वानुसार जरूर असणारें सहकार्य निरनिराळ्या जातींत होऊं शकत नाहीं' हें ज्ञानकोशकारांचें विधान चुकीचें दिसतें. या मुद्द्याचा विचार करतांना दोन गोष्टी नेहमीं लक्षांत धरल्या पाहिजेत. एक तर जातिभेद व राष्ट्रभेद यांचा घोंटाळा होऊं देऊं नये व दुसरी ही कीं कोणत्याहि वस्तूची मोठ्या प्रमाणावर निपज होणें हें लोकांच्या सांपत्तिक स्थितीवर व त्या वस्तूकरितां असलेल्या मागणीवर अवलंबून असतें. आपलें विधान सिद्ध करण्याकरितां ज्ञानकोशकार दोन उदाहरणें देतातः एक शिंप्याच्या धंद्याचें व दुसरें खाणावळीच्या धंद्याचें. यांत गुजराथी व दक्षिणी लोकांच्या पोषाखांतील फरकामुळें तोटा होतो असें त्यांचें म्हणणें आहे. दक्षिणी व गुजराथी यांच्या पेहरावांतील फरकामुळें शिंप्याच्या धंद्यांतील श्रमविभागास खरीच अडचण होते कीं काय ही गोष्ट अलाहिदा आहे येथें मूळांतच राष्ट्रभेद व जातिभेद यांत घोंटाळा दृष्टीस पडतो. दक्षिणी व गुजराथी हे फरक जातिभेदामुळें उत्पन्न झालेले खात्रीनें नव्हत. हिंदुस्थान हें इंग्लंडसारखें एक राष्ट्र नाहीं. दहाबारा राष्ट्रांचें कडबोळें आहे. ज्यांची भाषा निराळी परंपरा निराळी त्यांचे पोषाखहि निराळे. पण यांत जातिभेदाचा प्रश्न कोठून आला? जर जातिभेदामुळें श्रमविभागास कोठें अडथळा येत असेल तर तो पागोटी बांधण्याच्या धंद्यांत. पगड्यांशिवाय बाकी साधारण गुजराथ्यांचा पोषाख एकच असतो. तीच गोष्ट खाणावळींची. मुंबईत गुजराथी व दक्षिणी खाणावळी निराळ्या खऱ्या पण एखादी दक्षिणी खाणावळ पाहिली असतां तींत साधारण एका आर्थिक पायरीवरचे पण सर्व जातींचे असे महाराष्ट्रीय सांपडतील. वरें, या पोषाखांच्या व खाद्यपेयांच्या धंद्यांत मोठ्या प्रमाणावर निपज कितपत शक्य आहे? प्रथमच ही गोष्ट कळून येईल कीं, या धंद्यांत वैयक्तिक आवडीनिवडीचा प्रश्न महत्त्वाचा असल्यामुळें एकाच प्रकारची अशी सार्वजनिक मागणी सहसा असत नाहीं. पाश्चिमात्त्य देशांस सुद्धां या धंद्यांतून मोठ्या प्रमाणावर निपज अगदीं अलीकडे होऊं लागली आहे. इंग्लंडांत हल्लीं सुद्धां आयते तयार केलेले सूट चांगल्या स्थितींतले लोक सहसा घेत नाहींत आतां दुसऱ्या दृष्टीनें या प्रश्नाकडे पहा. आयते तयार केलेले कुडते

वगैरे तयार न होणें हा आपल्या बहुजनसमाजाच्या रहाणीचा दोष आहे.साधारण शेलकरी व मजूरवर्गास धोतर, उपरणें अगर मुंडासें याकरितां लागणाऱ्या कापडाची निपज मोठ्या प्रमाणावर होते, व त्यांत जातिभेदाचा कोंठें अडथळा येत नाहीं. मध्यम वर्गास लागणारा कपडा व धोतरें यांच्या उत्पादनांतहि जातिभेदामुळें कांहीं अडथळा येत नाहीं. खाद्यपेयाच्या धंद्याचीहि स्थिति तीच आहे आपल्याकडे टिन्ड अथवा कॅन्ड पदार्थांचा खप नाहीं यांचेंहि खापर ज्ञानकोशकार जातिभेदाच्याच माथीं फोडणार कीं काय कोण जाणे ! बिस्किटें वगैरेंनांहि मागणी आपल्याकडे फार कमी; मग श्रमविभागाचें तत्त्व चालण्यास वाव असणार कोंठें व जातिभेद आडवा येणार कोठून ? जेथें मोठ्या प्रमाणावर निपज शक्य आहे, तेथें जसजशी मागणी वाढते तसतशी निपज मोठ्या प्रमाणावर होतेहि. पिठाच्या व तांदळाच्या गिरण्या हेंच दर्शवितात. तसेंच अलीकडे गुलकंद, गरम मसाला वगैरे जिनसांनांहि सार्वत्रिक मागणी उत्पन्न झाली असून त्यांची निपजहि मोठ्या प्रमाणांत होऊं लागली आहे. या जिनसांकरितां मागणी केवळ सांपत्तिक स्थितीवरूनच ठरत नाहीं; तर घरांतील बायकांस वेळ व इतर सोय कितपत आहे यावरहि ती अंशतः अवलंबून असते. खेड्यापाड्यातून बायकांना निवडणें, पाखडणें; कांडणें, कुटणें इत्यादि करण्यास वेळ व तशीच जागेची सोयहि असते पण तेंच मुंबईत अशक्य. म्हणून मुंबईत आयत्या तयार केलेल्या जिनसांनां मागणी फार. हा मुख्यत्वें नागर व अनागर राहणींतला फरक आहे. आमचा मुद्दा एवढाच कीं, जातिभेदामुळें येथें कांहीं अडथळा येत नाहीं [या बाबींत एवढें मात्र कबूल केलें पाहिजे कीं, जातिभेदामुळें जरी नव्हे तरी खाण्यापिण्याच्या निरनिराळ्या बंधनांमुळें हिंदुसमाजाचा बराच आर्थिक तोटा होतो लंडनमध्यें हिंदी खलाशांच्या आर्थिक स्थितीची चौकशी करीत असतां शंभरावर हिंदी खलाशांची माहिती आम्हीं गोळा केली पण त्यांतील बहुतेक सगळेच मुसुलमान अगर ख्रिस्ती होते.]

आतां चामड्याच्या धंद्याचें आणखी एक उदाहरण ज्ञानकोशकार देतात तें वरवर पाहिलें असतां बरेंच महत्त्वाचें वाटतें. जुन्या पद्धतीनें चालणाऱ्या खेडवळ धंद्यांत बहुधा कांहीं ठराविक जातीचेच लोक आढळतात हें खरें. पण या धंद्यांत सुद्धां नवीन शास्त्रीय पद्धति सुरू करण्यास व मोठे कारखाने काढण्यास जातिभेदानें कांहींच अडथळा आणलेला नाहीं. मद्रास इलाख्यांत तर चामड्याच्या धंद्यांत इतर जातीं पुष्कळ आढळतात [चॅटरटन (मद्रास) यूथे; व मार्टिन (मुंबई) यांचे चामड्याच्या धंद्यावरील रिपोर्ट पहा]. मोठ्या कातडीं कमावणाऱ्या कारखान्यांतून कामगार वर्ग सगळा चांभार जातीचा खात्रीनें नसतो. शिवाय चांभाराचा धंदा घाणेरडा म्हणूनहि बऱ्याच जणांस

तो पतकरावासा वाटत नाहीं. हिंदूंच्या अहिंसेबद्दलच्या कांहीं समजुती व चामड्याचा विटाळ या गोष्टी त्या धंद्याची स्थिति खालावण्यास अंशतः कारण भूत असतील पण जातिभेदाचा येथेंहि परिणाम तराच आहे असें वाटत नाहीं हल्लींचा मुख्य प्रश्न प्रगतीचा व तींत तर जातिभेद आडवा येण्याचें कांहींच कारण दिसत नाहीं.

जातिभेदाचा अनेष्ट परिणाम असा एक दाखवितां येईल कीं, त्याच्यामुळें एकच धंदा वंशपरंपरा चालतो. पण बहुतेक सर्व देशांत--जेथें जातिभेद नाहीं तेथें सुद्धां बापाचा धंदा लेकानें पुढें चालविण्याचा प्रघात फार. आंधळेकडोंहे आपल्या जातीच्या परंपरागत धंद्यावर उपजीविका नीट चालूं शकत नाहीं असें आढळून आल्यास लोक दुसरे धंदे चटकन पतकरतात. खानेसुमारीच्या बऱ्याच रिपोर्टांत जाती व धंदे यांचे आंकडे दिले आहेत, त्यांपासून फार बोध होण्यासारखा आहे. या आंकड्यांसंबंधीं विचार केला असतां कांहीं गोष्टी उघड दिसतात. एक तर सुमारें पन्नास पाऊणशें वर्षांपूर्वी जरी जात व धंदा हीं स्थूल मानानें एकच असलीं तरी आज तशी स्थिति नाहीं. आपल्या जातीचा धंदा सोडणें हल्लीं बऱ्याचजणांना प्राप्त झालें आहे. आपल्या जातीचा धंदा सोडल्यानंतर साधारण बरी स्थिति असल्यास मनुष्य शेतकी करूं लागतो नाहीं तर त्यास मोलमजुरी करावी लागते; इतर धंदे तो सहसा करीत नाहीं. पण यांचें कारण जातिभेद नसून आपल्या सर्व जुन्या धंद्यांची निकृष्ट स्थिति हें होय. सुतार, लोहार, चांभार, वगैरेंच्या जुन्या पद्धतीच्या सर्व धंद्यांस उतरती कळा लागली आहे. पण जेथें कोणताहि धंदा किफायतशीर वाटतो तेथें इतर जातींचे लोकहि त्या धंद्यांत प्रवेश करतात. कांहीं प्रांतांतून कोष्टयांचा व कांहीं प्रांतांतून शिंप्यांचा धंदा फायदेशीर होता तेव्हां त्या धंद्यांत इतर जातींचेहि लोक सांपडत असत. तसेंच अलीकडे शहरांतून फर्निचर वगैरे जिनसांना बरीच मागणी असल्यामुळें सुतारकामांत मिळकत बरीच होऊं लागली आहे. त्या अर्थी नागर सुतार वर्गांत हल्लीं इतर जातींचा भरणा बराच आहे. जुन्या पद्धतीनें काम करणाऱ्या व निकृष्ट स्थितींत असलेल्या खेडवळ धंद्यांत इतर जाती शिरतील कशाला ? पण जेव्हां कांहीं सुधारणेमुळें अथवा नवीन मागणीमुळें धंद्यास ऊर्जितावस्था येते तेव्हां जातिभेदास न जुमानतां इतर जातींचे लोक देखील त्या धंद्यांत आपला शिरकाव करून घेतात [याविषयीं विशेष माहिती निरानिराळ्या खानेसुमारीच्या रिपोर्टांत मिळेल]. जाती व धंदे यांचे आंकडे मिळविण्यास श्रम पडतो व ते असावे तितके खात्रीलायक मिळत नाहींत म्हणून अलीकडील खानेसुमारीच्या रिपोर्टांत ते सांपडत नाहींत. पण या दोन आंकड्यांतील तफावत फार मोठी आहे ही गोष्ट निर्विवाद आहे इतकेंच नव्हे तर ही तफावत सारखी वाढत चालली आहे [१८९१ सालच्या पंजाब व मद्रास यांच्या खानेसुमारीच्या

रिपोर्टांत आंकडे पहा] कोणत्याहि जातींतले लोक आपल्या जातीचा धंदा सोडून इतर धंदे लवकर पहातात यावरून जातिभेदाचीं बंधनें आर्थिक बाबतींत फार सैल झालीं आहेत हें सिद्ध होतें.

ज्ञानकोशकार आणखी दोन विधानें करतातः पहिलें विधान हें आहे. "याप्रमाणें एकाच समाजांत भिन्न भिन्न वर्ग व त्याच्या भिन्नभिन्न गरजा यामुळें समाजांत आर्थिक उन्नति होण्याच्या मार्गांत भयंकर अडचणी येतात." आमच्या सर्वसाधारण गरजांच्या बाबतींत जातिभेदामुळें भिन्नत्व कोठें उत्पन्न होतें हें आम्हांस कळत नाहीं. पोषाख व खाण्यापिण्याचे पदार्थ या दोहोंतच जातिभेदामुळें मागणींत फरक होतो असें दाखविण्याचा ज्ञानकोशकारांनीं प्रयत्न केला आहे. या दोन्ही धंद्याच्या स्थितीचें सविस्तर विवेचन आम्ही वर केलेंच आहे. बाकी सर्व महत्त्वाच्या बाबतींत जातिभेदामुळें मागणींत कांहीं फरक होत नाहीं हें ज्ञानकोशकारांनां सुद्धां कबूल करावें लागेल. आपल्या घरांची बांधणी, तीं बांधण्यास लागणारें सामानसुमान वगैरे गोष्टी आपल्या सांपत्तिक स्थितीवर अवलंबून असतात, आपल्या जातीवर नव्हे. ब्राह्मण शेतकरी झाला म्हणून तो कांहीं कुणब्याहून निराळ्या शेतकी अवजारांची मागणी करीत नाहीं. एक जात दिव्यांतून राकेल वापरते म्हणून दुसऱ्या जातीनें गोड्या तेलाची मागणी केल्याचें आमच्या ऐकिवांत नाहीं. कोणतीहि महत्त्वाची बाबत घ्या, सर्व जातींची मागणी साधारणपणें सारखीच; मागणी परिणामकारक होणें आपल्या सांपत्तिक स्थितीवर अवलंबून आहे. बारीक सारीक फरक असतील पण ते अगदीं क्षुल्लक बाबतींत. आतां पगड्यांची घाटणी जातीजातींची निराळी, अथवा देशावरील ब्राह्मण स्वयंपाकांत गरम मसाला फार वापरतात पण सारस्वतांस मात्र ओल्या खोबऱ्याची जरूर फार, एवढ्यावरून जातिभेदामुळें आमची "आर्थिक उन्नति होण्याच्या मार्गांत भयंकर अडचणी येतात" असें ज्ञानकोशकारांस म्हणावयाचें असल्यास हरकत नाहीं. हें जरा अतिशयोक्तीचें विधान नव्हे काय? इतकीच पृच्छा आम्ही त्यांस करतों. ज्ञानकोशकारांचें दुसरें विधान म्हणजे "पदार्थांची निपज मोठ्या प्रमाणावर होणें व प्रत्येक धंद्यांत कामाची वांटणी होऊन प्रत्येक अंगांत प्रावीण्य संपादन करणें या गोष्टी जातिभेदामुळें फुट पडून विस्कळित झालेल्या हिंदु समाजांत मुळींच संभवत नाहींत" "आणि ही गोष्ट इतकी उघड आहे असें त्यांस वाटतें कीं तिच्या समर्थनार्थ ते कांहींच पुरावा देऊं इच्छीत नाहींत. पदार्थांची निपज मोठ्या प्रमाणावर केव्हां होऊं शकते याचा थोडासा विचार आम्ही मागेंच केला आहे. कोणत्याहि भागाची वांटणी करण्यास जातिभेदामुळें काय अडथळा येतो? जुन्या काळांत जेव्हां आपणांस यंत्रांचें साधन नव्हतें तेव्हां कोणत्याहि धंद्यांत श्रमविभाग फारसा होणें शक्यच नव्हतें.

पण त्या काळची यांत्रिक सुधारणा लक्षांत घेतां शक्य तितका श्रमविभाग होत असे. तसेंच जुन्या धंद्यांतून हळूहळू नवीन यांत्रिक सुधारणांचा जेव्हां प्रवेश झाला तेव्हां कामाची वांटणी जास्त चांगल्या रीतीनें होत गेली [बर्डन (यू. पी.) व निसिम (मुंबई) यांचे जर व कलाबूत या धंद्यावरील मोनोग्राफ पहा. तसेंच डाम्पियर (यू. पी.) व इतर प्रांतांचे पितळ व तांब्याच्या भांड्यांच्या धंद्यावरील मोनोग्राफ पहा]. कोणत्याहि धंद्यांत प्रावीण्य मिळविणें जातिभेदामुळें कसें अशक्य होतें ? आपले कारागीर नवीन यंत्रांचा अथवा शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करीत नाहींत यांचें कारण जातिभेद नाहीं. हा आपल्या शिक्षणाच्या अभावाचा परिणाम आहे. वंशपरंपरा सारखा एकच धंदा चालत असल्यामुळें एक प्रकारचें प्रावीण्य मिळविण्यास जातिभेदाचा थोडासा उपयोगच होतो असें म्हणण्यास हरकत नाहीं. हिंदु समाज सामाजिकदृष्ट्या विस्कळित असेल पण तो आर्थिकदृष्ट्या विस्कळित होत नाहीं.

एकदां, जातिभेदानें आमच्या आर्थिक आपत्तींची परंपरा ओढवली आहे असें ज्ञानकोशकारांच्या मानानें घेतलें, मग काय? सर्व कांहीं जातिभेदावर लादलें जातें. हिंदुस्थानांत मोठा व्यापार नाहीं हाहि जातिभेदाचाच अपराध हें ज्ञानकोशकार कसें सिद्ध करतात तें पहा. "बुद्धि,शारीरिक श्रम व भांडवल हीं तिन्ही एकत्र होणें मोठ्या व्यापारास आवश्यक" हा अर्थशास्त्राचा सर्वमान्य सिद्धांत प्रथम प्रतिपादितात. मग आपल्याकडे महाराष्ट्रीय ब्राह्मणाजवळ बुद्धि, मारवाड्याजवळ भांडवल व शूद्राजवळ शारीरिक बल असतें. या तीन निरनिराळ्या जाती झाल्या. त्यांचा एकमेकांशीं संबंध आमच्या समाजांत येणार कसा व मोठा व्यापार होणार कसा ! या अर्थशास्त्रास काय म्हणावें ? शारीरिक बलाचा प्रथम विचार करूं. मजूर लोक हे काम कशाकरितां करितात ? तर केवळ मजुरी मिळविण्याकरितां. ज्याप्रमाणें मजुरी मिळेल त्याप्रमाणें त्यांचें काम होईल व जेथें मजूरी जास्त मिळेल तेथें जाण्याचा मजूरवर्गाचा कल राहील [अर्थात मजूरवर्गाची चलनशक्ति पूर्ण आहे असें गृहीत धरलें आहे प्रत्येक लहानशा अडथळ्याचा विचार केला असतां विवेचन फारच लांबेल]. पण कुणबी मजूर दोन पैसे कमी घेऊन कुणबी कारखानदाराकडे काम करील असें ज्ञानकोशकारांस वाटतें काय ? आमच्या समाजांत महार व ब्राह्मण यांचा संबंध एकमेकांशीं फार कमी येतो पण पगार नीट मिळाल्यास ब्राह्मणाच्या दुकानांत चाकरी करण्यास महारांची कांहींच हरकत नसते. मारवाड्यांचें उदाहरण यूरोपांतील यहुद्यांप्रमाणेंच आहे. यहुद्यांचा यूरोपांतील आर्थिक रचनेवर जेवढा परिणाम होतो तेवढा आमच्याकडे मारवाड्यांच्यामुळें होईल. मारवाड्यांच्या हातांत कांहीं हिंदुस्थानांतला सर्व पैसा नाहीं. बंगालचें उदाहरण घ्या.बंगाली कायस्थ, ब्राह्मण वगैरे उच्च जातीचेच बंगालचे मोठमोठे

सधन जमीनदार आहेत, व त्या जातींतच बंगालचा बुद्धिवान व सुशिक्षित वर्ग आहे. मग येथें बुद्धि व भांडवल यांचा सांगड होण्यास ज्ञानकोशकारांच्या मतें कांहींच अडचण नसावी. तरी पण बंगाल्यांत एतद्देशीय लोकांनीं चालविलेले धंदे फार कमी आहेत. आणि जे कांहीं आहेत ते गेल्या दहा पंधरा वर्षांतच निघालेले. निरनिराळ्या अर्थशास्त्रीय कल्पनांचा घोंटाळा पुन्हां खालील विधानांत दृष्टीस पडतो. " आमच्या गुजराथी बनिया व मारवाडी समाजापैकीं परदेशांत जाऊन उच्च शिक्षण मिळविणारे इसमच नाहींत. यामुळें बुद्धि व भांडवल यांचें सहकार्य दुरापास्त झालें आहे" जसें कांहीं परदेशांत जाऊन आल्याशिवाय भांडवलाचा उद्योगधंद्यांच्या वाढीकारितां नीटसा उपयोगच करितां येत नाहीं ! आतां धंदे चालविण्यास अथवा सुरू करण्यास दोन प्रकारचें शिक्षण व बुद्धि यांची जरूरी आहे. मुख्य म्हणजे धंद्यामधील कार्ययोजकता. आपल्या उत्पाद्य वस्तूच्या मागणीचा व पुरवठ्याचा विचार करणें, सर्व धंदा व्यवस्थित चालविणें, काटकसर कोठें करतां येईल याकडे सारखें लक्ष देणें, व थोडाबहुत धोका आहे असें समजूनहि योग्य ठिकाणीं भांडवल खर्ची घालण्याची तयारी असणें वगैरेस लागणारी जी बुद्धि व जें शिक्षण धंदा सुरू करण्यास अथवा चालविण्यास आवश्यक आहे तें परदेशांत जाऊन मिळत नाहीं. यास मुख्यतः हिंदुस्थानांतिल धंद्याची घटना व त्यांच्या अडचणी यांचा अनुभव लागतो. परदेशीय औद्योगिक घटना व अर्थशास्त्र यांच्या ज्ञानानें फायदा होईल पण हें ज्ञान आवश्यक नाहीं. दुसऱ्या प्रकारचें शिक्षण म्हणजे त्या धंद्यांत लागणारें शास्त्रीय पद्धतीचें औद्योगिक शिक्षण होय. हें शिक्षण मिळविण्यास परदेशांत जाणें हल्लीं जरूरीचें आहे. पण असलें शिक्षण यूरोपांत सुद्धां खुद्द भांडवलवाले स्वतः घेत नाहींत. ते केवळ पगार देऊन त्या बाबीतले तज्ज्ञ लोक नोकरीस ठेवतात आणि तसे तज्ज्ञ मारवाडी अगर गुजराथी बनिया फायदा होईल असें दिसून आल्यास आजहि नोकरीस ठेवितात. खरें पाहिल्यास मारवाडी व गुजराथी बनिया या जातींनीं आपल्या भांडवलांचा उद्योगधंद्यची वाढ करण्याकडे जितका चांगला उपयोग केला आहे, तितका दुसऱ्या कोणत्याहि जातींनीं केला असता कीं नाहीं याबद्दल शंकाच आहे. आपल्या उद्योगधंद्याच्या वाढीचा प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचा आहे. अशिक्षित मजूरवर्ग, थोडें भांडवल व भांडवलाकरितां शेतकी, व्यापार, उद्योगधंदे यांची चढाओढ, कोळसा, लोखंड वगैरे खनिज संपत्तीची वाण अशा निरनिराळ्या मोठमोठ्या अडथळ्यांमुळें आपली औद्योगिक वाढ आज खुंटली आहे. जातिभेदाचा यावर परिणाम अत्यंत थोडा होतो आणि जातिभेद जरी आज नसते तरी या वाढीचा वेग जास्त झाला असता कीं नाहीं याची शंकाच आहे.जातिभेदाच्या

प्रश्नाचा आम्ही जरा विस्तृत विचार केला. कारण कीं ज्ञानकोशकार आपल्या विवेचनांत याला बरेंच महत्त्वाचें स्थान देतात. ज्ञानकोशकारांनीं नमूद केलेल्या प्रत्येक मुद्द्याचा निरनिराळा विचार आम्हीं विस्तारभयास्तव येथें करीत नाहीं.

आमची सामाजिक रचना भिन्न म्हणून आमची आर्थिक रचनाहि निराळी असली पाहिजे अशी ज्ञानकोशकारांची विचारपरंपरा दिसते. पण हें खरें नाहीं. आमच्या आर्थिक रचनेसारखी रचना गेल्या शतकांत इतर बऱ्याच देशांची होती व आजहि कित्येक देशांची आहे. बरें, हल्लीं जे फेरबदल जगांत होत आहेत त्यांच्या हिंदुस्थानावरील परिणामाकडे पहा. आमच्या देशाच्या गेल्या शतकांतील आर्थिक उत्क्रांतिकडे लक्ष दिलें असतां असें आढळून येईल कीं या उत्क्रांतीची दिशा यूरोपियन देशांत १८ व्या व १९ व्या शतकांत झालेल्या उत्क्रांतीच्या दिशेप्रमाणेंच आहे. आर्थिक बाबींत आर्थिक गरजांच्या दडपणामुळें सामाजिक रचनेचा तेव्हांच पाडाव होतो. आपल्याकडे अलुत्याबलुत्यांची पद्धत फार जुनी आहे. यांत प्रत्येकाचें ठराविक वेतन असून त्यावद्दल त्यास ठराविक चाकरी करावी लागे. कांहीं वर्षांपूर्वी आपल्याकडे गांवच्या मेलेल्या गुरांच्या कातड्यांवर चांभार अथवा धेड यांचा वंशपरंपरा हक्क चालत आला होता. पण सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी जेव्हां कातड्याच्या किंमती जगभर फार वाढल्या व मेलेल्या गुरांच्या कातड्यास चांगली किंमत येऊं लागली त्याबरोबर चांभार व धेड यांच्या पुरातन हक्कास गांवकरी लोक जुमानीत नाहींसे झाले. आमच्या आर्थिक रचनेंत विशेष असें कांहींच नाहीं. आमची आर्थिक उत्क्रांति हळू हळू होत आहे इतकेंच. बाकी सर्व बाबतींत ती इतर देशांप्रमाणेंच चालली आहे. आमच्या नागरधंद्यांच्या घटनेंतील स्थित्यंतर, आमच्या मजूरवर्गाची जमिनीपासून फारकत इत्यादि गोष्टींचा बारकाईनें विचार केला असतां या विधानांची खात्री पटेल. [प्रस्तुत लेखकाचें नुकतेंच प्रसिद्ध झालेलें इंडस्ट्रिअल एव्होल्यूशन ऑफ इंडिया पहा]. या सर्व महत्त्वाच्या बाबींत आपलें इतर देशांशीं पुरतें साम्य आहे. मग स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्राची आवश्यकता कोठून उरली; हें अर्थशास्त्र निर्माण करण्याकरितां ज्ञानकोशकार आणखी एक कारण देतात. ते म्हणतात, "आजपर्यंत-शंभर दीडशें वर्षांच्या ब्रिटिश अमदानींत पुष्कळ ब्रिटिश अर्थशास्त्र शिकलेल्या विद्वानांनीं अर्थशास्त्रीय विषयांचें शिक्षण दिलें पण अद्याप हिंदुस्थानची आर्थिक स्थिति फारशी सुधारली नाहीं." आम्ही वर दाखविल्याप्रमाणें फार मोठे अडथळे वाटेंत असतां नुसत्या अर्थशास्त्राच्या शिक्षणानें आर्थिक उन्नति कशी होणार? आणि विद्वानांनीं आर्थिक स्थिति सुधारण्यास त्यांच्या हातांत कांहीं तरी सत्ता पाहिजे, ती आमच्याकडील विद्वानांना कोठें होती? शिवाय अजून अर्थशास्त्राची प्रगति फार व्हावयाची आहे. मार्शल

याच्या वेळेपावेतों इंग्रजी अर्थशास्त्राची व व्यवहाराची फारकत बरीच होती आणि गेल्या दोनतीन वर्षांतच एकॉनॉमिक बॅरोमीटर्स् वगैरे तयार करण्याचा प्रयत्न होऊन उद्योगधंद्यास प्रत्यक्ष उपयोगी असें वळण अर्थशास्त्रास लागत आहे. ही खुद्द इंग्लंडांतील गोष्ट झाली. हिंदुस्थानांतील अर्थशास्त्रीय शिक्षण इंग्लंडांतील शिक्षणाच्या वरींच वर्षें मागें रेंगाळतें ही गोष्ट प्रसिद्धच आहे. तेव्हां हिंदी अर्थशास्त्रज्ञांनी जर आर्थिक उन्नतीस मदत केली नाहीं तर तो अर्थशास्त्राच्या अपरिपक्वतेचा व आपल्याकडील शिक्षणपद्धतीचा दोष आहे. याला उपाय म्हणजे हिंदुस्थानच्या आर्थिक इतिहासाचा तुलनात्मक दृष्टीनें अभ्यास करणें, व्यावहारिक अर्थशास्त्राकडे जास्त लक्ष देणें व यूरोपीय क्रमिक पुस्तकांतील ठराविक उदाहरणें न देतां हिंदी परिस्थितीकडे लक्ष देऊन अर्थशास्त्रीय सिद्धांत शिकविणें हा होय. प्रत्येक देशांतील परिस्थिति निराळी, म्हणून प्रत्येक देशीय अर्थशास्त्र असणें शक्य नाहीं.

एकंदर ज्ञानकोशकार सामाजिक रचनेला आर्थिक बाबतींत भलतेंच महत्त्व देतात असें आमचें मत आहे. त्यांनीं हिंदी अर्थशास्त्राच्या विवेचनांत जातिभेद, दैववाद यांवर पानें खर्च केलीं पण जमीनमहसूल, उद्योगधंदे नगरवाढ वगैरे आर्थिक दृष्ट्या ज्या खऱ्या महत्त्वाच्या गोष्टी त्यांचा बिलकुल विचार केला नाहीं. तसेंच ज्ञानकोशकारांची अर्थशास्त्राच्या कक्षेबद्दल चुकीची कल्पना दिसते. सामाजिक विषयांवरील सर्व शास्त्रें एकमेकांशीं संलग्न आहेत, व एकाचा विचार करतांना इतरांचा थोडाबहुत विचार करावा लागतो हें जरी खरें असलें तरी प्रत्येक शास्त्राची कांहींतरी आंखलेली मर्यादा असावी लागते. आणि या मर्यादेंतील विषयांचा त्या त्या शास्त्रांत विचार करावयाचा असतो. या दृष्टीनें समाजरचनेला अर्थशास्त्रांत फार गौण महत्त्व आहे. शिवाय ज्ञानकोशकारांची अशी समजूत दिसते कीं अर्थशास्त्र म्हणजे एक ठराविक सिद्धांतांचा सांठा. हे सिद्धांत यूरोपांत तयार झाले व ते आपणास लागू पडत नाहींत तेव्हां करा एक नवीन हिंदी अर्थशास्त्र निर्माण! पण खरी परिस्थिति अशी नाहीं. अर्थशास्त्राचे सिद्धांत व्यवहारांत आणतांना सर्व बाजूंनीं प्रथम योग्य विचार केला पाहिजे ही गोष्ट सर्वमान्य आहे आणि अर्थशास्त्र म्हणजे एक सिद्धांतांचा गड्डा व हे सिद्धांत जिकडे तिकडे सारखे लागू पडतात असेंहि कोणी म्हणत नाहीं. यासंबंधीं केंब्रिज येथें प्रसिद्ध झालेल्या अर्थशास्त्रीय विषयांवरील एका माळेच्या प्रस्तावनेंतून खालील उतारा देतों. या प्रस्तावनेंत मि. केन्स म्हणतात. "अर्थशास्त्रांय उपपत्ति" आपणांस ज्यावरून तत्काल एखाद्दें धोरण बसविता येईल असे निश्चित सिद्धांत काढून देत नाहीं. अर्थशास्त्रीय उपपत्ति हें एक तत्त्व नसून ती पद्धति आहे. ती एक विशिष्ट मानसिक रचना व विचारपद्धति असून तिच्यापासून एखाद्यास विशिष्ट गोष्टींसंबंधीं

अचूक सिद्धांत काढण्यास मात्र मदत होते. आतां धंदेवाईक अर्थशास्त्रज्ञांचें मुख्य कर्तव्य म्हणजे प्रस्तुत वस्तुस्थितीचें साकल्यानें ज्ञान मिळविणें आणि त्यास अर्थशास्त्रीय तत्त्वें कुशलतेनें लागू करणें किंवा आपल्या पद्धतीचीं मूलतत्त्वें सुलभ, बिनचूक व उद्बोधक रीतीनें प्रतिपादन करणें हेंच राहिलें आहे."

कोणत्याहि बाजूनें विचार करा असता स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्र उत्पन्न करण्याची जरूरी बिलकूल नाहीं इतकेंच नव्हे तर अशा प्रकारच्या संज्ञेनेंच फार चुकीच्या समजुती पसरण्याचा संभव आहे. उगीच अवांतर बऱ्याचशा गोष्टींचा विचार करून मुख्य अर्थशास्त्राची कक्षा विसरून चालावयाचें नाहीं. आणि हिंदी अर्थशास्त्र स्वतंत्र तयार करून आमच्या आर्थिक रचनेंत कांहीं विशेष आहे असा समज उत्पन्न करणेंहि योग्य नाहीं. व्यावहारिक दृष्टीनें अर्थशास्त्राचा विचार करणें बरोबर आहे आणि हिंदुस्थानांतील एकंदर परिस्थितीचा विचार करूनच नंतर अर्थशास्त्राचे सिद्धांत लागू कराचे पण यास हिंदी अर्थशास्त्र असें स्वतंत्र शास्त्र निर्माण करण्याची जरूरी नाहीं. समाजशास्त्र, मानसशास्त्र व अर्थशास्त्र यांची खिचडी अर्थशास्त्राच्या मर्यादेंत नको. अशामुळें आधींच निकृष्ट स्थितींत असलेल्या हिंदुस्थानांतील अर्थशास्त्राच्या शिक्षणास आणखी वाईट वळण लागण्याचा संभव आहे. असले विचार ज्ञानकोशकारांसारख्या अधिकारी गृहस्थांनीं प्रदर्शित केले. त्यांस विरोध करणें जरूरीचें वाटलें म्हणून हा लेख लिहीत आहों.

(परिशिष्ट नं. १६)

महाराष्ट्रकाव्य व ज्ञानकोश.

(ले. दत्तात्रय केशव केळकर, बी. ए. हिंदी हायस्कूल, पांचगणी)

[केसरी १२ मे. १९२५.]

लेखांक १ ला.

अहिल्याबाईचा पुत्र, खंडेराव दान म्हणून रौप्य आणि सुवर्ण मुद्रिकांनीं भरलेलीं पात्रें च्या पात्रें ब्राह्मणांस अर्पण करी. पण तीं अर्पण करतांना पुष्कळ वेळां खोडसाळ युक्तीचा अवलंब करी तशाच प्रकारच्या युक्तीचा अवलंब करण्याची 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' कारांनां मधून मधून लहर येत असल्याचें आढळून येतें. खंडेराव ब्राह्मणांस निमंत्रण करून त्यांच्यापुढें सुवर्णमुद्रांनीं भरलेलें तबक ठेवी व त्यांतून मनमानेल तितक्या मुद्रा उचलून घेण्यास सांग. त्या सुवर्णमुद्रांच्या लकाकीनें मुग्ध झालेला ब्राह्मणाचा हात मुद्रांनां कुरवाळूं लागतो न लागतो तोंच मुद्रांच्या खालीं दडपून ठेवलेल्या जहरी इंगळ्या

त्यांशीं हस्तांदोलन करीत, त्यामुळें बिचारा ब्राह्मण धनलोभ आणि शारीरिक वेदना यांच्यामध्यें लोंबकळत राही. ज्ञानकोशकारांनीं अजब उद्योग करून महाराष्ट्र वाचकवर्गाला अजपावेतों अगम्य असलेलीं ज्ञानसंपत्तीचीं भांडारें खुलीं करून दिलीं याबद्दल महाराष्ट्र ज्ञानभिक्षू त्यांचें सदैव ऋणी राहतील. पण खुल्या केलेल्या भांडारांतील ज्ञानसंपत्ति लुटून येत असतां खंडेरावी ढंगा मारण्याची हौस भागवून घेण्याचा मोह कोशकारांनीं टाळला असता तर ज्ञानभिक्षूंकडून मिळणारा धन्यवादहि प्रसन्नचित्तानें मिळाला असता. पण या धन्यवादापेक्षां उपमर्दकारक मतडंखांनीं तळमळणाऱ्यांच्या वेदना पाहण्यांत कोशकारांना अधिक हौस वाटत असावी. कोशकारांनीं अनेकांनां तळमळावयास लावलें आहे. त्यांपैकीं मासला म्हणून अखिल महाराष्ट्र कविवर्गाची त्यांनीं कशी प्राणांतिक अवस्था करून सोडली आहे ह्याकडे प्रस्तुत वाचकवर्गाचें लक्ष वेधावयाचें आहे.

ज्ञानकोशकारांचा अभिप्राय.

महाराष्ट्रीय ज्ञानकोश विभाग अक्षरा यांत काव्य या सदराखालीं एक विस्तृत लेख आला असून काव्यशास्त्र, संस्कृत काव्य, महाराष्ट्रकाव्य वगैरेंची माहिती वाचकांस पुरविली आहे. त्यांत महाराष्ट्रकाव्यासंबंधानें समालोचनात्मक थाटाचे जे विचार प्रगट केले आहेत ते वाचून महाराष्ट्र वाचक आश्चर्यमूढ झाल्याविना राहणार नाहींत. मूळ लेखांतील 'मराठी काव्य व प्राचीन कवी' या पोटमथळ्याच्या पहिल्या कालम दीड कालमांत प्राचीन मराठी काव्याची जबानी घेऊन नंतर अधिकारयुक्त वाणीनें निकाल देतांना कोशकार लिहितात कीं, "एकंदरीनें पाहतां मराठींतील काव्यवाङ्मय म्हणजे उष्टें आणि भिकार होय यांत शंका नाहीं. सुशिक्षित व शृंगारिक वाङ्मय अलीकडील मासिकांतील भीत भीत प्रसिद्ध केलेल्या पद्यांशिवाय मराठींत नाहीं.व आहे तें अगदीं कनिष्ठ प्रतीचें आहे. भावना सुशिक्षित होऊन त्यांचा विकास ज्या समाजांत नाहीं त्या समाजांत खरें प्रेमवाङ्मय कोठून सांपडणार ? पोवाडे देखील निर्बुद्ध अशा लोकांनींच लिहिले असल्यामुळें त्यांत कवित्व जरी मधून मधून दृष्टीस पडलें तरी तें आजच्या वाङ्मयप्रेमी वर्गावर छाप टाकील असें नाहीं व मोठमोठालीं चांगलीं काव्यें मराठींत झालींच नाहींत. इंग्रजी राज्यांतील ज्या मराठी काव्यांत कांहीं कवींचें कौशल्य दृष्टीस पडतें आणि ज्या कवीचा दम जरा जास्त टिकला आहे अशीं नांव घेण्यासारखीं काव्यें आमच्या मतें दोनच आहेतः एक चिंतामणी पेठकरांचें गंगावर्णन आणि टिळकांचें वनवासी फूल.. काव्याचे विषय शोधण्यांत स्वातंत्र्य, जन्मभर काव्याचा ह्व्यास, विविध प्रकारचा अनुभव या गोष्टींचा लाभ महाराष्ट्रकवितेस कधींच प्राप्त झाला नाहीं.

मराठींतील बरींचशी प्रसिद्ध झालेली अर्वाचीन कविता पंचविशीच्या आंतल्या पोरांनीं लिहिलेली आहे व त्याच मंडळींनीं प्रौढ वयांत कवितारचनेचा क्रम टाकून दिला आहे" वगैरे. पण येवढ्यानेंहि कोशकारांच्या अंतरात्म्याची खळमळ शांत न होऊन व मराठी काव्याविषयींचा तिटकारा नीट व्यक्त झालासें न वाटून कोशकार शेवटीं शेवटीं उद्गारतात कीं, "आजपर्यंत झालेलें मराठी वाङ्मय सर्व जळून गेलें तरी जगाचें वाङ्मय या दृष्टीनें कांहीं एक नुकसान व्हावयाचें नाहीं ! झालें तर भाषेचा इतिहास, खुरटलेल्या राष्ट्रांच्या मनःस्थितीचें व ज्ञानमर्यादेचें उदाहरण व स्त्रीशूद्रांच्या धार्मिक शिक्षणासाठीं झालेल्या प्रयत्नांचा इतिहास या नात्यानेंच होईल !!" इतक्या थोड्या शब्दांत महाराष्ट्रकाव्याची इतकी मासलेवाईक निंदा अन्यत्र सांपडणें दुर्मिळ.

एका बाजूनें महाराष्ट्रकवी हे जगत्कविमंडळाच्या अग्रभागीं विराजमान होण्यास योग्य, त्यांतील प्राचीनापैकीं बहुतकांचें काव्य भगवद्भक्तीच्या उत्कट परिमळानें दरवळलेलें अतएव केवळ असामान्य व अर्वाचीनांपेकीं 'गोविंदाग्रज' प्रभृतींचें काव्य अखिल जगतांत अव्वल दर्जाच्या ठरलेल्या वाल्मीकी, शेक्सपिअर, गटे वगैरे कवींच्या तोलाचें तर दुसऱ्या बाजूनें महाराष्ट्रकाव्य हें परपुष्ट, निर्बल व निस्तेजापैकीं प्राचीनांचें गांवढळ ठरीव सांचाचें व उद्दाम कल्पनारहित. अर्वाचीनांचें उच्छृंखल, छचोर व त्रुटित अशा दोनहि प्रकारच्या एकांतिक विचारसरणीच्या लाटा गेल्या पन्नास-साठ वर्षांत महाराष्ट्रावर लोऊन गेल्या. पण आजमितीस त्या ओसरल्या असून एकंदर काव्यसाम्राज्यांत महाराष्ट्रकाव्याला कोणता दर्जा प्राप्त होण्यासारखा आहे हें चिकित्सक बुद्धीनें ठरविणे, गुणदोषांचें हंसक्षीर न्यायानें परीक्षण करून गुणांचें सशास्त्र अध्ययन करणें, अशा प्रकारची प्रवृत्ति दिवसेंदिवस बळावत आहे. महाराष्ट्रवाङ्मयाचा अभ्यास एम. ए. च्या परीक्षेपुरता मर्यादित होता तो आतां बी. ए. च्या परीक्षेंत प्रविष्ट झाला आहे व कॉलेजांतील खालच्या दोन वर्गांतहि होण्याची चिन्हें दिसत आहेत. प्राचीन कवींवर 'मोरोपंतचरित्र व काव्यविवेचन' व अर्वाचीन कवींवर 'आधुनिक कविपंचक', 'महाराष्ट्र नाटककार, गडकरी', 'आपटग्रंथांच्या कादंबऱ्यांचें परीक्षण' वगैरेसारखे ग्रंथ होऊं लागले आहेत. जुन्या व नव्या कवींच्या सशास्त्र अध्ययनासाठीं 'मयूरमंडळ', 'गोविंदाग्रज मंडळ' अशा संस्था अस्तित्वांत येऊं लागल्या आहेत. अशा वेळीं समग्र महाराष्ट्रकाव्य जुनें व नवें जळून खाक झालें तरी रेसभर नुकसान नाहीं अशा प्रकारचे अनुदार उद्गार काढणें हें कोशकारांसच शोभूं जाणे.

काव्य-काव्योदयकारांचें मत.

पंधरा वर्षांपूर्वी 'काव्य-काव्योदय'कारांनीं प्राचीन कवींची हजेरी घेतली त्यावेळीं त्यांनांहि कोशकारांच्याइतकी इरसाल भाषा सुचली नाहीं.

जुन्या काव्याला परपुष्ट, प्रतिभास्वातंत्र्यरहित, खेडवळ वगैरे प्रकारें नाकें मुरडून काव्य -काव्योदयकारांनीं त्याला लाथाडलें होतें पण त्याला भडाग्नि देण्यास त्यांचा हात वाहेना ! शिवाय सर्व महाराष्ट्रकाव्याला सरसहा अस्पृश्य समजण्यासहि ते तयार नव्हते. अर्वाचीनांकडे त्यांच्या अंतःकरणाचा ओढा होताच. पण प्राचीनांपैकीं तुकाराम, नामदेव वगैरे भक्तकवींचें काव्य त्यांचें अंतःकरण उचंबळून सोडी. काव्य--काव्योदय या निबंधांत भक्तकवी-विषयीं दाखविलेला आदर कांहींसा चांचरत व नाखुषीनें दर्शविलेला असला तरी दहा वर्षांच्या परिशीलनानंतर वुइल्सन लेक्चर्समध्यें भक्तिकाव्याचें मुक्त-कंठ स्तुतिस्तोत्र गाण्यांत प्रोफेसरसाहेबांनां कमीपणा वाटलेला नाहीं. काव्यांत भक्तिरसाची बहार अथवा परमोच्च सीमा पहावयाची असल्यास महाराष्ट्रका-व्यांतच ती पहावी. उभ्या त्रिभुवनांत तिला जोड नाहीं, असें उद्गार काढ-णाऱ्याला समग्र महाराष्ट्रकाव्य अग्निसात झालेलें कसें पहावेल ! पण आमच्या कोशकारांच्या घरीं सर्वच व्यवहार घाऊक, त्यांत ग्राह्याग्राह्य, सरसनीरस असल्या बारकाव्या काढांत बसल्यास कोशकारांचें स्वातंत्र्य आणि वैशिष्ट्य कोठें उरलें ? जुने कवी, नवे कवी, पोवाडेकार, लावणीकार, तुकाराम, मोरो-पंत, केशवसुत, गोविंदाग्रज या सर्वांना त्यांनीं एकाच जात्यांत भरडून काढलें आहे. समग्र महाराष्ट्र काव्याचें आलोडन करण्याचा ठराव पास झाल्याबरोबर कोशकारांनीं आपल्या गुरुभट्यास जुन्या--नव्या सर्व काव्यग्रंथांचे गट्ठे आप-ल्यापुढें हजर करण्यास सांगितलें, व क्षणभर दहापांच पुस्तकांचें कान दुमड-ल्यावर हे घामानें डबरते होत्साते आरामखुर्चीवर देह लोटून व कपाळास आठ्या घालून डुरकले कीं 'भट्याजी सबकू आग लगाव, अब्बीके अब्बी'.!

ज्ञानकोशप्रकाशन हें सामुदायिक राष्ट्रीय कार्य आहे. तेव्हां कोशाच्या संपादकमंडळाचीं व्यक्तिविषयक मतें सिद्धान्तरूपानें मांडलीं जावींत अशी मंडळाच्या भागीदारांची अपेक्षा असणें शक्य नाहीं. संपादक मंडळाच्या व्यक्तिविषयक मतांची छटा अजीबाद दृग्गोचर न होणें अशक्य आहे हें कबूल. विषयांची निवड व निरनिराळ्या विषयांच्या वांट्यास येणाऱ्या मज-कुराची मर्यादा वगैरे बाबतींत संपादकांची आवडनिवड डोकावणें अपरिहार्य आहे. पण संपादकांनीं स्वतःच्या एकांतिक व आग्रही मतांनीं कॉलमच्या कॉलम भरून काढणें हा कोशाचा दुरुपयोग होय. इतर भाषेंतील ज्ञान-कोशांत प्रमुख विषयांवर तज्ज्ञांचे लेख छापण्याचा प्रघात आहे. पण आमच्या कोशकारांनां तज्ज्ञांचें साह्यच संपादितां आलें नाहीं किंवा त्यांनीं पर्वा केली नाहीं. कोशकारांनां स्वतःचीं लाडकीं मतें प्रतिपादावयाचीं असल्यास स्वतंत्र ग्रंथलेखनरूपानें तीं प्रतिपादणें हा रास्त मार्ग होय. स्वतंत्र विचार हा कितीहि खोडसाळ भासला तरी जिवंत विचाराचा तो प्रतीक आहे. म्हणूनच तो

प्रगट करण्याचें व्यक्तिमात्रांचें स्वातंत्र्य मान्य करणें अवश्य आहे. असे विचार व्यक्तींच्या नांवावर प्रसिद्ध केले जातात तोंपर्यंत त्यांचा परिणाम व्यक्ति माहात्म्यानुसार मर्यादित असतो. पण ज्ञानकोशाचा भव्य व रुबाबदार आकार, अनेक विद्वानांच्या मंथनांतून निघालेल्या रत्नांचा हा कोश अशी अपेक्षा व समजूत, यामुळें सामान्य वाचकाला कोशांतील मुक्ताफळें ब्रह्मरसें वाटावीं हेंच संभवनीय. कोशकारांची ही भूमिका व त्या भूमिकेला प्राप्त होणारें आगंतुक, अवास्तव माहात्म्य हें लक्षांत घेऊन संपादक मंडळानें स्वतःच्या खासगी मतांचें इतक्या नागव्या रीतीनें वाचकापुढें आविष्करण करावें हें अप्रशस्त होय.

पुरावा कोठें आहे ?

बरें, एकान्तिक मत प्रतिपादावयाचें तर त्याला साधकबाधक प्रमाणें दिलीं म्हणजे वाचकाला स्वतःला आपलें स्वतंत्र मत बनविण्यास वाव तरी राहतो. पण आमच्या कोशकारांची श्रुतिस्मृतिकारांच्या वर ताण ! बिचाऱ्या महाराष्ट्र कवींवर ठेवलेले आरोप पुराव्यानें सिद्ध करण्याचा त्रास न घेतां कोशकारांनीं लष्करी कोर्टातील न्यायाधीशाप्रमाणें एकदम त्या सर्वांस-नव्या व जुन्यांस--अग्निकाष्ठभक्षणाची शिक्षा सुनावली आहे. न्यायनिर्णयांत प्रथम आरोपींची ' हजेरी व नंतर निर्णय ' हा नेहमींचाच मार्ग. पण महाराष्ट्र कविवर्गाविषयींच्या तिटकाऱ्यांचें कालकूट ओकण्यास कोशकार इतके अधीर झाले होते कीं, कवींची हजेरी घेऊन नंतर निकाल होण्याइतक्या विलंबाची कळ न सोसून आधीं निर्णय व मागून हजेरी असा विपर्यस्त प्रकार त्यांनीं अंगिकारिला आहे.

या विसंगतीस काय म्हणावें!

पण सगळी बहार या मागून घेतलेल्या कवींच्या ' हजेरी 'त आहे. या हजेरीचा वाचकांस परिचय करून दिला म्हणजे ' आजपर्यंत झालेलें सर्व मराठी वाङ्मय जळून खाक झालें तरी जगाचें काव्यनाश' या दृष्टीनें कांहींहि नुकसान व्हावयाचें नाहीं ' या जलाल मताला मूठमाती देण्याकरितां त्याचें थडगें कोशकारांनीं स्वतः कसें खणून ठेवलें आहे हें पहावयास सांपडेल. तसेंच या हजेरीची ओळख करून दिली म्हणजे कोशकारांच्या मतांतील एकांगीपणा दर्शविण्याचा निराळा खटाटोप करण्याचें कारण नाहीं. कारण कोशकारांनीं या हजेरींत विसंगति आणि वदतोव्याघात यांनीं स्वतःच्या मतास स्वतःच हरताळ फांसला आहे.

आजपर्यंत झालेलें मराठी वाङ्मय सर्व जळून खाक झालें तरी जगाचें काव्यनाश या दृष्टीनें कांहींहि नुकसान व्हावयाचें नाहीं असले धाडशी मत बनविण्यापूर्वी कोशकारांनीं मराठी वाङ्मयाचें बरेंच परिशीलन केलें असावें

असा वाचकांनीं तर्क करण्याचें कारण नाहीं. कारण प्राचीन कवींसंबंधीं माहिती महाराष्ट्र सारस्वतांतून व अर्वाचीनसंबंधीं न. चिं. केळकर यांच्या बडोदें साहित्यसंमेलनांतून घेतल्यानें दोनहि उष्टो आणि परभृत आहेत आणि हें उष्टें अन्न पचावें म्हणूनच वाङ्मय जाळून त्याच्या भस्माची मात्रा वर सेवन केली कीं, काय कोण जाणे! महाराष्ट्र-सारस्वतकार आणि बडोद्याच्या साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष ह्या दोघांच्या लेखांत ह्या भस्माचा मागमूसहि नाहीं. मग कोशकारांनीं तें कोठून पैदा केलें? 'उष्टें', 'परभृत' वगैरे शब्द लक्षांत घेतां मूळ कल्पना 'काव्य--काव्योदय' निबंधांतून उचलली असावी. मग महाराष्ट्रसारस्वतकार व सा. सं.चे अध्यक्ष यांच्याप्रमाणें काव्य- काव्योदय-कारांचा स्पष्ट उल्लेख कां नाहीं? तसा उल्लेख असता तर दोनहि प्रकारची मतें कोशकारांनीं वाचकांपुढें मांडलीं असें तरी म्हणतां आलें असतें. बरें ह्याहि दृष्टीनें पाहतां 'काव्यकाव्योदयाचें' तेवढीच स्माठवण व्हावी आणि विविधज्ञानविस्तारांचे अंक कोशकारांनीं चाळलेले अन्यत्र आढळत असतां 'काव्यकाव्योदया' वरची वा. अ. भिडे यांचा टीका कोशकारांच्या नजरेंतून निसटली असावी असें तरी कसें मानावें? पण या टीकेचा किंवा मूळ निबंधाचा उल्लेख करण्यांत काव्यकाव्योदयकारांच्या मतांची सुधारून वाढविलेली आवृत्ति हें आपलें स्वतंत्र खास लाडकें मत म्हणून प्रसिद्ध व्हावें व त्याचा आपणांस योग्य अभिमान बाळगतां यावा, असा कोश-कारांचा इरादा दिसतो. पण मराठी काव्याचा परिचय बहुधा अल्प असल्यानें एका बाजूला आजपर्यंतचें मराठी वाङ्मय सर्व जळून गेलें तरी काव्यनाश या दृष्टीनें जगाचें रेसभर नुकसान व्हावयाचें नाहीं असलें आग्रही स्वयंमन्य मत, तर दुसऱ्या बाजूला ह्या अग्निकाष्ठाची शिक्षा सुनावलेल्या कवींची स्तुति! असल्या अक्षम्य विसंगतीच्या खोड्यांत कोशकार अडकले गेले आहेत; कसे ते पाहा—

कोशकारांचा हा अभिप्राय पहा.

अर्वाचीन कवींचें गुणवर्णने-छः दोषवर्णन-कोशकारांनां आपल्या खास मतास खुलवील अशा पद्धतीनें करतां आलें असतें पण त्यांनीं न. चिं. केळकर यांच्या भाषणाच्या गोषवाऱ्यावरच निर्वाह केला आहे, आणि त्यांतहि त्यांतील गुणवर्णनपर भाग गाळला आहे का; म्हणून पहावें तर 'भाषारचना व विषय यांचें वैचित्र्य आधुनिक कवितेंत अतिशय दिसून येतें. 'मुजुमदार, भिडे, लेले, पांगारकर, आगाशे, अनंततनय यांच्या रचनेचें मोरोपंती वळण; मोगरे, चंद्रशेखर, लेंभे यांची कांहींशी संस्कृतप्रचुर पण दौलदार व रमणीय श्लोकपद्धति; माधवानुज, सुमंत, नागेश व माधव यांची सफाईदार रचना; चिपळूणकर विनायक यांची सहजमधुर साकी;तुकारामाच्या थाटाचे व श्रीधरी,

याटाचे टिळकांचे अभंग; केशवसुत, ठोमरे यांची विषयानुरूप तुटक ओजस्वी व परिणामकारक नवीन वृत्तयोजना; तांबे व दत्त यांची लावणीपद्याच्या धर्तीवरील हृदयंगम कवनें; गोविंदाग्रज, रेंदाळकरांची ललितनादमधुर पण कृत्रिम भाषा आणि टेकाडे व बेहरे यांच्या वाणींतील तडफ हे सर्व विशेष आधुनिक कवितेला शोभादायक आहेत. ' आधुनिक कवितेचें स्वरूप जसें वैचित्र्यपर तसेंच तें चमत्कृतिजनक व आनंददायकहि आहे ' वगैरे वाक्यांनां राजरोसपणें वावरूं दिलें आहे.

आतां जुन्या कवींविषयीं अभिप्राय पहाः—जुन्या कवींत मोरोपंतांविषयीं वादविवादाचीं रणें आजपर्यंत पुष्कळ माजलीं असल्याकारणानें त्या कवीविषयीं कोशकारांचा अभिप्राय प्रतिकूल असावा असा तर्क केल्यास पुढील वाक्यें वाचावीं. " मोरोपंतांना त्यांच्या आर्धीच्या सर्व काव्यांचा भरपूर उपयोग घेतां आल्यामुळें त्यांचें काव्य ठाकठिकीचें वठलें आहे. त्यांची कविता म्हणजे एखाद्या राजाच्या सर्वांगसुंदर, नाजुक, बहुमोल अलंकारादि आभरणांनीं युक्त व बहुविध कलाकुशल प्रौढ वयाची तरुणी होय. शब्दगौरव, भाषेची प्रौढ रसानुकूलता, भरपूर अलंकार, कालव्यक्तिप्रसंगाला अनुसरून वर्णनें, मुख्य सूत्र न सोडतां थोडक्यांत पुष्कळ अर्थ आणणें हें त्यांच्या काव्याचे विशेष होते.' मराठी काव्याच्या निंदकानें केलेलें हे वर्णन वाचकांनीं लक्षांत धरावें. इतर कवींविषयींचे अभिप्रायहि नमूद करण्यासारखे आहेत. " अमृतरायाची कविता चटकदार व मनोहर असून त्याचा कटाव जर उत्तम हरिदासांच्या तोंडून ऐकला तर श्रोते तन्मय होऊन जातात ". वामनाची पौराणिक आख्यानें रसभरित व स्वभावोक्तिपूर्ण असून वाणी जोरदार, ओजस्वी व प्रौढ आहे '. ' श्रीधर व एकनाथ यांनीं ओवीबद्ध काव्यांत चमत्कारित्व व मनोहारित्व आणलें आहे. ' ' जनाबाईचे अभंग लडिवाळपणाचे असून त्यांत वात्सल्यरस बराच आढळतो '. ' ज्ञानेश्वरी ग्रंथ सरस दृष्टांत व भाषेचें मधुर स्वरूप यांहींकरून इतका खुलविला आहे कीं तो वाचीत असतां वाचकांची आपोआप ग्रंथार्थीं तन्मयता होते " वगैरे वगैरे. वरील वाक्यांत कोशकारांच्या मतें उत्तम काव्यांचे गुण कोणते व ते प्राचीन कवींत कसे आढळतात यांचें दिग्दर्शन होत आहे. पण मुक्तेश्वराविषयींचा अभिप्राय तर याहीपेक्षां स्पष्ट आहे. " कवीचें काम लोकशिक्षणविषयक किंवा मनोरंजक कथा अथवा विचार-सृष्टीतील विषयार्थीं तादात्म्य पावून स्वयंस्फूर्तीनें गौरवून सांगण्याचें असतें. या दृष्टीनें मुक्तेश्वर हा उत्तम कवि होऊन गेला. " अर्वाचीन व प्राचीन कवींविषयीं वरील स्तुतिपूर्ण अभिप्राय आणि आजपर्यंतचें मराठी वाङ्मय सर्व जळून गेलें तरी काव्यनाश या दृष्टीनें जगाचें कांहींहि नुकसान नाहीं असलें बेताल मत या विसंगतीचें कोडें पाहून कोशकार निरर्गल बरळत आहेत

कां काव्यावरील लेखाचे दोन जनक त्यसून ते एकमेकांविरुद्ध सूड उगवीत आहेत हें कांहींच कळत नाहींसें होतें. कै. गोविंदाग्रजांनीं पुण्याच्या खाणा-वळींत जेवणें, सदर्न मराठा रेल्वेतून प्रवास करणें, खांडेलकरांच्या पदांचा अर्थ लावणें अशा अभिनव शिक्षा सुचविल्या होत्या त्यावेळीं ज्ञानकोशाचा हा भाग प्रसिद्ध असता तर कोशकारांचें महाराष्ट्र कवींविषयींचें मत शोधून काढणें हा प्रकार त्यांत गोंवून कोशकारांच्या निंदाव्यंजक मताचा समाचार घेतला असता. गोविंदाग्रज आज हयात नाहींत, पण पुणें येथें लवकरच भरणाऱ्या साहित्यसंमेलनाकरितां जमणारे साहित्यसेवक कोशकारांनां आपल्या कर्तव्याची जाणीव करून देण्यास विसरणार नाहींत अशी अपेक्षा करणें अस्थानीं होणार नाहीं.

ज्ञानकोशासारख्या अवाढव्य जिगजिगीच्या व अविरतोद्योगसाध्य अशा ग्रंथप्रकाशनानें कोशकारांनीं महाराष्ट्र जनतेची केलेली अपूर्व सेवा लक्षांत घेता वरील सारख्या विचार प्रगट करणें भाग पडावें हें दुर्दैव. पण कोशकारांनीं मतस्वातंत्र्याची तार फाजील ताणली नसती तर वाचकांच्या धन्यवादांतहि बेसूर निघण्याचें कारण नव्हतें. महाराष्ट्रकाव्याविषयीं जे विचार कोशकारांनीं प्रगट केले आहेत ते सद्धेतूनेंच केले असले पाहिजेत. राष्ट्राच्या दैन्यावस्थेंत स्वतःच्या दोषांची जेवढी तीव्र जाणीव असेल तेवढी पथ्यकारकच या सद्भाव-नेनें कोशकार जालीम उपाय योजण्यास प्रवृत्त झाले असावेत. पण निद्रिस्थ जनतेला जागें करण्याकरितां समग्र महाराष्ट्रकाव्याची चिता पेटवून त्यांतील जळते निखारे तिच्या अंगावर फेकणें हा आततायीपणा होय.

असो, कोशकारांनीं स्वतःच्या मताच्या विचित्र विसंगतीच्या कात्रीनें स्वतःच उडविल्या असल्यामुळें त्यांच्या मताची चर्चा करण्याचें प्रयोजन नाहीं. पण कोशकारांच्याहूनकी जलाल नसली तरी सौम्य प्रमाणांत महाराष्ट्र काव्याची हेटाळणी करणारे लोक थोडे नाहींत, ह्या हेटाळणीचे विषय झालेले कांहीं दोष वास्तविक आहेत,पण कांहीं गैरसमजावर अधिष्ठित आहेत. म्हणून कोशकारांचें निंदाप्रचुर मत हें उपलक्षण मानून गैरसमजावर अधिष्ठित झालेल्या कांहीं दोषांची पुढील लेखांत चर्चा करूं. [ही चर्चा पुढें कधीं झालीच नाहीं. सं. ज्ञानकोश]

(परिशिष्ट नं. १७)

जर्मन शब्दांचे उच्चार.

[केसरी २६।५।२५]

(ले.—स. वा. हुदळीकर, इंदूर)

आजकाल जर्मन तत्त्वज्ञान, जर्मन राष्ट्रांतील राजकीय चळवळी व त्याच प्रमाणें जर्मन शिक्षणपद्धति वगैरे विषयांकडे आम्हां महाराष्ट्रीयांचें थोडें फार

लक्ष लागलें असल्यामुळें कित्येक मासिक पुस्तकांतून व वृत्तपत्रांतून कांहीं जर्मन नांवांचे विलक्षण तऱ्हेनें केलेले उच्चार वाचण्यांत येतात व ते वाचून मनापासून हसूं येतें. हे उच्चार कधीं इंग्रजी पद्धतीचे तर कधीं अगदीं खोटे असतात. म्हणून सर्वसाधारण जर्मन शब्दांच्या उच्चारांचे ठोकळ नियम घालून महाराष्ट्र वाचकांच्यापुढें ठेवावेत म्हणजे निदान साऱ्या वृत्तपत्रांतून दर एक शब्दाचा एकाच प्रकारचा उच्चार केलेला आढळून येईल व वाचकांचा विनाकारण घोंटाळा होणार नाहीं. या विचारांनीं प्रेरित होऊन हा लेख लिहिला आहे.

अत्यंत अल्प प्रयासानें बरोबर उच्चार करणें अगदीं शक्य आहे हें हा पुढील लेख वाचून तेव्हांच ध्यानांत येईल. पण या गोष्टीकडे अद्याप ज्ञानकोशकारांचेंहि लक्ष गेलेलें दिसत नाहीं. त्यांच्या संपादकमंडळांत एक जर्मन भाषा जाणणारी विदुषी आहे हें आम्हांस माहीत आहे असें असूनहि ज्ञानकोशाच्या आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या १२ भागांतून जेथें जर्मन प्रांतांचा किंवा शब्दांचा उच्चार करण्यांत आलेला आहे. तेथें तेथें त्या विदुषीच्या ज्ञानाचा या विद्वान संपादकमंडळानें मुळींच फायदा करून घेण्याचा प्रयत्न केलेला आढळून येत नाहीं. एवढेंच नाहीं तर अशा रीतीनें शुद्धीकरण ज्ञानकोशासारख्या नेहमीं उपयोगांत आणल्या जाणाऱ्या संदर्भग्रथांतून अवश्य हवें होतें असें जेव्हां आम्ही मुख्य संपादकांच्या नजरेस आणलें तेव्हां त्यांनीं हंसून " उच्चारांत काय आहे ! ते वाटेल तसे करून अर्थ समजला म्हणजे झालें " असें आपलें मत जोरानें प्रतिपादन केलें. मला वाटतें, भाषेचा अर्थ समजणें जितकें आवश्यक आहे तितकेंच शब्दाचा उच्चार बरोबर करतां येणें हेंहि आवश्यक आहे. आपल्याला सत्यान्वेषण करावयाचें असून लहानसहान गोष्टींत सुद्धां टापटीप व सुव्यवस्था हवी आहे व या गोष्टी बाह्यतः जरी क्षुल्लक दिसल्या तरी त्यांचा हेळसांड होऊं नये असें आम्हांस वाटतें.

उदाहरणार्थ—ज्ञानकोश भाग बारावा, पान २०२ ' गोएटे ' हा शब्द पहावा. या महान् विख्यात कवीच्या नांवाच्या इतक्या क्रूरपणानें चिंधड्या केलेल्या पाहून कालिदास कवीला " क्यालीड्यास," बाणाला "ब्यान्", दंडीला "ड्यांडी" किंवा गोखले यांनां गोखेल म्हटलें म्हणजे आपल्या कानाची जी दशा होते तीच आमच्याहि कानांची "जोहाना, वुल्फगंडा, व्हान, गोएटे" असें वाचलें म्हणजे होते. या वरील नांवांचा उच्चार "योहान, वोल्फगांग, फॉन, गॅइटे" असा आहे. आतां हें उच्चार कसे करावेत हें मी पुढें सांगणार आहे. तूर्त आणखी कांहीं उदाहरणें देऊं. ता. ५ मेच्या केसरींत हिंडेंबुर्ग असा जागोजाग उच्चार करण्यांत आलेला आढळला. त्याचा उच्चार हिंडेनबुर्ग

असा आहे. पुष्कळ वृत्तपत्रांतून झीटंग असें लिहिलेलें आढळतें. त्याचा उच्चार 'छायटुंग" असा आहे. त्याचप्रमाणें "वायमार" च्या ऐवजीं वीमर वगैरे विलक्षण उच्चार आम्हास आढळले आहेत.

असो. आतां आपण जर्मन शब्दांच्या उच्चारांच्या कांहीं ठोकळ नियमांविषयीं विचार करूं. जर्मन भाषेच्या मुळाक्षरांचा उच्चार अगदीं नियमित व अनन्य असा असतो. तो असा—

A	B	C	D	E	F	G	H	I	J	K	L	M	N
आ	बे	त्से	डे	ए	एफ	गे	हा	इ	याट	का	एल्	एम्	एन्

O	P	Q	R	S	T	U	V	W	X	y	Z
ओ	पे	कू	एर	एस्	टे	ऊ	फौ	व्ह	इक्स	इप्सिलोन	छड्

म्हणजे स्वरांचा उच्चार आ, ए, इ, ओ, उ, ई (मुख्य), व व्यंजनाचे ब, त्स, ड, फ, ग, ह, य, क,ल, म क, र, स, ट, फ, व्ह, क्स, ई, छ, असे उच्चार आहेत.

स्वर–वर्णांचा कधीं कधीं मिलाफ होत असतो तेव्हां त्यांचे उच्चार पुढीलप्रमाणें होतात. ie = ई, ei = आय्, au = आउ, a(ae) = कानडाप्रमाणें दीर्घ ए. o(oe)याचा तोंडाचें बोळकें करून ए असा दीर्घ उच्चार करावा म्हणजे कांहींसा ञ्यो असा उच्चार होईल. ai = ऐ. eu = ऑय व ee चा दीर्घ ए असे उच्चार आहेत. आतां या नियमाप्रमाणें उच्चार केले असतां जर्मन शब्दांचा अगदीं एक ठरावीक असा उच्चार केलेला आढळून येईल. इंग्रजीप्रमाणें put = पुट् व cut कट् असे u चे वेगवेगळे उच्चार नाहींत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

Zeitung = छायटुंग, झीटंग नव्हे.
Goham = योहान्, ज्ञानकोशाचा जोहान नव्हे.
wolfgang = वोल्फगांग, वुल्फगं.ा नव्हे.
Von = फॉन, व्हान नव्हे.
Goethe = गॅएटे, (?), गोएटे नव्हे.
weimar = वायमार, वीमर नव्हे.
Strassburg = स्ट्रासबुर्ग, स्ट्रॅसबर्ग नव्हे.
Heidelberg = हायडेलबर्ग, हीडलबर्ग नव्हे.
Oppenheim = ओप्पेनहायम, अप्पनहीम नव्हे.
Faust = फाउस्ट, फॉस्ट नव्हे.
Herman Jako'bi = हेरमान याकोबी, हेरमॅन ज्याकोबी नव्हे.

अशा तऱ्हेचीं कैक उदाहरणें दाखविता येतील. तरी पण वेळप्रसंगीं ज्ञानकोशांतील इतर वऱ्याच चुकांचा ज्या वेळीं विचार करण्यांत येईल त्या वेळीं जर्मन उच्चारांविषयीं अधिक लिहिणें साहाजिकच प्राप्त होणार आहे.

आतां जर्मनमध्यें आणखी थोडेसे व लिहिण्यास अगळ कठीण असे कांहीं उच्चार आहेत ते असेः एकाद्या शब्दाच्या शेवटीं जर e असेल तर त्याचा उच्चार अ व ऱ्हस्व ए यांच्या दरम्यान असतो. अस [Blume याचा उच्चार ब्लूम असा होईल; म्हणजे असें आपण "करण" यांतल्या शेवटल्या अनुस्वाराव्यतिरिक्त "ण" उच्चार करूं त्याप्रमाणें Deutschland याचा उच्चार वरील पद्धतीनें डॉयटचलांड असा होईल. पण त्याचा उच्चार चुकीनें "डयूशलॅन्ड" असा कोणी लिहितात. जर्मन भाषेमध्यें शब्दांतील प्रत्येक अक्षराचा उच्चार केलेला आढळून येईल, कोणतेंहि अक्षर लुप्त नसतें. उदाहरणार्थ Pslam याचा प्स्लाम असा उच्चार होतो. Pchychologie याचा प्सिशोलोगी, Halb याचा हाल्ब, Knie चा क्नी (इंग्रजी नी). आजच्या या अल्पशा लेखांत मुख्यतः शब्दांचे उच्चार बरोबर कसे करावेत एवढेंच सांगितलें, व त्याचा थोडा जरी उपयोग झाला तरी बरीच प्रगति झाल्याचें आढळून येईल. कोणास दोष न लावतां अज्ञानामुळें व योग्य खटपट न केली गेल्यामुळें आपण उगाच चुका करीत असतों एवढेंच सांगण्याचा लेखकाचा हेतु आहे.

(परिशिष्ट नं. १८).

ज्ञानकोशांतील

परकीय शब्दांचे उच्चार

(ले.—डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर, पुणें.)

केसरीच्या ता. २६ । ५ । २५ च्या अंकांत रा. हुदलीकर यांनीं जर्मन नांवांचें मातृकांतर करण्यांत केलेल्या भ्रष्टतेबद्दल आम्हांस दोष दिला आहे. त्यांची टीका कांहीं अंशीं बरोबर आहे. कां कीं, कांहीं चुका नजरचुकीनें झाल्या आहेत, पण कांहीं प्रसंगीं नजरचुकीचा दोष नसून जें होऊं दिलें तें कांहीं तत्त्वांमुळें मुद्दाम होऊं दिलें आहे. तर ज्या कारणांमुळें जर्मन शब्दांचें मातृकांतर करतांना जर्मन विशेष नामांचे जर्मन उच्चार देण्याला आम्हीं महत्त्व दिलें नाहीं तीं कारणें आम्हांस स्पष्ट केलीं पाहिजेत.

आम्हांस हा प्रश्न सोडवितांना केवळ जर्मन शब्दांकडे लक्ष देऊन कार्यपद्धति निश्चित करणें अशक्य होतें. सर्व देशांस व भाषांस लागू पडेल अशी पद्धति ठरवावयाची होती, व यासाठीं एकंदर परकीय शब्दांच्या उच्चारांविषयीं कांहीं सामान्य धोरण ठरवावें लागलें आणि तेंच धोरण जर्मन शब्दांस लावावें लागलें.

परकीय शब्दांचा उपयोग आपल्याकडे करताना अनेक गोष्टी होत असतात. कांहीं वेळेस आपण ज्या देशाविषयीं लिहितों त्या देशांविषयीं भौगोलिक शब्द घेतांना त्यांचें देश्य नांव न घेतां इंग्रजी रूपांतर घेतों. उदाहरणार्थ "नेपल्स" ला तेथील लोक "नापोली" म्हणतात. व्हिएन्नाला ऑस्ट्रियन लोक "वीन" म्हणतात. अशा प्रसंगीं आपण या शब्दांचा जो उच्चार घेतो तो देश्य नसून इंग्रज लोकांनीं रूढ केला आहे तो घेतो ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. व्हिएन्ना व नेपल्स यामध्यें केवळ उच्चारांतर नाहीं तर मातृकाभिन्नत्वहि आहे, पण "पारीस" सारख्या शब्दांची गोष्ट निराळी आहे. "पारीस" शब्दांसाठीं इंग्रज व फ्रेंच लोक तीच मातृकामाला ऊर्फ स्पेलिंग वापरतात, पण उच्चार मात्र भिन्न करतात. विशेषनामांचे मातृकांतर करतांना आम्हीं ज्या गोष्टी लक्षांत घेतल्या त्या येणेंप्रमाणें:—

परकीय भौगोलिक आणि वैयक्तिक नांवें लिहितांना दोन पद्धती वापरल्या जातात. एक पद्धति म्हटली म्हणजे तें नांव ज्यें स्वभाषत लिहिलें जातें तसें लिहिणें. आणि दुसरी म्हणजे तें नांव त्या भाषेंत जसें लिहिलें जातें तसें लिहिणें या दोन पद्धति सर्व अभिजात राष्ट्रांत वापरल्या जात आहेत. या पद्धतीपैकीं दुसरी पद्धति वापरणें जगांतील सर्व राष्ट्रांप्रमाणें महाराष्ट्रास अशक्य आहे. आम्हासहि तें शक्य नाहीं. आमच्या आफीसचें भाषासाहाय्य इंग्रजी फ्रेंच, जर्मन, डच, इटालियन व स्पॅनिश एवढ्याच युरोपीय भाषांपुरतें, व हिंदी गुजराथी व कानडी एवढ्याच भारतीय भाषांपुरतें होतें. रशियनसारख्या महत्त्वाच्या पाश्चात्य भाषा व अरबी, तुर्की, चिनीसारख्या आशियांतील भाषा यांच्या ज्ञात्यांचें साहाय्य आम्हांस मुळींच नाहीं. यामुळें आम्हांस प्रत्येक देशांतील स्थानाचा आणि व्यक्तीच्या नांवाचा उच्चार त्या त्या देशांतील भाषांच्याप्रमाणें करणें शक्य झालें नसतें, व त्यांत दुसऱ्याहि अनेक शास्त्रीय अडचणी उपस्थित होतात असें दिसून आलें.

लिहिण्याचा मुख्य उपयोग वाचकांस तें समजणें हा होय आणि त्या दृष्टीनें आम्हांस आंग्लानुसारी शब्दयोजना करावी लागली. भाषाशुद्धता म्हणून ज्या गोष्टींस सामान्य सुशिक्षितांकडून महत्त्व दिलें जातें त्यापैकीं बऱ्याचशा गोष्टींस शुद्ध किंवा अशुद्ध म्हणण्यास शिष्टसंप्रदायापलीकडे कारण नाहीं. जो परिपाट मूळ स्वरूपाशीं अधिक सदृश तो अधिक शुद्ध असेंहि कोणी शुद्ध सूज्ञ वैय्याकरणी आज म्हणणार नाहीं. जो शब्द परकीय आहे त्याचें सामान्य जनतेच्या मुखांत जें रूप बसले असेल तें वापरण्याची प्रवृत्ति अयोग्य होणार नाहीं. पुष्कळशीं इंग्रजी शब्दांचीं मूळ रूपें न घेतां अपभ्रष्ट ऊर्फ लोकाचार संस्कृत रूपें घेण्याची चाल आज देशी भाषांत सर्वत्र आहे. उदाहरणार्थ-हास्पितळ, मोटार, हपीस इ. हे शब्द लिहिणारास कोणी अशुद्ध लिहिणारा

असें म्हणणार नाहीं. फारशींतून मराठींत आलेल्या अपभ्रंशांस तर आजच्या भाषेंत इतकें शिष्टस्थान मिळालें आहे कीं, शाईच्या ऐवजीं सियाही (काळें) व सिपाई याच्या ऐवजीं शिपायहि अशीं रूपें दिलीं तर तीस 'भाषाशुद्धि' कोणी म्हणणार नाहीं.

आतां आपणांस असें पहावयाचें आहे कीं, परकीय शब्दांचीं कोणतीं रूपें मराठींत प्रचलित झालीं आहेत, होत आहेत व होतील. याविषयीं असा नियम सांगतां येईल कीं, सर्व परकीय शब्दांस आपण आंग्लोच्चाराचीं रूपें देत असतों. महाराष्ट्रांतील एकंदर जनसमूहामध्यें फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश व रशियन या भाषापेक्षां इंग्रजी भाषेचाच प्रचार अधिक राहाणार आणि यासाठीं आपण जर आंग्लोच्चारांच्या अनुरोधानें शब्द ठरविले तर तें अधिक योग्य व लोकांस अधिक सुगम होईल. उदाहरणार्थ, इंग्रजींत ज्या नांवाचा उच्चार हेनरी असा होतो, त्या नांवाचा उच्चार फ्रान्समध्यें "आंरी" असा होतो. आम्ही फ्रेंच इतिहास लिहितांना "आंरी" असा शब्दोपयोग केला तर "आंरी" म्हणजे हेनरीच आहे हें कितीजणांस समजेल? फ्रेंच इतिहास देतांना "आंरी" असा हेनरीचा उच्चार लिहीत गेल्यास कदाचित हुदलीकरहि आम्हांस प्रकृष्ट पांडित्याचा दोष देतील.

इंग्रजी उच्चारांस प्राधान्य देण्याचा जो प्रघात महाराष्ट्रीय लेखकांमध्यें पडला आहे त्यांचा अतिक्रम करणें आम्हांस अवश्य वाटत नाहीं. ही आंग्लोच्चारास प्राधान्य द्यावयाची पद्धति आपण केवळ यूरोपीय भाषांपुरतीच वापरतों असें नाहीं. हिंदुस्थानांतील शहरांचीं नांवें लिहितांना आपणतेंच करतों. बेंगळूर व मंगळूर यांस आपण बंगलोर मंगलोर लिहूं लागलों नाहीं काय? कोकोनाडाच्या ऐवजीं काकीनाडा असें लिहिलें व त्याखालीं लेख दिला तर तो लेख कोणाच्या दृष्टीस पडेल? उत्तर सिलोनमधील प्रसिद्ध शहर जाफना यास तामिळ लोक "यप्पनम्" असें नांव देतात पण, तें कोणास समजेल बरें? जाव्हाच्या ऐवजीं " यावा " किंवा " यव " असा डच किंवा संस्कृत उच्चार लिहूं लागलों तर कितीजणांस तें समजेल? एवंच आपणास आज तरी आपले परदेशी शब्दांचे उच्चार आंग्लोच्चारानुसारी करणें भाग आहे.

पूर्वोक्त विवेचनांत आलेलीं तत्त्वें येणेंप्रमाणें: परकीय शब्द घेतांना त्यास स्वकीय संस्कार करण्याचें स्वातंत्र्य प्रत्येक भाषेस असतें, आणि ज्या देशांतील लोक ज्या प्रकारच्या विशेष नामांचा उच्चार करतात त्या प्रकारचा उच्चार करणें जगांतील कोणत्याहि राष्ट्रास शक्य नाहीं व प्रत्येक राष्ट्र परकीय विशेषनामाचे उच्चार आपल्याच पद्धतीनें करीत.

इंग्रजी भाषेंतील स्पेलिंग पाहून आंग्लोच्या पद्धतीप्रमाणें उच्चार ठरविण्याची पद्धति महाराष्ट्रांत प्रचलित झाली आहे, व तीं सर्व देशांतील विशेष नामांस सारखीच लावली जात आहे.

मराठींत जे शब्द नवीन येणार त्यांचे उच्चार महाराष्ट्रीय वाचकवर्ग स्वाभाविकपणें जे करतील तेच ज्ञानकोशाचे उच्चार होत; हें प्रचलित धोरण महाराष्ट्रीय ज्ञानकोशानें स्वीकरालें आहे. परकीय नामांस प्रथम इंग्रजी संस्कार होऊन नंतर मराठी संस्कार होणार व त्यामुळें परकी नामांचा विशिष्ट उच्चारपद्धति महाराष्ट्रांत चालू होणार. ही गोष्ट आपणांस स्पष्ट दिसत असल्यामुळें जर्मन, फ्रेंच इत्यादि भाषांतील विशेषनामांचें दृश्य रूप प्रचलित केलीं नाहींत.

(परिशिष्ट नं. १९)

केसरीकारांचा ज्ञानकोशविषयक वृत्ति.

(ले. सं. ज्ञानकोश)

आमच्या ज्ञानकोशमंडळावर केसरी पत्राची कृपा त्याच्या प्रारंभापासून होती तो काहीं अंशीं लो. टिळकांच्या मृत्यूनंतर कमी झाली. ज्ञानकोशाच्या प्रारंभीं त्याच्या निरनिराळ्या प्रकाशितांचा गोषवारा देऊन ज्ञानकोशमंडळास केसरीनें प्रारंभीं चांगलेंच साहाय्य केलें. महाराष्ट्रीय जनतेंत इतर कोणत्याहि पत्रापेक्षां अधिक विस्तार या दृष्टीनें केसरीचें महत्त्व मोठें आहे. लोकमान्य जिवंत असते तर केसरीमार्फत ज्ञानकोशाची आणि त्यांतील अनेक विषयांची मार्मिक तपासणी किंवा लक्ष्य ओढण्याइतकी पहाणी बरींच झाली असती. ज्ञानकोश तयार करण्यास हात घालतांना ज्ञानकोशकारांची एक मोठी इच्छा होती की जुन्या पिढींतील विद्वानांनीं-उदाहरणार्थ, रा. टिळक व महाजनी यांसारख्या लोकांनीं-ही कृति पहावी, व त्यांनीं यशस्वितेबद्दल अभिनंदन करावें. पण ही इच्छा पुरी होण्याचा संभव नाहीं. ज्यांच्या अनुकूल अभिप्रायांचें किंवा शाबासकीचें विशेष महत्त्व ज्ञानकोशकारांस वाटत होतें अशांपैकीं रा. टिळक व महाजनी हे दिवंगत झाले आहेत, आणि सर डॉ. भांडारकर यांनां ही कृति पाहण्याचीहि शक्ति उरली नाहीं. ज्यांनीं आपलें अभिनंदन करावें अशी विशेष इच्छा असते त्यांच्याकडून अभिनंदन होण्याच्या असंभवामुळें कर्तृत्वाचेंहि महत्त्व वाटेनासें होतें. आणि आज इतर मंडळींनीं स्तुति केली तरी किंवा निंदा केली तरी त्या दोहोंचें महत्त्व त्यांच्या टांकेच्या योग्यतेप्रमाणें लहान किंवा थोर असलें तरी त्यापासून होणारा आनंद किंवा दुःख हीं बरींचशीं मर्यादित होतात.

आज लोकप्रियतेचें, लोकनिंदेचें, किंवा लोकांकडून अलक्ष झालें तरी, याचें महत्त्व कार्यास वैयक्तिक आनंद किंवा दुःख याचें उत्पादक खास नाहीं. ज्या मानानें लोकांची स्तुति, निंदा किंवा उपेक्षा यांचा परिणाम शंभर वर्षांवर होईल त्या मानानेंच त्याचें महत्त्व आहे. ज्या कांहीं भारतीय गोष्टींवर ज्ञानकोशांत लेख येत आहेत त्या गोष्टींवर योग्य तऱ्हेनें अभिप्राय देण्यास पुष्कळ

परिश्रम केला पाहिजे अशी स्थिति आहे, आणि आपल्याकडे परिश्रम करून अभिप्राय देण्यास स्वास्थ्याची आणि साधनांची अनुकूलता आहे व या दोहोंचा उपयोग करण्याची पूर्वागत शिक्षणसंपत्ति आहे असा वर्ग आजच्या लेखकवर्गामध्यें अत्यंत थोडा असल्यामुळें ज्या टीका ज्ञानकोशावर प्रसिद्ध होतात त्यांचें वैज्ञानिक दृष्टीनें महत्त्व वाटणें कठिण आहे. त्यांचें महत्त्व वाटावयाचें तें त्या चा लोकांचें लक्ष ओढण्याकडे उपयोग या दृष्टीनेंच वाटणार. रा. टिळकांच्या हयातींत जी केसरींत टीका आली असती तिचें महत्त्व सध्यांच्या स्थितींत नाहीं, व लोकांचें आमच्या प्रयत्नांपैकीं कांहीं भागांकडे तरी लक्ष ओढलें गेलें हें बरें झालें एवढ्याच दृष्टीनें आम्ही तिकडे पहात असतों.

अनेक वर्षांच्या परिचयामुळें व संपादकांच्या अमेरिकेस जाण्यास जे गृहस्थ कारण झाले त्यांत लोकमान्य प्रामुख्यानें असल्यामुळें ज्ञानकोशाच्या मुख्य संपादकांविषयीं लो. टिळकांस प्रेमबुद्धि वाटत होती, व हें कार्य आम्हीं हातीं घेतल्यामुळें त्यांस अभिमानहि वाटत होता. व १९१६ सालीं जानेवारींत ही योजना जेव्हां त्यांच्यापुढें मांडली तेव्हां त्यांनीं प्रथम जरी,हें कार्य पडीस जाण्यास फारच कठिण आहे, तर हें इतक्यांत हातीं येऊं नका असा सल्ला प्रथम दिला, तथापि काम करण्याचा विचार नक्की झाला आहे असें जेव्हां त्यांस सांगितलें तेव्हां त्यांनीं तीन प्रकारें मदत करण्याचें आश्वासन दिलें. ते तीन प्रकार म्हणजे केसरींतून या कार्याकडे लक्ष ओढणें, जी मंडळी भेटतील त्यांच्यापाशीं गोष्टी काढणें आणि वेदांतर्गत सूक्तांचा कालानुक्रम, या विषयावर लिहिणें, यांपैकीं केसरीमार्फत आमच्या प्रयत्नाकडे लक्ष ओढण्याचा क्रिया केसरी चांगल्या तऱ्हेनें करीत होतें. वेदांतर्गत सूक्तांचा कालानुक्रम या विषयावर त्यांस लिहावयाचें होतें तथापि १९१७ सालीं त्यांनीं असें कळविलें कीं त्यांचें लिहिण्याचें अभिवचन इंग्लंडाहून आल्यानंतर खरें समजावें, तोंपर्यंत तें तहकूब समजावें. इंग्लंडांतून आल्यानंतर थोडक्याच दिवसांनीं त्यांचा अंत झाला. त्यामुळें हें साहाय्य लोकमान्यांकडून मिळालें नाहीं; व पुढें केसरीमार्फत आमच्या प्रयत्नांकडे लक्ष ओढण्याची क्रिया फारच कमी व झाल्यास नाखुषीनें व अंग चोरून होऊं लागली.

लो. टिळकांच्या निधनानंतर केसरीची ज्ञानकोशविषयक वृत्ति पालटली. त्या सुमारासच नवीन सुधारणांमुळें पुणें शहरास एक स्वतंत्र प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क मिळाला होता. तेव्हां कांग्रेस डेमोक्राटिक पक्षातर्फे रा. केळकर व डॉ. केतकर या दोघांचीं नांवें उमेदवार म्हणून प्रसिद्ध करण्यांत आलीं होतीं, व त्या दोहोंपैकीं पक्षातर्फे नक्की निवडणूक कोणाची करावयाची हेंहि लो. टिळकांच्या निधनापर्यंत निश्चित झालें नव्हतें. तथापि त्या काळापासून

किंवा लो. टिळकांच्या मृत्यूपासून केसरीच्या ज्ञानकोशविषयक वृत्तांत फेरबदल झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्ञानकोशाचा उल्लेखच होतां होईतों केसरींतून कमी व्हावा अशी केसरीची प्रवृत्ति होऊं लागली. केसरीकारांनीं धैर्यानें उभें राहून कांहीं विषय घेऊन त्यांत ज्ञानकोशकारांशीं दोन हात केले असें कधीं झालें नाहीं. झालें असतें तर त्याबद्दल ज्ञानकोशकारांस कधींच विषाद वाटला नसता. पण केसरीची प्रवृत्ति ज्ञानकोशाची जाहिरात केसरी-मार्फत होतांहोईतों कमी व्हावी अशी होती. जे केसरीकार "संक्रांतीचा तिळगुळ" यासारख्या पुस्तकावर (रा. अच्युतराव कोल्हटकर यांच्याशीं भांडणाऐवजीं दोस्ता होती अशा दिवसांत) स्तुतिपूर्ण अग्रलेख लिहीत आणि दुसऱ्या अनेक पुस्तकांवर लेखमाला लिहीत त्याच केसरीकारांकडे ज्ञानकोशाचे भाग पाठविले गेले तरी त्यांच्यावर अभिप्राय लिहिण्यास प्रवृत्त होत ना. तो न लिहिण्याचें कारण केवळ शास्त्रीय लेखांशीं व लेखनपद्धतीशीं अपरिचय असें केवळ म्हणतां येणार नाहीं. पहिला भाग प्रसिद्ध झाल्यानंतर सुमारें दीड वर्षानें केसरींत अभिप्राय आला; आणि तो देखील जेव्हां केसरींत ज्ञान-कोशावर अभिप्राय कसा नाहीं, अशा तऱ्हेची चर्चा लोकांत सुरू झाली तेव्हां आला. ज्ञानकोशाच्या भागावर अभिप्राय जरी दिला नाहीं तरी तावडतोब पुस्तकाची पोंच म्हणून तरी प्रसिद्ध व्हावी, पण तसलीहि कृपा आमच्यावर केसरीकारांनीं केली नाहीं ज्ञानकोशकारांनीं मात्र रा. केळकर यांस एक वेळ कार्यालयांत मुद्दाम निमंत्रण करून कार्य कसें चालतें हें प्रत्यक्ष दाखविलें होतें.

जेव्हां ज्ञानकोशमंडळाच्या वार्षिक सभा नागपुरास न करतां पुण्यास करण्याचा उपक्रम सुरू करण्यांत आला. तेव्हां त्या योजनेविरुद्ध नागपूरच्या चळवळ करणाऱ्या मंडळींस केसरीकारांनीं भीतभीत हातभार लावला. त्यांचा प्रयत्न कांहीं आरोप न ठेवतां संशय उत्पन्न करण्याचा होता. केसरीच्या संपाद-कांनीं ज्ञानकोशमंडळाचा अपमान करण्याचे इतर प्रसंगहि वाया घालविले नाहींत. जेव्हां केसरीच्या संपादकांस बडोदें येथील साहित्यसंमेलनाचें अध्यक्ष केलें होतें तेव्हां जरी श्रीमंत संपतरावांनीं मोठ्या आग्रहानें स्वतः आमंत्रण केलें होतें तरी कांहीं कौटुंबिक कारणामुळें ज्ञानकोशाच्या संपादकांस जातां आलें नाहीं. अशा संधीस ज्ञानकोशाची उपेक्षा करण्याचा प्रयत्न रा. केळकर यांनीं केलाच. त्यांच्या अध्यक्ष या नात्यानें झालेल्या भाषणांत ज्ञानकोशास पुऱ्या पांच ओळीहि दिल्या नसून वाङ्मयसूचांस अजीबात फांटा दिला आहे. ज्ञानकोशमंडळाचे मुद्दाम पाठविलेले प्रतिनिधि रा. दाते यांस विषयनियामक मंडळींतून वगळण्याचा अयशस्वी प्रयत्नहि झालाच व त्याच प्रसंगीं श्री. सया-जीराव गायकवाड यांनीं साहित्यसंमेलनाच्या सभासदांस आमंत्रण केलें त्यावे-ळेस रा. दाते यांस वगळण्याची खटपट झाली. पण श्री. संपतराव हे रा. दाते यांस

अगोदरच घेऊन गेले आणि त्यामुळें तोहि प्रयत्न फुकट गेला. तसेंच संमेलनामध्यें कांहीं वाङ्मयसंस्थांची माहिती सांगण्याची त्यांच्या चालकांस संधि देण्यांत आली. त्यावेळीं अध्यक्षांस मुद्दाम चिठी पाठवून ज्ञानकोशमंडळाची सोय लावावी लागली. ज्ञानकोशाच्या मुख्य संपादकांनी किंवा त्यांच्या कुटुंबानें जर कोठें व्याख्यान दिलें तर त्याचा उपहासात्मक सारांश देण्याची पद्धति तर केसरींत कायमचीच पडलेली आहे. केसरींत वर्धी टीका करून उत्तरास स्थान न देण्याची क्रिया देखील केसरीकर्ते करीतच आहेत. एवंच केसरीकारांची ज्ञानकोशाविषयीं प्रवृत्ति अशी सांगतां येईल कीं उघडपणें विरोध न करतां, किंवा चांगली म्हणून सर्वसंमत असलेल्या वृत्तीस विरोध वाचकांच्या नजरेस येऊं न देतां ज्ञानकोशाचा उपेक्षा जितकी करता येईल तितकी करावी, ज्या योगानें ज्ञानकोशास मदत होईल असें केसरीनें करूं नये.

केसरी पत्र ज्ञानकोशाचें मित्र असतें तर सरकारनें ज्ञानकोश घेण्याचें लांबणीवर टाकण्याचो युक्ति करून आश्रय न देण्याचें धोरण अंगिकारलें आहे त्यावर टीका करण्यावें केसरीकारांनी कमी केलें नसतें. निदान आमच्या हिताप्रीत्यर्थ न होईना पण ज्या सरकारची केसरीकार शोभा करूं पहातात त्या सरकारची शोभा करण्यासाठीं म्हणून तरी केसरीकारांनीं सरकारची हजेरी घेतली असती. पण हा प्रसंग केसरीकारांनीं ज्ञानकोशविषयक विरोधबुद्धीमुळें मुद्दाम दवडिला. का हीं त्यामुळें ज्ञानकोशाची प्रसिद्धि होईल ती होऊं देण्यापेक्षां या मुद्द्यावर मुग्धच राहिलेलें काय वाईट !

आतां ज्ञानकोशाची २००० ची आवृत्ति बहुतेक खपत आली आहे. २७०० वर ग्राहक झाले आहेत. ज्ञानकोश हा बाहेर पडणार आणि उरलेली निम्हाइकी मिळण्यास अडचण पडणार नाहीं अशी जेव्हां केसरीकारांची खात्री झाली तेव्हां मात्र त्यांनीं ज्ञानकोशाकडे लक्ष देण्यास सुरवात केली. पण असें करण्यांतहि त्यांनीं कौशल्य दाखविलें आहे. प्रतिपक्षाच्या मुख्य मुद्द्याकडे दुर्लक्ष करणें व लहान सहान मुद्दा घेऊन टर उडविण्याचा प्रयत्न करणें, वितंडवाद करणें, आरोप प्रत्यक्ष न करतां गर्भित करणें या तऱ्हेच्या युक्त्या अनेक वर्तमानपत्रकार वापरतात. पण या युक्त्यांमध्यें वाढ करण्याची क्रिया फारशी कोणी करात नाहीं, पण तीं केसरीकारांनीं केली यावद्दल तिच्याविरुद्ध जरी आम्हीं प्रतिकार करतों तरी युक्तीच्या शाबासकीबद्दल तारीफ केल्यावांचून रहावत नाहीं. ती युक्ति अशी-एखादी विरुद्ध लेखमाला सुरू करावी आणि तिचे हप्ते पुष्कळसे उशीरानें देत जावे, व ती अपूर्ण सोडावी. असें केल्यानें दोन फायदे होतातः ज्याच्यावर टीका होते तो मनुष्य लेख संपल्यावर उत्तर देऊं अशी वाट पहातो. अशांत कांहीं महिने गेले म्हणजे टीकेचा विषय असलेला मनुष्य ती गोष्टहि विसरून जातो, त्यामुळें वाचकांच्या मनावर

"परिणाम असा होतो कीं,पहा; या टीकेला त्या मनुष्याकडून उत्तर देखील आलें नाहीं; टीका बरोबर लागू पडली. म्हणजे मोठीशी विचारपूर्वक टीकाहि करावयास नको आणि आपल्या विजयाची टिमकीहि पुन्हां वाजविण्यास संधि आहेच. आम्हांस असें वाटतें कीं ही पद्धत सुचण्यास केसरीकारांस "न चारिहिंसा विजयश्च हस्ते" ही कालिदासोक्ति गमक झाली असावी. असो, कांहीं झालें तरी हें कबूल केलें पाहिजे कीं बलवान प्रतिस्पर्ध्याशीं वागण्याची एक आगळी युक्ति दाखवून वादनीतिशास्त्राची केसरीकारांनीं वाढ केली, यांत संशय नाहीं, आणि याबद्दल केसरीकारांच्या संशोधनशक्तीबद्दलहि आम्हांस विश्वास वाटूं लागला आहे.

केसरीकारांचें भाग्य कांहीं बाबतींत मोठें स्पृहणीय आहे. त्यांच्या पत्राचा प्रसार त्यांच्या पूर्वसंपादकांच्या कार्यामुळें मोठा झाला असल्यानें त्यास प्रतिपक्षासंबंधानें एखादा खोटा गोष्ट प्रसृत करण्यांत यश हें ठेवलेलेंच. प्रतिपक्षाचें उत्तर प्रसिद्ध करूं नये, त्यानें अन्यत्र प्रसिद्ध केलें तरी हरकत नाहीं. आपण केलेला आरोप पसरेल पण आरोपाचें निराकरण फारसें पसरणार नाहीं. या संधीचा फायदा केसरीकार थोडा थोडका घेत नाहींत. केसरीच्या हिताचा आणखी एक गोष्ट ज्या वेळेस केसरीच्या उत्पादकानें आपलें नामकरण केलें त्याच वेळेस झाली. सिंहाच्या अर्थाचें नांव असलें म्हणजे फार फायदा होतो, दुसऱ्याची कींव वाटेल तेव्हां करतां येतें आणि स्वतःच्या बोलण्यास गर्जना म्हणता येतें. प्रतिपक्षानें चीत करून केसरीकारांस निरुत्तर केलें म्हणजे " ब्रूहि सिंहो मया जितः " असें म्हणून आपल्या निरुत्तरार्चेहि समर्थन करतां येतें.

केसरींत आजपर्यंत जे मुद्दे येऊन गेले त्यांचा विचार पुढें करूं.

केसरीकार व ज्ञानकोशकार
(एका खोडसाळ टीकेस उत्तर)

' विद्यासेवक ' मासिकाच्या गेल्या(वर्ष १,अंक १०)अंकांत ज्ञानकोशाचे संपादक(डॉ. श्री. व्यं. केतकर) यांनीं ' केसरीकारांची ज्ञानकोशविषयक वृत्ति ' या मथळ्याखालीं एक अत्यंत खोडसाळ असा लेख लिहिला आहे. सदर लेखाचा अनुचितपणा लक्षांत येण्याला वाचकांनीं तो स्वतःच संपूर्ण वाचावयास पाहिजे. परंतु केसरीवर केलेल्या आक्षेपांस उत्तर देण्याला जरूर तेव्हढींच विधानें जमेस धरून आम्हांस या लेखाचा निर्वाह करावयाचा आहे.

ज्ञानकोशकारांचा मुख्य आक्षेप असा कीं, केसरीनें त्यांच्या ज्ञानकोश ग्रंथाचा उपेक्षा केली ! डॉ. केतकर यांनां आपल्या ग्रंथाचें महत्त्व ज्या मानानें प्रचंड वाटतें त्या मानानें अर्थात् उपेक्षाहि दुःसहच वाटणार. पण त्यांचा या उपेक्षेचा आक्षेप सर्वस्वीं निर्मूल आहे. शिवाय त्यांनीं या उपेक्षेचीं

जीं अनेक कारणें किंवा लक्षणें दिलीं आहेत तीं पाहिलीं म्हणजे तर या टीकेच्या बाष्कळपणाविषयीं जितकें हंसूं येतें तितकाच तिच्या खोडसाळपणाचा तिटकाराहि येतो.

कृतघ्न भिक्षुक !

हल्लींच्या केसरीकारांनीं ज्ञानकोशाची उपेक्षा केली हें भासविण्याला टिळकांनीं त्या ग्रंथाची विशेष आस्था बाळगिली ही विरोधगर्भ भूमिका सहजच उपयोगी पडणारी आहे. हल्लींच्या केसरीकारांनीं ज्ञानकोशाची कितीहि स्तुति केली तरी तिची किंमत ज्ञानकोशकारांना वाटत नाहीं हें त्यांनीं या लेखांत परोपरीनें सांगितलेलें आहे. अशी स्थिति खरीच असती तर उपेक्षेचा रागहि येण्याचें कारण नव्हतें. पण इकडे मनांतून आपल्या कार्याचा परामर्ष तर घेतला जावा अशी इच्छा व अपेक्षा, आणि फिरून तो परामर्ष घेतला गेला तरी त्याची आपणास किंमत वाटत नाहीं असें तुच्छताबुद्धीचें प्रदर्शन, हीं परस्पर कशी सुसंगत आहेत हें ज्ञानकोशकारच जाणोत! पण या विसंगतीनें त्यांनी ' पोटभर जेवून उठतांना अन्नाला नांवें ठेवणाऱ्या ' कृतघ्न भिक्षुकांचेंच अनुकरण केलेलें आहे. " टिळक व महाजनी हे ज्ञानकोशकारांची पाठ थोपटण्यास आज हयात नाहींत, आणे डॉ. भांडारकर जिवंत आहेत पण ते प्रकृतीनें निरुपयोगी, असे झाल्यानें योग्य माणसांच्या अभिनंदनाच्या असंभवामुळें आपणांस आपल्या कर्तृत्वाचेंहि महत्त्व वाटेनासें झालें आहे " असे निराशेचे उद्गार डॉ. केतकर यांनीं दिमाखानें काढले आहेत. जणूं काय महाराष्ट्रांत टिळक, महाजनी, भांडारकर यांच्या जोडीला बसण्याला स्वतः डॉ. केतकर हेच काय ते एकटे चौथे विद्वान व बाकी सर्व शून्यांधकार ! पण या मानभावी निराशेच्या रडण्यानें डॉ. केतकरांनीं योजिलेल्या प्रतिष्ठेचें घर त्यांनां सहज मिळेल असें मात्र त्यांनीं समजूं नये. कुठें टिळक-भांडारकर व कुठें केतकर !

डॉ. केतकर लिहितात कीं, " अनेक वर्षांच्या परिचयामुळें त्यांच्या अमेरिकेस जाण्याला जे गृहस्थ कारणीभूत झाले त्यांत लोकमान्य प्रामुख्यानें असल्यामुळें ज्ञानकोशाच्या मुख्य संपादकाविषयीं टिळकांना प्रेमबुद्धि व अभिमान वाटत होता. " टिळकांच्या निकट परिचयाच्या लोकांनाहि हें शुभ वर्तमान अपूर्वच वाटेल ! अमेरिकेला धाडण्याला हाच एक मोहरा योग्य असें म्हणून टिळकांनीं डॉ. केतकरांची निवडणूक केली असें आमच्या तरी ऐकिवांत नाहीं. एरवीं अमेरिकेंत जाणारे पुष्कळ तरुण लोक चालीप्रमाणें टिळकांचा आशीर्वाद घेऊन जात असत ही सामान्य गोष्ट आम्हांस माहीत आहे. पण लोकमान्यांचें विशेष प्रेम व ममत्व स्वतःला नसतें चिकटवून घेण्यांत डॉ. केतकरांचा हेतु एवढाच दिसतो कीं, या प्रेमामुळें टिळक होते

तोपर्यंत त्यांनीं ज्ञानकोशावर विशेष परामर्ष घेतला व त्यांच्या मरणानंतर केळकरांनीं तसा परामर्ष घेतला नाहीं हें सकारण म्हणून वाचकांस भासवावें. पण केसरीद्वारां परामर्ष घेणें हाच त्यांचा मुख्य मुद्दा असल्यास त्यांनां विघातक अशी एक गोष्ट डॉ. केतकर यांच्या लक्षांत आली नाहीं तीं ही कीं, ज्ञानकोशावर कलाना निघण्यापूर्वीपासून आतांपर्यंत केळकर हेच प्रायः केसरीचे संपादक आहेत. टिळकांच्या हयातींत केसरीमध्यें ज्ञानकोशासंबंधीं मजकूर आलीं, जो नांव मिळाला तोहि केळकरांनींच दिलेला होता! केळकरांची इच्छा नसतां तो नांव देण्यास टिळकांनीं केळकरांनां भाग पाडलें असला कांहीं पुरावा डॉ. केतकर यांजपाशीं असल्यास त्यांनीं तो जरूर प्रसिद्ध करावा.

खरी मदत केळकरांचीच

पण या बाबतींत वस्तुस्थिति काय आहे हें एकदांच सांगून टाकलेलें बरें. टिळकांच्या हयातींत ज्ञानकोशासंबंधीं मजकूर केसरींत चारं वेळां आला; त्या तारखा येणेंप्रमाणें: (१) १९-६-१७; (२) १८-१२-१७; (३) १-१०-१८; (४) १७-१२-१८. हे चारहि लेख डॉ. केतकर यांच्या सहीचे आहेत व ते ज्ञानकोश योजनेच्या प्रसिद्धयर्थ आहेत. हें सांगावयाचें कारण इतकेंच कीं, टिळकांनीं ज्ञानकोशाचा पुष्कळ परामर्ष घेतला या केतकरांच्या विधानावरून स्वतः टिळकांनीं याविषयीं केसरींत अनेक लेख लिहिले असा वाचकांस भ्रम होतो तो दूर व्हावा. त्यांतूनहि एक गोष्ट विशेष सांगण्याची ती ही कीं, टिळकांच्या हयातींत जे केतकरांचे ४ लेख प्रसिद्ध झाले म्हणून वर सांगितलें त्यांतले नं. ३ व ४ हे तर टिळक विलायतेस गेल्यावरच प्रसिद्ध झाले. अर्थात् ते लेख तरी टिळकांच्या भिडेमुळें घातलेले नाहींत तर स्वतः संपादकाच्या सहानुभूतीनें! ज्ञानकोशाचा हा काळच असा होता कीं, प्रत्यक्ष ग्रंथ असा अद्यापि प्रसिद्धच व्हावयाचा होता, यामुळें भागीदारांनां काय काम चालू आहे याचीच फक्त माहिती मिळणें जरूर होतें; व ती माहिती देण्याला डॉ. केतकर यांनां भरपूर वाव टिळक असतांना त्यांच्या आग्रहाशिवाय व ते नसतांना संपादकांच्या स्वयंस्फूर्त सहानुभूतीनें दिला गेला. उपेक्षा किंवा आबाळ केली गेली नाहीं.

" सूचि " हा पहिला ग्रंथ प्रसिद्ध झाला तेव्हां केळकर हे विलायतेंत होते. ते परत आल्यावर व टिळकांच्या मृत्यूनंतरहि ज्ञानकोशाचे भाग अभिप्रायाला पाठविण्यांत येऊं लागल्यानंतर, अर्थात कमजास्त उशीरानें, कांहींचें परीक्षणहि करण्यांत आलें. हे भाग प्रसिद्ध होण्यांत व केसरीकडे अभिप्रायार्थ पाठविण्यांत जितकें आगेमागे झालें व अव्यवस्था घडली तितकी अव्यवस्था

परीक्षणांत खास घडली नाहीं. सन १९२२ सालीं ज्ञानकोशमंडळापैकीं कर्वे यांचें एक चर्चात्मक पत्र आलें तेंहि केसरींत छापलें होतें. १९२३ सालीं "वेदविद्या" या विभागग्रंथाचें सविस्तर परीक्षण देण्यांत आलें. तसेंच १९२४ सालीं 'बुद्धपूर्वजग' या विभागाचें परीक्षण व फिरून त्याच वर्षांत 'विद्यासेवक' नामक जें मासिक पुस्तक ज्ञानकोशानें सुरू केलें त्याच्या स्वागताच्या निमित्तानें, स्वतः ज्ञानकोशाचा गौरवपूर्ण व अभिनंदपर उल्लेख आला होता. चालू सालीं प्रसिद्ध झालेल्या कांहीं विभागांची पोंच दिलेली आहे. पण प्रसिद्ध झाले असे कित्येक विभाग केसरीकडे अद्यापि अभिप्रायाला आलेलेच नाहींत. अर्थात परीक्षण यथावकाश कांहीं झालें व पुढें कांहीं होणार आहे. पण ग्रंथच न आले तर परीक्षण तरी कसें व्हावें? बरें–ज्ञानकोशासंबंधीं केसरी तील परामर्षाचे गौरवपूर्ण उल्लेख केवळ औपचारिक असते तर डॉ. केतकर यांना कुरकुर करण्यास कदाचित जागा असती. परंतु तसें घडलेलें नाहीं, व त्याचा प्रत्यक्ष पुरावा म्हणून आम्ही दोनतीन उतारे खालीं देतों.

पदरात पुराव्याचें माप घ्या

'वेदविद्ये' च्या विभागाचें परीक्षणांत केसरीनें दोन सवादोन कॉलम खर्ची घातले आहेत. त्यांतील एक उल्लेख असा आहे "अशा रीतीचें विवेचन पाश्चात्य किंवा भारतीय विद्वानांनीं कोठें केलेलें नाहीं. ग्रंथकारांनीं मांडलेले सिद्धांत अगदीं नवे, फार महत्त्वाचे, आणि मतभेद व वाद उत्पन्न करणारे आहेत. तथापि त्या योगानें वाचकांच्या चिकित्सक बुद्धीला चालन मिळणार असल्यामुळें तज्ज्ञांनीं व संशोधकांनीं तिकडे अवश्य लक्ष पुरवावें एवढें आम्ही सुचवितों."

सन १९२४ सालीं 'बुद्धपूर्वजग' या विभागाचें परीक्षण करतांना खालील वाक्य लिहिलेलें वाचकांस आढळल.- "एकदंरीत बुद्धपूर्व जग हा ग्रंथ मराठी भाषांत अपूर्व झाला आहे."

याच सालीं 'विद्यासेवका' चें केसरीनें जें स्वागत केलें त्यांतील खालील उतारा डॉ. केतकर यांस आम्हीं सादर करतोः—

"महाराष्ट्रीय ज्ञानकोश प्रकाशित करण्याचें महत्त्वाचें कार्य ज्ञानकोशमंडळानें चालविलें आहेच. ज्ञानकोशाच्या निरनिराळ्या विषयांवर त्यांतील दोष दाखविणाऱ्या प्रतिकूल टीका होतील त्यांस उत्तर देणें, आणि शुद्ध भौतिक शास्त्रें व यंत्रकला वगळून बाकीचीं शास्त्रें, विद्या व कला यांवर स्वतंत्र लेख लिहिणें, ह्या उद्देशानें ज्ञानकोशमंडळाच्या संपादकवर्गानेंच 'विद्यासेवक' चालू महिन्यापासून सुरू केलें आहे. विद्यासेवकाकडून महाराष्ट्राची सेवा त्याच्या नांवास साजण्यासारखी होईल अशी उमेद बाळगण्यास हरकत नाहीं" (केसरी ३०-९-२४).

ज्ञानकोशाला केळकर यांनीं साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष या नात्यानें केलेल्या भाषणांत, अवघ्या ५ । ४ ओळींच दिल्या अशी तक्रार केतकरांनीं केली आहे. पण त्या ५।४ ओळींत किती उत्साहपूर्ण स्तुति व उत्तेजन आहे, त्यांत ' अंगचोरपणा ' मुळींच कसा नाहीं, हें वाचकांस कळावें म्हणून मुद्दाम त्या पांच ओळीं खालीं देत आहें. "डॉ. केतकर यांच्या प्रस्तवना-खंडातील 'हिंदुस्थान आणि जग' हा ग्रंथहि जुन्या इतिहासाच्या दृष्टीनें वाखाणण्यासारखा आहे. केतकर यांचा ज्ञानकोश प्रसिद्ध झालेल्या योजनेप्रमाणें संपूर्ण झाल्यास मराठी भाषेची ती बिनमोल सेवा घडून येणार आहे."

असले उतारे देण्याचें एरवी कारण नव्हतें, पण पुराव्याचें माप पदरांत घालणें जरूर झालें. कारण टिळकांच्या मृत्यूनंतर ज्ञानकोशाकडे "लोकांचें लक्ष ओढण्याची क्रिया फारच कमी झाली व झाल्यास नाखुषीनें व अंग चोरून होऊं लागली" असा निराधार बाष्कळ आरोप डॉ. केतकर यांनीं केसरीकारांवर केला आहे. केसरीकारांच्या मनांत ज्ञानकोशाविषयीं वैर असतें तर वरील उताऱ्यांत लिहिलेले गौरवपर शब्द त्यांजकडून कधींच लिहिले गेले नसते. त्यांनीं तसें लिहिण्याला भाग पाडण्यास त्यांच्या मानगुटीवर तेव्हां कोणता संबंध बसला होता? असो; आमचे हे वरील उतारे व डॉ. केतकर यांच्या आक्षेपाची द्वाड भाषा एकत्र वाचल्यास 'छिन्न भिन्नका' ची जी उपमा आम्ही त्यांस प्रारंभीच दिली आहे ती किती समर्पक आहे हें वाचकांस कळून येईल.

व्यक्तिविषयक आरोप

पण डॉ. केतकर यांच्या टीकेला व्यक्तिविषयक भावनांची मूळ स्फूर्ति असल्यामुळेंच त्यांच्या हातून असले निर्मूल आक्षेप आणण्यांत आले. कसे ते पहा. "लो. टिळकांच्या निधानानंतर केसरीची ज्ञानकोशविषयक वृत्ति पालटली," असें विधान डॉ. केतकर यांनीं केलें आहे; व लगेच त्यापुढें त्यांच्या मतें त्याला घडलेलें कारणहि दिलें आहे! तें असें कीं, "काँग्रेस डेमोक्रॅटिक पक्षातर्फे केळकर व डॉ. केतकर या दोघांचीं नांवें १९२० सालीं पुणें शहरातर्फे मुंबई—कौन्सिलच्या निवडणुकींत उमेदवार म्हणून प्रसिद्ध करण्यांत आलीं होतीं व त्यांपैकीं या पक्षातर्फे नक्की निवडणूक कोणाची व्हावयाची हेंहि टिळकांच्या निधनापर्यंत ठरलें नव्हतें." डॉ. केतकर म्हणतात, "त्या काळापासून केसरीच्या ज्ञानकोशविषयक वृत्तींत फेरबदल झाला. व कोशाचा उल्लेख होतां होईतों केसरींतून कमी व्हावा अशी प्रवृत्ति होऊं लागली." वरील विधानांत डॉ. केतकर यांनां काय सुचवावयाचें आहे तें अगदीं उघड आहे. काँग्रेस डेमोक्रॅटिक पक्षातर्फे कौन्सिलांतील पुणें शहराच्या

जागेकरितां ते एक उमेदवार म्हणून स्वतः पुढें आले होते ही गोष्ट खरी. आणि त्यांचेंच काय पण या पक्षातर्फे कोणत्याहि मतदारसंघांत जो जो कोणी उमेदवार म्हणून उभा राहिला त्याचें त्याचें नाव केसरीमध्यें उमेदवारांच्या यादींत प्रसिद्ध झालें होतें. पण केळकरांच्या ऐवजीं डॉ. केतकरांना उमेदवार म्हणून कायम करण्याची टिळकांची इच्छा असल्याची जी गर्भित सूचना केतकरांनीं केली आहे ती सर्वस्वी असत्यमूलक आहे. पुण्यांतलें एखादें पोरहि या सूचनेला हंसेल !

या बाबतींत एक गोष्ट आम्हांस पक्की आठवते ती अशी कीं डॉ. केतकर यांनीं मात्र या सुमारास एक धाडसी व बढाईखोर पत्र लिहून टिळकांकडे धाडलें त्यांत त्यांनीं असें लिहिलें होतें कीं, 'मी केळकरांना निवडणुकींत लीलेनें सहज चारीमुंडे चीत करीन असा माझा आत्मविश्वास आहे. याकरितां उमेदवार म्हणून न राहण्याविषयीं केळकरांनां सल्ला द्या व मला उमेदवार निवडा' परंतु केतकरांनीं टिळकांना असलें पत्र लिहिलें यावरून टिळकांच्या मनांत केळकरांऐवजीं केतकरांनां उमेदवार म्हणून निश्चित करण्याचें आलें होतें असें सिद्ध कसें होणार ? आम्हाला एवढेंच स्मरतें कीं, या पत्राचा उघड उपहास करून टिळकांनीं तें पत्र केळकरांचेच स्वाधीन केलें ! तें कसेंहि असो, केतकरांनीं दिलेल्या माहितींत अशी कोणतीच गोष्ट नाहीं की जीमुळें ज्ञानकोशावर अप्रसिद्धीचें दडपण घालण्याइतकें केतकरांचें वैर केळकरांनीं मनांत बाळगावें ! केतकरांच्या उमेदवारीची किंमत केळकर कैक्षांहि पुर्णपणें जाणून होते. वरें, पुढें असहकारितेमुळें केळकरांनीं उमेदवारीचा राजीनामा दिला, तेव्हां, आणि निदान यंदा फिरून स्वराज्यपक्षानें आपले उमेदवार निवाडणुकीस उभे केले तेव्हां हे बढाईखोर केतकर कां दडून बसले ? केळकरांनां 'सहज चारीमुंडे चीत' करण्याची ज्यांनां खात्री त्यांनां आपटे-भोपटकरांच्या चढाओढींत पुष्कळच फायदा झाला असता. पण आम्ही चुकलों ! ते टिळक-व ते केतकर अशीच कायती जोडी जगांत होऊन गेली ! रंडक्या महाराष्ट्रांत टिळकांच्या मृत्यूनंतर, आपल्या बरोबरीचा पुरस्कर्ता नाहींसा झाल्यामुळें, डॉ. केतकरांनीं निवडणुकीवर तुच्छतेनें सहजच पाठ फिरविली असावी !

बडोद्यास काय घडलें.

असलाच दुसरा एक व्यक्तिविषयक बाष्कळ आक्षेप, केळकरांच्या उपेक्षेचें निदर्शक म्हणून, डॉ. केतकर यांनीं गंभीरपणें पुढें आणलेला आहे ! ते म्हणतात " ज्ञानकोशाच्या संपादकमंडळाचा अपमान व उपेक्षा करण्याचीं संधि केळकरांनीं वेळोवेळीं साधली ! " आणि याला पुरावा काय तर म्हणे ज्ञानकोशाचे प्रतिनिधि म्हणून दाते हे बडोद्याला साहित्यसंमेलनास (१९२९ नोव्हेंबर) गेले असतां त्यानां विषयनियामक मंडळांतून वगळण्याची खटपट झाली, व संमेलनाच्या सभासदांनां सयाजीराव महाराजांनीं आमंत्रण केलें त्यांतूनहि ते वगळले जात होते ! जणूं काय या गोष्टी संमेलनाचे अध्यक्ष केळकर यांनींच मुद्दाम घडवून आणल्या ! कशास काय, संबंध ! पण ही गोष्ट केळकरांनीं केली असें केतकर कोणत्याहि माहितीवरून म्हणत असले तरी तें निखालस निखालस खोटें आहे असें आम्ही म्हणतों. दाते यांनां अशा रीतीनें

बगळण्यांत केळकरांनां स्वतःचे असें काय साधावयाचें होतें हें केतकरांनीं नुसतें दर्शविलें असतें तरी बरें होतें. केळकर स्वतः अध्यक्ष असल्यामुळें विषय-नियामक मंडळांतील व राजवाड्यांतील त्यांची जागा तरी सुरक्षित होती ना! दाते ती अडवूं शकत नव्हते. मग केळकरांनीं दाते यांच्या आड कां यावें ? याचा खुलासा केतकर करतील तर बरें होईल. कदाचित असा संभव आहे कीं, ज्ञानकोशमंडळ पुण्यास नुकतेंच स्थापन झालें असून दाते यांचीं त्याअेळीं संमेलनाच्या चालकांनां व्यक्तिशः असावी तितकी माहिती नसेल, तसेंच ते ज्ञानकोशाचे ' प्रतिनिधि ' या नात्यानें गेले म्हणून काय झालें ? खुद्द ज्ञान-कोशाचेंहि महत्त्व ग्रंथांच्या द्वारें लोकांच्या मनात बिंबावें तितकें त्यावेळीं बिंबलेलें नसेल.

तें कसेंहि असो, तो विषय आमचा नाहीं. दाते यांची परामर्षाची अपेक्षा निष्फळ झाली असल्यास केतकरांनीं तो बाद बडोदें-संमेलनाच्या अधिकृत चालकांशीं भांडावा. आम्ही इतकेंच सांगतों कीं, केळकरांचा या गोष्टींत कांडाइतकाहि संबंध नाहीं. उलट अध्यक्ष केळकर यांचेपर्यंत जी गोष्ट गेली तींत दाते यांची दाद केळकरांनींच लादली अशी पुढच्याच वाक्यांत डॉ. केतकर यांनीं स्वतःच कबुली दिली आहे ! कारण ते म्हणतात " संमे-लनांत वाङ्मयसंस्थांची माहिती सांगण्याची त्याच्या चालकांस संधि देण्यांत आली. त्यावेळी अध्यक्षांस (केळकरांस) मुद्दाम चिठ्ठी पाठवून ज्ञानकोश-मंडळाची सोय लावावी लागली. " दाते यांना सोय लावावी लागली असेल पण ती सोय केळकरांकडे चिठ्ठी जाताच त्यांनीं लावून दिली. यावरून केळ-करांना ज्ञानकोशाची उपेक्षा करण्याची इच्छा नव्हती हेंच सिद्ध होत नाहीं काय ? या गोष्टी एरवीं किती किरकोळ आहेत हें वाचकांच्या तेव्हांच लक्षांत येईल पण डॉ. केतकर यांनीं केवळ केळकर यांजवर दोषारोप करण्याकरितां इतकी क्षुद्र दृष्टि चालविली म्हणूनच उत्तरादाखल असल्या क्षुद्र गोष्टींत आम्हांसाहि शिरावें लागतें.

जोडप्याच्या उपहासाचें पाप

याहीपुढची पायरी म्हणजे डॉ. केतकरांनीं असा एक आरोप केला आहे आहे कीं, ते स्वतः किंवा त्यांचें कुटुंब यांनीं जर कोठें व्याख्यान दिलें तर त्याचा उपहासात्मक सारांश केसरींत देण्याची ' पद्धत कायमची ' पडलेली आहे. जणूं काय केसरीला या जोडप्याचा उपहास करण्याखेरीज दुसरा उद्योगच नाहीं ! पण आम्ही डॉ. केतकर यांना असें उघड आव्हान करतों कीं, त्यांनां सत्याची कांहीं चाड असेल तर, या ' कायमपद्धतीं 'तील गोष्ट किती वेळां व कोणकोणत्या बाबतींत कसकशी घडली याची त्यांनीं उदाहरणें द्यावीं, नाहीं तर आपला खोटा आरोप निमूटपणें परत घ्यावा. या वादांत डॉ. केतकर यांनीं आपल्या कुटुंबाचाहि उल्लेख केला ही गोष्ट मात्र अश्लाघ्य आहे. ती बिचारी तुमच्या आमच्या वादांत कशाला ? आपला उपहास झाला अशी तक्रार करणारीं माणसें पुष्कळ वेळां आपल्या उपहासास स्वतःच कारणीभूत होतात ही गोष्ट तरी डॉ. केतकर वरील उदाहरणें देतील तर आपोआप सिद्धहि होईल. ज्ञानकोशमंडळ म्हणजे स्वतः डॉक्टर केतकर,

त्यांचें कुटुंब, त्यांचे दुय्यम संपादक, अशा सर्व गोतावळ्याचा घोळ घालून या सर्वांचा अपमान केसरीकार संपादक व व्यक्ति या दोनहि नात्यांनीं करण्याची संधि दवडीत नाहींत असलें विधान करणें म्हणजे धाष्टर्याचें व बेजबाबदारीची कमालच होय ! केळकर यांस एक वेळ ज्ञानकोशकारांनीं मुद्दाम कचेरींत निमंत्रण केलें होतें असें केतकर मोठ्या आढयतेनें सांगतात. पण केळकरांनींहि ज्ञानकोशाचा केसरींतून ७।८ वेळ तरी परामर्ष घेतला हा प्रत्युपकार कांहीं कमी नाहीं.

आपली आपण उपेक्षा करी

डॉ. केतकर यांचा दुसरा असा आक्षेप कीं, "ज्ञानकोशमंडळाची कचेरी नागपुराहून पुण्यास आणिली गेली तेव्हां त्याविरुद्ध चळवळ करणाऱ्या मंडळींना केसरीकारांनीं भीत भीत हातभार लावला ! " यांतील खरी गोष्ट इतकीच आहे कीं ज्ञानकोशाची मूळ घटना नागपुरास झाली, डॉ. केतकर यांस पाहिले साहाय्यक व आश्रयदाते नागपुरास मिळाले,अशा स्थितींत नागपूरच्याच आठ-दहा प्रमख प्रमुख गृहस्थांनीं नागपुराहून कचेरी पुण्यास आणण्याविरुद्ध महत्त्वाचीं कारणें देऊन एक पत्र केसरीकडे पाठविलें व तें केसरीनें छापलें. स्वतंत्र रीतीनें या वादांत केसरी मुळींच पडला नाहीं. तसें त्यास पडावयाचें असतें तर डॉ. केतकर यांचेपेक्षा नागपूरच्या स्नेहीमंडळींचीच बाजू उचलून धरण्याला केसरीकारांना स्वाभाविक अधिक कारण होतें, पण तसें त्यानीं केलें नाहीं, आणि या सर्व सरळ प्रकाराला, आपल्या विरोधकांना भीत भीत हातभार लावला,असें केतकर म्हणतात. तेव्हां तें त्यांच्या दूषित मनास शोभेसेंच आहे याहून अधिक काय म्हणावें!

दुसरा एक चिल्हर आक्षेप केवळ अकरणरूपी असाहि आणला आहे, तो असा कीं " मुंबई सरकारानें ज्ञानकोशाला आश्रय देण्याचें लांबणीवर टाकलें ह्या गोष्टीवर केसरीकारांनीं टीका केली नाहीं." पण ज्ञानकोशाला ह्या बाबतींत आलेलें सरकारी उत्तर म्हणजे कांहीं बादशाही जाहीरनामा नव्हे कीं, तो सर्व जगाला कळेल. इतर चार लोकांप्रमाणें आपलें गाऱ्हाणें ज्ञानकोशकारांनीं केळकराकडे साधार कळविलें असतें व टीकेची अपेक्षा दर्शविली असती तर ती गोष्ट सहज घडली असती. पण यावर केतकर म्हणतात कीं, " हा टीकेचा प्रसंग केसरीकारांनीं ज्ञानकोशविषयक विरोधबुद्धीमुळें मुद्दाम दवडला. ज्ञानकोशाची प्रसिद्धि होईल ती होऊं देण्यापेक्षां या मुद्दयावर मुग्धच राहिलेलें काय वाईट ! आम्ही म्हणतों कीं, हा आक्षेप म्हणजे अधमपणाच्या आरोपाची कमालच होय.

विक्षिप्तपणा कोण चालूं देणार.

ज्ञानकोशांतील कित्येक विषयांवर व विधानांवर आक्षेप घेणारे एकदोन लेख केसरींत प्रसिद्ध झाले आहेत हें खरें पण असल्या महत्त्वाच्या ग्रंथांत भरमसाट विधानें करून डॉ. केतकर यांनीं आपल्या बेसुमार बेताल मतांचें

नंगे प्रदर्शन मांडल्यास त्यावर टीका होणारच. केतकर ज्ञानकोशाचे संपादक झाले म्हणून शुद्ध ज्ञानाचा व बिनचूक मतांचा मक्ता त्यांना मिळालेला नाहीं. आणि लोकांच्या खर्चानें ते आपलीं विक्षिप्त मतें एका टोंकाला नेऊन भिडवूं लागले तर लोकांनीं तीं काय म्हणून निमूटपणें ऐकून घ्यावीं ? श्रीयुत नानासाहेब पावगी यांचा ज्ञानकोशावरील टीकालेख फार लांब म्हणून आम्हांस तो पुरा करतां आला नाहीं. तसेंच काव्य विषयावरील श्रीयुत दत्तात्रेय केशव केळकर यांचा टीकालेख समर्पक, एवढेंच नव्हे तर आम्हांस सर्वस्वीं मान्य, म्हणूनच आम्ही तो छापला. लेखणीच्या एका घोटाला पुरेल इतकेंच धेंडें तेजाब शिंपडून सगळें जुनें-नवें मराठी काव्यवाङ्मय दग्ध करूं पाहणाऱ्या या ऋषिमन्य तामसी व्रात्य टीकाकाराला आपलें स्तोम कोण कसें माजवूं देईल ? आपल्या टीकाकारांशीं दोन हात करण्याचें धैर्य डॉ. केतकर यांना खेर असतें तर या दोनहि लेखांना त्यांनीं आजवर उत्तर दिलें असतें. पण त्यांनीं मौन धरणें हेंहि ' ब्रूहि सिंहो मया हतः ' या वाक्यानें स्वतःच्या निरुत्तरांचेंच समर्थन नव्हे काय ? टीकाविषयक लेखांना डॉ. केतकरांनीं उत्तरे देण्याकरितां लेख आम्हांकडे पाठविले व आम्ही ते छापले नाहींत असें किती वेळा घडलें हें डॉ. केतकर उदाहरणें देऊन सांगतील तर बरें होईल. प्रतिकूल टीकेच्या चिखलानें ज्ञानकोशाचें तोंड खराब झालें असें त्यांना वाटत असल्यास आपल्या प्रतिटीकेच्या पदरानें त्यानीं तें वेळींच पुसून काढावयास पाहिजे होतें. वरें, उलट टीका होऊन देखील स्वतः जर त्यांना निरुत्तर बसवतें तर केसरीनें त्याची उपेक्षा केल्यास तरी का रागवावें ?

आरतूनपरतून डॉ. केतकर यांनीं केसरीकारांस असा टोमणा मारण्याचा प्रयत्न केला आहे कीं, केसरीनें ज्ञानकोशाचा परामर्ष घेतल्यापासून जी प्रसिद्धि लाभेल तिच्यावरच आज आपली मुख्य नजर आहे, इतर रीतीनें केसरीच्या अभिप्रायाची किंमत आपणांस वाटत नाहीं ! अशा टीकेला आम्हांसहि उत्तर आहे. कारण ज्या अनुकूल अभिप्रायाची ज्ञानकोशकारांना किंमत वाटत नाहीं तो यापुढें आम्हीहि पण देऊं इच्छित नाहीं. म्हणून त्यांना यापुढील ग्रंथ केसरीकडे अभिप्रायाला मुळींच न पाठविलेले बरे. केसरी पत्राचा प्रसार ' पूर्वसंपादका ' च्या म्हणजे टिळकांच्या कार्यामुळें मोठा झाला ही गोष्ट खरी असली तरी, तिनें केळकरांस भोसकावें म्हणून तीहि केतकरांनीं तशी मुद्दाम लिहिली आहे. अर्थात केसरीच्या प्रचंड वाचकसंख्येचें कांहींच श्रेय केळकर यांजकडे नाहीं असेंहि ध्वनित करण्याचें धाष्टर्य डॉ. केतकर यांनीं केलें आहे. पण टिळकांच्या मृत्यूनंतर पांच वर्षांनीहि अवशिष्ट राहिलेल्या केसरीच्या प्रसाराचा फायदा घेण्याचा लोभ डॉ. केतकर यांना अजूनहि सुटत नाहीं. या एका गोष्टीवरूनच या अवशिष्ट अशाहि प्रसाराचें प्रचंडत्व किती आहे हें

सहजच कळून येतें. ज्ञानकोशाची तीन हजारांची आवृत्ति खपत आली असें डॉ. केतकर दिमाखानें सांगतात त्यांचें कितीसें श्रेय केसरीनें वेळोवेळीं घेतलेल्या त्याच्या परामर्षाला असेल हें कोणी सांगावें ? " ज्ञानकोशाला उरलेली गिऱ्हाइकी मिळण्यास अडचण पडणार नाहीं अशी केसरीकारांची खात्री झाल्यावरच त्यांनीं ज्ञानकोशाकडे लक्ष देण्यास सुरवात केली आहे, " असें डॉ.केतकर लिहितात ! पण आम्ही इतकेंच सांगतों कीं या खासगी माहितीची आम्हांस पूर्वी जरूर नव्हती व पुढेंहि ती नाहीं. ग्रंथाकडे ग्रंथ या दृष्टीनेंच केसरी पाहणार. केसरीद्वारें मिळणाऱ्या प्रसिद्धीची ज्ञानकोशकर्त्यांनां किंमत वाटत नसल्यास त्यांनीं केसरीकडे आपले ग्रंथ आणि आपल्या जाहिराती देखील यापुढें पाठविण्याचें कारण नाहीं. ज्ञानकोशाशिवाय लिहिण्याला इतर विषय व जाहिरातीच्या रकान्याचे इतर आश्रयदाते सुदैवानें केसरीला पुष्कळच आहेत.

' नाठाळांच्या काठीं देऊं माथा '

डॉ. केतकर यांच्या टीकेला वरील लांबलचक उत्तर आम्ही खरोखर मोठ्या खेदपूर्ण मनानें दिलें आहे. कारण कित्येक प्रतिष्ठितमन्य ग्रंथकाराची वृत्ति, वांकड्या पापडानें मर्जी जाणाऱ्या विद्वानांच्या मिजासीइतकी नाजूक झालेली आढळते. नवीन होणारे चांगले ग्रंथ हे मराठी भाषेच्या उत्कर्षाला कारणीभूत आहेत अशा बुद्धीनें केसरीकार होईल तितक्या दक्षतेनें ग्रंथपरीक्षणाचें काम करीत असतात. हें काम एवढें व्यापक आहे कीं, त्यांत क्वचित कोणास अन्याय होत नसेल असें आम्हीं म्हणत नाहीं. पण ईश्वरानें हातीं दिलेल्या प्रसिद्धिसाधनाचा उपयोग वाङ्मयभक्तांनां व वाचक वर्गाला होईल तितका देण्याच्या सद्बुद्धीनें आम्ही वागत असतां,डॉ. केतकर यांच्यासारखी क्षुद्र बुद्धीची आणि अक्षमपणाचे आरोप करणारी टीका कोणी केली म्हणजे तिचा राग केसरीकारास आल्यास त्यांस कोणी नांवें ठेवील असें वाटत नाहीं. ग्रंथपरीक्षणाचे बाबतींत आपणेकडून बुद्धिपुरस्सर अन्याय असा कोणास होत नाहीं, व चुकून तो झाल्यास तो दुरुस्त करण्याचीहि आमची इच्छा असते.पण सरळपणानें वागल्यास केसरीची मदत वाटेल तेवढी मिळण्यासारखी असतां ती न घेतां कोणी विनाकारण हत्यार उपसून उठेल, तर त्याच्याविरुद्ध उपसण्याला स्वतः केसरीकारांजवळहि त्यांचें हत्यार नेहमीं तयार असतें हें कोणी विसरूं नये, एवढें दर्शविण्याकरितांच डॉ. केतकर यांनां हें विस्तृत उत्तर आम्हीं दिलें आहे.

" ज्ञानकोशकारांचें केसरीकारांस प्रत्युत्तर "

[हें पत्र केसरीकारांकडे प्रसिद्धीसाठीं पाठविलें होतें तें त्यांनीं छापण्याचें नाकारल्यामुळें विद्यासेवकांत प्रसिद्ध होत आहे विद्या सेवक वर्ष १ अं. ११]

जूनच्या विद्यासेवकांत जे केसरीकारांवर आक्षेप घेतले आहेत त्यांस केसरीच्या २३।६।२५ च्या अंकांत उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे.

उत्तराची भाषा

लेखाखालीं सही नाहीं. तथापि " पोटभर जेऊन अन्नाला नांवें ठेवणाऱ्या " भिक्षुकाची व " वांकड्या पापडानें मर्जी आणाऱ्या विद्दिणीची " उपमा देणारा लेखक कोण असावा हें केसरीच्या वाचकांस सहज समजणार आहे.

केसरीकार आपलें व्यवहारतत्त्व स्पष्ट करण्यासाठीं लिहितात कीं, " नवीन होणारे चांगले ग्रंथ हे मराठी भाषेच्या उत्कर्षास कारणीभूत आहेत अशा बुद्धीनें केसरीकार होईल तितक्या दक्षतेनें ग्रंथपरीक्षणाचें काम करीत असतात. हें काम एवढें व्यापक आहे कीं, क्वचित कोणास अन्याय होत नसेल असें आम्ही म्हणत नाहीं. तथापि डॉ. केतकर यांची टीका क्षुद्रबुद्धीची आहे. डॉ. केतकर ' प्रतिष्ठितमन्य ' ग्रंथकार आहेत. आम्ही त्यांचा परामर्ष योग्य तऱ्हेनें घेत असतां आम्ही घेत नाहीं असा आरोप करणारे डॉ. केतकर ' कृतघ्न भिक्षुक ' आहेत. डॉ. केतकर यांचे ' आपणांस आतां कर्तृत्वाचेंहि महत्त्व वाटत नाहींसें झालें आहे ' हे उद्गार दिमाखाचे आहेत; हे मानभावी निराशेचें रडणें आहे. लोकमान्यांचें महत्त्व आणि विशेष प्रेम डॉ. केतकर यांनीं स्वतःला नसतें चिकटवून लावून घेतलें आहे. केळकरांच्याऐवजीं डॉ. केतकरांनां उमेदवार म्हणून कायम करण्याची लो. टिळकांची इच्छा होती. असें डॉ. केतकर गर्भित करतात, पण हें खोटें आहे. डॉ. केतकरांनीं लो. टिळकांच्याकडे एक धाडसी आणि बढाईखोर पत्र धाडलें, आणि त्या पत्रांत मी केळकरांनां लीलेनें ' चारीमुंडे चीत ' करीन असा आपला आत्मविश्वास व्यक्त केला. हें पत्र लो. टिळकांनीं केळकरांनां दिलें. वडोद्यास ज्ञानकोशमंडळाच्या प्रतिनिधीस विषयनियामक कमिटींत घेतलें नाहीं, वगैरे गोष्टी बुद्धया झाल्या नाहींत. ज्ञानकोशांतील विधानांवर आक्षेप घेणारे जे लेख केसरींत प्रसिद्ध झाले, ते विक्षिप्तपणा चालू देऊं नये म्हणून झाले. डॉ. केतकरांच्या व्याख्यानांचे उपहासात्मक सारांश देण्याची कायम पद्धति डॉ. केतकरांनीं सत्याची चाड असेल तर सिद्ध करून दाखवावी. " इत्यादि विधानें केलीं आहेत.

केसरीकारांनीं हा लेख संतापून लिहिला आहे असें दिसतें. त्यामुळें त्यांत जीं त्यांनीं अनेक असत्यें लिहिलीं आहेत तीं लबाडी करण्याच्या हेतूनें लिहिलीं आहेत असें म्हणतां येत नाहीं. डॉ. केतकरांचें लोकमान्यांस पाठविलेलें काल्पनिक पत्र वगळलें तर उरलेलीं असत्यें हा त्यांचा गैरसावधपणाचा भाग दिसतो. केसरीकारांनीं अनेक ठिकाणीं शब्दविपर्यास करून टीका केली आहे, आणि मूळाचाच विपर्यास करणारास जोरदार टीका सहज करतां येते, त्यामुळें त्या टीकेची भाषा जोरदार आणि मनोरम झाली आहे. या उत्तरांत रा. केसरीकारांनीं डॉ. केतकरांचें ' बढाईखोर, स्तुतीची तहान न भागणारे, उद्धट, व खोटे आरोप दुष्टाव्यानें करणारे ' असें चित्र रंगविण्याचा प्रयत्न केला आहे. या केसरीकारांच्या पद्धतीमुळें आमच्या विधानांचें समर्थन करणें याशिवाय केसरीकारांनीं केलेल्या खोट्या आरोपांचें निराकरण करणें अशीं दोन कार्यें या उत्तरांत करावीं लागत आहेत. असो.

आतां प्रत्येक मुद्द्याकडे लक्ष देण्याचा उपक्रम केला पाहिजे,व यासाठीं केसरीकारांचाच अनुक्रम घेतों.

टिळकांशीं बरोबरी सांगण्याचा आरोप

(१) आजच्या लोकांच्या व आजच्या केसरीकारांच्या मतांची आम्हांस किंमत नाहीं, असें म्हटल्याचें केसरीकार दाखवितात, तें खोटें आहे. आमचें वाक्य आहे तें असें " आज इतर मंडळींनीं स्तुति केली तरी त्या दोहोंचें महत्त्व त्यांच्या टीकेच्या महत्त्वाप्रमाणें लहान किंवा थोर असलें तरी त्यापासून (वैय्यक्तिक) आनंद किंवा दुःख हीं बरींच मर्यादित होतात " अर्थात लोकांच्या मतांस किंमत नाहीं असें यांत म्हटलें नाहीं, तर लो.टिळक, महाजनी यांसारख्या वडील म्हणून समजल्या जाणाऱ्या व्यक्तींकडून शाबासकी मिळाल्यास त्याचा विशेष आनंद वाटतो असें म्हटलें आहे व असें म्हणण्यांत लो. टिळक, भांडारकर याच्या बरोबरीचे आम्ही विद्वान आहोंत असें म्हटल्यासारखें होतें काय ?

टिळकांचें ममत्व खोटें चिकटविलें काय ?

(२) लो. टिळक यांचा व आमचा अनेक वर्षांचा परिचय होता व आमच्या अमेरिकेस जाण्यास लो. टिळकांनीं उत्तेजन दिलें. यावर केसरीकार उपहासात्मक विधानें करतात व केतकर केवळ लोकमान्यांचे आशीर्वाद घेऊन गेले असतील पण यापलीकडे कांहीं नाहीं,असेंहि ते भासवितात व खोटें ममत्व चिकटविल्याचा आरोप करतात. लोकमान्याचा व आमचा अनेक वर्षांचा परिचय होता ही गोष्ट सध्यांच्या केसरीकारांस ठाऊक नसली, म्हणजे जर्णं काय तो असत्यच होय. इ. स. १९०४ सालापासून लोकमान्यांचा व डॉ.केतकर यांचा परिचय आहे; म्हणजे तो 'अनेक' वर्षांचा आहे. रा. केतकर ज्या वेळेस हिंदुस्थान सोडून अमेरिकेला गेले तेव्हां त्यांस लोकमान्यांनीं प्रोत्साहन कोणत्या तऱ्हेचें दिलें ? पैशाची मदत सुद्धां द्यावयास लोकमान्य तयार झाले किंवा नाहींत व पुढें ती मदत रा. केतकर यांनीं कां नाकारली;व रा. केतकरांस अमेरिकेस जाण्यासंबंधीं रा. टिळक यांनीं जें प्रोत्साहन दिलें त्यामुळें रा. टिळकांस रा. केतकरांच्या घरांतल्या मंडळींचा रागहि सहन करावा लागला किंवा नाहीं, या गोष्टी त्या वेळच्या कांहीं लो. टिळकांच्याच वयाच्या व अत्यंत प्रसिद्ध मंडळीस ठाऊक आहेत. ही गोष्ट असलेल्या मंडळी पैकीं पुण्यातल्याच एखाद्या व्यक्तीचा उल्लेख करावयाचा झाल्यास रा.वासुदेवराव जोशी, चित्रशाळेचे मालक यांचा करतां येईल.

केळकरांवर टिळकांचा विश्वास कितपत होता?

केसरीकारांनां टिळकांच्या केतकरांस प्रोत्साहनासंबंधींची माहिती शुभ. वर्तमानाप्रमाणें भासली यावरून डॉ. केतकरांच्या विधानांचें असत्यत्व सिद्ध न होतां १९०४, १९०५ व १९०६ या सालांत रा. टिळक सध्यांच्या केसरीकारांस विश्वासांत घेत होते एवढें स्पष्ट होतें. डॉ. केतकर यांच्याविषयीं लो. टिळक यांस अभिमान वाटत होता किंवा नव्हता यासंबंधीं लोकमान्यांचे शब्द जर प्रमाण असतील तर एवढें सांगतां येईल का असले शब्द त्यांनीं अनेक मंडळीसमक्ष व अनेकदां उद्गारिलेले आहेत.

मालकाच्या कीं नोकराच्या इच्छेस महत्व?

(३) लोकमान्यांनीं केसरीमार्फत साहाय्याचें अभिवचन दिलें असें आम्हीं लिहिलें आहे तें खोटें धरून लोकमान्यांच्या हयातींत जें केसरीचें साहाय्य ज्ञानकोशकारांस मिळालें तें लो. टिळकांच्या इच्छेमुळें नसून रा. केळकरांच्याच इच्छेमुळें मिळालें असें केसरीकार भासवितात आणि रा. केळकरांस ती मदत देण्यास भाग पाडलें असा पुरावा आमच्यापाशीं मागतात ! यास उत्तर एवढेंच कीं लोकमान्य आपल्या मदतनिसांचे सर्वजानिकपणें कान उपटीत होते अशी पद्धत होती हें केसरीकारानीं सिद्ध करून दिलें पाहिजे. नाहीं तर मालक आपल्या कारकुनास काय सांगणो हें तिऱ्हाइतास कसें कळणार ? शिवाय लो. टिळक यांचें अभिवचन ज्ञानकोशाचीं केसरींतून योग्य जाहिरात आम्हीं करूं असें असतां व लोकमान्याच्या हयातींत तें होतहि असतां रा. केळकरांनीं केवळ लोकमान्यांच्या इच्छेसाठीं केंव्हां कीं स्वतः होऊन केलें ही चौकशी करण्याचें आम्हांस कारण काय ? लोकमान्यांचीं अभिवचनें आम्हीं धाब्यावर बसवीत होतों असा पुरावा जर रा. केळकर पुढें आणतील तरच रा. केळकरांना लोकमान्यांनीं कोणती गोष्ट करावयास लावली हें सिद्ध करण्याची आवश्यकता उत्पन्न होईल. तथापि हेंहि कबूल केलें पाहिजे कीं ज्ञानकोशास मदत करण्याचें सत्कार्य लो. टिळकांच्या हयातींत रा. केळकर म्हणतात त्याप्रमाणें त्यानीं स्वतःच्या इच्छेनेंहि केलें असावें. ज्ञानकोशासारख्या कार्यास मदत करावी अशा रा. केळकर यांचे मनात अन्य किंतु नसल्यास स्वाभाविकपणें इच्छा असणार याविषयीं खुद्द ज्ञानकोशकारांची खात्री आहे.

टिळकांची मदत फुगवली काय ?

(४) " केतकरांच्या विधानांवरून स्वतः टिळकांनीं याविषयीं केसरींत अनेक लेख लिहिले असा वाचकांस भ्रम होतो तो दूर व्हावा " म्हणून " हे चारहि लेख डॉ. केतकर याच्यांच सहीचे आहेत " असा पुरावा केसरीकार पुढें आणतात. डॉ. केतकर यांनीं भ्रामक विधान केलें नाहीं असें केसरीनें घेतलेल्या टीकेस लेखांतील वाक्यांवरूनच सिद्ध होईल; तीं वाक्यें येणेप्रमाणें:—

" ज्ञानकोशाच्या प्रारंभीं त्याच्या निरनिराळ्या प्रकाशितांचा गोषवारा देवून ज्ञानकोशमंडळास केसरीनें चांगलेंच साहाय्य केलें ", " लोकमान्य जिवत असते तर केसरीमार्फत ज्ञानकोशाचीं आणि त्यांतील अनेक विषयांची मार्मिक तपासणी किंवा लक्ष ओढण्याइतकी पहाणी बरीच झाली असती. " यावरून भ्रामक विधानें केसरीकारांनीं केलीं आहेत कीं ज्ञानकोशकारांनीं केलीं आहेत हें सहज समजून येईल.

हास्यकारक समर्थन

(५) बडोद्याच्या व्याख्यानांत रा. केळकरांनीं वाङमयाचा आढावा न करण्याचें कारण सूची ज्यावेळस प्रसिद्ध झाली त्यावेळस रा. केळकर विलायतेंत होते असें मौजेचें स्पष्टीकरण केसरीकारांनीं केलें आहे.

उपेक्षेचे घटक स्वाभाविक उल्लेखाची अपुरी संख्या

(६) पुराव्याचें माप पदरांत घ्या म्हणून केसरीकारांनीं कांहीं अभिप्रायाचे उतारे दिले आहेत व त्यांतील प्रशंसावाक्यें ही ज्ञानकोशाची उपेक्षा केली या विधानास विरुद्ध म्हणून मांडलीं आहेत परंतु तेवढा पुरावा पुरेसा नाहीं. कां कीं, प्रसिद्ध झालेल्या १३ भागांपैकीं ९ भाग आक्टोबर १९२४ पूर्वीच केसरीकारांकडे गेले. त्या ९ भागांचीं पोंच जितक्या वेळां यावयास पाहिजे होती तितक्या वेळां आली नाहीं. अभिप्राय पुष्कळदां पोंचेनंतर दिला जातो; या नियमाप्रमाणें आणखी बऱ्याच वेळां तरी उल्लेख यावयास पाहिजे होता; तो तसा आला नाहीं; शिवाय स्तुतिवाक्यें जीं केसरींत आलीं त्यांविषयीं एवढेंच म्हणता येईल कीं जो ग्रंथ अत्यंत परिश्रमपूर्वक तयार झाला आहे व ज्याचा बराचसा भाग तज्ज्ञाकरितांच आहे व जो इतर पत्रकारांनीं व संशोधकांनीं नांवाजला आहे त्याच्याविरुद्ध लिहावयास बरेंचसें स्वास्थ्य व बराचसा परिश्रम करावा लागतो व तो तसा केल्याखेरीज विरुद्ध लिहिणें ही सोपी गोष्ट होत नाहीं.

तारतम्यांत बिघाड

उपेक्षेचा मुख्य आरोप हा केवळ आमच्या पुस्तकांविषयीं किरकोळ अभिप्रायांनीं असिद्ध होणार नाहीं. वाङ्मयक्षेत्रामध्यें जीं पुस्तकें अवतरतात त्यांत ज्ञानकोशास इतर ग्रंथांच्या मानानें व त्याच्या योग्यतेप्रमाणें योग्य तें महत्त्व मिळालें आहे काय ? इतर ग्रंथांना केसरीकारांकडून जें प्राधान्य देण्यांत आलें त्या मानानें ज्ञानकोशाकडे लक्ष दिलें किंवा नाहीं; या प्रश्नाचा निर्णय तारतम्यविषयक वृत्ति पाहून होईल. अच्युतरावांचा संक्रांतीचा तिळगुळ, रा. वझे यांचें भावी हिंदी स्वराज्य (दोन अग्रलेख) व राधामाधवविलासचंपू इत्यादि पुस्तकें जर अग्रलेखाचा मान केसरीकारांच्या 'समतोल' दृष्टीनें मिळवूं शकतात, तर ज्ञानकोश मंडळ हें कधींहि अग्रलेखास पात्र होऊं नये काय ? कधीं कधीं तारतम्यांत बिघाड केल्यानें अपमान करण्याची जी संधि मिळते ती केवळ अपेक्षेनें मिळत नाहीं व बडोद्यास हेंच तत्त्व अवलंबिलें गेलें असावें. वर्तमानपत्रास अहेर करतांना एखाद्या फाटक्या वर्तमानपत्रावर स्तुतीचा वर्षाव करून केसरीची सामान्य स्तुति केली तर तें केसरीस कसें आवडेल! बडोद्यास जेव्हां ज्ञानकोशमंडळाचा सोय अध्यक्षांनीं लाविली असें केसरीकार अभिमानानें सांगतात त्यावेळेस अग्रपूजेचा मान मयूरमंडळास देण्यांत आला. आणि या कृतीमध्यें अध्यक्षच जबाबदार होते; का कीं, हा प्रश्न विषयनियामक कमिटींत मुळींच निघाला नव्हता व अध्यक्षांनींच हा स्वेच्छेनें उपक्रम करून मयूरमंडळास अग्रस्थान दिलें. हें मंडळ ज्ञानकोशांतील एका लेखकानें त्यावेळीं नुकतेंच काढलेलें होतें तर तें मंडळ ही वाङ्मयसंस्थांतील अग्रगण्य संस्था आहे असें भासवून ज्ञानकोशमंडळास अजिबात विसरण्याइतकें क्षुद्र ठरविण्याचा प्रयत्न नव्हता काय ? कदाचित हाहि विस्मृतीचाच दोष असेल!

लवाडचें पत्र; लोकमान्यांच्या हेतूसंबंधानें पांघारलेलें अज्ञान

(७) कौन्सिल उमेदवारीसंबंधानें लेखांश केसरीकारांनीं अगदींच विपर्यस्त लिहिला आहे. डॉ. केतकर यांनीं लोकमान्यांस, मी रा. केळकर यांस "चारी मुंडे चीत करीन" असें पत्र लिहिलें नव्हतें तर रा. केळकर यांस दुसऱ्या कोणत्या तरी जागेसाठीं उमेदवार करावें असें सुचविणारें पत्र लिहिलें होतें. त्यानंतर एकदां लोकमान्य म्हणाले कीं, " मी (लोकमान्य) स्वतः कोठेंच उमेदवार म्हणून उभें न राहतां सर्व प्रांतांत हिंडून सर्व प्रांतांतील लोकपक्षांतील एकसूत्रता ठेवण्याचें काम करावें असें माझ्या मनांत येतें " व तशी योजना झाल्यास वरच्या कौन्सिलासाठीं रा. केळकरांस घालूं व तुम्हांस अवश्य संधि देऊं. इतपत डॉ. केतकर व लोकमान्य यांचें संभाषण झालें होतें. ही योजना रा. केळकरांसहि टाऊक असावी असें वाटतें.

स्वतः विरुद्ध अधिक पुरावा देण्याचा अजागळपणा

(८) रा. केळकरांस " चारी मुंडे चीत करीन " असें जें केवळ काल्पनिक पत्र केसरीकारांनीं उत्पन्न केलें तें करतांना खोटीं विधानें करणाऱ्या पण तीं विधानें साधक आहेत कीं बाधक आहेत हें न पाहणाऱ्या वगल्या-वकीलाप्रमाणें केसरीकार अगदींच घसरले. हें लिहितांना केसरीकारांनीं रा. केळकरांस तरी विचारावयास पाहिजे होतें. या काल्पनिक पत्रानें रा. केळकरांची 'केस' त्यानीं अगदीं खराब करून टाकली. या पत्रानें केसरीकारांच्या वर्तनाची सहेतुकता सिद्ध केली. यानें असें सिद्ध होईल कीं, रा. नरसोपंतांस चीड येईल असें वर्तन डॉ. केतकरांकडून घडलें व डॉ. केतकरांकडून द्वाड वर्तन झाल्यामुळें रा. केळकरांस राग आला, आणि त्यामुळें रा. केळकरांकडून ज्ञानकोशाविरुद्ध वर्तन घडलें. खुद्द केळकरांचींच अशी शोभा केसरीकार करतात हें पाहून ज्ञानकोशकारांस कृतघ्न भिक्षुक, वांकड्या पापडानें मर्जी जाणारी विहीण इत्यादि विशेषणें लावून जर केसरीकारांनीं दुखविलें तर त्याबद्दलचें दुःख खरोखरच कमी होतें. हें खोटें पत्र उपस्थित करतेवेळेस स्वतःचें समर्थन करण्यापेक्षां दुसऱ्याचा उपहास करण्याची इच्छा अधिक प्रबल नव्हती काय ? याबरोबर हेंहि सांगितलें पाहिजे कीं, " चारी मुंडे चीत " ही शब्दमाला केसरीकारांच्या परिचयाची असली तरी ज्ञानकोशकाराच्या परिचयाची नाहीं.

चला कबूल करू

(९) " बडोद्यास काय घडलें " याविषयीं जो एकंदर खुलासा केसरींत आहे त्याविषयीं एवढेंच म्हणतां येईल कीं खुद्द नरसोपंत जर असें म्हणत असतील कीं ज्ञानकोशाच्या उपेक्षेची इच्छा नव्हती तर ते सभ्य गृहस्थाचे

शब्द म्हणून मान्य करण्यास हरकत नाहीं. अध्यक्षाचें काम सदोष केलें एवढें तरी शिल्लक राहीलच. पण त्या प्रश्नास येथें महत्त्व देण्याचें कारण नाहीं.

चुकीचे रिपोर्ट

(१०) भाषणाचा चुकीचा सारांश केसरींत प्रसिद्ध होतो हें केसरीकार सप्रमाण सिद्ध करण्यास सांगतात. केसरींतील रिपोर्ट चुकीचा आहे हें आज ज्या साधनांनीं ठरवावयाचें तीं साधनें म्हणजे आमचींच आठवण व टिपणें. तीं खरीं मानून त्याबरोबर आपल्या रिपोर्टांची तुलना होऊं द्यावयास केसरीकार तयार आहेत काय ? तसें करणें म्हणजे केसरीकारांनीं प्रतिपक्षाला फारच फायदा देणें आहे.

दोस्तांना मदत करण्याची इच्छा

(११) नागपूरच्या उपद्व्यापी मंडळींस केसरीकारांनीं जें साहाय्य केलें त्याविषयीं केसरीकारांचा मांडणी अगदीं चुकीची आहे. एवढेंच नव्हे तर ती मांडणी करतांना आपली मनोवृत्ति व्यक्त करून केसरीकारांनीं विरुद्ध पक्षाच्या हातीं विनाकारण हत्यार दिलें आहे. " नागपूरच्या सर्वही मंडळींचींच बाजू उचलून धरण्याला केसरीकारांस अधिक कारण होते, " असें केसरीकार म्हणतात, याचा अर्थ काय ? नागपूरच्या कांहीं मंडळींनीं केसरीकारांस जेवावयास बोलाविलें किंवा त्यांच्या गळ्यांत हार घातले अशा तऱ्हेचें कारण होतें कीं, ज्ञानकोशाच्या संपादनास व प्रसिद्धीकरणास नागपूरच्या कांहीं विशिष्ट गृहस्थांची बाजू उचलल्यानें अधिक साहाय्य झालें असतें अशा पद्धतीचें कारण होतें, हें केसरीकारांनीं स्पष्ट केलें नाहीं. ज्ञानकोशाचें संपादकीय खातें व हिशोबखातें हीं नागपुराहून पुण्यास नागपूरच्या डायरेक्टरांच्या इच्छेनेंच आणलीं असतां आपलें छपाईचें नुकसान झालें अशा भावनेनें एका छापखानदारानें कांहीं नागपूरच्या गृहस्थांची सहानुभूति मिळवून विरोध केला, अशा प्रसंगीं केसरीकारांस ज्ञानकोशाच्या कोणत्या हितासाठीं नागपुरकर मित्रांस मदत करावयाची होती ? यांतील इंगीत डॉ. केतकर यांनीं पुण्यास येऊंच नये अशी केसरीकारांची इच्छा होती हें आहे काय ? खरोखर पाहता केसरीकारांच्या नागपूरकर मित्रांची तक्रार नागपुराहून ऑफिस हालविण्याबद्दल नसून शेअर होल्डरांची बैठक पुण्यास बोलावण्याबद्दल होती, व पण्याच्या सभेस जाऊं नये असा त्यांत इशारा होता, तें पत्र केसरीकारांनीं तो बैठक आटोपल्यानंतर प्रसिद्ध केलें.

रा. केळकरांची डॉ. केतकरांस भीति

(१२) डॉ. केतकर हे कौन्सिलसाठीं पुन्हां उमेदवार कां उभे राहिले नाहींत म्हणून केसरीकार पृच्छा करतात. ही पृच्छा प्रस्तुत वादांत अनवश्यक आहे. तथापि प्रश्न उपस्थित झाला म्हणजे त्याचें स्पष्टीकरण केलें पाहिजे. तें हें कीं, डॉ. केतकर यांस असें आढळून आलें कीं, ज्ञानकोशाच्या कामामध्यें

दुसरें कोणतेंहि काम हातीं घेतलें तरी अंतराय उत्पन्न होणार आणि दोन कामें एकाच वेळेस करतां येणार नाहींत ही गोष्ट पहिल्या प्रसंगींच लक्षांत आली. केवळ केळकरांच्या भीतीमुळें जर डॉ. केतकरांस उभें रहावयाचें नसतें तर जेव्हां केळकरांनीं असहकारितेमुळें उमेदवारी सोडून दिली तेव्हां, आतां संधि बरी आहे म्हणून डॉ. केतकर यांस कै. गुप्ते यांच्याविरुद्ध उभें राहतां आलें नसतें काय ?

उत्तर देऊ नका असें सांगून उत्तर आलें नाहीं म्हणून ओरड

(१३) केसरीकारांनीं रा. पावगीस व रा. केळकरांस उत्तर कां दिलें नाहीं. म्हणून पृच्छा केली आहे पण त्याचा दोष आमच्याकडे नसून केसरीकारांकडेच आहे. त्यांनीं (१) विरुद्ध लेख अपूर्ण ठेविले, (२) त्या लेखांत पुरावा उत्तर भागांत येणार म्हणून आश्वासन होतें. (३) लेखांक पुष्कळ उशीरां छापले (४) लेख अपूर्ण ठेवणार हें कळविलें नाहीं, (५) लेख पुरा झाल्यानंतर उत्तर देऊं अशा अर्थाचें आमचें पत्र छापलें नाहीं (तें पत्र पुढें विद्यासेवकांत व ज्ञानप्रकाशांत छापावें लागलें) (६) व आमच्या टकिवर ज्ञानकोशकार तुच्छ समजून उत्तर देत नाहींत असा आरोप ज्ञानकोशकारांवर केला (७) व इतर सर्व आरोप अमान्य करून आपण प्रतिकूल टीका आपल्या पत्रांत येऊं दिली हः स्वतःचा आरोप उत्पन्न करून त्याचें समर्थन करतात, व त्या प्रतिकूल टीकेमुळें ज्ञानकोशकार चिडले आहेत असें दाखविण्याचा प्रयत्न करतात.

ज्ञानकोशांतील दोषांसंबंधाने संपादकीय वृत्ति

येथें एवढें सांगितलें पाहिजे कीं, विरुद्ध टीका प्रसिद्ध करणें ही आमच्यावर कृपाच आहे असें आम्हीं अनेक कारणांमुळें समजतों. ज्ञानकोश हा निर्दोष ग्रंथ असें ज्ञानकोशकार कधींहि म्हणणार नाहींत. ज्ञानकोशांतील दोषाची जाणीव इतर लोकांपेक्षां खुद्द ज्ञानकोशकारांसच अधिक असणार. आणि ज्या ग्रंथास अनेक व्यक्तींचा हात लागतो त्या ग्रंथांतील मतांविषयीं स्वाभाविकपणें वैयक्तिक अभिमान कमी होत जातो. विरुद्ध टीका जरी कोणी केली तरी तिचें आम्हीं मोठ्या आनंदानें स्वागत करतों. व अशा करितांच विद्यासेवकाची योजना झाली. केसरीकारांनीं ज्ञानकोशकारांच्या ठायीं गर्वाचा जो आरोप केला आहे तो कांहीं अंशीं खरा आहे. त्या गर्वामुळेंच असें वाटतें कीं, ज्ञानकोश संपूर्ण तयार करणें हेंच काम इतकें मोठें आहे कीं, त्यांत दिसून येणाऱ्या कांहीं दोषांमुळें त्याचें महत्त्व फारसें कमी होणार नाहीं, आणि त्यामुळें विरुद्ध टीकाकारानें एखाद्या विधानांत वस्तुदोष दाखविला तर तो स्वीकारून त्याप्रमाणें त्याची नोंद करण्यास बिलकूल दिकत वाटत नाहीं. आम्हीं असें समजूं कीं आमचेंच काम त्यानें केलें. या दृष्टीनेंच विद्यासेवकांत ज्ञानकोशांतील विधानांविरुद्ध व मतांविरुद्ध लेख घेण्यांत आले आहेत.

पावगी व काव्यपरीक्षक केळकर.

(१४) रा. पावगी व केळकर यांच्या लेखांस एकाच परिच्छेदांत उत्तर देऊन टाकतों. पावगींनीं ज्ञानकोशांतील एकहि विधान पद्धतशीर

खोडून काढलें नाहीं. कोणत्या विधानांनी त्यांच्या मनाला दुःख झालें हें त्यांनीं कळविलें आहे. व आमच्या कांहीं आधारासहित दिलेल्या विधानांना निराधार म्हटलें आहे. तसेंच रा. केळकर यांच्या लेखांत त्यांनीं मराठी विशिष्ट कवींची स्तुति करणें आणि एकंदर मराठी काव्यास तें नष्ट झालें तरी हरकत नाहीं हीं विसंगतता दाखवून हा लेख दोन परस्परांविरुद्ध चाललेल्या लेखण्यांनीं लिहिला असें ध्वनित केलें आहे खरोखरच त्यांत विरुद्धता कांहींच नाहीं. मराठी काव्याचें दोन दृष्टींनीं परीक्षण केलें आहे. एक दृष्टि म्हटली म्हणजे विशिष्ट कवीचा किंवा कृतीचा गुणदोष पहाण्याची आणि दुसरी दृष्टि म्हटली म्हणजे एकंदर जागतिक काव्यवाङ्मयांत मराठी काव्यवाङ्मयाचें महत्त्व मोजण्याची. पहिल्या दृष्टीनें मोरोपंत आणि मुक्तेश्वर हे रसाळ कवी म्हणून त्यांची पाठ थोपटावी लागेल व जागतिक वाङ्मयांत स्थान या दृष्टीनें त्याची किंमत कांहींच नाहीं म्हणून सांगावें लागेल. उदाहरणार्थ, वाल्मिकी रामायणाची किंवा होमरची किंवा शहानाम्याची किंवा अनेक तामिळ चरित्र-काव्यग्रंथांची गोष्ट तशी नाहीं. ते ग्रंथ नष्ट झाले तर जगाचें मोठें नुकसान आहे. त्या पात्रतेस आज मराठी काव्यवाङ्मय दुर्दैवानें पात्र झालें नाहीं. याबद्दल एकंदर जगांतील वाङ्मयाचें विहंगमावलोकन करण्याचा प्रसंग ज्याचर येणार त्यास महाराष्ट्राच्या त्या कमीपणाबद्दल वाईटच वाटणार; अर्थात हा कमीपणा जितका स्पष्टपणें नजरेस येईल तितकें चांगलें या हेतूनें रा. दत्तोपंत केळकरांनीं अवतरण केलेली स्पष्ट भाषा वापरली आहे. केसरीकार म्हणतात त्याप्रमाणें ' मराठी वाङ्मयास आग लावा' असें म्हटलें नाहीं. कां कीं आपणांस वाङ्मयाकडे केवळ जगाच्या दृष्टीनें पहावयाचें असतें ! ' जाळा ' असें म्हटलें नसून केवळ " जळालें तर जगाचें नुकसान नाहीं " असें म्हटलें आहे.

केळकरांविषयीं व्यक्तिविषयक भावना.

डॉ. केतकर यांस रा. केळकर यांच्याविषयीं केसरीकारांस पत्ता लागलेल्या "क्षुद्र" , "व्यक्तिविषयक भावना " असण्याचें कारणच नाहीं. रा. केळकर व डॉ. केतकर हे निरनिराळ्या धंद्यांतले लोक आहेत. आणि केळकर हे राजकारणांत आहेत. डॉ. केतकर आज तरी राजकारणांत नाहींत. आमच्यावर मेहरबानी कमी केली अशा अर्थाचा आरोप, ज्या मनुष्याविषयीं " क्षुद्र " " व्यक्तिविषयक भावना " आहेत, अशा मनुष्याविरुद्ध कोण करणार.

जनतेपुढें तक्रार करण्याचा हक्क.

ज्ञानकोशानें जनतेची सेवा बरोबर केली नाहीं तर तक्रार करण्याचा जसा रा. केळकरांस हक्क आहे तसाच जनतेची किंवा जनतेंत उत्पन्न झालेल्या संस्थांची केसरीनें सेवा चांगली केली नाहीं म्हणून तक्रार करण्याचा हक्क ज्ञानकोशकारांसहि आहे. ज्ञानकोशकारांनीं डॉ. केतकर व रा. केळकर हे एकमेकांविरुद्ध उमेदवार होते त्यावेळेपासून केसरीच्या वृत्तींत बदल झाला काय, असा संशय जो व्यक्त केला तो बडोद्याचें उदाहरण, भाग प्रसिद्ध झाल्यानंतर व केसरीकडे अभिप्रायाला भाग गेल्यानंतर पांच लवकर द्यावयाचा नाहीं, अभिप्राय आला तर उशीरां व आमच्याकडून आग्रहाचीं पत्रें गेल्यानंतर बऱ्याच काळानें आला, या गोष्टी केसरीकारांस खोडून काढतां येणार

नाहींत. फार तर केसरीकार उशीराचें किंवा बडोद्याच्या प्रकरणाचें स्पष्टीकरण निराळें देऊं शकतील. बडोद्यास ज्ञानकोशाची उपेक्षा झाली यांचें कारण रा. दाते यांची मंडळीशीं व्यक्तिशः ओळख नव्हती इत्यादि गोष्टी त्यास कारण झाल्या असतील व त्यांत रा. केळकरांचा संबंध मुळींच नव्हता यासारखी गोष्ट रा. केळकरासारख्या सभ्य गृहस्थानें प्रतिज्ञापूर्वक, किंवा त्यांच्या तर्फेनें केसरीकारांनीं सांगितली तर तें स्पष्टीकरण स्वीकारण्यास आमची हरकत नाहीं.

मुंबई सरकारची वर्तणूक केसरीकारांस कळविली नाहीं.

ज्ञानकोशास मुंबई सरकारनें गिऱ्हाईक होण्याचें दोनदां नाकारलें. एकदां डॉ. परांजप्यांच्या व दुसऱ्यांदा ना. जाधव यांच्या दिवाणगिरींत या गोष्टी घडल्या आणि त्या दोन्ही प्रसंगीं आम्हांस उत्तर आलें त्यावेळीं वार्षिक रिपोर्ट तयार होत होता. तेव्हां त्यांतच त्याचा उल्लेख करून व असहकारितेविरुद्ध आक्षेप घेणाऱ्या व राष्ट्रीय वाङ्मयाविषयीं होणाऱ्या प्रयत्नांशी असहकारिता करणाऱ्या मुंबई सरकारविषयीं आम्हांस काय वाटलें हें सांगितलें होतें आणि त्या रिपोर्टाची प्रत महाराष्ट्रांतील प्रमुख वर्तमानपत्रांकडे पाठविली होती. कांहीं पत्रांनीं व मासिकांनीं तींतून मोठाले उताराहि प्रसिद्ध केले होते. यावेळेस 'केसरी' सरकाराचा समाचार घेईल अशी आमची अपेक्षा होती, ती पुरी झाली नाहीं. केसरीकारांविषयीं न्यायबुद्धि ठेवून हेंहि सांगितलें पाहिजे कीं, याविषयीं केवळ केसरीकारांनींच उदासीनता दाखविली असें नाहीं तर महाराष्ट्रांतील अनेक प्रमुख पत्रांनींहि दाखविली.

मुंबई सरकारच्या दुसऱ्या नकाराच्या प्रसंगीं ज्ञानकोशविषयक प्रश्न कौन्सिलमध्यें रा. जयकर व रा. बोले यांच्याकडून विचारविले होते व विद्यासेवकांतहि त्यासंबंधीं मजकूर प्रसिद्ध केला होता. प्रस्तुत वादाचें व त्याच्या इच्छित शेवटाचें स्वरूपच जरासें विलक्षण आहे. झालेल्या दोन्याच गोष्टी दोघांसहि मंजूर आहेत. स्पष्टीकरणासंबंधानें मात्र फरक आहे.

आमचें म्हणणें खोटें ठरो हीच इच्छा.

ज्ञानकोशास विरोधक किंवा उपेक्षादर्शक कांहीं क्रिया झाल्या त्या कांहीं केसरीच्या अनिष्ट प्रवृत्तीच्या दर्शक होत्या काय? किंवा त्यांत कांहीं विरोधभावना होती काय? याचा निर्णय व्हावयाचा आहे आणि त्यात आम्ही एक बाजू मांडली आहे आणि त्या बाजूवर आक्षेप केसरीकारांनीं मांडले आहेत. वरील प्रश्नांतील सत्य जर आमच्या मांडणीच्या विरुद्ध असलें, म्हणजे केसरीकारांची वृत्ति दूषित नव्हती, आम्हींच आपली चुकीची कल्पना करून घेतली होंच सत्य असलें तर तो आमच्या इष्ट कार्याचा मोठा विजय होय. आमचें म्हणणें जर खरें असलें कीं, केसरीकार दूषितदृष्टि होऊन आमच्याशीं वागत आहेत, तर ती मोठी आपत्तीची गोष्ट होय.

आमचा धंदा

'आम्हांस आतां केसरीसारख्या उपयुक्त प्रसिद्धिसाधनाची मदत नको आहे' असें जें केसरीकारांनीं स्वतःस भासवून इतरांस भासविण्याचा प्रयत्न

केला आहे तो चुकीचा आहे. आम्ही धंदा करण्यास बसलों आहोंत, प्रसिद्धि-साधनांशीं वैर करण्यासाठीं नव्हें. केसरी, लोकमान्य, ज्ञानप्रकाश, महाराष्ट्र, नवाकाळ, मनोरंजन, किर्लोस्करखबर इत्यादि जीं अनेक प्रसिद्धिसाधनें महाराष्ट्रांत आहेत त्या सर्वांचाच आम्हांस उपयोग आहे आणि या सर्वांमार्फत आम्हांस जनतेशीं पोंचावयाचें असतें. जेव्हां जनतेपर्यंत पोंचण्यांत विशिष्ट पत्राच्या मालकांचीं, किंवा चालकांचीं वृत्ति अनिष्ट होईल तेव्हां ती दूर करणें आणि त्यांनीं स्वतः दूर केली नाहीं तर वर्तमानपत्रकार, मासिककार किंवा प्रकाशक यांचे आश्रयदाते जी जनता, तिजकडे तक्रार नेणें या गोष्टी स्वाभाविकपणें करणें भाग पडतें. केसरीकार म्हणतात कीं, ज्ञानकोशकारांनीं स्वतःच्याकडे अभिप्रायासाठीं ज्ञानकोशाचे भाग किंवा जाहिरात दाखल वर्तमानपत्रें पाठवूं नयेत. इतका त्रागा कां वरें ? वर्तमानपत्राच्या धंद्यांत आज इतकीं वर्षें काढून विरुद्ध टीकेसंबंधानें इतकी नाजुक प्रकृति कां असावी ? आम्ही ज्या पत्राविरुद्ध कारणपरत्वें लिहूं त्या पत्रात देखील जाहिरात देऊं आणि आमचे विरुद्ध जे कोणी एखादें पुस्तक लिहितील त्या पुस्तकाचीहि जाहिरात आमच्या पत्रांत छापूं; आणि केसरीच्या विद्वान संपादकांनीं तीच वृत्ति आपल्याहि व्यवहारात ठेवावी अशी आमची त्यास प्रेमाची शिफारस आहे.

पुरवणी—केसरीकाराकडे न पाठविलेली

ज्ञानकोश श्रेयाच्या वाटेकरीपणाचा केसरीकारांनीं सांगितलेला हक्क.

ज्ञानकोशाच्या प्रसाराचें श्रेय केसरीकार केसरींनें ज्ञानकोशाच्या घेतलेल्या परामर्शाला देतात (केसरी २३ । ६ । २५, पृष्ठ ७, रकाना ५, ओळी ५–१७), हें पाहून आम्हांस अत्यंत आनंद होतो. ज्ञानकोशाच्या श्रेयाचे वांटेकरी आम्हीं आहोंत म्हणून अहमहमिका जितकी सुरू होते तितकी तो ज्ञानकोशाचें महत्त्व वाढविते. मार्ग नागपुरास तर कांहीं मंडळींनीं ज्ञानकोशाचें श्रेय स्वतःस घेऊन कौन्सिलासाठीं व युनिव्हर्सिटीच्या कोर्टासाठीं उमेदवारी करण्यासाठीं ज्या पत्रिका प्रसिद्ध केल्या त्यांतहि नमूद केलें होतें. आम्ही तर ज्ञानकोशाच्या प्रसिद्धिचें श्रेय महाराष्ट्रांतील सुशिक्षित जनतेच्या अंतःकरणपूर्वक सहकार्यास देतों; व त्यांतील कांहीं श्रेय केसरी, लोकमान्य, मनोरंजन इत्यादि पत्रकारांस आनंदानें देतों; तथापि 'आमच्या पश्चात्‌नें ज्ञानकोश चालला आहे' अशी समजूत केसरीकार पसरवूं पहातात तिचा निषेध करतों. तसली समजूत उपस्थित करतांनां केसरीकार तत्त्ववेत्तेहि बनतात. केसरीकार एक मोठा तात्त्विक प्रश्न म्हणून उपस्थित करीत आहेत. त्यांच्या मतें डॉ. केतकर आपलीं मतें लोकांच्या खर्चानें प्रसिद्ध करीत आहेत. मग लोकांनीं तरी कां गप्प बसावें म्हणून आत्मकृत्यसमर्थनाची पृच्छा करीत आहेत. त्यांत जर तें अर्थ गर्भित करीत असतील कीं केसरीकारांच्या पैशावर ज्ञानकोश चालला आहे म्हणून केसरीकारास त्यावर टीका करण्यास अखत्यार आहे, तर हें स्पष्ट केलें पाहिजे कीं केसरीकार ज्ञानकोशाचे शेअरहोल्डर किंवा वर्गणीदार नाहींत. तथापि त्यांना टीका करण्याचा हक्क ज्या कारणामुळें येतो म्हणून ते सांगतात तें जरी खोटें असलें तरी केसरीकारांचा किंवा कोणत्याहि लेखकाचा टीक

करण्याचा हक्क आम्ही मुळीच अमान्य करीत नाहीं. या सार्वजनिक कार्याकडे ते जितकें लक्ष अधिक देतील तितकें चांगलेंच आहे.

डॉ. केतकर लोकांच्या पैशानें आपलीं मतें पसरवितात. या आक्षेपासंबंधीं आम्हीं सध्यां एवढेंच सांगतों कीं, या विषयाचें तात्त्विक दृष्टीनें अधिक विवेचन अवश्य आहे व तें उपदेशपर व मनोरंजक होईल हा संपादकीय नीतिशास्त्राचा भाग आहे. या विषयासंबंधानें केसरीकारांसारख्या सुशिक्षित पत्रकारानें आणखी तात्त्विक विवेचन करावें. तें वाटल्यास कायद्याच्या दृष्टीनें करावें किंवा यूरोपांतील व अमेरिकेंतील चालू पद्धतीच्या दृष्टीनें करावें किंवा युरोपांतील व अमेरिकेंतील चालू पद्धतीच्या दृष्टीनें करावें यासंबंधाचा नीतिशास्त्रविषयक लेख आमच्याकडे जरी पाठविला तरी मोठ्या आनंदानें छापूं.

डॉ. केतकर यांस मुद्दाम, वढाइखोर, कृतघ्न ठरविण्यासाठीं केसरीकारांनीं काल्पनिक पत्रें उपस्थित केलीं आहेत. पण असें करतांना केळकरांविरुद्ध पुरावा तयार केला आहे. तसेंच ज्ञानकोशसाहाय्याचें श्रेय टिळकांकडून काढून तें केळकरांस देतांना कै. लोकमान्यांनां ते जिवंत असतांहि केळकर त्यांच्याशीं वरचढपणानें वागत, अशी केळकर व लोकमान्य यांतील परस्परसंबंधाची विनाकारण मांडणी केली आहे. केसरीकार म्हणतात 'अर्थात ते लेख (ज्ञानकोशविषयक) तरी टिळकांच्या " भिडे " मुळें घातलेले नाहींत. पुढें केसरीकार आणखी सांगतात " तो माहितो (ज्ञानकोशाचें काम काय चालू आहे ही) देण्याला डॉ. केतकर यांनां भरपूर वाव " टिळक असतांना त्यांच्या आग्रहाशिवाय व ते नसतांना संपादकाच्या सहानुभूतीनें दिला गेला " इत्यादि.

यावरून केसरीकार काय सांगू इच्छितात हें दिसतेंच आहे. विशिष्ट गोष्ट केसरींत येऊं द्यावयाची असें टिळकांच्या मनांत असलें म्हणजे लोकमान्यांस हुकूम करून चालत नव्हतें तर त्यांनां आपली " भीड " खर्च करावी लागत होती, व 'आग्रह' करावा लागत होता. केसरी ऑफिसांतील नोकरशाहीच्या उद्दामपणाबद्दल व स्वामिद्रोहाबद्दल यापेक्षां अधिक प्रमाण काय पाहिजे ? ही लोकमान्यांच्या दौर्बल्याविषयीं आणि स्वतःच्या वरचढपणाविषयीं केलेली विधानें खरीं असतील काय ? असो, केसरीकारांस एवढा अहेर पुरा आहेसें वाटतें.

ज्ञानकोश आणि ज्ञातिविषयक लेख

देवरुखेप्रकरण

ज्ञानकोशा मध्यें जे लेख प्रसिद्ध झाले त्यामुळें अनेक ज्ञातींचें मन दुखावेंल गेलें हें सांगतलेंच आहे. अशा ज्ञातींत देवरुखे येतात तर त्यांच्याप्रकरणाकडे प्रथम लक्ष देतों.

ज्ञानकोशाची वृत्ति चित्पावनांखेरीज इतर जातींचें उणें वांहेर काढावें अशा तऱ्हेची आहे असें सांगण्याचा कांहीं पत्रकार प्रयत्न करीत आहेत, आणि आपल्या विधानाच्या समर्थनार्थ जेव्हां एखादी जात ज्ञानकोशांतील लेखाविरुद्ध आपली नापसंति व्यक्त करिते तेव्हां त्या गोष्टीस प्राधान्य देऊन जातिविषयक वैमनस्यें वाढविण्याचा प्रयत्न ज्ञानकोशकारांनीं केला अशा तऱ्हेची समजूत करून देत आहेत. कांहीं संभावित पत्रें जेव्हां निजामानें ज्ञानकोशास आपल्या राज्यांत बंदी केली तेव्हां त्याच्याविरुद्ध लिहीत तर नाहींतच पण त्या बंदीची बातमीहि आपल्या पत्रांत देत नाहींत; पण जेव्हां एखादी जात आम्हांला क्षत्रिय म्हटलें नाहीं किंवा आमचा श्रीरामचंद्र किंवा श्रीकृष्ण यांशीं वांशिक संबंध ज्ञानकोशकार कबूल करीत नाहींत म्हणून निषेध करीत असेल तेव्हां त्यांच्या निषेधाची बातमी आपल्या पत्रांत अर्धीमुर्धी देऊन ज्ञानकोशकारांवर दुराभिमानाचा आक्षेप उत्पन्न व्हावा असा प्रयत्न करीत आहेत.या तऱ्हेचे आक्षेप कसे निरर्थक आहेत हें पुढील लेखांत दाखविण्याचा इरादा आहे.

ज्ञानकोशामुळें जातिविषयक वाङ्मय बरेंच उत्पन्न झालें. व अनेक जातींस एक तऱ्हेची शिस्त लागली. उदा. ज्या जातींनां पंचायती होत्या व ज्यांत पंचायतींचे निवाडे लिहून ठेवण्याची चाल नव्हती त्या जातींत पंचायतीचे निवाडे लिहून ठेवण्याची चाल सुरू झाली, असें अनेक जातींकडून आम्हांस कळलें आहे. आम्ही विचारलेल्या प्रश्नांमध्यें पंचायतीचे निवाडे लिहून ठेवण्याची चाल तुमच्यांत आहे काय असा प्रश्न करीत होतों. त्या प्रश्नामुळें जेव्हां जातीची ज्ञानकोशास माहिती पुरविण्यास सभा भरे तेव्हां निवाडे लिहून ठेवावेत असें कांहीं मंडळीकडून मांडण्यांत येई. व एका जातींत तर यामुळें निश्चयात्मक सुधारणाहि झाली. ज्या जातीमध्यें व्यभिचाराच्या दंडाबद्दल खटले पंचायतीपुढें येत त्या जातीमध्यें जेव्हां निवाडे लिहून ठेवण्याची पद्धत सुरू झाली तेव्हां तसले खटले येऊं नयेत किंवा त्यावरील निकाल कागदावर लिहिले जाऊं नयेत म्हणून खटपट सुरू झाली. व जी मंडळी पूर्वी असल्या तऱ्हेचा आरोप निमूटपणें सहन करीत तीच मंडळी असें लिहून ठेवाल तर खटला करीन असा धाक देऊं लागली. त्यामुळें असले खटलेहि न घेण्याकडे प्रवृत्ति झाली. व कित्येक वेळ असें झालें कीं बारीक सारीक गोष्टींबद्दल दंड करण्याची प्रवृत्ति कांहीं जातींत होती त्या प्रवृत्तीसहि आळा बसला. जोंपर्यंत लिहिलें जात नव्हतें तोंपर्यंत मंडळी क्षुद्र आरोप करीत व त्याबद्दल दंडहि वसूल करीत. तथापि जेव्हां निवाडे लिहिण्याची प्रवृत्ति झाली तेव्हां आपल्या पंचायतींत आपण इतक्या क्षुद्र गोष्टींची चर्चा करतों असें कागदावर पहणें पंचांसच आवडेनासें झालें. व पंचायतींचा उपयोग फक्त जातीचें शिक्षण वाढविण्याकडे करावा अशा तऱ्हेचें त्या जातींत लोकमत बनूं लागलें. असो.

ज्ञानकोशाच्या चौकशीमुळें प्रत्येक ज्ञातींत खळबळ उडालेली आहे आणि प्रत्येक जात आपल्या अंतःस्थितीकडे अधिक पाहूं लागली हा आमच्या दृष्टीनें

इतका मोठा फायदा झाला आहे की त्या फायद्यामुळें संपादकांस मोठे समाधान वाटतें. आणि आपण आपल्या लिहिण्यामुळें किंवा आपल्या चुकांनीं जरी एखाद्या जातींच्या सदस्यांस दुखविलें असेल तरी आपण त्या जातीची कांहीं तरी सेवाच केली अशी भावना होऊन एक तऱ्हेचा आनंदच वाटत आहे.

आतां अनेक जातींच्या विषयीं जो मजकूर आला तो जातिमत्सरासारख्या भावनांनीं प्रेरित होऊन आला कीं त्या जातीच्या कल्याणाच्या दृष्टीनें आला या-विषयीं विचार करण्याकरितां साहित्य पुरविण्याचें काम आम्ही करणार आहों. याविषयीं निर्णय वाचकांवरच सोंपवितों. आणि आमच्याकडे साहित्य कसें जमूं लागलें आणि त्यांतून आम्ही काय घेतलें एवढेंच मांडतों.

प्रथम येथें एवढें सांगितलें पाहिजे कीं प्रत्येक जातीस आपली हकीकत आम्हांस कळविण्यास आम्ही जाहीर रीतीनें केसरीपत्रांतून आमंत्रण केलें होतें. व माहिती पाठविण्यासाठीं तेवीस सूचक प्रश्नहि लिहिले होते. शिवाय त्यां पत्राचें पुन्हां मुद्रण करून अनेक जातींच्या संस्थांकडे तें पाठविलें होतें. आणि त्या पत्रांच्या सहाय्यानें आमच्या आफिसांत गॅझेटियर, एथ्नालॉजिकल सर्व्हे, सेन्सस रिपोर्ट इत्यादि साधनांतून जमविलेली माहिती दुरुस्त करण्यांत येत असे. सर्वच जाती आपल्या संबंधानें जें जें पाठवीत तें तें ग्रहण करण्याचा आमचा इरादा नव्हता. कां कीं, पुष्कळशा जाती आपलीच माहिती न देतां आपल्या हकीकतींत शेजारच्या जातीवरहि शिंतोडे टाकीत असत. आणि आपल्या जातीची तारीफ बेसुमार करीत. व इतिहास लिहितांना वाटेल त्याशीं संबंध जुळवून देत. ज्यांनीं जें पाठविलें तें सर्व ग्रहण करणें म्हणजे संपादकांनीं आपली कांहींच बुद्धि न चालविणें होय. उदा. माळी जातीची माहिती पाठवितांना त्या जातीच्या एका सद्गृहस्थांनीं एक बाड लिहून आमच्याकडे पाठविलें. त्यांत कृष्ण हा जातीचा माळीच होता, कां कीं, त्यास वनमाली म्हणत, सूर्य हाहि माळीच होता, कां की, त्यास अंशु-माली म्हणत इत्यादि विधानें होतीं. सुतार, सोनार इत्यादि जातींचा विश्वकर्म्याशीं जोडलेला संबंध सांगणारी आणि त्या आधारावर आम्ही ब्राम्हण आहोंत म्हणून सांगणारीं पत्रें अनेक होतीं. आमचा भोजन व्यवहार फक्त ब्राम्हणांबरोबर होतो असेंहि अनेक जाती लिहीत असत. अशा तऱ्हेच्या आलेल्या माहितीवर संशयात्मक संक्षेप देणें भागच पडे. ज्ञानकोश न वाचतां ज्ञानकोशमंडळ ही एक चित्पावनांची टोळी आहे आणि ती इतर जातींची निंदा करीत असते व सारस्वतांची निंदा विशेष केली आहे व त्यांचें ब्राह्मण्य नाकारलें आहे असें सांगत सुटणारे एक गिर-गांवांत खटपटे सारस्वत बॅरिस्टर आहेत. वर्तमानपत्रांत असलीं विधानें न करतां खाजगी तऱ्हेनें असल्या विधानांचा प्रसार करणें ही गोष्ट अत्यंत भ्याडपणाची आहे असें आम्ही त्या सारस्वत बॅरिस्टरांस सुचवितों. लोकांस एवढेंच सांगाव-याचें आहे कीं सारस्वतांच्या ब्राह्मण्याबद्दल संशय घेणारा ज्ञानकोशांत मजकूर मुळींच आलेला नाहीं. त्यांस न आवडणारा दुसरा कांही मजकूर आला आहे असें मात्र

दिसतें. त्या शिवाय महाराष्ट्रसारस्वत इतके क्षुब्ध झाले नसते. तो मजकूर 'कुडाळदेशकर ब्राह्मण' या लेखांत आहे. पण त्यांत बरेच ऐतिहासिक प्रश्न आहेत. त्या प्रश्नांचा खल करण्याचें काम इतिहासज्ञांचें आहे त्यावरून सारस्वत ज्ञातीच्या विरूद्ध संपादकाची वृत्ति होती असें कोणासहि म्हणतां यावयाचें नाहीं.

देवरुखे मंडळींचें ज्ञानकोशाविरुद्ध जें मत झालें तें विशेषें करून कोंकण देशस्थांविषयीं ज्ञानकोशांत मजकूर दिला नाही त्यामुळें झालें आहे. आम्ही त्यांस महाराष्ट्रीय ब्राम्हणांतून वगळतों असा त्यांचा एवड्याच कारणावरून समज होऊन त्या समाजांत संताप उत्पन्न झाला. आणि तसा समज होण्यास आम्ही कारण झालों याच्याबद्दल आम्हांस अत्यंत खेद होतो. देवरुखे मंडळींस आम्ही एवढेंच सांगूं इच्छितों 'कीं आम्ही देवरुखे महाराष्ट्रीय ब्राह्मण नाहीं' असा जर त्यांनी ठराव केला तर आम्हांसच त्यांच्या बद्दल फार संताप येईल, इतके आम्ही त्यांस महाराष्ट्रीय ब्राह्मणांतले समजतों.

आम्ही आतां देवरुखे ज्ञातीविषयी ज्ञानकोशांत काय लिहिलें हें पुढें मांडतों. अक्षिप्त लेखाचें पुन्हां प्रसिद्धीकरण आम्ही करतों तें देवरुखे मंडळीस दुखविण्याकरितां नव्हे. आमच्या मतें देवरुखे मंडळीस दुखविण्यासारखें यांत कांहींएक नाहीं. तथापि त्या ज्ञातींतल्या मंडळीचीं मने दुखावलीं असें त्यानंतर झालेल्या चळवळीवरून दिसून येतें.

जेव्हां आपला दुसऱ्याचें मन दुखविण्याचा हेतु नसतांना आपल्या कृतीनें इतर मंडळी चिडली असेल तेव्हां आपल्या कृतीचें परीक्षण पुन्हां करणें इष्ट असतें. तथापि आमच्या लेखावरून देवरुखे मंडळीस रागाविण्यासारखें कांहीं विशेष आहे काय आणि चित्पावनांखेरीज इतर ज्ञातींची निंदा करण्याचा हेतु त्यांत दिसून येत आहे काय याविषयीं वाचकांस स्वतंत्रपणें निर्णय करतां यावा यासाठीं म्हणजे प्रतिवादी पक्षकार या नात्यानें वाचकांच्या न्यायासनापुढें तो संबंध लेख आम्ही मांडतों.

देवरुखे हे ब्राम्हण मुख्यत्वें कुलाबा व रत्नागिरी जिल्ह्यांत (फूणगुसच्या खाडीच्या दोन्ही कांठावर ९० गांवांत) आढळतात. रत्नागिरी जिल्ह्यांत संगमेश्वर तालुक्यांतील देवरुख गांवावरून ते आपल्यास देवरुखे म्हणवितात. त्यांचें म्हणणें कीं, आपण मूळचे देशस्थ; परंतु देवरुखभागांत रहावयास गेल्यामुळें देवरुखे हें नांव प्राप्त झालें. विल्सन म्हणतो की, अथर्ववेदाच्या देवर्षिशाखेचा हा वर्ग असावा. महाराष्ट्र ब्राह्मणांत त्यांचा दर्जा कमी लेखला जातो; त्यांच्या पंक्तीस बसण्यास संकेत कोसळतात असा समज आहे. त्यामुळें पुष्कळ कऱ्हाडे—देशस्थ-चित्पावनब्राह्मण त्यांच्या पंक्तीस बसत नाहीत. (से. रि. १९११; बॉंबे, भा. २ पृ. २४५). यांच्या धार्मिक व सामाजिक चालीरीती देशस्थ ब्राह्मणांहून फारशा निराळ्या नाहीत. यांच्यांपैकीं पुष्कळजण शेतकरी असून, अगदीं थोडे लोक व्यापार व सरकारी नोकरींत शिरले आहेत

शके १६४६ (स. १७२४) मध्यें सोपारें (जिल्हा ठाणें) येथील ब्राह्मणांनीं देवरुखे हे पांक्तिबाह्य ब्राह्मण नाहींत असा निकाल दिला होता (भा. मं. वा. इति. १८३६). सध्यां मुंबईतील बहुतेक खाणावळी देवरुख्यांनीं चालविल्या आहेत व त्यांत सर्व तऱ्हेचे ब्राह्मण जेवतात; कोंकणांतहि बहुतेक लोक त्यांच्याशीं रोटीव्यवहार करतात.

वरील निर्णयपत्रांत देवरुख्यांना देवराष्ट्रीय म्हटलें आहे. स्कंदपुराणांतहि त्यांनां देवराष्ट्रीय म्हणून ते देवराष्ट्रांतून आलेले व अपांक्त म्हटलें आहे." अन्येपि देवराष्ट्रीया देवराष्ट्रादुपागताः। अपांक्तेया अयाज्याश्च गिरिकांतारवासिनः ॥" पद्मपुराणांत सुद्धां यांना पांक्तिदूषक देवराष्ट्रब्राह्मण म्हणून संबोधिलें आहे.

शके २७२ (स. ३५०) च्या अलाहाबादच्या समुद्रगुप्ताच्या शिलालेखांत देवराष्ट्र देशाचा उल्लेख आढळतो.दक्षिणापथांतील जे जे राजे त्यानें जिंकिले त्या देशांच्या नामावलींत देवराष्ट्राचें नांव आहे. तसेंच तेथील कुबेर नांवाच्या राजाचाहि उल्लेख आहे. नागपुर ते म्हैसूरपर्यंतच्या प्रदेशांत मध्येंच हें देवराष्ट्र होतें, सह्याद्रीच्या किनाऱ्याचा टापू त्या राष्ट्रांत मोडत असे.

कृष्णानदीच्या कांठीं कऱ्हाडा(सातारा जिल्हा)जवळ कुंडलच्या पूर्वेस २–३ कोसावर हल्लीं देवराष्ट्र नांवाचें एक खेडें आहे. त्याच्या आसपास प्राचीन अवशेष, लेणीं, देवळें फार आहेत. येथें कुबेरेश्वर व समुद्रेश्वर यांचीं देवळेंहि आहेत. हेंच पूर्वीच्या देवराष्ट्राच्या राजधानीचें शहर; हें राज्य सातारा ते कोल्हापूर व अरबीसमुद्र ते पंढरपूर या भागावर पसरलें असावें व शके २७२ त तेथें कुबेर राजा होता. त्याच्या आश्रयानें देवराष्ट्र या प्रांतांत जे ब्राह्मण रहात असत ते देवराष्ट्र–देवराष्ट्रीय–देवरुखे ब्राह्मण होत असें कें. राजवाडे म्हणतात.

शातवाहनांचें राज्य (३२८) नष्ट झाल्यावर त्यांचे मांडलिक तगरेश्वर यांचाहि ऱ्हास होऊन देवराष्ट्र येथील राजांनीं महाराष्ट्रांत डोकें वर उचललें असावें. त्यांनां पुढें (३५०) समुद्रगुप्तानें मांडलिक केलें. नंतर ते ४७८ पर्यंत कांहीं काळ मांडलिक बनले असावेत. या २५० वर्षांच्या (२३०–४८०) कालांत महाराष्ट्रांत अनेक लहानमोठे राजे व राज्यें उदयास आलीं. त्यांपैकींच देवराष्ट्राचें एक राज्य होय. हें राज्य ४७८ त चालुक्यांच्या अंकित झालें असावें व पुढें थोडयाच कालानें नष्ट झालें असावें. त्यावेळीं कुबेर राजाचे आश्रित हे देवराष्ट्रीय ब्राह्मण राजाश्रयाभावीं त्या (देवराष्ट्र) प्रांतातून निघून संगमेश्वर व फुणगूसच्या आसपास येऊन कायमचे राहिले असावे. हा टापू त्यावेळी चालुक्यांच्या अंमलापासून दूर होता. यावेळीं तेथें दुसरे (चित्पावन) ब्राह्मण होतेच. त्यांच्यामध्यें परचक्राच्या भयानें हे देवराष्ट्रीय येऊन गिरिगव्हरांत लपून राहिले. या घाटावरील भिन्नाचाराच्या व भिन्न व्यवहाराच्या ब्राह्मणांपासून यज्ञयाग करणारे चित्पावन ब्राह्मण अर्थातच अलिप्त राहिले.

देवराष्ट्र याचा अपभ्रंश देवरठ होतो; देवऋषि याचा अपभ्रंश देवरुखे किंवा देवरखे. संगमेश्वराजवळ देवरुखें हें एक गांवहि आहे. सारांश ही जात प्रादेशिक आहे; याशिवाय इतर महाराष्ट्रीय ब्राह्मण व यांच्यांत विशेष फरक नाही.

हे स्वत:स देवर्षिब्राह्मण ह्मणवून पंचद्राविडांतर्गत महाराष्ट्र ब्राह्मण असल्याचें सांगतात. मुंबई इलाख्यांत यांची लो. सं. सुमारें ५ हजार असून याशिवाय माळवा, ग्वाल्हेर, कर्नाटक इकडे २ हजारांपर्यंत लोक आहेत. ठाणें जिल्ह्यांत उंबरगांव पेट्यांतहि यांची वस्ती बरीच आहे.

कुलाबा जिल्ह्यांत दहिवली येथील विठ्ठलदेवाचें एक संस्थान या जातीच्या पंचायतीच्या मालकीचें आहे. गरीब विद्यार्थ्यांकरितां अलीकडे यांनीं कांहीं फंड काढले आहेत. पूर्वी यांच्यांत पंचायती होत्या, सांप्रत नाहींत. यांच्यांत पोटजाती नाहींत; हे आपणास ऋग्वेदीय देशस्थांची पोटजात म्हणवितात आणि देशस्थांशीं आपला लग्नव्यवहार २५० वर्षांपासून असल्याचें सांगतात. यांचा धर्मविधी देवरुखे भिक्षुकांकरवींच बहुशः होतो. हे अपांक्त नाहींत याबद्दल निरनिराळ्या ठिकाणच्या धर्मसभेचीं व अधिकाऱ्यांचीं आज्ञापत्रें (नकला) पाहण्यांत येतात.

शतप्रश्नकल्पलता या पुस्तकांत (अ. १, प्र. ९) यांच्या उत्पत्तीबद्दल एक दंतकथा आहे. तीच सर्वत्र आढळते. यांचें म्हणणें कीं, कोल्हापूरप्रांतांतून शृगाल राजाच्या (१) छळामुळें आम्हीं कोंकणांत गेलों. पुढें परशुराम कोंकणांत आल्यावर त्याच्या वाडिलांच्या श्राद्धास या ब्राह्मणांनां क्षण दिला असतां हे गेले नाहींत ह्मणून मग त्यानें चित्पावनांनां निर्माण केलें व देवर्षि ब्राह्मणांनां शाप दिला.

यांचीं व देशस्थांचीं गोत्रें (बरीचशीं) एकच आहेत. तसेंच दोघांच्या कुलस्वामींमध्येंहि बरेंच साम्य आहे. ऋग्वेदी आश्वलायन व यजुर्वेदी तैत्तिरीय शाखांतर्गत हिरण्यकेशी अशा दोन शाखा यांच्यामध्यें आहेत. तुळजापूर व कोल्हापूर येथील देवी, जेजुरीचा खंडोबा हे यांचे मुख्य देव आहेत.

यांचीं कांहीं आडनांवें.—करोडे, कानडे, कारूळकर, कोबजे (कोगजे) कारकर, कवठेकर, कुळकर्णी, खटावकर, खरवतकर, आरेकर, आंबेडकर, चाफेकर, (दोन गोत्रांचे), चांदें, जुवेकर, जकाते, जोशी, ढापरे, डांगे, ताले, टांकसाळे, नेरे, तेरेदेसाई, डंबळकर, गोंधळेकर, चौगुले, निमकर, नवरंगे, निबंधे, धनुर्धर, पेडवळे, पिंपुटकर, बोमे, (भोमे), भोळे, भडसावळे, वाढे, बाठे पांगारकर, मोगरे, देवळे, महाजन, मराठे, मांदुसकर, मुठ्ठल, मुळे, मुसळे, रोडे, शितूत, साले, सावले. यांशिवाय कर्नाटक, प्रांतांत, गेलेल्या, लोकांचीं आडनांवें:—थळहट्टी, बनहट्टी, कलघट, वैगरे.

कै. विष्णु परशुराम पंडित यांनीं ' पंचद्राविडान्तर्गत महराष्ट्र ब्राह्मणांतील देवरुख्यांविषयी शास्त्रसंमतविचार ' नामक एक पुस्तक लिहिलें आहे (१८७४) त्यांत देवरुख्यांनां देशस्थ म्हटलें आहे.

मुसुलमानी अंमलांत कुळकर्ण, देसाईपण, करोडगिरी वगैरे अधिकार यांनां मिळाल्यानें पुन्हां हे देशावर अहमदनगर, बेळगांव, धारवाडाकडे गेले. मराठी

राज्यांत हे जकाते, कारकून झाल्यानें गुजराथ, माळवा, सातारा, पुणें या भागांत पसरले, महादजी शिंद्याच्या लष्करांत अमझारवाले जहागिरदार होते. नागो देवचक्के हाहि एक पथक्या त्यांत होता. [सेन्सस रिपोर्ट १९११ मुंबई; भा.इ.सं. अहवाल शक १८३८, रत्नागिरी ग्याझे; सोलापूर ग्याझे; भांडारकर—हिस्टरी ऑफ दि डेक्कन; विल्सन—इंडियन कास्ट्स; हरिवंश;सह्याद्रीखंड; रा.भि. मो.मांडुसकर यांची माहिती.]

या लेखावर आक्षेप काय उत्पन्न झाले ते आतां देऊं.

ज्ञानकोशांतील पर्वांच्या अंकांत दिलेला लेख बऱ्याच जणांनां स्वयंस्फूर्तीनें आक्षेपार्ह वाटला ही गोष्ट खरी आहे अशी आमची खात्री झाली आहे. रा. तेरेदेसाई यांनीं प्रथमतः या लेखाचें पुनर्मुद्रण करून सुमारें २५० मंडळीकडे तो लेख स्वतःचें मत व्यक्त न करतां त्यांचें मत मिळविण्यासाठीं पाठविला आणि तेव्हांपासून चळवळीस प्रारंभ झाला.

या चळवळीचें स्वरूप, त्यावर झालेल्या सभा, कोर्टापुढें ज्ञानकोशकारांस खेंचण्याचीं भाषा व त्यानंतर ज्ञानकोशकारांनांच आपलें म्हणणें सांगण्यासाठीं झालेला प्रयत्न व त्यासाठीं " स्पेशल कमिटीची स्थापना " आणि त्या स्थापने-नंतर कमिटींत उत्पन्न झालेले द्वैत म्हणजे तीमध्यें एकमेकांचे मसुदे एकमेकांस पसंत न पडणें व त्यामुळें उत्पन्न झालेल्या दोन परिषदा या सर्व गोष्टी या प्रकर-णाच्या अलीकडील बाढ दाखविलात. साधारण वाचक या चळवळीच्या वृत्ताकडे लक्षपूर्वक पहातच नाहीं. त्याला असें वाटतें कीं, ज्या अर्थीं देवरुखे मंडळींत इतकी चळवळ झाली त्या अर्थीं ज्ञानकोशकारांनीं कांहीं तरी भयंकर लिहिलें असलें पाहिजे.

आम्ही या चळवळीचा सांगत इतिहास न देतां आमच्यावर काय आक्षेप उत्पन्न झाले तेवढेंच सांगतों.

पिंपुटकरांचे आक्षेप

(चिंतळेभट्ट प्रकरण या पुस्तकावरून)

'द' अक्षरांतील ज्ञातिलेखांचें परीक्षण

आतां ज्ञानकोशाकडे वळूं. ज्ञानकोशकारांनीं 'द' या सदरांत 'देवरुखे' या मथळ्याखाली मोठा मौजेचा असा एक लेख प्रसिद्ध केला आहे. या लेखाच्या पंचायतनांतील मुख्य देवता अगर केंद्र अगर इंग्रजींत 'बॅकबोन्' किंवा 'न्युक्लीअस' या शब्दानें जें व्यक्त होतें तें म्हणजे सोपारें गांवच्या इसमाच्या एका पत्राची बिन सह्यांची नक्कल व त्यावर मळीनाथी चढवून इतिहाससंशोधक राजवाडे यांनी छापलेला लेख होय. पण ज्ञानकोशकारांनीं त्याच्यापेक्षां और एक मजा केलेली आहे. भिल्ल, कोळी, आफ्रिकेंतील किंवा दूर सरहद्दीवर असलेल्या कांहीं विचित्र अशा विशिष्ट जाती यांचे कित्येक ठिकाणीं कुतूहलानें वर्णन केलेलें आढळून येतें. नुकतेंच कांहीं महिन्यापूर्वी 'मॉडर्न रिव्ह्यु' नांवाच्या एका इंग्रजी मासिक पुस्त-

कांत नागालोकांचें वर्णन आलें आहे. त्यांत संपादकांनीं त्यांचे स्त्रीपुरुष व त्यांनीं धारण केलेली हाडांचीं व शिंगांचीं आभूषणें यांचे फोटो नावीन्याच्या औत्सुक्यानें दिलेले आहेत, त्यांची आठवण होते. ज्ञानकोशकारांनीं 'द' या अक्षराखालीं हिंदुस्थानचा इतिहास या विभागांत त्यांना देणें शक्य झालीं इतकीं कांहीं विशिष्ट जातींचीं वर्णनें दिलीं आहेत. त्या जाती ह्या:—दलु, दरद, दरवेशी, दर्जी, दस-नामी, दहाईत, दांगट, दास, दुबळे, देवांग, देवार, दैवज्ञ. याच जातींच्या मालिकेंत ज्ञानकोशकारांनी 'देवरुखे' याहि जातीचा समावेश करून तिचें वर्णन दिलेलें आहे. इतिहाससंशोधक राजवाडे यांच्या लेखावरोबरच ज्ञानकोशकारांनीं विपरीत भासणाऱ्या आणखी वाईट गोष्टी मिळविल्या आहेत. हा मजकूर एखाद्या चवथी इयत्तेंतल्या मुलानें लिहिला आहे कीं काय असें वाटूं लागतें. किंवा एखाद्या फाटक्यातुटक्या पाद्यानें आमच्या इकडल्या कांहीं बारक्यासारक्या गोष्टींसंबंधी अमेरिकेंत किंवा इंग्लंडांत वर्णन करून सांगावें तसलाच हा प्रकार आहे कीं काय असा भास होतो. एवच ज्ञानकोशकारांनीं संशोधकांच्याहि आणखी पुढें दोन पावलें जाऊन देवरुख समाजाचें स्वरूप चीड व संताप येण्यासारखें विद्रुप व हिडिस करून दाखविलें आहे. आमच्या मतें 'देवरुखे' समाजाचा हा राजरोस अपमान व धडधडीत उपमर्द होय.

आम्ही वर नमूद केलेल्या जातीचें ज्ञानकोशांतील वर्णन या नमुन्याचें आहे. (१) दलु:—ब्रह्मदेश व शानसंस्थानें यांमधील प्रदेशांत रहाणारे मिश्र शान ब्रह्मी लोक. हे थोडथोडे बौद्धलोकांसारखेहि आहेत. (२) दरद:—गिलजित भोंवतालच्या प्रदेशांत काश्मीर व हिंदुकूश यामध्यें दरद लोक रहातात, संस्कृत ग्रंथांतून ज्यांना पिशाची लोक म्हटलें आहे त्यांचेच हे वंशज असावेत असें ग्रीयर्सन-चें म्हणणें आहे. सस्कृत ग्रथकार 'दरदा:' असा उल्लेख करितात. आजचे बहुतेक दरद मुसलमान आहेत. मुसलमानी दरदांत कित्येक हिंदु चाली सांपडतात. या लोकांत पुरुष व बायका एका ठिकाणी जेवावयास बसतात. लग्न जमविण्याचे वेळीं मुलाचा बाप मुलीच्या बापाकडे जाऊन १॥ फूट लांब चाकू, ४ वार कापड आणि एक भोपळा (कमडल) भर दारू नजर करतो. मुलीच्या बापानें तिचा स्वीकार केल्यास बाड्निश्चय झाला असें समजतात. हे प्रेतयात्रेच्या वेळीं प्रेताभोंवतीं बसून द्राक्षें वगैरे खातात आणि मद्य पितात.मरणानतर तीन दिवसांनीं तूपभाकर वांटतात. प्रेत जमिनीत पुरतात. दरदांना बाईचा मोठा तिटकारा आहे. इ० इ० (३) दरवेशी:—हा परशियन शब्द असून त्याचा अर्थ भिक्षेकरी आहे. हे मुसलमान व कांहीं ख्रिश्चन जातीचे असून काम न करतां भिक्षावृत्तीवर चरितार्थ चालविणें हा त्यांचा धदा असतो. (४) दर्जी:—शिवणकाम करणारी जात. यांच्यांत कांहीं ब्राह्मणसंततीपैकीं आहेत ही संतति सर्वांत उच्च म्हटली जाते. यांच्यांत चमरिया म्हणून एक चांभारांची संतति आहे. पंचमहालांतील दर्जी लोकांचा दर्जा भेड लोकांहून खालचा आहे. सुरत प्रांतांतील दर्जी कधीं कधी भारवाड लोकांचे

उपाध्याय असतात. पुनर्विवाह व घटस्फोट या दोन्ही चाली यांमध्यें आहेत.कुंभार व लोहार यांच्या हातचें जेवण हे जेवतात.हिंगलाज देवीची पूजा करितात.या लोकांपैकीं पांचषष्टांश लोक शिंप्याचा व रंगाऱ्याचा धंदा करतात इ० इ० (५) दहाईत:—यांचे व खंगारांचे पूर्वज एकच होते अशी एक दंतकथा आहे. सहा रुपये, साखर, हळद, तिळाचें तेल इतकें वराच्या बापानें वधूस दिले पाहिजे. व्यभिचारांत धरलेल्या स्त्रीस पहिल्यांदा क्षमा करितात पण पुनः केल्यास बहिष्कार घालतात. नवऱ्यास सोडून कोणी स्त्री राहूं लागली तर त्यानें नवऱ्याचा खर्च भरून दिला पाहिजे. जर कुणबी वगैरे माणसानें दहाईत बाईबरोबर व्यभिचार केला तर त्याला जातींत सामील करून घेतात. हे स्थानिक हिंदु देवांची पूजा करितात. इ० इ० (६) दांगट:—महाराष्ट्रांतील एक जात. हल्लीं सिंगणापूर गांव ज्या ठिकाणीं आहे तेथें दाट झाडी असे व त्या वेळीं या जंगलांत दांगट लोकांची वस्ति असे. या जातींत जाधव भोंसले यासारखीं आडनांवें आहेत. कांहीं ठिकाणीं दांगटांना अस्पृश्य समजलें जातें. सध्यां या लोकांचा मुख्य धंदा लावण्या पोवाडे म्हणण्याचा आहे. पुष्कळसे मोलमजुरी करून रहातात. (७) दास:—विशेषत: कर्नाटकांत आणि कोल्हापुर संस्थानांत यांची वस्ति बरीच आहे. हा एक भिकारी वर्ग असून हिंदु आणि लिंगायत धर्माच्या हलक्या दर्जाच्या जातींत यांची गणना होते. म्हैसूरमध्यें हे भिक्षुकीहि करतात, व स्वत:जवळ शंख, घंटा वगैरे बाळगतात. भिक्षावृत्तीशिवाय दास लोक गाणें वजावणें आणि नाटकी खेळ करून पोट भरतात. दासस्त्रिया बहुधां वेश्यांचा धंदा करितात. कांहीं स्त्रिया वंशपरंपरा देवांच्या देवळांतून रहातात. देवळें झाडसारवण्याचें काम यांच्याकडे सोंपविलेलें असतें. तथापि देवळाच्या गाभाऱ्यांत जाण्यास यांना मज्जाव असतो. (८) दुबळे:—भडोच सुरत व ठाणें जिल्ह्यांत मुख्यत्वेंकरून आढळतात. कोळ्यांप्रमाणेंच या जातींत इतर लोकांचें मिश्रण आहे. बहुधां शेतकरी मजुर व घरगुती नोकर. पुनर्विवाह, घटस्फोट, दिराशीं लग्न अन्य हिंदु, भूत पिशाचाशिवाय हनुमान, शिकोत्री, आगाशी इ० देवतांची पूजा करतात, ब्राह्मणांनां मान देतात. विवाह संस्कार व नामसंस्कार त्यांच्याकडून करवितात. इ०

(९) देवांग:—हे कोष्टी असून सुती व रेशमी कपडे विणतात. आतेबहीण व मामेबहीण यांच्याशीं लग्न बहुधां करतां येतें. कर्नाटकांत मुलाचा बाप मुलीबद्दल ३० रुपये देतो. पुनर्विवाहाची चाल. पंचांची संमति असल्यास घटस्फोटहि करतां येतो. खंडोबा, बहिरोबा, जोतीबा, नरसोबा यांची पूजा करितात. यांचे उपाध्याय देशस्थ ब्राह्मण आहेत. यांच्यांत कांही जंगमपंथी आहेत. विवाहादि संस्कार यांच्या जातीचे उपाध्याय करितात. (१०) देवार:—गाणारे व भिक्षा मागणारे द्रविड जातीचे. वधू प्रौढ असल्यास गर्भाधान निराळें करावें लागत नाहीं. नवऱ्याजवळून पळून दुसऱ्याबरोबर राहूं लागल्यास विधवाविवाहाच्या दुप्पट दंड द्यावा लागतो. न परवडेल तर १० रुपयांसकट परत नवऱ्याकडे त्यानें पाठवावी.

ह लोक प्रेतें पुरतात. ब्राह्मणांच्या हातचें जेवीत नाहींत. पण गोंडांच्या हातचें खातात. हे लोक डुकरें पाळतात. सूत काढणें, वानरें शिकविणें, अस्वलें व वाघ पाळणें, शिसें व कथलाचे दागिने विकणें हे धंदे करतात. इ० (११) दैवज्ञः— सुवर्णकारांची एक जात. प्रत्येक तालुक्यांतून एक दोन देवळें व जमीन उत्पन्नें. या जातीमध्यें विवाहादि संस्कार बहुतेक स्वज्ञातीय उपाध्यायांकडून न मिळाल्यास इतर ब्राह्मणांकडून करविण्यांत येतात. ही जात आपल्याला ब्राह्मण म्हणविते. ज्ञातीसंबंधीं उपलब्ध असलेली बहुतेक माहिती, आज्ञापत्रें, निवाडे वगैरे कै. वे. शां. सं. नारायण रावजी शास्त्री क्षीरसागर यांनीं " विश्वब्रह्मकुलोत्साह " या ग्रंथांत संकलित केलेली आहे. विधवाविवाहाची चाल केव्हांहि प्रचलित नाहीं. रखेल्या स्त्रियांपासून अगर अधर्म व्यवहारापासून झालेल्या संततीची गणना ज्ञातींत होत नसून तिची स्वतंत्रहि जात बनलेली पहाण्यांत नाही. ' दैवज्ञ समाजोन्नति परिषद ' सारख्या संस्था व " दैवज्ञ प्रबोधिनी " एक पाक्षिकहि यांच्यांत आहे. इ० इ० या व त्यांच्यांत भर म्हणजे ' देवरुखे ' इतक्याच काय त्या जाती ज्ञानकोशाच्या पंधराव्या विभागांत दिलेल्या आहेत. याहून जास्ती नाहींत.

इतर जातींचीं हीं दिलेलीं वर्णनें वाचून झालीं म्हणजे लागलीच कोशांतील ' देवरुखे ' या मथळ्याखालीं दिलेला मजकूर वाचून पहावा म्हणजे आम्ही जीं वर विधानें केलेलीं आहेत त्यांची सत्यता व त्यांतील मर्म हीं सहज कोणालाहि पटण्यासारखीं आहेत. याच विभागांत शोधून पहातां ' देशस्थ ' हा मथळा सांपडलाच नाहीं. चित्पावन ऊर्फ कोंकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे यांचींहि वर्णनें दिलीं असतीं म्हणजे त्यांचींहि वर्णनें कशीं दिलीं आहेत तें ताडून पहातां आलें असतें. पण मग ज्ञानकोशकारांनीं तसें कां केलें नाही हें काय सांगावें? कीं त्यांच्या मतें हे महाराष्ट्रीय ब्राह्मणच नव्हेत ?

निदान प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं तरी देवरुखे समाजांतील सज्जन, शहाणे व सुशिक्षित असे कमींत कमी चारदोन लोक सहज आहेत. ज्या ज्ञानकोशकारांनीं आपला इतका ज्ञानाचा कोश बनविण्याकरितां अनेक ठिकाणांहून अनेक प्रकारांनीं माहिती मिळविली त्यांना या लोकांची गांठ घेऊन हा ' देवरुखे ' मथळ्याखालील लेख प्रथम दाखवून, त्यांचा अभिप्राय घेऊन मग छापतां आला नसता काय ? हें करणें त्यांना काय अशक्य होतें ? कीं जाणून बुजून त्यांनीं हें कृत्य मुद्दाम केलें ? मागाहून आम्हांला असें कळलें कीं पुण्यांतील श्रीयुत भिकाजी मोरेश्वर मांदुस्कर हे त्यांच्याकडे स्वतः गेले होते. त्यांनीं आपले जवळचे सर्व कागदपत्र ज्ञानकोशाच्या संपादकांना दाखविले. त्यांच्याशीं या विषयाची चर्चाहि केली. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं असेंच शेवटीं सिद्ध झालें. केवळ " हे (देवरुखे) अपांक्त नाहींत याबद्दल निरनिराळ्या ठिकाणच्या धर्मसभेचीं व अधिकाऱ्यांचीं आज्ञापत्रें (नकला) पाहण्यांत येतात " एवढेंच वाक्य कौंसांत ' नकला ' हा शब्द घालून अगदीं मोघमपणें छापून व दोन्ही हात आपल्या

कानांवर टेवून ज्ञानकोशकार मोकळे झाले आहेत: संशोधक राजवाडे यांना सोपारं येथें सांपडलेलें पत्र हेंहि नक्कलच: किंबहुना नकलेचीं नक्कल. पुन: त्यावर सह्या कोणाच्याच नाहींत. तेव्हां यांतील सर्व हकीकत निवेदन करून, त्यांतील श्लोकच्या श्लोक आपल्या कोशांत उद्धारून घेऊन त्यांवरील रा: राजवाडे यांचें जें एक लांबलचक चव्हाट लावीत बसले आहेत, तें त्यांना टाळतां आलें नसतें काय? तें राहिलें त्यांची मर्जी! पण हें राजवाडयांचें चव्हाट संपल्यानंतर तरी शके १५०५ मध्यें श्रीक्षेत्र काशी येथील प्रसिद्ध मुक्तिमंडपांत सर्व जातींतील विद्वानांनीं निर्णय लाविलेल्या सह्यांनिशीं असलेल्या निर्णयपत्रांतील अर्थात् मांदुस्कर यांनीं दिलेल्या पत्रांतील आणखी पांच चार ओळी त्यांना देतां आल्या नसत्या काय? "सभासदिं विचारू केला जो अनत भट्टिं देवर्षि ब्राह्मणांसांवानें द्वेषु केला तो शास्त्रविरुद्ध याकारणें चिपळुणे, कऱ्हाडे, देवर्षि, महाराष्ट्र हे समस्त ब्राह्मण समान वैदिक कर्मी व अन्नसंबंधीं समस्तांशीं अधिकार ऐसा निश्चय जाहला यांहि ब्राह्मणिं परस्पर द्वेषु करूं नये. देवर्षि ब्राह्मणांस आम्हांस पूर्वीं अन्नसंबंध होता मध्यें अनंतभट्टि नाहीं म्हणितलें होतें. तुम्ही सकळ करितसा कोणीं अन्नसंबंध न म्हणति त्याशी विश्वेश्वराची आण जे अति पाषांड मत्त करिती" हीं रा. मांदुस्कर यांनीं दिलेल्या पत्रांतील दोन वाक्यें रा. राजवाडे यांच्या मजकुराप्रमाणेंच दिलीं असतीं तर काय बिघडलें असतें? हीं वाक्यें तर प्रत्यक्ष श्री काशीक्षेत्रांतील प्रसिद्ध मुक्तिमंडपांत शक १५०५ मध्यें झालेल्या निर्णयपत्रांतील होत. त्यावेळीं चिपोळणे, कऱ्हाडे, महाराष्ट्र, गुर्जर, तैलभुक्त वगैरे अनेक जातींचे प्रमुख हजर होते त्याचप्रमाणें "अथ देवर्षीविप्राणां काश्यां श्री मुक्तिमंडपे। यतिमिश्रविपश्चिद्भि: सद्ब्राह्मण्यं विविच्यते ॥ १ ॥ तत्र तावत्पूज्यपाद परमहंस परिव्राजक महाराष्ट्र कर्णाटक कोंकणतैलंगद्रविडादि सकल ज्ञातीय विद्वद्गृहस्थनिचयसंमत्या वेदशास्त्रलोकतो विमृश्य देवर्षिब्राह्मणा वेदशास्त्रपुराणेतिहासेभ्योधिगतपरमार्था:। क्रतुयजनयाजनशीला: पंक्तिपावना: शरीरान्वयार्हा अत्युत्तमब्राह्मण्यशालिन: ॥ शिष्टानुष्ठितशरीरान्वयार्हाश्चेति सिद्धांतितम् ॥ वयंच ते ब्रुवाणा दोषमत्रार्थे (दोषम् अत्रार्थे) विद्वद्भि: परिशोधिते। विश्वेशद्रोहिणो ब्रह्मघातिनश्च भवंति ते। इतिदिग् ॥" या शेवटच्या शपथेसह या पाचचार ओळी छापतां आल्या नसत्या काय? मग? शाई संपली कीं कागद संपले? काय झालें तरी काय? याच्यावर ज्या अनेक ७५ विद्वानांच्या सह्या आहेत, त्यांत "संमतार्थो गागाभट्टस्य अस्मिन्नर्थे संमतं साम्राज्य पंडितस्य" या प्रमाणें श्री शिवाजी महाराजांनां राज्याभिषेक करणाऱ्या प्रत्यक्ष प्रसिद्ध पंडित गागाभट्ट व दिल्लीदरबारांतील साम्राज्यपंडित यांचीही सही आहे.

बरें, असो; ज्ञानकोशाचा पुष्कळसा मजकूर रा. चितळेभट्टप्रकरणाचें समर्थन करणाऱ्या, राजवाडे यांच्याच लेखाचा अनुवाद आहे. त्याचा यथास्थित ऊहापोह व विवेचन पूर्वी केलेंच असल्यामुळें त्याची येथें पुनरुक्ति करण्याचें मुळींच कारण नाहीं. पण त्याशिवाय ज्ञानकोशकारांनीं दुसरी जी कांहीं माहिती गोळा

केली आहे तिचाहि तिच्या मानानें सत्कारपूर्वक विचार करणें जरूर आहे. इ. सन १९११ सालच्या सेन्सस रिपोर्टमधील्हि कांहीं वाक्यें ज्ञानकोशकारांनीं दिलेलीं आहेत. पण सेन्सस रिपोर्ट व ग्याझेटिअर्स यांतील मजकूर गोळा करणाऱ्या गृहस्थांवर चितळेभटपक्षाच्या कोठें अवशेष राहिलेल्या लोकांचा परिणाम घडलेला आहे असें म्हणावें लागतें. कारण असें जर न म्हणावें तर त्यांना दुसरी बाजू कां दिसली नाहीं ? खरी वस्तुस्थिति काय आहे ती द्यावयाची म्हटलें तर त्यांनी दुसरे बाजूची माहिती कां मिळवूं नये ? आतांपर्यंतच्या इतिहासावरून असेंहि दिसून येतें कीं अशा सर्वमान्य ग्रंथांतून त्याला इष्ट असलेली माहिती साहजिकपणा दाखवून नमूद करून अगर करवून ठेवण्यांत चितळेभट्टाचा एखादा अनुयायी असेना, पण तो मोठा दक्ष असतो. निदान ज्ञानकोशकारांनीं तरी असें करणें मोठी लाजिरवाणी गोष्ट होय. कारण त्यांनां तर दुसरी बाजू पुराव्यानिशीं मांडून दाखवून व समजावूनहि सांगितली होती. असें असूनहि त्यांनी दुसरी बाजू योग्य स्वरूपात मांडू नये याला काय म्हणावें ? किंवा त्यांनां जो मजकूर वाटून ठेवावा असें वाटलें तो त्यांनीं मुद्दाम वाटून ठेविला ? काय म्हणावें तरी. काय ? एखादा यूरोपियन साहेबहि आमच्या इकडल्या तिकडल्या गोष्टीविषयीं कांही लिहीत असतो. पण ती त्याची धाटणी निराळी. देवरुखे ब्राह्मणांत ऋग्वेद व यजुर्वेद हेच दोन वेद असून आज शतकेंच्या शतकें किंबहुना हजारों वर्षें याच दोन वेदाचें ते अध्ययन करीत आले आहेत. अथर्ववेदाचा त्यांनां गंध देखील नाहीं. पण असें असून ज्ञानकोशकार विल्सन साहेबांचें मत मोठ्या आवडीनें छापून ठेवीत आहेत. कोणीं काहीं म्हटलें तरी आपल्याजवळ सारासार विचार पाहिजेच कीं नाही ? विल्सन म्हणतो की, अथर्ववेदाच्या देवर्षि शाखेचा हा वर्ग असावा. असो; त्याच्या इच्छेस येईल तें म्हणून टाकण्यास त्या बिचाऱ्याला वरी मुभा कां नसावी ?

'ते आपल्यास म्हणतात अगर म्हणवितात" 'त्यांचें म्हणणें की,' 'असें असावें', 'सांगतात,' 'म्हणतात' 'पुष्कळ' 'बहुतेक' 'बहुशः' 'मुख्य' असल्या मराठी भाषेंतील शब्दांनीं व शब्दप्रयोगांनीं ज्ञानकोशकारांवर व रा. राजवाडयांवर फार, नव्हे अनंत उपकार करून ठेविले आहेत असें कोणी म्हटल्यास ती अतिशयोक्ति होऊं शकणार नाही. या शब्दांच्या आड जरी ते उभे राहिले आहेत तरी त्यांचें अंतरंग सहजच उघडें पडत आहे. वरील शब्दांनी युक्त अशीं वाक्यें स्वतंत्रपणें वाचून पहावींतच. त्याशिवाय त्यांतील खरा रसस्वाद प्राप्त होणें शक्य नाहीं. आणखी एक दोन गमती सांगतों. "देशस्थांशीं आपला लग्न व्यवहार २५० वर्षांपासून असल्याचें सांगतात" असें एक वाक्य आहे. म्हणजे काय ? पूर्वी कधीं नव्हता व हल्लीं सरसकट आहे असें ज्ञानकोशकार लिहितात. "यांच्यांत पोटजाती नाहींत" म्हणजे काय ?" 'देवरुखे' हे युरोप आफ्रिकेतून चुकतीच येथें येऊन तळ देऊन राहिलेली एखादी पाहुणी अशी स्वतंत्रच जात अगर समाज आहे कीं काय ? ज्ञानकोशकारांची तरी काय कल्पना झाली आहे ?

त्याच्या पुढचें दुसरें वाक्य " हे आपणांस ऋग्वेदीय देशस्थांची पोटजात म्हणवितात " पण हें ऐकावयास ज्ञानकोशकार कोठें गेले होते ! लिहावयास काय पाहिजे तें लिहून छापतां येतें. किं एकदा वहावत सुटलें म्हणजे काय पाहिजे तें लिहून टाकावयाचें ? प्रत्येक ठिकाणी सारासार विचार म्हणून कांहीं असतोच कीं नाहीं? " हे आपणांस ऋग्वेदीय देशस्थांची पोट जात म्हणवितात " या वाक्यानंतर आणखी कांहीं वाक्यें लिहिल्यानंतर ज्ञानकोशकार म्हणतात " हें ऋग्वेदी आश्वलायन व यजुर्वेदी तैत्तिरीय शाखांतर्गत हिरण्यकेशी अशा दोन शाखा यांच्यामध्यें आहेत. " या देवरुख्यामध्यें दोन्ही वेदांच्या शाखेचे लोक आहेत हें जर सिद्ध आहे तर ज्ञानकोशकारांनीं ' हे आपणांस ऋग्वेदीय देशस्थांची पोटजात म्हणवितात' असें वाक्य दिलें आहे त्याचा अर्थ कसा लावावयाचा? किंवा " हे आपणांस म्हणवितात " यांतील " म्हणवितात " या क्रियापदाचा येथें उपयोग केला असल्यामुळें कोशकार सुटत आहेत! पण कोशकारांपाशीं याप्रमाणें म्हणावयास तरी कोण गेला होता हें कळूं शकेल काय ? निदान ज्ञानकोशकारांनीं तरी या वाक्यांची संगति कशी लाविली असेल ती त्यांची त्यांनांच ठाऊक ? असो; या सर्व गोष्टी ज्ञानकोशाच्या ज्ञानभाडारांतच शोभोत.

ज्ञानकोशकारांनीं ' शतप्रश्नकल्पलते ' करितां एक स्वतंत्र प्यारा राखून ठेवून अध्यायप्रश्ननिर्णायक तिच्यांतील त्यांना देवरुखे यांच्या दंतकथेचा जो मुद्दा सांगून ठेवावयाचा होता तो त्यांनीं अगदीं स्पष्ट नमूद करून ठेविला. त्याचबरोबर कै. पंडित विष्णुशास्त्री यांनी लिहिलेल्या ग्रथाचा उल्लेख करणेंहि त्यांना भाग पडलें आहे. पण त्या ग्रंथांचें नुस्तें संपूर्ण नांवहि त्यांच्यानें छापवलें नाही. " पंचद्रविडांतर्गत महाराष्ट्र ब्राह्मणांतील देवरुख्यांविषयीं शास्त्रसंमत विचार " एवढेंच नांव दिलें आहे. पण त्यांच्यापुढें " आणि त्यांजविषयीं खोटया प्रवादांचें खंडन " हें त्या ग्रंथाचें नांव संपूर्ण दिलें असतें तर मांजर आडवें कां गेलें असतें ? " त्यांत देवरुख्यांनां देशस्थ म्हटलें आहे " एवढेंच त्या ग्रंथांविषयीं नमूद करून ठेविलें आहे. पण त्यांतच पंडित विष्णुशास्त्री यांनीं या ' कल्पलते 'चा कर्ता अगदीं सामान्य प्रतीचा, अव्युत्पन्न, इतिहास नभिज्ञ, वृथाजात्याभिमानी व दुरभिमानी कोणी तरी माध्व पुराणिक होता हें सिद्ध केलें आहे. तसेंच त्याच कल्पलतेंतील नायक देवरुख्यांविषयीच्या द्वेषाचा आद्य प्रवर्तक जो चिंतळेभट्ट त्याच्या कृतीचा पुर्ण निषेध केला आहे. इतकेंच नव्हे, तर श्रीमद्भागवतांतील व मनुस्मृतींतील वगैरे धर्मशास्त्रार्थाप्रमाणें उलट हा चिंतळेभट्टच दुराग्रही तामसी, महापापी व अधमाधम व अत्यंत मोठा गुन्हेगार कसा ठरतो व हें त्याचें आचरण किती निंद्य आहे हें साधार सप्रमाण सिद्ध केलें आहे. इतकेंच नव्हे तर इतर महाराष्ट्रीय ब्राह्मणांपेक्षां देवरुखे यांचा दर्जा कोणत्याहि प्रकारें यत्किंचितहि कमी नाहीं असें सिद्ध केलें आहे. एवढा हा चार सहा ओळींचा मजकूर जर रा. राजवाडे यांच्या मजकुरापुढें नमूद करून ठेविला असता तर त्यांत काय बिघडलें असतें ? " शतप्रश्नकल्पतेमध्यें

यांच्या (देवरुख्यांच्या) उत्पत्तीबद्दल एक कथा आहे; तीच सर्वत्र आढळते" या त्यांच्या हृदयवाक्यावर या मजकुरानें कायमचें विरजण पेडल अशी ज्ञानकोशकारांना भीति वाटली कीं काय ? कीं या गोष्टी त्यांना उमगल्याच नाहींत ? " यांचें (देवरुख्यांचें) म्हणणें कीं.....मग परशुरामानें चित्पावनांना निर्माण केलें व देवर्षि ब्राह्मणांना शाप दिला " असें ' कल्पलते ' च्या प्याऱ्यांतच ज्ञानकोशकारांचें एक वाक्य आहे. पण हें वाक्य कोणाचें ? कोण-या देवरुखे इसमानें हा त्यांना शोध लावून दिला ?

सह्याद्रिखंडांत परशुरामानें शाप दिल्याची एक कथा आहे. पण हा शाप कोणाला दिला आहे ? देवर्षींना मुळींच दिलेला नाहीं. परशुरामानें परशुरामक्षेत्र निर्माण केलें. त्यानंतर त्यानें चि पावन ब्राह्मण उत्पन्न केले. शिवाय दुसरीकडूनहि त्यानें कांहीं ब्राह्मण आपल्या क्षेत्रांत आणून ठेविले. यांना सोडून परत जातांना परशुरामानें त्यांना सांगितलें कीं " तुमच्यावर जेव्हां एखादें संकट येईल त्यावेळीं मला हांक मारा म्हणजे मी येईन. " पण या ब्राह्मणांचा या वचनावर विश्वास न बसून परीक्षा पहाण्याकरितां उगाच खोटेपणानें धांवा केला. हा धांवा ऐकून परशुराम तेथें आला आणि पहातों तों निराळाच प्रकार ! यावर परशुरामाला क्रोध आला आणि त्यानें उत्पन्न केलेल्या व येथें आणून ठेविलेल्या ब्राह्मणांना शाप दिला. असा हा शापाचा खरा प्रकार व खरा प्रसंग सह्याद्रिखंडांत वर्णिला आहे. परशुरामानें कोणकोणत्या ब्राह्मणांना शाप दिला त्या ब्राह्मणांची यादी दिली आहे. पण त्यांत देवर्षि ब्राह्मणांचा कोण याहि प्रकारचा उल्लेख अगर संबंध आलेला नाहीं. उलट त्याच्या वडिलाच्या श्राद्धास देवर्षि ब्राह्मणांना क्षण दिला असतां ते गेले नाहींत. व अत्यंत पवित्र ब्राह्मण क्षणाला बसूं इच्छित नाहींत ही परंपरा अद्यापहि चालू आहे हें निराळें सांगावयास नकोच. नंतर परशुरामानें चि-पावनांना उत्पन्न केलें; पण तो या देवर्षि ब्राह्मणांना शाप देऊं शकला नाही असेंच म्हणणें भाग पडेल.यावरून हेंहि सिद्ध होतं आहे कीं,परशुरामानें हें चि:पावन ब्राह्मण उत्पन्न करण्यापूर्वीच सह्याद्रीमध्यें देवर्षींचा निवास होता.

पुराणांतून व संस्कृतांत देवरुखे यांनां देवर्षि म्हटलें आहे. त्याचप्रमाणें परंपरागत चालत आलेल्या ज्ञानाला व समजुतीला अनुसरून थेट श्रीकाशीक्षेत्रांपर्यंत यांनां देवर्षींच म्हणत आलेले आहेत. तर मग असें असतां देवरुखे हे देवराष्ट्रांतून कोंकणांत सुमारें शके ४५० च्या सुमारास आलें असें जें रा. रा. राजवाडे म्हणतात त्याचा अन्वयार्थ कसा लावावयाचा ? सोपारें येथील चिटोऱ्याचा धागा धरून रा. राजवाडे या तर्कज्ञानांत शिरत आहेत. पण या चिटोऱ्यांतील श्लोक व ' देवर्षि ऊर्फ देवरुखे यांचा अर्थाअर्थीं कोणत्याच प्रकारचा संबंध येत नाहीं हें सिद्ध झाल्यावर रा. राजवाडे यांच्या मताला मुळींच जागा उरत नाहीं हें सिद्धच होत आहे. त्याचप्रमाणें ज्ञानकोशांत एक वाक्य आहे तें असें. " यांचें (म्हणजे कोणत्या इसमांचें ?) म्हणणें कीं, या ब्राह्मण नां क्षण दिला असतां हें गेले नाहींत म्हणून

मग त्यानें (परशुरामानें) चित्पावनांना निर्माण केलें, व देवर्षि ब्राह्मणांना शाप दिला " तेव्हां या वाक्यालाहि सह्याद्रिखंडांत मुळींच आधार मिळूं शकत नाहीं व त्यामुळें तें अगदींच विसंगत आहे असें म्हणणें भाग आहे.

रा. राजवाडे यांनीं आपल्या लेखांत जो आवाज काढला आहे त्याचाच प्रतिध्वनि ज्ञानकोशकारांनीं आपल्या कोशांत उमटविलेला आहे. रा. राजवाडे म्हणतात " सध्यां मुंबईतील बहुतेक खानावळी देवरुख्यांनीं चालविलेल्या आहेत व त्यांत सर्व तऱ्हेचे ब्राह्मण जेवतात तेव्हां मुंबईटापूंत पंक्तिपावनत्वाचा प्रश्न राहिलेला नाहीं. " म्हणजे काय ? मुंबई बाहेरच्या टापूंत सध्यां हा प्रश्न आढळून येतो की काय ? मुंबईचा टांपू हा कोंकणच्या लगत असल्याकारणानें तेथें कांहीं देवरुख्यांच्या खानावळी असणें साहाजिकच आहे. पण खुद्द मुंबईत अगर मुंबईबाहेर पुण्यासारख्या शहरांत ज्या खाणावळी अगर जेंवणाच्या अन्य मोठमोठया संस्था आहेत त्या बहुतेक चित्पावन ऊर्फ कोंकणस्थ यांच्याच आहेत, थोडया बहुत देशस्थांच्या आहेत त्यांतहि पुष्कळ ' देवरुखे ' जेवीत असतात. पण तेथें हा प्रश्न आमच्या संशोधकांना आढळून येतो काय ? शिवाय घांटावर देशांतदेखील अनेक खेडयापाडयांत अगर सातारा, नाशिक, धुळे, जळगांव असल्या शहरांत पुष्कळ देवरुखे आहेत तेथून तरी या प्रश्नाचा वास आमच्या संशोधकांनां येत आहे काय ? आमचे संशोधक पुढें म्हणतात " कोंकणांतहि (मागील वाक्यांतील ' सध्यां ') बहुतेक लोक ह्या जातीशीं अन्नव्यवहार करितात " म्हणजे पूर्वी करीत नव्हते कीं काय ? किंवा हल्ली चितळेभट्टाच्या अवशेष राहिलेल्या पक्षांतील उरलेला दहा हजारांत एकदा करीत नसेल तर तो आमच्या संशोधकांच्या मतें शहाणा कीं समंजस ? यांच्यापुढें संशोधकांचें दुसरें वाक्य असें. " तेव्हां पांक्तिपावनत्वाच्या प्रश्नांत आतां कांहीं म्हणण्यासारखें तथ्य राहिलें नाहीं. " म्हणजे पूर्वी तरी हा प्रश्न संशोधकांच्या ' तथ्यानें ' अगदीं थबथबलेला होता की काय ? बरें; आतां एक या प्रश्नांत म्हणण्यासारखें तथ्य राहिलें नसेल; पण समजा कीं चितळेभट्टाचा एखादा छोटासा अवतार आज पुनः अवतरला तर त्याच्या बावटयाखालीं आपल्या गणांसह येऊन उभें रहाण्यास संशोधक व त्यांचीच ' री ' ओढणारी ज्ञानकोशसंपादक मंडळी तयार होईल काय ?

" गरीब विद्यार्थ्यांकरितां अलीकडे यांनीं कांहीं फंड काढले आहेत " ही एक गोष्ट कोशांत नमूद करून ठेविलेली आहे. पण यांत कोणतें स्वारस्य कोशकारांनां वाटलें ? फंड काढणें, सभा काढणें, अगर संस्था काढणें म्हणजे संघटनेचाच एक प्रकार आहे. भोंवतालच्या लोकांची उपाधी अगर जुल्मबजा त्रास होऊं लागला म्हणजे त्याला प्रत्याघात अगर प्रतिक्रिया अथवा स्वसंरक्षण म्हणून अशा संस्था निघत असतात. ब्राह्मण ब्राह्मणेतर हा वाद उपस्थित होऊन ब्राह्मणांनां जेव्हां आंच लागूं लागली तेव्हां ब्राह्मण्यसंरक्षक परिषद अस्तित्वांत नाहीं काय आली ? पुण्यास ब्राह्मण विद्यार्थी साहाय्यक मंडळ पुणें, अशी एक संस्था सुमारें सन

१९१२—१३ सालीं अस्तित्वांत आली होती. तथेंच ऋग्वेदी देशस्थांच्या गरीब विद्यार्थ्यांनां साह्य करण्याकरितां अशीच एक नुकतीच संस्था स्थापन झालेली आहे. अशीं एक ना दोन किती तरी उदाहरणें दाखवून देतां येतील. हल्लीं हिंदुसंघटना-विषयीं आम्ही फार आतुर झालों आहों. सारांश, असल्या संघटनाच्या म्हणून ज्या ज्या संस्था निघतात त्यांची पूर्वपीठिका अगर त्यांविषयीं सर्वसामान्य नियम अशाच प्रकारचा असतो. पुण्यास नुकतीच गेल्या जानेवारींत ब्राह्मणांचें संघटन करण्याच्या उद्देशानें एक महाराष्ट्र—ब्राह्मण—सभा म्हणून निघालेली आहे त्याचा तरी अर्थ काय ? हाच.

" कुलाबा जिल्ह्यांत दहिवली येथील विठ्ठलदेवाचें एक संस्थान या जातीच्या पंचायतीच्या मालकीचें आहे. गरीब विद्यार्थ्यांकरितां अलीकडे यांनीं कांहीं फंड काढले आहेत. पूर्वी यांच्यांत पंचायती होत्या, सांप्रत नाहींत. यांच्यांत पोटजाती नाहींत. हे आपणांस ऋग्वेदीय देशस्थांची पोटजात म्हणवितात. आणि देशस्थांशीं आपला लग्नव्यवहार २५० वर्षांपासून असल्याचें सांगतात यांचा धर्मविधि देवरुखे भिक्षुकांकरवींच बहुशः होतो. हे अपांक्त नाहींत याबद्दल निरनिराळ्या ठिकाणच्या धर्मसभेचीं व अधिकाऱ्यांचीं आज्ञापत्रें (नकला) पहाण्यांत येतात. तसेंच देशस्थ व देवरुखे या दोघांच्या कुलस्वामीमध्येंहि बरेंच साम्य आहे. तुळजापुर व कोल्हापुर येथील देवी, जेजुरीचा खंडोबा हे यांचे मुख्य देव आहेत. " अशीं अनेक वाक्यें ज्ञानकोशकारांनीं लिहिलेलीं आहेत. म्हणजे पण याचा अर्थ काय ? आणि हेतु तरी काय ? म्हणजे ही अगदीं कांहीं तरी आपली एक जात आहे काय ? म्हणजे हिच्यांत उच्च ज्ञान नाहीं, उच्च उपासना नाहीं, उच्च कर्में नाहींत असें ? गणपति, शंकर, विठोबा, राम, श्रीदत्त वगैरे देवतांचीं किती तरी मंदिरें आपल्या उपास्याच्या भक्तिप्रेमामुळें या लोकांनीं उभारलेलीं आहेत. याची काय वार्ता ज्ञानकोशकारांनां लागलीच नसेल ? नाहीं म्हणावें तर इतर गोष्टी यांनां कशा आढळल्या ? व त्यां विपरीत स्वरूपांत देतां आल्या ? कीं चांगल्या वार्ता मुद्दाम लावूनच घेतल्या नसतील ? की लागल्या असून सुद्धां दिल्या नसतील ? यांचा मुख्य देव जेजूरीचा खंडोबा आहे असें ज्ञानकोशकार उल्लेखितात. पण या देवतेचीं कितीशीं देवळें देवरुख्यांनीं बांधलेलीं ज्ञानकोशकारांनां आढळलीं आहेत ? अगर जेजूरी येथील देवतेस कितीशा देणग्या भाविक देवरुख्यांनीं दिलेल्या ज्ञानकोशकारांस आढळल्या आहेत ? किंवा कितीशा देवरुख्यांनीं येथील यात्रा केलेल्या आहेत ? म्हणूनच आम्ही म्हणतों की हा मजकूर लिहून झाल्यावर त्यांनां छापावयाचाच होता तर देवरुखे समाजांतील एकदोन, सज्जन, शहाण्या व सुशिक्षित गृहस्थांनां दाखवून मग तरी छापावयास पाहिजे होता. याकरितांच, आम्ही या लेखाच्या आरंभीं दास, दांगट, दुबळे, दैवांग, दैवज्ञ वगैरेंच्या वर्णनाचे मासले दाखविले आहेत. त्यां वर्णनाबरोबरच हें वरील प्रमाणें दिलेलें ' देवरुखे ' यांचें वर्णनहि वाचून पहावें म्हणजे 'ज्ञानकोशकारां'विषयीं लिहितांना प्रारंभी जो आम्ही एवढा उपोद्घात केला आहे त्यांतील मर्म काय

आहे हें त्यांनीं येईल. शेवटचा प्यारा त्यांनां लिहावयाचा होता तर तो पूर्ण करतांना अंताजी दामोदर शितुत कीं ज्याचें वजन व महत्त्व शिंद्याच्या दरबारांत इतकें वाढलें कीं त्यांनीं त्याला आपल्या नांवाचें नाणेंहि पाडूं दिलें; इतकेंच नव्हे; तर हा अंतुशाही रुपया अजूनहि प्रचारांत चालू असल्याचें ऐकतों. त्या अंताजीपंताचें नांव ज्ञानकोशकारांनां दिसलेंच नाहीं? अशा एक की दोन किती गोष्टी सांगाव्यात? त्यांच्या लेखांतील प्रत्येक वाक्य, त्यांतील शब्द, त्यांची जुळवणी यावरून ज्ञानकोशकारांचें अंतरंग उघडें होत आहे. असो; आतां कोठवर लिहावें? एवढ्या ऊहापोहावरून व विवेचनावरून संशोधक राजवाडे व ज्ञानकोशकार यांचा रोखझोंक, कल कसा झुकतो आहे हें सहज कळून येण्यासारखें आहे. परमेश्वर त्यांचें भलें करो!!! (चितळे भट प्रकरण).

आमच्यावर जे आक्षेप घेतले गेले ते कितपत योग्य आहेत हें दाखविण्यासाठीं पिंपुटकरांनीं तारीफ केलेल्या मांदुसकरांनीं पुरविलेल्या माहितीकडे लक्ष दिलें पाहिजे.

महाराष्ट्रीय ज्ञानकोशकारांनीं सर्व ज्ञातींच्या पुढाऱ्यांस केलेल्या विनंतीस अनुसरून देवरुखे जातींतील रा. मांदुसकर यांजकडून पुढील माहिती आली होती, व तिच्या आधारावरच ज्ञानकोशांतील लेख तयार केला होता तीं याठिकाणीं प्रश्नानुक्रमानें देत आहों:—

रा. मांदुसकरांनीं ज्ञानकोशाला पुरविलेली माहिती.

१ (अ) सन १८९१ सालच्या खानेसुमारीप्रमाणें पुरुष ३६८५+स्त्रिया ३३९९ मिळून केवळ मुंबई इलाख्यांत ७०८४ एकूण लोकसंख्या. या शिवाय माळवा (इंदूर, ग्वालेर संस्थानें), कर्नाटक वगैरे प्रांतांत सुमारें २००० मिळून सुमारें ९।१० हजार वस्ती सन १८९१ सालीं होती:—

खानेसुमारीचे रिपोर्टांत 'देवरुषी' म्हणून एक वर्ग दाखल केलेला आहे; त्यांची लोकसंख्याहि सुमारानें वरील आंकड्याइतकीच आहे. तो वर्ग आमचे समाजांतील आहे किंवा वेगळा आहे हें मला निश्चित माहीत नाहीं.

(ब) जातीचें मुख्य वसस्थान, रत्नागिरी जिल्ह्यांत फुणगूसचे खाडीचे दोन्ही तीरांवर,(रत्नागिरी, चिपळूण, संगमेश्वर ह्या तीन तालुक्यांत)सुमारें ९० गांवें आहे. व एकंदर लोकसंख्येचा जवळ जवळ निम्मे भाग सांप्रत या गांवीं आहे.

तसेंच उंबरगांव, जिल्हा ठाणें येथें, आजूबाजूचीं सात गांवें येथें आमचे देवरुखे लोकांची वसती आह. तेथील लोकसंख्या सुमोर १५००-२००० असावी.

२ पूर्वी कोंकणप्रांतीं गांवोंगांवीं पंचायती होत्या असें सांगतात, पण सांप्रत कोठेंहि नाहींत. सर्वसामान्य पंचायत अर्थात नाहीं.

३ पूर्वीच्या पंचायतीचे अध्यक्ष विवक्षित घराण्यांतलेच निवडीत. प्रसंग विशेषीं अगदीं तिऱ्हाईत अध्यक्ष निवडीत असे वृद्ध लोक सांगतात. इतर ब्राम्हण जातींच्या पंचांनींही निवाडे दिलेले आहेत.

४ जातीची अशीं विवक्षित देवळें नाहींत. जातींतील गृहस्थांनीं बांधलेलीं; उत्सव वगैरे ज्ञातींतलेच गृहस्थ करीत आहेत अशीं देवळें आहेत. त्यांस सरकारी व इतर खाजगी गृहस्थांकडून देणग्या वगैरे आहेत. त्यांची वहिवाट देऊळ बांधणारांचे वंशाकडे आहे. कांहीं ठिकाणीं अशा मिळकतीची व्यवस्था लोकानियुक्त मंडळींचे हातीं आहे उ. दहीवली, तालुके कर्जत, जिल्हा कुलाबा येथील श्री विठ्ठल देवाची मिळकत लोकनियुक्त सभेचे हातीं आहे. अशा मिळकतीची किंमत अजमासें १०।१५ हजार रुपये पर्यंत होईल.

जातीचे मालकीचीं घरें, चाळी वगैरे नाहींत.

५ जातीचा विवक्षित कर नाहीं. पण कांहीं गांवांत लग्नकार्यांत ऐपतीप्रमाणें कमींतकमी १। रु. पासून २५ रु. पर्यंत सार्वजनिक कामाकडे घेतात. या पैशांतून गांवांतील देवळें, धर्मशाळा यांची दुरुस्ती व अनाथेप्रतसंस्कार करण्याची वहिवाट आहे.

अलीकडे उंबरगांव प्रांतीं अशा कार्यांत नारळफंड म्हणून वसूल करतात. त्याचा उपयोग गरीब विद्यार्थी (अर्थात जातींतले) यांस मदत देण्याचे कामीं करतात.

६ पूर्वी पंचायती होत्या तेव्हां त्याचे निवाडे लिहून ठेवण्याची वहिवाट होती. असे निवाडे रत्नागिरी जिल्ह्यांतल्या कांहीं गांवीं विशेषतः राई, जांबरूण, नरवण या गांवीं कांहीं आढळले. गेल्या ५० वर्षांतले लिहिल्याचें आढळले नाहींत त्या पूर्वीचे आहेत.

७ पंचायतीचे नियम अमलांत आणण्यासाठीं अन्नोदकव्यवहार बंद ठेवण्याची चाल होती.

८ सरकारी मंजुरी मिळालेली नव्हती अशी मंजुरी मिळविण्याचें कारणहि पडत नसावेसें दिसतें.

९ मागील पंचायतीचे निकाल पाहतां देवादिकांस दिलेल्या सार्वजनिक पैशाचा अपहार केल्यावरून, शूद्रादिकांशीं अन्नोदकव्यवहार केल्यावरून, अतिशूद्रादिक स्त्रियांशीं पापमूलक संबंध केल्यावरून, शासन करण्यासाठीं पंचायतीपुढें प्रश्न येत; व पंच उभय पक्षाच्या लेखी कैफीयती, साक्षी पुरावा पाहून निकाल देत.

सार्वजनिक पैशाच्या अपहाराबद्दल, सर्व नुकसानभरपाईशिवाय कांहीं ठरीव दंड, अगर ठरीव कालमर्यादेपर्यंत, ठरीव हत्ते दंड घेत.

इतर गुन्ह्यास सक्षौर प्रायश्चित अगर जातिबहिष्कृति हीं शासनें असत. याशिवाय क्षुल्लक गुन्ह्याबद्दल अमुक देवावर अमुक अभिषेक करावा अशा प्रकारेंहि शासनें करीत असल्याचें दिसतें.

आजपर्यंतच्या प्रश्नापैकीं बहुतेक सार्वजनिक मिळकतीचा अपहार, गांवकीनें ठरविलेले देवादिकांचे संबंधीं नियम मोडणें हेच प्रश्न पंचायतीपुढें आलेले दिसतात. क्वचित् शूद्रादिकांच्या हातचें अन्नोदक ग्रहण केल्याबद्दल तक्रारी, व फारच तुरळक (फक्त एकदांच) अतिशूद्रादिकाशीं अनीतिसंबंध वगैरेबद्दल दिसतात.

१० देशस्थ (ऋग्वेदीय व यजुर्वेदीय) कोंकणस्थ (चित्पावन),कऱ्हाड वगैरे.

११ या वरील सर्व जातीशीं अन्नोदकव्यवहार होतो.

१२ आमच्या जातीच्या पोटजाती नाहींत. पण आमचीं देवरुखे जातच ऋग्वेदीय देशस्थाची पोटजात आहे असें दिसतें व तसें मानण्याची कित्येकांची प्रवृत्ति आहे.

ऋग्वेदीय देशस्थांशीं कमींतकमी २६० वर्षांपासून तों आतांपर्यंत बरेच शरीरसंबंध झालेले आहेत. तुरळक कऱ्हाडे, व कोंकणस्थ (चित्पावन) यांच्याशीं झाल्याचे दाखले आहेत. सोबत पाठविलेल्या कागदांत (येथें छापलें नाहींत) हवा तितका पुरावा आहे)

१३ आमच्या जातींत होतां होईतों आमच्या देवरुखे जातीचेच भिक्षुक विवाहादि संस्कार करतात त्यांचे अभावीं, देशस्थ (ऋग्वेदीय), कऱ्हाडे अगर कोंकणस्थ (चित्पावन) भिक्षुकहि विवाहादि संस्कार करतात.

१४ देशस्थ, कोंकणस्थ व कऱ्हाडे या जातींतल्या प्रमाणेंच या प्रश्नांतल्या मुद्यांचा निकाल होतो.

१५ चातुर्वण्यव्यवस्थेंत जातीचें स्थान (पंचद्राविडान्तर्गत महाराष्ट्र ब्राह्मणा-पैकीं) षट्कर्माधिकारी ब्राह्मण हें आहे;व हेंच ज्ञातीचें म्हणणें आहे.पण रत्नागिरी प्रान्तस्थ चित्पावनांस हें मात्र म्हणणें मान्य नसावें असें सोबतच्या (येथें छापलीं नाहींत) निरनिराळ्या काळच्या पत्रावरून दिसतें.

यास्तव त्या प्रांतातल्या चित्पावन व त्यांचेच कक्षेंतले कऱ्हाडे यांशिवाय सर्व आर्यावर्तांत त्या सर्व ज्ञातींनां आमचेंच मत सर्वमान्य असल्याचें त्या त्या काळच्या संमत पत्रांवरून व राजांचे हुकुमावरून दिसतें. या बाबत (१) शके १५०५ सालचें श्रीक्षेत्र काशी येथील ब्राम्हण सभेचें पत्र (मराठी). या पत्रांत उल्लेखिलेले ताम्रपट मात्र माझ्या पाहाण्यांत नाहीत. (२) शके १५७९ सालचें श्रीक्षेत्र काशी येथील मुक्तिमंडपसभेचें समपत्र (संस्कृत) ७५ सह्यानिशी. (३) शके १६०५ सालचें काशींतलें ब्राम्हणभोजन संबंधीं पत्र

सह्यानिशीं. (४) शके १६४९ सालचें पत्र. यांत पैठण, द्वारका, त्र्यंबक, रामेश्वर मथुरा, काशी वगैरे ठिकाणच्या महाराष्ट्र ब्राम्हणांचीं संमतें आहेत. याशिवाय यांत आणखीहि कांहीं क्षेत्रस्थांचे निरनिराळ्या काळचे निवाड्यांचे उल्लेख आहेत. (५) शके १६९६ सालचें गागाभट्ट व्यास पैठणकर यांचें पत्र. (६) सुमारें वीस वर्षांपूर्वी सातारा येथें श्रीमच्छंकराचार्य संकेश्वर मठ यांचे अध्यक्षतेखालीं देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे, देवरुखे या महाराष्ट्र ब्राह्मणांत बेटी व्यवहार होण्यास हरकत नाहीं अशा अर्थाचा झालेला ठराव. त्यास अनुसरून सन १९१४ सालीं लिमये (चित्पावन) व देवधेकर (देवरुखे) यांचा झालेला विवाह (ता. १२–५-१४ चा केसरी पहा.) यासंबंधी केसरी लिहितो "अभिनंदनीय विवाह–येथील रहिवासी रावसाहेब वासुदेव सदाशिव बापट, माजी कमिशनर बडोदें, यांची भाची (रा. हरि चिंतामण लिमये रहाणार गोळप यांची कन्या) आणि रा. नारायण दामोदर देवधेकर बी. ए. राहणार उंबरगांव यांचा विवाह काल रोजीं पुण्यास रा. सा. बापट यांचे हस्ते झाला. रा. देवधेकर हे देवरुखे व लिमये हे कोंकणस्थ असल्यामुळें सदर विवाह हें पोटजातींतील विवाहाचें एक उदाहरण होय. म्हणूनच आम्ही त्यास अभिनंदनीय म्हटलें आहे. ब्राह्मणान्तर्गत पोटभेदांतील विवाह पूर्णपणें सशास्त्र असून फक्त रूढीमुळें ते आजवर निषिद्ध मानण्यांत आलें आहेत. अर्थात् ते फिरून प्रचारांत आणण्यांतच सामाजिक हित आहे."

१६ जातीचे प्रकरणीं कागद श्रीक्षेत्र काशी वगैरे सर्व क्षेत्रीं क्षेत्रोपाध्याकडे आहेत असें कळतें. तुरळक तुरळक कोठें कोठें जुन्या घराण्यांतून आढळतात. रत्नागिरी जिल्ह्यांत, नरवण जांवरूण, निवेंडी वगैरे गांवीं असे कागद आहेत. श्रीकाशी येथें क्षेत्रोपाध्याय वे. शा. सं. रामडोहोकर रामघाट, यांचें घरीं दप्तर आहे असें वे. शा. सिताराम भटजी रामडोहोकर कळवितात. तसेंच उज्जनी येथें रा. शितूत यांकडे व बडनरे (शिंदेशाही) येथें रा. करोडे यांचेकडे दप्तर असल्याचें कळतें. उंबरगांवी श्री. महादेवराव पाटील पिंपुटकर यांचेकडे चरेंच मोठें दप्तर आहे असें ते म्हणतात. मी समक्ष पाहिलें नाहीं.

१७ जातीच्या इतिहासासंबंधीं दंतकथा विशेषशा नाहींत फक्त 'शतप्रश्नकल्पलता' नामक पुस्तकांत अध्याय १ प्रश्न ९ यांत देवरुखे यांचे उत्पत्तीबद्दल एक कथा सांगितली आहे. त्या कथेस अनुसरूनच एक दंतकथा प्रचलित आहे व तिचाच उल्लेख आहे. ती दंतकथा सारांशरूपानें अशी:—रत्नागिरीजवळ निवेंडी नामक गांवाजवळ (बसणी) एक चित्पावन ब्राह्मण तळें खणण्याचें काम करीत होता. त्याचा नियम असा कीं त्यामार्गें जो कोणी जाईल त्यानें एक पाटी माती तळ्याबाहेर टाकावी. कांहीं दिवसांनीं देवरुख प्रांताकडील कांही ब्राह्मण मंडळी तेथें आली त्यांस सदर चित्पावनानें तळ्याबाहेर माती खणून टाकण्यास सांगितलें. त्यांनीं तें शूद्रकर्म म्हणून नाकारलें. त्यावरून त्या चित्पावनानें त्यांस शाप दिला कीं "जे कोणी तुमचें पंक्तीस जेवतील त्यास सहा महिने दारिद्र्य येईल." याच दंतकथेचा अनुवाद

थोड्या फार फरकानें सर्वत्र आढळतो. याच आधारावर रत्नागिरी प्रांतस्थ चित्पावन व देवरुखे यांचा आज कित्येक वर्षें वाद आहे व एकमेक एकमेकांस अपांक्त लेखीत आहेत !

अन्येपि देवराष्ट्रीया देवराष्ट्रादुपागताः ।
अपांक्तेया अयाज्याश्च गिरिकांतारवासिनः ॥
उदीच्याः कान्यकुब्जाश्च नागराश्चित्तपावनाः ।
पयोष्णीतीरसंस्थाश्च सर्वे ते पंक्तिदूषकाः ॥

हा श्लोक सह्याद्रिखंडांत आहे (तो मूळचा तेथील आहे कीं प्राक्षिप्त आहे याबद्दल वाद आहे). यांतले देवराष्ट्रीय हेच देवरुखे असेंही कित्येकांनीं वादांत ध्वनित केलें व देवरुख्यांस दूर सारण्याचा प्रयत्न केलेला कागदपत्रांवरून दिसतो पण " देवरुखे " हा " देवर्षि " या शब्दाचा अपभ्रंश आहे हें उघड आहे. " देवराष्ट्राः " व " देवर्षयः " हे भिन्न आहेत असें नागरखंडांतल्या उताऱ्यावरून व इतर कागदपत्रांवरून दिसतें.

करवीर क्षेत्रापासून समुद्रापर्यंतच्या प्रदेशांतल्या अनेक नामापूर्वीं ' देव ' हा शब्द लावलेला आहे, उदाहरणार्थः देवगड, देवडोंगर, देवनदी वगैरे. त्या प्रमाणेंच त्या प्रांतांत राहणारे कोणी ' ऋषि ' नामक ब्राह्मणांस ' देवर्षि ' हें नांव पडलें असावें व तेच देवरुख्यांचें मूळ पूर्वज होत. या करवीर क्षेत्रांत व त्यांतच असलेल्या सह्याद्रीच्या भागीं ऋषि लोकांची वस्ती होती याबाबत

"तत्क्षेत्रे (करवीर क्षेत्रे) ऋषयः सर्वे ब्राह्मणा वेदपारगाः ।
तेषां दर्शनमात्रेण सर्वपापक्षयोभवेत् ॥
ततः सह्याद्रि शिखरमदूरे दृष्टवान् मुनिः ।
दिव्यौषधि तपोनिष्ठैर्मल्लासिद्धे महर्षिभिः ॥(हरिवंश पुराण अध्याय ४०).
क्रमादागत्य चाद्राक्षीत्सह्यं पर्वतमुत्तमम् ।
नानागमतपोनिष्ठैर्मंत्रासिद्धैर्महर्षिभिः ॥ (परशुरामक्षेत्रोत्पत्ति सह्याद्रिखंड)

इत्यादि पुराणांतरीचे उतारे अनेक आहेत. तसेच देवर्षि हे फार प्राचीन काळचे म्हणजे ज्यावेळीं आर्यलोकांत जातीं प्रचारांत आल्या नव्हत्या त्यावेळचे लोक होत असे ' लोकहितवादी ' आपल्या ऐतिहासिक गोष्टींत म्हणतात. (ऐ. गोष्टी भा. ३ नासिकवृत्त छा. छा. पृ. ३८)

डॉ. विल्सन आपल्या ' इंडियन कास्टस ' यांतही देवरुखे हे प्राचीन देवर्षींचे अवशेष असावेत असें म्हणतो.

यावरून ' देवरुखे ' म्हणजेच ' देवर्षि ' किंवा करवीर क्षेत्रांतले ऋषि होत. हेच ऋषि पुढें करवीरच्या शृगाल राजाच्या छळानें तेथून निघून परशुराम क्षेत्रांत (कोंकणांत) येऊन राहिले. हे " वेदवेदांगपारगाः " , " दिव्यौषधितपो-

निष्ठाः " होते. असें हरिवंशपुराण व सह्याद्रिखंड वगैरे ग्रंथांत उल्लेखिलें आहे. पुढें परशुराम कोंकणांत आल्यावर त्यानें आपल्या पितृश्राद्ध तिथीस " श्राद्धार्थं चैव यज्ञार्थं मंत्रिताः सर्व ब्राह्मणाः ॥ नागताऋषयः सर्वे क्रुद्धोऽभूद्भार्गवो मुनिः " असा सह्याद्रिखंडांत चित्पावनांच्या उत्पत्तिप्रकरणीं उल्लेख आहे. यांतील ' ऋषि ' करवीर प्रांतातून या प्रांती आलेलेच ऋषि–देवर्षि होत. तें परशुरामाकडे श्राद्धर्थ गेले नाहींत म्हणूनच रागानें त्यानें ' चित्पावन ' नवीन निर्माण केले. या गोष्टीच्या तात्पर्यार्थाकडे लक्ष देतां ऋषि–देवर्षि कोंकणचे मूळ रहिवासी व चित्पावन मागाहून तेथें आलेले वसाहतवाले होत व त्यामुळेंच या जातींत हर्षामर्ष व तंटे उत्पन्न झाले असावेत. व तेच निरनिराळे काळीं पुढें चालले आहेत-

तेव्हा देवरुखे हे मूळचे ' देशस्थ ' असून ते कोल्हापूरमार्गें कोंकणांत गेले असावेत. हें अन्य पुराव्यांनींही सिद्ध होतें.

(१) देवरुख्यांची बरींच–नव्हे सर्वच उपनामें–गोत्रें देशस्थांत (ऋग्वेदीय) आहेत.

(२) कुलस्वामी–बरेच देशस्थांचे कुलस्वामींशीं समान आहेत. उदा. तुळजापूर–भवानी, कोल्हापूर–अंबाबाई व एकवीरा, जेजूरी–खंडोबा, रत्नेश्वर, तृणबिंदेश्वर, कोटेश्वर, सोमेश्वर हे सर्व देशावरच आहेत व अनेक देशस्थांचे हेच कुलस्वामी आहे.

(३) वर्ण, भाषा, चालीरीति–देशस्थांशीं मिळत्या आहेत.

(४) २६० वर्षांपासून आतांपर्यंत देशस्थांशीं शरीरसंबंध होत आले आहेत. (कै. विष्णु परशुरामशास्त्री पंडित यांनीं " पंचद्राविडान्तर्गत महाराष्ट्र ब्राह्मणांतील देवरुख्यांविषयीं शास्त्रसंमत विचार " नामक पुस्तक सन १८७४ सालीं लिहिलें आहे, त्याची एक प्रत माझे संग्रहीं आहे त्याचीच नक्कल या सोबत आहे. [येथें छापली नाहीं.] त्या पुस्तकांतही देवरुखे हे मूळचे देशस्थ असून ते कोल्हापूर मार्गेंच रत्नागिरी प्रांतांत गेलें असेंच सिद्ध केलें आहे.)

१८ गेल्या तीन चारशें वर्षांत विशेषतः ब्राह्मणी राज्यांत (आदिलशाही व निजामशाही) सरकारी नोकऱ्या, कुलकर्णीपण, देसाई पण पतकरून कित्येक लोक पुनः देशावर धारवाड बेळगांव जिल्ह्यांत आहे.

पुढें मराठेशाहींत, गुजराथ, माळवा, सातारा, पुणें उंबरगांव वगैरे भागांत देवरुखे लोक कारकून, जकाते, वैदिक, शास्त्री वगैरे नात्यानें जाऊन राहिले. महादजी शिंद्यांचे पथकांत अमझारवाले हे एक सरदार होते त्यांस जहागीर होती. तसेंच त्यांचेच पथकांत नागो देवचके हे एक देवरुखे सरदार अहमदाबादेजवळ इंग्रजांबरोबर लढले. या कारणांनीं सर्वत्र पसरले.

१९ इंग्रजी राज्यापूर्वी देवरुख्यांचा आचार इतर महाराष्ट्र ब्राह्मणाप्रमाणेंच होता. त्यांचे प्रमाणेंच आतां त्यांत फरक होत आहे.

२० जातींत पुनर्विवाह नाहींत. जातींतल्या विधवांची व निराश्रित मुलांची व्यवस्था इतर महाराष्ट्र ब्राह्मणांप्रमाणेंच कांहीं विशेष प्रकारें लावलेली नाहीं.

२१ अशी जात बनलेली नाहीं.

२२ अशा प्रकारचें उदाहरणच घडलेलें नाहीं.

आडनांवें, गोत्रें व कुलस्वामी यांच्या याद्या सोबत आहेत. [येथें छापल्या नाहींत]

जातींतील प्रसिद्ध स्त्री पुरुषांचीं चित्रें मिळणें शक्य नाहीं.

स्त्री–पुरुषांचे दागदागिने व पोषाख इतर महाराष्ट्र ब्राह्मणांप्रमाणेंच असल्यामुळें याबद्दल जास्त माहिती देणेची जरूरी नाही.

जातीचा असा फंड नाहीं तरी जातींतील गरीब विद्यार्थ्यांस मदत देण्याचें कामीं आजपर्यंत अनेक संस्था निघाल्या होत्या.

सांप्रत " विद्यामृतपोषक संस्था शाखा नं. १ व २ " व " विद्यार्थी सहायक मंडळ " अशा दोन संस्था आज आहेत. त्यांचे वार्षिक रिपोर्ट प्रसिद्ध होत असतात. पैकीं " विद्यामृत पोषक संस्थेचे १९१६ व १९१७ सालचे रिपोर्ट; व ' विद्यार्थी सहायक मंडळी ' चा १९१६ चा रिपोर्ट पाठविला आहे [येथें छापला नाहीं.]

समारोप

आम्हांस ज्ञानकोशाचे पुरवणीविभाग तयार करावयाचे आहेत, आणि ज्ञानकोशांत ज्या उणीवा असतील त्या भरून काढण्यासाठींच हे विभाग आहेत. ज्यानां कांहीं मजकूर हवा असेल तो त्यांनीं आम्हास कळवावा आणि विस्मृतीमुळें किंवा गैर माहितीमुळें जे दोष उत्पन्न झाले असतील ते दूर व्होवत, ही आमची इच्छा असल्यामुळें देवरुखे मंडळीनां आम्ही असें कळविलें कीं तुमच्या म्हणण्याप्रमाणें जर तुम्हांस मांडणी करावयाची असेल तर आम्ही तुम्हांस सवड देऊं. खरोखर असें दिसून येईल कीं आमच्या मूळच्या लेखांत देवरुखे मंडळीनां राग येण्यासारखें कांहीं एक नाहीं. तथापि तो लेख प्रसिद्ध झाल्यानंतर लोकांनां त्यांत आपला अपमान झाला असें वाटूं लागलें तेव्हां केवळ त्यांच्या समजुतीसाठीं त्यांचें म्हणणें जसें येईल तसें त्यांच्या अधिकाऱ्यांच्या नांवावर व जबाबदारीवर छापण्याचें आम्ही अभिवचन दिलें.

आमच्या अभिवचनापूर्वीच ठाणें, मुंबई या दोन ठिकाणीं ज्ञानकोशासाठीं मजकूर तयार करण्यासाठीं मंडळें स्थापन झालीं. आणि ती दोन्ही मंडळें पुढें एकत्र झालीं आणि त्यांच्या संयुक्त मंडळास आम्ही हें अभिवचन दिलें. तेव्हां असें वाटलें कीं आपलें काम आटोपलें; पण तेवढ्यानें पुरें झालें नाहीं. मजकूर तयार करण्यासाठीं

जी सभासदांची कमेटी नेमण्यांत आली तिच्यामध्यें तीव्र मतभेद उत्पन्न झाला आणि तयार केलेला मजकूर अध्यक्षांना आपलें निर्णायक मत वापरून पास करून घ्यावा लागला. तेव्हां अल्पसंख्याक पक्षानें आम्हांस असें कळविलें कीं तयार झालेला मजकूर आम्हांस मान्य नाहीं. यामुळें आम्ही बहुसंख्याक पक्षास असें कळविलें कीं त्यांची बहुसंख्या या कमेटींत अल्प फरकानें असल्यामुळें मजकूर जितका जास्त लोकांना मान्य होईल तितका चांगला आणि तसें होण्यासारखें असेल तर प्रयत्न करावा. आपल्या पक्षाला अधिक लोकबळ मिळावें म्हणून ज्यांनीं मसुदा तयार केला होता त्यांनीं आपल्या पक्षाला लोकांचें पाठबळ अधिक मिळावें म्हणून खटपट करणें अवश्य होतें आणि त्यांनीं त्याप्रमाणें खटपटहि केली. त्या खटपटीचें दृश्य स्वरूप दाहिवलीची परिषद होय. ज्ञानकोशाची जाहिरात करण्यासाठीं आम्ही देवरुखे मंडळीनां मुद्दाम तंटे वाढवीत आहोंत म्हणून मुंबईच्या एका पत्रानें जो आमच्यावर आरोप केला तोही खरा नाहीं.

दाहिवलीच्या परिषदेंत मुंबईकर अल्पसंख्याक वर्गाचा भाग घेण्याचा विचार होता असें दिसतें. आणि अल्पसंख्याक पक्षानें कांहीं पत्रकें दाहिवलीसच काढली आहेत. त्या पक्षास चोहोंकडून आलेल्या समाजांत आपल्या म्हणण्यास जोर येईल अशी खात्री नव्हती त्यामुळें ती मंडळी त्या परिषदेपासून अलिप्त राहिली आणि त्यांनीं दुसरी एक परिषद मुंबईस भरविली. असें आम्हांस दिसत आहे तथापि अल्पसंख्याक पक्षानें चळवळ बरीच केली आणि आपल्या पाठीमागें लोकबळ हेंच मिळविलें यांत शंका नाहीं.

दोन परिषदा झाल्या त्या परिषदांचें बल भिन्न आहे तरी बरेंच आहे. अशा प्रसंगीं आम्हांस असें वाटलें कीं जर या दोन्ही परिषदांच्या चालकांचीं एकी होऊन मसुदा आला तर चांगलें. आणि यासाठीं मसुदा करून पाठविण्याची संधि आम्हीं त्यांस दिली. तथापि जर दोन्ही पक्षांची एकी झाली नाहीं तर काय करावें हा प्रश्न उपस्थित होतो. आम्हाला एकच मार्ग शिल्लक उरतो तो म्हटला म्हणजे दोन्ही परिषदा भरण्यापूर्वी ठाणें व मुंबई येथिल सभांच्या संयुक्त मंडळाकडून जसें तयार झालें असेल त्याचा स्वीकार करणें, किंवा दोन्ही पक्षांचें म्हणणें पाहून एका पक्षानें पाठविलेला मजकूर मुख्य म्हणून स्वीकारणें व दुसऱ्या पक्षानें सुचविलेल्या फरकांचा टीपांत निर्देश करून मोकळें होणें. या परिस्थितींत संपादकीय निश्चय झाला तो येणेंप्रमाणें:—

दोन्ही परिषदांच्या प्रतिनिधींची तडजोड होऊन दोघांस संमत असलेला असा मसुदा आला तर त्याचा स्वीकार करण्यांत येईल. जर तसा झाला नाही तर

दाहिवली परिषदेच्या प्रतिनिधींचा मसुदा मान्य करण्यांत येईल. आणि अल्पसंख्याकांची परिषद जी मुंबईस भरली तिच्या इच्छेस मान देण्यासाठीं जे माहितीच्या स्वरूपाचे आक्षेप आहेत त्या आक्षेपांस टीपेमध्यें स्थान दिलें जाईल. या संपादकीय निश्चयाची प्रत दोन्ही पक्षांच्या प्रतिनिधींकडे पाठवावी.

या पूर्वोक्त विवेचनावरून असें दिसून येईल कीं या ज्ञातीच्या बाबतींत आमचा दुराग्रह कोणताच नव्हता, आणि आम्ही केलेलीं विधानें त्या ज्ञातीनें पाठविलेल्या साहित्यावरूनच केली होती.

गोवर्धन ब्राह्मणप्रकरण

ज्ञानकोशकारांनीं आपणांस अन्याय केला म्हणून ज्या हिंदु ज्ञातीनें सपाटुन चळवळ केली, अशी ज्ञाति म्हटली म्हणजे गोवर्धन ब्राह्मणांची होय. त्यांनीं जी टीका केली त्या टीकेला आम्ही उत्तरहि दिलें आहे.मुख्य गोष्ट अशी आहे कीं आमच्यावर तुटून पडणारे गोवर्धन ब्राह्मण ज्ञातींतील खटपट करणारे (रा. देवराव नाईक इत्यादि मंडळी) आपले मित्र कोण आहेत हें ओळखीनासे झाले आहेत. गोवर्धन ब्राह्मणासंबंधानें विचार करतां स्वतःची वृत्ति पहिल्यापासून अनुकूल नव्हती हें आम्हांस सरळपणें मांडलें पाहिजे. आम्हांस प्रथम असें वाटलें कीं नागपूरकडे विदुर किंवा कृष्णपक्षी लोक (ब्राह्मणांची कुणबिणीपासून झालेली प्रजा) आज आपणांस पाराशर "ब्राह्मण" म्हणवून घेत आहेत त्याप्रमाणेंच विधवांची व्यभिचारामुळें झालेली संतति "गोळक" हें लोकपरिचित नांव झुगारून देऊन "गोवर्धन ब्राह्मण" म्हणवून घेऊं लागली असावी. गोवर्धन हे गोळक म्हणजे व्यभिचारसंतति आहेत अशी केवळ आमचीच समजूत आहे असें नाहीं तर खुद्द गोवर्धनांचीहि तशी समजूत होती व अजूनही असेल. त्यांनीं जे आपल्या तर्फेचे पुरावे दिले आहेत किंवा पुस्तकें लिहिलीं आहेत त्यांत व्यभिचारोत्पन्न मनुष्य, आईबाप ब्राम्हण असल्यास ब्राह्मणच होतो अशा अर्थाचें लिहिलें आहे आणि कित्येकांस गोवर्धन हें नांव पसंत नाहीं असें दाखविणारे लेखहि आहेत. आज आमचा हा गोवर्धनांच्या व्यभिचारोत्पत्तीचा समज दूर झाला आहे आणि कोंकणस्थ देशस्थांप्रमाणें गोवर्धन ही एक महाराष्ट्रीय ब्राह्मणांतील पोटजात आहे असें आमचें मत झालें आहे.

यासंबंधानें ज्ञानकोशांत जो लेख लिहिला होता तो लेख त्या ज्ञातीचें म्हणणें ऐकून आणि मुद्दाम चौकशी करून लिहिला होता. त्यासंबंधानें जी चौकशी झाली ती. प्रथम ११।२।२२ रोजीं झाली त्याप्रसंगीं गोवर्धनांपैकीं खालील मंडळी हजर होती.

१ रा. राजाराम केशव ऋषी, २ रा. देवराव विष्णु नाईक, ३ रा. त्रिंबक विष्णु धर्माधिकारी, ४ रा. पांडुरंग भास्कर शास्त्री,५ रा.शिवराम रामचंद्र बिवलकर, ६ रा. हरी विष्णु, ७ रा. गणेश नारायण पानसरे, ८ रा. शंकर गोपाळ वड, णगेकर, ९ रा. विनायक रामचंद्र मरवी, १० रा. श्रीपाद केशव महाजन, ११ रा. श्रीधर गणेश जोशी, १२ रा. सिताराम जोशी, १३ रा. भगवंत भाऊ जोशी, १४ रा. दत्तात्रेय कृष्ण व्यवहारे, १५ रा. महादेव नारायण देव, १६ रा.शंकर बाळकृष्ण पिंगळे, १७ रा. विठ्ठल महादेव टापरे, १९ रा. नामदेव केशव कुवर, १९ रा. केशव नरहरी घवी, २० रा. हरी गणेश कुलकर्णी, २१ रा. रामचंद्र बळवंत कावळे परळी, २२ रा. गजानन गोपाळ देव, २३ रा. पांडुरंग चिंतामण, २४ रा. पुरुषोत्तम रंगनाथ टापरे, २५ रा. केशव भिकाजी चावरे, २६ रा. महादेव रामचंद्र मुरळे २७ रा. दिनकर रामकृष्ण लकडे, २८ रा. गंगावर रावजी पिंगळे, २९ रा. श्रीनिवास बनहट्टी, ३० रा. दामोदर वासुदेव पाध्ये,३१ रा. हरी वहिरव मंडावले, ३२ रा. आबाजी बाळकृष्ण अगटे, ३३ रा. बापू गोविंद आखरे, ३४ रा. राजाराम आप्पाजी मंडावले, ३५ रा. गोविंद बाळकृष्ण मिरासदार, ३६ रा. पांडूरंग रावजी जोशी, ३७ रा. रंगनाथ नरहर रोंघे, ३८ रा. दत्तात्रेय पांडूरंग जोशी, ३९ रा. रामकृष्ण पांडूरंग कुलकर्णी, ४० रा. महादेव विष्णु ढवळे, ४१ रा. गणेश पाडुरग खिरास्ते. इ. दोन बैठकी झाल्या. दुसऱ्या बैठकीस ही कांहीं मंडळी हजर होती. पण त्या वेळचे सह्यांचे कागद सांपडले नसल्यामुळें दिले नाहींत.

गोवर्धनांची बाजू चांगल्या तऱ्हेनें मांडण्याचें श्रेय रा, मंडावले वकील व रा. पाध्येशास्त्री व रा. देवराव नाईक यांच्याकडे आहे. आणि आमच्या मतांत जो फरक घडून आला याचें कारण जो पुरावा होता तो तर आहेच पण या तीन गृहस्थांची मांडणी देखील तितकीच कारण आहे.

ज्ञातिनिर्णयासाठीं जीं कमेटी नेमली होती तिनें जो कच्चा मसुदा तयार केला तो आफिसांत आहे कच्च्या मसुद्याचा पक्का मसुदा प्रसिद्धीसाठीं कधींच झाला नाहीं. आणि गोवर्धनासंबंधीं जो मजकूर ज्ञानकोशांत लिहिला गेला तो त्या कच्च्या मसुद्यावरूनच लिहिला गेला. तो मसुदा पुढें दिला आहे.

ज्ञातीच्या प्रश्नावर निकाल द्यावयाचा म्हणजे अगोदर पुढें आलेला पुरावा आणि नंतर निकाल असा अनुक्रम असावा लागतो. जेव्हां आमच्या निकालाचेंच परीक्षण होत असेल तेव्हां तो निकाल प्रथम देऊन नंतर तो निकाल देण्यासाठीं पुढें आलेला पुरावा देणें हा क्रम उत्पन्न होतो, म्हणून तो येथें अंगिकारितों.

गोवर्धन ज्ञातिनिर्णय

" गोळक " व " गोवर्धन ब्राह्मण " या नांवानें जी ज्ञाति ओळखली जाते तिच्याविषयींचा मुख्य ऐतिहासिक प्रश्न म्हटला म्हणजे हा कीं, ही ज्ञाति मूळचीच ब्राह्मण आहे कीं, व्यभिचारोत्पन्न एका ज्ञातीनें आपणांस गोवर्धन हें नांव वर्णाविषयक महत्त्वाकांक्षेनें लावून घेतलें आहे एवढाच कायतो प्रश्न पुढें आहे.

कुंड आणि गोळक या नांवानें धर्मशास्त्रांत उल्लेखिलेले जे वर्ग आहेत त्यांस ब्राह्मण म्हणावें किंवा म्हणूं नये, त्यांची गणना कोणांत करावी हा प्रश्न आमच्यापुढें नाहीं. आणि यासाठीं कुंड किंवा गोलक या जारज वर्गांस देखील ब्राह्मणांचे अधिकार दिले आहेत असें सिद्ध करण्यासाठीं गोवर्धनांनीं मांडलेला वादविवाद आमच्या विचारक्षेत्राबाहेरचा असल्यामुळें तो आम्हीं पूर्णपणें उपेक्षितों. आम्हांस पहावयाचें तें हें कीं,

(१) गोवर्धन ब्राह्मणांच्या अस्तित्वाबद्दलचा आधार कितपत जुना आहे.

(२) ज्या ज्या काळीं त्यांचा उल्लेख सनदांतून केला जातो त्याकाळीं त्यांचा अंतर्भाव ब्राह्मणांत होत होता काय.

आमच्यापुढें जीं अनेक पत्रें व सनदा आल्या त्यांत शालिवाहन शके १६८१ सालचें पत्र जुनें आहे, याहून जुन्या पत्राचें अस्सल आमच्यापुढें आलें नाहीं. त्यांत लक्ष्मण नरहर भट उपाध्ये यांस गोवर्धन म्हणून धर्माधिकार दिलेले आहेत म्हणजे बाळाजी बाजीरावांच्या कारकीर्दींत गोवर्धन हें नांव रूढ होतें, त्यांस ब्राह्मण म्हणत होते आणि त्यांस धर्माधिकार होते एवढें निश्चित होतें. आदिलशाहींतील सनद आणि त्या सनदेवर पेशवाईतील ठराव ही दोन्ही अस्सल आमच्यापुढें न आल्यामुळें जमेस धरली नाहींत पण तो पुरावा खरा असणें अशक्य नाहीं.

गोवर्धन हा शब्द महाराष्ट्राच्या बऱ्याच भागास लावीत असत ही गोष्ट निश्चित आहे. तसेंच गोवर्धन आज अनेक जातीचे व ठिकाणचे उपाध्येपण व जोशीपण करतात ही गोष्टहि निश्चित आहे. आगळे ज्ञातीकडून ज्ञानकोशमंडळास आलेल्या माहितींत ही गोष्ट नभूद केली आहे. आज ब्राह्मणांचे सर्व कर्माधिकार गोवर्धनांस आहेत शिवाय उत्तर कोंकणांतील माध्यंदिनांच्या प्रसिद्ध सनदांत त्यांनीं आपली वृत्ति गोवर्धनांपासून बिंबामार्फत घेतली असा पुरावा आहे. यावरून गोवर्धन ही ब्राह्मणांची जुनी स्वतंत्र जात असावी असें दिसतें.

गोवर्धनांनीं पुढें मांडलेल्या पुराव्यांत असें सांगितलें आहे कीं. ते अधर्मसंतति नाहींत. असते तर त्यांची आडनांवें इतर ब्राह्मणांतलीं असतीं पण त्यांची

आडनांवें इतर ब्राह्मणांतली नाहींत. प्रस्तुत विधान अयथार्थ आहे. गोवर्धनांतहि बिवलकर, मंडलिक; फाटक, खरे, साठ्ये वगैरे कोंकणस्थांत असलेलीं आडनांवें आहेत. भालेराव, दास्तानें, डांगे वगैरे देशस्थांतील आडनांवें आहेत. तथापि गोवर्धनांतील विश्वाते, शूल, टापरे, कंथे इ. आडनांवें बरींचशीं किंबहुना निम्म्याहून अधिक आडनांवें अगदीं स्वतंत्र आहेत यांत शंका नाहीं. निराळ्या आडनांवाच्या पुराव्यावरून कांहीं निर्णय करतां येईल तर हा कीं, ही 'जात' इतर ब्राह्मण जातींपासून अगदीं पृथक् आहे. सदृश आडनांवावरून निर्णय दोन प्रकारचे निघतील, ते हे, कीं कोंकणस्थ ब्राह्मण देशस्थ व कऱ्हाडे ब्राह्मण प्रभु, मराठे यांत अनेक आडनांवें ज्या कारणांमुळें सामान्य असतील त्याच कारणांमुळें कांहीं आडनांवें देशस्थादि ब्राम्हणांत व गोवर्धनांत एक असतील. दुसरा असा संभव आहे कीं अन्य जातींतील माणसें गोवर्धनांत शिरली असतील व त्यांस कारण शिरलेल्या व्यक्तींचा जन्म विधवेपासून झाला असावा; या खेरीज अन्य कारणेंहि असणें अशक्य नाहीं. भिन्न ब्राम्हण जातींतील माणसें गोवर्धनांत शिरली असल्यास व विधवासंततीहि गोवर्धनांनी स्वीकारली असल्यास जातीची कांहीं काळपर्यंत ज्ञातिनियमनाविषयक नीति मात्र स्पष्ट होईल, तेवढयावरून जातीच्या स्वतंत्र अस्तित्वास किंवा ब्राम्हणजातित्वास बाध येत नाहीं.

गोवर्धनांशीं इतर ब्राह्मण आज उघडपणें अन्नव्यवहार करीत नाहींत असें पुढें आक्षेपकांनीं आणलें आहे व गोवर्धनांनीहि ही गोष्ट मान्य केली आहे आणि ही गोष्ट ब्राम्हण्यास बाध आणूं शकत नाहीं; असें अनेक ब्राम्हणांमध्यें असलेला अन्नोदक व्यवहाराचा अभाव पुराव्यादाखल मांडून दाखविलें आहे. गोवर्धनांनीं याचें कारण व्यावहारिक स्पर्धा असावी असें मांडलें आहे, तें अशक्य नाही. ऋग्वेदी गंगातीरवासी गोवर्धन यांनी पुढें जी कैफियत मांडली आहे; त्यांत उत्तरकोंकणातील यजुर्वेदी गोवर्धन आमच्यांतील नाहीत असें म्हटलें आहे. व सनदी गोवर्धन ते आम्ही आहोंत असें म्हटलें आहे. सनदी गोवर्धन ती कोणती घराणीं हा प्रश्न आमच्यापुढें नसल्यामुळें त्यांच्या कैफियतीचा आम्हांस सध्यां विचार कर्तव्य नाहीं.

ज्याअर्थीं गोवर्धनांत ऋग्वेदी व यजुर्वेदी असे दोन्ही भेद आहेत त्याअर्थीं गोवर्धनांचा वर्ग विशिष्टवेदानुयायी न धरतां कोंकणस्थांप्रमाणें प्रादेशिक म्हणण्यास हरकत नाहीं.

वरील कारणांमुळें गोवर्धनांचा उल्लेख ज्ञानकोशांत गोळक या सदराखालीं न करतां गोवर्धन या सदराखालीं करावा, आणि कोंकणस्थ–देशस्थांप्रमाणें त्यांचा अंतर्भाव महाराष्ट्रीय ब्राम्हणांत प्रादेशिक जात म्हणून करावा अशी आम्हीं ज्ञानकोशसंपादकांस शिफारस करतों.

वरील गिर्णयांतील वाक्यें आमच्या ज्ञानकोशांतील लेखांत आलीं आहेत व त्यावरच टीकेचा मारा नेमला आहे. आमच्या विरुद्ध घेतलेले आक्षेप येणेंप्रमाणें आहेत.

(१) आम्ही गोळक हा अपमानास्पद शब्द वापरला.

(२) आम्ही गोवर्धनांच्या ज्ञातीमध्यें व्यभिचारोत्पन्न किंवा पुनर्विवाहाची संतति गेली असेल अशी कल्पना उत्पन्न करून दिली.

(३) आणि त्यास इतर ब्राह्मणांच्या आडनावांचें अस्तित्त्व हा पुरावा असणें शक्य आहे हें कबूल केलें.

या तिन्ही विधानांना उत्तर असें आहे कीं गोळक हा शब्द आम्हीच वापरला असें नाहीं तर हा शब्द त्यांच्याच लेखकांनीं व ग्रंथकारांनीं वापरला आहे आणि गोळक याच्या ऐवजीं " गोलेक " असें नांव रूढ करण्याचा प्रयत्न देखील कित्येकांनीं केला आहे.

या जातीसंबंधीं गॅझेटिअर, सेन्सस रिपोर्ट वगैरेमध्यें जी माहिती आम्हांस मिळाली त्या माहितींत गोवर्धन या ज्ञातीबद्दल बहुतेक ठिकाणीं ' गोलक ' म्हणून पर्यायनाम दिलेलें आढळलें. एवढेंच नव्हे तर या ज्ञातींतीलच बडोदें येथील एक गृहस्थ रा. हणमंत रघुनाथ जोशी यांनीं पाठविलेल्या ' स्वशाखीय बांधवांस विनंति' या नांवाच्या पुस्तकांत (पृ. १८, १९, २६, २७ इत्यादि) व ता. २१ माहे मे सन १८८७ रोजीं प्रसिद्ध केलेल्या एका जाहिरातींत जो एका खटल्याचा निकाल दिलेला आहे त्यांत (' गोळक ब्राह्मणांचे बेअदबीचे खटल्यांचा निकाल ' व ' विष्णु अनंत भटजी वैद्य, समस्त गोळक ब्रम्हवृंदांचे उपाध्ये व धर्माधिकारीं यांचे आज्ञेवरून ' वगैरे तऱ्हेचे) या ज्ञातीसंबंधीं ज्ञातींतील गृहस्थांनीं गोळक ब्राह्मण असे उल्लेख केलेले आढळले.

आतां याप्रसंगीं ज्ञानकोशकारांस दोन्ही बाजू वाचकांपुढें ठेऊन निर्णय वाचकांवरच सोंपवून मोकळें होतां आलें असतें परंतु या प्रश्नाचा निश्चित निकाल लागून एका जातीवरचा प्रवाद जर अजीबाद काढून टाकतां आला तर ज्ञानकोशामार्फत तें एक मोठें कार्य होईल व निश्चयात्मक मत समाजापुढें मांडतां येईल (म्हणून आम्ही मुद्दाम खटपट केली; आणि गोवर्धनांच्या सुदैवानें आम्ही गोवर्धनांस अत्यंत अनुकूल अशा निर्णयास पोंचलों असल्यामुळें आमच्या मनांत आलेल्या प्रत्येक प्रश्नास व निकालांत उत्तर दिलें आहे.

उलटपक्षीं ' दंडकारण्य देशांतील आर्य ब्राह्मण ' नांवाच्या पत्रकांत या शब्दाचा व गोवर्धन ब्राह्मणांचा कांहीं संबंध नाहीं असें विवेचन केलेलें आढळलें.

गोलक व गोवर्धन ब्राम्हण हे एकच किंवा काय या प्रश्नासंबंधीं जाहीर रीतीनें चर्चा करून गोवर्धन ब्राह्मणासंबंधीं गोळक शब्दाचा जर अपप्रयोग होत असेल तर त्याचें निराकरण करावें व जातीची इतिहासास धरून साधार व वास्तविक माहिती ज्ञानकोशांत अंतर्भूत व्हावी व इतरहि ज्ञातीसंबंधीं जेथें संशयित माहिती असेल तेथें ती निश्चित स्वरूपाची मिळावी म्हणून ज्ञानकोशमंडळांतील, कायद्याशीं परिचित व ऐतिहासिक पद्धतीचा अभ्यास केलेले अशा गृहस्थांची निवड करून एक जातिनिर्णायक कमिटी नेमण्यांत आली. त्या कमिटींत रा. यशवंत रामकृष्ण दाते, बी. ए. एल् एल्. बी. (अध्यक्ष); शंकर पांडुरंग पारखी, बी. ए. एल. एल. बी.; सर्वोत्तम बासुदेव देशपांडे, बी. ए. हे गृहस्थ असून रा. चिंतामण गणेश कर्वे बी. ए. यांस या कमिटीचे चिटणीस नेमण्यांत आले.

आम्ही जी चौकशी केली तिचा हेतु देखील जाहीरपणे स्पष्ट केला होता तथापि आम्ही शंकराचार्यांचे अधिकार आमच्याकडे घेतों म्हणून आमच्यावर प्रबोधनफर्तें वगैरेंकडून टीका झालीच.

ज्ञानकोशकारांची विनंति

ज्ञानकोश मंडळाकडे अनेक जातींकडून, आमचा तुम्ही ब्राह्मण म्हणून आपल्या ग्रंथांत उल्लेख करा अशा तऱ्हेचीं पत्रें आलीं आहेत. त्याचप्रमाणें अमक्या जातीस ब्राह्मण म्हणून लेखूं नका अशा तऱ्हेची इच्छाहि प्रदर्शित केली आहे.

कोणत्याहि जातीचें चातुर्वर्ण्यांत स्थान ठरविण्याची जबाबदारी ज्ञानकोश मंडळ घ्यावयास तयार नाहीं. तथापि कांहीं प्रश्न केवळ इतिहास—स्वरूपी आहेत त्यांची चर्चा उघडपणें करण्याची ज्ञानकोशकारांची इच्छा आहे. एखाद्या जातीनें आपला इतिहास आमच्याकडे पाठविला तर त्यांतील ऐतिहासिक भागाची उघडपणें चर्चा केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. उदाहरणार्थ कुडाळकर ब्राह्मण हा सारस्वतांचा एक भेद आहे कीं,सारस्वतांव्यतिरिक्त निराळा वर्ग आहे इत्यादि ऐतिहासिकदृष्ट्या विवेचन करण्यास हरकत नाहीं.

या प्रश्नावर आम्हांस जें कांहीं लिहावयाचें तें लिहिण्यापूर्वी त्या प्रश्नामध्यें ज्यांचे हितसंबंध अडकले आहेत अशा लोकांस आपलें म्हणणें सविस्तर मांडण्यांची व आमच्याकडे काय माहिती आली आहे ती तपासून तीस प्रत्युतर देण्याची संधि देणें अवश्य आहे.

प्रस्तुत हेतूच्या सिध्यर्थ ज्ञानकोशमंडळांतील संपादकवर्गापैकीं इतिहासशोधनाच्या तत्त्वांशीं व कायद्याशीं परिचित असलेल्या तीन मंडळींची (रा. रा. यशवंत रामकृष्ण दाते बी. ए. एल्. एल् बी; रा. रा. शंकर पांडुरंग पारखी एल्.एल्.बी;व रा. रा सर्वोत्तम वासुदेव देझपांडे बी. ए.) कमेंटी नेमली आहे. तर ज्यांस या बाबतींत कांहीं लिहावयाचें असेल किंवा मंडळापुढें मांडावयाचें असेल त्यांनीं आपलें म्हणणें या कमेटीपुढें मांडावें.

या कमेटीच्या बैठकी शनिवारीं दुपारीं तीन वाजल्यापासून ६ वाजेपर्यंत होतील. पाहिली बैठक फेब्रुवारीच्या पाहिल्या शनिवारीं होईल.

या कमेटीपुढें जी माहिती येईल ती प्रसिद्धपणें स्वीकारली जाईल. व चर्चेसाठीं घेतलेले प्रश्न आणि ते कोणच्या तारखेस निवतील तेंहि आगाऊ प्रसिद्ध होईल. ता. १८।१।२२] [लोकमान्य २७।१।२२

श्रीधर व्यंकटेश केतकर.

गोळकांविषयीं विचार

" सामाजिक इतिहासाविषयीं वादग्रस्त प्रश्नाच्या " निर्णयासाठीं त्यांची चौकशी उघड करण्याचें ठरवून जे निर्णायक नेमिले, त्यांची गोळक उर्फ गोवर्धन यांच्या प्रश्नांचा निर्णय करण्यासाठीं पूर्वी जाहीर केल्याप्रमाणें पहिली बैठक ११ फेब्रुवारी १९२२ रोजीं ३ वाजतां ज्ञानकोशकार्यालयांत भरली होती.

बैठकीस रा. मंडावले वकील (मुंबई), रा. पालये शास्त्री, रा. देवराव नाईक (मुंबई), रा. महाजन (आकोला) इत्यादि त्या ज्ञातीची अदमासें ५० मंडळी हजर होती. बैठकीस गोवर्धनब्राह्मणसभा मुंबई, पुणें, आकोला या संघांकडून प्रतिनिधी आले होते.

सुरवातीपूर्वी डॉ. केतकर यांनीं निर्णायक मंडळी तटस्थपणें केवळ ऐतिहासिक विचार करणार आहेत, जातीस बाहिष्कृत ठेवावें किंवा नाहीं या प्रकारच्या प्रश्नाचा ते विचार करणार नाहींत, यासाठीं ऐतिहासिक प्रश्नाशिवाय दुसरे प्रश्न कोणीं उपस्थित करूं नयेत असें सांगितलें.

रा. सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांनीं पूर्वपक्ष करून त्यांत असें सांगितलें कीं सध्यां संबोधिले जाणारें गोलक शास्त्र, आचार व व्यवहार यावरून पाहतां ब्राह्मण नाहींत. आपल्या म्हणण्याला त्यांनीं आधार दाखविले.

याला पालयेशास्त्री यांनीं उत्तर दिलें कीं, गोळक हा विशिष्ट जातिवाचक शब्द नाहीं. महाराष्ट्रांतील प्राचीन गोवर्धन प्रांतांतील ब्राह्मणांनां गोवर्धन ब्राह्मण असें नांव आहे, दोन हजार वर्षांपासून आब्राह्मणशुद्रांत गोवर्धन पौरोहित्य करीत आले आहेत. अन्नोदकव्यवहाराभास ब्राह्मण्यांस विरोधक नाहीं.

नंतर प्रत्युत्तरादाखल कोणास बोलावयाचें असल्यास तसें करण्याची परवानगी दिली. दोघातिघांनीं गोवर्धनांच्या ब्राह्मण्याविषयीं आपलें म्हणणें पुढें मांडिलें. रा. मंडावले यांनीं ऐतिहासिक पुरावे सादर केले व इसवी सन १७४२ पर्यंत निदान गोळक हें नांव आढळत नाहीं असें सांगितलें.

अखेरीस पांच वाजल्यानंतर निर्णायकांनीं ज्ञातीनें रुजू केलेले व करणार असलेले कागदपत्र पाहून विचार करण्यासाठीं आज निर्णय तहकूब ठेऊन त्यासाठीं २२ एप्रिल १९२२ ही तारीख नेमिली व मंडळींचे आभार मानून बैठक खलास करण्यांत आली

चिंतामण गणेश कर्वे

[लोकमान्य ता. १६।२।२२ व लोकसंग्रह ता. १८।२।२२]

कृष्णातीरकर गोवर्धनांचीं कैफीयत

पुणें मिरासदार स्कूल, वेताळ पेठ

श्रीयुत महाराष्ट्र ज्ञानकोश मंडळाचे सेक्रेटरी व व्यवस्थापक यांस

पुणें येथील कृष्णातीरकर कुंडब्राह्मण ज्ञातीकडून कृ. सा. न. वि. वि.

१ आमच्या ज्ञातीविषयीं महाराष्ट्र ज्ञानकोशांत अद्यापि खरी माहिती छापली गेली नाहीं म्हणून व माहितीची उणीव पडल्यामुळें ज्ञानकोश मंडळांनीं चुकीची माहिती प्रसिद्ध करूं नये म्हणून आम्ही आपल्या समाजातर्फे खालील प्रमाणें माहिती सादर करीत आहोंत.

ज्ञानकोशमंडळातर्फे प्रत्येक ज्ञातीच्या उत्पत्ती वगैरे संबंधीं खरा निर्णय मिळवितां यावा या सद्धेतूनें त्यांनीं जें 'न्यायमंडळ' नेमून चिकित्सा चालविली आहे; त्या मंडळामार्फत ता. ११ फेब्रु व २२ एप्रिल (१९२२) ह्या तारखा " गोळक उर्फ गोवर्धन " हे ब्राह्मण आहेत काय ? असा प्रश्न घेऊन त्याची चर्चा करण्याकरितां नेमलेल्या होत्या. सदरील तारखेस वरील ज्ञातीसंबंधीं जो पुरावा आपणापुढें आला आहे, त्याच्या वास्तविक स्वरूपावर या आमच्या माहितीनें प्रकाश पडून आपलें निर्णयाचें कामहि बरेंच सुलभ होईल.

२ " गोवर्धन ब्राह्मण " म्हणून सर्वसामान्य जो समाज प्रसिद्ध आहे त्यांत मुख्यत्वें दोनच ठिकाणच्या लोकांचा समावेश होतो. एक कृष्णातीरकर व दुसरे गंगातीरकर कृष्णेच्या आजूबाजूस जे ब्राह्मण वस्ती करून राहतात ते कृष्णातीरकर ऋग्वेदी गोवर्धन ब्राह्मण होत व गोदावरीच्या आसमंतात राहणाऱ्यांना गंगातीरकर ऋग्वेदी गोवर्धन

ब्राह्मण अशी संज्ञा आहे. कृष्णातीरकर व गंगातीरकर मिळून होणारा समाज हा एक असून त्यांचा परस्परांशीं रोटीबेटी व्यवहार होत असतो. या दोन्ही समाजांची राहणी तंतोतंत देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हणांप्रमाणें असून हे स्नानसंध्यादि नित्य कर्में व दानप्रतिग्रहादि षट्कर्में ब्राह्मणवत् यथाविधि करीत असतात. यांच्या श्रावण्या (यज्ञोपवीत धारण करण्याचा वार्षिक संस्कार) देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणाबरोबर त्यांचे बरोबरीचे नात्यानें केल्या जातात उपनयनादि संस्कार वेदोक्त पद्धतीनें ब्राह्मणांकरवीं करविले जातात. त्यांत कधीं कधीं यांच्या शाखेचे वैदिक ब्राह्मणहि असतात. गायत्रीमंत्राची दीक्षा यांना ऋग्वेदी ब्राम्हण उपाध्यायाकडून दिली जाते. वरील रूढीविरुद्ध आजपर्यंत कोणीहि ऋग्वेदी ब्राम्हणांनीं आक्षेप घेतलेला नाहीं. कांहीं वितंडखोर ब्राम्हणांनीं जोशीपणाच्या वृत्तीच्या कामीं आपला स्वार्थ साधावा व तो गोवर्धनब्राम्हणांस हीनत्व दिल्यानें साधेल म्हणून कांहीं खोडसाळपणा केलेल्यांची एकदोन उदाहरणें आहेत परंतु त्यांचा निकाल कोर्टातून त्यांच्या वतनेंच होऊन गोवर्धन ब्राम्हणास उपाध्ये पणाचा व सर्व ब्रम्हकर्मांचा अधिकार आहे असें शाबीत झालें आहे. असे एक दोन अपवाद सोडले तर या ज्ञातीचा ब्राम्हण जातीशीं कोणत्याहि प्रकारचा वाद व मत्सर नसून ब्राम्हणास हे आपलेच ब्राम्हण समजून पूज्यतेनें वागवितात. खुद्द ब्राम्हणाशीं यांचा रोटीबेटी व्यवहार होत नाहीं परंतु उदकग्रहणास प्रत्यवाय नाहीं असे बद्दल त्यांना मिळालेल्या सनदापत्रांत स्पष्ट उलेख आहे. सार्वजनिक भोजनाचे प्रसंगीं व लग्नकार्यादि बाबतींत ब्राम्हणाच्या येथें जाऊन हे दान–दक्षिणा घेतात व ते देतात. त्याबद्दल आजपर्यंत केव्हांच हरकत झालेली नाहीं. यांचा आहारा–विहार यच्चयावत ऋग्वेदी देशस्थ ब्राम्हणाप्रमाणें असून सांप्रत धर्मभ्रष्टतेच्या काळीं सुद्धां अहारविहारादि बाबतींत हे शुद्ध आहेत हें विशेष आहे.

वरील समाजापैकीं आम्ही माहिती देणारे कृष्णातीरकर आहोंत. आमची वस्ती भोर, पुणें, नसरापूर, परळी, सातारा, कोल्हापूर धामणी, उंब्रज, मिरज, कालें, धारपुडी, पेडगांव व कर्नाटक या बाजूस असून आम्हांस सर्व साधारण कृष्णातीरकर कुंड गोवर्धन ब्राम्हण म्हणतात. आमची उपजीविका कुलकर्णी, जोशीपणाची वतनें व भिक्षुकी यांवर मुख्यत्वेंकरून होते. आमच्यांतील कांहीं लोक शाळामास्तर किंवा इतर सरकारी नोकर आहेत. कांहीं शेतकीवर योगक्षेम चालवितात. मु. उंब्रज ता. कऱ्हाड, जि. सातारा येथील जोशी व उपाध्येपणाचा आमचा हक्क असून ती वृत्ति आज तागायंत आम्ही चालवीत आहोंत. त्याकामीं उंब्रज येथील सरकारी सनद व शंकराचार्यांचें आज्ञापत्र ता. २२।४।२२ रोजीं आपणांस समक्ष दाखविण्यांत आलीं आहेत व त्यांची नोंद माहितीचे पुराव्यांत आपण दाखल केली आहे.

३ आमचे दुसरे ज्ञातिबांधव गंगातीरकर मंडळी यांची वस्ती अहमदनगर जिल्ह्यांतील आश्वी, उंबरी, पुणतांबे, येवलें, नाशिक, वऱ्हाड, बुलढाणा, अकोला, उमरावती इत्यादि ठिकाणीं आहे. त्यांचा निर्वाह मुख्यत्वेंकरून उपाध्येपणा व जोशीपणा यांवर होतो. या मंडळीस तिकडे धर्माधिकारी, भट अशी संज्ञा आहे. हे लोक नोकरी वगैरेवर फारसे निर्वाह करणारे नाहींत. त्यांच्यापाशी उपाध्येपणा व जोशीपणा यांच्या वृत्तीसंबंधीं सनदापत्रें आहेत. तींहि आपणांस ता. ११।२।२२ व ता. २२।४।२२ रोजीं समक्ष दाखविण्यांत आलेलीं आहेत.

याप्रमाणें कृष्णातीरकर व गंगातीरकर मिळून आमच्या ज्ञातिबांधवांची वस्ती उपरिनिर्दिष्ट ठिकाणांखेरीज इतरत्र नाहीं.

४ आतां ता. ११।२।२२ व २२।४।२२ रोजीं जी मंडळी 'आम्ही गोवर्धन ब्राह्मण' म्हणून पुरावा सांगण्याकरितां 'ज्ञानकोश कचेरींत' आली होती त्यांपैकीं बहुतेक कोंकण प्रांतांतील असून अन्य शाखीय होती. त्यांचें वसतिस्थान ठाणा, कल्याण, भिवंडी, माहीम, बदलापूर वगैरे भागांतून आहे. त्यांचा आमचा शरीरसबंध, रोटीबेटीव्यवहार होत नाही म्हणून त्यांनां आम्ही आपले शाखेचे समजत नाहीं. आतां अगदीं अलीकडे चारदोन वर्षांत शहरांतील एक दोन सुधारक म्हणविणाऱ्या लोकांनीं त्यांच्याशीं शरीरसंबंध केल्याचें आढळतें. परंतु त्यास कांहीं व्यक्तीखेरीजकरून आमच्या समाजाची मान्यता नाही. विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट ही कीं, ता. २२।४।२२ रोजीं आपणापुढें त्या मंडळींत मिसळून जे लोक आले होते त्यांत पुढारी या नात्यानें जी मंडळी काम करीत होती त्यांना आम्हीं आमच्या वतीनें मुळींच निवडलेलें नाहीं. आमच्या समाजांतील चार दोन मंडळी त्यावेळीं हजर होती पण सदर मंडळींनीं आम्हास न बोलण्याविषयीं विनंति केल्यावरून (कां ते माहित नाहीं) व आपण होऊन आपणाकडे असलेल्या माहितीवरून गोंवर्धन ब्राह्मणसमाजांत कोणकोणाचा समावेश होतो हा प्रश्न काढाल असें वाटल्यावरून आतांपर्यंत आम्ही तटस्थ राहिलों व सर्व प्रकार निमुटपणें पाहिला.

५ त्यांत असें दिसून आलें कीं, कोंकणस्थ मंडळीबरोबर पुणें येथील लकडे, टापरे, वगैरे मंडळीहि मिसळलेली आहेत. सदर लकडे, टापरे यांचा शरीसंबंध कोंकणस्थांशीं असेल परंतु त्यांचा रोटी व बेटी व्यवहार कृष्णातीरकरांशीं नाहीं व त्यांच्याशीं शरीरसंबंध करण्यास आमचा समाज तयार नाहीं. आमची पुण्यास यापूर्वी बरींच वस्ती होती. अनेक वर्षें या दोन्ही समाजांचें (कृष्णातीरकर व लकडे, टापरे) वास्तव्य पुण्यास असतांहि त्यांच्याशीं आमचा रोटी व बेटी व्यवहार होत नाहीं याचें कारण कांहीं तरी असलेंच पाहिजे. आम्हांस त्या समाजाची कांहींच

माहिती नाहीं व त्यांनीहि ती दाखाविलेली नाहीं.पूर्वी सन १८९४-९५सालीं आमच्या ज्ञातिबांधवांची व लकडे, टापरे यांच्या समाजाची ऐक्यता पुराव्यानिशीं व्हावी-म्हणजे ते आमचेच आहेत अशाबद्दल पुरावा दाखल करून त्यांनीं निर्णय करून घ्यावा—म्हणून सभा भरविण्यांत आली होती. त्यांत आमच्यातर्फे प्रगल्भ विचारांचे विद्वान असे गृहस्थ होते. परंतु त्यांनां तशा प्रकारचा पुरावा आणतां न आल्यामुळें सभा मोडण्यांत आली. त्यासंबंधीं माहिती दिलेले वर्तमानपत्राचे अंक आपणा स समक्ष दाखवीत आहोंत. करितां आमच्या समाजांत कृष्णातरिकर व गंगातरिकर कुंडगोवर्धन ब्राह्मण या नांवानें संबोधिल्या जाणाऱ्या लोकांत—त्यांचा (कोंकणस्थ, लकडे, टापरे) समावेश करणें झाल्यास कागदोपत्रीं—म्हणजे उपाध्येपणाच्या व वेदोक्त कर्माच्या अधिकाराच्या सनदा वगैरे—पुरावा पाहून करावयास चुकूं नये.

६ यजुर्वेदी कोंकणस्थ गो. ब्राह्मण यांनीं एक काल्पनिक मध्यवर्ती मंडळ नेमून ज्ञानकोशमंडळाकडे पाठविल्या जाणाऱ्या सनदापत्रें वगैरे कागद त्या काल्पनिक मंडळीनें निवडून दिलेल्या अर्थात कोणीही न निवडलेल्या सेक्रेटरीमार्फत यावेत व नंतर आपण स्वीकारावेत अशी आपणाशीं अट ठरविल्याचें समजतें तरी तसें केल्यानें आपणांस खरी वस्तुस्थिति कळणार नाहीं व कृष्णातरिकर व गंगातीरकर यांच्या नांवाचीं सनदापत्रें त्यांचेचमार्फत दाखल होऊन कोंणकस्थ, यजुर्वेदी व पुणें येथील लकडे, टापरे हे गोवर्धन ब्राह्मण आहेत असें ठरविण्याचे कामीं या पुराव्याचा उपयोग करण्याचा त्यांचा हेतु दिसतो तो सफल होऊं देऊं नये. कारण त्यापासून मागेंपुढें आमच्या सुरळीत व्यवहारांत अडचणी येण्याचा संभव ओह हें आपणांस थोड्याशा विचारांती कळून येईल. त्यांच्या शाखेच्या उपाध्येपणाच्या सनदा किंवा आज्ञापत्रें त्यांनां निराळीं दाखल करण्यास सांगावें व नंतर योग्य तो निर्णय ज्ञान-कोशांत करावा.

येणेंप्रमाणें वस्तुस्थितीच्या खऱ्या निदर्शनाकरितां ही माहिती कृष्णातीरकर कुंडगोवर्धन ब्राह्मण यांच्यातर्फे देण्यांत आली आहे. कोणाच्या भिडेस्तव ही गाळण्यांत येऊं नये अशी विनंति आहे. आपणापुढें जीं सनदापत्रें आतांपर्यंत दाखल केलीं गेलीं आहेत तीं फक्त आमच्यातर्फे व गंगातीरकरांचीं आहेत हें विशेष लक्षांत घ्यावें.

आमच्या उत्पत्तीविषयीं शास्त्रीय विचार, आमचे आचार विचार नित्यनैमि-त्तिक कर्मांचें आमचे संस्कार व कालस्थित्यनुरूप आम्हांस पावन करून घेण्याची आवश्यकता याबद्दल योग्य अशा निर्णयाचें स्वरूप कसें असावें अशासंबंधीं आमच

मत आम्ही सोबत निराळेंच देत आहोंत तें वाचून व सर्व सूत्रांचा लक्षांत घेऊन ही सर्व हकीकत विस्तृत रूपानें ज्ञानकोशांत छापावी व त्यासंबंधीं ज्ञानकोशमंडळाचा न्यायबुद्धिपुरस्सर विचार करून ठरविलेला निर्णय छापावा अशी विनयपूर्वक सूचना आहे, कळावें ता. १।५।२२.

सूचना—यासंबंधीं पत्रव्यवहार करणें झाल्यास तो खालील पत्त्यावर करावा.

"चिटणीस, कृष्णातीरकर कार्यकारी मंडळ.मिरासदार स्कूल,वेताळ पेठ पुणें."

१ शकर अमृत खडकतकर.
१ दत्तात्रय पांडुरंग जोशी.
१ रामचंद्र गोपाळ ऋषी.
१ अनंत शंकर नाचणे बी. ए.
१ सदाशिव नारायण परलेकर.
१ गोविंद बाळकृष्ण मिरासदार.

मिरासदार--स्कूल वेताळ पेठ.

कुंडगोवर्धन ब्राह्मणांस हल्लीं 'ब्राह्मण' म्हणणें कसें योग्य झालें आहे तत्संबंधीं बुद्धिवाद व या जातीस गैरसमजुतीनें लोक 'गोळक' समजतात; हें कसें चुकीचें आहे हें खालीं लिहिलेल्या विचारांच्यायोगें लक्षांत येईल.

मिताक्षरी स्मृतिः—"यो यज्जातीयाद्यजातीयामुत्पन्नः स तज्जातीय एव। यथा गौर्गवि गौः। अश्वादश्वायाश्वः तस्माद् ब्राह्मण्यां ब्राह्मणोत्पन्नो ब्राह्मणः। द्विजोत्पन्नयोः कुंडगोलकयोरुपनयनसंध्यावंदनादिच परंपरागतं ग्राह्यं ॥ १ ॥" या स्मृतीवरून असा बोध होतो कीं, जो ज्या जातींत उत्पन्न झाला असेल त्यास त्याच जातींत गणावा व ब्राह्मणब्राह्मणीचे पोटीं उत्पन्न झालेला ब्राम्हणच होय असें प्रतिपादिलें आहे.

यावरून उघडच लक्षांत येईल कीं, आम्हांस गायत्रीमंत्रोपदेश, स्नानसंध्यादि कर्म, मौंजीबंधनादि संस्कार व वेदोक्त कर्में करण्याचा अधिकार आहेच व त्याप्रमाणें आजपर्यंत सर्व व्यवहार ऋग्वेदी ब्राह्मणाकरवीं अगर आमचे ब्राम्हणाकरवीं करीत आहोंत व आमचा प्रत्येक ज्ञातिबांधव स्नानसंध्यादि ब्रम्हकर्म नित्य करीत आहे, अन्य जातीचें पाणीहि घेत नाहीं. यांनां उपाध्येपणाच्या सनदा आहेत. भटभिक्षुकीवर यांचा निर्वाह आहे. ब्राह्मणगृहींहि यांना जोशीपणाच्या हक्काचें उत्पन्न व दान-दक्षिणा मिळते यावरून यांना 'ब्राह्मण' म्हणण्यास कोणत्याहि प्रकारची हरकत नाहीं असें विचारांतीं कळून येईल.

"अमृते जारजःकुंडः मृते भर्तरि गोलकः।" असें स्मृतींत म्हटलें असून त्यांत विधवेच्या पोटीं उत्पन्न होणाऱ्यास 'गोळक' ही संज्ञा दिलेली आहे. सुवासिनी ब्राह्मणस्त्रीस ब्राह्मणापासून जारकर्माचे योगें झालेल्या संततीस 'कुंड'

एवढेंच नांव दिलेलें आहे व हे कुंडब्राह्मण जातीचे ब्राह्मणांचे वंशज आहेत हें समजण्याकरितां त्यांस पुढें ब्राह्मण नांव लावणें योग्य झालें आहे. या न्यायानें ज्ञानकोशांत कुंडब्राह्मणांस कुंडगोळक म्हणण्याची पद्धति चुकीनें व्यवहारांत रूढ झालेली आहे हें दाखल होणें अवश्य आहे. ही चुकी ब्राह्मण व इतर समाजाकडून करण्यांत येते याचें कारण त्यांचें या ज्ञातीसंबंधीं असणारें औदासिन्य व हलगर्जीपणा होय असें दिसून येईल. यावेळीं ब्राह्मणांनीं व जगद्गुरु शंकराचार्य यांनीं हेंहि लक्षांत बाळगलें पाहिजे कीं, अशा तऱ्हेची उत्पत्ति करण्यांत मूळ कारण हे ब्राह्मणच असल्यामुळें तेच दोषी आहेत हें ते विसरतात. यांच्या ह्या दोषाचा परिणाम अशा प्रकारच्या झालेल्या वंशांस अनेक प्रकारें लांछनास्पद व अपमानकारक झालेला आहे याचा बोजा त्यांच्यावर आहे. तो त्यांनीं उतरून या जातीस कैक वर्षांनंतर तरी मुक्त करावयास पाहिजे तरच ते मानवज्ञातींतील श्रेष्ठ ज्ञातींत मोडण्यास पात्र आहेत असें आम्ही समजूं.

' अमृते जारजः कुण्डः ' या स्मृतीप्रमाणें कित्येक शतकांपूर्वी अशा तऱ्हेची उत्पत्ति एके वेळीं झाली असेल परंतु त्यानंतर वारंवार अशाच अनाचारापासून उत्पन्न झालेल्या संततीस आपणामध्यें मिसळूं न देतां ही ज्ञाती कायम झाली असल्यामुळें इतक्या शतकानंतरहि ती जारउत्पत्तीची ठरेल हें म्हणणें बुद्धिवंतास पटणें शक्य नाहीं. आमच्यामतें आज कित्येक शतकें आम्हांस शास्त्रोक्त विवाहपद्धतीनें बद्ध होऊन त्यापासून निर्माण झालेली संतति म्हणून आम्ही अस्तित्वांत आलेलों आहों व ब्राह्मणांप्रमाणेंच आम्हांस आईबापें आहेत. त्यामुळें आम्ही जारकर्माची प्रजा नाहीं हें प्रत्येकास कबूल करावें लागेल. ब्राह्मण समाजांत आज कित्येक शतकांपासून व हल्लींहि त्यांच्यांत जारकर्मापासून संतति झालेली नाहीं अगर होत नाहीं असें म्हणणारा कोणता ब्राह्मण छाती ठोकून पुढें येईल ? अशा तऱ्हेच्या संततीच्या आवृत्त्या ब्राह्मण समाजांत अनेक निघालेल्या आहेत व असतील, त्या संततीचा समावेश ब्राह्मण लोक कोणत्या समाजांत करतात व ती दाखवितील काय ? जर आमच्या समाजांत त्यांचा समावेश होत नाहीं व त्यांची जातहि निराळी आढळून येत नाहीं तर अशी प्रजा युक्तीनें त्याच समाजांत मोडत असली पाहिजे; अगर ती निराळ्या शूद्र जातींत (समाजांत) तरी दाखल झाली असली पाहिजे हें उघड आहे.

जर अशा प्रजेची हल्लीं निराळी ज्ञाति बनत नाहीं तर पूर्वीं कोणे काळीं एकाद्या ब्राह्मण-ब्राह्मणीच्या चुकीमुळें अशी प्रजा उत्पन्न झाली असल्यास ती प्रजा जर

पुढें आपल्या आचरणानें उत्तम कुलांत गणण्यास पात्र होऊन पृथक् राहिली असेल तर इतक्या वर्षांनींहि तिचें हीन ज्ञातित्व व हीन नांव जावयास नको काय? या ज्ञातीची अधिक सुधारणा न होण्यास कारण ब्राह्मणांचें औदासिन्यच होय, असें गृहीत धरावयास नको काय?

हल्लीं सुधारणेचा काल आहे. कैक ब्राह्मण आपल्या ब्राह्मणत्वाच्या आचार बिचारास व परंपरेस सोडून वागत असतांहि ब्राह्मणवर्णांतच मोडतात याची जाणीव ब्राह्मणांस आहे काय?

हल्लीं ब्राह्मण–ब्राह्मणी पुनर्विवाह करितात व त्यापासून त्यांना संतति होते त्या संततीस काय नांव देणार व त्यांचा समावेश आमच्यांत तर केव्हांच होत नाहीं तर त्यांची जात बनली आहे काय?

जर अशा पुनर्विवाहित संततीपासून ज्ञाति बनली नाहीं तर कुंड ब्राह्मण ही ज्ञाति संभवते कशी?

अर्थात अशा तऱ्हेची जात कायम असणें ज्याअर्थीं शक्य नाहीं त्या अर्थीं ही कुंडब्राह्मण अगर गोळक ही नांवाची जाति होत नाहीं असें सिद्ध होतें.

अर्थात् अशा प्रकारच्या व्यक्तिवाचक संततीस कांहीं अल्पकाळ ती दुसऱ्या ज्ञातींत समावेश पावेपर्यंत वरील नांवानें संबोधणें योग्य आहे असें दिसून येईल.

हा विचार लक्षांत घेऊन ज्ञानकोशमंडळानें ही समाजांत होणारी मोठी चूक दुरुस्त करण्याकरितां शंकराचार्य वगैरेस लिहून व ब्राम्हण लोकांस सदर दुरुस्ती करून अशा तऱ्हेच्या चुका ते यापुढें न करतील अशा प्रकारचा इशारा वर्तमान-पत्रामध्यें त्या लोकांस द्यावा व ज्ञानकोशांतहि अशा प्रकारचा न्याय नमूद करून ठेवावा.

" सत पिढ्यांनंतर कोणीहि हीनवंश असला तरी तो पूर्वीच्या आपल्या श्रेष्ठ ज्ञातींत–मूळ ज्ञातींत–येऊं शकतो."

या स्मृतीच्या आधाराप्रमाणें आतां आमच्या हजार–पांचशें पिढ्या झाल्या आहेत तेव्हां इतक्या पिढ्यानंतरहि आम्ही या हीन नांवानेंच पाचारिले जावें हें न्यायदृष्ट्या अशास्त्र व जनदृष्ट्या निंद्य कृत्य आहे असें सिद्ध होतें.

समाजास सद्गुरुस्थानी असणारे जे जगद्गुरु श्री शंकराचार्य ते या कामीं औदासिन्य दाखवितात. यावरून त्यांच्या डोळ्यावरहि अद्याप अज्ञानाचें आवरण असल्याचें स्पष्ट होत आहे व त्यामुळें आम्हांस मात्र अपमान सहन करावा लागत आहे. आम्ही छातीठोकपणानें सांगतों की, आम्ही जारकर्मापासून झालेलों नसून आमचे वाडवडीलहि तशा प्रकारची प्रजा नाहीं म्हणून आम्ही आतां कुंडगोवर्धन ब्राह्मण म्हणवून घेण्यास तयार नाहीं. आम्ही शुद्ध 'ब्राह्मण' आहोंत म्हणून ज्ञानकोशांत आम्हांस असा खुलासा पाहिजे की, " हल्ली चुकीनें ज्या लोकांस कुंड गोलक असें लोक समजतात, ते कुंड गोलक नसून ते अज्ञानामुळें तसें समजतात.

हे ऋग्वेदी ब्राह्मण आहेत असें समजावें " व यांच्याशीं अन्नोदक व बेटीव्यवहार करण्यास हरकत नाहीं. पण ब्राह्मण समाजानें या गोष्टीचा निर्णय करणें आतां जरूर झालें आहे.

आतां आम्ही आपणांस ' गोवर्धन ब्राह्मण समजतों याचें कारण आम्ही ब्राह्मणवर्णीय लोक असून पूर्वी आमचा मुख्य व्यवहार गोवर्धन (गाईचें पालन पोषण) करणें हाच होता; व सर्व ब्राह्मणांच्या गाईहि रक्षण करणें आमचें काम होतें व तें पूर्वी थोड्याशा हीन दोषामुळेंच आमच्या पूर्वजांकडे सोंपविलें होतें हेंच होय व नाशिक प्रांतांत आमच्या वंशजापैकीं कांहीनीं गाईच्या मोठ्या कळपांचें संरक्षण केलें म्हणून त्या प्रांतासहि 'गोवर्धन प्रांत' म्हणण्यांत येत होतें हें होय. हें नमूद करून ठेवणें. या कारणास्तवच आम्हांस 'गोवर्धन ब्राम्हण'असें समजतात.या माहितीच्या अभावी कांहीं लोक अज्ञानपणानें आपणांस भलत्याच नावानें संबोधित असतील तर ती त्यांची चुकी होय.

हल्लींच्या सुधारणेच्या काळांत पळशे, देवरुखे,सवाशे, हे पूर्वी ब्राम्हण न समजले जाणारे लोक हल्ली ब्राम्हण समजले जातात तेव्हां तोच नियम आम्हासहि लागू करण्यास काय हरकत आहे ? मूळ ब्राम्हणांची उत्पत्ति आमच्यापासून झाली व ती सशास्त्र झालेली आहे व तेच आम्ही ब्राम्हण आहोंत अशा अर्थाचा पुरावा कोणी ब्राम्हण आणूं शकेल काय ?

चित्पावन ब्राह्मण या नावांवरून चितेपासून पावन केलेले ब्राम्हण म्हणून ते मूळचे ब्राम्हण नाहींत असें सिद्ध होत नाहीं काय ?

जगास आदर्शभूत व श्रुतिस्मृतीस आधारभूत मानलेले व ईश्वराचे अंश मानले गेलेले जे व्यास हे पराशर ऋषीच्या योगें कोळणीचे पोटीं झालेली संतति हे ब्राह्मणांच्या गुरुस्थानी मानले जात नाहींत काय ? भारतादि ग्रंथ वाचले असतां त्यांत असा स्पष्ट उल्लेख आहे की, पुष्कळ क्षात्रिय राजांनीं आपल्या कन्या ब्राम्हण ऋषीस देऊन त्यापासून झालेली संतति ब्राम्हणच गणली आहे. या सर्व गोष्टींचा विचार आपल्या डोक्यांत यावा म्हणून लिहिलें आहे याचा राग नसावा. हा निर्णय जगद्गुरु श्रीशंकराचार्य यांच्या हस्तें करण्यास आपल्यासारख्या वजनदार मंडळींचाच उपयोग होईल असें अ.म्ह.स वाटल्यावरून आम्हांस ठेवावयाचे प्रश्न आपल्यापुढें ठेविले आहेत. तुमच्यामतें हे प्रश्न अस्थानी आहेत व या गोष्टींचा विचार करण्याइतका अधिकारहि तुम्हांस नाहीं असें वाटेल हें आम्हांस कबूल आहे तरी पण आपल्या सारख्या वजनदार मंडळींनीं मनांत आणल्यास आपण कांहीं तरी कार्य करूं शकाल असें आम्हास वाटतें.

ही सोबत जोडलेली कैफीयत आपणांस विचार करण्याचें कामीं मदत होईल म्हणून मूळ कैफीयतीबरोबर जोडण्यांत आली आहे.

इतर ज्ञाती व संप्रदाय

महाराष्ट्रीय ज्ञानकोशांत चित्पावन, देशस्थ व कऱ्हाडे ब्राह्मणांवर लेख कां नाहींत. देवरुखे गोवर्धन इत्यादि ज्ञातींवर लेख आले. या तीन जातींवर लेख लिहिण्याचें मुद्दाम वगळलें काय अशी पृच्छा कांहीं मंडळीकडून करण्यांत आली आहे. महाराष्ट्रीय सारस्वतांवर लेख नाहीं व दाक्षिणात्य गौडांपैकीं फक्त कुडाळ देशकरांवर काय तो लेख आला आहे. ही पृच्छा करणारी मंडळी केवळ या लेख वगळलेल्या ज्ञातींतील नसून इतर ज्ञातींतील आहेत तर या प्रश्नासंबंधानें उत्तर देणें जरूर आहे.

यांचें मुख्य कारण असें झालें. कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे या तीनहि ज्ञातींतील मंडळी आमच्या ऑफिसांत काम करीत असल्याचें लोकांस ठाऊक असल्यामुळें व या तीन ज्ञातींच्या ज्ञातिविशिष्ट संस्था नसल्यामुळें या तीनहि ज्ञातींतील लोकांनीं लेख लिहून पाठविण्याची तसदी घेतली नसावी. कोंकणस्थांच्या जातीसंबंधाचा लेख प्रसिद्ध करण्याचा काळ आला तेव्हां तो लेख तयार नव्हता. तेव्हां संपादकांनीं चित्पावन शब्दाखालीं लेख देण्याचें ठरविलें. चित्पावन शब्द जेथें येईल तेथपर्यंत ग्रंथ छापून झाला तरी लेख तयार नव्हता.तेव्हां ब्राह्मण या सदराखालीं किंवा "महाराष्ट्रीय ब्राह्मण" या सदराखालीं लेख घालूं असें योजिलें. पण तोहि प्रसंग आला आणि तेव्हांहि लेख तयार नव्हता.व ज्ञानकोशाचीं पानें वाढूं देऊं नयेत म्हणून फारसे जास्त लेख तयार करूं नयेत, जे लेख तयार आहेत त्यांसच संक्षेप द्यावा ही वृत्ति संपादकांनां अवश्य झाली. व लहानसा लेख लिहून मोकळें होण्याची इच्छा मात्र संपादकांनां नव्हती. या लेखांनां भरपूर पृष्ठें द्यावींत अशी इच्छा होती आणि त्यामुळें त्या लेखांनां संकल्पित महाराष्ट्र विभागांत स्थान देण्याचें ठरविलें. सारस्वत ब्राह्मणांवर लेख लिहिण्याचा प्रसंग आला तेव्हांहि दाक्षिणात्य सारस्वत स्थलसंकोचामुळें वगळले गेले आणि त्यांनां महाराष्ट्र विभागांत स्थान देण्याचें ठरविलें. उत्तर कोंकणांतील देशस्थ माध्यंदिनांनां ज्ञानकोशांत स्वतंत्र स्थान न मिळण्याचें कारण झालें तें येणेंप्रमाणें: या वर्गासंबंधानें वाद उपस्थित झाला होता. आणि यासंबंधी त्या ज्ञातीनें माहितीहि पाठविली होती. कै. प्रो. आचार्य, डॉ. पुरंदरे, रा. केशवराव पाध्ये, यांसारख्या जबाबदार पुढाऱ्यांच्या सह्याहि होत्या. त्या माहितीवर जर कोणास आक्षेप घ्यावयाचा असेल तर तो घ्यावा असें आम्ही जाहीरपणें आव्हानहि केलें होतें. या ज्ञातीला देशस्थ माध्यंदिनांत लेखूं नये असें म्हणणाऱ्या मंडळीस आपला पुरावा पुढें मांडण्यासाठीं जितकी जास्त सवलत देतां येईल तितकी द्यावी असें आम्हांस उत्तरकोंकणच्या माध्यंदिनांपैकी रा. ब. जोशी, केशवराव पाध्ये, कै. आचार्य, डॉ. दांडेकर, इत्यादि मंडळींनीं मुद्दाम कळविलें होतें. पण त्या माहितीवर कोणीहि पुराव्यासह आक्षेप न घेतल्यामुळें यांचा इतिहास द्यावयाचा झाल्यास तो इतर देशस्थ माध्यंदिनांच्या इतिहासाचीच पुरवणी म्हणून द्यावा म्हणजे स्वतंत्रपणें देण्याचें कारण नाहीं असें आम्ही ठरविलें, तर देशस्थ ब्राह्मणांचा इतिहास जसा महाराष्ट्र

३६५

विभागांत घालण्याच्या अपेक्षेनें वगळला गेला त्याबरोबरच उत्तरकोंकणस्थ माध्यंदिनांचाहि वगळला गेला. त्यांचा इतिहास गाळण्याचें कारण त्यांच्याविषयीं विरोधबुद्धि होती असें नाहीं. त्यांचा जो कांहीं स्वतंत्र इतिहास आहे तो देशस्थ—यजुर्वेदी ब्राह्मणांचें विवेचन करतांना त्याचाच भाग म्हणून येईल.

देवरुखे आणि गोवर्धन या दोन ज्ञातींशिवाय तिसरी विरुद्ध लेखन करणारी ज्ञाति म्हटली म्हणजे सारस्वतांची होय. यांच्याविषयीं माहिती ज्ञानकोशांत आलीच नाहीं आणि कुडाळदेशकर ब्राह्मणांवर जो लेख रा. बांबेंडकर यांनीं पाठविला त्या लेखाविरुद्ध सारस्वत मंडळींत बराच आक्षेप उत्पन्न झाला. जर एखाद्या ज्ञातीला आपल्यासंबंधानेंच लिहावयास सांगितलें तरी त्यामुळें कसे प्रसंग उत्पन्न होतात हें दिसून येतें. ज्ञातीविषयीं लेख लिहितांनां ज्या त्या ज्ञातीला आपल्याविषयी लिहूं दिल्यानें विरोध टळेल अशी अपेक्षा केल्यास तीहि फसतें असें दिसून येतें, कायस्थ प्रभूंच्या ज्ञातीकडून आलेला लेख आम्ही दिलेल्या मुद्यावर लिहून आल्यामुळें जसाचे तसाच छापला. पण पाठारे प्रभूंची तशी गोष्ट नाहीं त्यांच्यामध्यें कंचोळे म्हणून जी जात आहे तिचा अंतर्भाव रा. नायक यानीं पाठारे प्रभूंमध्येंच केल्यामुळें त्या ज्ञातीच्या पत्रांतून संतापलेली बरीच टीका प्रसिद्ध झाली. तिची हकीकत विद्यासेवकांत पूर्वी (वर्ष ३ अंक ११।१२)) प्रसिद्ध झालीच आहे. ज्ञानकोशाची माहिती जसजशी इतरत्र होऊं लागली आहे तसतसा ज्ञानकोशांतील लेखांवर आक्षेप देखील इतर लोक घेऊं लागले आहेत. अहीर ,गोलाल जातीचे लोक आतां अभीर हे यादव नव्हत असें जें मत ज्ञानकोशांत प्रतिपादन केलें आहे त्यालाच आक्षेप घेत आहेत. त्यांच्या पाटना येथील परिषदेंत मराठी ज्ञानकोशाचा निषेध केला आहे.

गुजराती जैन संस्थांच्या ज्ञानकोशाविरुद्ध सभा झाल्या पण त्यांच्यामध्यें आणि ज्ञानकोशमंडळामध्यें आतां स्नेहाचा संबंध उत्पन्न झाला आहे. जेव्हां जैन धर्मासंबंधानें लेख पुरवावेत म्हणुन महाराष्ट्रीय ज्ञानकोशाच्या संपादकांनीं खटपट केली तेव्हां त्यांनीं तिच्याविषयीं सहानुभुतीनें मदत केली नाहीं. तथापि आतां मदत चांगली मिळेल अशी अपेक्षा आहे. कांहीं जैन साधुंनीं (उदाहरणार्थ दर्शनविजयजींनीं) ज्ञानकोशांतील जैनविषयक सर्व लेख तपासून कोठें मतभेद झाला आहे किंवा त्यांच्यामतें चुक असेल, तें दाखवून. देण्याची तयारी करीत आहेत. गुजराथेंत वल्लभपंथी देखील मंडळी ज्ञानकोशावर नाखूष झाली आहेत. आणि त्यांच्या सभा भरत आहेत. निरानिराळ्या ज्ञातीचा गहजब बहुतकरून ज्या कारणामुळें होतो तो असत्य प्रसिद्ध केल्यामुळें होत नसून सत्य प्रसिद्ध केल्यामुळेंच होत असतो असेंच पुष्कळदां आढळून येतें.